ग्रंथाली वाचक चळवळ

# रुची

दिवाळी अंक

मूल्य ८० रुपये

ऑक्टोबर-नोव्हेंबर २००९






# असे बचत खाते उघडा
## जे तुम्हाला देईल भरपूर लाभ
## त्याच प्रमाणे अपघात विमा देखील

सादर आहे स्टार डायमंड आणि स्टार सुरक्षा बचत खाते* (सेविंग्ज अकाउंट्स*) जे तुम्हाला देतील बचतीपेक्षा अधिक काही, मिळवा असेच काही लाभ :

• विनाशुल्क एसएमएस/फोन/एटीएम आणि इंटरनेट बँकिंग • पर्सनलाइज्ड चेक बुक • डिमांड ड्राफ्टची विनाशुल्क घरपोच सेवा • खात्याचे विनाशुल्क विवरण (मागणीनुसार) • इंटरनॅशनल गोल्ड क्रेडिट कार्ड • इंटरनॅशनल डेबिट कार्ड • रिलेशनशिप मॅनेजरची उपलब्धता • इंटरनेट बँकिंग द्वारा विनाशुल्क RTGS/NEFT • डेबिट/क्रेडिट व्यवहारांसाठी विनाशुल्क एसएमएस अॅलर्ट्स • विनाशुल्क डीमॅट अकाउंट • चेकचे विनाशुल्क स्टॉप पेमेंट • विनाशुल्क इनवर्ड चेक रीटर्न • व्यक्तिगत/रीटेल कर्जावरती प्रक्रिया शुल्क माफ

*अटी लागू

*Relationships beyond banking*

बैंक ऑफ़ इंडिया
Bank of India

मुख्य कार्यालय : स्टार हाउस, सी–5, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई – 400 051.

Visit us at www.bankofindia.co.in

57675 ला BOI <CITY> एसएमएस करा. उदा. "BOI MUMBAI" / कॉल सेंटर 022 40919191

# आतां सूर्यकिरणांचे बहुविध उपयोग अन जोडीला जैन गुणवत्ता !






## जैन सौरबंब

सूर्याचे उष्णतेवर पाणी तापविण्याची स्वतंत्र यंत्रणा.
नको वीज. नको रॉकेल. नको गॅस. नको लाकूडफाटा.
जवळ जवळ शून्य मेंटेनन्स. दोन मॉडेल्स्
व सोयीस्कर अशा विविध क्षमतेत उपलब्ध



## जैन ज्योत कंदील

७ वॅटचा सीएफएल दिवा. भरपूर स्वच्छ प्रकाश.
१२ व्होल्टची सील्ड मेंटेनन्स फ्री बॅटरी.
अत्यंत कार्यक्षम इलेक्ट्रॉनिक सर्किट, सोलर पॅनल.




## जैन ज्योत होम लाइटिंग सिस्टिम

७ किंवा ९ वॅटचे लँप + डीसी फॅन
किंवा ब्लॅक ॲण्ड व्हाईट टीव्ही लागेल अशी यंत्रणा.
दररोज ३-४ तास वापर शक्य.
सोबत बॅटरी, सोलर पॅनेल अशी स्वयंपूर्ण यंत्रणा.
ग्राहकाच्या आवशकतेनुसार सिस्टिम उपलब्ध.




## जैन ज्योत पथ दिवे

**एकाच खांबा**वर उभी राहणारी स्वयंपूर्ण यंत्रणा.
११ वॅट **सीएफएल** ट्यूब व सोलर पॅनेल,
**चार्जिंग बॅटरी**सह परिपूर्ण यंत्रणा.

### आमचा निसर्गासोबत संयुक्त प्रकल्प

जैन अपारंपारिक ऊर्जा | TÜV NORD ISO 9001 | जैन सोलर®

अधिक माहितीसाठी लिहा. : **जैन इरिगेशन सिस्टिम्स् लि.,** अपारंपारीक ऊर्जा विभाग, जैन एनर्जी पार्क ,शिरसोली रोड, जळगांव.
फोन: ०२५७-२२६००१३, २२६००११/२२; फॅक्स: ०२५७-२२६११२२/४४; ई: मेल: solar@jains.com; वेबसाईट: www.jains.com

**विक्री प्रतिनिधी: जळगाव:** ९४२२७७५९२७, ९४२२७७६८६३; **रावेर/यावल:** ९४२२७७५९२८; **औरंगाबाद:** ९४२२७७५९२९; **अहमदनगर:** ९४२२७७५९३०; **पुणे/बारामती:** ९४२२७७५९३१, ९४२२७७५९३२; **सोलापूर:** ९४२२७७५९३३; **सांगली/ सातारा:** ९४२२२८३४२६; **नाशिक:** ९४२२७७५९३५, ९४२२७७४३२४; **अमरावती:** ९४२२७७५९३७; **ठाणे:** ९८७०९९०७५०,९४०३०८०१२०; **कोल्हापूर:** ९८२३७२४९१९; **रत्नागिरी:** ९४२२७७५९३९; **नागपूर:** ९४२२७७५९४०.


16x22




Non Bleed 16 (w) x 22 (h)


भारतीय स्टेट बँक
तुमच्या सोबत - प्रत्येक क्षणी
निवळ बँकिंग.
बाकी काहीच नाही.
दिपावलीचा आनंद द्विगुणित करा
स्टेट बँकेच्या शुद्ध सोन्याच्या नाण्यांसह
स्टेट बँक, भारतातील सर्वात विश्वसनीय बँक,
सादर करीत आहे शुद्ध सोने - 999.9 शुद्धता.
• ॲसे द्वारा प्रमाणित आणि टॅम्पर-प्रूफ पॅकेजिंग.
• सोन्याचा दररोज जो काही भाव असेल, त्या आधारे किंमत.
• गुंतवणूक, वैयक्तिक व कॉर्पोरेट गिफ्टिंगसाठी आदर्श.
• सोन्याची नाणी 2 ग्रॅम, 4 ग्रॅम, 5 ग्रॅम, 8 ग्रॅम व 10 ग्रॅम मध्ये उपलब्ध.
(निवडक शाखांमध्ये 20 ग्रॅम व 50 ग्रॅम सुद्धा)
शुद्धतेची पुरेपूर खात्री
संपूर्ण भारतात निवडक शाखांमध्ये उपलब्ध. अधिक माहितीसाठी : जवळच्या एसबीआय शाखेला भेट द्या / 24x7 हेल्पलाईन 1800 11 22 11 (बीएसएनएल / एमटीएनएल लॅण्डलाइन वरुन टोल फ्री) किंवा 080-2659 9990 (इतर लाइन्स) वर संपर्क करा /
इ-मेल : contactcentre@sbi.co.in
प्रत्येक भारतीयाची बँक


THE SHAMRAO VITHAL CO-OPERATIVE BANK
SVC
दि शामराव विठ्ठल को-ऑप. बँक लि.
एक परिपूर्ण बँक
नातं तुमचं आमचं... सुमारे ४ पिढ्यांचं... १०३ वर्षांचं...
आर्थिक प्रगतीच्या वाटेवर व्यक्तिगत सेवा, पारदर्शकता, तत्परता व आधुनिक तंत्रज्ञान ह्या सर्वांसह आम्ही आपल्यासाठी विविध योजनांचे दिप प्रज्वलित करीत अनेक मापदंड प्रस्थापित करीत गेलो, आपणांस व आपल्या कुटुंबियांस
Call: 022-66999777 | www.svcbank.com
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
• ६ राज्यात ७ लाख संतुष्ट ग्राहक • एनी ब्रांच बँकिंग आणि इंटरनेट बँकिंग • एटीएम, एसएमएस, मोबाईल आणि टेली बँकिंग सुविधा
• एनईएफटी, आरटीजीएस, डीमॅट सुविधा • फॉरेक्स, जनरल, लाईफ इन्शुरन्स व म्युच्युअल फंडस्



हा सण आपल्या
स्वत:च्या घरात
साजरा करा.
8.5% P.A.
सादर आहे गृहकर्ज 3 वर्षांसाठी निश्चित व्याज दरांवर. ह्या सणासुदीच्या मौसमांत आपल्या प्रिय व्यक्तिंना 'घर' भेट देऊन आश्चर्यचकित करा. सणासुदीसाठी कमी व्याजदरांने विशेष गृह कर्ज.
प्रस्ताव दि. 31.10.09 पर्यंत ग्राह्य
रक्कम
प्रत्येक लाख रु. साठी इएमआइ
तीन वर्षांसाठी 50 लाखांपर्यंत 8.50%* (नियत) दराने
869/-
रु. 50 लाखांहून अधिक 9.25%* (फ्लोटिंग) दराने
916/-
*240 महिन्यांची परतफेड मुदत. अटी लागू.
युनियन बँक
ऑफ इंडिया
चांगले लोक, चांगली बँक
माहिती आणि तपशीलासाठी नि:शुल्क क्र. 1800222244 वर संपर्क करा अथवा www.unionbankofindia.co.in वर लॉग-इन करा.

# रुची

ऑक्टोबर–नोव्हेंबर २००९
वर्ष २९ वे, दिवाळी अंक, मूल्य ८० रु.
संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **धनंजय गांगल**
**अंजली कुलकर्णी**
मुखपृष्ठ व चित्रे : **सतीश भावसार**
मांडणी : **अनिरुद्ध गद्रे**
वितरण व्यवस्था : **सुदेश हिंगलासपूरकर**
**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रु.**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७ ( २३८९ २४ ४५) । फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८ ( २४४७ ४८ ४३)
Email - granthali01@gmail.com
Website - www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

### लेख

**सुरेल मैफलीची सुरु झालेली भैरवी** / कुमार नवाथे / **९**
**चित्रकार–कवीची दार्शनिकता** / दीपक घारे/ **४१**
**'वैदर्भीचे सहा आविष्कार'** / विद्युल्लेखा अकलूजकर/ **७०**
**संपादकांचे ऱ्हासपर्व** / नरेंद्र बोडके/ **७९**
**ती स्नेहज्योत एक** / मृणालिनी कानिटकर–जोशी / **८४**
**मुस्लिमांची साक्षरता आणि वास्तव** / **८९**
रझिया पटेल (शब्दांकन : ममता क्षेमकल्याणी)
**हॉफनंगचे हास्यसंगीत**/ प्रकाश चव्हाण / **९६**
**अत्त दीपो भव** / सुहासिनी देशपांडे / **१११**
**तुझे गीत गाण्यासाठी...** / सत्त्वशीला सामंत / **१२३**
**पाकिस्तानची गाणी** / योगेंद्र जावडेकर / **१२८**
**माझ्या सासुबाईच्या मैत्रिणी** / वसुमती धुरू / **१६०**
**यातू, गूढ, साक्षात्कार,**
**धर्म आणि विज्ञान** / श्रीनिवास हेमाडे / **१७२**
**चेतन भगत..** / अनुवाद – अभय पाटील / **१८७**

### महाराष्ट्राची सुवर्णतुला

**सारी नुसती खळबळ!** / दिनकर गांगल/ **१९**
**विकास आणि सामाजिक न्यायावर आधारलेल्या**
**महाराष्ट्रनिर्मितीची गरज!** / डॉ. भालचंद्र मुणगेकर / **३१**
**महाराष्ट्राची उद्यमशीलता** / आदिनाथ हरवंदे / **६२**
**नेतृत्व आणि विकास** / हेमंत देसाई / **१३५**
**अधिकार आणि दृष्टिकोन** / प्रकाश परांजपे / **१६८**

### कथा

**यमाजीची गोष्ट!** / संजय बोरुडे/ **५३**
**'आंनदभूमी'च्या शोधात** / प्रभा पुरोहित / **१०१**
**मानधन** / प्रा. मिलिंद जोशी / **११७**
**जेवणाचा ट्रक** / सुभाष सुंठणकर / **१८१**

**जनसंवाद काय, का व कसे?** / राज्यश्री क्षीरसागर/ **१४७**
(जनसंवाद स्पर्धेसाठी)
**एक चित्तवेधक कथा** / सु.गो. तपस्वी/ **१५२**

**कवितेचं व्यासपीठ** / **१०५**
उषा मेहता, गोविंद केळकर, गणेश भाकरे,
अर्जुन देशमुख, शशिकांत शिंदे, अशोक कोतवाल, सदानंद डबीर, सदानंद सिनगारे, राजा गायंगी, प्रा. प्रसन्नकुमार पाटील, प्रा. प्रगती गुणाजी नाईक–अमृते, अजीम नवाज राही, प्रशांत असनारे, तुकाराम खिल्लारे

# संपादकीय

साल १९९०, दिग्दर्शक-अभिनेता होता केविन कोसनर आणि अमेरिकन सिव्हिल वॉरच्या पार्श्वभूमीवर असलेल्या चित्रपटाचं नाव होतं 'डान्सेस ऑफ द वूल्फस्.' हा चित्रपट चालला, त्याचं कौतुक झालं आणि टीकाही झाली. पुढे या चित्रपटाला प्रतिष्ठित ऑस्कर नामांकनही लाभलं आणि चित्रपटावरील टीकेची धार वाढली. टीकेचा मुख्य सूर होता, की चित्रपटाला जागतिक परिमाण नाही. ते खरंही होतं. ऑस्करची जी अलिखित तत्त्वं आहेत ती मुख्यतः ख्रिश्चॅनिटीची! चांगल्याचा वाईटावर विजय, स्फूर्तिदायक किंवा जगाला संदेश देणारा, यांपैकी कुठल्याच तत्त्वात बसणारा हा चित्रपट नव्हता. या चित्रपटाला मिळालेला ऑस्कर सन्मान स्वीकारताना केविन कोसनरनं या टीकाला उत्तर दिलं. तो म्हणाला, ''हा चित्रपट काही संदेश देतो का? तो स्फूर्तिदायक आहे का? हे मला माहीत नाही. ह्या चित्रपटाचं जगाशी, युरोपशी आणि खुद्द अमेरिकेशी काही नातं आहे का, हे मला माहीत नाही. माझं त्याच्याशी काही देणंघेणं नाही. मला ही कलाकृती माझ्यासाठी महत्त्वाची वाटली आणि म्हणून हा सिनेमा मी केला, बस्!'' प्रथेप्रमाणे या लहानशा भाषणाला सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या. केवीनला आणि टाळ्या वाजवणाऱ्या प्रेक्षकांना अंदाज नव्हता की हे भाषण भविष्यसूचक होतं.

१९९० च्या सुमारास आर्थिक जागतिकीकरण येऊ घातलं होतं आणि त्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्षात साहित्य, संस्कृती, राजकारण आणि समाजकारण यात जे विकेंद्रीकरण येणार होतं तेच एकप्रकारे केविनच्या त्या दोन ओळींच्या भाषणातून सूचित होत होतं.

भारताबद्दल बोलायचं तर, औद्योगिकी-करणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेतून शहरी अर्थव्यवस्थेत होणारं स्थलांतर हे १९६० च्या दशकातच चालू झालं होतं. त्याला ग्रामीण एकत्र कुटुंब पद्धती बहुतेक गैरसोयीची असावी. त्यामुळे ती फुटून, नवीन शहरी-औद्योगिक अर्थव्यवस्थेला साजेशी अशी छोटी कुटुंबं अस्तित्वात आली. या बदलाला मुख्यत: परिमाण होतं ते आर्थिक. यापलीकडे माणूस म्हणून ज्या मानवाच्या गरजा त्या साहित्य, संस्कृती, समाजकारण वा राजकारण यांसाठी मात्र अजूनही एक व्यापक, सर्वसमावेशक रचना असावी अशीच धारणा होती. पण ९० नंतर टप्प्याटप्प्यानं ती रचना विस्कटत गेली.

'संपादकांना हसवा आणि हजार रुपये मिळवा' असं गोविंद तळवलकरांच्या गंभीर प्रकृतीकडे बघून गमतीत म्हटलं जायचं. तरी तळवलकर आणि गडकरी काय लिहितात याकडे महाराष्ट्राचं लक्ष असायचं. आर्थिक उदारीकरणात अपरिहार्यपणे वृत्तपत्रं ही प्रॉफिट सेंटर झाली आणि संपादकीय निस्तेज होऊ लागली. टिळक, आगरकरांची परंपरा जर काही असलीच तर ती त्या अर्थानं लयास गेली, पण एका वेगळ्या अर्थानं जगभरचे छोटे छोटे टिळक-आगरकर आपापल्या कुवती आणि आवडीनुसार वेगवेगळ्या ब्लॉगवर लिहीत असतात. आपल्या शंभर-दोनशे परिचित व्यक्तींना ते इमेल करत असतात. आपल्या ह्या छोट्याशा जगात ते आनंदी असतात. दुसरीकडे काय चाललंय याचं त्यांना विशेष देणंघेणं नसतं.

जनतापार्टी आणि नंतरच्या दशकात व्ही.पी. सिंग, हे प्रयोग फसल्यावर सत्तेच्या राजकारणाला छेद देऊन विधायक कार्य करणाऱ्या अनेकांनी मनाशी खूणगाठ बांधली की आता 'एकत्र' येण्यात राम नाही. यशावकाश चळवळी संपल्या आणि त्यांची बेटं तयार झाली- ती आता महाराष्ट्रभर विखुरली आहेत!

नेत्यागणिक पक्ष, जिल्हावार साहित्यसंमेलनं आणि ज्ञातीज्ञातीची संमेलनं जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर हा विकेंद्रीकरणाचा विरोधाभास बुचकळ्यात पाडणारा आहे. अशा या 'निर्नायकी' अवस्थेतील महाराष्ट्राचा सुवर्णमहोत्सव साजरा होतोय. निवडणुकीच्या मंथनातून काय बाहेर पडेल ते हा अंक हाती येईपर्यंत उलगडलेलं असेल. आपली त्याबद्दलची आस्थादेखील अशीच विखुरलेली राहणार का हे काळच ठरवेल.

दिवाळीच्या व नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. पुढला अंक डिसेंबरमध्ये.

**– धनंजय गांगल**

# सुरेल मैफलीची सुरू झालेली भैरवी

## कुमार नवाथे

संपूर्ण आशियावर आपल्या वेगळेपणाने गेली सहा दशके अखंड सत्ता गाजवणाऱ्या 'रेडिओ सिलोन'ची अवस्था सध्या शेवटचे दिवस मोजणाऱ्या रुग्णासारखी क्षीण होत चालली आहे. ज्या अनेक पिढ्यांची सांस्कृतिक जडणघडण रेडिओ सिलोनने इतकी वर्षे सजगपणे केली, त्या साऱ्यांना हा मानसिक धक्का पचवणे कठीण आहे.

आजही बहुतांशांना असेच वाटते की रेडिओ सिलोन केव्हाच बंद झालाय. पण भारत, पाकिस्तान, दुबई येथील लाखो लोकांच्या रेट्यामुळे रडतखडत का होईना दिवसाचे केवळ दोन तासाचे सकाळचे कार्यक्रम अजूनही तग धरून आहेत. भारताच्या शंभर कोटी लोकसंख्येतील निदान अर्धा कोटी लोक आजही भक्तिभावाने सकाळचे दीड-दोन तास केवळ रेडिओ सिलोन आणि सिलोन करताच जगतात. त्याशिवाय त्यांची दिनचर्या चालूच होत नाही. एखाद दिवशी प्रसारण नीट न आल्यास किंवा अजिबात न आल्यास मुंबई, राजकोट, कराड, औरंगाबाद, जळगाव, दिल्ली, लाहोर-कराचीमधील फोन एकमेकांस सगळे ठीक तर आहे ना हे विचारण्याकरता खणखणत राहतात. थेट कोलंबोला निवेदिकेलासुद्धा फोनचा हा मारा दोन गाण्यांमधील वेळेत सहन करावा लागतो आणि त्याउलटही, जेव्हा केंद्र सुस्पष्ट लागते, तेव्हा तिला प्रत्येक गाण्यानंतर फोन आलेल्या अनेकांचे आभार मानत मानत कार्यक्रम पुढे सरकावावा लागतो.

या पार्श्वभूमीवर, सध्या होत असलेली प्रसारणे ही शेवटचीच आहेत हे माहीत झाल्यावर, हा शेवट टाळण्याकरता प्रत्येक श्रोता आपल्या परीने झटतो आहे. कोणी धनबाद, बिलासपूर, नांदगावचे वेडे रसिक आपल्या मोडक्यातोडक्या इंग्रजीत थेट रेडिओ केंद्र अधिकाऱ्यांना प्रसारण बंद करू नका म्हणून आर्जवी पत्र लिहीत आहेत. इंदूर आणि दिल्लीच्या काहींनी श्रीलंकन उच्चायुक्तांनाच साकडे घातले आहे. तर अनेकांनी भारतीय राजदूतांना प्रत्यक्ष भेटून लाखो रसिकांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. काही जण तर कोलंबोला प्रत्यक्ष रेडिओ सिलोनवरच जाऊन धडकले आहेत.

आज भारतात दीड-दोनशे नभोवाणी केंद्रे आहेत. एफ.एम.ची लाट जोरात आहे. दोनदोनशे वाहिन्यांवरून जगभरचे कार्यक्रम घराघरात कोसळत आहेत. शिवाय, सीडी प्लेअर आणि एमपी३ हा जसा शाळेत कंपास बॉक्स सक्तीचा असतो तसा प्रत्येक मुलामुलीकडे फावल्या वेळात वाजतो आहे. अजून

कशाची कमतरता आहे? चित्रपट घरी बघता येतात. इंटरनेटमुळे पुस्तक उघडायची जरुरी वाटत नाही.

एवढ्या साऱ्या उपलब्धता असताना एक परदेशी नभोवाणी केंद्र बंद होते याकरता गळा काढण्याची भारतातल्या लोकांना गरजच काय?

या व्यावहारिक प्रश्नाला उत्तर नाही. कारण इतक्या वर्षांत रेडिओ सिलोनशी जुळलेली नाळ पूर्णपणे भावनिक पातळीवरची आहे. त्यातून थोडीच इतकी सहजासहजी कुणाची सुटका होणार आहे? हे व्यसन थोडेच सुटणार आहे? हे व्यसन मुळात लागलेच कसे, कोणी लावले लाखो लोकांना रेडिओ सिलोनच्या नादी? त्यात असे काय जगावेगळे होते की त्याच्या बंद होण्याने जीव तळमळतोय?

हे सारे घडले योगायोगाने.

कुणाच्या अदूरदृष्टी, अहंभावी ताठर भूमिकेमुळे, तर दुसऱ्या बाजूला संवेदनशील, दूरगामी विचारांच्या क्रियाशील व्यक्तीमुळे. या दोघांनी समोरासमोर येणे हीच एकाच्या भाग्याची आणि समोरच्याच्या दुर्भाग्याची नांदी होती.

ब्रिटिश सत्तेपासून भारत आणि सिलोनला स्वातंत्र्य एका वर्षाच्या फरकानेच मिळाले. १९४८ला स्वतंत्र झालेल्या सिलोनचे सरकारी रेडिओ केंद्र सियाक (साउथ एशियन इस्टर्न कमांड) ब्रिटिश काळापासून चालत आलेले कार्यक्रम पुढे चालवत होते.

सिलोन या सिंहली भाषक देशात भारतातून गेलेले आणि पिढ्यान् पिढ्या तेथे वास्तव्य केलेले तामिळीही मोठ्या संख्येने होते. भारतीय हिंदी भाषेचे व त्यातील विशेषतः चित्रपट संगीताचे वारे याही देशात वाहू लागले होते. नव्याच्या शोधात असलेल्या सियाक रेडिओचे एक-दोन वर्षांत सिलोन रेडिओ असे नामकरण झाले आणि जसे जमतील तसे अर्धवट, सदोष हिंदीत कार्यक्रमांचे प्रसारण होऊ लागले.

दुसऱ्या महायुद्धामुळे जगभर झालेली गोंधळाची आणि हलाखीची परिस्थिती भारतीय उपखंडातही होती. पण अन्नधान्याची, कपड्या-निवाऱ्याची टंचाई, दारिद्र्य असतानाही भारतीय चित्रपटउद्योग मात्र बाळसे धरू लागला होता. कमळ दलदलीत चिखलात रुजते, वाढते आणि आपल्या अस्तित्वाने साऱ्यांनाच रिझवते. तशीच भारतीय चित्रपटसंगीत ही या दलदलीत फुलणारी आशा होती.

चित्रपट तयार होत होते, पण तांत्रिकदृष्ट्या ते फारसे प्रगत नव्हते. काही चित्रपटांची कथा पूर्ण ढिसाळ असायची, तर काहींचे नायक म्हणजे चालतेबोलते दगडी पुतळेच. कधी संवाद ऐकू यायचे नाहीत तर कधी बोलणाऱ्याचे शब्द आणि हलणारे ओठ यांत ताळमेळ नसे.

एवढे सारे असूनही चित्रपट तुफान गर्दीत हाऊसफुल चालायचे. कित्येक आठवडे एकेका सिनेमागृहात ठाण मांडून बसायचे. ही सारी करामत होती संगीताची. त्या काळात एकापेक्षा एक प्रतिभाशाली शायर, गीतकार आपली अदाकारी पेश करायचे, संगीतकारांना आव्हान द्यायचे. संगीतकारही सप्तस्वर कोळून प्यायलेले. ते गीतांवर अशा काही चाली बांधायचे की बुजुर्ग गायकांचाही कस लागावा. ही त्रिवेणी एकमेकांस एवढी घट्ट पकडून होती की त्यातून काही अद्‌भुत न निघते तरच नवल.

परिणामस्वरूप, चित्रपट कसाही असो त्यातील गाणी हेच मुख्य आकर्षण होते. त्या पूर्वी ना अशी अप्रतिम गीते जन्माला आली ना भविष्यात येतील. भारतीय चित्रपट संगीताचा सुवर्णकाळ जन्मास आला होता.

मात्र त्याची पाहिजे एवढी दखल आपल्या रेडिओवरून घेतली गेली नाही. सिलोन रेडिओवर सगळा आनंदच होता. हिंदी समजणारे-बोलणारे तिथे कुणी नव्हते. त्या देशात वासरांत जी कोणी लंगडी गाय थोडेफार हिंदी जाणायची, तीच कार्यक्रमप्रमुख आणि तीच उद्‌घोषक.

हिंदी चित्रपटसंगीतामुळे हाही सिलसिला एक-दोन वर्षे खपून गेला. गाणीच इतकी लाजवाब होती की त्याला बाकी सजावटीची जरुरीच भासायची नाही. आह, अंदाज, महल, समाधी, संगदिल, तराणा, बाजार असे एकामागून एक येणारे चित्रपट आणि गुलाम हैदर, मोहम्मद शफी, नौशाद, अनिल बिश्वास, सी. रामचंद्र, सज्जाद, बुलो सी रानी यांसारखे संगीत हाच आत्मा असलेले संगीतकार. या रसायनाचा कळस होता सैगल, अमीरबाई, नूरजहाँ, सुरैय्या, लता मंगेशकर यांचा स्वर. या कालखंडात, भरभरून पीक आल्यासारखे शंभरनंबरी सोने पिकवून या साऱ्या बलवंतांनी जमानाच बदलून टाकला.

आॅल इंडिया रेडिओने या नव्या बदलांची जेमतेमच दखल घेतली. देश नुकताच स्वतंत्र झालाय, नव्या दमाने काही उभे करुया ही ऊर्जा जणू नव्हतीच. ज्यांना काही करण्याची इच्छा होती ते सरकारी नियमाने बांधलेले होते. अशातच, सत्ताग्रहण करताच भारतीय नभोवाणीमंत्र्यांनी या सुवर्णमयी संगीताच्या प्रसारणाला थिल्लर, सवंग ठरवून देशातील सर्व नभोवाणी केंद्रांवरून हद्दपार केले! हिंदी चित्रपटातील गीते रेडिओवरून ऐकण्याच्या माफक करमणुकीलाही कोट्यवधी लोक पारखे झाले.

या मनमानी निर्णयामुळे करोडोंच्या जीवनात पोकळी निर्माण होऊ शकते हे ना नभोवाणीमंत्र्यांना जाणवले ना आॅल इंडिया रेडिओच्या उच्चपदस्थांना. हुकूमशाही, अरेरावी कारभाराची मस्ती स्वातंत्र्या-नंतरच्या पहिल्या चार-पाच वर्षांतच अनेकांना त्रासदायक होऊ लागली. परिणामी, आॅल इंडिया रेडिओने कल्पक, बुद्धिमान मोहरे गमावले. देशाची मोठी सांस्कृतिक हानी झाली.

त्यांपैकी एक होते विजय किशोर दुबे. उत्तम कार्यक्रम सादर करून श्रोत्यांना जागीच खिळवून ठेवण्याचे त्यांचे कसब इथे कामाला आले नाही. रोजच्या मनमानीला कंटाळून त्यांनी आॅल इंडिया रेडिओ सोडले आणि ते थेट कोलंबोत रेडिओ सिलोनवर रुजू झाले.


दैव सिलोन देशाला अनुकूल होते. कोलंबो प्लॅनच्या अभ्यासाकरता आॅस्ट्रेलियाचे क्लिफर्ड डॉड कोलंबोत आले होते. रेडिओवरील जाहिराती व तत्सम व्यापारी कार्यक्रम हा त्यांचा विषय व व्यवसायही होता. सरकारी कामाकरता आलेल्या डॉडने सिलोन रेडिओच्या साऱ्या कार्यक्रमाचे सर्वेक्षण केले. भारतीय रेडिओवर असलेली हिंदी गाण्यांवरील बंदी, तरीपण त्यांची प्रचंड निर्मिती आणि त्याकरता लोकांचे पागलपण याची त्यांनी माहिती करून घेतली. त्याबरोबर नवीन उद्योग आणि घरगुती वापराच्या वस्तूंची भारतात होणारी निर्मिती या गोष्टी त्यांना भरपूर पैसा देणाऱ्या दिसू लागल्या. श्रीलंकेच्या सरकारला या साऱ्या गोष्टी त्यांनी सप्रमाण पटवून दिल्या. श्रीलंकन सरकारनेही त्यांस योग्य प्रतिसाद देऊन, रेडिओ सिलोनवर व्यापारविभाग उघडण्याची परवानगी देऊन, डॉडना त्याचे केंद्रप्रमुख केले. डॉड

रेडिओ सिलोन ऐकताना नेहमी वाटायचे, एवढ्याशा लाकडी खोक्याने केवढ्या अफाट नादविश्वाची ओळख करून देत राहण्याचे काम वर्षानुवर्षे निष्ठावंतपणे केले आहे.
तलतचा रेशमी सूर आणि सी. एच. आत्माचा खर्जातला आवाज तिथेच भेटला. लताबाईंची दर्दभरी गाणी बिनचेहऱ्याच्या दूरदर्शनऐवजी मंद प्रकाशात ऐकावी तर केवळ रेडिओ सिलोनवर. म्हणून असे वाटते, की दुर्दैवाने आज अडगळीत पडत चाललेल्या या 'रेडिओ'ची 'एका जुन्या मित्राची' आठवण आपण न विसरुया, त्यावरील धूळ झटकून ती पुन्हा बसणार नाही एवढीतरी काळजी घेउया.

यांनी मग आॅस्ट्रेलियाला काही वर्षांकरता रामराम ठोकला आणि ते रेडिओ सिलोनचे (अलिखित) सर्वेसर्वा झाले. जगावेगळे, कल्पक-रोचक कार्यक्रम दिवसभर ऐकवणे ही विजय किशोर यांची खासियत होती. क्लिफर्ड डॉड यांनी विजय किशोर दुबेंना कोणत्याही हस्तक्षेपाविना कार्यक्रम सादरीकरणाचे पूर्ण अधिकार दिले.

रेडिओ सिलोनचा पुनर्जन्म झाला. यादरम्यान मनोरंजनाबरोबर व्यापार विभागही चालू झाला होता. 'ओव्हलटिन फुलवारी' हा व्यापारी तत्त्वावर सुरू केलेला पहिला कार्यक्रम. पाठोपाठ त्याच वर्षी-१९५४ मध्ये आली 'बीनाका गीतमाला.' अमीन सयानींच्या दमदार आवाजाने व वेगळ्या ढंगातील सादरीकरणात रेडिओ सिलोनचे बळ अजूनच वाढले. आणि मग भारतीय श्रोते आॅल इंडिया रेडिओ विसरले. सकाळ, दुपार ते रात्री अकरापर्यंत रेडिओ सिलोन ऐकू लागले. आपल्या ज्ञानात रोज नवीन भर घालू लागले. गाणी तीच पण त्यांचे सादरीकरण अफलातून. एक ही फिल्म के गीत, वाद्यसंगीत, शास्त्रीय संगीत, कव्वाली, पाकिस्तानी नगमे, एक और अनेक, जब आप गा उठे यांसारखे कार्यक्रम म्हणजे संथ गतीने मनात घुसणारी, मनावर राज्य करणारी नशा होती. या नशेचा असर देशभर पसरत गेला. कुंपण सोडून भारतासह पुरा पाकिस्तानही त्याने काबीज केला.

दर रविवारी रात्री दहा ते अकरा दरम्यान प्रसारित



विजय किशोर दुबे आणि गोपाल शर्मा

होणारा 'हमेशा जवाँ गीत' हा कार्यक्रम प्रचंड लोकप्रिय झाला. खुद्द लता मंगेशकर या कार्यक्रमाच्या चाहत्या श्रोत्या होत्या.

विजय किशोर दुबेंनी केवळ दोन वर्षांत रेडिओ प्रसारणमाध्यमात क्रांती केली. रेडिओ सिलोनचा आजही जो श्रोता आहे त्याला दुबेजींच्या या डोंगराएवढ्या कामाचे ऋण मान्य करावेच लागेल. त्यांच्या नव्या नव्या उपक्रमांबद्दल लिहायचे तर एक प्रबंधच होईल इतके ते त्या काळात नाविन्यपूर्ण होते. आज इतक्या वर्षानंतरही त्या कार्यक्रमाचा ढाचा पाहिला की जाणवतो तो प्रत्येकाचा वेगळा बाज आणि वेगळी पेशकारी. त्याच ध्वनिमुद्रिका पण 'कौशल्य सारे रचनेत आहे' या सुभाषिताची पुष्टी करणारी दुबेजींजी कल्पकता. इतका मजबूत शास्त्रशुद्ध पाया घालणारे दुबेजी येथील आपले काम संपले या भावनेने भारतात परत येण्याची तयारी करू लागले, पण येण्यापूर्वी त्यांनी घालून दिलेल्या उच्च अभिरुचीला कुठे धक्का लागणार नाही, सवंग उथळपणाला जराही थारा मिळणार नाही याची खात्री करूनच. ते केंद्रावर असतानाच त्यांनी त्यांचा शिष्योत्तम, स्वतःच्या कठोर करड्या शिस्तीत घडवला. त्याला साऱ्या कामांचे बारकावे सांगितले. त्याहीपेक्षा कार्यक्रम अजून रोचक करायला वाव कसा आहे हे त्याच्या मनावर सोदाहरण बिंबवले.

त्यांचा बाप से बेटा सवाई असा चेला होता गोपाल शर्मा. दुबेजींनंतर तब्बल अकरा वर्षे गोपाल शर्मा या मधुर आवाजाने जगभर रेडिओ सिलोनची लोकप्रियता शिगेला पोचवली. चोवीस तास भारतीय चित्रपटसंगीत हाच गोपालजींचा ध्यास होता. या काळात श्रोत्यांच्या हजारो पत्रांनी रेडिओ सिलोनची सीमा गाठली. जेवढा प्रतिसाद तेवढी नवीनता कार्यक्रमांत येऊ लागली. आपल्या चित्रपटाची गाणी सिलोनवर वाजली की जगभर पोचतात असा एक मानदंडच निर्माण झाला. भारतातून हजारो दुर्मिळ ध्वनिमुद्रिका सिलोन रेडिओवर सुरक्षित राहतील या भावनेने अनेकांनी त्या भेटीदाखल दिल्या. सिलोन सरकारनेही मिळतील तेवढ्या ध्वनिमुद्रिका घेऊन आपली संपत्ती वाढवली. भारतीय चित्रपट जेव्हा प्रथम बोलपट झाला तिथपर्यंत मागे जाण्याचे आणि त्या जमान्यातील ध्वनिमुद्रिकासुद्धा आपल्या खजिन्यात आणण्याचे आणि जपण्याचे ऐतिहासिक काम या रेडिओ केंद्राने केले.

सरकारी केंद्र असूनही कामाची पूर्ण मोकळीक होती. त्यामुळे तिथे काम करणाऱ्या प्रत्येकाला जणू घरचेच काम आहे असा उत्साह असायचा. प्रमुख केंद्राधिकारी ऑस्ट्रेलियन क्लिफर्ड डॉड यांनी विजय किशोर दुबे व गोपाल शर्मांना पाहिजे तेवढ्या ध्वनिमुद्रिका खरीदण्याची मुभा दिली होती. त्याचाच परिणाम म्हणजे हिंदी चित्रपटसंगीताचे जगातील एकमेव, अव्वल दर्जाचे उत्कृष्ट ध्वनिमुद्रिकालय एवढ्याशा सिंहली भाषक देशात उभे राहू शकले.

गोपाल शर्मांना या अनमोल खजिन्याची जाण होती. आपली कल्पक बुध्दी पणाला लावून त्यांनी भारत-पाकिस्तानांतील सर्व वयोगटांच्या भिन्न आवडीनिवडीच्या रसिकांची अशी मोट बांधली की श्रोत्यांमध्येसुद्धा हे आपलेच व आपल्या साठीचेच केंद्र आहे अशी सार्थ भावना निर्माण झाली. आठवड्यातील एकेक दिवस स्थानिक भाषेच्या गाण्यासाठी राखून ठेवला. सोमवारी सकाळी मराठी, मंगळवारी पंजाबी, मग गुजराती अशी आपापल्या

मातृभाषेतील गाणी परदेशी केंद्रावरून ऐकताना श्रोते हुरळून जायचे. आजही सिलोनवरून प्रसारित होणारी मराठी गाणी ऐकली की ती आपल्याकडे आहेत की नाही अशी रास्त शंका येते.

पुढील काही वर्षांत रेडिओ सिलोनचे आजच्या भाषेनुसार टीआरपी दररोज वाढतच गेले. पन्नास-साठ हजार पत्रे उघडता उघडता, त्यानुसार कार्यक्रम बनवताना साऱ्यांची दमछाक व्हायची. त्यातूनच नव्या कल्पना मिळायच्या. श्रोतेच कार्यक्रम तयार करून पाठवायचे. स्वत: ऐकायचे. गावागावात श्रोतासंघ उभे करायचे. एक गाणे-त्याची शिफारसनावे वाचण्याला शेवटच नसायचा.

गोपाल शर्मा लोकप्रिय निवेदक होते. कार्यक्रमाचे सर्वेसर्वा होते. दिवस-रात्र लोक त्यांना ऐकत होते. त्यांच्या आवाजाचे, सादरीकरणाचे दिवाणे होते, पण त्यांचे दर्शन कोणासच होत नव्हते.

एकदा शर्मा सुट्टीवर भारतात आणि तेही मुंबईत आल्याची बातमी लता मंगेशकरांना कळली. त्यांनी ताबडतोब दुबेजींशी संपर्क साधून गोपाल शर्मांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. दुबेजींना आश्चर्य तर वाटलेच, पण आपल्या शिष्याचा अभिमानही. त्याच दिवशी दुपारी चार वाजता बॉम्बे लॅबमध्ये लताजींचे ध्वनिमुद्रण होते. गोपाल शर्मा तिथे पोचल्यावर आपण आल्याचा निरोप आत पाठवला आणि काही मिनिटांतच खुद्द स्वरसम्राज्ञी गोपालजींना भेटायला बाहेर आल्या. पहिल्या भेटीतच गोपालजींच्या आवाजाचे, भारतीय चित्रपट-संगीताचे सारे पैलू दाखवणाऱ्या त्यांच्या कौशल्याचे लताजींनी भरभरून कौतुक केले. मीही रेडिओ सिलोनची दिवाणी असल्याचे नमूद केले. चित्रपट संगीताची आपण उत्तम जाण ठेवता म्हणून आभारही मानले.

गोपालजींचा स्वत:वरच विश्वास बसत नव्हता. ते एवढेच म्हणाले, ''मी पूर्ण रस घेऊन, माझा जीव प्रत्येक कार्यक्रमात ओतून मी माझे कर्तव्य पार पाडतो आहे. आभार मानायचेच असतील तर चित्रपटसंगीताच्या जन्मापासून आजपर्यंतच्या स्थित्यंतराला ध्वनिमुद्रिकांच्या रूपाने आपल्या वास्तूत मायेने सामावून घेणाऱ्या 'रेडिओ सिलोन'चेच मानायला पाहिजेत.''

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाची शंभर वर्षे १८५७-१९५७ हा अतिशय अभ्यासपूर्ण कार्यक्रम गोपाल शर्मांनी रेडिओ सिलोनवरून सादर केला आणि संपूर्ण भारतवर्षात त्याचे कौतुक झाले. भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद त्यानंतर जेव्हा सिलोनला गेले तेव्हा त्यांच्या सन्मानार्थ शाही भोजनाचा जो कार्यक्रम आयोजित केला होता त्यात गोपाल शर्मांनाही निमंत्रित करण्यात आले. भारतीय हायकमिशनर श्री. गनडेविया यांनी त्यांचा राष्ट्रपतींबरोबर परिचय करून देताना, गोपाल शर्मांच्या कामाचा आवर्जून उल्लेख करून सांगितले की भारतीय श्रोत्यांकरता परदेशी रेडिओ केंद्रावरून अप्रतिम कार्यक्रम पेश करणारा हा भारतीय तरुण आहे.

हिंदुस्थानात परत आल्यावर मला भेटा आणि ऑल इंडिया रेडिओवरून असेच बहारदार कार्यक्रम सादर करा असे राष्ट्रपती म्हणाल्यावर गोपाल शर्मा म्हणाले, ''राष्ट्रपतीजी, क्षमा करा, मला इथे रेडिओ सिलोनवर जे स्वातंत्र्य मिळते आहे ते भारतात मिळणार नाही. आपले घोषवाक्य जरी 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' असले तरी प्रत्यक्षात 'बहुजन रुलाय, स्वहित सुखाय' असंच आहे.''

जुन्या पिढीतील गायक कुंदनलाल सैगल यांना



अमीन सयानी, विजय किशोर दुबे, गोपाल शर्मा आणि कुमार नवाथे



रेडिओ सिलोनची वास्तू
आणि
'रेडिओ सिलोन ऐका' असे सांगणारा पोस्टाचा शिक्का!




गोपाल शर्मांनी अजरामर केले. सकाळच्या जुन्या गाण्यांचा कार्यक्रम संपताना शेवटचे गाणे के.एल. सैगल यांचेच असेल हा त्यांनी नियमच केला. म्हणूनच आज पंचावन्न वर्षांनंतरही सैगलचे गाणे लागले की आठ वाजायला तीन मिनिटे कमी आहेत, हे घड्याळ डोक्यात एकदम फिट्ट बसले आहे.

कोणत्याही उद्घोषकाची नोकरी ही रेडिओ सिलोनवर करार पध्दतीने असल्याने तो करार किती वाढवायचा यालाही मर्यादा होती. गोपाल शर्मा दहा वर्षे झाल्यावर करारातून मोकळे होणार होते. पण त्यांनी ज्या एका पातळीवर रेडिओ केंद्राला नेऊन ठेवले होते तेथून त्यांना सोडणे साऱ्यांनाच कठीण होते. त्यांस एका वर्षाची मुदतवाढ मिळाली आणि पुढील वर्षी ते निवृत्त होणार ही बातमीही आली आणि अक्षरशः हजारो दुःखद पत्रांचा पाऊस रेडिओ केंद्रावर साचू लागला.

रेडिओ केंद्राच्या शेवटच्या दिवशी, शेवटच्या प्रसारणाच्या वेळी गोपाल शर्मांनी साऱ्या श्रोत्यांचा जड अंत:करणाने निरोप घेतला, तसाच त्या वास्तूने, जिने त्यांना अफाट प्रसिद्धी मान्यता, सन्मान बहाल केला, विजय किशोर दुबेंनंतर गोपाल शर्मांना भावूपर्ण निरोप दिला.

या प्रेमाच्या उतराईकरता गोपाल शर्मांनी त्यांना आलेल्या असंख्य पत्रांतून दहा हजार पत्रे निवडली. त्या साऱ्यांचे आभार मानणारी पत्रे त्यांनी पाच हजारजणांना सिलोनमधून तर उरलेल्यांना भारतात आल्यावर येथील डाकघरातून रवाना केली.

भारतीय मनांची रुची बदलणारे, जुन्या कलाकारांची कदर करणारे आणि आपल्या कामाचे पावित्र्य जपणारे विजय किशोर दुबे आणि गोपाल शर्मा हे रेडिओ सिलोनच्या यशाचे आणि दुर्मिळ खजिना निर्माण करण्यामागचे खंदे आधारस्तंभ आहेत. त्यांनी इतिहास घडवला, त्यांनी रसिकता वाढवली. त्यांच्या निवृत्तीनंतर अनेक जण आले–गेले. दलवीरसिंग परमार, मनोहर महाजन, विजयालक्ष्मी सेरम, शिवकुमार सरोज, मोहम्मद उमर आणखी काही. पण मागील संचितच एवढे होते की या साऱ्यांचा फारसा वेगळा, विशेष प्रभाव श्रोत्यांवर पडला नाही. त्यातल्या त्यात उत्तम कामगिरी आणि सातत्य राखले मनोहर महाजन यांनी. सात वर्षांच्या त्यांच्या कारकिर्दीत नवनवीन कार्यक्रम देण्याचा त्यांनी स्तुत्य प्रयत्न केला. शेरोशायरीयुक्त दमदार आवाजातले निवेदन ही त्यांची खासियत होती.

वर्षे उलटत होती. नित्यनियमाने कार्यक्रम प्रसारित होत होते, यांत्रिक पद्धतीने घराघरातून रेडिओच्या पंचवीस मीटरवर 'रेडिओ सिलोन'वर काटा स्थिर होत होता.

ऑल इंडिया रेडिओची आकाशवाणी झाली. तिची अनेक केंद्रे आली. जे चित्रपटसंगीत संपूर्ण हद्दपार केले गेले होते त्यालाच वाहून घेतलेले 'विविध भारती' हे केंद्र दिवसभर गाऊ लागले. सैगललाही त्यांनी आपल्या कार्यक्रमात सामावून घेतले. पुढे, दूरदर्शन आणि आणखी काही काही...

याच सुमारास रेडिओ सिलोनवर भारतातून जाहिराती पाठवायला निर्बंध आले. त्यामुळे सिलोन रेडिओ केंद्राचा आर्थिक स्रोत पूर्ण बंद झाला आणि हे केंद्र हळूहळू अरिष्टात सापडू लागले. भरीस भर म्हणून चांगल्या उद्घोषकांची उणीव भासू लागली.

पण हाही दुष्काळ संपला. उत्तम निवेदनाची कमतरता अगदी गेल्या वर्षापर्यंत यशस्वीपणे नुसती



पद्मिनी परेरा

अशा विस्ताराने विशद करायची, की हे सारे आता आपल्यात नाहीत याची जाणीव खरोखरीच डोळ्यांत पाणी येऊन जागी व्हायची. पद्मिनीच्या मधाळ आवाजाशिवायची सकाळ म्हणजे सपक दिवसाची नांदी. अनेक वर्षे तिने रेडिओ सिलोनच्या नऊ नंबरच्या स्टुडिओतून लक्षावधी श्रोत्यांचे द्विधा मन:स्थितीतील सकाळचे साडेतीन तास आपल्या मुठीत असे घट्ट पकडून ठेवले होते की त्यांची सकाळची कामे तर अडायची, पण रेडिओसमोरून हलण्याची इच्छाही व्हायची नाही. मंगळवारी सकाळी सादर होणाऱ्या 'मेरी पसंद'ची विशेष ओढ सर्वांना असायची. इतकी सुमधुर गाणी प्रत्येक आठवड्याला ती शोधायचीच, पण या सिंहली कन्येला एवढ्या सफाईदार हिंदी शब्दांची खाण कुठून सापडायची याचेच आश्चर्य वाटायचे. तिने सादर केलेले सारेच कार्यक्रम त्या त्या संदर्भातील तज्ज्ञ व्यक्तींशी बोलून सादर केले आहेत असे वाटावे इतके ते अविस्मरणीय होत. कधीही लता मंगेशकरांचा उल्लेख, ये गीत गानेवाली थी लता या पद्धतीने न करता, ये थी लताजी म्हणूनच करायची.

पद्मिनीने १० मे २००८ च्या सकाळी तिचा प्रसारणाचा शेवटचा कार्यक्रम जड अंतःकरणाने पार पाडला. आज ये मेरा आखरी प्रसारण है, मगर मैं रोऊंगी नहीं असे म्हणत दाटलेल्या गळ्याने सादर केलेला सारा कार्यक्रम अश्रुपूर्ण होता. शेवटचे गाणे लावताना ती म्हणाली, अब सुनिये, आपसे विदाई लेते हुअे ये आखरी गाना. लताजी के सूरों में, फिल्म बागी से–बहारें हम को ढूँढेंगी, न जाने हम कहाँ होंगे।

पद्मिनीच्या निवृत्तीने रेडिओ सिलोनचा तिसरा खांब कोसळला.

आर्थिक विवंचना अजूनच वाढल्या होत्या, संध्याकाळचे प्रक्षेपणही बंद झाले होते. याच दरम्यान मी व सुधीर मोघे केवळ आणि फक्त केवळ पंढरीच्या वारकऱ्याच्या भावनेने 'रेडिओ सिलोन' करताच कोलंबोस गेलो होतो. चारही दिवस रेडिओ सिलोनच्या इमारतीच्या वास्तुशिवाय दुसरे काहीही आम्ही पाहिले नाही. आम्ही रेकॉर्ड लायब्ररी पाहिली, सारे स्टुडिओ

सांभाळलीच नाही तर पुन्हा पूर्ववैभवावर नेली ती दोन स्त्री उद्‌घोषिकांनी.

एक आहे पद्मिनी परेरा. तिची मातृभाषा सिंहली. तिचा जन्म, बालपण सभोवतालच्या सिंहली वातावरणात गेलेले. स्वभावाने बुजरी, चार चौघांपासून दूर राहणारी, सार्वजनिक कार्यक्रमात न रमणारी. अशा अबोल पद्मिनीची ब्रह्मानंदी टाळी लागायची ती रेडिओ सिलोनच्या बंदिस्त काचेच्या खोलीतून कार्यक्रम सादर करताना. ती एकदा त्या मायक्रोफोनसमोर आसनस्थ झाली की सूर लगेच सापडायचा. सारे जग विसरून तल्लीनतेने केलेले तिचे प्रसारण श्रोत्यांना मोहित करत जायचे.

लता मंगेशकर हे तिचे दैवत. रेडिओ सिलोनच्या ध्वनिमुद्रिकालयातून जुन्यातील जुनी, एकापेक्षा एक सरस गाणी शोधून ती ऐकवायची. प्रत्येक गाण्याआधी त्या गाण्यावर आधारित उत्स्फूर्त चार ओळी तिला सुचत, त्या गाण्याला अगदी अनुरूप अशा. गाणे ऐकण्याचा जेवढा आनंद होई तेवढाच पद्मिनीच्या मिठ्ठास वाणीचा, तिच्या शेरोशायरीचा. पद्मिनी खरोखरच पन्नास वर्षे मागे घेऊन जायची. मधुबालाचा 'महल' डोळ्यांसमोर आणायची. झांझर किंवा मधुर मिलनमधील लताच्या सुरांना तिच्या शब्दांनी अजून घायाळ करून विशुद्ध, बावनकशी सोन्याची झळाळी दाखवून द्यायची. शमशाद असो वा पी.एल. संतोषी, सलील चौधरी वा सुरय्या, पद्मिनी या साऱ्यांचे वैभव



ध्वनिमुद्रिकांच्या खजिन्यातून एक ध्वनिमुद्रिका निवडताना ज्योती परमार आणि पद्मिनी परेरा

पाहिले. मुख्य कंट्रोल रूम पाहिली. रोज दुपारी पद्मिनी ज्योतीबरोबर जिथे जेवण घेत होती ते उपाहारगृह बघितले. बस, बाकी कोलंबो काहीच पाहिले नाही!

चार दिवसांत आम्ही मुख्यकेंद्राधिकाऱ्यांना भेटलो. व्यापार विभाग सांभाळणाऱ्या अधिकाऱ्यांना भेटलो आणि एका कठोर वस्तुस्थितीचे आकलन आम्हाला झाले. रेडिओ केंद्राच्या संपूर्ण परिसरात, अधिकाऱ्या-पासून ते चपराशापर्यंत कोणासही हिंदी भाषेचा गंध नाही! भारतात या हिंदी प्रसारणाचे अक्षरश: लाखो चाहते आहेत याची पुसटशी कल्पनाही कोणास नाही. हे केंद्र तरतेय की बुडतेय याचे सोयर-सुतकही कोणास नाही. म्हणजेच संपूर्ण आशिया प्रक्षेपणाची जबाबदारी फक्त या दोन उद्घोषकांचीच होती. त्यातील एक तर निवृत्त झाली आणि रेडिओ सिलोन आता एकखांबी तंबूवर उभे आहे.

हा बहुधा शेवटचाच भक्कम खांब म्हणजे ज्योती परमार. ज्योतीचे वडील दलबीरसिंग परमार हे याच केंद्रावर उद्घोषक होते. त्यांच्या मृत्यूनंतर ज्योतीने वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत या लोकप्रिय रेडिओ केंद्रावर नोकरी स्वीकारली. विजय किशोर दुबेंपासून चालत आलेल्या मधुर कहाणीचा बहुधा हा शेवटचा स्वर.

ज्योती परमारचा या केंद्राशी संबंध घरातून वडिलांपासूनच असल्याने तिनेही अनेक कलाकार, चित्रपट अभिनेत्री, अभिनेते यांना जवळून पाहिले आहे आणि त्यांच्यावर उत्तमोत्तम कार्यक्रमही सादर केले आहेत. तिच्या बोलण्यातील ओलावा लाखोजणांना भावतो. बुधवारी 'गीत मेरे मीत' या कार्यक्रमात श्रोते दूरध्वनीवरून तिच्याशी संपर्क साधतात आणि भरभरून रेडिओ सिलोनविषयीची आपली प्रीती व विशेषत: ज्योतीदीदीबद्दलच्या भावना तेवढ्याच जिव्हाळ्याने प्रकट करतात. बलुचिस्तान-लाहोर तसेच उत्तरप्रदेशच्या अनेक गावांतून येणारे फोन, त्यांचा कळवळा, त्यांच्या मागण्या, त्यांचे प्रत्येकाचे ज्योतीदीदीला आपल्या गावी यायचे प्रेमपूर्वक आमंत्रण... सारेच ऐकायला मस्त वाटते. एवढे पैसे खर्चून लोक परदेशी व्यक्तीशी सारे विसरून मनमोकळा संवाद साधत असतात.

'रेडिओ सिलोन'चे संध्याकाळचे प्रसारण आता आर्थिक कारणामुळे बंद झाले आहे. सकाळच्या कार्यक्रमातसुद्धा एक तासाची घट झाली आहे. त्यामुळे एवढ्या भरगच्च-मनोरंजक कार्यक्रमाची मदार सकाळच्या केवळ दोन तासांत तारेवरील कसरत करून सांभाळणे किती जिकिरीचे आहे, हे कार्यक्रम ऐकताना प्रकर्षाने जाणवते. हळूहळू कार्यक्रमाची रयाही निस्तेज होते आहे.

एकसष्ठीच्या उंबरठ्यावर उभी राहिलेली ही जुनी संस्था अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करू शकेल

का या शंकेला याही खंगलेल्या परिस्थितीत उत्तर आहे, होय! अमृतमहोत्सवच नाही तर शताब्दीसुद्धा गाठू शकेल, जर आम्ही थोडे संवेदशील झालो तर. सवंग, किळसवाण्या 'रिॲलिटी'शो वर एका रात्रीत करोडो रुपयांची राख होते. आम्ही उशीरापर्यंत जागून 'इडियट बॉक्स' म्हणत ते कार्यक्रम पाहत बसतो. ज्या चित्रपटांच्या, नटनट्यांच्या सहभागाने हा चाळीस हजार कोटींचा उद्योग जगभर मिरवतो आहे त्यांना, आपण कोणाच्या खांद्यावर बसून इथपर्यंत आलो याचे विस्मरण झाले आहे. ज्यांनी अभिजात संगीत निर्माण केले आणि ज्यांनी ते कृतज्ञतेच्या भावनेने इतकी वर्षे जपले त्यांना या करोडो रुपयांपैकी वर्षाला केवळ एक कोटी रुपये देण्याचीही दानत होत नाही, यापेक्षा दुसरे दुर्दैव ते कोणते? पण त्यांना ही सहसंवेदना समजली तर केवढे सुदैव!

रेडिओ सिलोन ऐकताना नेहमी वाटायचे, एवढ्याशा लाकडी खोक्याने केवढ्या अफाट नादविश्वाची ओळख करून देत राहण्याचे काम वर्षानुवर्षे निष्ठावंतपणे केले आहे. कैक गायक संगीतकार, गीतकार यांची पहिली ओळख ह्या ध्वनिमाध्यमातूनच झाली. तलतचा रेशमी सूर आणि सी. एच. आत्माचा खर्जातला आवाज तिथेच भेटला. लताबाईंची दर्दभरी गाणी बिनचेहऱ्याच्या दूरदर्शनऐवजी मंद प्रकाशात केवळ रेडिओवर ऐकावी. त्यांचे स्वर कानांतून थेट हृदयालाच भिडतात. म्हणून असे वाटते, अडगळीत पडत चाललेल्या या 'रेडिओ'ची 'एका जुन्या मित्राची' आठवण आपण न विसरुया, त्यावरील धूळ झटकून ती पुन्हा बसणार नाही एवढीतरी काळजी घेऊ या.

---

**– कुमार नवाथे**
साई प्रसाद, ६वा मजला,
दयाळदास रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई – ४०० ०५७
दूरध्वनी : ०२२– २६११८३०९
भ्रमणध्वनी : ९८६९०१४४८६
ई–मेल : kumar.nawathe@hotmail.com








# सारी नुसती खळबळ!

दिनकर गांगल

गेल्या शतकारंभी, सुराज्यासाठी राजकारण की समाजकारण या वादास तोंड फुटले. मधल्या एका टप्प्यावर, गांधींनी त्या दोन्ही गोष्टी एकत्र विणून झकास तोल साधला व समाजविकासाचे नवे तत्त्वज्ञान मांडले. परंतु त्यानंतरच्या पन्नास-साठ वर्षांत राजकारण व समाजकारण ह्या दोन्ही क्षेत्रांत दिवाळखोरी जाहीर करण्याचे बाकी राहिले आहे, इतका येथे ऱ्हास घडून आला आहे. ह्याच काळात तंत्रविज्ञान नावाच्या एका नव्या प्रेरणेने आधीचे सारे काम संदर्भहीन बनवून मानवी जीवनासाठी अवघे विश्व खुले करून ठेवले आहे!

तो काळ उत्सुकतेचा होता, जग जाणून घेण्याचा होता. जग जवळ येत असल्याची चाहूल लागली होती. पण ज्ञानशाखा अमर्याद नव्हत्या. विषयही क्षितिजाअलिकडचे वाटत होते. प्रश्नांना उत्तरे असतील असा विश्वास होता. ज्ञानसंपादनाची साधने मर्यादित होती. मुख्यत: पुस्तके, मासिके आणि ते साहित्य साठवणारी ग्रंथालये! अभ्यासाच्या, संशोधनाच्या वाटा मळलेल्या होत्या. समाज-परिवर्तनाचे सिद्धांत पक्के होते. निष्ठा भक्कम होत्या... मी भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या पस्तीस-चाळीस वर्षांच्या काळाचा उल्लेख करत आहे.

धर्माने दोन सहस्रके समाजरचना आखून दिली होती; परंतु आता धर्माची कालबाह्यता कळून चुकली होती. विज्ञानविकासाची दिशा ठरली होती. त्यातून मानवी जीवन सुखी होईल असा भरवसा आला होता. विज्ञानविकासामधूनच शस्त्रास्त्रांचा शोध लागला, अणुबाँबचा स्फोट घडून आला याची जाणीव होती. तथापि, ती चूक झालेली आहे याबद्दल पश्चात्तापही होता. त्यामुळेच त्या काळात वादसभा होत, शांतता-मोर्चे निघत, सत्याग्रह-निदर्शने संघटित केली जात.

विचारवंत आणि कार्यकर्ते एका आदर्श समाजाचे स्वप्न पाहत होते. ते साकार होणार असा त्यांचा विश्वास होता. त्यात समानता-बंधुता-स्वातंत्र्य अभिप्रेत होते. साऱ्या जगाने ती मूल्ये मान्य केली होती. संतांच्या वगैरे शिकवणुकीत, म्हणजे इतिहासातही त्यांचा शोध लावण्याचा प्रयत्न विचारवंत करू लागले होते आणि या परंपरेबद्दल अभिमान व्यक्त केला जात होता! श्रीमंत-गरीब, पुरुष-स्त्री, हिंदू-मुसलमान असे भेद नव्या

समाजरचनेत राहणार नव्हते. वर्णभेदाला वाव नव्हता. अजून सावकार शिल्लक होते, पुरुषवर्ग अहंकारी होता, धर्मांध वेडे होते; पण त्यांचे अतिरेकी बनले नव्हते.

वर्णश्रेष्ठत्व मानणाऱ्या हिटलरचा नि:पात करायला जग एकत्र येऊन गेल्याचा दाखला होता. सावकार-शाहीतून उद्‌भवलेल्या भांडवलशाहीला तोंड देण्यासाठी कामगारआंदोलने बांधली जात होती, त्यांच्या संघटना प्रबळ होत्या आणि त्या मालकासमोर उभ्या ठाकत तेव्हा त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी लेबर कोर्टे होती. त्या कोर्टांमधील छोट्या-छोट्या लढ्यांतील विजय मोठे, दूरगामी परिणामाचे वाटत होते!

कष्टकरी शेतकऱ्याला शेतमालकीची हमी देण्यासाठी कुळकायदा होता. त्यामुळे बसून खाणारा ऐतखाऊ जमीनदार, खोत हा समाजाचा शत्रू ठरला होता. शेतकऱ्यालाही अर्थकारण कळू लागले होते आणि तो त्याच्या उत्पादित मालाची रास्त किंमत मागू लागला होता. शेतकरी 'योद्धा' बनला आणि समाजाने त्याचे कौतुक आरंभले.

घराघरात होणारी स्त्रीची अवहेलना, विटंबना, अप्रतिष्ठा विचारी संवेदनाशीलांना बोचू लागली. स्त्रीचे 'अर्धे आकाश' तिला मिळायलाच हवे याबद्दल त्यांच्या मनात संदेह राहिला नाही; परंतु ते मिळणार कसे? घरसंसार, स्त्री-पुरुष संबंध ही कौटुंबिक गोष्ट होती. ती मानवी जिव्हाळ्याची कहाणी होती. तेथे शत्रू नक्की करता येत नव्हता. परंतु श्रेणिबद्ध समाजरचनेमधून पुरुषी दुष्टपणा निर्माण झाला आहे हे निदान पक्के होते व त्यावर इलाज करण्यासाठी हक्कांच्या जाणिवेबरोबर समजूत वाढणे गरजेचे होते. त्यामुळेच स्त्रियांवरील अत्याचारविरोधी कायदे जसे होत गेले तशी समुपदेशनाची केंद्रे सुरू केली गेली. नाटका-सिनेमांमधून, वाङ्‌मयामधून मांडले गेलेले स्त्रीचे दास्य, वस्तुकरण डोळ्यांत अंजन घालू लागले.

दलित-वंचित समाजापर्यंत शिक्षण पोचले आणि त्यांना आपण मानव असल्याचा साक्षात्कारच झाला! समाजातले असे उपेक्षित-दुर्लक्षित घटक त्यांचे जीवन प्रकट करू लागले तेव्हा ते 'विश्वरूप दर्शन'च वाटले! मानवी अस्तित्वाची अशी अवहेलना! इतकी भीषण घुसमट! व्यवस्थांतर्गत इतकी जुलमी-जबरदस्त पिळवणूक! त्या जाणिवेतून शिका-संघटित व्हा-संघर्ष करा हा मंत्रोच्चार बनला.

बहुतेक सर्व जाणीवजागृत लोक आपापल्या आयुष्यक्रमाची दिशा या 'पुरोगामी' वाटेने जाते हे समजून गेले होते. ते त्यात समाधानीही होते. त्याकरता त्यांना वैचारिक अधिष्ठान लाभले होते ते त्या आधीच्या तीनशे वर्षांच्या, आधुनिक ज्ञानप्रकाशित (रेनेसान्स) कालखंडामध्ये. ते लोक आपल्या पुढील पिढ्यांवर तसेच संस्कार करू लागले होते. तोपर्यंत पस्तीस-चाळीस वर्षे पार झाली होती. ते 'ज्येष्ठ नागरिक' होऊ लागले होते आणि त्यांचा मावळतीचा काळ सुरू झाला होता. दोन पिढ्यांची कामाची उमेद संपत आली होती. त्या जाणीवजागृत लोकांना हे कळले नाही, की आपले जीवन आतून वेगळाच कोणीतरी पोखरून राहिला आहे. विज्ञानाला-अर्थकारणाला-व्यवहाराला स्वत:चे मूल्य नसते, ते माणसाने त्यांना द्यायचे असते, हे त्या लोकांना माहीत होते. पण ते मूल्य नव्या समाजाच्या घडणीत आहे असे ते लोक धरून चालले होते. त्यामुळे त्यांना वेगळे कोणते विचार ऐकू येत नव्हते. कोठे घडत होता हा नवा समाज?

दोन प्रसंग आठवतात : एक- 'ग्रंथाली' व 'इंडियन एज्युकेशन सोसायटी' यांनी मिळून मुंबईत १९८८ च्या आसपास वाचन परिषद भरवली. तिचा समर्पक आशय छोट्या पोटशीर्षकात मांडण्यात आला होता- 'मानवी जिज्ञासेचा शोध.' तीन दिवसांच्या परिषदेतील एका परिसंवादाचा विषय होता 'शतक मावळताना.' सुमा चिटणीस, दि.वि. गोखले अशा ज्येष्ठांबरोबर दूरदर्शनवरील त्या वेळचा तरुण निर्माता विनय धुमाळे चर्चेत सहभागी होता. त्याने मानवाची शतकाची निराशा मांडली होती. तो म्हणाला की गेल्या शतकाच्या- एकोणिसाव्या- अखेरीने आम्हाला सांगितले, की धर्म झुट आहे, विज्ञान मानवतेचे प्रश्न सोडवणार आहे. आम्ही विश्वास ठेवला. शंभर वर्षे संपत आली. आज आमच्या ध्यानात असे येत आहे, की विज्ञानदेखील माणसाचे प्रश्न सोडवू शकणार नाही आणि म्हणून आम्ही पुन्हा धर्माकडे वळत आहोत? ही संदिग्धता छळणारी आहे.

दोन- त्याच बेताला मुंबई विद्यापीठात 'सृजन फीचर्स'तर्फे दिवसभराची एक गोलमेज अभ्यासचर्चा घडवून आणली गेली. विषय होता- 'गोर्बाचेवनंतरचे जग.' सारा विचार मुख्यत: राजकीय अंगाने झाला. मुंबईतील अनेक विद्वान त्यात सामील झाले होते.

गोविंद तळवलकर यांच्यापासून राम जोशींपर्यंत. 'नेशन-स्टेट'पासून 'स्त्रियांसाठी राखीव जागां'पर्यंतचे अनेक मुद्दे येत गेले. एका सत्रात विज्ञानशिक्षणतज्ञ वि.गो.कुळकर्णी व्यासपीठावरील तज्ज्ञमंडळाला प्रश्न विचारते झाले, की आपल्याला जीवनभर भेडसावत आलेले दलित-वंचित, स्त्रियांचे दुय्यम स्थान, भांडवलदारांकडून पिळवणूक हे सारे प्रश्न तंत्रविज्ञानाने बाजूला पडणार आहेत; बिनमहत्त्वाचे ठरणार आहेत? आणि तंत्रविज्ञानाची प्रगती व त्यातून येणारी भौतिक समृद्धी हा स्वतःच एक प्रश्न बनून मानवतेला ग्रासणार आहे? त्यावेळी सॉफ्टवेअर क्रांती व्हायची होती. टेलिव्हिजन जरी पूर्ण रुळला होता तरी इंटरनेट व इलेक्ट्रॉनिक्सचे कम्युनिकेशनमधील चमत्कार दिसून यायचे होते. धुमाळे म्हणतो ती विचारांतील संदिग्धता आणि कुळकर्णी सुचवतात तो तंत्रविज्ञानाचा समाजावरील कब्जा या गोष्टी एकमेकांस पूरक आहेत का? असे वेगळे आवाज त्याकाळी उमटत होते.

गेल्या शतकातील उत्तरार्ध अशा संगत-विसंगत विचारांनी, घटनांनी सतत धक्के देत गेला आहे. परभणी जिल्ह्यातल्या गंगाखेडजवळच्या एका स्वयंसेवी संस्थेत एके दिवशी सकाळी नऊच्या बेताला काहीसा अचानक पोचलो होतो. एका झाडाखाली संस्थेच्या आवारात पन्नास-साठ स्त्रिया घोळक्याने बसल्या होत्या. त्यांच्यासमोर झाडाच्या पारावर संस्थेचे कार्यकर्ते स्त्रियांची निवेदने ऐकत होते. मी त्यांच्या बाजूला जाऊन बसलो. बोलणाऱ्या प्रत्येक स्त्रीचा आत्मविश्वास प्रत्ययकारी होता पण त्याहून अधिक, त्या स्त्रीसमुदायाच्या चेहऱ्यांवरील एकत्रित ताकद भेदून टाकणारी वाटत होती. त्या माझा भेद नक्कीच करणार नव्हत्या. ते सामर्थ्य जाणवत होते परिस्थितीवर मात करण्याचे.

ऑस्ट्रेलिया किंवा न्यूझीलंड यांपैकी कोणत्या-तरी देशाने, त्या स्वयंसेवी संस्थेच्या मध्यस्थीने, त्या परिसरातील शंभरएक कुटुंबांना जर्सी गायी दिल्या होत्या. त्या गायी स्त्रियांच्या नावावर होत्या. त्यामुळे दुधाचे उत्पन्न हे स्त्रियांच्या हाती येत होते. हा प्रयोग सुरू होऊन पाच-सात महिने उलटून गेले होते. त्यासाठी स्त्रियांची दर पंधरवड्याला अशी बैठक होई. त्यामध्ये अनुभवकथन व अडचणींचे निवारण ही

> तंत्रविज्ञानाने व्यक्तिस्वातंत्र्याचे मूल्य प्रबळ व प्राप्तिसुकर झाले, परंतु त्याबरोबर विचारतत्त्वज्ञान प्रगल्भ होत न गेल्याने लोकशाही राज्यपद्धत मात्र दुबळी व कर्मकांडी होत गेली. स्वाभाविकच, लोकशाही हे ठेकेदारांचे कुरण बनले. राजकरणी, नोकरशहा व ठेकेदार हे मिळून लोकशाही राबवतात. त्यामुळे समाजपरिवर्तनाचे साधन म्हणून राजकारण बाद झाले.

कार्यक्रमपत्रिका असे. त्यांच्यामध्ये बळ आले होते ते समुहातून आणि स्वावलंबनातून.

दहा-पंधरा वर्षांपूर्वीचा हा प्रसंग माझ्या मनात विसरला जाणे मुश्किल आहे. त्यानंतर अल्पबचत गटांतील स्त्रियांचे सामुहिक बळ मी परत परत पाहिले आहे आणि थक्क होऊन गेलो आहे. गेल्या पन्नास वर्षांत स्त्रियांमध्ये घडून आलेली जागृती समाजाचे सामर्थ्य वाढवणारी आणि नवी आशा देणारी आहे. पण 'अर्ध्या आकाशा'चे काय? स्त्री पुरुषाबरोबरीने स्थान मिळवणार असे दिसते, परंतु नव्या समाज-घडणीत दोघेही कोणाच्या तरी हातचे साधन बनून आपले मानव म्हणून असलेले संवेदनेचे स्थानच गमावून बसत नाहीत ना, अशी शंका, असुरक्षित भावना का वाटते?

दुसरे थोडे वेगळे चित्र. गडचिरोली जिल्ह्यातील बल्लारशा हे रेल्वेस्टेशन. स्टेशनात एक स्त्री कार्यकर्ती भेटली. ती स्टेशनातील भटक्या मुलांना वळण लावण्याचे आणि पुढे शाळेत दाखल करण्याचे कार्य करत होती. मी जाताच तिने स्टेशनातल्या इकडे-तिकडे फिरणाऱ्या मुलांना एका छोट्या दालनात बोलावून घेतले. कोणाचे नाव सय्यद, तर कोणाचे बाबू, आणखी कोणाचे ॲलेक्स अथवा जॉन.

ती सारी मुले त्या कार्यकर्तीला अशीच स्टेशनात वा रेल्वेत भेटली होती. त्यांना आई-बाप-बहीण-भाऊ, कोणी असल्याची नोंद नव्हती. ती रेल्वेत भीक मागत, भुरट्या चोऱ्या करत जगत होती. त्या मुलांना एकत्र करून त्यांना जीवनात स्थिरावण्याचा त्या कार्यकर्तीचा प्रयत्न होता. ती कार्यकर्ती त्यांना तऱ्हतऱ्हेचे प्रश्न विचारून बोलते करू लागली. पण त्यांचे उत्तर अ नाही

की ढ नाही. त्या कार्यकर्तीने त्यांच्यासाठी जेवण, झोप या संबंधात ज्या सोयी केल्या होत्या त्याबाबतच्या प्रश्नांना मात्र त्यांच्याकडून 'हो-नाही' अशी जुजबी उत्तरे आली. त्यांचे चेहरे पूर्णत: कोरे!

कार्यकर्तीने सांगितले त्याप्रमाणे ती मुले दहा ते सतरा वयोगटातील असावीत. कार्यकर्तीच्या एका प्रश्नाला त्यांनी दिलेले उत्तर मन विदीर्ण करून गेले. तिने विचारले, 'ख्रिस्तो कुठे दिसत नाही तो?' मुले उद्गारली, 'काल ग्रँट ट्रंकवर (एक्स्प्रेस) गेला.' आम्ही विचारले, 'परत केव्हा येणार?' मुले म्हणाली, 'माहीत नाही.' त्यांच्या लेखी मुलगा गाडीवर गेला तो गेला. तो परत आला तर आपला, नाही आला तर कोण आठवण काढणार? सगळ्यांची अवस्था अशीच होती. ना आगा ना पिछा. स्वतःची ओळख नसलेली ती मुले कायम डोक्यात जाऊन बसली आहेत. मुंबईत स्ट्रीट चिल्ड्रेन पाहिली होती, स्टेशनांवर त्यांच्यासाठी चालणारे उपक्रम जवळून निरखले होते. मुंबईत रेल्वेत बूटपॉलिश करून शिकलेल्या मुलाची आत्मकहाणी प्रसिद्ध होण्यास मी साधनही झालो आहे. परंतु बल्लारशा स्टेशनवरील त्या बारा-तेरा 'हरवलेल्या' मुलांचे निर्विकार चेहरे गेली बारा-पंधरा वर्षे मनोमन हताश करत असतात. माझ्या बरोबर आलेल्या चित्रकार मित्राने त्यांचे चेहरे रेखाटायचा प्रयत्न केला, परंतु जिवंत असून नसलेल्या त्या मुलांच्या सजीवमूर्ती आमच्या मनात शीळा बनून राहिल्या आहेत.

भारताच्या समाजस्थितीचे हे सामर्थ्य आहे आणि दुर्दशाही आहे. एकाच वेळी, मनाला उभारी देणाऱ्या गोष्टी घडत असतात आणि विकल-विषण्ण करणारे असे चित्रही समोर येऊन उभे ठाकलेले असते. भारताच्या विकासाची ही कहाणी आहे. गेल्या साठ वर्षांमध्ये खूप मोठमोठे प्रकल्प उभे राहिले. औद्योगिक क्रांती झाली. सॉफ्टवेअरमधील तज्ज्ञतेने देशाला वैभव प्राप्त करून दिले. देशातील साक्षरता पासष्ट टक्क्यांवर जाऊन पोचली. चार कोटी लोकांकडे टेलिव्हिजन सेट आले. वीस कोटी लोकांच्या हाती मोबाईल्स दिसू लागले. दुष्काळ आला तरी भूकबळी जाणार नाही अशी हमी कृषी मंत्र्यांच्या तोंडी आली. त्याचबरोबर गडचिरोलीत बालमृत्यूंची संख्या केवढी मोठी आहे हे अभय बंगांनी दाखवून दिले तर मेळघाटमधील कुपोषणातून होणारे मृत्यू टाळण्यासाठी 'मेळघाट मित्र'सारख्या वीस-बावीस संस्था कटिबद्ध झाल्या तरी मृत्यूच्या बातम्या परत परत येतच आहेत!

गेल्या शतकाचा उत्तरार्ध हा विचारांनी प्रगल्भ आणि कृतीने धगधगता असा काळ आहे. त्याने अनेक राजकीय व सामाजिक चढउतार पाहिले. त्याच काळात जगातील सर्वात मोठा लोकशाहीचा यशस्वी प्रयोग येथे घडून आला. राजकीय पक्षपद्धतीचे विघटन आणि ऱ्हास होऊन गेले. महात्मा गांधींची हत्या झाली. पंडित नेहरूंचे संस्कृतिसंपन्न भारताचे स्वप्न इंद्रधनुष्य स्वरूपात चमकून गेले. इंदिरा गांधींची ओजस्वी तडफ दिसून आली, पण त्यांना प्रस्फुटित होणारा समाज काबूत ठेवता आला नाही हेही प्रकट झाले. राजीव गांधींच्या रूपाने भारतात पुन्हा अरुणोदय होणार असे वाटत असतानाच त्यांचा अस्त घडून आला. त्या काळातील कलुषित राजकारणाने त्यांचा बळी घेतला. त्यानंतर देशातील परिस्थिती हे विश्वास गमावलेले राजकारण आहे.

समाजविकासासाठी राजकारण की समाज-कारण असे दोन पर्याय गेल्या शतकात उभे केले गेले. टिळक-आगरकरांपासून चालत आलेला वाद नंतर डावा प्रभाव वाढला तेव्हा आपोआप सुटल्यासारखा झाला आणि समाजबदल घडवायचा तर सत्ता हवीच हा स्वीकार दृढपणे रुजला. क्रांतिकारी सामाजिक बदल घडवू शकतील असे काही महत्त्वाचे निर्णय सरकारने-प्रशासनाने राबवलेदेखील. विशेषत: नेहरूंचे संमिश्र अर्थकारण आणि पंचवार्षिक योजना, इंदिरा गांधी ह्यांचे बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे नष्ट करणे, आणीबाणीतील वीस कलमी कार्यक्रम, व्ही.पी.सिंग ह्यांचा मंडल आयोगाचा स्वीकार ह्यांचा उल्लेख करता येईल. विद्यमान स्थिती अशी आहे की भारत सरकारने व राज्य सरकारांनी केलेले कायदे व नियम इतके सुविहित आहेत की ते अमलात आणले गेले तर ह्या देशात 'रामराज्य' निर्माण होईल! परंतु सत्तेमध्ये राजकारणी, नोकरशहा व ठेकेदार ह्यांचे असे जबरदस्त हितसंबंधी त्रिकूट जमले आहे, की ते भेदून कोणतीही चांगली गोष्ट सत्तेतून या देशात घडू शकेल ह्यावर जनतेचा विश्वास राहिलेला नाही. विज्ञानविकासामुळे आम-माणसाच्या मनातील देवाधर्माबद्दलच्या विश्वासाला तडा गेला आहे, परंतु प्रभावी पर्यायाभावी तो रुढी-कर्मकांडात व

भावववेडेपणात अडकला आहे. तीच अवस्था आजच्या राजकारणाची व सत्ताकारणाची झाली आहे. शरद पवार, गोपीनाथ मुंडे, विलासराव देशमुख ह्या विद्यमान नेत्यांना महाराष्ट्राच्या लोकमानसात अत्यंत तळचे स्थान आहे. त्यांच्या बाबतीत जे दिसते-भासते ते पद व स्थानमहात्म्य आणि अर्थातच पैशांची किमया. एके काळी देशाचे व्यवस्थापन टाटा-बिर्ला ह्यांच्याकडे सोपवावे अशी उपरोधाने चर्चा होई, पण परवा एक पत्रकार म्हणाला, महाराष्ट्र विकायला काढला तर बोहारीण स्टीलचे भांडे देखील देणार नाही! लोकशाही राजकारणाची केवढी ही अवनती व अधोगती!

समाजकारण एनजीओंच्या हाती गेले आहे. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर स्वातंत्र्य-चळवळीच्या काळात कर्वे-केतकर-भाऊराव पाटील, विठ्ठल रामजी शिंदे असे मोठे समाजसेवक होऊन गेले. त्या सर्व समाजसेवेच्या मागे मोठा ध्येयवाद होता, स्वातंत्र्याचे उद्दिष्ट होते. स्वातंत्र्यानंतर समता येईल, त्या समतेसाठी म्हणून ते प्रयत्न होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, राष्ट्र सेवा दल, साने गुरुजी कथामाला असे वेगवेगळ्या स्वरूपाचे स्वयंसेवी उपक्रमदेखील त्या काळात रुजले. किंबहुना, त्या मधून स्वयंसेवी कामांना बळ, नैतिक पाठिंबा व कार्यकर्ते मिळत गेले. संघाच्या प्रचारासाठी सगळे आयुष्य एका कार्याला वाहण्याची कडवी परंपरा तयार झाली. राजेंद्र बनहट्टींची संघ प्रचारकाच्या जीवनावरील कथा फार प्रभावी आहे.

परंतु उद्घोष करून बनलेली, समाजसेवेचे व्रत जाहीरपणे स्वीकारलेली - त्यासाठी सारे जीवन व्यतीत केलेली आणि जी समाजसेवेचे घराणेच बनली, अशी पहिली व्यक्ती म्हणजे बाबा आमटे. त्यांनी व त्यांच्या वारसांनी उभे केलेले कार्य थक्क करून सोडणारे आहे.

आमट्यांच्याच आगेमागे असे मोठे आणखी काही प्रयत्नही महाराष्ट्रात झाले. त्यात देवरूखचे 'मातृमंदिर', पनवेलजवळचे शांतिवन, अमरावती-जवळचे 'तपोवन' असे उल्लेख करता येतील. ह्या संस्थांनीदेखील त्यांच्या सभोवतालच्या परिसरात ग्रामविकासाच्या दिशेने फार मोठे काम उभे केले. तेथे घराणी निर्माण झालेली दिसत नाहीत. कामाचे सातत्य मात्र टिकले आहे. ह्या सर्व कामांना 'व्रता'चे वलय लाभले आहे. त्यांनी कालानुरूप व्यावसायिकता धारण केली आहे. 'शांतिवन'चे गोविंदराव शिंदे यांचे अलिकडेच निधन झाले. ते अखेरपर्यंत बिनखर्चाचे संयमित जीवन जगले. नारकर पती-पत्नी तसेच साधे जीवन जगतात. 'तपोवन'ची कहाणी सरकार बरोबरच्या संघर्षाची झाली आहे.

बाबा आढाव ह्यांची एक गाव-एक पाणवठा मोहीम, नरेंद्र दाभोळकरांचे अंधश्रद्धा निर्मूलन, संघाने चालवलेले समरसता अभियान, शांताराम गरुड ह्यांची समाजवादी प्रबोधिनी, किशोर बेडकीहाळ ह्यांची आंबेडकर ॲकॅडमी, विनय सहस्रबुद्धे ह्यांची रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी असे काही उपक्रम, मोहिमा, प्रकल्प गेल्या चाळीस-पन्नास वर्षांत संघटित झाले. त्यांचा आपापल्या क्षेत्रात परिणाम घडून आला, काही बाबतींत घडून येत आहे. विलासराव साळुंख्यांच्या पाणी पंचायतीसारखे 'वन मॅन मिशन'ही बराच काळ चर्चेत राहिले. गिरीश प्रभुणे ह्यांचे पारध्यांमधील काम नमुनेदार ठरले आहे.

महाराष्ट्रात स्वयंसेवी कार्याची दुसरी लाट आली ती १९८० नंतर. जनता पार्टीचे सरकार कोसळले. काँग्रेस पक्षाला पर्याय निर्माण करण्याचे स्वप्न भंगले. इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर आल्या. त्यामुळे राजकारण विशुद्ध असू शकते असे सिद्ध करण्यास निघालेले, मुख्यत: जयप्रकाशांच्या आंदोलनातील कार्यकर्ते सैरभैर झाले. त्यांना समाजासाठी काही करायचे होते, राजकारणाचा मार्ग त्यांचा त्यांनीच बंद केला होता. मग त्यांनी विधायक कार्याच्या उपक्रमांना वाहून घेतले.

तोपर्यंत सरकारी विकासाचे वारेही तळापर्यंत जाऊन पोचले होते. परंतु नोकरशाहीचा नन्ना म्हणा किंवा स्थानिक पुढाऱ्यांचा आडमुठेपणा म्हणा, यामुळे जनतेला सरकारी योजनेचा लाभ प्रत्यक्ष होत नव्हता. त्यात सुकरता आणण्यासाठी विधायक कार्याचे हे उपक्रम फलदायी ठरले आणि विशेषत: विदर्भ-मराठवाड्यात, तो विभाग जास्त मागासलेला असल्यामुळे अनेक स्वयंसेवी संस्था उभ्या राहिल्या. मार्क्सवादी 'मागोवा' गटाच्या लोकांनीदेखील धुळ्यात ह्या प्रकारच्या विधायक कामाला वाहून घेतले.

राजकारणापासून निराश झालेल्या ह्या कार्यकर्त्यांशिवाय संघ परिवारातून समाजसेवी कार्यकर्त्यांची मोठी फौज त्याच काळाच्या आगेमागे

बाहेर पडली, ती बाळासाहेब देवरस सरसंघचालक असताना. त्यांनी संघाचे समाजकार्य विस्तारण्याचा 'आदेश' दिला आणि वनवासी कल्याणाश्रम वगैरे-सारखे, तळागाळातल्या लोकांच्या उद्धाराचे कार्य सुरू झाले. अजून ते बऱ्याच अंशी त्याच निष्ठेने चाललेले दिसते. स्वयंसेवी समाजकारणात वैभव, व्यावसायिकता व कागद हलवणारी नोकरशाही आल्याची जी टीका होते ती संघ संबंधित संस्थांना लागू होत नाही. तेथे सेवाभाव व निष्ठा टिकून आहेत. असेच काही मोजके सेवाकार्य राष्ट्र सेवा दल प्रणित ज्येष्ठांकडून होत असते.

स्वयंसेवेच्या कामाची दिशा मुख्यत: चार प्रकारची आहे. पहिली म्हणजे गरिबी हटाव-लोकांच्या उत्पन्नाची पातळी वाढवणे. त्यात पाणलोट विकासाच्या कामापासून रोजगार हमीवरील वेतना-पर्यंतचे तऱ्हतऱ्हेचे प्रयत्न झालेले दिसतात. दुसरी तऱ्हा शिक्षणाची व जाणीवजागृतीची. अज्ञानांध:कार दूर झाल्याशिवाय प्रगती शक्य नाही, या जाणिवेने ही मंडळी प्रौढ साक्षरता वगैरेसारख्या उपक्रमात हिरिरीने उतरली. तिसरी तऱ्हा होती आरोग्यसुविधा. त्यातही दोन प्रकार होते. एक प्रतिबंधात्मक आणि दुसरा उपाययोजनेच्या अंगाने. त्यातील दुसऱ्या प्रकारावर सरकारचा, देणगीदार संस्थांचा आणि लोकांचाही जास्त विश्वास होता. चौथी तऱ्हा-मानवी हक्क संरक्षण. भारत हा इतका रुढीबद्ध देश आहे, की तिथे श्रीमंत स्तरातही माणसाला माणुसकीचे अधिकार नाहीत आणि आपण त्यापासून वंचित आहोत याची जाणीवदेखील नाही. त्यामुळे गरीब वर्गात तर या संबंधी विलक्षण दैना होती. त्यांना साधा जिवंत राहण्याचा हक्कदेखील माहीत नव्हता. अशा तळच्या वर्गात मानवी शरीराच्या अस्तित्वा-साठीदेखील संरक्षण हवे होते. स्वयंसेवी संस्थांसाठी ते देखील मोठे काम झाले. स्वयंसेवी संस्थांनी वेठ-बिगारांना मुक्त केल्याच्या कहाण्या रोमहर्षक आहेत.

स्त्रियांमधील जागृती मोहीम थोड्या उशिरा, 'युनो'ने स्त्रीसंवत्सर जाहीर केल्यावर, १९७५ नंतर येथे पोचली. मात्र बघता बघता, तिने अवघा महाराष्ट्र व्यापून टाकला. पहिली पाच वर्षे जागृतीची, दुसरी दहा वर्षे संघर्षाची आणि १९९० नंतरची वर्षे अल्पबचत गट वगैरे विधायक कामांची व त्याचबरोबर १९९६ नंतर आलेल्या 'माहिती स्फोटा'च्या क्रांतीत 'जेंडरजाणीव विहीन' होण्याची आहेत. स्त्रीस्वातंत्र्य संकल्पनेत मान्य झाले, ते प्रत्यक्षातही येईल अशी सुचिन्हे आहेत, परंतु स्वातंत्र्य कशासाठी हा वैचारिक आधारच तंत्रज्ञानाच्या व्याप्तीत लुप्त झाला आणि तो शोध पर्यावरणासारख्या मुद्यांमध्ये पुरुषवर्गाबरोबर करण्याची वेळ आली आहे!

स्त्रीमुक्ती संघटनेसारख्या काही जुन्या संस्था चिकाटीने व्रतस्थ राहिल्या. त्यांनी व्यापक विधायक कार्यास वाहून घेतले आणि विस्तार साधला. त्यामधून कचरावेचक महिलांचे संघटन, शालेय मुलामुलींसाठी जिज्ञासा प्रकल्प, मुलींना शिक्षण सुविधा, कुटुंबपीडित स्त्रियांना कायदेशीर सल्ला असे चांगले उपक्रम घडून येत आहेत. इरि बऱ्याच स्त्री संस्था एनजीओ बनल्या. स्त्रियांचे अल्पबचत गट हा तर शासनमान्य स्त्री-उद्धाराचा मार्ग बनला आहे. स्त्रीस्वातंत्र्य विचाराच्या क्षेत्रातही विद्या बाळ, छाया दातार, रुपा कुळकर्णी, मेधा नानिवडेकर, नीलम गोऱ्हे, शारदा साठे ह्यांच्या नंतरचे नेतृत्व नजरेसमोर येत नाही.

मधुकर देवल ह्यांनी म्हैसाळ येथे दलितांसाठी सहकार प्रकल्प राबवला व तोही आदर्शवत झाला. त्या पाठीमागे संघ परिवारातील लोक प्रामुख्याने होते. त्याचा विस्तार म्हणून प्रकल्पाचे पाठीराखे वसंतराव देशपांडे आणि श्री.ग. माजगावकर ह्यांनी 'ग्रामायन' नावाचा, विधायक कार्यांना एकत्र गुंफण्याचा प्रयोग केला. तसा स्वयंसेवी संस्थांना एकत्र आणण्याचा प्रयत्न मधुकरराव चौधरी ह्यांच्या अध्यक्षतेखाली जळगाव येथेही झाला होता.

देश पातळीवर चिपको (उत्तरांचल), अप्पिको (कर्नाटक), नर्मदा (गुजराथ), चिल्का (ओरिसा) ही आंदोलने गाजली. त्यांपैकी 'नर्मदे'ने राजकीय रूप घेण्याचा प्रयत्न केला, पण कार्यक्रमातील तथ्यहीनतेने तो रंग गडद होऊ शकला नाही.

नव्या रूपातील, अधिक लक्ष्यकेंद्रित स्वयंसेवी संस्था (एनजीओ) गेली पंचवीस-तीस वर्षे सतत चर्चेत राहत आलेल्या आहेत; काही वेळा मोठे वादही झडले आहेत. त्या निर्माण झाल्या सत्प्रवृत्तीतून. कोणा व्यक्तीच्या डोक्यात आले, तिच्याभोवती चार मित्र-

सहकारी जमा झाले. त्यातून कोठेतरी सोयीच्या जागी मुख्यत: ग्रामविकासाचे काम सुरू झाले. पाणलोट विकास, मुलांचे संगोपन-शिक्षण, आरोग्य असे मुद्दे असतात. त्यासाठी अनुदान, अर्थसाहाय्य मिळते. त्यांच्याकडे विधायक विकासकार्याची आच सच्ची असते, परंतु वैचारिक निष्ठेचा अभाव असतो. त्यामुळे आरंभीची आर्तता व पारदर्शकताही फार काळ टिकत नाही. त्यामधून एनजीओ म्हणजे कोणाचे तरी संस्थान अशी प्रतिमा तयार झाली आहे.

त्यांच्यावरील टीकेचा एक प्रमुख मुद्दा परदेशातून येणारा पैसा हा असतो. हा निधी नियंत्रित करण्यासाठी सरकारी स्वतंत्र कायदा आहे. या निधीबाबत खरी चर्चा सुरू झाली ती किल्लारीच्या भूकंपानंतर (१९९३). त्यावेळी परदेशातून मोठ्या प्रमाणावर पैसा उपलब्ध झाला. अनेक संस्था आणि व्यक्ती या कामात घुसल्या. आरंभी त्यांमध्ये चांगल्यापैकी प्रामाणिक-पणा आणि पारदर्शकता हे गुण होते. त्यामुळे त्या परिसरात काही चांगली कामेही घडून आली आहेत. तथापि, पैसा उपलब्ध होण्याचा मार्ग कळला, की देणारे आणि घेणारेही सोकावतात. त्यामधून याचनावृत्ती तयार झाली. गरिबीचे भांडवल होऊ लागले आणि खोटेपणा पसरला. या गोष्टीला देखील वीस वर्षे होत आली.

स्वयंसेवी संस्थांना मिळणारा पैसा हा मुख्यत: पाश्चात्य जगातून-अमेरिका व काही युरोपीय देश-येत होता. त्याचे प्रमाण नंतर इतके वाढत गेले, की एका अंदाजानुसार त्या दशकात दरवर्षी स्वयंसेवी संस्थांना दोन हजार दोनशेवीस कोटी रुपये मिळाले असावे व त्याचा लाभ भारतातील एक लाखापर्यंत स्वयंसेवी संस्थांना होत असावा. या साहाय्यावरील टीका मुख्यत: डाव्या समाजवादी विचारांच्या मंडळींकडून होत असे. त्यांना हा राजकारणाचा भाग वाटत असे. त्याखेरीज पाश्चात्य संस्था आर्थिक मदत देऊन येथील स्वयंसेवी संस्थांकडून आपला कार्यक्रम पुढे रेटत असतात असाही एक प्रवाद आहे. तो काही प्रमाणात सत्य आहे. उदाहरणार्थ ब्राऊन शुगरविरोधी मोहिमेसाठी एका काळात इकडे पैसे आले आणि अनेक संस्था त्या प्रचारात उतरल्या. डॉ. अनिल अवचट, डॉ. आनंद नाडकर्णी यांच्यासारखे मान्यवर बुद्धिवंतदेखील त्या मोहिमेत उतरले; येथे खरा प्रश्न

> बाबा आमटे ह्यांच्यानंतर, विद्यमान महाराष्ट्रात
> अण्णा हजारे ह्यांचे नाव आदर्श समाजसवेक
> म्हणून ठळकपणे नजरेसमोर येते.
> त्यांचे राळेगण सिद्धीचे काम घडून गेले.
> आता अण्णांना, 'पेडगावच्या शहाणे'
> चित्रपटात राजा परांजपे ह्यांना जसा 'कात्री'
> तसा 'भ्रष्टाचार' रोग झाला आहे.
> भ्रष्टाचारी दिसला रे दिसला की ते
> उपोषणाला बसतात (आणि सोडतात).
> अभय बंग व प्रकाश आमटे ह्यांच्या कार्याने
> सध्या समाजसेवा प्रतीत होते.
> पहिला अभ्यास-संशोधनाने मोठा,
> दुसरा सेवाभावाने मोठा.
> पण दोघेही विनम्र, प्रेमळ, दयार्द्र...
> जुन्या पिढीच्या करुणेचा वारसा सांगणारे

दारूच्या व्यसनाचा होता व आहे. ब्राऊन शुगरचे अस्तित्व जाणवतही नव्हते. त्यामुळेच त्या विरोधी मोहीम अल्पकाळ टिकली व अस्तंगतही झाली.

परदेशी साहाय्यामुळे अनेक चांगल्या गोष्टी घडून आल्याचीही नोंद करता येईल. या संबंधात एक मुख्य मुद्दा नमूद करून ठेवला पाहिजे, की इकडे जे साहाय्य परदेशातून येते ते मानवी करुणेच्या भावनेतून आलेले असते. दुसरे म्हणजे त्या त्या देशातील लोकांची पोटे पूर्ण भरल्यावर पाठवले गेलेले असते. शहर भागात मोठमोठ्या इमारतींवर पाण्याच्या टाक्या असतात. त्या पूर्ण भरल्या, की पाणी धोऽधो वाहू लागते. परदेशी पैशांची आवक ही भरलेल्या टाक्यांमध्ये आणखी पडत राहणाऱ्या पाण्यासारखी असते. त्या मदतीचा लाभ जोपर्यंत होत आहे तोपर्यंत ती प्रभावीपणे उपयोगात आणणे व त्या आधारे येथील लोकांना 'फिलाँथ्रॉपी'ची सवय लावणे हा उत्तम मार्ग होय. या मदतीमुळे परावलंबित्व न वाढता आत्मबल व स्वावलंबित्व वाढत आहे ना? याकडे कल असणे हा इष्ट मार्ग होय.

या काळात आणखी एक घटक प्रबळ झाला तो म्हणजे व्यावसायिक स्वयंसेवेचा. आरंभी टाटा इन्स्टिट्यूट आणि निर्मला निकेतन या दोन ठिकाणी समाजसेवेचे व्यावसायिक शिक्षण उपलब्ध होते. परंतु

## ।। मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास ।।

### राज्य मराठी विकास संस्थेची प्रकाशने

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महानगरपालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी : २२६५ ३१ ६६ / फॅक्स- २२६३ १३ २५

- मराठी लेखन मार्गदर्शिका-यास्मिन शेख - मूल्य ८०रु.
- प्रशासनिक मराठी भाषेचा विकास - गीता भागवत - मूल्य १५० रु.
- कोश व सूची वाङ्मय : स्वरूप आणि साध्य - संपा.सरोजिनी वैद्य, सुषमा पौडवाल, अनिता जोशी, कविता महाजन - मूल्य २०० रु.
- मराठी लघुलेखन शब्दकोश - व.वा.इनामदार - मूल्य १४०रु.
- शालेय मराठी शब्दकोश - वसंत आबाजी डहाके, गिरीश पतके - मूल्य १०० रु.
- शिक्षण , शिक्षक व अभ्यासक्रम - वासुदेव बळवंत पटवर्धन - संपा. रमेश पानसे - मूल्य १६० रु.
- मराठी भाषा:वाढ आणि बिघाड - श्री. के.क्षीरसागर - मूल्य १७५ रु.
- 'वृद्धि:' भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन - दिनेश द. माहुलकर - मूल्य १६० रु.
- बेलभाषा - सुमन बेलवलकर - मूल्य १००रु.
- भाषा आपली सर्वांचीच-अविनाश बिनीवाले-मूल्य १५०रु.
- महाराष्ट्र साहित्य परिषद - म. श्री. दीक्षित - मूल्य ५० रु.
- व्याकरणकार मोरो केशव दामले : व्यक्ती आणि कार्य - कृ.श्री.अर्जुनवाडकर - मूल्य १५० रु.
- काकासाहेब कालेलकर : व्यक्ती आणि कार्य - मृणालिनी जोगळेकर - मूल्य १५०रु.
- गंगाधर बाळकृष्ण सरदार : व्यक्ती आणि कार्य - हेमंत वि. इनामदार - मूल्य ६० रु.
- बालगंधर्व:व्यक्ती आणि कार्य-मोहिनी वर्दे - मूल्य ६० रु.
- मातृसेवा संघ - विनया खडपेकर - मूल्य ६०रु.
- सकाळ वृत्तपत्र आणि वृत्तसमूह-स्वाती सुहास कर्वे-मूल्य ६० रु.
- शंतनुराव किर्लोस्कर:व्यक्ती आणि कार्य - भा. र.साबडे - मूल्य १६०रु.
- डॉ.अ.का.प्रियोळकर:व्यक्ती आणि कार्य - डॉ.वि.बा. प्रभुदेसाई - मूल्य १४० रु.
- त्र्यंबक शंकर शेजवलकर सूची - सुषमा पौडवाल - मूल्य १५०रु.
- त्रिवेंद्रमची मराठी हस्तलिखिते - संपा.डॉ.वसंत जोशी - मूल्य ३०रु.
- मद्रासची मराठी हस्तलिखिते - संपा.डॉ.वसंत जोशी - मूल्य १५०रु.
- हैदराबादची मराठी हस्तलिखिते - संपा. डॉ. श्री. रं. कुलकर्णी, डॉ. व. दा. कुलकर्णी, प्रा. द. पं. जोशी - मूल्य १००रु.
- कर्नाटकातील मराठी हस्तलिखिते - संपा. डॉ भीमाशंकर देशपांडे - मूल्य १५० रु.
- तंजावर सूची - संपा. भीमराव केसकर - मूल्य २०० रु.
- दक्षिण भारतातील मराठी वाङ्मयाचा इतिहास - तंजावर खंड संपा. डॉ. वसंत जोशी - मूल्य ५००रु.
- दाक्षिणात्य साहित्य - संस्कृतीचा मराठीशी अनुबंध - डॉ. माणिक धनपलवार - मूल्य ३०० रु.
- साहित्यसेतू - श्री.रं.कुलकर्णी - मूल्य ४५ रु.
- दखनी भाषा - मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार - श्री.रं.कुलकर्णी - मूल्य ४५ रु.
- आंध्र - कर्नाटक खंड - संपा. डॉ. वसंत जोशी, डॉ. द. दि. पुंडे - मूल्य ५०० रु.
- मराठी विज्ञानग्रंथसूची (१९५१-१९९९) - संपा. रा.वि. सोवनी, संजीवनी शिंत्रे - मूल्य १५० रु.
- मराठी वैद्यकग्रंथसूची (वर्णनात्मक) (१९५१-१९९९) - संपा.डॉ.सु.नाडकर्णी, क. महाजन - मूल्य १२५ रु.
- मराठी ग्रंथसूची-भाग १ व २ - संपा. कै. शं.ग.दाते - मूल्य २६०० रु.
- मराठी ग्रंथसूची भाग - ३ (१९५१-१९६२)- संपा. शरद साठे - मूल्य १००० रु.
- मराठी ग्रंथसूची भाग - ४ (१९६३ -१९७०) संपा. शरद केशव साठे - मूल्य ११०० रु.
- मराठी ग्रंथसूची भाग - ५ (१९७१ -१९७८) संपा. शरद केशव साठे - मूल्य १६०० रु.
- वाचू आनंदे - माधुरी पुरंदरे भाग १ ते ४, संचाचे - मूल्य ३०० रु.
- यंत्रालयाचा ज्ञानकोश - संपा.शं.गो.भिडे - मूल्य १६००रु.
- विज्ञान संकल्पना कोश-संपा.प्रा.रा.वि.सोवनी - मूल्य २२५ रु.
- मराठी कोश व संदर्भसाधने यांची समग्र सूची - (१८००-२००३) संपा. डॉ. व. वि. कुलकर्णी - मूल्य २०० रु.
- शिक्षणाचे अंतरंग - लीला पाटील - मूल्य १७५ रु.

- फार्सी - मराठी व्युत्पत्तिकोश - डॉ. यू. म. पठाण - मूल्य ६०० रु.

संस्थेच्या इतर दर्जेदार प्रकाशनांसाठी प्रकाशनसूची मागवा. संस्थेचे संकेतस्थळ - http://rmvs.maharashtra.gov.in

या क्षेत्रातही 'नोकरी'च्या संधी आहेत असे दिसल्या-नंतर समाजसेवेच्या शिक्षणसंस्था, बी.एड. कॉलेजां-प्रमाणे पटापट वाढत गेल्या. त्याशिवाय 'पॅरा' कोर्सेस आहेतच. ते एक प्रकारचे उमेदवारी प्रशिक्षण. त्यामुळे या क्षेत्रातही पदवीधर समाजकार्यकर्त्यांचा सुकाळ आहे. त्यामानाने नोकऱ्या उपलब्ध नाहीत. एक अडचण अशी असते, की व्यावसायिक शिक्षण उपलब्ध झाले तरी व्यवसायवृत्ती अंगी मुरलेली नाही. त्यामुळे मालक व नोकर अशा तऱ्हेचा, इतरत्र आढळणारा वरचढ श्रेणिव्यवस्थेचा दुजाभाव या क्षेत्रातही दिसून येतो आणि नोकरी करणारे समाजसेवक त्यांची खरी कर्तबगारी न दाखवता संस्थाचालकांच्या मर्जीचे गुलाम बनतात. त्यातून या क्षेत्रातही हांजी हांजी वृत्ती वाढलेली आहे.

व्यावसायिक शिक्षणातून आणि सभोवताली असणाऱ्या स्पर्धेच्या वातावरणातून वेगळाच प्रश्न भेडसावतो, तो पूर्णवेळ कार्यकर्त्यांच्या निष्ठेचा. सेवाकार्य जेव्हा उत्स्फूर्तपणे उभे राहते आणि त्यास उदात्त ध्येय-उद्दिष्टाची आस असते तेव्हा कार्यकर्ते मंत्रभारित असतात. त्यांना व्यापक समाजबदलाचे चित्र दिसत असते, परंतु संस्थेचे प्रशासन तयार झाले, की त्यामध्ये नोकरशाही संचारते; आवश्यक ते निष्ठेचे प्रशिक्षण वेळोवेळी दिले जात नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये ना स्फुरण संचारते, ना कार्यक्षमता अंगी बाणते.

विद्यमान महाराष्ट्रात आदर्श समाजसेवक म्हणून एक नाव ठळकपणे लोकांच्या नजरेसमोर येते. ते आहे अण्णा हजारे ह्यांचे. त्यांनी राळेगणसिद्धी या गावपरिसराचा विकास साधून मोठे काम उभे केले. त्या गावाचा तऱ्हतऱ्हेने अभ्यास झाला आहे. त्यामध्ये अण्णा हजारे यांच्या तेथील कामाची गुणवत्ता सर्वांनीच मान्य केली आहे. परंतु तशा प्रकारचे दुसरे गाव निर्माण होण्यासाठी प्रेरणा देण्याचे मात्र अण्णा हजारे यांना जमलेले नाही. किंबहुना, सुधाकरराव नाइक मुख्यमंत्री असताना, त्यांच्यावर महाराष्ट्रात तीनशे आदर्श गावे बनवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. त्या समितीचे ते अध्यक्ष होते. त्याबाबत फार काही घडून आलेले दिसत नाही. तो विषयच मागे पडला आहे. उलट, ते सर्व तऱ्हेच्या राजकारणात ढवळाढवळ करत असतात. त्यासाठी भ्रष्टाचाराचा मुद्दा हाती घेतात. त्यानिमित्ताने प्रसिद्धी माध्यमांसमोर येत असतात आणि त्यामुळे त्यांच्या मूळ कामाचे मोल देखील उणावत जाते.

औरंगाबाद जिल्ह्यातील विजय अण्णा बोराडे (पाणलोटामधील ऐंशीच्या दशकातील आदर्श), नगर जिल्ह्यातील हिवरेबाजार सारख्या आणखी काही विकासात्मक विधायक प्रकल्पांचा समाजसेवेच्या क्षेत्रामध्ये कौतुकाने उल्लेख होतो. अनिल अवचटने त्याच्या 'कार्यरत'मध्ये अशा काही व्यक्तींकडे लक्ष वेधले आहे. परंतु ती खरोखरीच कुसुमाग्रजांनी वर्णन केल्याप्रमाणे प्रकाशाची बेटे ठरलेली आहेत. त्यांचा इतर समाजाशी काही संबंध नसतो; असलाच तर तो समाजाच्या कौतुकाचा विषय इतपतच असतो.

रत्नागिरी जिल्ह्यातील देवरूखचे 'मातृमंदिर' हे असेच एक वेगळे आणि विस्तारित असे उदाहरण आहे. ते नमुनेदारही आहे. व्यवस्थापनतज्ज्ञ सु.गो. तपस्वी यांनी 'मातृमंदिर'च्या सेवाकार्याचा आढावा एका पुस्तकात घेतला आहे. त्या पुस्तकाचा निष्कर्ष असा सांगता येईल, की त्या प्रकल्पाचे प्रमुख, नारकर दांपत्य यांच्या गेल्या पस्तीस वर्षांच्या प्रयत्नांमधून आजच्या घडीला दीड कोटीच्या आसपास रुपये खर्च होऊन पन्नास-साठ हजार लोकांच्या जीवनात बदल घडवून आणला, त्यांचा जीवनस्तर उंचावला. तशा उत्तम सत्य कहाण्या पुस्तकात आहेत. मनात असे येते, की हेच समीकरण साऱ्या देशाला लावले तर शंभर कोटी जनतेचा विकास केवळ दोन हजार जोडपी येत्या पस्तीस वर्षांत तेवढ्या पटीत रुपये खर्च करून घडवून आणू शकतील. सरकारच्या हजारो कोटी रुपये खर्चापेक्षा कितीतरी कमी पैशांत हा चमत्कार दिसू शकेल. पण प्रत्यक्षात तसे होत नाही. खरे तर, समाजसेवक भरपूर आहेत. विकासाची गरज असलेल्या जागा बऱ्याच आहेत आणि पैसे तर समाजात कोट्यवधीने आणि अब्जावधीने उधळले जातात. मग नारकरांच्या विकासप्रयत्नांचे समीकरण का बनत नाही? तो इतरांसाठी दाखला का होत नाही?

ज्या तऱ्हेने स्वातंत्र्यकाळात आणि नंतर १९८० च्या लाटेत अनेक तरुण उत्स्फूर्तपणे समाजकार्यात पडले, तसे उदाहरण गेल्या पंधरा-वीस वर्षांत का दिसत नाही? अपवाद म्हणून अभय पाटील आणि सदानंद भागवत यांचा उल्लेख करता येईल. या दोघांनी पदव्युत्तर शिक्षण अमेरिकेत घेतले. तेथेच उत्तम

नोकऱ्या केल्या आणि एका टप्प्यावर झिंग येऊन महाराष्ट्रात समाजकार्य करण्याच्या हेतूने परत आले. अभय पाटील यांनी स्वत:ला पाबळच्या विज्ञानाश्रमाशी जोडून घेतले आहे, तर सदानंद भागवत यांनी देवरूख येथे 'आदर्श शिक्षण संस्था' सुरू करण्याचा संकल्प सोडला आहे आणि त्यासाठी ते पूर्ण वेळ देतात. त्यांनी ते काम गेल्या चार-पाच वर्षांत बरेच पुढे नेले आहे. त्या दोघांनी आधी नोकरी-उद्योग करून स्वत:च्या घरसंसाराचे बस्तान नीट बसवले आणि मग ते समाजकार्याकडे वळले आहेत. हा एक नवा व वेगळा प्रवाह आहे.

अभय बंग आणि प्रकाश आमटे या दोघांच्या कामाच्या रूपाने महाराष्ट्राची आजची समाजसेवा प्रतीत होते. (विकास आमटे ह्यांचे आनंदवन अजून बाबांचे मानले जाते.) या दोघांना त्यांच्या वडिलांचा समाजसेवेचा वारसा आहे आणि दोघांची मुले समाजसेवेच्या दिशेने चालली आहेत. अभय बंग यांचा अमृत त्यांच्या 'निर्माण' या नव्या प्रकल्पात गुंतलेला दिसतो. प्रकाश आमटे यांची मुले त्यांच्या लोकबिरादरी प्रकल्पात पूर्णत: सामील झालेली आहेत. प्रकाश आमटे यांच्या उत्स्फूर्त भावनेमधून निर्माण झालेला हा प्रकल्प त्यांची मुले विशुद्ध व्यावसायिक समाजसेवेच्या तत्त्वावर चालवणार हे स्पष्ट झाले आहे.

अभय बंग आणि प्रकाश आमटे या दोघांनाही अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. दोघांची कामाची तऱ्हा वेगवेगळी आहे. दोघांची वृत्ती मात्र विनम्र व शालीन आहे. त्यामुळे त्यांच्याबद्दल लोकांमध्ये आदरभाव दिसून येतो. बंग हे अभ्यासू व संशोधक वृत्तीचे आहेत. आमटे यांच्यामध्ये सेवाभाव जास्त आहे. दोघांच्या प्रकल्पांच्या नावांवरूनसुद्धा त्यांची वृत्ती प्रकट होते. बंग यांचा प्रकल्प आहे 'सर्च' आणि त्यांनी वसवलेल्या खेड्याचे नाव आहे शोधग्राम. कित्येक वर्षांपूर्वी, त्यांना असा प्रश्न विचारण्यात आला होता, की तुम्ही गांधीवादी परंपरेतले, परंतु तुमचे सारे काम संगणकावर आधारित आधुनिक तंत्रज्ञानातले, हे कसे काय? अभय बंग यांनी समर्पक उत्तर दिले, की गांधीजींच्या काळात सेवा हा समाजकार्यातील महत्त्वाचा घटक होता. परंतु आधुनिक काळात समाजरचना ज्ञानाधिष्ठित आहे आणि त्यामुळे अध्ययन ('अभ्यास' यासाठी बंगांचा लाडका शब्द) आणि संशोधन या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. गांधीजी असते तर त्यांनी बहुधा ही कास धरली असती. म्हणून गांधीजींचे सेवाग्राम आणि माझे शोधग्राम!

अभय बंग यांनी गडचिरोली परिसरातील आदिवासी समाजातील बालमृत्यूंचा सखोल अभ्यास केला, त्याला महाराष्ट्रातील आणखी नऊ ठिकाणच्या पाहणीचा आधार दिला आणि 'कोवळी पानगळ' नावाचा अतिशय विदारक अहवाल सादर केला. त्या आधारे त्यांनी जगाचे महाराष्ट्रातील बालमृत्यू-संबंधीच्या दुस्थितीकडे लक्ष वेधले आणि महाराष्ट्र सरकारलाही जेरीस आणले. अभय बंग यांचा अशा कामांमुळे जागतिक पातळीवर लौकिक झाला. डॉ. राणी बंग यांची त्यांना प्रत्येक टप्प्यावर साथ लाभली आहे.

अभय बंग यांचे बंधू अशोक बंग हेही समाजसेवी कार्यात गुंतलेले असून त्यांचा शेतीविषयक अभ्यास दांडगा आहे. त्यांचा वर्धा जिल्ह्यातील शेती प्रकल्प कौतुकास पात्र ठरलेला आहे.

प्रकाश आमटे यांच्या 'लोकबिरादरी' या शीर्षकातून त्यांना समाजाप्रती असलेला जिव्हाळा, बंधुभाव, कणव व्यक्त होतात. ते मुदलात वर्ध्याच्या आनंदवनातून शेकडो मैल दूर गडचिरोली जिल्ह्यातील हेमलकसाला गेले तेच आदिवासींच्या आणि जंगलाच्या ओढीने. त्या काळात बहुसंख्य प्रवास पायी करावा लागायचा. गावसंपर्काचे कुठलेही साधन नव्हते. दोन-अडीच दिवसांची चाल करून माणूस हेमलकसाला पोचला की तिथलाच व्हायचा. त्याची परतवाट बंद होत असे. प्रकाश आमटे व त्यांचे मोजके साथीदार ह्यांनी प्रथम दुर्गम जंगलभागात आदिवासीं-साठी आरोग्य प्रकल्प राबवला. मग मुलांसाठी शाळा सुरू केली आणि एकूण ग्रामविकासाच्या दिशेने वाटचाल आरंभली. त्यांनी ह्या ओघात मनुष्यप्राण्या-बरोबर वाघ-सिंहापासून सशापर्यंतच्या सर्व वन्य प्राण्यांचेदेखील त्या भागात संगोपन व संवर्धन केले. त्यातूनच त्यांचे तेथे जागतिक कीर्तीचे प्राणी संग्रहालय उभे राहिले आहे. प्रकाश आमटे यांचे कार्य पंधरा-वीस वर्षांपूर्वीपर्यंत फारसे परिचित नव्हते. स्वत: प्रकाश प्रसिद्धीपराङ्मुख आणि 'आपले काम व आपले जीवन' अशा वृत्तीचे आहेत. परंतु विलास मनोहर या त्यांच्या साथीदाराने 'नेगल' नावाचे पुस्तक लिहून

प्रकाश यांच्या जीवनकार्याकडे लक्ष वेधले आणि त्यानंतर त्यांची ख्याती वाढतच गेली. प्रकाश यांच्या पत्नी मंदा आणि त्यांचे आरंभापासूनचे मोजके साथीदार यांच्या कार्यातून हा प्रकल्प जागतिक पातळीवर नावारूपास आला आहे.

बंग आणि आमटे या दोघांचा गौरव होतो तो रास्तच आहे. तरीही एक गोष्ट जाणवत राहते, की ही दोन माणसे आणि त्याबरोबर विकास आमटे, रजनीकांत आरोळे, शशी अहंकारी, नारकर पती-पत्नी, गंगावणे अशी समाजसेवी कार्यात गुंतलेली अनेक माणसे महाराष्ट्रात असूनदेखील त्यांचा हवा तसा प्रभाव समाजावर का जाणवत नाही? समाजाला त्यांची आठवण वेगवेगळे पुरस्कार देण्यावेळी आणि सभा-समारंभांच्या वेळी होते, परंतु ती तेवढ्यापुरती. त्यानंतर ती माणसे आपल्या कोषात जातात आणि समाज आपल्या नित्य व्यवहारात गुंततो.

सध्या 'फंड रेझिंग'च्या निमित्ताने आमटे समाजात बरेच येत असतात. बंग ह्यांना आंतरराष्ट्रीय मोठा निधी मिळतो.

गेल्या तीन-चार दशकांत तंत्रविज्ञानामुळे व्यक्तिस्वातंत्र्याचे मूल्य अधिक प्रबळ व प्रभावी झाले. लोकशाही या विचारसूत्रात अर्थ राहिला नाही. ते धर्मचरणाहूनही प्रखर असे कर्मकांड होऊन बसले आहे. लोकशाही ठेकेदारीने राबवली जाते. राजकीय ठेकेदारांच्या टोळीत सामील झाल्याशिवाय कोणत्याही सत्तापदापर्यंत काय लोकप्रतिनिधीपदापर्यंत पोचणे शक्य नाही.

तरी राजकारणाची ही गती प्रभावशाली ठरत आहे ह्याचे प्रत्यंतर गेल्या दोन-चार वर्षांत आले. सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रातून राजकारणाकडे गेलेल्या तीन व्यक्तींचा दाखला घेऊ. प्रथम नीलम गोऱ्हे. त्या स्त्रीउद्धाराच्या क्षेत्राचा आधार घेऊन राजकारणात शिरल्या, शिवसेनेच्या आमदार बनल्या. नीलम गोऱ्हे यांचा प्रवास 'युक्रांद'पासून सुरू झाला. युक्रांद ही राजकीय जाणिवा जागृत करू इच्छिणारी संघटना. (ती आज अवशेषरूपाने शिल्लक आहे.) गोऱ्हे 'युक्रांद'मधून स्त्री हक्काच्या कामाकडे वळल्या. त्यांनी स्त्रियांवरील अन्याय-अत्याचाराबद्दल जाणीव जागृती साधणारे मोठे काम उभे केले. त्या एक चांगल्या, तडफेच्या सामाजिक-सांस्कृतिक नेत्या म्हणून गणल्या जाऊ लागल्या. त्यांनी उभे केलेले संघटनात्मक जाळे, त्यांना केव्हातरी अपुरे वाटू लागले असावे आणि त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. समाजवादी विचाराची ही व्यक्ती हिंदुत्ववादी संघटनेकडे कशी झुकली गेली याबद्दल काही काळ कुजबुज होत राहिली. आज उद्धव ठाकरे यांच्या नंतरच्या पहिल्या फळीच्या नेतृत्वात त्यांचे स्थान जाणवते.

अविनाश धर्माधिकारी. संघपरिवारातील ज्ञानप्रबोधिनी या शाळेतून मोठा झालेला, उच्च शिक्षण घेऊन आय.ए.एस. अधिकारी बनलेला, 'अस्वस्थ दशकाची डायरी' असे संवेदनाशील पुस्तक व तशाच कविता लिहून वाचकांना भिडलेला, उत्तम वक्तृत्वगुण अंगी असलेला हा तरुण सर्व चाकोरी सोडून राजकारणात पडतो, पक्षाने नकार दिला तेव्हा अपक्षपणे खासदारकीची निवडणूक लढवतो, तेथे अपयश आले तेव्हा पुन्हा सामाजिक क्षेत्रात येतो आणि 'चाणक्य मंडळ'सारखी उपयुक्त कल्पना राबवतो; त्याच्या वक्तृत्वाचा महाराष्ट्रभर दबदबा निर्माण होतो. तो सांस्कृतिक क्षेत्रात काही कर्तबगारी करणार असे वाटत असताना शिवसेनेमध्ये एक नगण्य व्यक्ती म्हणून (त्यांचे पक्षातील स्थान जाणवले नाही वा जाहीर झाल्याचे ऐकले नाही.) सामील होतो, हे अगम्य आहे. ही राजकारणाची ओढ म्हणायची की सांस्कृतिक क्षेत्राच्या परिणाम-कारकतेबद्दलची निराशा म्हणायची?

अनिल शिदोरे हे विद्यार्थिदशेपासून पुरोगामी राजकारणात वाढले. पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी आंदोलनातून समाजसेवा क्षेत्राकडे वळले. त्या काळातच समाजसेवेच्या व्यावसायिक शिक्षणाची महती वाढली. शिदोरे यांनी ते शिक्षण घेतले. उत्तम नेतृत्वगुण लाभलेला हा तरुण फंडिंगच्या क्षेत्रात शिरला. हाती लाभलेल्या त्या संधीमार्फत मुख्यत: मराठवाड्यात व काही प्रमाणात विदर्भात त्याने संस्था-कार्याचे उत्तम जाळे उभे केले. चांगले वाचणारा, विचार चांगले समजावून घेणारा हा तरुण इधर-उधर करत राहिला आणि एक दिवस त्याने 'महाराष्ट्र नवनिर्माण सेने'च्या कामासाठी जिवाची बाजी लावली. तो राजकारणात उतरला. त्याआधी त्याने समाजकार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या अपुरेपणाबद्दल भलामोठा भेदक लेख लिहिला आणि तशा प्रकारच्या

कामात गेलेल्या आपल्या आयुष्यातील आधीच्या पंचवीस वर्षांचे 'पापक्षालन' केले.

पूर्वी, ग.दि. माडगूळकर, ना.धों महानोर, रामदास फुटाणे, सदानंद वर्दे, भाई वैद्य असे सांस्कृतिक-सामाजिक क्षेत्रातून राजकारणात गेले व तेथे निष्प्रभ ठरले, म्हणून आपापल्या क्षेत्रात परत येऊन रमले अशी उदाहरणे आहेत.

सामाजिक कार्याचा, संघटनांचा, त्यात गुंतलेल्या व्यक्तींचा गेल्या साठ-पासष्ट वर्षांतील पट उलगडत असताना दलित, स्त्रिया, शेती-शेतकरी, विज्ञान, ग्रामविकास, पर्यावरण, नागरी समाज असे अनेक विषय समोर येत गेल्याचे व नाहीसे झाल्याचे दिसते. त्या त्या विषयात काही खळबळ झाल्याचे जाणवते. पण प्रश्न महासागराइतके व्यापक व खोलही आहेत, की त्यांची किमान पातळीवरील सुटका हीसुद्धा असंभव भासते. गेल्या हजार वर्षांत आपण राहतो ह्या भूभागातील मानवी जीवनाचा स्तर इतका खालावला आहे, की त्यात बदल घडवून आणणे मुष्कील वाटते. कोट्यवधी लोक शतकानुशतके कर्दमातले जिणे सहन करत आहेत! त्यांच्यासमोर उत्कर्षाच्या वाटा उघड होत जात असताना, ती जरादेखील पुढाकार घेऊ इच्छित नाहीत. एकेकाळी ती संघटित तरी होत होती, पुढाऱ्याच्या मागेतरी धावत होती. आता ती काय करतात? जगत राहतात!

तंत्रविज्ञानाचा प्रभाव जगभर इतका ग्रासणारा ठरला आहे, की त्यामुळेच, पर्यावरण हा विषय सर्वांना सर्वाधिक महत्त्वाचा वाटत आहे. माणसाचे निसर्गा-बरोबरचे नाते हा नेहमीच कुतूहलाचा विषय राहिला आहे. माणूस एका बाजूला निसर्गास आपल्या पद्धतीने वळवून (वाकवून?) घेत असताना, त्याला ही जाणीव आहे, की आपण निसर्गाचाच भाग आहोत आणि नैसर्गिक प्रक्रियेच्या अधीन आहोत. त्यामुळे निसर्गावर अत्याचार न करता, त्याच्याच सूत्रांनी आपला मतलब साधण्याची माणसाची नवी क्लृप्ती 'पर्यावरणा'तून व्यक्त होत आहे. अखेरीस लाभधारक आहे माणूसच! कारण माणसाला निसर्गानेच बहाल केला आहे मेंदू. त्याला वळण लागणे (लावणे) महत्त्वाचे.

पैसा इतर सर्व क्षेत्रांत झाला आहे त्याप्रमाणे समाजसेवा क्षेत्राचाही आधार बनला आहे. निधी उपलब्ध होण्याचे मार्ग दोन- एक, परदेशातून देणगी रूपाने किंवा दुसरा, इथे सभोवतालातून तो उभा करायचा. पुण्याच्या 'मेळघाट मित्र'ने तसा तो गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर उभा करून दाखवला.

ह्या दुसऱ्या मार्गाने चैतन्यमय होत असलेली काही कामे वेबसाइटवरही दृष्टोत्पत्तीस येतात, कोणीतरी निवृत्तीनंतरची आपली पुंजी किंवा कोणाच्या तरी स्मरणार्थ तयार झालेला निधी अशा कामी लावत असते. कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन काम उभे केल्याची, तीस-चाळीस वर्षांपूर्वीची उदाहरणे तशा स्वरूपात दिसत नाहीत. मात्र एकेकट्या व्यक्ती नेटाने आपल्या मर्जीने काही करताना दिसतात. महाराष्ट्रात इन्स्टिट्यूशन उभ्या राहण्याची शक्यता, जी गेल्या शतकाच्या शेवटच्या तीन दशकांत जाणवत होती ती अस्तंगत पावली आहे. सद्भावप्रेरित माणसे समाजकार्य करत राहतील, परंतु त्यांचे काम समाजजीवनावर प्रभाव टाकू शकेल असे जाणवत नाही. ते गेल्या शतकात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, राष्ट्र सेवा दल, साने गुरूजी कथामाला व काही प्रमाणात बाबा आमटे ह्यांच्या श्रमसंस्कार छावण्यांमधून घडून आले. त्यांचा प्रभाव १९६०-७० च्या आसपास संपला, त्यानंतर जाणवते ती सामाजिक विचारांची व कार्याची नुसती खळबळ!

गेल्या दोन सहस्रकांत धर्मसत्ता, राजसत्ता, समाजसत्ता यांनी मानवी जीवन घडवले. सध्या अर्थसत्तेची चलती आहे व तिच्या हाताशी तंत्रविज्ञान आहे. तंत्रविज्ञान निसर्गाचे प्रत्येक कोडे उलगडून दाखवणार असे दिसते. गांधींच्या जीवनसरणीत व विचारसरणीत या साऱ्यांचा एकात्म अवलंब प्रयोग-शीलतेने झालेला दिसतो. तसा प्रयोग सद्यकाळातील विसंगती दूर करू शकेल? खळबळ दूर सारून स्थैर्याची, शांततेची वाट दाखवू शकेल? समाजात प्रयोग चालूच राहतील. त्यांतील विद्यमान विकृती दूर होऊन समाजविकास निकोप मार्गाला लागेल. त्यासाठी विचारमंथन गरजेचे आहे. तशा अनेक वाटा तंत्रविज्ञानानेच उपलब्ध होणार आहेत.

---

**– दिनकर गांगल**
ए-३, अजिंक्यतारा, सी.एस.टी. रोड,
चेंबूर, मुंबई ४०० ०७१






# विकास आणि सामाजिक न्यायावर आधारलेल्या महाराष्ट्रनिर्मितीची गरज!

डॉ. भालचंद्र मुणगेकर

'भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वानुसार मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' या मागणीसाठी झालेल्या प्रदीर्घ आंदोलनाच्या शेवटच्या पर्वात १०५ बांधवांनी हौतात्म्य पत्करलं आणि अखेर १ मे १९६० रोजी मुंबई या राजधानीसह महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्र राज्याचं हे सुवर्णमहोत्सवी वर्षं आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या ५० वर्षांत राज्यानं विविध क्षेत्रांमध्ये किती प्रगती केली, कोणत्या क्षेत्रात म्हणावी तशी प्रगती झाली नाही, त्याची नेमकी कारणं कोणती व सर्वच क्षेत्रात महाराष्ट्र राज्याचं अव्वल स्थान निर्माण करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे, यासंबंधीचं थोडक्यात प्रतिपादन या लेखात करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

**शेती क्षेत्र**

इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रदेखील सुरुवातीपासून शेतीवरच अवलंबून आहे. आजही राज्यातील सुमारे ५६ टक्के रोजगार शेतीतून निर्माण होतो आणि ६५

टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. गेल्या ५० वर्षांत शेतीचा काही प्रमाणात विकास झाला हे जरी डोळ्याआड करता येणारं नसलं, तरी राज्याच्या एकूणच आर्थिक विकासात शेतीक्षेत्राला योग्य तो न्याय मिळू शकला नाही. उदाहरणार्थ, १९६० साली राज्याची एकूण सिंचनक्षमता ११ टक्के होती, ती आज जेमतेम १६ ते १७ पर्यंतच पोचली आहे. शेतीच्या विकासात सिंचनाचं महत्त्व अनन्यसाधारण आहे. सिंचनाच्या दृष्टीनं गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्राची सिंचनक्षमता फक्त ६ टक्क्यांनी वाढली ही गोष्ट स्पृहणीय नाही. त्यातही महत्त्वाची गोष्ट म्हणजे, अशा तुटपुंज्या सिंचनापैकी सुमारे ६० टक्के पाणी फक्त ऊसाच्या पिकाला दिलं जातं. प्रत्यक्षात जमिनीपैकी फक्त चार टक्के जमीन ऊसाच्या लागवडीखाली असताना! ऊस हे नगदी पीक आहे, ऊसाच्या उत्पादनानं शेतकऱ्यांना चार पैसे त्वरित आणि रोखीनं मिळतात हे जरी खरं असलं; तरी महाराष्ट्राच्या शेतीत फक्त 'ऊस-एके-ऊस' करत राहणं हे राज्याच्या हिताचं नाही. महाराष्ट्राला सध्या दुष्काळाची समस्या भेडसावत आहे. राज्याच्या इतर भागांचं सोडा, साखरेच्या कारखान्यांचं केंद्र असलेल्या पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत दुष्काळ पडणं वा दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होणं, याचं एक कारण या भागात ऊसाला लागणारं पाणी देण्यासाठी शेकडो फूट खोल खणल्या गेलेल्या हजारो विहिरी, हे आहे. एवढं करूनही आज ऊसाचा अपुरा पुरवठा होत आहे. कधी कधी ऊसाच्या कमी उत्पादनामुळे अनेक कारखाने आपल्या क्षमतेइतपत गाळप करू शकत नाहीत आणि त्यापैकी काही चक्क आजारी आहेत.

**औद्योगिकीकरण**

महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासामध्ये मुंबई शहराचं ऐतिहासिक योगदान आहे. जगातील एक उत्कृष्ट नैसर्गिक बंदर म्हणून मुंबई शहर औद्योगिक राजधानीचा दर्जा प्राप्त करू शकलं आहे. मुंबईच्या औद्योगिक राजधानीच्या दर्जाचे फायदे राज्याला (व संपूर्ण देशाला) विपुल झाले आहेत.

उदाहरणार्थ, महाराष्ट्रात कापसाचं पीक उत्तम असल्यामुळे केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण देशाच्या औद्योगिकीकरणाचा पाया घालणाऱ्या

> 'धर्माच्या आधारे होणारं समाजाचं
> ध्रुवीकरण हे जसं सर्वार्थानं समाजाला
> मारक आहे, तसंच जातींच्या
> आधारे होणारं वाढतं ध्रुवीकरणही
> समाजाच्या आत्मघातकीपणाचं आहे.
> ही प्रक्रिया लवकरात लवकर
> थांबवणंच गरजेचं आहे.
> कारण त्यामुळे समाजाच्या
> सर्व थरांतील गरीब घटकांचं
> अतोनात नुकसान होत आहे.'

कापडउद्योगाची सुरुवात मुंबईत झाली. देशाच्या इतर भागांत औद्योगिकीकरणाचा विस्तार करण्यासाठी आवश्यक असलेला भांडवलसंचय (Capital Accumulation) या कापडउद्योगानंच उपलब्ध करून दिला. सुरुवातीच्या काळात मुंबईत जो रोजगार निर्माण झाला त्यातील बहुतांश रोजगार हा कापडउद्योग आणि या उद्योगाशी संलग्न असलेल्या इतर छोट्यामोठ्या उद्योगांतून निर्माण झाला. परिणामी, बँकिंग, विमा, दळणवळण इत्यादी क्षेत्रांत महाराष्ट्रानं अव्वल स्थान प्राप्त केलं आहे. मोठ्या प्रमाणावरील आर्थिक उलाढालींमुळे भारतातील सर्वात मोठं शेअर मार्केट मुंबईत निर्माण झालं. त्यामुळे औद्योगिक राजधानीबरोबर मुंबई ही देशाची आर्थिक राजधानीही झाली. गेल्या २० वर्षांमध्ये आंध्रप्रदेश, गुजरात, तामिळनाडू इत्यादी राज्यांनी औद्योगिकीकरणात मिळवलेलं यश हे अभिनंदनीय आहे. मात्र आजही औद्योगिकीकरणाच्या बाबतीत महाराष्ट्रानं आपलं प्रथम क्रमांकाचं स्थान कायम ठेवलं आहे. औद्योगिकीकरणाच्या वाढीमुळे महाराष्ट्रात सेवाक्षेत्राचाही विकास झाला. आज एकूण रोजगारा- पैकी सुमारे ३५ टक्के रोजगार सेवाक्षेत्रात निर्माण होतो.

**शिक्षण, सेवाक्षेत्र व सहकारी चळवळ**

मुंबई शहराचा राज्याला झालेला आणखी एक मोठा फायदा म्हणजे कलकत्ता आणि मद्रासप्रमाणे तिसरं विद्यापीठ १८५७ साली मुंबईत स्थापन झालं. आज 'मुंबई विद्यापीठ' हे जगातील सर्वात मोठ्या (किंबहुना सर्वात मोठं) विद्यापीठांपैकी एक आहे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशाच्या सर्वांगीण

विकासामध्ये मुंबई विद्यापीठानं एक ऐतिहासिक योगदान दिलं आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्रात एकूण १० जनरल विद्यापीठं, ८-९ अभिमत विद्यापीठं, ५ कृषी विद्यापीठं आणि सुमारे ३,५०० महाविद्यालयं असून त्यात लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तांत्रिक शिक्षणातही महाराष्ट्र बऱ्यापैकी आघाडीवर आहे.

महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासामध्ये सहकारी चळवळीनं मोलाचं योगदान दिलं आहे. विशेषतः महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शेतीव्यवसायाशी निगडीत असलेली क्षेत्रं व जोडधंदे यांचा जो विकास झाला त्याचं श्रेय प्रामुख्यानं सहकारी चळवळीला जातं. त्यातही सहकारी साखर कारखानदारीनं ग्रामीण महाराष्ट्राचं स्वरूप बदलून टाकलं आहे. तिच्या अनेक उणिवांसह सहकारी साखर कारखानदारीचं हे योगदान आपल्याला मान्य करायला हवं.

**सामाजिक चळवळीचा वारसा**

महाराष्ट्राला सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांतही मोठा वारसा मिळाला आहे. राज्याच्या सांस्कृतिक जडणघडणीत संतांनी केलेलं कार्य मोलाचं म्हणावं लागेल. आध्यात्मिक पातळीवर का होईना, त्यावर विश्वास नसलेल्या माझ्यासारख्यालाही संतांनी प्रतिपादन केलेली समता महत्त्वाची वाटते. संतांच्या या समतामूलक विचारांच्या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजीमहाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. हिंदवी स्वराज्याचा अर्थ, दुरान्वयेही 'हिंदूंचं राज्य' असा नव्हे तर एतद्देशीयांचं राज्य (Rule of Natives) असा आहे.

जोतिराव आणि सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक समतेसाठी केलेल्या अविरत संघर्षामुळेच महाराष्ट्र स्वतःला पुरोगामी म्हणू शकतो. वर्ण-जाती-अस्पृश्यतेचं उच्चाटन करण्यासाठी या समाजक्रांतिकारकांनी केलेला संघर्ष हा अभूतपूर्वच म्हणावा लागेल. फुले यांच्यापासून प्रेरणा घेतलेल्या व त्यांचं शिष्यत्व पत्करलेल्या नारायण मेघाजी लोखंडे यांनी गिरणी कामगारांची बॉम्बे मिल हॅन्डस् ही असोसिएशन- पहिली युनियन स्थापन केली आणि भारतातील कामगार चळवळीचा पाया घातला. पुढे देशातील कामगार चळवळीचं मुंबई हे केंद्र झालं. कामगारांना त्यांचे हक्क प्राप्त करून देण्यासाठी मुंबईतील कामगार चळवळीनं योगदान दिलंच; परंतु त्याबरोबरीनं देशाची स्वातंत्र्यचळवळ आणि नंतर संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात अग्रभागी राहून संघर्ष केला आहे.

महाराष्ट्राला गोपाळ कृष्ण गोखले, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे इत्यादींची जशी प्रगल्भ, सर्वसमावेशक आणि उदारमतवादी परंपरा लाभली तशीच गोपाळ गणेश आगरकर यांची रॅशनॅलिस्ट परंपरा लाभली. सामाजिक सुधारणांच्या बाबतीत लोकमान्य टिळकांची भूमिका जरी वादग्रस्त असली तरी त्यांचा त्याग स्फूर्तिदायी आहे.

महाराष्ट्राला स्त्री-पुरुष समानतेच्या विचारांचाही वारसा लाभलेला आहे. सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख या दोघीजणी फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर सबंध देशातील आद्य स्त्रीशिक्षिका होत. स्त्री शिक्षणासाठी त्यांनी सोसलेल्या अवहेलनेची आजच्या उच्चभ्रू समाजातील सुशिक्षित स्त्रिया फार दखल घेत नसल्या तरीही तो इतिहास मात्र प्रेरणादायीच आहे. महर्षी कर्वे यांनीही आपलं संपूर्ण आयुष्य स्त्री शिक्षणासाठी वाहून घेतलं. समग्र हिंदू स्त्रियांना समानतेच्या हक्कांची सनद देणारे 'हिंदू कोड बिल'कर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हे बिल मंजूर होत नाही, असं दिसताच आपल्या कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला. १९७०च्या दशतकात महाराष्ट्रात सुरू झालेल्या स्त्रीमुक्ती चळवळीचं उगमस्थान वरील क्रांतिकारकांच्या विचारांमध्ये आहे.

**विकास आणि समताधिष्ठित महाराष्ट्र : शेतीला अग्रक्रम**

आर्थिक प्रगती व तिचे अधिकाधिक फायदे गरीब लोकांपर्यंत पोचवून, सामाजिक न्यायाच्या दिशेनं वाटचाल करण्यासाठी व त्याचप्रमाणे एकूणच शैक्षणिक तसंच सांस्कृतिक क्षेत्रात प्रगती करून उज्ज्वल भवितव्य असलेला महाराष्ट्र घडवण्यासाठी आपल्याला गांभीर्यानं विचार करावा लागेल. शेतीच्या व तत्सम क्षेत्रांच्या विकासाला अग्रक्रम द्यावा लागेल. महाराष्ट्रातल्या तुटपुंज्या सिंचनक्षमतेचा मुद्दा आधी आला आहे. तज्ज्ञांच्या मते राज्याची कमाल सिंचनक्षमता ३६ ते ३७ टक्क्यांच्या आसपास आहे. सध्या आपली सिंचनक्षमता १६ ते १७ टक्के इतकी आहे. म्हणजेच तज्ज्ञांनी सांगितलेली कमाल

सिंचनक्षमता गाठण्यासाठी अजून २० टक्क्यांची आवश्यकता आहे. कृष्णा नदीचं महाराष्ट्राच्या वाट्याला येणारं पाणी नियोजनबद्ध पद्धतीनं वापरण्यासाठी महाप्रकल्पाची आवश्यकता होती. म्हणून महाराष्ट्र शासनानं 'कृष्णा खोरे महाप्रकल्प' हाती घेतला. या प्रकल्पाकरता हजारो कोटी रुपये खर्च केले. मात्र प्रत्यक्षात त्या प्रकल्पाची बरीच कामं अजून अर्धवट आहेत, ही खेदजनक बाब आहे. इतकंच नव्हे, तर सबंध राज्यात बरेच मध्यम आणि शेकडो छोटे सिंचनप्रकल्प एक तर अर्धवट अवस्थेत आहेत किंवा सिंचनयोग्य नाहीत. ही परिस्थिती बदलण्यासाठी त्वरित पावलं उचलावी लागतील; तसंच राज्यभर सिंचन-क्षमता वाढवण्यासाठी आवश्यक ती गुंतवणूक अग्रक्रमानं करावी लागेल.

परंतु सामाजिक न्यायाच्या दृष्टीनं सिंचनक्षमता वाढवण्याबरोबरीनंच तिच्या योग्य वाटपाकडेही लक्ष द्यावं लागेल. एकट्या ऊसाला ६० टक्के सिंचनपाणी कसं दिलं जातं हा मुद्दा मी आधी मांडला आहे. सिंचनाच्या दृष्टीनं उपाययोजना सुचवण्यासाठी शासनानं नियुक्त केलेल्या अनेक समित्यांनी आणि विशेषतः दांडेकर समितीनं छोट्या व अल्पभूधारक अशा गरिबातल्या गरीब शेतकऱ्यालाही वर्षातून किमान एक पीक येण्यासाठी पाणी उपलब्ध करून दिलं पाहिजे, अशी सूचना केली होती. प्रत्यक्षात राज्यानं दांडेकर व इतर समित्यांच्या सूचनांची दुरान्वयेही अंमलबजावणी केलेली नाही. त्याची कार्यवाही करावी लागेल.

शेतमालाची विक्री आणि शेतकऱ्यांना होणारा पतपुरवठा या दोन्ही गोष्टींना शेतीच्या विकासामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. दारिद्र्याच्या दुष्टचक्रामुळे आज गरीब शेतकरी आपला शेतमाल मातीमोल भावानं विकतो. नेमका याचाच फायदा प्रामुख्यानं दलाल व व्यापाऱ्यांना होतो. उदाहरणार्थ, शेतकरी व्यापाऱ्यांना २ रुपये प्रतिकिलो दरानं बटाटे विकतात आणि याच बटाट्यांची मुंबईत १५ ते २० रुपये दरानं विक्री होते आणि त्याच बटाट्यांपासून तयार केलेले वेफर्स ४० रुपये किलो दरानं मिळतात! १५ वर्षांपूर्वी मी नाशिकमध्ये असताना माझ्यासमोर एक शेतकरी ५० पैसे किलो दरानं टॉमेटो विकत होता. तेच टॉमेटो मुंबईत २० रुपये किलो दरानं ग्राहक विकत घेत होते. अशा पद्धतीनं शेतकऱ्यांनी शेतमालाची कवडीमोल दरानं विक्री केली तर त्यांचा विकास होणार नाही. म्हणूनच शेतकरी व ग्राहक यांच्या फायद्यासाठी मोठ्या प्रमाणावर सहकारी संस्था निर्माण करणं गरजेचं आहे.

हीच गोष्ट पतपुरवठ्याबाबत आहे. राष्ट्रीयीकृत बँका आणि सहकारी बँका-पतपेढ्यांकडून विशेषतः मध्यम व गरीब शेतकऱ्यांना योग्य त्या प्रमाणात, योग्य दरानं, तसंच योग्य वेळी कर्जपुरवठा होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. श्रीमती इंदिरा गांधी यांनी १९६९ साली प्रमुख व्यापारी बँकाचं राष्ट्रीयीकरण केलं नि शेती क्षेत्र 'प्रामुख्यानं कर्जपुरवठा क्षेत्रा'खाली (Prioroty Sector Lending) आणलं. देशात १९७० च्या दशकात झालेल्या हरितक्रांतीमध्ये या कर्जपुरवठ्याचं महत्त्वाचं योगदान आहे. गेल्या काही दिवसांत ही संकल्पना बदलली आहे. राष्ट्रीयीकृत आणि सहकारी बँकांद्वारे शेतीक्षेत्राला होणाऱ्या कर्जपुरवठ्यात लक्षणीय वाढ होत आहे. तसं असलं तरी त्यामध्ये छोटे व अल्पउत्पादक शेतकरी सोडाच, पण मध्यम तसंच विशेषत: जिराईत शेतकऱ्यांना होणारा कर्जपुरवठा समाधानकारक नाही. याचा परिणाम म्हणून नाइलाजानं गरीब शेतकऱ्यांना खाजगी व्यापाऱ्यांकडून अतिभरमसाठ व्याजदरानं कर्ज घेणं भाग पडतं. समाधानकारक पीक आल्यानंतरसुद्धा कर्जाचे हप्ते फेडणं हे या शेतकऱ्यांना कठीण जातं. अशा परिस्थितीत मध्येच एखाद-दुसऱ्या वर्षी पीक बुडाल्यानंतर तर त्यांना जगणंच कठीण जातंय.

गेल्या काही वर्षांत विदर्भातल्या शेतकऱ्यांनी अभूतपूर्व आणि मोठ्या प्रमाणावर ज्या आत्महत्या केल्या तो या कर्जाच्याच दुष्टचक्राचा परिणाम आहे. विदर्भातल्या शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणावर कर्जमाफीच्या मुद्याला देशातील काही तज्ज्ञांचा विरोध असतानाही माझा मात्र त्याला पूर्ण पाठिंबा होता व आहे. अशा अभूतपूर्व परिस्थितीमध्ये घेतल्या गेलेल्या अभूतपूर्व धोरणांचा अवलंब करावा लागतो, अशी माझी भूमिका आहे. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी नागपूरमध्ये शेतकऱ्यांच्या कर्जमाफी-संबंधीची अधिकृत घोषणा केली होती. कर्जमाफीसंदर्भातली अधिकृत घोषणा करण्यापूर्वी योजनाआयोगाच्या तीन सदस्यांना विदर्भात तिथल्या परिस्थितीचं अवलोकन

करण्यास पाठवलं होतं. ते तिघं, बी.एन. युगंधर, प्रा. अभिजीत सेन आणि स्वत: मी होतो. आम्ही एकमतानं पंतप्रधानांकडे कर्जमाफीच्या पॅकेजचं प्रतिपादन केलं. विदर्भाच्या पॅकेजचा योग्य निर्णय घेतल्याबद्दल मी पंतप्रधानांचं अभिनंदन करतो. विदर्भ पॅकेजच्या अंमल-बजावणीच्या गुन्हाळात मी जाऊ इच्छित नाही. संकटग्रस्त शेतकरीच हेच त्याचं योग्य न्यायदान करू शकतात.

प्रत्येकवेळी अशी पॅकेजेस देणं शक्य होणार नाही. त्यावर कायमची परिणामकारक उपाययोजना करावी लागेल. ही उपाययोजना म्हणजे शेतकऱ्यांना आणि त्यातही गरीब शेतकऱ्यांना योग्य त्या प्रमाणात, योग्य वेळी किफायतशीर दरानं कर्जपुरवठा केला गेलाच पाहिजे. किफायतशीर दरानं कर्जपुरवठा झाल्यास शेतकऱ्यांचं खाजगी सावकारांवरचं अवलंबित्व कमी होईल. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या शेतमालाला विशेषत: फळं आणि भाज्या तसंच इतर नाशिवंत वस्तूंना योग्य मोबदला मिळवण्यासाठी शेकडो सहकारी संस्थांचं जाळं ग्रामीण महाराष्ट्रात निर्माण करावं लागेल. या संदर्भातला आणखी एक मुद्दा म्हणजे क्रॉप फार्मिंग म्हणजे पीक शेतीबरोबरच दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, फलोद्यान आणि पर्यटन अशा अनेक जोडधंद्यांना प्राधान्य द्यावं लागेल. विदर्भामध्ये शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याच्या दोन-तीन प्रमुख कारणांपैकी अशा पूरक जोडधंद्यांचा अभाव हे एक प्रमुख कारण होतं, हेही लक्षात घ्यायला हवं. थोडक्यात, उद्योग आणि सेवाक्षेत्रांच्या विकासा-बरोबरच शेती व तत्सम व्यवसायांचा अधिकाधिक परिणामकारक विकास केला तरच ग्रामीण महाराष्ट्रातील दारिद्र्य आणि बेरोजगारीचा प्रश्न नीटपणे सोडवता येईल.

दारिद्र्याचा मुद्दा उपस्थित झाला म्हणून इथे त्या संदर्भातला आणखी एक मुद्दा नोंदवणं आवश्यक आहे. तो म्हणजे गोवा ह्या अतिछोट्या राज्याचा अपवाद वगळता दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत आणि एकूणच आर्थिक तसंच औद्योगिक प्रगतीचा विचार करता आजही अव्वलस्थानी असलेल्या महाराष्ट्रातील ग्रामीण दारिद्र्य त्याच्या प्रगतीशी विसंगत आहे. आंध्रप्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू आणि गुजरात ही चार राज्यं ग्रामीण दारिद्र्य कमी करण्याच्या बाबतीत महाराष्ट्राच्या पुढे आहेत. महाराष्ट्रापेक्षा कितीतरी कमी दरडोई उत्पन्न असलेलं केरळ राज्य हे याबाबतीत सर्वात आघाडीवर आहे. याचाच स्पष्ट अर्थ असा की, एखाद्या राज्यात (व देशातही) होणाऱ्या आर्थिक विकासाचे फायदे काही लोकांपर्यंत मर्यादित न ठेवता ते अधिकाधिक गरजू लोकांपर्यंत परिणामकारकरीत्या पोचवणं हे विकासाचा दर वाढवण्याइतकंच महत्त्वाचं आहे. म्हणजेच आर्थिक विकास ही दारिद्र्य आणि बेरोजगारी कमी करण्यासाठी 'अत्यावश्यक' गोष्ट असली तरी पुरेशी नाही. याचाच अर्थ असा की, न्याय्य वाटप झालं तरच आर्थिक प्रगती ही अधिक अर्थपूर्ण होईल.

**प्रादेशिक असमतोल कमी करायला हवा**

देशातील काही इतर राज्यांप्रमाणेच महाराष्ट्रातही प्रादेशिक असमतोलाची समस्या कठीण व गुंतागुतीची झाली आहे. या दृष्टीनं विचार करता मराठवाडा, विदर्भ आणि कोकण, इतकंच नव्हे तर पश्चिम महाराष्ट्रातील काही अवर्षणग्रस्त भागही विकासाच्या प्रक्रियेत गतिमान झाल्याचे दिसत नाहीत. विशेषतः विदर्भ हा विभाग 'विशेष करार' करून (नागपूर करार) महाराष्ट्रात विलीन झाला. या विलिनीकरणाच्या प्रक्रियेत वर्षातून एकदा विधानसभेचं अधिवेशन घेणं एवढाच मुद्दा नव्हता, तर राज्याच्या विकासात विदर्भाला (आणि मराठवाड्याला) योग्य स्थान मिळेल हा 'नागपूर करारा'चा आशय होता. मात्र तसं झालं नाही. त्यामुळेच पुढे नागपूर आणि विदर्भासाठी वैधानिक विकास मंडळं स्थापन करण्याची मागणी पुढे आली. या मागणीकरता दोन्ही भागातील जनतेनं प्रदीर्घकाळ आंदोलनं केली नि 'हो-ना' करत शेवटी ही वैधानिक विकास मंडळं अस्तित्वात आली.

या संबंधीचा दांडेकर समितीचा अहवाल सुरुवातीपासूनच इतका वादग्रस्त झाला की तेव्हा शेतकरी कामगार पक्षाच्या विधानसभेतील आमदारांनी हा अहवाल फेकून दिला. (माझ्या माहितीनुसार तो अहवाल विधानसभेत जाळला.) यावरून या भागातील जनतेच्या भावनांची तीव्रता दिसून येते.

ते काहीही असो, या मंडळांचं काम खुद्द राज्यपालांचं मार्गदर्शन व नियंत्रणाखाली चालतं. असं असूनही राज्यकर्त्यांच्या इच्छाशक्तीच्या अभावामुळे या वैधानिक मंडळाचं कामकाज समाधानकारकपणे



डॉ. भालचंद्र मुणगेकर

संपूर्ण महाराष्ट्राला पुरेल इतकं पाणी पावसाळ्यात कोकणातील नद्यांमधून वाहून जातं. परंतु सिंचन-क्षमतेकडे पूर्ण दुर्लक्ष केल्यामुळे कोकणातील नद्यांमधल्या पाण्याचा शेतीसाठी उपयोग होत नाही. मार्च, एप्रिल आणि मे या उन्हाळ्याच्या तीन महिन्यांच्या काळात कोकणातल्या काही भागांत पिण्याच्या पाण्याचं दुर्भिक्ष्य असतं, हा तर खरा विरोधाभास आहे. भारतातील एकूण ६०४ जिल्ह्यांपैकी सिंधुदुर्ग जिल्हा हा एकमेव पर्यटन जिल्हा म्हणून शासनानं जाहीर केला आहे. मात्र त्यासाठी आवश्यक असलेली गुंतवणूक इतकी नगण्य झाली आहे की त्यामुळे पर्यटनाचा विकास होऊन इच्छित विकास व रोजगार निर्मिती झाली नाही.

चाललेलं दिसत नाही. राज्याच्या अखंडतेच्या दृष्टीनं ही गोष्ट हितावह नाही. थोडक्यात, महाराष्ट्रामध्ये असलेल्या एकूणच प्रादेशिक असमतोलाची समस्या पूर्ण राजकीय इच्छाशक्तीच्या आधारे सोडवणं आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक तरतूद करून तिचा पूर्णपणे विनियोग करावा लागेल. उदाहरणार्थ, राज्यातलं कापसाचं सर्व उत्पादन हे विदर्भात होतं; पण सूतगिरण्या विदर्भात नाहीत. कापूस एकाधिकार योजना ही शेतकऱ्यांना खूप दिलासा देणारी होती; मात्र तिच्या चुकीच्या अंमल-बाजवणीमुळे ती बंद करावी लागली. महाराष्ट्रातील संत्र्याचं उत्पादन विदर्भात होतं तरी त्यातल्या ५ टक्केही संत्र्यांवर प्रक्रिया होऊन त्यांचं मूल्यवर्धीकरण होत नाही.

हीच परिस्थिती कोकणाबाबत आहे. महाराष्ट्राला लाभलेला एकूण ७२० किलोमीटरचा समुद्र हा फक्त कोकणाला लाभला आहे. परंतु मासेमारीसाठी त्याचा हवा तितका उपयोग होत नाही. त्यामुळे केवळ मासेमारीवर उपजीविका करणाऱ्या हजारो मच्छिमारांची परिस्थिती उत्तरोत्तर बिकट होत चालली आहे. महाराष्ट्र सरकारनं कोकण हे फलोद्यानासाठी योग्य असल्यामुळे त्याच्या विकासावर भर दिला. त्यासाठी सरकारचं अभिनंदन करायला हवं. परंतु आंबे, काजू, रातांबे, करवंद, जांभळं यांच्यापैकी ५-१० टक्के फळांवरही प्रक्रिया होत नाही. कोकणात सहकारी चळवळ अजूनही घट्ट न झाल्यामुळे याचा अधिकतर फायदा मधल्या व्यापारी व दलालांना होतो.

याबाबत गेल्या काही दिवसांतील परिस्थिती थोडीशी समाधानकारक असली तरी कोकणाच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक दमदारपणे पावले उचलावी लागतील.

गेल्या काही वर्षांत आर्थिक विकासाच्या वाढत्या वेगाबरोबरच रोजगारनिर्मिती होत असली तरी श्रमिकांच्या वाढत्या संख्येमुळे देशातली बेरोजगारीची समस्याही तीव्र होत आहे. बऱ्याचदा याचं वर्णन 'जॉबलेस ग्रोथ' असं करण्यात येतं. महाराष्ट्रसुद्धा त्याला अपवाद नाही. खासकरून सुशिक्षित बेरोजगारांचा प्रश्न तीव्र होत आहे. एक-दोन वर्षांपूर्वी अशा सुशिक्षित बेरोजगारांनी महाराष्ट्रातील विविध रोजगार विनियमय केंद्रात नोंदवलेली नावं ही ३५-३६ लाखांच्या आसपास होती. त्यामुळे विकासाबरोबरच अधिकाधिक रोजगार निर्मिती कशी होऊ शकेल, याचाही इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रानं विचार करायला हवा.

**शहरांचा वाढता बकालपणा**

स्वातंत्र्योत्तर काळात आर्थिक नियोजनाचा प्रयत्न करूनसुद्धा देशानं शहरांच्या नियोजनासाठी

असमर्थनीय दुर्लक्ष केलं. याचा परिणाम म्हणून रस्ते, वीज, पाणी, आरोग्य, संडास, गटारव्यवस्था आणि वाहतूक अशा सर्व सार्वजनिक सेवांना प्रचंड प्रमाणात अवकळा आली आहे. आपण लोकशाहीचा स्वीकार करून देशातील कोणत्याही व्यक्तीला कुठल्याही कारणासाठी मुक्तपणे संचार करण्याचं स्वातंत्र्य दिलं आहे. ते लोकशाही मूल्यांशी पूर्णपणे सुसंगत आहे आणि आता त्याबाबत कोणतीही तडजोड करता येणार नाही. परंतु खेडी तसंच शहरं यातील रोज वाढत जाणारी दरी, ग्रामीण भागातल्या रोजगार संधींचा अभाव व दुसऱ्या बाजूला शहरांमध्ये उपजीविकेचं काहीना काही साधन उपलब्ध होईल अशी आशा असल्यामुळे देशाच्या विविध ग्रामीण भागांतून मोठ्या शहरांकडे लोकांचे लोंढेच्या लोंढे येत आहेत. त्यामुळे मुंबई, कोलकाता, दिल्ली, चेन्नई, हैदराबाद, बंगलोर या मोठ्या शहरांना बकालपणा आला असून तो उत्तरोत्तर वाढत आहे. मुंबईसारख्या शहरात ५० टक्क्यांहून अधिक लोक झोपडपट्टीत राहतात. अलिकडे, बांधकाम व्यवसायाच्या भरभराटीमुळे मुंबईच्या तुरळक भागात २५, ३० आणि ४० मजल्यांच्या उंच इमारती तयार होत आहेत. मुंबईत एकीकडे उंच इमारती तयार होत असल्या तरी दुसरीकडे या शहराला प्रत्यक्षात एका मोठ्या झोपडपट्टीचं स्वरूप प्राप्त झालं आहे. हे पाहता भारताची आर्थिक राजधानी म्हणून आपण मुंबईचा कितीही गौरव करत असलो; तरी या सर्व परिस्थितीमुळे मुंबापुरीचं भवितव्य धोक्यात आल्यासारखं वाटतं.

**शिक्षणाच्या खाजगीकरणातील तारतम्य**

प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक आणि उच्च व तांत्रिक शिक्षणाच्या क्षेत्रात महाराष्ट्रानं विशेष प्रगती केली आहे. परंतु यासंदर्भातही अधिक गंभीरपणे विचार करायला हवा. पाचवी, आठवी आणि दहावीपर्यंत मुलांच्या गळतीचं प्रमाण स्पृहणीय नाही. त्यातही अनुसूचित जाती-जमाती, भटके-विमुक्त जाती, अल्पसंख्याकांमध्ये विशेषतः मुस्लिम आणि ग्रामीण भागातील एकूणच गरिबांमध्ये हे गळतीचं प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्रामध्ये साधारणपणे १८ ते २० लाख विद्यार्थी दरवर्षी दहावीच्या परीक्षेला बसतात. त्यापैकी ६० टक्के मुलं उत्तीर्ण होतात तर उरलेली ४०-४५ टक्के अनुत्तीर्ण होतात. उत्तीर्ण झालेल्यांपैकी साधारणपणे २५ टक्के मुलं उच्च माध्यमिक शाळेत जातात व त्या उत्तीर्ण होणाऱ्यांपैकी फक्त १३ ते १४ टक्के मुलं महाविद्यालयात प्रवेश करतात. दुसऱ्या बाजूला प्रतिवर्ष दहावीतच नापास होणाऱ्या ८ -१० लाख मुलांचं भवितव्य अंधारमय होतंय. अशा मुलांसाठी मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक शिक्षणाचा अवलंब करावा लागेल.

उच्च व तांत्रिक शिक्षणाबाबतची परिस्थिती झपाट्यानं बदलत आहे. आर्थिक साधनसामुग्रीचा तुटवडा असूनही केंद्र व राज्य सरकारनं आजपर्यंत अशा शिक्षणाचा फार मोठा भार उचलला आहे. केंद्र सरकारच्या शिक्षणासंदर्भातल्या अनेक कल्याणकारी योजना आहेत. परंतु सरकारच्या इतर अनेक कल्याणकारी योजनांमुळे उच्च व तांत्रिक शिक्षणक्षेत्रात काही ठिकाणी खाजगीकरण करण्याची आवश्यकता भासत आहे. मात्र सरकार आणि खाजगी क्षेत्रानं संयुक्तपणे शिक्षणाच्या खाजगीकरणासाठी प्रयत्न करणं आवश्यक आहे. तसंच, उच्च व तांत्रिक शिक्षणाचं अनिर्बंध खाजगीकरण झाल्यास केवळ गरीबच नाही तर अगदी मध्यमवर्गातील मुलांनासुद्धा उच्चशिक्षण घेणं न परवडणारं होईल. थोडक्यात, शिक्षणाचं 'व्यापारीकरण' वा 'बाजारीकरण' होता कामा नये. त्यामुळे ज्या शिक्षणामुळे एकूणच सामान्य जनतेला विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होता आलं ती जनता पुन्हा एकदा उच्चशिक्षणाला वंचित होईल आणि त्यांना विकासाची दारं बंद होतील. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयानं 'फी'बाबत काही उपयुक्त मार्गदर्शक तत्त्वं सांगितली आहेत, त्यांचा विचार व्हायला हवा.

**समतेच्या चळवळींना उजाळा**

इतर राज्यांमध्ये पुरोगामी चळवळी झाल्या नाहीत असं नाही. तामिळनाडूमधील पेरियार यांची चळवळ व केरळमध्ये नारायणगुरूंनी केलेला प्रबोधनाचा लढा ही त्याची दोन ठळक उदाहरणं दाखवता येतील. असं असूनही पुरोगामीपणाच्या बाबतीत महाराष्ट्राचं ठळकपणे जे वैशिष्ट्य जाणवतं ते फुले-आंबेडकर यांच्यामुळे. त्यांचा वारसा पुढे चालवण्याच्या दृष्टीनं आज समाधानकारक परिस्थिती आहे असं नाही. उदा. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं नाव देण्यासाठी आंबेडकर

अनुयायांना १५ वर्षं संघर्ष करावा लागला. विद्यापीठाचं नामांतर करणं हे फक्त एका व्यक्तीचं नाव देण्याचा प्रश्न नव्हता. तर त्या नामांतरणाच्या प्रक्रियेला एक ऐतिहासिक व क्रांतिकारक सामाजिक संदर्भ होता. खरं म्हणजे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' अशा नामविस्ताराचा अगदी सुरुवातीलाच प्रस्ताव पुढे आला असता तर नामांतरण आंदोलनात झालेले अत्याचार झाले नसते. नामांतराच्या प्रश्नाचे महाराष्ट्राच्या एकूणच राजकारणावर किती दूरगामी परिणाम झाले आहेत हे समाज-राजकारणाच्या अभ्यासकांना वेगळं सांगण्याची आवश्यकता नाही. आजही प्रामुख्यानं बौद्धांवरील अत्याचारांच्या घटना या कुठेना कुठे घडतच असतात. मुंबईतील घाटकोपरच्या रमाबाई-नगरमध्ये ११ दलितांची गोळीबारात झालेली निर्घृण हत्या वा तीन वर्षांपूर्वी खैरलांजीतील भोतमांगे कुटुंबातल्या एकाच वेळी चारजणांची (आई व तीन मुलं - त्यापैकी एक मुलगा आंधळा होता) झालेली हत्या हे पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्राला काळिमा फासणारं आहे. याबाबत तितकीच खेदजनक गोष्ट म्हणजे अशा अत्याचारांच्या विरोधात विशेषत: बौद्ध समाजाव्यतिरिक्त इतर कोणाताही समाजघटक, अल्पप्रमाणात का होईना परंतु संघटितपणे प्रतिक्रियाही नोंदवत नाही, त्यासाठी आंदोलन करणं तर दूरच. अशा पार्श्वभूमीवर १९७०-८० च्या दरम्यान महाराष्ट्रात प्रभावीपणे कार्य करणाऱ्या पुरोगामी तसंच दलित-श्रमिकांच्या बाबतीत खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या चळवळींची उणीव भासत आहे. विशेषतः दलित चळवळीत काम करणाऱ्या अनेकांना आज 'दलित पँथर'सारख्या लढाऊ संघटनेची गरज भासते.

महाराष्ट्रात १९७०च्या दरम्यान सुरू झालेल्या स्त्रीमुक्ती चळवळीनं स्त्रियांच्या स्वतंत्र प्रश्नांबाबत जनमानस निर्माण करून स्त्रीपुरुष समानतेच्या दृष्टीनं मोठं योगदान दिलं आहे. खरं पाहता, एखाद्या समाजात स्त्रीचं स्थान किती श्रेष्ठ आहे यावरून तो समाज किती सुसंस्कृत आहे हे सिद्ध व्हायला हवं. परंतु गेल्या शेकडो वर्षांच्या एकूण सांस्कृतिक व्यवस्थेमुळे स्त्रियांचं असं श्रेष्ठ स्थान आपोआप निर्माण होणं ही गोष्ट अशक्यप्राय आहे. त्या दृष्टीनं विचार करता गेल्या २५ वर्षांमध्ये एकूणच देशपातळीवर आणि महाराष्ट्रातसुद्धा स्त्रियांच्या विविध संघटनांनी स्त्रियांचे प्रश्न ऐरणीवर आणण्याचं काम केलं. या चळवळींचं आजचं नेमकं स्वरूप काय आहे, त्यात कोणते वैचारिक प्रवाह कार्यरत आहेत व ती चळवळ एका व्यापक नि सर्वसमावेशक पातळीवर कशी घेऊन जाता येईल याचाही विचार अगत्यानं करायला हवा. या संदर्भात विशेष नोंदवण्यासारखी गोष्ट म्हणजे 'स्त्री' म्हणून काही प्रश्न समान असले तरी जात, धर्म, प्रदेश, शिक्षण, व्यवसाय आदींचा विचार करता विविध स्थानांवर असलेल्या स्त्रियांच्या प्रश्नांचं भिन्नत्व लक्षात घ्यायला हवं. तसं झालं नाही तर चळवळीत स्थितिशीलता येईल. किंबहुना, काही प्रमाणात आज आली आहे.

**साहित्यक्षेत्रातील घटनांचा पुनर्विचार**

महाराष्ट्रातील काही सांस्कृतिक घटनांवर दृष्टिक्षेप टाकला तरीही अस्वस्थ वाटण्यासारखी परिस्थिती आहे. त्याचं इथे एकच उदाहरण देणं पुरेसं आहे.

इतर अनेक क्षेत्रांत न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी जसं ऐतिहासिक स्वरूपाचं योगदान दिलं तसं त्यांनी पहिली 'मराठी ग्रंथकारांची सभा' आयोजित करून आजच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा पाया घातला. अगदी काही उणिवा गृहीत धरूनही अ. भा. मराठी साहित्य संमेलन हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील एक महत्त्वाची घटना आहे. परंतु गेल्या ६०-७० वर्षांमध्ये जगात, भारतात आणि खुद्द महाराष्ट्रातही मूलगामी स्वरूपाचे बदल झाले असले तरीही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षाची निवडणूक न लढवता सन्मानानं नियुक्ती करण्यात येईल अशी घटनादुरुस्ती मात्र झाली नाही. निवडणूक ही लोकशाहीत सर्वोच्च निर्णयप्रक्रिया आहे. त्यामुळे निवडणूक लढवणं यात काही गैर नाही. परंतु एखादा निर्णय जर निवडणुकीशिवाय सर्वानुमते होत असेल तर निवडणूक लढवलीच पाहिजे, असं बंधन नाही. निवडणूक लढवण्यास नकार दिल्यामुळे श्री.ना.पेंडसे, विंदा करंदीकर, विजय तेंडुलकर यांच्यासारखे मराठी भाषेचे मातब्बर मानकरी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होऊ शकले नाहीत. अर्थात त्यामुळे त्यांचं स्वतःचं काही बिघडलं नाही. महाबळेश्वरमध्ये भरलेले ८२वं साहित्य संमेलन तर

खुद्द अध्यक्षांशिवाय भरवून कळसच करण्यात आला. खरं म्हणजे नियोजित अध्यक्ष आनंद यादव यांनी संत तुकाराम महाराजांवर केलेल्या तथाकथित आक्षेपार्ह लिखाणाबद्दल जाहीरपणे माफी मागितल्यानंतर तो वाद तिथेच संपायला हवा होता. परंतु उठता-बसता राजकारण्यांची टिंगलटवाळी करण्यात धन्यता मानणाऱ्या अनेकजणांनी या गोष्टीचं घृणास्पद राजकारण केलं. याच्याही पुढे जाऊन संतांवरील लिखाण आम्ही सेन्सॉर करू इथपर्यंत मजल मारण्यात आली. मराठी सांस्कृतिक विश्वात अनन्यसाधारण महत्त्व असलेलं अखिल भारतीय साहित्य संमेलन हे अध्यक्षांशिवाय झालं या गोष्टींमुळे मराठी समाज कसा काय ढवळून निघाला नाही, याचाच मला राहून राहून खेद वाटतो.

१९७०च्या दशकात निर्माण झालेलं दलित साहित्य हे केवळ मराठीच नव्हे तर एकूण भारतीय साहित्यविश्वातील एक क्रांतिकारक घटना आहे, असं मला वाटतं. साहित्यविश्वाचा स्पर्श न झालेल्या व इतर क्षेत्राप्रमाणेच परिघाबाहेर असलेल्या दलित समाजाचं चित्रण परिणामकारकपणे साहित्यात प्रतिबिंबित होऊ लागलं. सुरुवातीस दलित साहित्य इतकं प्रभावीपणे लिहिलं गेलं की काही काळ मराठी साहित्य समीक्षेचे निकष तोकडे वाटू लागले. परंतु या संबंधी थोडा तपशीलवार विचार करता दलित साहित्यसुद्धा एका विशिष्ट आवर्तनात सापडल्याचं दिसून येतं.

दुसरी घटना म्हणजे 'विचारवंत', 'गाढे अभ्यासक', 'जगप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ' इत्यादी विशेषणं महाराष्ट्रात सर्रासपणे वापरली जातात. एखाद्या विषयावर दोन-चार लेख लिहिले की झाले 'गाढे अभ्यासक' वा 'विचारवंत'! अर्थशास्त्राचा प्राध्यापक अथवा फार तर पीएच.डी अथवा इकडे-तिकडे भाषणं किंवा अगदी कळस म्हणजे नावावर एक-दोन पुस्तकं असली म्हणजे नुसता अर्थतज्ज्ञ नव्हे, तर 'जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ' संबोधण्यास सुरुवात होते. न्यायमूर्ती रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे 'विचारवंत'. राहुल संकृतायन, भदंत आनंद, कौसेल्यायन म्हणजे बौद्ध धम्माचे 'गाढे अभ्यासक'. डी.डी. कोसंबी, रोमिला थापर, इर्फान हबीब हे 'इतिहासकार'. इरावती कर्वे, जी.एस. घुर्ये हे समाजशास्त्रज्ञ आणि एम.एल. सांतवाला, डी.के. लकडावाला आणि पी.आर. ब्रह्मानंद हे अर्थतज्ज्ञ. अगदी 'मराठी माणूस' म्हणून काही विचार केला तरी गेल्या काही वर्षांतील अर्थतज्ज्ञ म्हणून जी दोन नावं डोळ्यांसमोर उभी राहतात ती म्हणजे धनंजयराव गाडगीळ आणि वि.म. दांडेकर.

आज महाराष्ट्रात कोणत्याही विषयावर गंभीर चर्चा किंवा वाद नाही. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक अथवा सांस्कृतिक क्षेत्रात अत्यंत महत्त्वाच्या काही घटना वेगानं घडत असतानाही त्याची वैचारिक पातळीवर गंभीरपणे दखल घेतली न जाणं अथवा त्यावर वादविवाद न झडणं ही गोष्ट महाराष्ट्राच्या वैचारिक प्रगतीच्या दृष्टीनं निराशाजनक आहे.

**जमातवाद आणि दहशतवादाचं आव्हान**

धर्मनिरपेक्षतेला भारतीय राज्यघटनेनं एक अंगभूत लोकशाहीमूल्य म्हणून स्वीकारलं आहे. एखाद्या धर्माचा द्वेष किंवा त्याची भलामण करणं हे राज्यघटनेला अभिप्रेत नाही. राज्यघटनेला धर्म आणि शासन यांची फारकत अपेक्षित आहे. त्यामुळे धर्म मानणं अथवा न मानणं ही पूर्णपणे व्यक्तिगत बाब आहे. परंतु या संदर्भात केवळ खेदाचीच नव्हे तर निषिद्ध बाब म्हणजे धर्माचा राजकीय सत्तेसाठी उपयोग करणं. धर्माचा असा राजकीय दुरुपयोग म्हणजेच जमातवाद होय. गेल्या काही वर्षांत भारतीय राजकारणामध्ये असा जमातवाद एक प्रभावी शक्ती म्हणून स्थिर होत आहे.

जमातवादाचं सर्वात बीभत्स स्वरूप म्हणजे जातीय दंगे. भारतात स्वातंत्र्यानंतर विशेषत: हिंदू-मुसलमानांच्या शेकडो दंगली होऊन त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर मनुष्य आणि वित्तहानी झाली आहे. या सर्वांची इथे तपशीलात चर्चा करणं अशक्य आहे. परंतु महाराष्ट्राच्या दृष्टीनं त्याचं एकच उदाहरण बोलकं आहे आणि ते म्हणजे मुंबईतल्या ९२-९३च्या जातीय दंगली. ६ डिसेंबर १९९२ रोजी संघ परिवारानं बाबरी मशीद उद्ध्वस्त केली. सर्वसमावेशक व एकात्म संस्कृती असलेल्या भारतात स्वातंत्र्योत्तर काळात बाबरी मशीद उद्ध्वस्त करणं ही सर्वात काळीकुट्ट घटना आहे. परंतु एवढ्यावरच हे थांबलं नाही. ज्या आयोध्येत बाबरी मशीद उद्ध्वस्त करण्यात आली तिथं झाडाचं एक पानही हललं नाही. तर स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वात भीषण दंगलींपैकी ९२ ची हिंदू-

मुस्लमान दंगल होती. त्यानंतर पुढे वर्षभरातच संपूर्ण देशाला हादरा देणारे बॉम्बस्फोट मुंबईतच झाले. देशाची आर्थिक राजधानी, जगातील एक उत्तम कॉस्मोपॉलिटन शहर, १९४२च्या चलेजाव चळवळीची कर्मभूमी आणि कामगार चळवळीचा बालेकिल्ला असलेली मुंबई निर्घृण दंगलींनी कलंकित झाली. या दोन्ही घटनांचे भारतीय राजकारणावर किती गंभीर परिणाम झाले आणि देशाच्या सीमेलगत असलेली काही राष्ट्रं भारताला दहशतवादाचं भक्ष्य करून कसं खिळखळं करण्याचा प्रयत्न करताहेत हे आपण आज अनुभवत आहोतच. शिवाय २६ नोव्हेंबर २००८रोजी मुंबईतील दहशतवादी हल्यामुळे झालेली जखम अजूनही भळाभळा वाहतेय...

**विकास आणि न्यायाधिष्ठित समाज**

भारतीय समाजव्यवस्था पारंपरिकतेकडून आधुनिकतेकडे वाटचाल करत आहे. त्या अर्थानं ही संक्रमणअवस्था म्हणावी लागेल. अशा संक्रमण-अवस्थेत देशाचं राजकारण पाश्चात्य देशांइतकं अधिकाधिक निर्दोष असणार नाही. मात्र समाजाचं स्वास्थ्य आणि भावनिक ऐक्याला छेद देणाऱ्या गोष्टी कटाक्षानं टाळणं आवश्यक आहे. नेमकं तेच होताना दिसत नाही. त्यामुळे जी परिस्थिती जमातवादाविषयी आहे, ती राजकारणातील व समाजकारणातील जातींच्या वाढत्या प्राबल्याविषयी आहे. महाराष्ट्रही त्याला अपवाद नाही. महाराष्ट्रातील सर्व सत्तास्थानं प्रबळ जाती-वर्गांच्या हाती केंद्रित झाली आहेत. तर दुसऱ्या बाजूला वंचित घटक तसंच जाती सत्तास्थानांच्या परिघाबाहेर आहेत. धर्माच्या आधारे होणारं समाजाचं ध्रुवीकरण हे जसं सर्वार्थानं समाजाला मारक आहे तसंच जातींच्या आधारे होणारं वाढतं ध्रुवीकरणही आत्मघातकीपणाचं आहे. ही प्रक्रिया लवकरात लवकर थांबवणं गरजेचं आहे.

वरील एकूण सर्व पार्श्वभूमीवर विचार करता, अशा एकूण वातावरणात समाजाच्या सर्व थरांतील गरीब घटकांचं अतोनात नुकसान होत आहे. केंद्र सरकारच्या हजारो कोटी रुपयांच्या लोककल्याणकारी योजनांचे फायदे गरीब लोकांपर्यंत पोचत नाहीत. सर्वच क्षेत्रांत सत्तास्थानी असलेल्या २० ते २५ टक्के सधन, समृद्ध वर्गाचं 'नाहीरे' लोकांकडे हवं तितकं लक्ष जात नाही. अशी परिस्थिती दीर्घकाळ चालणं अशक्य आहे. लवकरात लवकर थांबवणं हेच देशाच्या हिताचं आहे. इतर राज्यांचा विचार करता महाराष्ट्राला एक वेगळा सामाजिक व वैचारिक वारसा लाभला आहे. तो विचारात घेता विकास आणि सामाजिक न्यायावर आधारलेला समाज निर्माण करण्याच्या कार्यात महाराष्ट्रानं अग्रभागी असायला हवं.

या वर्षी सुवर्णमहोत्सव साजरा करणाऱ्या महाराष्ट्रासमोर हे एक आव्हान आहे.

---

**– डॉ. भालचंद्र मुणगेकर**
९०१, दोस्ती कॉरनेशन, ९ वा माळा,
दोस्ती एकर कॉम्प्लेक्स, संगमनगर,
वडाळा (पूर्व), मुंबई ४०००३०
दूरध्वनी : २४१८ ७० ४१
blmungekar@yahoo.com

*दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!*



**रोहन एम्पोरियम**

भैरवनाथ टेलिकॉम आणि
झेरॉक्स सेंटर

**प्रोप्रा. चंद्रकांत मा. बाबर (नाना टेलर)**

सफाळे पूर्व (बी. टेलर), ता. पालघर,
जि. ठाणे ४०१ १०२
दूरध्वनी : दुकान – ०२५२५-२३०२८९
घर – २३०३५१ भ्रमणध्वनी : ९४२३ ३५९ ०७१

# चित्रकार-कवीची दार्शनिकता

दीपक घारे

चित्रकार–कवी हा शब्द शांताराम पवार यांनी चित्रकार–कवींचे कार्यक्रम करून रूढ केला. पेशाने चित्रकार असलेले किंवा चित्रकार म्हणून प्रसिद्ध असलेले ते चित्रकार–कवी अशी त्याची प्राथमिक व्याख्या करता येईल. मग इंजिनीयर– कवी, डॉक्टर–कवी अशीही वर्गवारी होऊ शकते. पण ती चुकीची आहे. 'चित्रकार– कवी'मध्ये चित्रकार आणि कवी, म्हणजेच चित्रप्रतिमा आणि शब्दप्रतिमा या परस्परपूरक कलाविश्वाचा एकात्म आविष्कार करणारे कवी हा अर्थ अभिप्रेत आहे. तिथे चित्रकाराची भूमिका कवितेत स्पष्ट दिसावी असे अपेक्षित नाही; किंबहुना, तशी ती नसावीच. पण दोन माध्यमांमध्ये विहार करणारा कलावंत नकळतपणे माध्यमांच्या मर्यादा ओलांडत असतो, जाणिवांचे अवकाश विस्तारत असतो त्या अर्थाने चित्रकार–कवी ही संज्ञा वापरली पाहिजे.

शांताराम पवार चित्रकार– कवी म्हणून कसे भावतात ते पाहण्याचा हा एक प्रयत्न आहे. समीक्षेच्या रूढ चौकटीत तो बसणारही नाही. पण त्यामुळे आपल्या जाणिवांच्या कक्षा विस्तारतात का हे पाहणे अधिक महत्त्वाचे!



‘पिकासोच्या चित्रातली
नागडी बसते
पाठ फिरवून’

‘रात्र बुरखेवाली’ या कवितेत स्त्रीपुरुष नात्याचा एक उत्कट अनुभव आलेला आहे, पण तो सलग नाही. त्यात सहभागी असणाऱ्या स्त्रीची आणि पुरुषाची कामव्यवहाराकडे पाहण्याची वेगळी दृष्टी आहे. त्यात कामवासनेची विविध रूपे आहेत. प्रतारणा आहे, पुरुषी अहंकाराला डिवचणे आहे. त्यामागचे वास्तवाचे विविध कोन लक्षात आल्यावर शरीर आणि मनाने एकरूप होण्याच्या एकात्म अनुभवाचा बुरखा गळून पडतो. मग उरतो तो कामतृप्तीचा अनुभव आणि आपण वापरले गेल्याची बोच.

या कवितेत पिकासोचा उल्लेख आहे. एडका आणि बोकड या प्रतिमा आहेत. पिकासोमुळे या कवितेतला चित्रात्मक आशय स्पष्ट होतो. एडका आणि बोकड यांना कामवासनेच्या संदर्भात असलेला प्रतिमात्मक आशय पिकासोच्या अंगाने आपण मग शोधू लागतो आणि एका चतुर कावेबाज कामिनीचे आधुनिक शैलीतील चित्र आपल्यासमोर उभे राहते.


या कवितेत पिकासोचा उल्लेख असा येतो, ‘पिकासोच्या चित्रातली नागडी बसते पाठ फिरवून.’ हे वाचताच पिकासोचे ‘दम्वायझेल’ हे क्युबिझमची पहिली पायरी असलेले क्रांतिकारक चित्र आठवते. या चित्रात वेश्यागृहातल्या ज्या पाच नग्न स्त्रिया दाखवल्या आहेत त्यातली एक पाठमोरी बसलेली आहे आणि ती मागे वळून पाहते आहे. तिचा चेहरा आफ्रिकन मुखवट्यासारखा आहे. पवारांच्या कवितेतल्या स्त्री पुरुषांचं मैथुन पाहताच चित्रातली नागडी पाठ फिरवून बसते आणि

‘साली ताक पिते वळूनवळून डोळे भरून.’

पिकासोच्या चित्रातली स्त्री, तिची पवारांच्या कवितेमधली कृती म्हणजे असूया (jealousy) आणि कामक्रीडा चोरून पाहण्यातला आनंद (voyeurism) यांचे मिश्रण आहे. ‘दुधाची तहान ताकावर’ आणि ‘डोळेभरून या’ तपशिलांमधून हा आशय स्पष्ट होतो.

पिकासोचा उल्लेख करताना पवारांच्या मनात ‘दम्वायझेल’ चित्रच असेल असे नाही. पिकासोच्या असंख्य चित्रांमधली कोणतीही स्त्री असेल, किंबहुना

‘दम्वायझेल’
क्युबिझमची पहिली पायरी
असलेले पिकासोचे चित्र



पाश्चात्य आधुनिक चित्रांमधलीही ती असू शकते. आजपर्यंत जुन्या, नव्या अनेक चित्रकारांनी पाठमोऱ्या स्त्रीची न्यूड रंगवलेली आहेत. पिकासोवर ज्याचा प्रभाव होता त्या इंग्रचे (Ingres) 'वुमन बाथिंग' हे या संदर्भात पटकन आठवणारे चित्र. पाठमोरी स्त्री ही एक प्रतिमा आहे, दृश्यकलेतल्या अर्थच्छटा घेऊन येणारी, पण 'नागडी', 'साली ताक पिते' या शब्दयोजनेतून जी स्त्री उभी राहते, जो थेट उघडेनागडेपणा आणि जी तामसी कामप्रेरणा त्यातून व्यक्त होते, त्यानुसार पिकासोच्या स्त्रीशी ती अधिक जवळीक साधते.

या कवितेत बदामी एक्का, एडका आणि बोकड या प्रतिमाही आलेल्या आहेत. बदामी एक्का पुरुषी अहंकाराचे, वर्चस्वभावनेचे प्रतीक आहे. बदामाचा प्रेमभावनेशी आणि हृदयाशीही संबंध जोडला जाऊ शकतो. एडका हा कामप्रेरणेचे प्रतीक आहे तर बोकड अंध कामवासनेचे, त्या वासनेचा बळी ठरणाऱ्या पौरुषाचे प्रतीक आहे.


'बदामी एक्क्याचे, झुक्‌झुक्‌ झोक्यांचे
बोकड होईपर्यंत एडक्याला वापरायचे
शहाणे तुझे वेड'

लैंगिक वासनेचे प्रतीक म्हणून आधुनिक चित्रकलेत प्राणी आलेले आहेत. एडका, बैल, घोडा अथवा मिनोटॉर यांसारखी मिथके चित्रांमधून येतात. मार्क शगालच्या प्रणयी युगुलांच्या चित्रांमध्ये अशा प्रतिमा येतात. ('मिडसमर्स नाईट ड्रीम' या चित्रात शगालने एका तरुणीला कवेत घेणारा बकरा दाखवला आहे. शगालच्या दृष्टीनुसार आपण प्राणिसृष्टीचे घटक आहोत.) लक्ष्मा गौड याच्या मुद्राचित्रांमधून वासनेचे पाशवीपण सुचवण्यासाठी असेच चित्रविचित्र प्राणी येतात. सांगण्याचे तात्पर्य एवढेच की एडका आणि बोकड या प्रतिमांना चित्रकलेतील प्रतिमांची ही पार्श्वभूमी आहे.

पवारांनी कवितेत 'एडका' ही प्रतिमा वापरली आहे. तिला भारतीय साहित्य आणि संस्कृतीचाही संदर्भ आहे. एडका म्हणजे मदन. इरावती कर्वे यांनी 'उकल' ('गंगाजल'-इरावती कर्वे, देशमुख आणि कंपनी, पुणे १९७७) या त्यांच्या एका लेखात 'एडका मदन-पंचानन' या एकनाथांच्या रूपकाची उकल केलेली आहे. त्यांना प्रथम उमगलेला अर्थ मदन म्हणजे मदास आलेला- 'मद आलेला एडका' एवढाच होता. पंचानन म्हणजे वाघ. पण एकनाथांचे रूपक वाचल्यावर इरावती कर्वेंना खरा अर्थ कळला. 'एडका मदन तो केवळ पंचानन'मध्ये मदनरूपी एडक्याचे प्रताप आहेत. त्याने शंकराला धडक मारली, ब्रह्मदेवाचे मातेरे केले, इंद्र, चंद्र यांना भेदरवले. नारद, रावण, दुर्योधन, भस्मासूर, वाली, विश्वामित्र हेसुद्धा

एडका-मदन-पंचानन
- एकनाथांचे रूपक

'मिडसमर नाइट्स् ड्रीम'
- मार्क शगाल



## रात्र बुरखेवाली

शॉवरखाली विझवलेली
आठवते का ग ती
रात्र बुरखेवाली?
कौटुंबिक तुझ्या जिव्हाळ्याच्या मांडीवर
स्विचऑन होताच मिथून आपले
अपशकुन झाला समजून
पिकासोच्या चित्रातली
नागडी बसते पाठ फिरवून
आणि ओठापासून देठापर्यंत
एकमेकात शिरताना आपण
साली ताक पिते वळून वळून
डोळे भरून
लाळ तिची हँगरवर.
त्या रात्रीची गोष्टच वेगळी
धुतल्या तांदळासारखी
पांढरीधोप सकाळी
अळीमिळी गुपचिळी.
तिळोत्तमे!
त्या रात्री मला कळले
बदामी एक्क्याचे, झुकझुक झोक्यांचे
बोकड होईपर्यंत एडक्याला वापरायचे
शहाणे तुझे वेड.
आणि त्याच रात्री कानफटात,
निरोप तुझा रेकॉर्डेड
'ऐका हो ऐका'!
वॉन्टेड एडका, मारणारा धडका.
थोड्या विश्रांतीनंतर... वॉक इन इंन्टरव्यू
असे तसे आणखी खूप
तेरीभी चूप मेरी भी चूप

त्याच्या तावडीतून सुटले नाहीत. याला अपवाद फक्त शुकदेव. शुकाने आपल्या वैराग्यवृत्तीने मदनरूपी एडक्याला काबूत आणले आणि विठ्ठलाच्या चरणी बांधून ठेवले. म्हणून शुकदेव पंचानन ठरले. पवारांच्या कवितेत मदास आलेला या अर्थाने एडका मदन आहेच. 'वॉन्टेड एडका, मारणारा धडका' या ओळीतून तो अर्थ व्यक्त होतो. एकनाथांच्या रूपकामध्ये इतरांना लोळवणारा, पुरुषी अहंकार जोपासणारा म्हणूनही तो आहे. फरक एवढाच, की शुकाऐवजी कवितेतही स्त्रीच एडक्याला बोकड बनवते, त्याला वश करून घेते. शांताराम पवार यांची चित्रं असोत वा कविता, त्यांची प्रतिमासृष्टी पाश्चात्य आणि पौर्वात्य दोन्ही संस्कारांमधून साकारते. म्हणूनच पवारांच्या कवितेच्या संदर्भात मार्क शगाल आणि एकनाथ दोघेही पूरक ठरतात.

कवितेतल्या प्रतिमांचा विचार केल्यानंतर आता या कवितेतली दृश्यात्मकता पाहुया. संपूर्ण कविताच एखाद्या चित्रासारखी आहे. कवितेत घडते ते वास्तव की कल्पनेच्या विश्वातले? अशी एक संदिग्धता या कवितेत आहे. रात्र आणि सकाळ, बुरखेवाली रात्र, अळीमिळी गुपचिळी, तेरी भी चूप, मेरी भी चूप या ओळींमधून एक अत्यंत खाजगी अनुभव सूचित होतो. तो रात्रीच्या अंधारात जिवंत होतो (स्विचऑन) आणि पांढऱ्याधोप सकाळी अंतर्धान पावतो.

या कवितेत जो उठावदार विरोध आहे (Contrast) तो एखाद्या चित्रातल्यासारखा आहे. 'त्या रात्रीची गोष्टच वेगळी/ धुतल्या तांदळासारखी पांढरीधोप सकाळी' यातला विरोध आठवण करून देतो तो पवारांच्या चित्रांमधल्या पॉझिटिव्ह/निगेटिव्ह स्पेसची, अवकाशाच्या वापराची.

'अळीमिळी गुपचिळी,
तिळोत्तमे'

या ओळींमध्ये ळ अक्षराच्या पुनरावृत्तीतली शाब्दिक आणि शब्दांच्या नादाची गंमत आहे. तिळोत्तमे या शब्दातून स्त्रीदेहावरचा तीळ हा सौंदर्याचा रूढ संकेत तर व्यक्त होतोच, पण अळीमिळी हे अवकाश आणि अवकाशाला जिवंत करणारा तीळ म्हणजे ठिपका असा एक दृश्यात्मक संकेतही पवार सूचित करतात. 'स्विचऑन होताच मिथुन आपले' इथेही अवकाश जिवंत होण्याची सूचना आहे. त्याचीच पुनरावृत्ती 'अळीमिळी...तिळोत्तमे' या ओळीत होते. रात्र 'धुतल्या तांदळासारखी पांढरीधोप सकाळी' होते, यातली पांढरीधोप सकाळी ही दृश्यात्मक प्रतिमा आहे तर धुतल्या तांदळासारखी ही शब्दप्रतिमा आहे. निष्कलंकपणा हा अर्थ तिथे अभिप्रेत आहे. रात्री जे काही घडले त्यातल्या अपराधभावाची बोच त्यातून व्यक्त होते. रात्र आणि सकाळ, वास्तव आणि चित्र, वास्तव आणि शब्दप्रतिमा, पाश्चात्य आणि भारतीय संवेदनशीलता, प्रेम आणि वासना, समर्पण आणि प्रतारणा अशा अनेक संवाद-विरोधी ताणांमधून ही कविता आकाराला येते.

'रक्तपिपासू वाघ की वनराज सिंह' या कवितेतली स्त्रीदेखील 'रात्र

बुरखेवाली' कवितेतल्या स्त्रीसारखीच आहे. अनेक प्रवृत्तींच्या पुरुषांना खेळवणारी. अनेक पुरुषांना हवीहवीशी वाटणारी, पण सर्वांनाच अप्राप्य असलेली.


'काय ग रक्तपिपासू वाघ की वनराज सिंह
आंबटशौकीन कोल्हा की लबाड लांडगा
कुत्रा शिकारी की राजबिंडा घोडा
सांग तरी आवडतो कोण तुला?

प्राण्यांच्या या प्रतिमा आणि त्यांची स्वभाववैशिष्ट्ये तशी साहित्यातून नेहमी येतात. पण इथे लैंगिक वासनेशी त्यांचा संबंध जोडला गेल्यामुळे त्यांना वेगळे परिमाण लाभले आहे. आधुनिक चित्रकलेत या प्रतिमा अनेक वेळा येतात. रक्तपिपासू, वनराज, आंबटशौकीन, लबाड, शिकारी, राजबिंडा ही पुरुषी मनोवृत्तीची विविध रूपे आहेत. भारतीय लघुचित्रशैलीत प्रणय आणि शृंगार व्यक्त करण्यासाठी पशुपक्ष्यांच्या प्रतिमा येतात. मोर, हरीण, पक्षी, वृक्षवेली वगैरे. पण त्यांची भूमिका प्रेमभावनेला पोषक असे वातावरण निर्माण करण्याची असते. स्त्री-पुरुषांच्या वासनामय प्रेमाचा एक सूचक आणि उन्नत असा अनुभव रागमालिकेवरील लघुचित्रांमध्ये आपल्याला दिसतो.

पवारांच्या या कवितेत प्राण्यांच्या प्रतिमा पुरुषी वासनेचे आक्रमक आणि रांगडे रूप दर्शवतात. लोकसाहित्यात कोल्हा, लांडगा अशा प्रतिमा येतात किंवा वैदिक साहित्यात व शिल्पकलेत पौरुषत्वाचे प्रतीक म्हणून वृषभ, अश्व यांच्या प्रतिमा येतात, पण तिथले प्रयोजन आणि पवारांची कविता यांत मुळातच फरक आहे.

या कवितेत हे सारे प्राणी तिच्या दिवाण-ए-खासमध्ये गप्पांसाठी जमतात. पॅरिसच्या कॅफेमध्ये आधुनिक चित्रकार जमायचे तसे! तिच्या कविता आणि खुशमस्कऱ्यांची गर्दी यातून सूचित होणारे काव्यशास्त्र-

आधुनिक कलेतील पुरुषी वासनेचे रांगडे रूप दाखवणाऱ्या प्राण्यांच्या प्रतिमा लक्ष्मा गौड यांचे मुद्राचित्र



विनोदाचे वातावरण हा संदर्भ अधिक पक्का करते. कवितेच्या शेवटी पुढील ओळी येतात,

'तुला चाहनेवाला बापुडा, रात्री-अपरात्री प्राणपणाने आरवतोय
गावाच्या डोक्यात हळूहळू प्रकाश पडतोय'

मार्क शगालच्या चित्रात प्रेमी युगुलाबरोबर सर्जनाचे प्रतीक म्हणून कोंबडा बरेच वेळा येतो. या कवितेत कोंबड्याची प्रतिमा विरही प्रियकराची म्हणून येते. लघुचित्रांमध्ये प्रियकराची वाट पाहणाऱ्या किंवा प्रियकराच्या विरहाने व्याकुळ झालेल्या स्त्रियांचे चित्रण येते. इथे नेमके त्याच्या उलट घडते.

कोंबडा आरवण्याने आणखी एक गोष्ट घडते. तिच्याभोवतीची प्रभावळ म्हणजे रात्रीचे एक स्वप्न तर नव्हे असे वाटू लागते आणि चाहनेवाल्या बापुड्याचे तिला वश करण्याचे प्रयत्न म्हणजे दिवास्वप्नही!

ज्यामध्ये पाश्चात्य कलेतली दृश्यजाणीव आहे अशी पवारांची आणखी एक कविता आहे, 'शवासन.' या कवितेत एक मानवी देहाचे सलग चित्र तुकड्यातुकड्यांमध्ये विभागलेले आहे. 'क्युबिस्ट' चित्रांमध्ये चेहरा विविध कोनांमध्ये विभागलेला असतो किंवा मानवी देहासारखी एकच वस्तू चित्रकार एकाच चित्रात वेगवेगळ्या प्रकारे दाखवतो. पिकासोने काढलेली डोरा मारची व्यक्तिचित्रे किंवा रोदांने केलेल्या हातांच्या विविध शिल्पकृती यातून एक जाणीवपूर्वक खंडितता आणलेली असते. रोदांचे फक्त धडाचे (torso) केलेले शिल्प आपण पाहतो तेव्हा किंवा डोके व हात नसलेले 'वॉकिंग मॅन'चे शिल्प पाहतो तेव्हा शरीराचे आणि स्नायूंचे सौष्ठव अधोरेखित केले जाते. थोडक्यात सांगायचे तर चित्रात खंडितता आली की पाहणाराही धक्का बसून जागा होतो आणि परिचित वस्तूमध्ये त्याला वेगळा आशय दिसू लागतो. पवारांच्या या कवितेत तसेच काहीसे होते.

'काढून ठेवले खुंटीवर त्याने मुंडके आपले
तेव्हा गोठून राहिलेला 'हुश्श'चा कडेलोट
मुखवट्याच्या तोंडून,

इथे मुखवट्याचे अनेक अर्थ होऊ शकतात. वास्तव जीवनात सोयीसाठी घ्यावे लागणारे मुखवटे, नाटकात वापरायचे, जीवनाचे कलात्मक अनुभवात परिवर्तन करणारे मुखवटे अथवा मास्क किंवा आदिम कलाजाणिवांकडे नेणारे मुखवटे.

'टेबलावर सरकवले मग त्याने हात आपले
ते घडी घालून बसले जसे काही झालेच नाही
देहावसान'

हात म्हणजेच आपले कर्म त्याने बाजूला ठेवले. कार्याला प्रेरणा देणारे देहाचे अवसान त्यामुळे गळून पडले.

'आणि धडावेगळे केले त्याने पाय आपले
मांडी घालून कोपऱ्यात बसले
निर्बुद्ध पद्मासन'

इथे 'पद्मासन' शब्दात खोच आहे. पद्मासन ही एक योगमुद्रा आहे. शरीराच्या चित्तवृत्ती एकाग्र करणारी आणि चैतन्यशक्तीला जागृत करणारी. इथे पद्मासन निर्बुद्ध आहे, प्रयोजनशून्य आहे, एखाद्या दगडी शिल्पासारखे. निर्बुद्धचा आणखीही एक श्लेष निघतो, बुद्ध नसलेला, बुद्धाची प्रेरणा नसलेले पद्मासन.


'आता राहिलेसाहिलेले ढकलून दिले त्याने धड आपले
बिछान्यावर पाठ खाजवण्यापुरते
शवासन.

जिथे सारासार विवेक आणि कलात्मकतेचा मुखवटा नाही, हातांची कर्मप्रवणता नाही, पायांची गतिशीलता नाही तिथे शवासनापलीकडे दुसरी कुठची अवस्था उरणार?

ही कविता म्हणजे एका माणसाची दिवसभराच्या धडपडीनंतर आलेल्या थकव्याची कविता आहे. जीवनाचे प्रतीक बनलेली.

'शयनगृहाचे पडदे' ही एक हळुवार, तरल अशी दृश्यसंवेदना जपणारी कविता आहे. इथे वासनेपेक्षा प्रेमभावनेची स्मरणरंजनात्मक अवस्था वरचढ आहे. शयनगृहाचे जीर्ण झालेले पडदे आता बदलायचे आहेत. एक अध्याय संपला आहे आणि दुसऱ्या अध्यायाला सुरुवात करायची आहे. हा शयनगृहाचा पडदा म्हणजे वासनापूर्ण प्रेमभावनेचे प्रतीक आहे. इथे स्त्री-पुरुष नात्यातले सारे भावबंध प्रत्यक्षपणे व्यक्त न होता पडद्याच्या माध्यमातून साकार होतात. पडदा म्हणजे नाजूक आणि तरल आठवणी आहेत. पडदे हलक्या हातांनी काढ, जरभारी नख लागून फाटतील, गर्भगळित होतील या सूचनांवरून त्यांचे नाजूकपण लक्षात यावे. 'नक्षीवरले पक्षी उडाले आहेत', 'घडी घाल त्या गुलाबी पाकळ्यांची' या ओळींमधून पडद्यावरचे डिझाईन सूचित होते. इथे कोणतेही चित्रात्मक तपशील स्पष्ट केलेले नाहीत. तरीही आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते ती मंद रंगसंगती असलेली युकिओ-ई या जपानी चित्रांमध्ये असलेली तरल भावुकता. नक्षीवरले पक्षी या प्रतिमेने याला अधिक बळकटी येते. नवीन पडद्यांचे 'रंगपोत' हा उल्लेखही दृश्य अनुभूतीत भर घालणारा आहे. एका अर्थाने हे पडद्याचे स्थिरचित्र आहे. तरल आणि संयत. फक्त एकाच ओळीत तृप्तीतही असलेली अतृप्तीची उत्कट भावना उफाळून बाहेर येते आणि साऱ्या चित्राला जिवंत करते. या ओळी अशा आहेत-

'घडी घाल त्या गुलाबी पाकळ्यांची
पुष्ट तुझ्या असंतुष्ट मांड्यांवर'


युकिओ-ई शैलीतले चित्र

'पुष्ट' या शब्दाने द्विमितीपूर्ण पडद्याच्या चित्राला एक गोलाई किंवा भरीवपणा येतो. तिसऱ्या मितीच्या स्पर्शाने चैतन्य येते.

इथे असा एक प्रश्न उपस्थित होईल की हे पडद्याचे चित्र युकिओ-ई शैलीचीच आठवण का करून देते? लघुचित्रशैलीची का नाही? पहिला संदर्भ आकाराचा. लघुचित्रे आकाराने लहान असतात. त्यामुळे पडदा आणि लघुचित्र आकाराच्या दृष्टीने भिन्न आहेत. दुसरे असे, की युकिओ-ई चित्रे ही कापडावर काष्ठठशांनी मुद्रित केलेली चित्रे असत व गृहसजावटीचा भाग म्हणूनही त्यांचा उपयोग केला जाई. पक्षी, फुले, पाने यांचा प्रतिमा म्हणून वापर आणि मंद रंगसंगती ही युकिओ-ई चित्रांची वैशिष्ट्ये आहेत.

पडदा या प्रतिमेत एक लवचिकपणा आहे. त्याच्या घड्या घालता येतात. आठवणींचे वस्त्र आपण उलगडतो, घड्या घालतो, स्मृतीच्या कप्प्यात ठेवून देतो. स्मृतींचे अवकाश जागे करणाऱ्या नव्या शक्यता आपण त्यातून अनुभवत असतो. नवे रंग आणि पोत विणत असतो. याच हळुवार वृत्तीने अवकाश उलगडण्याची किमया पुढील छोट्या कवितेत येते.

कागद चुरगळलेला
बघता बघता उलगडला
रुमाल तुझा हरवलेला
वाचता वाचता सापडला

पवारांच्या कवितांमध्ये अशा हळुवार वृत्तीची आणखीही काही उदाहरणे सापडतील, आणि अवकाशाच्या स्थिती-गतिशील अवस्थांच्या अदलाबदलाचीही, त्यांच्या चित्रांमधल्या निगेटिव्ह-पॉझिटिव्ह स्पेससारखी. आता ही कविता पाहा-

उघडली
शवपेटी
त्यात चिठ्ठी
गर्भवती

अवकाशाचे विरूपीकरण (distortion) किंवा अवकाशाला घड्या घालण्याची कल्पना आणखी एका कवितेत येते. 'कॉन्व्हेक्स आणि कॉन्केव्ह' या कवितेत आरसा आहे. आरसा ही प्रतिमा पवारांच्या कवितांमधून बऱ्याच वेळेस येते. पण इथे आरसा आला आहे तो दृश्यजाणिवेचा एक संदर्भ बिंदू अथवा प्रतल म्हणून. आपण वास्तवाच्या प्रतिमा पाहतो. बहिर्गोल किंवा अंतर्गोल भिंगातल्या विरूप झालेल्या प्रतिमांसारख्या त्या असतात. कॅलिडोस्कोपमध्ये त्यांचे नानाविध आकार दिसतात. पण प्रत्यक्ष वास्तव वेगळेच असते. या कवितेत पवार म्हणतात,

'आरशाने पाहिल्या, सावल्या पेटलेल्या आपल्या
आरसा लाजलाबुजला, पांढराफटक पडला.
खूप वाटले आरशाला
नीट ठेवाव्या सावल्या आपल्या घडी करून
पण ठेवल्या तशाच पेटलेल्या, मनभरून...मनापासून'

### शयनगृहाचे पडदे

काढ ते पडदे शयनगृहाचे
हलक्या हातांनी
काळजी घे त्यांची
जागेवरून हलवताना
जरभारी नख लागून
फाटतील, गर्भगळीत होतील.
असेच होते जागेवरून हलताना.
त्यांचे तर आता वय झाले आहे
नक्षीवरले पक्षी उडाले आहेत.
काढ ते पडदे शयनगृहाचे अलगद.
झटकू नकोस त्यांना,
वसंत आपला पुसू नकोस
घडी घाल त्या गुलाबी पाकळ्यांची
पुष्ट तुझ्या असंतुष्ट मांड्यांवर
आणि हो, नवीन पडद्यांचे रंगपोत
बदलायला विसरू नकोस
मागे वळून पाहू नकोस.

यात सावल्यांची घडी घालण्याचा उल्लेख आहे तो आधीच्या कवितेतल्या पडद्याच्या घड्या घालण्याशी संवादी आहे. इथे सावल्या म्हणजे अबोध मनाचे प्रतीक आहे. मनामध्ये अनेक आशा-आकांक्षा साचून राहिलेल्या असतात. आरशामध्ये प्रतिबिंब पाहणे म्हणजे एका अर्थाने स्वत: अंतर्मुख होणे. असे स्वतःत दडलेल्या वासनांचे दर्शन पेटलेल्या सावल्यांमधून घडते. एका बाजूला 'लाजलाबुजला, पांढराफटक पडला' या विशेषणांमधून आत्मदर्शनामुळे होणारी भयमिश्रित लज्जेची भावना आहे आणि त्याच वेळेस या लसलसत्या वासनांचे, त्या जपण्याचे आकर्षणही आहे. आरसा आणि सावल्या, पांढराफटक होऊन आरशाने आपले पारदर्शी अस्तित्व विसरून अपारदर्शक होणे, भिंगांच्या आरशाच्या रूपाने दृश्यप्रतिमांची चंचल गतिशीलता जाणवणे यामुळे या कवितेला एक प्रकारची चैतन्यशील गतिमानता आलेली आहे.

'सोनेरी हरण' कवितेत आजच्या दहशतवादाच्या, अपहरण-नाट्यांच्या जगात मनात दाटणारी असुरक्षिततेची भावना आलेली आहे. या भयाण वास्तवाचे आणि भीतीचे रूपांतर इथे एका मिथकात झाले आहे. लघुचित्रशैलीतले मोहक चित्र असावे तसे. हे 'सोनेरी हरण तुझ्या मनात, माझ्या मनात' असे दोघांच्याही मनात आहे. 'तुझ्याकडून माझ्याकडे माझ्याकडून तुझ्याकडे' असा त्याचा प्रवास आहे. म्हणजेच संवादातून ते अधिक जिवंत होते. हे दोघे प्रियकर-प्रेयसी असतील अथवा दोन वा अधिक जिवांचा सामाजिक पातळीवरील तो संवाद असेल. या संवादाच्या वाटेवर जागोजाग शिकारी पेरल्याचे, नजरकैदेचे, जन्मठेप शिक्षेचे आणि संशयास्पद हालचालीचे भास आहेत. इथे नकळतपणे रोजच्या जगण्याचेच हे रूपक बनते आणि सोनेरी हरीण मानवी मनातल्या निरागसतेचे. असे विसंवादी भयशंकित भासांच्या दुनियेत जगण्यापेक्षा हरण देवाकडे मरण मागते. प्रभू रामचंद्र त्याला मुक्ती देतात आणि सीतेच्या पदरी हरण धन्य होते. सीतेच्या ठिकाणी स्वप्नांमध्ये रमणारी सौंदर्यदृष्टी आहे आणि तिच्या ठायी समर्पित होणे हे इतर कुणाची तरी शिकार होण्यापेक्षा निश्चितच चांगले. शिकार या शब्दाने रानटीपणा सूचित होतो तर मृगया शब्दामध्ये शिकारीबरोबरच क्रीडाही आहे. राजे लोकांचा मृगया हा एक छंद तसाच सुंदर स्त्रियांची शिकार करणे, त्यांना वश करणे हा देखील एक खेळच. त्यामुळे भारतीय साहित्यात, गझलसारख्या काव्यात आणि लघुचित्रकलेत हरण हा प्रणयभावना व्यक्त करणारा एक संकेत होऊन बसलेला आहे. गझलचा एक अर्थ हरण असा आहे.

रामबाणासाठी सीतेकडे हट्ट धरते;
'तथास्तू!' ऐकताच 'राम' म्हणते,

या ओळी अतिशय अर्थपूर्ण आहेत. जीवन आणि मरण यातले अंतर्विरोध आणि या दोन्ही अवस्थांची अंतरीची समज यांच्या अर्थच्छटा बघण्यासारख्या आहेत. रामबाण म्हणजे रोगावरचा उपाय. पण इथे रामबाण म्हणजे मृत्यू किंवा मोक्ष. 'राम' म्हणते म्हणजे अखेरचा श्वास घेते, पण इथे 'राम' म्हणणे म्हणजे 'राम हाकेला धावून आला' म्हणून

### सोनेरी हरण

सोनेरी हरण
तुझ्या मनात माझ्या मनात
अपहरणाच्या भीतीने
तुझ्याकडून माझ्याकडे
माझ्याकडून तुझ्याकडे
त्याला वास आला आहे
संशयास्पद हालचालींचा
जागोजाग शिकारी पेरल्याचा
नजरकैद केल्याचा,
जन्मठेप शिक्षेचा.
म्हणून सोनेरी हरण,
देवाकडे मागते मरण.
प्रभू रामचंद्राने बाण मारावा
सत्कारणी आपला देह पडावा
अशी प्रार्थना करते.
रामबाणासाठी सीतेकडे
हट्ट धरते.
'तथास्तू!' ऐकताच 'राम' म्हणते
धन्य होते सीतेच्या पदरी
सोनेरी हरण.

रुची
दिवाळी

समाधान व्यक्त करणे असाही अर्थ होऊ शकतो.

'अंधार' ही अजिंठा-वेरूळवरची कविता इथे आठवते. तिथेही चतुभंग हरणांचा उल्लेख आहे. 'सोनेरी हरण' कवितेत जसा एक आध्यात्मिक आशय आहे तसाच तो 'अंधार' कवितेतही आहे. मुख्य म्हणजे ही आध्यात्मिकता दृश्यकलेच्या संवेदनशीलतेतून साकार होते. 'अंधार' कवितेत अजिंठ्याच्या कलासृष्टीमागची सखोल जीवनजाणीव कलातत्त्वांच्या उच्चारातूनच साकार होते-

'उलगडले तुम्ही गर्भ...ताल तोल साधून सावधान
अंगभंग देवदानवांचे...गंधर्वअप्सरांचे त्रिभंग नि चतुभंग हरणांचे'

ताल-तोलमध्ये आवर्तन, गतिशीलता आणि स्थितिशीलता आणि सममितीचे सूचन येते. सावधानमध्ये सचेतन समतोल आहे. अंगभंग मध्ये rapture आणि rupture दोन्ही आहे. त्रिभंगमध्ये नृत्यातील त्रिभंगी मुद्रा आहे आणि चतुभंग हा पवारांनी केलेला त्याचा विस्तार (extension) आहे.

पवारांच्या चित्ररचनेत मांडणीतला समतोल हा अतिशय प्रमाणबद्ध, नेमका आणि तरीही सचेतन असतो. तो अनुभव या दोन्ही कविता वाचताना प्रकर्षाने येतो. भारतीय सौंदर्यदृष्टीतून आलेली ही जाणीव काव्यरचनेला अधिक समृद्ध करते.

स्त्री-पुरुष एकरूपतेचा प्रत्यय आणून देणारी आणखी एक कविता आहे. या कवितेची रचना, तंत्र आर्टची आठवण करून देणारी आहे. ती कविता शेजारी दिली आहे.

किर्र
कातरवेळी
सहस्त्र
पाकळ्यांनी
शहारलेली
विवस्त्र
हठयोगी
गुलाबी
देठावर
स्फुल्लिंग
अजस्र
अण्वस्त्र


जी.आर.संतोष यांचे चित्र

या कवितेत एकही क्रियापद नाही. आहेत ती विशेषणे. त्यातून स्त्री-पुरुष समागम सूचित होतो. तो शाक्तपंथीय रिच्युअलची आठवण करून देणारा आणि स्फोटक आशयाने परिपूर्ण असा आहे. तंत्र आर्टमध्ये यंत्रांच्या आकृती आणि बीजाक्षरे असतात. या चित्रांमध्ये चित्तवृत्ती एकाग्र करण्यासाठी एखादा केंद्रबिंदू असतो. या कवितेचे नाभीकेंद्र आहे ते 'विवस्त्र/हठयोगी' या दोन ओळींमध्ये. हठयोगी हे विवस्त्र स्त्रीचे विशेषण होऊ शकते किंवा हठयोगी म्हणजे पुरुषही होऊ शकतो. कारण अजस्र, अण्वस्त्र यातून लिंगाचा आकार ध्वनित होतो. कवितेचे दोन भाग पडतात. किर्रपासून विवस्त्रपर्यंत एक भाग. सहस्रपाकळ्यांचे कमळ हे प्रतीक स्त्री-तत्त्वाचे आहे आणि मानवी शरीरातील कुंडलिनी जागृती करणाऱ्या चक्रांचेही आहे. किर्र कातरवेळी यातून काळ आणि अवकाशाची सूचना मिळते. कातरवेळीमध्ये एक संक्रमणावस्था आणि अज्ञाताची ओढ आहे. ती संगमोत्सुकतेच्या ओढीमुळे शहारलेली आहे. नाभीकेंद्राकडे जाणाऱ्या concentric वर्तुळांसारखी. किर्र शब्दापासून ते विवस्त्रपर्यंत अवकाश स्थूल आकारापासून नेमके आणि व्यक्तिगत होत जाते. हठयोगीपासून अण्वस्त्रपर्यंत नेमकी उलट क्रिया घडते. म्हणजे ते विस्तारत जाते.

गुलाबी/देठावर/स्फुल्लिंग/अजस्र/अण्वस्त्र यामध्ये व्यक्तिगत नाभीकेंद्रापासून देठ/स्फुल्लिंग यातून उमलण्याची, स्फुरण्याची क्रिया सूचित होते तर पुढच्याच क्षणी ती अजस्र/अण्वस्त्र शब्दांमधून प्रचंड रूप धारण

करते. स्त्री-पुरुष समागमाबरोबर ते वैश्विक उर्जेचे (cosmic energy) प्रतीक बनते.

कवितेत दृश्यात्मकता हा घटक काही नवीन नाही. ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदासांपासून तो मराठी काव्यात चालत आलेला आहे. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायातील ध्यानसाधनेच्या जागेचे वर्णन, नाथांच्या 'रात्रकाळी घागर काळी'सारख्या गवळणी, रामदासांच्या मारुती स्त्रोत्रातले 'वाढता वाढता वाढे'सारख्या ओळीमधले अवकाशाचे भान यामधून ही दृश्यात्मकता जाणवते. बालकवींच्या कवितेत ती आहे. पण या दृश्यात्मकतेचे नाते तत्कालीन समांतर चित्रशैलींशी जोडता येईलच असे नाही. बालकवींच्या बाबतीत रोमँटिक संप्रदायातल्या चित्रकारांशी काही नाते जोडता येते किंवा इम्प्रेशनिस्ट चित्रशैलीशी, पण ते काही प्रमाणातच. पु. शि. रेगे, सदानंद रेगे, दिलीप चित्रे यांच्या कवितेतही दृश्यात्मकता किंवा दृश्यकलेचे संदर्भ येतात. बऱ्याच वेळा व्हॅन गॉगचे सूर्यफूल, ब्रांकुशीचा पक्षी अशा प्रतिमांच्या स्वरूपात ही दृश्यात्मकता येते. पण या दृश्यात्मकतेच्या पलीकडे जाणारी चित्रकाराची एक संवेदनशीलता असते. ती शांताराम पवार किंवा अरुण कोलटकर यांच्या कवितांमधून दिसते.

चित्रकार-कवी म्हणायचे असेल तर अशी दृश्यकलेच्या अंगाने जाणारी दार्शनिकता असणाऱ्या कवींना ते विशेषण लावले पाहिजे. शांताराम पवार या अर्थाने चित्रकार-कवी आहेत. कारण पवारांच्या कविता दृश्यकलेतील संवेदनशीलतेच्या अंगाने अधिक उलगडतात. त्यांचा आस्वाद घेताना आपण त्याला दृश्यकलेचे निकष अथवा संकल्पना लावू शकतो. अवकाश आणि त्याचे विभाजन हा त्याचा एक निकष. पॉझिटिव्ह-निगेटिव्ह स्पेसचा दुसरा निकष. कवितेतील सचेतन समतोल हा तिसरा निकष आणि पौर्वात्य-पाश्चिमात्य दृश्यकलेतील समांतर प्रवाहांच्या कवितेत आढळणाऱ्या खुणा हा चौथा निकष. नुसत्या पारिभाषिक शब्दप्रतिमांच्या माध्यमापेक्षा संवेदनशीलतेतून व्यक्त होणाऱ्या पवारांच्या जीवनजाणिवेवर भारतीय कलापरंपरेचे आणि आधुनिक पाश्चात्य कलाप्रवाहांचे संस्कार झालेले आहेत आणि तेच नकळतपणे त्यांच्या कवितांमधून येतात.

शांताराम पवार यांच्या सर्वच कवितांचे अशा पद्धतीने विश्लेषण करता येणार नाही. शब्दप्रधान प्रतिमा असलेल्या अनेक चांगल्या कविता त्यांनी लिहिलेल्या आहेत. तसेच, या कवितांचा आस्वाद दृश्यकलेचा संदर्भ लक्षात न घेतादेखील घेता येईल. पण त्या अधिक कळायला हव्या असतील, त्यांचे मर्म उलगडायला हवे असेल तर मात्र हा मार्ग अधिक खात्रीचा आहे.

---

**- दीपक घारे**
४, शिवांजली,
पाथर्ली रोड, गोग्रास वाडी,
डोंबिवली (पूर्व) - ४२१ २०१

*दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!*

# सुभाष प्रभाकर माणगांवकर

सदस्य अभिकर्ताओं के लिये क्षेत्रीय प्रबंधक क्लब

भारतीय जीवन बीमा निगम

कार्यालय : शाखा ८९७, लक्ष्मी कमर्शियल सेन्टर,
सेनापती बापट मार्ग, दादर (प.), मुंबई ४०० ०२८
निवास : १०, धनंजय बिल्डिंग, दुसरा मजला, टी.पी.एस. ६,
पहिला रस्ता, सांताक्रूझ (प.), मुंबई – ४०० ०५४
दूरध्वनी : (कार्यालय) २४३६ १०५८ – ०१२३ – २४२२ १९४१
(निवास) ०२२–२६१९१७७७ / भ्रमणध्वनी : ९८३३ २६० ४७७
ई–मेल : subhash@mafatlals.com

# यमाजीची गोष्ट!

संजय बोरुडे

यमाजी भालेकर गेला महिनाभर कमालीचा 'कावला' होता. बरं, दुसऱ्यातिसऱ्या कोणावर नव्हे तर स्वतःवरच 'कावला' होता! नुसता 'कावला' नव्हता तर भयंकर, भयंकर 'कावला' होता...!

लोकांवर 'कावणं' सोपं असतं हो...ऊठसूट त्यांच्यावर तोंड टाकलं की त्या 'कावण्याचा' निचराही होतो; पण स्वतःवरच कावायचं म्हणजे अतिच झालं! मग कोणावर तोंड टाकणार? हे असलं दुःख कोणाबरोबर 'शेअर' करणार? बरं, थोडंथोडकं नाही तर महिनाभर 'कावायचं' म्हणजे काय सोपी गोष्ट आहे?

कावण्याचं कारणही अर्थात तसंच जालिम होतं! तो जगण्याला 'सॉलिड' म्हणजे अगदी 'लिक्विड' व्हायच्या गतीत वैतागला होता! तुम्ही-आम्ही काय जगण्याला वैतागत नाही? पण आपलं वैतागणं म्हणजे तात्पुरतं वैतागणं, पण यमाजी अगदी 'सेंट-परसेंट' वैतागला होता... बरं, जिंदगी म्हणजे काय ताट-वाटी आहे बदलून आणायला?

आता वैतागायचं कारण 'महाजालिम' होतं. जगण्याला कंटाळून जीव देण्याचे सर्व प्रकार त्यानं अंमलात आणण्याचा (अगदी भ्रष्ट अधिकाऱ्याच्या प्रामाणिकपणाच्या थाटात) प्रयत्न केला होता. पण त्याला यश आलं नव्हतं. या महागाईच्या दिवसांत 'मरणं' एवढं 'महाग' असेल; याची त्याला कल्पना नव्हती. जगण्यानं त्याची कोणतीच अपेक्षा पूर्ण केली नव्हती. निदान मरणानं तरी दगा देऊ नये एवढीच त्याची माफक अपेक्षा होती! मरणाकडून त्याच्या फार काही अपेक्षा होत्या; असंही नाही. मरण साधं, सुलभ, बिनवेदनेचं त्याला नको होतं, पण निदान 'झटपट मृत्यू' त्याला हवा होता. 'झटपट लॉटरी'सारखा!

महिन्यातला एकही दिवस असा गेला नाही की त्यानं मरण्याचा प्रयत्न केला नसेल! तरीही तो मेला नव्हता! मरण त्याला आपलं सारखं हुलकावणी देत होतं. आता कसं आणि का? याचाच तर विचार करत त्यानं स्वतःला चार भिंतींच्या आत कोंडून घेतलं होतं. बरं, मरण येईना म्हणून त्याला अगदी नाइलाजानं जगावं लागत होतं. जगण्यासाठी पुन्हा जेवावं लागत होतं! जेवणासाठी काम करावं लागत होतं...काम केलं की पैसे मिळत होते! आणि नेमकी हीच त्याची डोकेदुखी होती. कारण त्याचं कामच असं होतं की; तासभर केलं तरी नको एवढे पैसे मिळत होते! एवढ्या पैशांचं करायचं काय हा त्याच्यापुढचा प्रश्न होता. या पैशांनी त्याला जगणं नको-नको केलं होतं. नाकातोंडात पाणी जावं तसा पैसा त्याला गुदमरवून टाकत होता...!

आणि म्हणूनच त्यापेक्षा 'मेलेलं बरं' हा ठाम विचार त्यानं ठरवला होता. वाट्टेल ते झालं तरी तो मरणार होता. किंबहुना, आता एकदाचं मरायचं या विचारानं तो जगत होता. आणि म्हणूनच तो 'कावला' होता! पण नुसतं 'कावून' उपयोग नव्हता. कृती महत्त्वाची होती... पण आपल्या हाताला यश कुठंय? आपल्या हातांनी मरण कुठं येतंय?...मग दुसऱ्याच्या हातांनी? आणि इथेच तो दचकला...! दुसऱ्याच्या हातांनी मरण?...म्हणजे खून? की आत्महत्या? छे! छे! आत्महत्या स्वतःनं करायची असते. आपला खून दुसऱ्याच्या हातानं करवून आणायचा...वा! काय भन्नाट, थरारक आयडिया आहे! इतके दिवस का नाही सुचली? पण ठीक आहे...उशीरा तर उशीरा...पण

आता तो नक्की, डेफिनेटली, शुअरली, पॉवरफुली, प्रॉपरली, सक्सेसफुली, ग्रेसफुली आणि सर्टनली मरणार होता!

उपाय सापडल्यानं यमाजी अगदी निश्चिंत, हर्षभरीत झाला! उत्साहानं, नव्या दमानं तो फुरफुरू लागला. त्याची 'कावणं' नावाची प्रक्रिया अगदी शत-प्रतिशत थांबली. त्याच नादात तो 'फ्रेश' झाला. हजारांच्या नोटांनी भरलेली ब्रीफकेस उचलून अर्नाळकरांच्या रहस्यकथेतील नायकाच्या थाटात बाहेर पडला!

आपल्याला जीवे मारील असा माणूस शोधणं एवढाच एक मुद्दा राहिला होता. पण तो आणायचा कुठून? तो काय झाडाला येतो? मग काय करावं? 'आपण तर शोध घेऊच पण मग जाहिरातही देऊन टाकू' असा सनदशीर विचार करून तो एका प्रसिद्ध टाइम्सच्या ऑफिसमध्ये शिरला.

काउंटरवरच्या बालेनं त्याच्याकडे पाहत स्मित करून विचारलं, ''व्हॉट कॅनाय डू फॉर यू, सर?''

''उसका क्या है...'' यमाजी हिंदी-इंग्रजीची मराठी भेसळ करत म्हणाला, ''आय है ना आय...म्हणजे मी...'' त्या बालेला हसू आवरेना. तिच्या शेजारणीही टवकारून पाहू लागल्या.

''इसमे लाफिंग की क्या बात है?'' यमाजी चिडला.

''सॉरी सर..प्लीज कंटीन्यू...''

''आय म्हणजे मी वॉन्ट टू गिव्ह ॲड्...''

'' ओ.के. प्लीज. प्रोसिड टूवर्डस् ॲडव्हटाईज सेक्शन्... सेकंड फ्लोर...''

''तुम्ही साथमें आल्या असत्या तर बेस्ट झालं असतं..''

''ओके सर. आय विल शो यू...'' असं म्हणत एक प्रोफेशनल हास्य फेकत ती बाला पुढे झाली... तिच्या शेजारणी फिसफिस हसल्या. त्यांच्याकडे एक क्रोधायमान नजर टाकत तो त्या कमनीय बालेच्या मागून लिफ्टमध्ये शिरला. तिनं लिफ्टचं बटण आपल्या नेलपॉलिश केलेल्या नाजुक बोटानं दाबलं. आतला फॅन सुरू झाला; तिचे केस हलके हलके उडू लागले तसे यमाजीच्या डोक्यातले विचारही उडू लागले. लिफ्टमध्ये ती अगदी शेजारी उभी असल्यानं तिनं लावलेल्या परफ्युमचा मंद, आल्हादायक वास त्याला जाणवत होता. आयुष्यात पहिल्यांदाच आपण तरुण असल्याची जाणीव यमाजीला झाली. झालं, मरणावर एवढा विचार करण्यापेक्षा तरुणपणावर विचार केला असता तर हिच्यासारखी सावळी पण तरतरीत तरुणी गटवता आली असती. आता काय उपयोग? मरायची वेळ जवळ आलीये. अशा तंद्रीत असताना लिफ्ट थांबली तशी ती सावळी तरुणी बाहेर पडली अन् यमाजी भानावर आला. ब्रीफकेस सावरत तोही बाहेर पडला.

एका टेबलाच्या आड एक टकलू बसलेला होता तिथे ती त्याला घेऊन गेली. त्यानं खुर्चीवर बसण्याचा निर्देश केला. पण मरायला निघालेल्या माणसाला ''प्लीज बी सीटेड्...'' ती तरुणी म्हणाली.

''नो थँक्स...''

''आप बैठ जाईये ना...'' तो टकलू हसून म्हणाला.

''मेरे पास इतना वक्त नहीं है...'' यमाजी घाईगडबडीनं म्हणाला. तशी काऊंटरकडे जायला निघालेली बाला थबकली. बसायलासुद्धा वेळ नसणाऱ्या या किंचित, गावंढळ तरुणला कसली ॲड् द्यायची असेल याचा विचार करत ती पुन्हा मागे वळली.

''ठीक है...सांगा, कसली जाहिरात द्यायचीये?'' असं म्हणत टकलूनं रेटकार्ड पुढे केलं.

''नो नीड...'' रेटकार्ड बाजूला सरकवत ब्रीफकेस खाली टेकवून तो पुटपुटला, ''मरणाऱ्या माणसाला कसला आलाय रेट...''

''आपण काही म्हणालात?'' टकलू.

''अं...? काही नाही...जाहिरात तुमच्या पद्धतीनं द्या..''

''कलर की ब्लॅक ॲन्ड व्हाईट?''

''कशीही द्या...पण ती वाचून रिस्पॉन्स मिळाला पाहिजे, इतपत ती आकर्षक हवी..''

''त्याची काळजी नको सर...'' ती काऊंटरबाला पुढे होत म्हणाली,

''आमचा पेपर मुळात जाहिरातींसाठी तर प्रसिद्ध आहे...''

''मला वाटतं तुम्हाला वेगळं म्हणायचंय...'' टकलू तिला म्हणाला,

''...हं...येस्...'' तिच्या लक्षात चूक आली.

''...म्हणजे कटेन्ट तर पॉवरफुल असतंच...'' (याचा अर्थ हिला मराठी येतं तर...मघाशी उगीच...)

''...मला त्याच्याशी घेणं नाही...''

''बरं, मॅटर..?''

''त्याचं असं आहे...'' यमाजी पुढे झुकून म्हणाला, ''तुम्ही शब्दांची मांडणी कशी करायची ते बघा. पण मला मरायचं आहे...''

''व्हॉऽऽट?'' टकलू टण्कन् उडाला. 'ऐकलंत का

मिस राणी?''

''ओह...येस...!'' राणी नावाची ती काउंटरबाला चाट होत म्हणाली, ''तुमची काहीतरी चूक होतीय का?''

''...नाही...'' यमाजी ठामपणे म्हणाला, ''मला मरायचं आहे. परंतु माझ्याच्यानं माझा जीव घेणं मला जमलं नाही...''

''अच्छा, मग मी तुमचा जीव घ्यावा काय?'' तो टकलू दीनपणे म्हणाला, ''साहेब, मी तुमचाच काय पण मुंगीचा देखील जीव घेऊ शकत नाही हो...'' मला माझ्या भांडखोर बायकोचा कित्येक वेळा जीव घ्यावासा वाटतो हो...पण मला ते फक्त कल्पनेतच शक्य झालं..'' त्यानं रुमाल काढला.

''इटस् ओके...'' यमाजीला काय करावं ते कळेना.

''मिस् राणी,'' टकलू उठत म्हणाला, ''प्लीज् एवढी ॲड् तुम्ही घ्या..मी जरा येतो...'' डोळे पुसत तो दुःखी जीव चालता झाला. त्याचं दुःख पाहून यमाजीचा जीव गलबलला.

काउंटरबाला राणी आता खुर्चीवर स्थानापन्न झाली.

''हं...तर तुम्हाला मरायचंय...?''

''येस्...''

''मग बसायला काय हरकत आहे?'' राणी मधाळ हसत म्हणाली,

''मरणाऱ्या माणसाला एवढा का मान?''

अरेच्चा! ही म्हणते; त्यात तथ्य आहे खरं! तो बसला.

''तर ॲड् कशी द्यायचीये? तुम्हाला काय अपेक्षित आहे?''

''...मला माझ्याच्यानं मरवत नाही. तेव्हा माझा जीव घेऊ शकेल असा माणूस मला हवा आहे. काय मजकूर घालायचा तो तुम्हीच ठरवा...''

''बरं, ठीक आहे...'' राणी क्षणभर विचार करत म्हणाली; ''पण ॲडखाली तुमचा पत्ता, फोन नंबर, मोबाईल...?''

यमाजीनं कार्ड पुढे केलं. तिनं त्यावरून नजर फिरवली.

''...मिस्टर भालेकर...'' ती विचारात पडत म्हणाली, ''तुमचा पत्ता दिल्यानं तुमच्यामागे कायद्याचा ससेमिरा लागेल...''

''मग? हे तर माझ्या लक्षात आलचं नव्हतं...''

''त्यापेक्षा मी माझा पत्ता देते...''

''तुमचा पत्ता?''

''मिस् राणी शिंदे, सी-१३, प्रेसिडेन्सी कॉलनी...''

''ठीक आहे...की?''

''पाच हजार रुपये...''

यमाजीनं पैसे पेड् केले आणि तो उठत म्हणाला, ''दरम्यान मी माझ्या परीनं असा माणूस शोधणारच आहे. त्यामुळे मला कदाचित यशही येऊ शकतं आणि जर मी मेलोच तर आपली ही शेवटचीच भेट...ओके?''

''मी रोज तुम्हाला फोन करेन ना?''

''ओके. बेस्ट लक् फॉर मी. ॲन्ड माय डेथ...''

किंचित चमत्कारिक पण रुबाबदार तरुणाच्या या मॅडचॅप विचारांबद्दल राणी विचार करत राहिली.

यमाजीच्या डोक्यातून राणी जाईना तशी त्यानं जोरात मान झटकली. आपल्याला मारील असा माणूस कोठे शोधावा? विचार करता-करता तो मल्हार चौकात आला. आणि त्याला तसं नाव सापडलं. मन्नूदादा...!

मल्हार चौक आणि परिसरात भाईगिरी करणारा मन्नूदादा अतिशय डेंजर आदमी होता. अंडरवर्ल्डशी त्याचे संबंध असल्याची बोलवा होती. कायम मारामाऱ्या, डोके फोडाफोडी असल्या बाबींशी त्याचा संबंध होता. चार-दोन खूनही पचवल्याची कुणकुण यमाजीच्या कानी आली होती. चौकातच त्याची जंगूभाई तालीम होती. त्यात मन्नूदादाचे चेले झोंबी खेळायचे. कुठेही राडा करायच्या तयारीत असायचे. खूष होऊन यमाजी तालमीत शिरला. आत अनेक जण व्यायाम करत होते. कोण डंबेल्स उचलत होते तर कोण वेटलिफ्टिंग करत होते. कोणी कशाचा यंत्रावर बसून, झोपून कसले कसले बार पुढे मागे करत होते.

''बोल, क्या है भिडू?'' एकजण आपल्या मानेभोवती जाडजूड सोटा फिरवत होता. तो म्हणाला.

''आपुनको हेऽना मन्नू दादासे मिलने का है...''

'' तो थांबला; पुढे आला,

''कुछ राडा करने का है क्याऽ?''

यमाजीनं मान हलवली. त्याच्याकडे व त्याच्या ब्रीफकेसकडे पाहत तो मनुष्य यमाजीला घेऊन निघाला. झोपडपट्टीतून चालता चालता शेवटी एका सिमेंटच्या घरापाशी तो येऊन थांबला. यमाजीला बाहेरच उभा करून तो आत शिरला.

पुढच्याच क्षणी त्याला मन्नूदादासमोर हजर करण्यात आलं.

''बोल क्या है? माल लाया क्या?''

''हां दादा हां...'' यमाजी ब्रीफकेस दाखवत

म्हणाला.

''बोल क्या राडा करने का है? किसको मारने का?''

''मारने का नै, टपका देने का है...'' यमाजी फिल्मी हिंदी आठवत बोलला...

''किसको टपकाने का है? फोटू लाया?''

''फोटू की जरूरत नै...''

''तो कैसे टपकाने का?''

''मै हूं ना''

'' तू क्या वो शारुक के पिच्चर का नाम बोल रहा है क्या? मैं हूं ना...! मैने देखी है मौत अच्छी है क्या रे ढाईफूट्याऽ''

त्याच्या खांद्याची मालिश करणारा ढाईफूट्या हसला.

''मै पिच्चर की बात नै कर रहेला...''

''मेरेकू मालूम है...टपकाने की बात...'' बोल, किसको टपकाने का? तेरेकू?''

''आपको कैसे पता?''

''क्या?''

''मेरेकू टपकाने का है करके...''

''पागल हो गया है तू?'' मन्नूदादा उडाला.

''नै. मै सच्ची बोल रहा हूं...'' यमाजी शब्द जुळवत म्हणाला, ''मैने..मेरेकू टपकानेकी भौतच कोशिश की लेकिन मराच नै.''

''याने खुदकुशी?''

''हां...सो मैने सोचा मेरेकू टपकाना होंगा तो किसी दूसरे के हाथ से टपकाना होंगा...''

''सो, तू मेरे पास आया?'' मन्नूदादा हसत म्हणाला, ''मन्नूदादा को क्या बच्चा समझ रहा है तू? इस तरह का मजाक मेरेकू बिल्कुल पसंद नै...''

''नै..मै मजाक नै कर रहा हूं. सच बक रहा हूं...''

'' मन्नूदादा उठला..त्याने यमाजीच्या तोंडाचा वास घेतला, ''कुच नशापानी करके आया तू? चल, भाग ह्यांसे...''

''ये देखो...'' यमाजी ब्रीफकेस उघडत म्हणाला, मन्नूदादाने पाहिले. खरोखरच हजारच्या नोटांची बंडलं...! तो डोळे विस्फारून पाहत राहिला.!!

''मेरेकू सच्ची में मरने का है यार...कोई मुझपे यकीन क्यूं नै करता?''

''पर तेरेकू क्यूं मरने का?''

''या पैशांनी माझी जिंदगी हराम केली. थोडं जरी कामं केल तरी नको तेवढा पैसा..करू तरी काय या पैशाचं मी? देणग्या दिल्या, वर्गण्या दिल्या, खंडण्या दिल्या तरी संपतच नाही, साला...''

''सो मरने का है तेरेकू?'' मन्नूदादा विचारात पडला. मग ढाईफूट्याशी आणि इतर चेल्यांशी काहीतरी बोलला.

''जाओ, बाबूजी, जाओ, भला कोई खुद को मारनेकी सुपारी क्यूं देगा? हमारा बी उसूल है.. सुपारी लेने का कुछ तरीका है. उठाओ अपनी बॅग और भागो ह्यांसे...अरे मकडी, साब को घर पहुंचा दो...''

पुढच्याच क्षणी यमाजीला घेऊन मकडी बाहेर पडला. ढाईफूट्या मन्नूदादाला म्हणाला,

''दादा, इतना पैसा था फिर भी सुपारी नै लिया?''

''जरा...सोच. दिमागसे काम ले. कोई खुद को मारने की सुपारी क्यूं देगा? कुछ समझा?''

''नै...''

''अरे, येड्या, ये पुलिस का आदमी है. अभी ह्यांसे अड्डा उठाना पडेगा...''

आता काय करावं? सालं, इमानदारीत सांगितलं मरायचंय तर कोण भरोसा ठेवायला तयार नाही, यार? एवढा पैसा पाहूनसुद्धा कोणी मारीना म्हणजे काय? यमाजीचा दुनियेवरचा विश्वासच उडाला. हे जग जगायला तर लायक नाहीच पण मरायलासुद्धा लायक नाही याची त्याला खात्री पटली.

एवढा मन्नूदादासारखा नामचीन गुंड...तोपण सुपारी घेईना म्हटल्यावर काय न्याय राहिला का? घ्या! दुर्दैव म्हणतात ते हेच. साधं मरायचंय यार...पण ते जमेना. इतक्यात मोबाईल वाजला,

''हॅलो, मी राणी बोलतेय...''

''हॅलो, हं, बोला दिली जाहिरात?''

''हं, लावलीये...तुमचं काही जमलं का?''

''नाही ना..एका नामचीन गुंडाला सुपारी दिली तर त्यानं सुद्धा घेतली नाही...तुम्ही घेता का?''

''काय?''

''सुपारी...''

''इश्श्य...मला नाही आवडत. सुपारी काय घ्यायची गोष्ट आहे...?''

''मग?''

''ती फोडायची गोष्ट आहे.. माझी अजून फुटली नाही...''

''काय?''

''सुपारी म्हणते मी...''

''अच्छा...मग निदान पानसुपारी तरी?''





''किती किती विनोदी आहात हो तुम्ही...!''

''काय करणार? मरायचं म्हटल्यावर हे सुचणारच...हं...समोर काय दिसतंय?''

''कुठं काय? नेहमीचं ऑफिस...''

''तुमचं नाही म्हणत मी...माझ्यासमोर...''

''आता ते मला कसं दिसणार? कोणी सुंदर तरुणी आहे का?''

''छे! हो...एका पुलाचं काम चाललंय... आयडिया! मी तुम्हाला नंतर फोन करतो...''

समोर एका पुलाचं काम चालू होतं. क्रशर घरघरत

होतं...डायव्हर्शन केलेलं. मजूर हलत होते; घमेलं उचलत होते. पुलाखाली पाईप टाकलेले होते. जे मशीन जमीन उकरत होतं. त्याला डोक्यावर फायबर कॅप असलेला इंजिनीयर डायरेक्शन्स देत होता.

यमाजी पुढे झाला, त्यानं इंजिनीयरला नमस्कार केला. इंजिनीयरनंही प्रतिनमस्कार केला. या अनोळखी प्राण्याचं आपल्याकडे काय काम असावं बरं? असा विचार करून तो किंचित नवलानं पाहू लागला.

''माफ करा...'' यमाजी खाकरला, ''तुम्हाला जरा वेळ असेल तर मला थोडंसं बोलायंच होतं...''

''आहे. शुअर...'' इंजिनीयर कपाळावरचा घाम पुसत म्हणाला. मग त्यानं कॅप हातात घेतली आणि जवळच्या शेडमध्ये ते घुसले.

''हं...बोला,'' टेबलावर कॅप ठेवून तो म्हणाला, ''काय सेवा करू मी आपली?''

''पुलाचं काम अगदी व्यवस्थित चाललंय ना?...नाही...म्हणजे...'' यमाजीनं सुरुवात केली

'' अं...?'' इंजिनीयर गोंधळला आणि जरा चाचरला, '' तसं व्यवस्थितच चाललंय म्हणा...''

''मी असं ऐकलंय की काही पूल नीट उभे राहत नाहीत. सारखे पुन्हा पुन्हा पडतात...''

इंजिनीयरच्या चेहऱ्यावरचे भाव सरासरा बदलत गेले. कपाळावरचा घाम निपटीत पाण्याचा ग्लास तोंडाला लावला आणि तो उठून दारात आला.

''एऽ भाऊसाहेब... साहेबांना जरा ठंडा सांग रे...'' आणि पुन्हा आत येऊन बसला...पेपरवेटशी चाळा करत.

''मी समजलो नाही, सर...''

अचानक हा आपल्याला रिस्पेक्ट का देतोय ते, यमाजीला समजेना. मान झटकत तो त्याच्याच नादात म्हणाला, ''जर पूल असा सारखा पडत असेल तर त्याला बळी द्यावा लागतो म्हणतात...!''

इंजिनीयरचा चेहरा पांढराफटक पडला. तो उठला आणि लटपटत त्यानं यमाजीचे पाय धरले. यमाजी अवाक्!

''...सर, पण तुम्हाला कसं कळलं?'' इंजिनीयर.

''कसलं?''

''चुकलं, साहेब...'' फाडकन स्वतःच्या तोंडात मारून घेत तो म्हणाला, ''पण माझ्या लेकराबाळांची शपथ घेऊन सांगतो, तो एकनाथ हे सांगत होता...माझं असं काहीच म्हणणं नाही...''

इंजिनीयरची ही बडबड त्याच्या डोक्यावरून जात होती. तो आपल्याच नादात पुन्हा म्हणाला,

''हं...तर सांगत काय होतो?...बळी...''

''साहेब, गळ्याशपथ माझा काहीच तसा विचार नाही, एकनाथचंच चाललंय की 'पूल चौथ्यांदा पडलाय तर बळी दिला पाहिजे म्हणून...मी नकोच म्हणालोय, सर...'' तो गयावया करू लागला.

''तुमचा काहीतरी गैरसमज होतोय मिस्टर...'' यमजी म्हणाला, '' मला इतकंच म्हणाचंय की जर तुम्हाला बळी हवा असेल तर मी आहे. मला घाला त्या पुलात...''

''काय थट्टा करताय साहेब...! एकनाथ म्हणत होता. झोपडपट्टीतून एखादं पोरगं...'' इंजिनीयर ढसाढसा रडू लागला, ''साहेब, माझी पोरबाळं उपाशी मरतील होऽ प्लीज काहीतरी करून मिटवून घ्या, सर.'' मग तो घाईघाईनं उठला. ड्रॉवरमधून कोरा चेक काढून त्यावर सही केली आणि बळेच यमाजीच्या खिशात कोंबून त्यानं पुन्हा यमाजीचे पाय धरले तसं यमाजीचं डोकं भणकलं. 'या मूर्ख माणसाच्या नादी लागण्यात काही अर्थ नाही' असा विचार करून तो ब्रीफकेस उचलून तडक बाहेर पडला.

त्याला इंजिनीयरच्या वागण्याची कोणतीच संगती लागेना. साले! काय लोक पैदा झालेत या पृथ्वीवर...! सरळ सांगितलेलं कुणालाच कसं समजत नाही? प्रत्येक गोष्टीतून वाकडाच अर्थ कसा काढतात ही मंडळी? मघाशी तो मन्नूदादा आणि आता हा बावळट इंजिनीयर...! पाय काय धरतो, चेक काय कोंबतो! साला! काय चाललंय काय या देशात? धड प्रामाणिकपणे मरूही देत नाहीत आणि मारतही नाहीत ही मंडळी!...भंपक साला!

शिव्या हासडत, ब्रीफकेस सांभाळत तो पुन्हा रस्त्याला लागला. तेवढ्यात मोबाईल वाजला...मिस् कॉल...राणीचा! तशी त्याला आठवण झाली...त्यानं नंबर डायर केला...

''हॅलोऽ तुम्ही मला फोन करणार होतात नं?''

''हं...करणार होतो...पण काय!'' यमाजी निराश स्वरात म्हणाला, ''...हा भंपक इंजिनीयर...''

'' इंजिनीयर? त्याचा काय संबंध? त्याला विचारून फोन करणार होता?''

''नाही होऽ''

''मग त्याला फोन करायला सांगणार होता काय?''

''अहो, नाही होऽ'' यमाजी घायकुतीला येत म्हणला,

''त्या पुलाचं काम चालू आहे त्यात मला बळी द्या म्हणालो, तर तो माझेच पाय पकडत राहिला, इडियट!''

''काय म्हणालात?''

''तुम्हाला नाही...'' यमाजी सावरत म्हणाला, ''मला काय म्हणायचंय...''

राणी तिकडून घाईनं म्हणाली, ''पाय पकडीना का त्यानं... पण मग तुम्हाला दिलं का बळी त्यांनी त्या पुलात?''

''व्हॉऽट्...'' यमाजी दचकला,''मग तुमच्याशी कोण बोलतंय?''

''नाही म्हणजे...मला तसं नव्हतं म्हणायचं, पण म्हटलं खरंच बळी-बिळी दिला की काय?''

''माझी खूप इच्छा होती होऽ पण काय कुणी मनावर घेईना...''

''मी घेऊ का?''

''अच्छा! तुम्ही घेताय! कुठं पूल चाललाय तुमचा?'' यमाजी आनंदानं ओरडला.

''पूल कशाला हवा त्याला? तुम्ही एक काम करा...''

''एक का हजार सांगा...मला काय? मरण्याशी मतलब!''

''तुम्ही संध्याकाळी मला भेटाल? कॅफे फरहतमध्ये?''

''किती वाजता?''

''सहा-साडेसहाला...''

''पण तुम्ही नक्की घेताय ना मनावर?''

''हं...मी घेते- पण तुम्ही घ्यायला हवं ना?''

''अहो, मी तर किती आतुर झालोय मरायला...''

''मरायला? व्हॉट डू यू मीन? मरायचा काय संबंध?''

''तुम्ही बळी देताय ना मला?''

''हे काय अभद्र बोलताय?''

''अरे, आताच तर तुम्ही म्हणालात, मी मनावर घेते म्हणून?''

''अच्छा,'' राणी हसत म्हणाली, ''त्याबद्दल होय? ते मी वेगळ्या संदर्भात म्हणाले...''

''कसल्या वेगळ्या?''

''संध्याकाळी भेटल्यावर सांगते, ओ.के.?''

च्यायला! काय मॅडचॅप बाया असतात. घडीत एक बोलतील अन् घडीत दुसरं...चांगलं मनासारखं मरायला मिळेल अशी आशा लागली, तर ही बया दुसरंच बोलायंच म्हणतेय...पण आवाज मात्र गोड आहे पोरीचा...! असेना का? असं पाघळायचं नाही. मरायला निघालेल्या माणसानं आवाजाचा विचार करू नये...चला, पुढे! असा विचार करत ऊन डोक्यावर घेऊन यमाजी पुढे सरकला.

...पैशांनी या जगात सगळं काही मिळतं म्हणे... मग साधं मरण मिळू नये? छट्! काय जग आहे...! एक तर ही ब्रीफकेस केवढी जड! पैसे पाहूनसुद्धा लोक पाघळत नाहीत म्हणजे काय? हे सत्ययुग तर नाही ना? कालपर्यंत लोक पैशासाठी वाटेल ते करायला तयार होते अन् आज हा काय दिवस उगवला?

''...हॅण्डस् अप्...'' अचानक शब्द ऐकू आले. यमाजी दचकला. रिव्हॉल्व्हर रोखून एक इन्स्पेक्टर उभा मागे दोन कॉन्स्टेबल्स...शेजारी पोलीस व्हॅन...

यमाजीनं ब्रीफकेस खाली ठेवली आणि हात वर केले. ऐन रस्त्यात ही काय पीडा झाली बुवा?

इन्स्पेक्टर रिव्हॉल्व्हर रोखून पुढे सरकले. कॉन्स्टेबलनं बॅग ताब्यात घेतली. यमाजी क्षणभर विचार करत रिव्हॉल्व्हरच्या नळीकडे पाहत राहिला आणि त्याचे डोळे लकाकले, मरण्याचा हा अभिनव, गोल्डन चान्स यमाजी गमावणार नव्हता...

''फाऽयऽर..'' यमाजी खच्चून ओरडला.. तशी बघ्यांची गर्दी जमा झाली. इन्स्पेक्टर आता ट्रिगर ओढणार म्हणून आनंदानं यमाजीनं डोळे झाकले! पण काहीच झालं नाही! म्हणून पुन्हा डोळे उघडले तर इन्स्पेक्टर गोंधळलेला...कॉन्स्टेबल्स गर्दी पांगवायला लागले.

''कमॉऽन!...शूऽऽट् मी...फाऽयर...'' यमाजी पुन्हा ओरडला. तसा इन्स्पेक्टर टण्कन् उडाला आणि एक आश्चर्य घडलं, त्यानं रिव्हॉल्व्हर यमाजीच्या पायाशी फेकलं!

''सॉरी सर...'' कान पकडून तो म्हणाला, ''माफ करा सर, गलती झाली.''

''कसली गलती मूर्खाऽ'' यमाजी संतापाने ओरडला, ''फायर मीऽऽ''

इन्स्पेक्टर खाली मान घालून उभा. कॉन्स्टेबल्सनी खाड् खाड् सॅल्यूट ठोकले. यमाजीचं माथं सरकलं... एक तर दिवसभर मरण्यासाठी एवढा प्रयत्न केला, त्याला यश आलं नाही. आाता चान्स आला तर हा मूर्ख इन्स्पेक्टर हातातोंडाशी आलेला घास काढून घेऊ पाहत होता. झालं! यमाजीनं सारा राग त्या इन्स्पेक्टरवर काढला. फाडकन त्याच्या कानाखाली जाळ काढत तो गरजला,

''कुणी भरती केलं तुला? रायरन् व्हायच्या तरी लायकीचा आहेस का तू? माझी बॅग पाहिजे ना तुला? घेऊन टाक. पण मला गोळी घाल...'' मग खाली वाकून, रिव्हॉल्व्हर त्याच्या हातात कोंबत तो त्याच्याशी झोंबत राहिला. इन्स्टेक्टर ढिम्म...तो हात जोडून, मान खाली

''गेली ९२ वर्षे सतत ग्राहकांची सेवा करीत पूर्णपणे संगणकीकृत दहा शाखांसह आधुनिक प्रगतीची वाटचाल''

।। असमर्थास समर्थ करणे ।।

# दि डेक्कन मर्चन्टस् को–ऑप. बँक लि. मुंबई

मुख्य कार्यालय : २१७, राजा राममोहन रॉय रोड, गिरगाव, मुंबई ४०० ००४.
दू. क्र. २३८५४९४५, २३८६८१३४, २३८५४९९४ / फॅक्स क्र. – २३८९ ६८ ५३
मध्यवर्ती कार्यालय : १३–१४, गणानाथ को–ऑपरेटिव्ह हौ. सोसा. लि., दादर (पश्चिम) स्टेशन समोर, मुंबई – २८.
दू. क्र. २४२२५७१८, २४२२३११६ / फॅक्स क्र. २४३१ ५०५०

**<u>शाखा</u>**

१) गिरगाव शाखा २) दादर शाखा ३) भायखळा शाखा ४) घाटकोपर (प.) शाखा ५) गोरेगाव शाखा
६) बोरीवली शाखा ७) दहिसर शाखा ८) घाटकोपर (पू.) शाखा ९) वाशी शाखा १०) ठाणे शाखा

*नियोजित शाखा – खारघर, नवी मुंबई.*

**मुदत ठेवीवर दिनांक १ ऑगस्ट, २००९ पासून खालीलप्रमाणे व्याजदर लागू**

| मुदत | व्याजदर | मुदत | व्याजदर |
|---|---|---|---|
| १५ दिवस ते ९० दिवस | ४.००% | १ वर्ष ते २ वर्षापेक्षा कमी | ८.५०% |
| ९१ दिवस ते १८० दिवस | ६.००% | २ वर्ष ते ३ वर्षापेक्षा कमी | ९.००% |
| १८१ दिवस ते १ वर्षापेक्षा कमी | ७.००% | ३ वर्ष ते ५ वर्ष व अधिक | ८.७५% |

०.५०% अधिक व्याजदर ज्येष्ठ नागरिक (१ वर्ष व त्यावरील कालावधी), रजिस्टर्ड हौसिंग सोसायटी
व धर्मादाय संस्था यांचेकरिता

वसुल भाग भांडवल ५.७३ कोटी ठेवी २२६.९० कोटी कर्ज १२३.२८ कोटी

**श्री. विनोदकुमार तख्तमल कच्छारा**
उपाध्यक्ष

**श्री. काशिनाथ दिनकर मोरे**
अध्यक्ष

**संचालक मंडळ**

श्री. शांतीलाल ताराचंद जैन
श्री. रघुनाथ कृष्णाजी मसुरकर
श्री. चंद्रकांत शिवराम शेवाळे
श्री. गजानन शंकर पानवलकर
डॉ. गुरुनाथ वासुदेव पंडीत
श्री. रविंद्रनाथ रामचंद्र पोटफोडे
(स्वीकृत तज्ञ संचालक)

श्री. रमेश देवू मेढेकर
श्री. महेश माणिक भालिंगे
सौ. सुरेखा काशिनाथ राऊत
सौ. निलिमा मनोहर राजोपाध्ये
श्री. रामदास गोविंदराव हुले
श्री. दिलीप साहेबराव नागवडे
(कर्मचारी प्रतिनिधी)

श्री. चंद्रकांत मायाप्पा मासाळ
श्री. विजय श्रीकृष्ण भोळे
श्री. ज्ञानेश्वर नारायण दाभोळे
श्री. दिपक कल्याणराव सावंत
श्री. अभिजीत बाबाजी नागवडे
श्री. महेश प्रभाकर घैसास
(कर्मचारी प्रतिनिधी)

**श्री. अरुण र. आंबेरकर**
उपसरव्यवस्थापक (लेखा)

**श्री. लालचंद रा. साखरकर**
सरव्यवस्थापक

ho@deccanbank.com website : www.deccanbank.com co@deccanbank.com

घालून उभा...

यमाजी पुन्हा ओरडला, ''अरे, गाढवा...हजारो एन्काऊंटर होतात ना? आता मी तुझ्यावर हल्ला केलाय, मारलंय तुला... आता तरी गोळी घाल मला आणि दाखव एन्काऊंटर झालेलं...''

इन्स्पेक्टर ढसाढसा रडूच लागला. ''सॉरी सर... प्लीज सर...डोन्ट सस्पेंड मी सर...पहलेसे ही मेरी एन्क्वायरी चल रही है; दोन वर्षांपूर्वीच्या एन्काऊन्टरची–प्लीज मला वाचवा...'' असं म्हणून यमाजीच्या पायाशी त्यानं लोळण घेतली!

बघ्यांची गर्दी मात्र यमाजीवर खूष होती. कुणीतरी जबरदस्त सिनियर ऑफिसर दिसतोय आणि भररस्त्यात इन्स्पेक्टरला वाजवतोय म्हटल्यावर पब्लिक चेकाळलं...

''हिप् हिप् हुर्रेऽ''

''गली गली में शोर है यहाँकी पुलिस चोर है...'' नारेबाजी वाढली. यमाजीचं डोकं आऊट! तो तडक व्हॅनमध्ये जाऊन बसला. कॉन्स्टेबल्स हलले. इन्स्पेक्टरनं ब्रीफकेस यमाजीजवळ ठेवली आणि व्हॅन स्टार्ट झाली.

''कुठे सोडू सर?''

यमाजीच्या डोक्याचा गोविंदा झाला होता! अक्कल बंद झाली होती!! इतक्यात मोबाईल वाजला. मिस् कॉल! राणीचा...!

''कुठे सोडू सर?'' ड्रायव्हरचा प्रश्न

''कॅपे फरहत...'' यमाजी हताश स्वरात म्हणाला.

''काय मिस्टर भालेकर, किती हा उशीर?'' राणी वैतागून म्हणाली, ''इथे अभयारण्यातल्या प्राण्यासारखी माझी अवस्था झाली. वेटर तीनदा येऊन गेला, मॅनेजर दोनदा. लोक पाहतात सारखे. मी वेड्यात निघाले...''

''सॉरी.'' यमाजी ओशाळं हसत म्हणाला,

''काय घेणार?'' राणी प्रसन्न आवाजात म्हणाली, ''ज्यूस? कॉफी? कोल्ड कॉफी की आइस्क्रीम?''

''मरणाऱ्या माणसाला काय?'' यमाजी रुक्ष आवाजात.

''ठीक आहे. बेयराऽ टू कोल्ड कॉफी.''

कॉफी सिब् होताच राणीनं यमाजीच्या हातावर हलकेच हात ठेवला,

''असं मनाला लावून घेऊ नका मिस्टर भालेकर...आज तुम्ही मरण्याचा, मारून घेण्याचा मनापासून प्रयत्न केलाय् हे तुमच्या चेहऱ्यावरून दिसतंय...'' यमाजीला त्या विलक्षण ओलाव्यानं गलबलून आलं. ''मला माहीत नाही; तुमचा नेमका प्रॉब्लेम काय आहे तो...पण आयुष्य असं अकाली खुडण्याचा कुणालाच अधिकार नाही. अगदी तुम्हालासुद्धा...जरा डोळे उघडून पाहा भोवताली. तुमच्यापेक्षा कित्येक पटींनी वाईट परिस्थितीतही लोक जगतात. तुम्हाला सुख बोचतंय, पैशांनी भरलेली ब्रीफकेस घेऊन मरण विकत घ्यायला निघालात तुम्ही! याचा अर्थ सुख बोचतंय...पण ज्याअर्थी सुख टोचतंय त्या अर्थी तुम्ही एक कोमल, संवेदनशील आणि अत्यंत प्रामाणिक व्यक्ती आहात आणि म्हणूनच..'' यमाजी आता भारावला होता. एका वेगळ्याच आदरानं तो राणीकडे पाहू लागला.

''म्हणूनच काय?''

''मी 'मनावर घेते' असं म्हणाले. तुमचं जर लग्न झालेलं नसेल आणि मी तुम्हाला योग्य वाटत असेल तर....'' असं म्हणून राणीनं ओंजळीत चेहरा लपवला...

''म...म...मला काय बोलावं ते समजत नाही.'' यमाजी सुखद आश्चर्यात गटांगळ्या खात म्हणाला, ''पण खरंच, मी अजूनपर्यंत लग्न या विषयाकडे गांभीर्यानं लक्षच दिलं नव्हतं....तुमच्यासारखी...''

''तुझ्यासारखी म्हणा,'' राणी लाजत म्हणाली, ''बुद्दू!''

''तुझ्यासारखी हुशार, गोड मुलगी आणि मी असा...''

''मला चालेल...''

''मग हरकत नाही...'' यमाजी तिचे हात हातात घेत म्हणाला...

''मी हा पर्याय एवढ्यासाठी सुचवला, एवीतेवी मरायला तयार झालाच आहात तर लग्न करून मेलेलं काय वाईट?''

''नाइस–'' यमाजी हसत म्हणाला. पर्समधून सकाळी दिलेले पाच हजार रुपये काढून त्याच्या हातात देत ती म्हणाली,

''मग कधी द्यायची जाहिरात मरणासंबंधी?''

''आता ती कॅन्सल...'' प्रथमच प्रसन्न हसत यमाजी म्हणाला, ''आता लग्नाचीच ॲड...'' दोघंही प्रसन्न हसत उठले; तेव्हा बाहेर चमचमतं चांदणं पडलं होतं.

---

**– संजय बोरुडे**

२०४, मुळा, शासकीय वसतिस्थाने

डी. एस. पी चौक, अहमदनगर ४१४००१

मो.न.९३७२५६०५१८

sanjay_borude@rediffmail.com




# महाराष्ट्राची उद्यमशीलता

आदिनाथ हरवंदे

भारत स्वतंत्र झाला तेव्हा मुंबई, कोलकाता आणि चेन्नई ह्या शहरांच्या कक्षेत उद्योग एकवटलेले होते. ह्या शहरांतील बंदरांमुळे तिथं उद्योगांचं जाळं निर्माण झालं. औद्योगिक आणि सामाजिक सुविधा तिथं रुजल्या होत्या. साहजिक, ह्या बंदर-शहरांकडे उद्योगांचा ओढा होता.

उद्योगांची ही प्रवृत्ती लक्षात आल्यानंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून समतोल औद्योगिक विकासाचं धोरण अंगिकारण्यात आलं. मात्र १९५० ते १९८५ पर्यंत अपेक्षित विकासदर एकदाही गाठता आला नाही. १९८० मध्ये सात टक्के विकासदराचं लक्ष्य ठरवण्यात आलं, पण १.४ टक्केच विकासदर गाठता आला. अशा निराशाजनक कामगिरीनंतर १९८५-८६ ह्या वर्षात विकासदरानं आठ टक्क्यांचं लक्ष्य ओलांडून ८.४ टक्क्यांपर्यंत भरारी घेतली. परंतु हा विकास दर फसवा ठरला. हा भ्रमाचा फुगा १९९१-९२ ह्या आर्थिक वर्षात फुटला. विकास दर २.५ टक्क्यापर्यंत घसरला.

महाराष्ट्र राज्याची स्थापना १मे,१९६० रोजी झाली. १९७० मध्ये महाराष्ट्राचं दरडोई उत्पन्न २०४ रुपये होतं. मूळच्या मुंबई राज्याची विभागणी करून महाराष्ट्र आणि गुजरात ही राज्यं उदयास आली. महाराष्ट्रात मुंबई असल्यामुळे दरडोई उत्पन्न इतकं जास्त दिसतं. संपूर्ण राष्ट्राचं दरडोई सरासरी उत्पन्न ८० रुपये होतं. गुजरात (१३१ रुपये), पश्चिम बंगाल (१२५ रुपये) आणि तामिळनाडू (१११ रुपये) ही राज्यं महाराष्ट्राच्या फार मागे होती. ८० च्या दशकात ह्या राज्यांचे उद्यमशीलतेचे प्रयत्न चालूच होते. कर्नाटक, हरियाणा आणि पंजाब ह्या राज्यांनी औद्योगिकीकरणाचं महत्त्व ओळखून ह्या कालावधीत दमदार पावलं उचलली. मात्र महाराष्ट्राचा औद्योगिकीकरणाचा वेग जास्त होता. त्यामुळे महाराष्ट्राचं दरडोई उत्पन्न २०४ रुपयांवरून ३४४ रुपयांपर्यंत वाढलं त्यावेळी दुसऱ्या क्रमांकावरील तामिळनाडूचं उत्पन्न १९६ रुपये होतं.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण

ह्यांनी अनेक क्षेत्रांत दूरदर्शीपणे नवीन पायंडे पाडले. त्यांपैकी उद्योग हे एक क्षेत्र. महाराष्ट्रात औद्योगिक संस्कृती रुजलेली होती. त्या पूर्वपुण्याईवर विसंबून न राहता औद्योगिक प्रगती महाराष्ट्रात सर्वदूर पसरावी, असं त्यांचं धोरण होतं. त्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची (एमआयडीसी) स्थापना हे पहिलं पाऊल. पायाभूत सोयींनी युक्त औद्योगिक क्षेत्रं विकसीत करणं हे एमआयडीसीचं प्रमुख उद्दिष्ट.

मुख्यमंत्री चव्हाणांना दोन वर्षांनी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनी दिल्लीत बोलावून संरक्षण मंत्रीपदाची जबाबदारी सोपवली. मात्र नवे मुख्यमंत्री वसंतराव नाईक, उद्योगमंत्री स.गो. बर्वे आणि अर्थमंत्री शेषराव वानखेडे ह्यांनी औद्योगिक धोरणात खंड पडू दिला नाही.

औद्योगिक क्षेत्र विकसित केल्यानंतर तिथं जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे उद्योगाची रीघ लागणार नाही, हे बर्वे ह्यांनी हेरलं. उद्योगांना आकर्षित करण्यासाठी व्यावसायिक पद्धतीनं कार्य करणाऱ्या महामंडळाची स्थापना करण्याची निकड त्यांच्या लक्षात आली. पोर्टो रिकोमध्ये औद्योगिक विकेंद्रीकरणाचा प्रयोग यशस्वी झाला होता. बर्वेंनी त्याचा अभ्यास करण्यासाठी व्ही. श्रीनिवासन ह्या आय.ए.एस. अधिकाऱ्याला पोर्टो रिकोला पाठवलं. ह्या अधिकाऱ्याची झोकून देऊन कार्य करण्याची पद्धत बर्वेंनी ओळखली होती. श्रीनिवासन ह्यांनी पोर्टो रिकोच्या प्रयोगाचा सूक्ष्मपणे अभ्यास केला. पोर्टो रिक्लेच्या यशस्वी प्रयोगाच्या माहितीपत्रकांच्या गठ्ठ्यांनी सर्व बॅगा भरल्या. त्यामुळे तिथून ते नेसत्या वस्त्रानिशी परतले.

श्रीनिवासन मुंबईत परतल्यानंतर महाराष्ट्र शासनानं 'महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ मर्यादित' (सिकॉम) ह्या कंपनीची स्थापना केली. कंपनी कायद्यानुसार स्थापना झाल्यामुळे सरकारी लाल फितीपासून सिकॉम कोसभर दूर होतं. सिकॉमचे पहिले व्यवस्थापकीय संचालक, अर्थतज्ज्ञ व्ही. श्रीनिवासन होते.

त्यांनी सिकॉमची पूर्ण रचना व्यावसायिक पातळीवर केली. पाया मजबूत केला. परवाना राजचा तो काळ होता. औद्योगिक परवाना मिळवण्यासाठी कोणत्या कोणत्या कंपन्यांनी अर्ज केलाय ह्याची बातमी मिळवण्यासाठी श्रीनिवासन ह्यांनी सिकॉमचं दिल्लीत एक कार्यालय स्थापन केलं.

बंगलोरच्या 'मायको' ह्या विदेशी कंपनीनं विस्तारीकरणासाठी परवाना मिळवण्यासाठी अर्ज केलाय, ही बातमी सिकॉमनं मिळवली. मायकोचे विदेशी अध्यक्ष आणि दोन संचालक वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी बंगलोरला आले होते. सभा संपल्यानंतर विस्तारीकरणावर सविस्तर चर्चा करून ते मुंबईमार्गे स्वदेशी जायला निघाले. मुंबई विमानतळावर ते एक-दीड तास थांबणार होते.

त्या अवधीत श्रीनिवासन ह्यांनी व्यवसाय विकास विभागाच्या दोन अधिकाऱ्यांसह मुंबई विमानतळावरील व्ही.आय.पी. कक्षात मायकोनं महाराष्ट्रात विस्तारीकरणाचा प्रकल्प स्थापावा असं सादरीकरण केलं. त्या एका तासाच्या बैठकीत श्रीनिवासन ह्यांनी मायकोच्या अध्यक्षांकडून विस्तारीकरणाच्या जागेविषयी पुनर्विचार करण्याचं आश्वासन मिळवलं.

काही महिन्यांतच ते भारतात आले. सिकॉमच्या अधिकाऱ्यांनी त्यांना नाशिकला नेऊन नवीन उदयास येणारं सातपूर औद्योगिक क्षेत्र दाखवलं. सिकॉमच्या कार्यालयात त्यांच्यासाठी महाराष्ट्र आणि नाशिकवरील दृक्-श्राव्य सादरीकरण केलं. महाराष्ट्र, नाशिक आणि सिकॉमबद्दलच्या रंगीत आणि ग्लॉसी पुस्तिका दिल्या. १९६० ते ७० च्या दशकात शासकीय महामंडळानं दृक्-श्राव्य सादरीकरण आणि आकर्षक पुस्तिका तयार करणं अविश्वसनीय होतं.

मायकोचे अध्यक्ष मुंबईहून बंगलोरला गेले. दोन दिवसानंतर त्यांचा दूरध्वनी आला.

'मायकोचा विस्तारीकरण प्रकल्प नाशिकमध्ये स्थापन होईल!'

तो प्रकल्प पूर्ण झाला. त्या एका प्रकल्पामुळे नाशिकमध्ये सुमारे दोन हजार रोजगार उपलब्ध झाले.

सिकॉमच्या स्थापनेच्या वेळी शेषराव वानखेडे सिकॉमचे अध्यक्ष होते. ती तात्पुरती व्यवस्था होती.

औद्योगिक क्षेत्रातील अध्यक्ष शोधायची शासनाची प्रक्रिया सुरू होती. माजी आयसीएस अधिकारी नित्यानंद वागळे ह्यांच्यावर ही जबाबदारी सोपवावी; अशा निर्णयाप्रत शासन आलं. त्यावेळी वागळे ग्रिव्हज कॉटनचे अध्यक्ष होते. त्यांच्यापुढे प्रस्ताव ठेवल्यानंतर त्यांनी पहिली अट घातली.

'सिकॉमच्या कामात शासनाचा हस्तक्षेप नसावा.'

महाराष्ट्र सरकारनं विनाशर्त ती अट मान्य केली.

सिकॉमनं खाजगीरीत्या रोखेविक्री करून भांडवलउभारणी करायचं ठरवल्यानंतर शासनानं आडकाठी घातली नाही.

सिकॉमचे पहिले तीन व्यवस्थापकीय संचालक व्ही. श्रीनिवासन, अभय देशपांडे आणि शरद केळकर सिकॉममधून थेट 'वर्ल्ड बँकेत' गेले. त्यांपैकी श्रीनिवासन आणि देशपांडे यांची नेमणूक अमेरिकेत तर केळकर ह्यांची नेमणूक मनिला येथे झाली होती. सिकॉममार्फत औद्योगिकीकरणाविषयी त्यांनी केलेल्या कामगिरीचा हा गौरव होता.

असे अधिकारी आणि असे राजकारणी आता सापडणं विरळा.

उद्योगाच्या विकेंद्रीकरणाचं धोरण अत्यंत पद्धतशीरपणे राबवलं जात होतं. महाराष्ट्राच्या अविकसित विभागांत उद्योगांची रीघ लागली. १९९१ मध्ये 'बिझनेस इंडिया' ह्या नियतकालिकानं भारतातील १०० अग्रेसर उद्योग निवडले. त्यांपैकी जवळजवळ सर्व उद्योग महाराष्ट्रात होते. पण अभिमानाची बाब अशी, की त्यांपैकी ४० उद्योग एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रात म्हणजे अविकसित विभागात होते. टेल्को, बजाज ऑटो, व्हिडिओकॉन, नोसिल, सिएट, रेमंड, ग्लॅक्सो, एसीसी ही त्यांपैकी काही नावं.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवण्यात सहकारी साखर कारखान्यांचं ऋण मान्य करावं लागेल. साखर उत्पादनात महाराष्ट्र अग्रेसर झाला. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, विठ्ठलराव विखे-पाटील, वसंतदादा पाटील ह्यांनी सहकार चळवळीला आणि कृषीक्षेत्राला दिशा दिली. ही चळवळ अनेक क्षेत्रांत फोफावली. कापूस पिंजणी व कापसाच्या गासड्या बांधणाऱ्या सहकारी संस्था, सहकारी सूत गिरण्या, सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्था, सहकारी दुग्ध संस्था आणि मत्स्य सहकारी संस्थेचं जाळं पसरलं.

निव्वळ शेतीवर सत्तर टक्क्यांहून अधिक समाज जगत असणं, अवलंबून असणं यामुळे देशाला हवी तशी आर्थिक स्थिरता येणार नाही. त्यासाठी शेतीपूरक जोडधंदे, अन्य लहान-मोठे उद्योग उभारणं गरजेचं असल्याचे द्रष्टे विचार अण्णासाहेब शिंदे यांनी मांडले.

> महाराष्ट्रातील प्रत्येक राज्यकर्त्याला आपल्या मतदारसंघात औद्योगिक क्षेत्र असावं असं वाटतं. उद्योगपोषक सोयींचा विचार तो करत नाही. त्यामुळे मिनी इंडस्ट्रियल एरियाची टूम निघाली. त्या योजनेमुळे एमआयडीसीचे कोट्यवधी रुपये वाया गेले. माहिती तंत्रज्ञान उद्योगांसाठी (आयटी) महाराष्ट्राइतका सुपीक प्रदेश नव्हता. मोठी शहरं, विद्यापीठं, शहरी सुविधा, जागतिक संबंध ह्या सर्व आघाड्यांवर महाराष्ट्र इतरांपेक्षा कितीतरी पुढे होता. पण महाराष्ट्रानं वेळीच पुढाकार न घेतल्यामुळे कर्नाटक आणि बंगळूरू ह्यांनी महाराष्ट्रावर कुरघोडी केली. ह्याबाबतीत महाराष्ट्र शासनाला आयटी उद्योगाचं महत्त्व कळलं नाही

भारतातील हरितक्रांतीच्या जनकांपैकी महत्त्वाचं योगदान असणाऱ्या अण्णासाहेबांनी उद्योगांबाबत नेमकं भानही ठेवलं होतं.

डॉ. कुरियन ह्यांनी गुजरातमध्ये 'अमूल' ही सहकारी दुग्धसंस्था स्थापली आणि गरिबांच्या कल्याणाचा मार्ग दाखवला. 'वारणा', 'गोकुळ', ह्या सहकारी संस्था, चितळेंसारख्या असंख्य खाजगी संस्था आणि 'महानंद' ही शासकीय संस्था ह्यांच्या सफलतेमुळे महाराष्ट्रात दुधाचा महापूर आला. आरेचं 'एनर्जी' हे दूध कोल्ड्रिंकप्रमाणे लोकप्रिय झालं होतं. सिकॉमचे पहिले व्यवस्थापकीय संचालक व्ही. श्रीनिवासन जागतिक बँकेतून परतल्यानंतर त्यांनी सचिवपदाच्या कारकिर्दीत ही करामत करून दाखवली. महानंदने ते धनुष्य पेललं असतं तर चार चांद लागले असते. दुधाच्या ह्या महापुरामुळे वरळी आणि गोरेगाव येथील शासकीय आरे डेअरी बंद होण्याच्या वाटेवर आहे. तेथील प्रचंड जमीन बिल्डर लॉबीला खुणावतेय.

महाराष्ट्रात सिकॉम आणि एमआयडीसी ह्या दोन महामंडळांनी औद्योगिकीकरणासाठी मोलाची कामगिरी बजावली. एमआयडीसीनं औद्योगिक क्षेत्रात सेवा-सुविधांची निर्मिती केली. त्यामध्ये अंतर्गत रस्ते, स्ट्रिट लाइट, सामायिक सुविधा केंद्र, अतिथिगृहं

इत्यादींचा समावेश असे. अशा सोयींनी सज्ज झालेल्या औद्योगिक क्षेत्रात उद्योग स्थापण्यास उद्योजकांना आकृष्ट करायची जबाबदारी सिकॉमनं पार पाडली. सिकॉम अर्थसाहाय्याशिवाय इतर अनेक उपयुक्त सेवाही पुरवत असे.

ह्या संयुक्त प्रयत्नांना लक्ष्यवेधक यश मिळालं. नाशिकमधील सातपूर, अंबड आणि थोडंसं दूर सिन्नर अशा तीन क्षेत्रांचा विकास झाला. औरंगाबादमध्ये चिकलठाणा आणि वाळूज या दोन भव्य औद्योगिक वसाहती उदयास आल्या. नागपूर परिसरातील हिंगणा, कलमेश्वर आणि बुटिबोरी ह्या औद्योगिक क्षेत्रांनी विदर्भाची 'स्कायलाइन' बदलली.

१९८१ मध्ये केंद्र सरकारने 'विनाउद्योग जिल्हा' ही नवी संकल्पना अस्तित्वात आणली. अशा जिल्ह्यामध्ये उद्योगस्थापनेस आकर्षक सवलती जाहीर केल्या. त्या जिल्ह्यांमध्ये जाणाऱ्या उद्योगांना विनाविलंब औद्योगिक परवाना मिळायचा. उद्योजकांची प्रथम पसंती महाराष्ट्राला असायची. ओघानं महाराष्ट्राच्या अविकसित विभागांत उद्योगधंदे वाढले. इतर राज्यांतील व महाराष्ट्रातील 'गडचिरोली' ह्या 'विनाउद्योग जिल्ह्याला' ते भाग्य लाभलं नाही.

मराठी माणसांच्या रक्तात कारखानदारीची बीजं नाहीत. तरी महाराष्ट्र राज्यानं औद्योगिकीकरणात आघाडी मारली ह्या विधानात अतिशयोक्ती नव्हती. नव्या सहस्रकाच्या आगमनापूर्वी ही वस्तुस्थिती होती. टाटा, गोदरेज, बिर्ला, मोदी, किर्लोस्कर, बजाज, चौगुले, गरवारे, गोएंका, वालचंद, अंबानी आदी बडे उद्योगसमूह महाराष्ट्रात आहेत. ह्या उद्योगांमुळे विकसनशील विभागात प्रगतीला अनुकूल वातावरण निर्माण झालं. तेथील शैक्षणिक आणि सामाजिक स्तर उंचावला.

औरंगाबादमध्ये औद्योगिक विकासाची मुहूर्तमेढ रोवल्यानंतर काही वर्षांत तिथे सुबत्ता आली. त्यावेळी एका स्थानिक उद्योजकानं, ''औरंगाबाद शहराची औद्योगिक वाढ आता अंतिम टप्प्यात आली आहे. आता हे थांबायला हवं. अन्यथा औरंगाबादची मुंबई होईल.'' असं विधान केलं होतं.

त्यांच्या म्हणण्यात तथ्य होतं. त्यावेळी औरंगाबादमध्ये गल्लोगल्ली दोन स्टार, तीन स्टार हॉटेलं उभी राहिली होती. जागोजागी आईस्क्रिम पार्लर आणि फास्ट फूडचे भपकेबाज स्टॉल दिसत होते. अरुंद रस्त्यावरून वाहनं माणसांच्या जवळून भरधाव जात होती. पानाचे ठेले होते. ५५५ किंवा डनहिल सिगारेट सहज मिळत होत्या.

औरंगाबादच्या नव्या कारखान्यांमध्ये रोजगार मिळत होता. शेजारच्या गावातून तसंच इतर राज्यांतून लोक नोकरीनिमित्त आले. औरंगाबादच्या वातावरणात वेगळा कली कधी शिरला ते कळलं नाही. रात्री दहा वाजता सर्वत्र सामसूम. स्थानिक माणसाला विचारलं तर त्यानं शिव्यांची सरबत्ती करत सांगितलं, ''पूर्वीचं औरंगाबाद आता राहिलं नाय, सायब. जातीय दंगलीमुळे भीती वाढलेय.''

नव्यानं उदयास येणाऱ्या औद्योगिक शहरात हे असं होणार. विकास, मौजमजा, गर्दी, त्याचबरोबर दुस्वास, तिरस्कार, आत्मप्रौढी अशा परस्परविरोधी वृत्ती वाढतात. औद्योगिकीकरणाची हीसुद्धा अटळ फलश्रुती आहे.

महाराष्ट्रातील विकसनशील विभागाच्या औद्योगिकीकरणाचा विचार करताना नाशिक, औरंगाबाद आणि नागपूर ही नावं अभिमानास्पद वाटतात. मात्र पुढे हे चित्र पालटत गेलं. विकासाच्या दिशेनं जाणाऱ्या ह्या कामगिरीच्या पार्श्वभूमीवर, अगदी अलिकडच्या वृद्धिदराची आकडेवारी पाहिल्यावर पदरी निराशा येते.

कृषी व संलग्न व्यवसायात राज्याचा सहावा क्रमांक, उद्योगात सातवा, सेवाक्षेत्रात चौथा आणि दरडोई स्थूल राज्य उत्पन्नात दुसरा क्रमांक आहे.

पायाभूत सुविधांच्या बाबतीत महाराष्ट्र आघाडीवर आहे असा एकेकाळी समज होता. जग जसजसं जवळ येत गेलं तसा हा भ्रमाचा भोपळा फुटला. आंतरराष्ट्रीय विमानतळ अपुरा पडू लागला. पनवेल इथे नवीन विमानतळ बांधण्याचं कित्येक वर्षे घाटतंय. ते काम वेगानं होणं आवश्यक आहे. नागपूरला आंतरराष्ट्रीय प्रवासी व मालवाहतूक विमानतळाचं बांधकाम सुरू आहे. ४३५४ हेक्टर जमिनीवरील हे विमानतळ लवकर कार्यान्वित करण्यासाठी राज्य सरकारनं केंद्र सरकारपाशी टुमणं लावलं पाहिजे. 'मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे' रस्ता झाला अशी एखादी जमेची बाजू.

महाराष्ट्रातील औद्योगिकीकरणाला १९९५ नंतर खीळ बसू लागली. त्याला मुख्य कारण झालं

विजेचं. वीजटंचाईचा प्रश्न महाराष्ट्र राज्यानं समाधानकारकपणे सोडवला नाही. महाराष्ट्रात झपाट्यानं शहरीकरण होत असल्यामुळे घरगुती आणि व्यापारी वापरासाठी विजेची मागणी फार वाढत चालली आहे, त्यामुळे छोट्या योजना राबवून हा प्रश्न सुटण्यासारखा नाही. ह्या समस्येचं गांभीर्य लक्षात आलं नाही. प्रोत्साहन, करसवलती दिल्यानंतरही रत्नागिरी किंवा भंडारा इथं औद्योगिकीकरण झालं नाही. औद्योगिक प्रसारणाची एक थियरी आहे. एखाद्या औद्योगिक दृष्ट्या प्रगत शहराच्या कक्षेबाहेर प्रथम ५० मीटर परिघात औद्योगीकीकरणाची प्रक्रिया होईल. त्यानंतर १०० मीटर, २०० मीटर अशा टप्प्यानं उद्योग स्थापन होतात. पण अशी पद्धतशीर आखणी करण्यास राज्यकर्त्यांना सवड नसते.

महाराष्ट्रातील प्रत्येक राज्यकर्त्याला आपल्या मतदारसंघात औद्योगिक क्षेत्र असावं असं वाटतं. उद्योगपोषक सोयींचा विचार मात्र तो करत नाही. मिनी इंडस्ट्रियल एरियाची टूम निघाली. त्या योजनेमुळे एमआयडीसीचे कोट्यवधी रुपये वाया गेले. माहिती-तंत्रज्ञान उद्योगांसाठी (आयटी) महाराष्ट्राइतका सुपीक प्रदेश नव्हता. मोठी शहरं, विद्यापीठं, शहरी सुविधा, जागतिक संबंध ह्या सर्व आघाड्यांवर महाराष्ट्र इतरांपेक्षा कितीतरी पुढे होता. पण महाराष्ट्रानं वेळीच पुढाकार न घेतल्यामुळे कर्नाटक आणि बंगळूरू ह्यांनी महाराष्ट्रावर कुरघोडी केली. ह्याबाबतीत महाराष्ट्र शासनाला आयटी उद्योगाचं महत्त्व वेळीच कळलं नाही किंवा दूरदृष्टीचा अभाव असावा. त्यातील रोजगारांचा मुद्दा दुर्लक्षित राहिला.

पुढे, २००३ मध्ये 'माहितीतंत्रज्ञान व माहिती-तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा धोरण' जाहीर केलं. धोरणात माहितीतंत्रज्ञान उद्योगासाठी अनेक आकर्षक सवलती आणि सुविधांचा अंतर्भाव होता. पुण्याजवळ हिंजेवाडी येथे राजीव गांधी इंटरनॅशनल पार्कची स्थापना झाली. तिथे इन्फोसिस, जिओ मॅट्रिक, केपीआयटी क्युमिन्स इत्यादी प्रकल्प आले. एमआयडीसी आणि सिडकोने ३६ संकुलं विकसित केली. ३५३ खाजगी संकुलांना शासकीय मान्यता मिळाली. त्यांपैकी ५३ कार्यरत झाली.

माहिती तंत्रज्ञान धोरण जाहीर करण्यास मूलत: विलंब झाला होता. बंगलोर आणि हैदराबाद ह्या शहरांची अगोदरच भारताची 'सिलिकॉन व्हॅली' अशी ख्याती झाली होती.

महाराष्ट्र राज्याच्या अर्ध्या भागाचं शहरीकरण झालेलं आहे. अशा राज्याचं आकर्षक औद्योगिक क्षेत्र हे वैशिष्ट्य कसं लोप पावू शकतं? कोल्हापूर हे औद्योगिक दृष्ट्या नैसर्गिकपणे वाढलं, तिथे मोठा विमानतळ बांधण्याचा प्रकल्प का बारगळला? असे अनाकलनीय प्रश्न अनुत्तरीत राहतात.

गुजरातच्या नर्मदा सरोवर ह्या प्रकल्पाला कितीतरी विरोध झाला. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्या आंदोलनाची दखल घेतली गेली. अशा प्रतिकूल वातावरणात गुजरातच्या प्रत्येक मुख्यमंत्र्यानं त्या धरणाचं काम निर्धारानं पुढं रेटलं. काही तडजोडी केल्या, पण ते पूर्णत्वास नेलं. असा कणखरपणा रत्नागिरी वीज कंपनीच्या स्थापनेत आणि इतर काही मेगा प्रकल्पांबाबत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी दाखवला नाही.

२५६ एकर विस्तार असलेलं निर्यातप्रवण उद्योग क्षेत्र आणि २३४ एकर जमिनीवरील एसईझेड अशा दोन विभागांना जोडून गुजरात राज्यानं पिपावाव शिपयार्ड स्थापलं आहे. हे शिपयार्ड कार्यान्वित झालं असून तेथे जगातील सर्वांत मोठी २३५ मीटर लांबीची युरोपीयन नौका उभारण्यात येत ओ. ही नौका पुढच्या वर्षी बांधून पूर्ण होईल. त्यानंतर २२ युरोपीयन नौका आणि ओएनजीसीकरता १२ नौका तयार करण्याचं काम सुरू होईल.

पिपावाव शिपयार्ड भारतातील सर्वांत मोठं शिपयार्ड ठरावं असं गुजरात सरकारला वाटतंय. शिपयार्ड आणि इतर सर्व सुविधांच्या निर्मितीसाठी २९५० कोटी रुपयांची गुंतवणूक होईल. त्यांपैकी अडीच हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे.

महाराष्ट्राला लाभलेल्या ७२० किलोमीटर समुद्रकिनाऱ्यामुळे 'पोर्टबेस' उद्योगांच्या स्थापनेसाठी औद्योगिक स्थिती अनुकूल आहे, पण महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांना त्याचा लाभ उठवता आला नाही. महाराष्ट्राच्या समुद्र किनाऱ्यावर ४८ बंदरे विकसित करण्याची योजना आखण्यात आली. त्यापैकी अंजनवेल हे बंदर रत्नागिरी गॅस पॉवर प्रोजेक्ट लिमिटेड ह्या कंपनीने विकसीत केलं. दिघी आणि जयगड बंदराचं काम सुरू आहे.

महाराष्ट्रात हुंडाई प्रकल्प येईल असं वाटत

असताना तो प्रकल्प तामिळनाडूनं पळवला. हुंडाईचं प्रतिनिधी मंडळ, त्यांचा मोटार प्रकल्प कोठे स्थापन करावा ह्याची चाचपणी करण्यासाठी भारताच्या दौऱ्यावर आलं होतं. इतर काही राज्यातील भेटी आटोपून ते प्रतिनिधी महाराष्ट्रात आले. त्यांच्या-समवेत चर्चा करण्यासाठी आणि सादरीकरणासाठी सह्याद्री ह्या शासकीय अतिथीगृहात बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री मनोहर जोशी ह्यांनी शरद पवारांना मुद्दाम आमंत्रित केलं होतं. पवारांचे हुंडाईच्या व्यवस्थापनाशी सलोख्याचे संबंध होते. जोशींचा हा दृष्टिकोन व्यावसायिक होता ह्यात वाद नाही, पण त्या बैठकीत ठोस आश्वासन न देता आमच्या ह्या ह्या योजना आहेत अशी हवेतील बडबड झाली. हुंडाईचा आग्रह बंदरानजीकच्या जमिनीचा होता. त्या अनुषंगानं शासनानं कोणताच पर्याय सुचवला नाही.

ते शिष्टमंडळ दुसऱ्या दिवशी चेन्नईला पोचलं. त्या बैठकीत मुख्यमंत्री जयललिता ह्यांनी चेन्नईनजीक जागा सुचवली आणि देऊ केली. शिवाय, तात्पुरत्या कार्यालयासाठी शासकीय इमारतीचा एक मजला ताबडतोब रिकामा करून दिला. हुंडाईचं शिष्टमंडळ भारतातील काही राज्यांना भेटी देत असताना तामिळनाडूनं त्यांच्या अपेक्षांची माहिती मिळवली. त्यानुसार आपला प्रस्ताव तयार ठेवला. आता तामिळनाडू मोठं ऑटोमोबाइल केंद्र होतंय.

हुंडाईप्रमाणे इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील सोनी हे उत्तुंग नाव. त्यांना भारतात पाच लाख रंगीत चित्रवाणी संचाचं उत्पादन करण्याचा प्रकल्प टाकायचा होता. पायरीपायरीनं ती क्षमता दोन लाख चित्रवाणी संचांपर्यंत वाढवायची महत्त्वाकांक्षा होती. समुद्रमार्गे सुटे भाग आयात करावेत असा त्यांचा मनोदय होता. आपण त्यांना नवी मुंबईतील जागा द्यावी अशी विचारधारा होती. रायगड जिल्ह्यात त्या प्रकल्पाला जागा देऊ शकलो असतो. पण रायगड जिल्ह्यात औद्योगिक प्रकल्प येऊ द्यायचा नाही असा स्थानिक राजकीय कार्यकर्त्यांचा संकल्प होता. एसईझेडचा मोठा प्रकल्प पेण परिसरात स्थापण्यास असाच विरोध झाला. सोनीच्या प्रतिनिधमंडळाची राज्यपालांशी भेट घडवून आणली. उत्तम स्वागत करण्यात आलं. पण त्यांचं मुंबई पोर्ट ट्रस्टबद्दल मत चांगलं नव्हतं. मुंबईच्या बंदरात माल उतरल्यानंतर तो फॅक्टरीत पोचायला किती अवधी लागेल हे ठामपणे कोणी काही सांगत नव्हतं. अखेर, सोनीनं मुंबईचा नाद सोडून पंजाबला प्रकल्प कार्यान्वित केला. आता ते सुटे भाग थेट विमानानं आयात करतात.

समतोल औद्योगिक विकास ही संकल्पना नवीन नाही. परदेशात असे प्रयत्न झाले. त्याचं दृश्यफलित दिसलं. पण थोड्याफार प्रमाणात असमतोल टिकून राहतोच. उद्योगाशिवाय निवासव्यवस्थेबाबतही परदेशात हे तत्त्व वापरतात.

लंडनमध्ये लोकांचा लोंढा थांबवण्यासाठी फार मोठी जाहिरातमोहीम राबवण्यात आली होती. प्रचंड लोकसंख्येमुळे पाणीपुरवठा, वैद्यकीयसुविधा आणि वाहतूकव्यवस्था ह्या सर्वांवर ताण पडतो. अनेक नागरी सुविधांचा बोजवारा उडतो. लंडनची ही जाहिरात-मोहीम काहीअंशी यशस्वी झाली. मुंबईच्या बाबतीत असा प्रयत्न करण्यास काय हरकत आहे.

२००७ पासून प्रभाकर करंदीकर महिंद्र कंपनीत सल्लागार आहेत. त्यापूर्वी ते आयएएस ऑफिसर होते. ते दीर्घकाळ उद्योग खात्याशी निगडित होते. शासकीय सेवेतून खाजगी कंपनीत हा प्रवास. अनुभव समृद्ध करणारा. त्यांचं निरीक्षण अभ्यासण्यासारखं.

महिंद्र कंपनीचा व्याप इतका वाढलाय की आता एखाद्या सरकारप्रमाणे रचना झालीय. अनेक क्षेत्रांत कार्यरत असल्यामुळे अनेक विभाग-उपविभाग आहेत. आयटी सेक्टर, ऑटो सेक्टर आणि वित्त विभाग ह्यांचा कारभार स्वतंत्रपणे चालतो. त्यांचे निर्णय ते घेतात. संचालक मंडळाची समन्वय समिती असते. त्यांच्याकडे धोरणात्मक आणि इतर अतिमहत्त्वाचे प्रश्न येतात.

सत्यमच्या टेक ओव्हरचा निर्णय तात्काळ झाला. तो वेग चकित करणारा होता. मात्र इतर वेळी तो वेग दिसत नाही. उद्योगसमूहाचा आकार ठरावीक मर्यादेपर्यंत असतो तेव्हा सर्व निर्णय जलद गतीनं होतात. मात्र हा आकार मोठा होत जातो तसा निर्णयप्रक्रियेचा वेग मंदावतो. लांबून पाहताना आपल्याला हा लालफितीचा प्रभाव जाणवत नाही, कारण ती सरकारी लालफितीइतकी जाचक आणि उलटद्या दिशेकडे नेणारी नसते. महिंद्रच्या सर्व सेक्टरच्या प्रतिनिधींची वर्षातून एकदा दोन दिवसांची परिषद असते. सर्व सेक्टरचे मिळून तीन-चारशे प्रतिनिधी उपस्थित असतात. दृक्‌श्राव्य सादरीकरण, चर्चा, प्रश्नोत्तरे, अशा अनेक माध्यमांच्या आधारे ही

सभा पार पडते. स्वतः आनंद महिंद्र ह्या सभेत सहभाग घेतात. त्यांचं वाचन अफाट आहे. नेतृत्व आणि दूरदृष्टी ह्या गुणांमुळे ते सर्वांना आपल्याबरोबर नेतात.

सिकॉममध्ये पूर्वी 'आंतरराष्ट्रीय विभाग' होता. परदेशस्थ भारतीयांना महाराष्ट्रात उद्योग स्थापण्यास प्रवृत्त करणं, हे त्या विभागाचं प्रमुख कार्य. परदेशस्थ भारतीयांचा डाटाबेस त्या विभागानं तयार केला होता. अनेकांचा फार उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला. त्यांनी महाराष्ट्रात उद्योग स्थापन केले. सिकॉमचं खाजगीकरण झाल्यानंतर सिकॉमनं अविकसित भागाचं औद्योगिकीकरण ह्या प्रमुख उद्देशाचा त्याग केला. नफ्याचा विचार करणारी आर्थिक संस्था असं तिचं स्वरूप झालं. भौगोलिक सीमेचं बंधन उरलं नाही. भारतात कोठेही अर्थसाहाय्य पुरवण्याची मुभा मिळाली. नफा म्हणजे विष ही मनोवृत्ती कालबाह्य झाली, हे मान्य, पण महाराष्ट्राच्या विकासाची दृष्टी ठेवूनही नफा कमावण्याची कामगिरी कशी करता येईल, ह्यात खरी कल्पकता आहे.

सिकॉमच्या प्रारंभीचा कामाचा धडाका पाहून इतर राज्यांनी सिकॉमसारख्या संस्थांची स्थापना केली. सिकॉमचं अनुकरण केलं. गुजरातनं 'आंतरराष्ट्रीय विभाग' स्थापन केला. पण अपेक्षित यश मिळत नव्हतं. त्यावर मात करण्यासाठी त्यांनी इंडस्ट्री कमिशनरच्या दर्जाचा एनआरआय कमिशनर नेमला. तो परदेशी राहतो, त्याचा स्वतःचा व्यवसाय किंवा नोकरी सांभाळतो, शिवाय परदेशातील भारतीय व गुजराती लोकांच्या संपर्कात असतो. गुजरात सरकारच्या वतीनं तो उद्योजकांना ठोस आश्वासनं देतो. गुजरातचा उद्योगविभाग त्याचा अव्हेर करत नाही. त्या एनआरआय कमिशनरला भारतात आल्यावर निवास, कार्यालय, मोटार, स्वीयसहाय्यक अशा सर्व सुविधा मिळतात. हा नवविचार इतर राज्यांना सुचला नाही. गुजरातच्या कृतीतून जो संदेश परदेशस्थ भारतीयांना मिळतो, तो महत्त्वाचा.

टाटाच्या नॅनो मोटार प्रकल्प कोलकातामध्ये भोवऱ्यात सापडला. गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदींनी एका रात्रीत रतन टाटांच्या अटी मान्य करून तो प्रकल्प गुजरातेत नेला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री केवळ शाब्दिक निमंत्रण देत होते.

मोदींनी मी ही जमीन तुम्हाला दिली, अशा तऱ्हेची व्यावसायिक मनोवृत्ती दाखवताना वीज, रस्ते, पाणी सर्व सुविधांचं एक पॅकेज टाटांना दिलं.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना टाटांना भेटणं नाही जमलं. निदान उद्योगमंत्र्यांनी भेटायचं. आम्ही त्यांना या म्हटलंय. त्यांना गरज असेल तर त्यांनी यावं. आपल्या मंत्र्यांना त्या प्रकल्पामुळे निर्माण होणारा रोजगार आणि पूरक उद्योगांचं महत्त्वच कळलं नाही. त्यांना वाटलं आपल्या मागेमागे ब्रिफकेस घेऊन धावणाऱ्या बिल्डरांप्रमाणे टाटा आपल्यामागे धावतील.

दत्ता सामंतांसारख्या कामगार पुढाऱ्यानं महाराष्ट्रातील मूठभर कामगारांना डोळे दीपवणारे लाभ मिळवून दिले. पण अनेक वेळा हेकेखोरपणानं कारखाने बंद पाडले. मुंबईतला गिरणगाव नष्ट केला. अशी सामंतांची प्रतिमा तयार करण्यात आली. ती योग्य की अयोग्य हा वादाचा विषय होईल. त्यांना गुजरातमध्ये प्रवेश द्यायचा नाही. हा धोरणात्मक निर्णय गुजरातमधील प्रत्येक पक्षानं कसोशीनं पाळला.

गुजरातमधील सर्व स्तरातील माणूस उद्यमशील असतो. त्यामुळे कोणत्याही पक्षाचं सरकार असलं तरी औद्योगिक धोरणात बदल होत नाही. उद्योगात गुंतवणूक करणाऱ्या माणसाची अडवणूक न करता त्याच्या अडचणी दूर करण्याकडे कटाक्ष असतो.

महाराष्ट्रात सिकॉम, एमआयडीसी, एमएस-एफसी, एमएसएसआयडीसी, मिटकॉन या संस्था औद्योगिक विकासाशी निगडित आहेत. एकेकाळी त्यांचा उत्साह ऊतू जायचा. ती वृत्ती आता दिसत नाही. राज्यकर्त्यांमध्ये उदासीनता असल्यामुळे ती मनोधारणा खालील स्तरावर झिरपते.

त्याउलट गुजरातची स्थिती आहे. गुजरातमध्ये मेगा पॉवरसारखे प्रकल्प आले पाहिजेत. चार तोंडं चार दिशांना नसावीत, असा संदेश मुख्यमंत्र्यांकडून दिला जातो. आंध्रप्रदेशचे चंद्राबाबू नायडू ह्यांनी आपल्या मुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीत असाच पवित्रा घेतला होता.

१९९५ च्या आसपास खुली अर्थव्यवस्था अमलात आली. त्यानुसार औद्योगिक धोरणात बदल होत गेले. गोवा आणि सिल्वासा इथं उद्योगांना आकर्षित करणाऱ्या सेवासुविधा नव्हत्या, पण करातील फार मोठ्या सवलतीमुळे उद्योजकांनी उत्सुकता दाखवली.

महाराष्ट्रात १९९० नंतर फासे उलटे पडू लागले. आपल्या देशातील इतर राज्यांत काय चाललंय

एवढ्यापुरतंच आपण पाहत होतो. जागतिक पातळीवर वारे कसे वाहतायत इकडे महाराष्ट्रानं दुर्लक्ष केलं. सद्यस्थितीत असं धोरण उपयुक्त ठरणार नाही. परवानाराज होतं तेव्हा महाराष्ट्राच्या पूर्वपुण्याईनं उद्योगांचे परवाने महाराष्ट्राला अनुकूल असत.

उदारीकरणानंतर महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांनी भारतातील इतर राज्यांमध्ये औद्योगिकीकरणाचा आलेख कसा आणि का उंचावतोय ह्याची क्षिती बाळगायचं सोडून दिलं. त्यांची उद्योगाविषयीची आस्था कमी झाली. मग आंतरराष्ट्रीय घडामोडीकडे अभ्यासू वृत्तीनं पाहायचा आवाका त्यांच्याकडे कसा असेल? सध्याच्या परिस्थितीत स्थानिक कायदेकानून, नियम आणि आर्थिक स्थितीचा विचार करतानाच आंतरराष्ट्रीय घटनांचं खूप भान ठेवायला हवं. अशा विचारांची माणसं महाराष्ट्राच्या राजकारणात कमी झाली आहेत, हे विषादानं नमूद करावं लागतं.

महाराष्ट्राला सर्वात मोठा धक्का एसईझेडमुळे (विशेष आर्थिक विभाग) बसला. हे विभाग होऊच द्यायचे नाहीत असाच निश्चय महाराष्ट्रातल्या राजकीय नेत्यांनी केला. ह्या प्रकरणी महाराष्ट्र सरकारचं धोरण लेचंपेचं होतं. सरकारनं एसईझेडच्या विरोधकांची किंवा शेतकऱ्यांची मानसिकता बदलण्याचा प्रभावी प्रयत्न केला नाही. आयटी आणि बीटीसारखे काही एसईझेड निर्माण झाले, मात्र उल्लेखनीय म्हणता येईल असा एकही एसईझेड महाराष्ट्रात स्थापन झाला नाही.

वास्तविक, भारतातील पहिला एसईझेड 'सिप्झ' मुंबईत अंधेरी येथील एमआयडीसीच्या क्षेत्राला लागून उभा राहिला.

औद्योगिकीकरणाविषयी पुल आणि पुश असे दोन घटक असतात. कोलकातामध्ये आक्रमक कामगार चळवळीचा पुश घटक १९७० च्या आसपास कार्यान्वित होता. त्याचा लाभ महाराष्ट्राला झाला. आंध्र, कर्नाटक, पंजाब इत्यादी राज्यांतील अपुऱ्या सोयीसुविधा हा तेथील पुश घटक. ह्या सर्व पुश घटकांचा महाराष्ट्रात पुल घटक झाला. बंगालमधील कामगारांची अविवेकी चळवळ ओसरली. त्यांचा पुश घटक बंद झाला. आंध्र, कर्नाटक आणि पंजाब येथील सोयीसुविधा वाढल्यानंतर तेथील पुश घटक संपला. त्याचाच अर्थ महाराष्ट्राचा पुल घटक संपुष्टात आलाय. आता महाराष्ट्राला खंबीर धोरण आणि उत्तम सोयीसुविधा ह्यांच्या बळावर स्वत:चा मूळ घटक निर्माण करावा लागेल.

गुजरात राज्यात पुल घटक फार प्रबळ नव्हता. तेथे पुश घटकही अस्तित्वात नव्हता. गुजरातमध्ये तीन चार एसईझेड विना अडथळा स्थापन झाले. सर्व सेवासुविधा निर्माण करण्याच्या योजना पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. शिवाय, ५०० मेगावॅटपासून ४,००० मेगावॅटचे प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर गुजरातचा पुल घटक कोणाच्या पुश घटकावर अवलंबून नसेल. तीच स्थिती कर्नाटक आणि आंध्रची होईल आणि महाराष्ट्राच्या तीन सीमांवर पुल घटक तयार असतील.

---

**– आदिनाथ हरवंदे**
निवृत्त वरिष्ठ व्यवस्थापक (जनसंपर्क) सिकॉम
१२०३, कोरस टॉवर्स,
वर्तक नगर, ठाणे – ४००६०६
ई–मेल : adharwande@gmail.com

*दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!*



**SAPNA**
**ELECTRIC & ELECTRONICS**

Kamaldev Jain
Jagdish Jain

Colour T.V., V.C.D., D.V.D. Player,
Washing Machines,
Refrigerators & Air Conditioners

4 Dadasaheb Pandit Market,
Safale (E) 401 102
**Tel.: 02525-230204**

# ‘वैदर्भीचे सहा आविष्कार’

विद्युल्लेखा अकलूजकर

मी विदर्भाच्या दहा दिवसांच्या पर्यटनाला २००९ च्या जानेवारीत जाऊन आले. जवळपास तीस लोकांसह एका बसमधून सलग प्रवास केला आणि हरतऱ्हेच्या गोष्टी पाहिल्या. विवेक सरमुकादम या आमच्या हरहुन्नरी पर्यटनप्रमुखाने भरगच्च आणि वैविध्यपूर्ण कार्यक्रम आखला होता. आम्ही वर्धा, नागपूर, चंद्रपूर वगैरे मोठ्या शहरांना भोज्ज्या केले. पवनारचा विनोबांचा आणि सेवाग्रामचा बापूजींचा असे ऐतिहासिक आश्रम पाहिले. आनंदवन, हेमलकसा आणि शोधग्राम या आधुनिक भारतातील समाजोत्थानाच्या तीन तीर्थस्थानांची भेट घेतली. ताडोबा, आलापल्ली वगैरे जंगलांतून रपेट मारली. सागवान, ऐन, धावडा, बेहडा, तेंदूपत्ता वगैरे वृक्षवल्ली, आणि हरणे, चितळ, रानकुत्री, गवे, रानडुकरे, माकडे वगैरे सोयरी वनचरे पाहिली. उल्कापाताने निर्माण झालेले लोणारचं नयनमनोहर सरोवर न्याहाळले. चंद्रपूरजवळची कोळशाची खाण पाहिली, आणि माहूरची रेणुका, कळंबचा चिंतामणी-गणेश, चंद्रपूरची महाकाली, आणि वाशीमचा बालाजी अशी देवस्थानेही पाहिली. रामटेकचे कालिदास स्मारक, मनसरचे उत्खननात सापडलेले प्राचीन शहर, शेगावचे गजानन महाराजांचे समाधिस्थान, आणि त्याच्याजवळचे आनंदसागर हे नयनरम्य जलाशय-उद्यान आणि त्यातील विवेकानंद-ध्यानमंदिर ही काही ठिकाणे तर ‘पुनरागमनाय च’ असे खुणावत कायमची मनात राहून गेलेली आहेत.

या पर्यटनात पाहिलेल्या अनेक स्थळांमध्ये मला स्त्री-शक्तीचे विविध साक्षात्कार झाले. कधी पौराणिक, तर कधी ऐतिहासिक; कधी प्राचीन काळातील पुरातन स्त्री, तर कधी अगदी आजकालच्या काळातील, तुमच्याआमच्या ओळखीची स्त्री माझ्यापुढे वेगवेगळ्या संदर्भात येत राहिली. कधी ती प्रत्यक्ष दिसली, कधी आडून, तर कधी केवळ कथा-दंतकथा, मंदिरे, स्मारके यांच्या माध्यमातून तिची ओळख झाली. अशा वेगवेगळ्या काळातील स्त्रीची, तिच्यातील अंतःशक्तीची माझ्या पुढ्यात प्रकटलेली, किंवा मला त्या त्या वेळी जाणवलेली रूपे निरखताना मी माझ्या मनाशी गुपचूप संवाद करत राहिले. आता तोच संवाद तुमच्याशी साधायचा प्रयास आहे. स्त्रीशक्ती आणि तिचे विविध आविष्कार यासंबंधी मला साहजिकच चिरंतन आस्था असल्यामुळे कुठेही फिरताना, काहीही बघताना, त्या विचारांचे माझ्या मनात नेहमीच एक अधिष्ठान असते.

पहिली पाहिली माहूरची रेणुका. माहूरच्या रेणुकेचे दर्शन घेताना जमदग्नी, रेणुका आणि परशुराम यांची पौराणिक कथा समोर आली. रेणुकेला देवी मानले जाते. मातृदेवता मानले जाते. आणि इथल्या रेणुकेला तर जागृत देवीस्थान मानले जाते. पण रेणुकेची कथा कशी आहे? हे कथानक म्हणजे स्त्रीच्या पातिव्रत्याविषयीच्या अतिरिक्त कल्पनांचे एक उत्तम

उदाहरण आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. आमचे पर्यटनप्रमुख तिची संक्षिप्त कथा सांगत होते. पुराणांमधून मी ती वाचलेली होती. जमदग्नी ऋषींच्या रोजच्या पूजेसाठी नदीवर पाणी आणायला गेलेल्या रेणुकेने त्या जलात आपल्या सहचरींसह क्रीडा करणाऱ्या गंधर्वराजाला पाहून तिथेच थोडा वेळ रेंगाळावे, त्यामुळे तिला घरी यायला नेहमीपेक्षा उशीर व्हावा, त्या सुंदर जलक्रीडेमध्ये ती मनाने गुंगली, एवढ्याच तिच्या 'अपराधाने' खवळून जाऊन संतापी जमदग्नीने आपल्या सुशील भार्येचा शिरच्छेद करायची आज्ञा आपल्या मुलांना करावी, त्यातही ज्या मुलाने ते अघोरी कृत्य करणे नाकारले त्याला शाप द्यावा, आणि ज्या धाकट्या परशुरामाने पित्याच्या आज्ञेने आईच्या शिरच्छेदाचे ते काम पार पाडले, त्या परशुरामाला आपल्या देवांच्या अवतारात स्थान मिळावे, हे सगळे पुन्हा एकदा मनासमोर आल्यावर असे वाटले, की आपल्या दैवतकथांमधे किती तऱ्हतऱ्हेचे नमुने आदर्श म्हणून गणले गेले आहेत!

पित्याच्या आज्ञेच्या योग्यायोग्यतेचा विचार न करता, केवळ आज्ञापालन करण्यापायी प्रत्यक्ष मातेचा शिरच्छेद करणारा आणि नंतरही आपल्या मातापित्यांची हत्या करणाऱ्या क्षत्रिय राजाचा सूड घेण्यासाठी एकवीस वेळा धरती निःक्षत्रिय करणारा कृतिवीर परशुराम विष्णूचा सहावा अवतार गणला गेला आहे. कदाचित, ज्या परशुरामाने पित्याची आज्ञा पाळून अघोरी मातृहत्या केली, त्यानेच नंतर पित्याचा क्रोध शांत झाल्यावर, त्या रेणुकेच्या जीवदानाचाच वर पित्याकडे मागितला, एवढ्यावर त्याचे सद्‌गुणीपण भाविक लोकांपुरते सिद्ध होत असावे. तरी बरे, धर्मपत्नीवर एवढी आग पाखडणाऱ्या प्रत्यक्ष जमदग्नीला कोणी पुजत नाही, पण त्या ऋषीच्या क्रोधाग्नीत नाहक बळी पडलेल्या रेणुकेला मात्र आपल्या समाजाने देवी मानले आहे. भारतीय दैवतकथांची ही खासियत आहे म्हणायला हरकत नाही. ज्या ज्या स्त्रियांवर कोणत्या ना कोणत्या प्रकारे अन्याय झालेला आहे, कधी त्या स्त्रीच्या पतीकडून, तर कधी तिच्या घरच्यांकडून, अशा अन्याय सोसणाऱ्या स्त्रीला पुढे कधीतरी भारतीय कथासाहित्य देवीपदाला नेऊन पोचवते. आपल्या लोककथांच्या परंपरेने त्या स्त्रियांना मिळवून दिलेला हा काव्यात्म न्यायच म्हणायला हवा. प्रातःस्मरणीय पंचकन्यांची यादी देणारा श्लोक पाहा– ''अहल्या द्रौपदी तारा सीता मंदोदरी तथा। पंचकन्या स्मरेन्नित्यम् महापातकनाशनम् ।।'' या श्लोकात अशाच स्त्रियांचा समावेश आहे, की ज्यांच्यावर काही ना काही अन्याय पुरुषाकडून लादला गेला होता, पण त्या साऱ्याजणींना आपल्या भारतीय परंपरेने काव्यात्म न्याय दिला आणि स्त्री आणि पुरुष सर्वांसाठी चिरस्मरणीय बनवून टाकले.

अर्थात, पौराणिक कथाही आपल्यापैकीच कोणीतरी, द्रष्ट्या आणि संवादशील व्यक्तीने, त्या त्या वेळच्या समाजातील संकल्पनांना स्थायी करण्यासाठी किंवा समाजाला नवीन संकल्पना देण्यासाठी रचलेल्या असतात. त्यात जसे त्या त्या वेळच्या समाजमनाचे, त्यातील नीतिकल्पनांचे प्रतिबिंब पडलेले आपल्याला विचार केल्यावर दिसते, तसेच आपल्याकडच्या देवाच्या अवतारसंकल्पनां–मध्येदेखील उत्तरोत्तर थोडीबहुत का होईना, प्रगती होत असते, असेही आपल्याला चिकित्सक विचार केला तर जाणवत राहते. नीट पाहायला गेले तर विष्णूच्या सहाव्या अवतारात परशुरामाने केलेल्या कृत्याशी तुलना करता येईल अशी एक कथा आपल्याला विष्णूच्या सातव्या अवतारातही सापडते. रेणुकेची कथा आणि अहल्येची कथा या दोन कथांच्या साच्यांची तुलना आपण केली, तर स्त्रीच्या तथाकथित 'पातिव्रत्य–भंगा'कडे पाहण्याची कथाकारांची दृष्टी बदलत चाललीय असा निष्कर्ष काढता येतो. रेणुकेच्या मानसिक चांचल्यापायी तिला तिच्या संतापी नवऱ्याने देहान्त फर्मावला आणि परशुरामाने त्या शिक्षेची अंमलबजावणी केली, पण प्रत्यक्ष व्यभिचार करून, नंतर ते पतीच्या लक्षात आल्यावर, त्या ऋषिशापाने शिळा होऊन पडलेल्या अहल्येच्या बाबतीत, त्या दोघांहून पुढच्या काळातील रामाने मात्र वेगळी वागणूक दाखवली. नुसत्या मानसिक व्यभिचारिणीचाच नव्हे, तर प्रत्यक्ष व्यभिचार केलेल्या स्त्रीचादेखील या नव्या देवावताराने 'उद्धार' केला. तिला तिच्या अपराधाबद्दल नवऱ्याकडून मिळालेल्या शिळा होण्याच्या शापातून रामाने तिची सुटका केली, आणि पुन्हा तिला व्यक्ती म्हणून प्रतिष्ठापित केले, असाच संदेश अहल्येच्या कथेतून मिळतो. रेणुका–

जमदग्नी आणि त्यांचा प्रत्यक्ष पुत्र परशुराम या त्रिकोणासारखाच गौतम-अहल्या आणि त्यांना पुत्रासमान शोभावा असा दाशरथी राम हा या पुढच्या अवतार-कथेतील त्रिकोण आहे. या दोन कथांच्या परिणतीमध्ये असलेला फरक मात्र लक्षणीय आहे. हा फरकच जनमानसातील स्त्रीच्या पातिव्रत्या-संबंधीच्या कल्पनांमधे, अपराध आणि शिक्षा यांपासून सुरुवात करून अपराध आणि क्षमा इथपर्यंत प्रगतीचा आलेख दाखवतो, असे समजायला हरकत नाही. (अर्थात, दैवतकथा या एकसुरी किंवा एकेरी कधीच नसतात. माणूस प्रत्यक्षात जितका व्यामिश्र असतो, तितक्याच प्रमाणात दैवतकथांमधील माणसाचे, किंवा देवाचे वागणे व्यामिश्रच असते. म्हणूनच रामाच्या कथेतही, त्याचे ऋषिपत्नी असलेल्या अहल्येच्या संदर्भातले आधीचे क्षमाशील वागणे, आणि स्वतःची धर्मपत्नी असलेल्या सीतेच्या संदर्भातले नंतरचे 'निर्घृण' म्हणता येईल असे वागणे यातही तफावत दिसतेच. तो एक आणखीच वेगळा, मोठा आणि बहुचर्चित विषय आहे.)

संध्याकाळच्या संधिप्रकाशात, त्या रेणुकेच्या मंदिरालगतच्या मातृतीर्थावर आम्ही उभे होतो. तिथल्या पाण्याची गढूळ, शेवाळलेली आणि गलिच्छ अवस्था पाहताना, त्यात नसले तरी माझ्या मनात विचारांचे तरंग उठत होते. या तीर्थावर येऊन परशुरामाने स्वतःच्या मातापितरांचे तर्पण केले, तसे स्वतःच्या पितरांचे तर्पण करण्याचा संकल्प आमचे पर्यटनप्रमुख सांगत असताना, मी मात्र मनाने त्या रेणुकेच्या काळात भ्रमण करत होते. गंधर्वराज आणि त्यांच्या सख्यांची जलक्रीडा ऋषिपत्नी रेणुकेच्या नजरेतून न्याहाळीत होते. सहज भावभावना उरात घेऊन जगलेल्या आणि त्यापायी अन्याय सोसणाऱ्या, मानवी रेणुकेच्या स्वत्वाची ओळख नव्याने करून घेत होते आणि ज्यांच्यावर घोर अन्याय झाले अशा खऱ्याखुऱ्या, हाडामांसाच्या, जिवंत स्त्रियांना मरणोत्तर देवता मानून कमीतकमी काव्यात्म न्याय तरी त्यांच्या पदरी घालणाऱ्या आपल्या व्यापक आणि क्षमाशील समाजमनाचा धांडोळा घेत होते.

रेणुकेशेजारच्या टेकडीवर अनसूयेचे मंदिर आहे. तिथे जाईपर्यंत फार अंधार झाल्यामुळे, आणखी एक टेकडी चढून तिचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याचा विचार आम्हाला सर्वांनुमते सोडावा लागला, पण अनसूयेच्या मंदिराच्या परिसराजवळ गेल्यामुळे खंबीर पतिव्रता अनसूया आणि तीन देवांनी तिची पाहिलेली सत्त्वपरीक्षा याही पौराणिक कथेची स्मृती जागी झाली. अनसूया-कथा या विषयावर मी पूर्वी बरेच संशोधन केलेले होते. वाल्मीकीचे रामायण, पुराणे आणि एकनाथांनी रचलेल्या आख्यानामध्ये आलेल्या अनसूयेच्या कथेचे सर्व संदर्भ तपासून त्यावेळी लिहिलेला एक संशोधनलेख मी अमेरिकन ओरिएंटल सोसायटीच्या फिलाडेल्फियामध्ये भरलेल्या सभेत विद्वानांपुढे सादर केला होता. त्यावेळी अभ्यासलेले अनसूयेच्या बदलत जाणाऱ्या कथेचे सगळे संदर्भ विदर्भात तिच्या परिसरात पोचल्यावर पुन्हा एकदा मला आठवले.

खरे तर, रेणुका आणि अनसूया या दोघीही वैदर्भी स्त्रिया ऋषिपत्नीच होत्या. दोघींनाही आपल्या परंपरेने वंद्य मानले आहे, पण दोघींच्या स्वभावात आणि चरित्रांत मात्र भरपूर वेगळेपणा आहे. एक, वाट्याला आलेले निमूट सोसणारी, तर दुसरी त्याच्याशी प्रत्यक्ष सामना करणारी, असा हा दोन पतिव्रतांमधील मूलभूत फरक आहे. जमदग्नीसारखा आग्यावेताळ पती वाट्याला आलेली रेणुका स्वतः मुळात पतिव्रता असूनदेखील स्वतःच्या नवऱ्याच्या क्रोधाला अगतिक होऊन सामोरी गेली आणि अबोलपणे त्या अनाठायी क्रोधाग्नीत बळीच पडली. तिचा पती तिचा प्राणघातक आणि तिचा पुत्र तिचा प्राणहारक झाला, पण अत्री आणि अनसूया यांच्या कथेत एक हृद्य वेगळेपणा जोपासलेला आहे. स्वतःच्या आणि पतीच्या परस्पर-विश्वासाच्या बळावर संसारात मनाने स्थिर असलेल्या अनसूयेची कथा माझी एक आवडती कथा आहे. कारण पती-पत्नींच्या संसारात परस्परसामंजस्य असेल, तर स्त्री कोणत्याही बाह्य आपत्तीला, अगदी दैवी कुटिलतेलादेखील कसे खंबीरपणे तोंड देऊ शकते, तेच ही कथा काव्यात्म आणि नाट्यमय पद्धतीने दाखवते.

पातिव्रत्याची कसोटी घेणाऱ्या एक नाही, दोन नाही, तीन देवांच्या कुटिलनीतीला बळी न पडता, अनसूयेने स्वतःच्या बुद्धिचातुर्याने त्या देवांनाच बालके करून त्यांच्या कपटाला हास्यास्पद केले अशी 'दत्तजन्मा'ची कथा आपल्याला परिचित आहे. 'नग्न

होऊन आम्हाला भिक्षा वाढ' असा खोड्याळ पेच तिला टाकणाऱ्या देवांना तिने बालभावात परिवर्तित करून स्तनपान दिलेले आहे. या कथेचा एक विशेष म्हणजे, या कथेत अत्री ऋषींना अजिबात काम नाही. अनसूया यातील खरोखरीची नायिका आहे. सर्व काही अनसूयाच करते. स्त्रीच्या पातिव्रत्याच्या या सत्त्वपरीक्षेत, ऋषिपत्नी अनसूया स्वतःच्या भविष्याला स्वतःच्या हातात घेते. पुढ्यात आलेल्या संकटाला तोंड देताना ही बुद्धिमान स्त्री आपल्या मनाने एक अद्वितीय निर्णय घेऊन कपटी पुरुषांना किंवा कारस्थानी देवांना सामोरी जाते. त्यांच्यावर मातृरूपात कुरघोडी करण्यात यशस्वी होते. या पातिव्रत्य-संबंद्ध कथेत देवांनी रचलेला डाव त्यांच्यावरच उलटतो आणि त्याचा अक्षरश: 'पोरखेळ' होतो.

खट्याळ देवांचेही बालरूपांत परिवर्तन करणाऱ्या, शांत पण खंबीर स्त्रीची ही नाट्यपूर्ण कथा आठवली, की स्त्रीबद्दल खरीखुरी सहानुभूती असणाऱ्या, स्त्रीच्या आंतरिक सामर्थ्याला नीट ओळखणाऱ्या कुणा पारंपरिक लेखकाने ती रचली असावी असे मला राहून राहून वाटते. वैदिक, पौराणिक आणि अर्वाचीन कथासाहित्यातून अनसूयेचे व्यक्तित्व वेगवेगळ्या अंगांनी विकसित होत गेले आहे. रामायणातली सीतेला दागिने देणारी, आणि सीतेची कथा तिच्या तोंडून कौतुकाने ऐकणारी अनसूया पांढऱ्या केसांची, सुरकुतलेल्या अंगाची वृद्धा आहे. चालताना ती वाऱ्याने केळ कापावी, तशी थरथरते. एरवी, भारतीय विशेषतः महाराष्ट्रीय पतीला स्वतःच्या पत्नीबद्दल बोलताना संकोच वाटतो, पण रामायणात अनसूयेबद्दलचे कौतुकोद्गार प्रत्यक्ष अत्रिऋषींनीच काढलेले आहेत. तिच्या तपोबलाचे, तिच्या अजिबात न रागावणाऱ्या गोड स्वभावाचे, आणि देवांनाही मदत करणाऱ्या बुद्धिचातुर्याचे संदर्भ स्वतः तिच्या पतीच्या तोंडूनच रामाला समजतात. बाकी पुराणातूनही तिने वेळोवेळी दाखवलेल्या



समयसूचकतेचे, तिच्या अक्कलहुशारीचे आणि पातिव्रत्याच्या प्रभावाचे अनेक उल्लेख येतात. पण मराठी जनमानसात अढळ स्थान मिळवणारी अनसूया मात्र चिरतरुण आहे, सौंदर्यवती आहे आणि देवांनी घेतलेल्या सत्त्वपरीक्षेत स्वतःच्या बुद्धीच्या बळावर यशस्वी होणारी पतिव्रता आहे. पूर्वी अनेकदा अभ्यासलेल्या आणि नेहमीच आवडलेल्या अनसूयेच्या विलक्षण व्यक्तिमत्त्वाची आठवण अनसूयेच्या मंदिराच्या काळोखात बुडून जाणाऱ्या परिसरात जागी झाली. त्या तल्लख बुद्धीच्या, यशस्विनी, तेजस्विनी अशा पतिव्रतेच्या आठवणीत मी मनोमन रमले.

पुढे आम्ही चंद्रपूरमध्ये पोचलो तेव्हा तिथल्या एका महाकाली-मंदिरात आम्ही प्रथम गेलो. या महाकालीची दोन रूपे या देवळात आम्हाला दिसली. देवळाच्या सभागृहातल्या गाभाऱ्यात इथली महाकाली ताठ उभी आणि जागृत आहे. पण दगडी पायऱ्यांच्या जिन्याने, वाकून देवळाच्या खाली गेल्यावर तिचे शयनगृह दिसते. तिथे मात्र दगडाच्या पर्यंकावर पहुडलेली, विश्रांती घेणारी, पण प्रसन्नमुद्रेची अशी ती देवी दिसते. या देवळात कळले, की ही चंद्रपूरची महाकाली म्हणे कोल्हापूरची अंबाबाई, आणि अमरावतीची अंबादेवी यांची बहीण लागते. विविध ठिकाणच्या देवदेवतांची अशी नाती जोडावीत ही आपल्याकडची कल्पना मला फार कौतुकाची वाटते. आपण एकीकडे मानवी व्यक्तींना देवत्व देतो आणि दुसरीकडे देवतांच्या बाबतीत अशी मानवी नाती कल्पून त्यांनाच आपल्यासारखे मानवी करून टाकतो.

त्याहीपेक्षा कौतुक वाटण्यासारखी एक ऐतिहासिक कथा या देवळाच्या आवारात मला ऐकायला मिळाली. त्या कथेतून राणी हिराई या ऐतिहासिक स्त्रीचे नवीनच दर्शन मला घडले. झाशीची राणी लक्ष्मीबाई आणि इंदोरची अहिल्याबाई होळकर यांच्या गुणांनी एकवटलेले असे या राणी हिराईचे चरित्र आहे, असे आमचे पर्यटनप्रमुख म्हणाले. या महाकाली मंदिराच्या बांधकामाची सुरुवात पंधराव्या शतकातल्या खंडक्या बल्लाळशाह या गोंडवंशाच्या राजाने केली, परंतु पुढील काळातील गोंडवंशाची राणी हिराई हिने या देवळाचा जीर्णोद्धार केला आणि त्याला आजचे रूप दिले असे तिथे कळले. सतराव्या शतकात या हिराईने विदर्भात अनेक मंदिरे बांधली आणि कित्येक मंदिरांचे जीर्णोद्धार केले. चंद्रपूरमध्ये तिने महाकालीच्या मंदिराजवळ एकवीरादेवीचे मंदिर उभारले आणि माहूरच्या रेणुकेशीही या देवीचे नाते जोडून दिले. पण ही झाली राणी या नात्याने तिने केलेली काही सामाजिक, धार्मिक कृत्ये. महाकालीच्या मंदिराशी निगडित अशी तिच्या वैयक्तिक आयुष्यातली जी कथा आहे, ती ऐकल्यावर मला वैदर्भी स्त्री-शक्तीचे एक आणखीच आगळेवेगळे रूप दिसले. ती कथा अशी-

राणी हिराई आणि तिचा पती राजा बीरसाह यांची एकुलती एक मुलगी जयगडच्या दुर्गपाल किंवा दुर्गसाह या राजाला दिलेली होती. हा जावई तिला नीट वागवत नसे. एकदा त्याने हिराईच्या मुलीचा अपमान केला आणि ती अपमानास्पद वागणूक सहन न झाल्यामुळे ती राजकन्या माहेरी परत आली. या घटनेने खवळून त्या जावयाचा सूड घेण्यासाठी मोहीम काढताना हिराई-बीरसाह यांनी महाकालीला, देवीलाच साकडे घातले की ''या मोहिमेत यश दे, तुला त्या दुष्टाच्या शिरातील रक्ताने अभिषेक करीन.'' पुढे महाकालीच्या कृपेने बीरसाहने युद्धात जावयाला मारले आणि त्याचे शीर आणून समारंभपूर्वक महाकालीच्या पायांवर वाहिले. ही कथा ऐकल्यावर वाटले, की आपल्या मुलीला लग्न करून परघरी पाठवून दिल्यावरही तिची पाठराखण करणारे हे वैदर्भी आईबाप खरे वात्सल्य दाखवतात. नाहीतर आहेतच की सिनेमांतून सतत दाखवले जाणारे आणि समाजातही चुकीच्या कल्पनांनी घेरलेले असंख्य लोक. एकदा लग्न करून दिल्यावर मुलीला माहेर उरत नाही, मग तिने तो नवरा कसाही वागला तरी त्याच्यासोबतच नांदायचे, असले चुकीचे निकष लावणारे, आणि मुलींना वैवाहिक अन्यायाच्या खाईत आपल्या हातांनी लोटणारे कित्येक कसाई आपल्याला माहीत असतात. त्या पार्श्वभूमीवर विदर्भाच्या इतिहासात नोंदवलेली ही एक विलक्षण गाथा ऐकून मला फारच कौतुक वाटले. स्त्रीविरुद्ध केलेल्या दुष्कृत्यांची किंमत चुकवायला त्या दुर्गसाहला स्वतःच्या प्राणांना मुकायला लागले. राजा बीरसाहच्या मृत्यूनंतर; साधारण इसवी सन १६५० च्या सुमारास राणी हिराईने या महाकाली मंदिराचा

जीर्णोद्धार तर केलाच, पण पुढील काळातील स्त्री-छळवाद्यांना नीट आठवण राहावी, यासाठी महाकाली मंदिराच्या घुमटावर त्या दुराचारी जावयाचे धडावेगळे केलेले शीर दगडी प्रतिकृतीच्या स्वरूपात टांगून ठेवले. आजही हे शीर तिथे दाखवले जाते. मंदिराच्या कळसावर उत्तराभिमुख किंवा जयगडकडे तोंड करून असलेले हे अपराध्याचे मुंडके लटकावलेले आम्ही पाहिले आणि मानी राणी हिराईच्या जाज्वल्य स्त्रीशक्तीचा हा वैदर्भी साक्षात्कार मनोमन जपला.

पौराणिक रेणुका, महाकाव्य आणि पुराणातून लोककथेत अवतरलेली अनसूया आणि ऐतिहासिक हिराई अशी प्राचीन स्त्रीशक्तीची त्रिविध रूपे विदर्भात आम्हाला सामोरी आली. तशीच साधनाताई आमटे, डॉ. मंदा आमटे आणि डॉ. राणी बंग या आजच्या स्त्री-शक्तीचीही त्रिविध रूपे आम्ही त्या तिघींच्या कार्यक्षेत्रांमध्ये जाऊन प्रत्यक्ष निरखली. हा योग मला खरोखर दुर्मीळ वाटला. यातील साधनाताई हे संपूर्णतया समर्पित व्यक्तिमत्त्व आहे. प्रस्थापितांच्या समाजाला धक्के देत देत जागे करणाऱ्या आणि विस्थापितांना सक्षम पुनर्वसनाचे वळण लावणाऱ्या बाबा आमटे यांच्या नित्यनूतन वाढत जाणाऱ्या आणि धाडशी प्रकल्पांमध्ये, डोळे उघडे ठेवून पण सर्वशक्तीनिशी संपूर्ण साथ देणे हे त्यांच्या जीविताचे सार म्हणता येईल. अत्रि अनसूयेच्या कथेमध्ये जसे पतिपत्नींमधील संपूर्ण सामंजस्य आणि चिरंतन प्रेम आपल्याला दिसते, तसेच बाबा आणि साधनाताई यांच्या आयुष्यातही ते आपल्याला आढळून येते. या पर्यटनातून आनंदवनात पोचण्यापूर्वीच, साधनाताईंनी लिहिलेले 'समिधा' हे विलक्षण वेधक आत्मकथन मी वाचून काढले होते. त्यात दिसणाऱ्या त्यांच्या निश्चयी, मितभाषी, पण सक्षम व्यक्तिमत्त्वाने मी आधीच खूप प्रभावित झाले होते. लाडाकोडाने वाढलेली ही मनस्वी मुलगी लग्नानंतर आपला सुखवस्तू जीवनक्रम बदलून नवऱ्याच्या जगावेगळ्या सर्व अभूतपूर्व प्रकल्पांत साथ देताना लंकेची पार्वती बनते आणि तरीही स्वतःचे आयुष्य सार्थकी लावते, हे मुळातूनच प्रत्येकीने वाचायला हवे. 'समिधा' हे त्यांच्या आत्मकथनाचे नावच बोलके आहे. बाबांनी सुरू केलेल्या मानव्याच्या यज्ञात स्वखुशीने आपल्या आयुष्याच्या समिधेचे समर्पण साधनाताईंनी केले. आधुनिक पतिव्रतेच्या या अर्वाचीन अवतारात कितीतरी शक्ती आहे. केवळ शारीरिक कष्टच नव्हेत, तर मानसिक शक्तीचेही आविष्कार त्यांच्या वेगळी वाट चोखाळण्याच्या निर्णयात प्रकट झालेले दिसतात. कुष्ठरोग्यांचे पुनर्वसन या सुरुवातीतून पुढे गेलेला, असंख्यांना दिलासा देणारा, अनेकांना सक्षम बनवणारा आनंदवनातील बहुआयामी प्रकल्प राबवण्यात बाबांच्या बरोबरीने साधनाताईंचा सहभाग आहे.

आनंदवनात बाबांच्या मागे, बाबा नसताना आम्ही गेलो, पण त्यांनी घालून दिलेली घडी अगदी व्यवस्थितपणे चालवण्यात साधानाताईंचे केवढे मोठे कर्तृत्व आहे याचे प्रत्यंतर तिथले सर्व प्रकल्प पाहताना आणि साधनाताईंशी प्रत्यक्ष बातचीत करताना आले. प्रखर ध्येयनिष्ठा जागृत ठेवूनही आपल्या सौम्य आणि मायाळू व्यक्तिमत्त्वाने सर्व लोकांना आपलेसे करून टाकण्याचा साधनाताईंचा स्वभाव आहे. सर्व कार्यकर्त्यांच्या बोलण्यातून त्यांच्याविषयीचा सहज आदर आणि आत्मीयता आम्हाला जाणवत होती. तिथल्या पुनर्वसन करून दिलेल्या रहिवाशांच्या कार्यशाळेत तयार झालेले पंचे, टॉवेल, नॅपकिन वगैरे आम्ही पाहत होतो, तेव्हा या सर्व वस्तू स्वतः साधनाताईदेखील इथून 'विकत' घेतात असे कळल्यावर तर त्यांच्याबद्दलचा आदर आणखी वाढला. बाबांच्या झंझावाती व्यक्तिमत्त्वाइतक्याच विकासभाऊंच्या नाविन्यपूर्ण, प्रायोगिक आणि अत्याधुनिक, कल्पक नेतृत्वाच्या विपुल खुणा आनंदवनातील विविध प्रकल्प न्याहाळताना आपल्याला जागोजाग दिसतात. संधिनिकेतन, मुक्तिसदन, युवाग्राम आणि उत्तरायण अशा अनेक अंगांनी आनंदवनाचा विस्तार झालेला आहे. त्यांच्या विविधांगी समाजोन्नतीच्या उपक्रमांबद्दल मी नव्याने काही लिहिले पाहिजे असे नाही. पण त्या बापलेकांच्या या सर्व उपक्रमांतील महत्त्वाचा अनमोल सहभाग साधनाताईंचा आहे हे मात्र मला तिथे जाणवत राहिले.

त्या सकाळी, एक-दीड तासभर साधनाताईंनी त्या आवारात जमलेल्या, आमच्यासारख्या अनेक पर्यटकांच्या सर्व प्रकारच्या प्रश्नांना सहजपणे उत्तरे दिली. त्यांच्या बोलण्यात त्यांचा साधेपणा, खंबीरपणा, नेमकेपणा, वाट्याला आलेल्या स्वतःच्या

आयुष्याबद्दलचे समाधान आणि दुसऱ्यांच्या कार्याबद्दलचा जिव्हाळा, कौतुक असे सगळे मला जाणवले. माझी आणि माझ्या आईची पुस्तके त्यांना मी दिली, तेव्हा माझ्या सासर-माहेराबद्दल, माझ्या घरातल्यांबद्दलही त्यांनी अगत्याने चौकशी केली. साधनाताईंच्या आत्मकथनात त्यांच्या स्त्री-शक्तीचे विविध आविष्कार समग्र वाचायला मिळालेच होते. त्या साधनाताईंची प्रत्यक्ष भेट घेण्याचा, त्यांच्या पायांशी बसून त्यांचे सहजसुंदर बोलणे ऐकण्याचा आनंद अनमोल वाटला.

आनंदवनात साधनाताईंना भेटल्यानंतर आम्ही गडचिरोली जिल्ह्यातील हेमलकशाचा 'लोक-बिरादरी प्रकल्प' पाहायला गेलो. बाबा आमटे यांनी सुरू करून दिलेला, पण त्यांच्या धाकट्या मुलाने आणि सुनेने पुढे चालवलेला हा आदिवासींच्या सर्वांगीण सुधारणेचा आरोग्य-प्रकल्प आहे. तिथे डॉ. मंदा आमटे हे आणखी असेच एक स्त्रीशक्तीचे सुंदर रूप पाहिले. बाबा आणि साधनाताईंची ही एक कर्तबगार, आनंददायिनी सून. डॉ. प्रकाश आमटे यांची सुविद्य सहचारिणी-सहकारिणी पत्नी. रॅमन मॅगसेसेसारखे उत्कृष्ट समाजसेवेचं आंतरराष्ट्रीय पारितोषिक आमट्यांच्या घरातल्या दोन पिढ्यांना, दोन जोडप्यांना एकामागून एक असे मिळणे, हा एक विक्रमच म्हणायला हवा. बाबा आमटे व साधनाताई ही थोरली पाती, आणि डॉ. प्रकाश व डॉ. मंदा आमटे ही धाकली पाती, या दोन्ही जोडप्यांनी हा मान मिळवलेला आहे. या धाकट्या आमटे जोडप्याच्या कर्तृत्वाचा आणखी एक सत्कार मोनॅको या देशाने त्या दोघांच्या चित्राचे एक पोस्टाचे तिकीट काढून केलेला आहे. अशा विविध आंतरराष्ट्रीय सन्मानाने विभूषित झालेले, पण सरळ, साधे, हसतमुख असे मंदाताईंचे रूप आम्ही पाहिले. डॉ. मंदा या डॉ. प्रकाश यांच्या बरोबरीने हेमलकशातील आदिवासींच्या वैद्यकीय सेवेचे काम करत आहेत. पतीच्या खांद्यास खांदा लावून डॉक्टरकी आणि संसार अशा दोन्ही आघाड्यांवर कार्यरत असलेले हे व्यक्तिमत्त्व आहे. या दोघांचा मुलगा डॉ. दिगंत आणि त्याची सुविद्य पत्नी ही आमटे घराण्यातली तिसरी पिढीदेखील आता या कार्यात स्वतःच्या सर्वशक्तीनिशी उतरली आहे. म्हणजेच, हा समाजसेवा आणि आरोग्य-सुधारणांचा कार्ययज्ञ पुढे चालवण्यात प्रकाश आणि मंदा या दुसऱ्या पिढीलाही तितकेच यश लाभलेले आहे. त्यांच्या घरात त्या दिवशी मुलासुनांची, पाहुण्यांची गडबड होती, आणि त्यांची नित्य-नैमित्तिक कर्तव्येही त्यांना भरपूर होती. तरीदेखील या दांपत्याने आम्हाला वेळ देण कौतुकाचे वाटले. डॉ. मंदा आमटे आमच्याशी बोलताना मध्येच उठून मागे कशानेसे रडणे सुरू केलेल्या आपल्या छोट्या नातवाला उचलून घेत होत्या, आत जाऊन, त्याला मायेने गप्प करून, पुन्हा बाहेर येऊन श्रोत्यांशी आपल्या वैद्यकीय अनुभवांबद्दल बोलताना; सक्षम स्त्री एकाच वेळी सर्व आघाड्यांवर कशी लढू शकते, आणि पतीची समंजस साथ असेल तर ते लढणे म्हणजे चांदण्यातून चालणेच असल्यासारखे सहजपणाने कशी झेलून दाखवू शकते, तेही दिसून आले. 'समिधा'मध्ये साधनाताईंनी लिहिले आहे, की ''मंदामध्ये मला नेहमीच माझी तारुण्यातील, माझ्याहीपेक्षा काकणभर सरस असलेली प्रतिकृती दिसते. मी तिला वर्तमान युगातली 'पतिव्रता' म्हणते.'' प्रत्यक्ष कर्तबगार सासूकडून असा सन्मान मिळवणारी ही सून आपल्या मुलीसुनांसह वाढत्या घरसंसारात आणि स्वतःच्या सामाजिक आरोग्यदायी कार्यक्षेत्रात रमलेली पाहून फार कौतुक वाटले.

साधनाताई आणि मंदाताई, यांच्या प्रत्यक्ष भेटीचा आल्हाद आम्हाला मिळाला, पण शोधग्रामला गेल्यावर डॉ. राणी आणि डॉ. अभय बंग यांच्या कार्यक्षेत्रात फिरून माहिती घेत असताना, त्या दोघांपैकी कोणाचेच प्रत्यक्ष दर्शन झाले नाही. कारण डॉ. अभय प्रवासाच्या तयारीत गुंतले होते आणि डॉ. राणी या ओ.पी.डी.मध्ये रुग्णांना तपासण्यात गुंतलेल्या होत्या. सकाळी आठपासून दुपारी चारपर्यंत, मध्ये स्वतःसाठी खाण्याचीदेखील सुट्टी न घेता त्या रुग्णसेवेत दंग होत्या. शोधग्राममधील ग्रंथालयाची आणि पाहुण्यांची व्यवस्था पाहणारी प्रमुख चेतना हिनेच आम्हाला फिरून सगळीकडची माहिती दिली. त्यानंतर आणखी एका कार्यकर्त्याने हॉलमध्ये आम्हाला प्रकाशचित्रांच्या साहाय्याने शोधग्राममधील संशोधनाची आणि जागतिक महत्त्वाच्या प्रकल्पांची अधिक माहिती दिली. सेवाग्रामपासून स्फूर्ती घेऊन सुरू झालेला, पण सततचे मूलगामी संशोधन आणि

नंतरची वैद्यकीय सेवा असे चालू ठेवल्यामुळे 'शोधग्राम' हे नाव सार्थ ठरवणारा हा हिरवागार परिसर आहे. तिथे आम्ही सर्वत्र फिरलो. ज्या आदिवासींसाठी ही आरोग्यसेवा सुरू केली, त्यांना आपले वाटावे, अशा पद्धतीच्या मातीच्या गोल छपराच्या झोपड्यांमधून चालणारे आरोग्यसेवेचे काम पाहिले. शोधग्रामच्या दारातून आत येतानाच दिसणारी, आदिवासींच्या देवतेची, माँ दन्तेश्वरीची देवळी पाहिली. त्यांना जवळीक वाटेल अशा पद्धतीने स्वतःला बरेचसे वाकवून, त्यांच्याकडूनही थोडेफार शिकत शिकत, शेवटी त्यांनाच आरोग्यपूर्ण जगणे शिकवण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयोग तिथे चाललेला प्रत्यक्ष पाहिला. जागतिक स्तरावर संशोधनाचे अनेक पुरस्कार मिळवणाऱ्या या जोडप्याने आजवर मिळवलेली पारितोषिके, सन्मान, आणि पुरस्कार मांडून ठेवण्यासाठी एक अख्खी खोलीच भरून गेलेलीही पाहिली.


त्यांच्या कार्यक्षेत्रात फिरताना त्यांच्या जवळच्या कार्यकर्त्यांच्या बोलण्यातूनही या कार्याच्या महत्त्वाची आणि या दोघांच्या निरलस उत्साहाची, स्फूर्तिदायक कल्पना मिळतच होती. तेवढेच मला पुरेसे होते. पण आमच्या काही लोकांचा त्यांनी प्रत्यक्ष भेटावे असा आग्रह होता. त्याला मान देऊन, पर्यटनप्रमुख शेवटी डॉ.राणी बंगांच्या दवाखान्यात गेले. आम्ही सर्व पाहणे आटपून बाहेर बसमध्ये थांबलो होतो. सरमुकादम नंतर गुपचूप बाहेर येऊन बसमध्ये बसले, बस चालू झाली आणि परतीच्या वाटेवर त्यांनी आम्हाला तिथे झालेला संवाद सांगितला, तो मला फारच उद्बोधक वाटला. विवेक सरमुकादम डॉ. राणी बंगांना म्हणाले, 'अहो, देवळात येऊन देवाच्या मूर्तीचं दर्शन घेतल्याशिवाय कसं परत जायचं आमच्या लोकांनी? जरा दोन मिनिटं तरी द्या ना त्यांना भेटायला.' त्यावर समोर बसलेल्या रुग्णांच्या दिशेने हात करून डॉ. राणी म्हणाल्या, 'अहो, माझे सगळे हे देव माझ्या पुढ्यात असताना मी ही पूजा सोडून बाहेर कशी येऊ?' आणि रुग्णांना तपासण्याच्या नित्यकर्मात गुंतलेली ती बाई कामातच व्यस्त राहिली. या तिच्या निर्णयातच मला सेवाभावी खंबीर स्त्रीशक्तीचा आणखी एक उत्तम, उदात्त, उन्नत असा साक्षात्कार झाला. आणि पाहायला न मिळालेली ती कार्य-व्याप्त स्त्री अधिकच आदरणीय, आणि अधिक कौतुकास्पद वाटली.

पौराणिक आणि ऐतिहासिक तीन स्त्रीशक्तीच्या मूर्तींबद्दल मी लिहिले, त्यातील दोघींच्याच मंदिरात आम्ही जाऊ शकलो, पण तिसरीचे मंदिर बघता आले नाही, तसेच आधुनिक तीन स्त्रियांच्या कार्यक्षेत्रात आम्ही गेलो, दोघींना प्रत्यक्ष पाहिले, पण तिसरीला भेटू शकलो नाही. या योगायोगाचीही मला गंमत वाटली. 'विदर्भामध्ये गाजलेल्या जब्बर तीन बाया, दोन दिसल्या, एकऽ भेटेचिना!' असे मी भारुडाच्या चालीवर मनात गुणगुणत राहिले.

विदर्भ प्रत्यक्ष पाहिला नव्हता, तेव्हा विदर्भातील स्त्रीबद्दल माझी कल्पना फारच त्रोटक आणि धूसर होती. एक म्हणजे कविकुलगुरू कालिदासाच्या प्रतिभेतून साकारलेली मेघदूतातली यक्षी, 'तन्वी श्यामा शिखरिदशना, पक्वबिंबाधरोष्ठी' अशी काल्पनिक स्त्रीच मला 'वैदर्भी' म्हणून माहीत होती. या खेपेच्या विदर्भ-पर्यटनात रामटेकच्या कालिदासाच्या स्मारकातील भित्तिचित्रांमध्ये ती सुंदरी वैदर्भी चित्रकाराच्या कल्पनेने साकारलेली आम्ही पाहिली, पण अशी सौंदर्यवल्ली काही विदर्भाच्या पर्यटनात मला कुठे समक्ष दिसली नाही. अर्थात, सौंदर्यवती अनेक असतील, फक्त माझ्या दृष्टीस पडल्या नाहीत, एवढेच. दुसरी माझ्या आठवणीतली, वाचनातली वैदर्भी म्हणजे रुक्मिणी. स्वतःच्या मनातल्या प्रियकराला पत्र पाठवून स्वतःचे मन मोकळे करणारी, त्याच्यासह पळून जाऊन विवाहबद्ध होणारी मनस्वी विदर्भराजकन्या. पण तिच्याही कथेशी संबद्ध असलेली स्थळे, म्हणजे अमरावती, कौंडिण्यपूर वगैरे आम्ही या खेपेच्या पर्यटनात पाहू शकलो नाही. तरी पण विदर्भाच्या या दहा दिवसांच्या त्रोटक आणि तरीही वैविध्यपूर्ण प्रवासात जित्याजागत्या वैदर्भी स्त्री-शक्तीचे पौराणिक, ऐतिहासिक आणि आधुनिक काळातले जे विविध आविष्कार माझ्या पुढ्यात आले, तेवढ्यांच्या साक्षात्कारानेच माझा हा प्रवास सुफळ, संपन्न आणि संस्मरणीय झाला.

---

**– विद्युल्लेखा अकलूजकर**
vidyut.aklujkar@gmail.com




दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !


चौगुले समूह

**चौगुले अँड को. प्रा. लिमिटेड** : नोंदणीकृत कार्यालय : चौगुले हाऊस, मार्मागोवा हार्बर –४०३८०३, गोवा – भारत.

# संपादकांचे ऱ्हासपर्व

## नरेंद्र बोडके

लिहित्या हातांचे काही लेखक काही महिन्यांपूर्वी एकत्र जमले होते. त्यात दोन पत्रकार-लेखकही होते. सदा डुंबरे आणि महावीर जोंधळे. त्या दोघांनीही पत्रकारितेतील सद्यस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली. डुंबरे सकाळसारख्या नामवंत समूहात होते. एका भरपूर खपाच्या साप्ताहिकाचे संपादक होते. जोंधळे आणि मी काही काळ एकत्रच होतो. महावीरभाई संपादक होते. मी त्याच दैनिकाचा निवासी संपादक होतो. पाऊणशे वर्षांच्या परंपरेचे आम्ही पाईक होतो. आधी जोंधळे गेले. त्यांनी आकस्मिक राजीनामा दिला. मी त्यांचा सहकारी. जवळचा मित्र. शिवाय कवी वगैरे. मलाही विश्वासात न घेता त्यांनी राजीनामा दिला. कारण? निवांत लेखन-वाचनाला वेळ द्यायचा म्हणून. सहा महिन्यांनी मला महावीरभाईंच्या तत्कालीन मनोवस्थेचा अर्थ कळला. मालक एक कोंडी निर्माण करतात. त्यात तुम्ही अलगद अडकलेले असता. त्यांच्या आदेशावरून अनेक अप्रिय निर्णय घेतलेले असतात. आणि लहान मुलाला जुन्या खेळण्याचा कंटाळा यावा तसा आता मालकाला जुन्या संपादकाचा, त्याच्या कल्पनांचा कंटाळा आलेला असतो. त्याला नवे खेळणे हवे असते. तुमची त्याला अडचण होते. मग कधी करार संपल्याचे निमित्त होते. कधी एक दोन महिन्यांचा पगार देऊन टाटा करण्यात येते तर कधी राजीनाम्यासाठी दबाव आणला जातो. प्रमुख पत्रकार असलेला हा माणूस स्वतःवर धडधडीत अन्याय होत असताना काहीच करू शकत नाही. ती कोंडीच अशी विचित्र असते. कालांतराने संधी मिळताच ठसठस व्यक्त केली



जाते. वर्तमानपत्र हे प्रॉडक्ट झाले आहे ही डुंबरे यांची खंत किंवा महावीरभाईंनी व्यक्त केलेला विषाद ज्या परिस्थितीतून निर्माण झाला आहे तिचा अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. त्याशिवाय समस्या लक्षात येणार नाही.

इतर कंपन्यांप्रमाणे वृत्तपत्रीय आस्थापने याही कंपन्याच असतात. कधी फर्म, कधी प्रा.लि., कधी लिमिटेड कंपनी असे त्यांचे स्वरूप प्रत्येक मालकाच्या गरजेनुसार ठरते. ग्राहकोपयोगी वस्तूंची निर्मिती करणारी एखादी प्रा.लि. कंपनी आणि सकाळ किंवा प्रभात छापणाऱ्या कंपन्या यात कायद्याच्या दृष्टीने फरक नसतो. पण वृत्तपत्र हे प्रॉडक्ट मानले जात आहे आणि त्याबद्दल संपादकांना खंत वाटते आहे. प्रॉडक्ट म्हणजे शेवटी काय? तर बाजारपेठेत ग्राहकाला विकून नफा कमावण्यासाठी निर्माण केलेली वस्तू. वृत्तपत्र ही अशी वस्तू आहे का? केवळ नफा हा वृत्तपत्राचा हेतूच असू शकत नाही. माहिती, प्रबोधन व करमणूक यापैकी प्रबोधन हा सर्वात मूलभूत हेतू साध्य होत नसेल तर वृत्तपत्र छापायचे कशासाठी?

वृत्तपत्रसृष्टीचा हा ऱ्हास गेली अनेक वर्षे सुरू आहे. आम्ही लोकसत्तात असताना आमच्या डोळ्यांसमोरच द्वारका बुडू लागली होती. अनेक वर्षे खस्ता खाल्ल्यानंतर आम्हाला चांगला पगार व व्यावसायिक सुरक्षिततेची स्वप्ने पडू लागली होती. बछावत आयोगानुसार गणिते मांडण्यात येऊ लागली होती. नेमक्या याच वेळी पत्रकारितेत उच्च पदांवर काही टिक्कोजीराव स्थानापन्न झाले. त्यांनी कधी रात्रपाळ्या केल्या नव्हत्या. श्रमिक पत्रकार म्हणून कधीच काम केले नव्हते. व्यवस्थापनाने अव्वाच्यासव्वा पगार देऊन त्यांचे भलते लाड केले. दौऱ्यावर त्यांची फाईव्हस्टार व्यवस्था असायची. हे सगळे कशासाठी? श्रमिक पत्रकारांना वाढीव पगार, पेन्शन वगैरे सुविधा व्यवस्थापनाला द्यायच्या नव्हत्या. त्यासाठी त्यांनी हे रेडीमेड विचारवंत पाळले आणि श्रमिक पत्रकारिताच मोडीत काढली. या टिक्कोजीरावांच्या साक्षीने पहिली त्सुनामी आली तिचे नाव होते कंत्राटी पध्दत. वास्तविक इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्टनुसार एखाद्या व्यवसायाची मुख्य उलाढाल कंत्राटी असू शकत नाही. उदा. वृत्तपत्राचे मुख्य काम बातम्या मिळविणे हे असते. साहजिक वार्ताहर व

इतर कंपन्यांप्रमाणे वृत्तपत्रीय आस्थापने याही कंपन्याच असतात. कधी फ र्म, कधी प्रा.लि., कधी लिमिटेड कंपनी असे त्यांचे स्वरूप गरजेनुसार ठरते. ग्राहकोपयोगी वस्तूंची निर्मिती करणारी एखादी प्रा.लि. कंपनी आणि सकाळ किंवा प्रभात छापणाऱ्या कंपन्या यात कायद्याच्या दृष्टीने फ रक नसतो. पण वृत्तपत्र हे प्रॉडक्ट मानले जात आहे आणि त्याबद्दल संपादकांना खंत वाटते आहे. प्रॉडक्ट म्हणजे शेवटी काय? तर बाजारपेठेत ग्राहकाला विकून नफा कमावण्यासाठी निर्माण केलेली वस्तू. वृत्तपत्र ही अशी वस्तू आहे का? केवळ नफा हा वृत्तपत्राचा हेतूच असू शकत नाही. माहिती,प्रबोधन व करमणूक यापैकी प्रबोधन हा सर्वात मूलभूत हेतू साध्य होत नसेल तर वृत्तपत्र छापायचे कशासाठी?

उपसंपादक हे कंत्राटी असू शकत नाहीत. वृत्तपत्र वाटपाचे काम करारावर देता येते. पण व्यवस्थापनाने निवडक पत्रकारांना हाताशी धरून श्रमिक पत्रकारांना संपविले. तळवलकर-गडकरी यांच्यासारखे संपादक निवृत्त झाल्यावर जी नवी फळी आली तिला पत्रकारितेतील श्रमव्यवस्थेशी काही देणे-घेणे नव्हते. त्यांनी आपापले पगार-पाणी पाहिले. विचारवंत म्हणून मिरवताना किंवा कार्यक्रमांची निमंत्रणे स्वीकारताना आपण पत्रकारांच्या एका पिढीच्या टाळूवरचे लोणी खात आहोत याचे भान असते तर समाजाला सदुपदेश करण्यासाठी त्यांची जीभ टाळूला लागलीच नसती. कायम कामगारांच्या बदल्यांचे सत्र सुरू झाले. बदल्या नको असतील तर स्वेच्छानिवृत्ती स्वीकारा. कामगार पोरके झाले. श्रमिक पत्रकार सैरावैरा धावले, धावले आणि अखेर वस्तुस्थिती स्वीकारून नोकऱ्यांना चिकटून राहिले. कंत्राटी तर कंत्राटी. वर्ष दोन वर्षात त्याही नोकऱ्या गेल्या. मग या पेपरमधून त्या पेपरमध्ये. छोट्या गावातील मातब्बरांकडे. ऱ्हास सुरूच राहिला.

मग मोठ्या प्रमाणात लुटालूट सुरू झाली. अनेक ठिकाणी तर सध्या कसलेही नियुक्तीपत्र न

देताच कर्मचारी नेमतात. रोख पैसे देऊन काम करून घेतात. मुख्य वार्ताहर हे पद बाद ठरले आहे. धंद्याचे हित सांभाळणारा एखादा चमचा समन्वयक म्हणून नेमला जातो. वेगवेगळ्या बीटवर धंदा आणणारे चमचे नेमले जातात. हे चमचे संपादकांनाही जुमानत नाहीत. पगारावर ते अवलंबून नसतात. त्यांना पगाराव्यतिरिक्त तीस ते चाळीस टक्के कमिशन असते. जे संपादक आडवळणाने किंवा थेट ही कामे करून देण्याची तयारी दर्शवितात ते टिकतात. इतरांची परवड होते.

उपसंपादकांना कायद्याचे संरक्षण असूनही ते घेण्याची हिंमत नसते. नेमणूकपत्र मागितलेच तर कुठल्यातरी फीचर सर्व्हिसचे दिले जाते. वर्किंग जर्नालिस्ट्स ॲक्ट सर्वांनी मिळून गुंडाळून ठेवला आहे. संघटना हतबल आहेत. सहा तासांच्या ऐवजी आठ दहा बारा तास कामाची अपेक्षा ठेवली जाते. पगार तोच. त्यातही रजांचे पैसे कापले जातात.

या सगळ्यापेक्षा भयानक गोष्ट घडते आहे. संपादनाचे उपसंपादकांचे अधिकार व्यवस्थापक वापरत आहेत. कुठल्या बातम्या किती मोठ्या छापायच्या ते जाहिरात खात्याचे लोक ठरवू लागले आहेत. बातमीत अमक्याचे नाव ठेवा, तमक्याचे गाळा हेही आदेश ती मंडळी देतात. जे जाहिरातींचा मलिदा देऊ शकतील त्यांनाच प्रसिध्दी द्यायची असे हे तंत्र आहे. म्हणजे थोडक्यात पैसेवाल्यांनाच प्रसिध्दी. याप्रकारे आपण कायद्याचे उल्लंघन करीत आहोत याचे भान कधी असते कधी नसते. कायद्यानुसार संपादकीय मजकुराची जबाबदारी यांच्यावर अशी ओळ छापली जाते. त्या नावासमोर फुली छापली जाते. कोर्टकज्जे झाले तर ती सोय. पण खरे तर हाच माणूस न्यायदेवतेच्या नजरेतून संपादक असतो. त्याच्या परवानगीशिवाय मजकूर छापलाच जाता कामा नये. पण त्याला गुंडाळून ठेवण्याच्या वेगवेगळ्या क्लृप्त्या लढवल्या जातात. कंपन्यांच्या पत्रकार परिषदांना जाहिरात खात्याची माणसं जाऊन बसतात. त्या बातम्या संपादकांच्या संमतीविना स्मगल करून छापल्या जातात. शिवाय राजकीय बातम्यांसाठी वेगवेगळ्या पक्षांचे लॉबिंग चालते. त्यांचे त्यांचे पाळीव लोक असतात. ते बातम्या आपापल्या पाळीत घुसवतात. जो संपादक जाब विचारतो तो अप्रिय ठरतो. त्याला हुसकावण्यासाठी वेळप्रसंगी गलिच्छ आरोप केले जातात. अशा वेळी हितसंबंधांच्या शृंखलेत असलेले सारे निर्लज्जपणे एकत्र येतात. स्वतःवरील अन्यायाविरुध्द जे लढू शकत नाहीत ते दुसऱ्यावर अन्याय करण्यासाठी मात्र एकत्र येतात. ही अशी मानसिकता असते.

संपादकपदाचे खच्चीकरण करण्यासाठी वेगवेगळी पदे निर्माण करण्यात आली. गुंतागुंतीची परिस्थिती समोर आली म्हणजे माणसे गांगरून जातात, असा अनुभव आहे. डेप्युटी एडिटर हे असेच एक पद. मोठ्या संस्थेत प्रत्येक संपादकीय जबाबदारीसाठी वेगळा डेप्युटी एडिटर असणे समजू शकते. पण जिथे संपादकांनाच आपल्या कामाचे स्वरूप निश्चित करून देण्यात आलेले नाही तिथे हा डेप्युटी एडिटर आणखी काय करणार? शिवाय ही पदे पाहा– व्यवस्थापकीय संपादक, समूह संपादक, प्रबंध संपादक, समूह प्रबंध संपादक, प्रमुख संपादक, संचालक-संपादक, संपादक, उपप्रमुख संपादक (तेच ते – डेप्युटी एडिटर), संपादक (आशय व्यवस्थापन), संपादक (क्वालिटी कंट्रोल), संपादक (प्रकाशन विभाग), कार्यकारी संपादक, निवासी संपादक, शहर संपादक, आवृत्ती संपादक, वृत्त समन्वयक वगैरे. शिवाय खाशांसाठी खास पद– अध्यक्ष, संपादक मंडळ. अध्यक्षाला संपादनातले काही कळायला हवे अशी अपेक्षा कशासाठी? शिक्षणक्षेत्राचा आदर्श आहेच. आवश्यक त्या शैक्षणिक पात्रता प्राचार्यांकडे असल्या की झाले. संस्थेचा अध्यक्ष अडाणी असला तरी चालतो. त्या धर्तीवर संपादक मंडळ चालायला काय हरकत आहे? या वेगवेगळ्या पदांची आवश्यकता असतेच. अध्यक्षाला पगार नसतो पण व्यवस्थापकीय संचालकाला असतो, व्यवस्थापकीय संपादकालाही असतो. त्या पगारासाठी खाशांना ही पदे दिली जातात. इतरांसाठी ही पदे म्हणजे वाटाण्याच्या अक्षता असतात.

कपाळी नाही कुक्कू
म्हणे ही माही बायकू...

या उक्तीची आठवण व्हावी अशी अनेक पदे असतात.

गेल्या काही वर्षांमध्ये पेड न्यूजचा फंडा आला आहे. (ही भाषाही त्यांचीच.) इंग्रजी पेपरवाल्यांनी

ॲडव्हर्टाइजमेंट आणि एडिटोरियल यांच्या एकीकरणातून ॲडव्हर्टोरियल हा शब्द घडवला. जाहिरातीच्या दराने बातमीसारखा मजकूर छापायचा, ही त्यामागची मूळ कल्पना. जाहिरात दिली की हा मजकूर पैसै देऊन छापला आहे हे उघडच होते. काहींना बातमीसारखा प्रभाव हवा असतो. त्यासाठी ॲडव्हर्टोरियलची कल्पना आली.

मी नाही त्यातली
अन आधी कडी लावा आतली...

एकदा चटक लागली की कुठे थांबायचे ते कळत नाही म्हणून तर या अवदशेला ऱ्हास म्हणतात. इंग्रजी ॲडव्हर्टोरियल मराठीत पेड न्यूज या नावाने अवतरले. थेट बातमीच. वाचकाला गुंगारा देऊन. त्याला वाटतं की आपण बातमी वाचतो आहोत. प्रत्यक्षात त्या मजकुराचे जाहिरातीच्या दराने तर कधी दामदुप्पट पैसे घेतले जातात. पहिली फसवणूक होते ती वाचकाची. सोलापूरमध्ये अमुक तमुक यांचा विजय निश्चित... असा मथळा वाचून वाचकाला वाटतं की खरंच तशी स्थिती आहे की काय? प्रत्यक्षात तसं काहीच नसतं. नुसती हूल उठवलेली असते. त्यानंतर फसवणूक असते आयकर खात्याची. हा व्यवहार रोख असतो. पावत्या मागितल्या तर दिल्या जातात. बहुतेकदा काळा पैसा असतो. हेच ते कायद्याने निषिद्ध मानलेले ब्लॅक मार्केटिंग. कोण किती पैसा कमावतो हे कळण्याची यंत्रणा नसेल तर देशाची अर्थव्यवस्था चालूच शकणार नाही. म्हणून प्रत्येक व्यवहाराचा पुरावा ठेवणे आवश्यक असते. पेड न्यूजच्या माध्यमातून काळा पैसा निर्माण केला जात आहे. उद्या सीबीआयच्या आर्थिक गैरव्यवहार विभागाने अशा आस्थापनांविरुध्द धाडी टाकल्या तर आश्चर्य वाटायला नको.

या पैशाच्या आशेतून ब्लॅकमेलिंगपर्यंत मजल गेलेली आहे. म्हणजे उदाहरणार्थ माहिती अधिकारात मिळालेली माहिती छापायची व नंतर संबंधितांशी आर्थिक तडजोड करून उर्वरित मजकूर दाबून ठेवायचा.

निवडणुका म्हणजे लोकशाहीचे भूषण. त्या निवडणुकांचा माध्यमांनी पार कचरा करून टाकला आहे. निवडणूक आयोगाने निवडणूक खर्चावर मर्यादा घातली आहे. हे कायदे पाळण्यासाठी असतात की टाळण्यासाठी? उमेदवार त्यातून वाट काढायला बघतात. त्यांच्या बातम्या छापून येतात. त्याबद्दल पॅकेज ठरलेले असते. रोख पैसे पोहोचते होतात. आयोग अंघारात राहातो. उमेदवाराला प्रसिध्दी मिळते. माध्यमांना पैसे मिळतात. हा लोकशाहीशी चाललेला खेळ आहे. देशद्रोह म्हणजे वेगळे काय असते, असा प्रश्न करून पाहावा. उत्तर क्लेशदायक येईल.

या प्रकारात संपादकांना वेठीस धरणे हा या ऱ्हासपर्वातील शेवटचा सर्ग आहे. तो सुरू झालेला आहे. दहा वर्षांपूर्वी टिक्कोजीरावांना वापरून घेण्यात आले, तेव्हा श्रमिक पत्रकारिता संपवणे हा हेतू होता. तो साध्य झाला. आता पुढचा टप्पा लूटमारीत सहभागी करून घेण्याचा आहे. दरमहा लाख दोन लाख पगार कशासाठी दिले जातात? बड्या नेत्यांच्या जवळ राहा, उद्योगपतींच्या जवळ रहा. त्यांच्यापासून फायदा मिळवून द्या. त्या बदल्यात सहा आकड्यात पगार घ्या.

संपादकांच्या विदेशवाऱ्या, राज्यसभा-लोकसभेची तिकिटे, किताबांची खिरापत राजरोस चाललेले असते. एका संपादकाने दिल्लीच्या एका वार्ताहराची बदली केली होती. ती करताना एका पॉवरफुल नेत्याबद्दल सतत अनुकूल छापत असल्याचा आरोप केला होता. काही वर्षे गेली. संपादक पॉवरफुलांच्या पेपरमध्ये गेले. तिथून निवृत्त झाले. पुढे त्यांनी लाखो रुपयांचे मानधन घेऊन पॉवरफुलांच्या विचारसूत्रांचे संपादन केले. हे आमचे विचारवंत आणि संस्कृतीचे अभ्यासक. ते व्यासंगात इतके बुडून गेले की आपला वापर होतोय हे त्यांच्या लक्षातच आले नाही असे म्हणू आम्ही फारफार तर. पण समाजात पसरायचे ते पसरले. ऱ्हासपर्वाच्या पहिल्या सर्गात संपादकांनीच श्रमिकांना संपवले. दुसऱ्या टप्प्यात संपादक पापांच्या राशीत वाटेकरी झाले. आणि आता तिसऱ्या टप्प्यात डमी तयार होत आहेत. प्रत्यक्षात रोजचा वृत्तपत्रीय धबडगा सांभाळणारा माणूस वेगळा. संपादक म्हणून मिरवणारा वेगळाच अशी आज स्थिती आहे. ज्येष्ठांचा कोंडमारा होतोय पण कुणी बोलत नाहीय. मग आडून आडून सदाभाऊ बोलतात. महावीरभाई खंत व्यक्त करतात. महावीरभाईंसारख्या संघर्षशील माणसाचा कसा चोथा झाला हे मी

डोळ्यांनी पाहिले. संपादकांना कसे खुबीने संपवले जाते हा खरे तर गंभीर कादंबरीचा विषय आहे. एक जीएम पदावरचा जनरस डॅमेजर भाईंच्या संदर्भात म्हणाला, संपादक कोण वेगळा असतो? छू म्हटलं की त्यालाही पळावं लागतं...ह्यूमन रिसोर्सची इतकी इनह्यूमन कल्पना गेल्या ७५ वर्षात कुणाला सुचली नसेल. घडले असे होते की, संपादकांना पोहोचवायला गेलेल्या ड्रायव्हरला अपघात झाला. त्याने संपादकांची मदत मागितली. संपादक म्हणाले, अशा वेळी प्रशासनाची मदत घेणे इष्ट. ड्रायव्हरने जीएमला कळवलं. त्यांनी खाशांना सांगितले. खाशांचे संपादकांशी वाजले. त्यांनी चिंतन-मनन-लेखनासाठी उसंत हवी असे कारण सांगून राजीनामा दिला. त्यांच्या निवृत्तीची घोषणा झाली. कार्यक्रम झाला. त्यात संभावितपणे छू-वाले जीएम हजर होतेच. आपल्या दृष्टिकोनामुळे होत असलेल्या नैतिक ऱ्हासाची त्यांना कोणतीही जाणीव नव्हती. इतकं शिक्षित अडाणीपण असू शकतं हे समोर अगदी स्पष्टपणे दिसत होतं. भाईंनी भाषण केलं. इशारा दिला. संघर्ष टाळला. तशी स्थिती निर्माण केली जाते. आणखी एक अन्याय दफ्तरी दाखल होतो. काळ सोकावतो. काही महिन्यांनी माझा नंबर लागला. नवे कारण.नवी कोंडी. एकटेपण. करार संपला, मी निघालो असे पालुपद मी लावले. करार संपला होताच पण वेगळाच दबाव होता. त्यांना नवे खेळणे घेऊन खेळायचे होते.

यावर काहीच उपाय नाही का? हे असेच चालणार का? आहेत, उपाय आहेत. ही लढाई शेवटी माध्यमे विरूद्ध लोकप्रतिनिधी अशी लढली जाणार आहे. प्रत्येक निवडणूक ही मलिद्याची संधी मानून पेड न्यूजची विषवल्ली फोफावत जाणार आहे. शेवटी कोट्यवधी रुपये नाहीत तर निवडणूकच लढविता येणार नाही अशी स्थिती असेल. लोकशाहीच कुंठित होईल. त्यासाठी लोकप्रतिनिधींनाच नवे कायदे करावे लागतील.

फार्मसीसाठी जसा टेक्निकल डायरेक्टरचा नियम असतो तसा नियम करावा लागेल. संपादकाच्या लेखी संमतीशिवाय छापलेला अन्य मजकूर ही जाहिरात मानून त्यावर कर लावण्याची तरतूद केली की सरळ चाप बसेल. संपादक कुणाला नेमायचे त्याबाबतचे नियम असावेत. किमान पदवीधर, दहा वर्षे श्रमिक पत्रकारितेची अट असावी. किमान पाच प्रकाशित पुस्तके असावीत.

निवडणुकीच्या काळात जिल्हाधिकाऱ्यांचे सहाय्यक प्रसारमाध्यमांच्या आस्थापनांवर नजर ठेवून असावेत. पैशांच्या व्यवहारावर कडक नजर असावी. सीबीआयच्या आर्थिक विभागाने दक्ष रहावे. निवडणुकीतील आर्थिक गैरव्यवहार देशद्रोहासारखा गुन्हा मानला जावा.

अशा प्रकारचे निर्बंध निरोगी लोकशाहीसाठी आवश्यक आहेत. वेळीच या उपाययोजना केल्या नाहीत तर हे ऱ्हासपर्व पुढच्या सर्गात देशाची स्वायत्तता धोक्यात आणू शकते.


**– नरेंद्र बोडके**
डी-३, डीएसके चिंतामणी,
अप्पा बळवंत चौक, पुणे - ३०
भ्रमणध्वनी : ९९२२४०४९६३
nbodke09@gmail.com

*दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!*

# स्वाती ट्रान्सपोर्ट

**बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स**

**हितेन म्हात्रे : ९८२२ ५३६ ३७४**
**सुधीर म्हात्रे व बंधू : ९८२२ ६६० ७५७**



# स्वाती ऑटो पार्टस्

आमच्याकडे जेसीबी भाड्याने मिळेल

१, रिद्धी-सिद्धी बिल्डींग, डॉ. डहाळेंच्यासमोर, सफाळे,
ता. पालघर, जि. ठाणे - ४०१२०१
दूरध्वनी : कार्यालय - २३०२१७
निवास - २३३०२०

# ती स्नेहज्योत एक

## मृणालिनी कानिटकर-जोशी

फुलल्या न ज्या काही कळ्या
होत्या मुक्या, कोमेजल्या
त्या कळ्यांच्या विकसनाचा
ध्यास हृदयी जागला!

ज्या कोवळ्या कळ्या कधी पूर्णत्वाने विकसित होणारच नसतात; त्या निसर्गाच्या अपूर्ण कलाकृतींना विकसित करण्यासाठी, हळुवारपणे फुलवण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या, आईच्या मायेने त्यांची निगराणी करणाऱ्या संध्याताई देवरुखकर म्हणजे मतिमंद मुले आणि त्यांचे पालक यांच्यासाठी मोठा आधार आहेत. या बालकांना आत्मसन्मान देण्याचे, त्यांच्या आणि त्यांच्या पालकांच्या मनावर मलमपट्टी करण्याचे कार्य संध्याताई गेल्या २५ वर्षांहून अधिक काळ करत आहेत.

खरे तर, संध्याताईंनी आपल्या कामाची सुरुवात पत्रकार म्हणून केली. दैनिक संध्या, केसरी, महाराष्ट्र टाइम्स यांसारख्या नामांकित वृत्तपत्रांसाठी त्या लेखन करत होत्या. हे काम करत असतानाच त्यांनी एकदा दूरचित्रवाणीसाठी प्रसिद्ध क्रिकेटपटू विजय मर्चंट यांची मुलाखत घेतली. त्यावेळी मर्चंटसाहेब अंधांसाठी कार्य करत होते. क्रिकेटविश्वात लखलखीत यश मिळवणाऱ्या विजय मर्चंट यांनी एका प्रश्नाचे उत्तर देताना सांगितले, की ''क्रिकेटपटूपेक्षाही माझी समाजसेवक ही भूमिका माझ्या मनाला जास्त आनंद आणि समाधान देते. आपल्या आयुष्याचा उपयोग दुसऱ्यासाठी करता येणे यासारखी समाधानाची भावना दुसरी कुठलीच असणार नाही.'' त्यांच्या या उत्तराने संध्याताई प्रेरित झाल्या. आपले जीवनध्येय काय असावे याची लख्ख जाणीव त्यांच्या मनाला झाली आणि मतिमंदांसाठी कार्य करण्याची वाट त्यांनी निवडली.

त्यानंतर प्रथम त्यांनी सिंधुताई जोशींच्या 'कामायनी' संस्थेत प्रवेश घेतला. या मुलांची शिक्षिका होण्यासाठी विशेष प्रशिक्षण घेतले. हे प्रशिक्षण घेत असतानाच मतिमंदांच्या विकासासाठी काही वेगळ्या कल्पना, विचार त्यांच्या मनात साकार होत होते. या कल्पना प्रत्यक्षात साकार करता आल्या तर आपण या मुलांना अधिक स्वयंपूर्ण बनवू शकू असा विश्वास त्यांना वाटत होता. पण त्यासाठी पूर्ण स्वातंत्र्याने काम करण्याची संधी मिळणे आवश्यक होते. रुळलेली पाऊलवाट न निवडता स्वतःच मतिमंद मुलांसाठी शाळा काढली तर त्या कल्पना साकार होण्याची खात्री होती. मूळचा धडाडीचा स्वभाव आणि एखादी गोष्ट मनाला भिडली की सर्वस्व झोकून देऊन काम करण्याची जिद्द यामुळे संध्याताईंनी दोन-तीन संस्थांकडे मतिमंद मुलांसाठी स्वतंत्र शाळा काढण्यासाठीचे प्रस्ताव पाठवले. या संस्थामध्ये एक संस्था होती वंचितांसाठी, दुर्बल घटकांसाठी कार्य करणारी 'सेवासदन'. समाजसेवेचे व्रत अथकपणे अंगीकारणाऱ्या सेवासदनच्या मदतीने 'दिलासा

केंद्रा'चे रोपटे लावले गेले. निळूभाऊ लिमये, शशीताई किर्लोस्कर यांच्या पाठिंब्याने १९८२ साली 'दिलासा'ची शाळा, खरे तर उपचारकेंद्र चालू झाले.

संस्था स्वत: आर्थिक अडचणीत, असल्याने वसतिगृहाचा एक हॉल, बाजाची पेटी आणि बसण्यासाठी ताडपत्री एवढेच साहित्य देऊ शकत होती. पण एक नामांकित, सेवाभावी संस्थेचे नाव आणि जागा मिळणे ही खूप मोठी जमेची बाजू होती. कामायनी संस्थेच्या सिंधुताई जोशी यांना संध्याताई गुरुस्थानी मानतात. त्यांचे आशीर्वाद आणि त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन संध्याताईंचे काम सुरू झाले.

वाटले होते त्याहून ही वाट खूप खडतर होती. १९८२ साल म्हणजे जवळजवळ २६-२७ वर्षांपूर्वीचा काळ. आपल्या पाल्याचे मतिमंदत्व तेव्हा असे सहजासहजी स्वीकारले जात नसे. या मुलांना घरातच ठेवण्याचा पालकांचा कल असे. त्यांना शाळेत पाठवण्याची कल्पना त्यांचा मनात रुजवणे आवश्यक होते. सुहासिनी साठे या आपल्या प्रशिक्षित, शांत, विचारी मैत्रिणीबरोबर त्यांनी कामाला सुरुवात केली. आजुबाजूच्या लोकांकडून, डॉक्टरांकडून अशा प्रकारचे व्यंग असलेल्या मुलांची माहिती मिळवून त्यांची यादी बनवली. आता पुण्यातल्या साऱ्या पेठा पिंजून काढत, मोठ्या जिद्दीने या मुलांपर्यंत त्या पोचत होत्या. त्या मुलांच्या पुनर्वसनाचे, त्यांना शाळेत पाठवण्याचे महत्त्व पालकांना समजावून सांगत होत्या. पण पालकांच्या प्रतिक्रिया तितक्याशा सकारात्मक नसायच्या. तेही साहजिक होते म्हणा. ज्या व्यंगावर काही उपचार होऊ शकणार नाही, जे मूल स्वतःचे कोणतेही काम स्वतः करू शकणार नाही किंबहुना, अत्यल्प बुद्धीचे देणे ज्यांना मिळाले आहे अशा मुलांचे हे पालक आधीच मनाने पोळलेले, हताश झालेले. त्यातले काहीजण तर आपले मूल मतिमंद आहे याचा स्वीकारच करायला तयार नसायचे. त्यामुळे काही वेळा या दोघींना बोचऱ्या अनुभवांनाही सामोरे जावे लागायचे. ''आमचे मूल मतिमंद आहे हे तुम्हाला सांगितलंच कोणी?'' इथपासून ''आमच्या मुलाला हुशार बनवाल असं लिहून देणार आहात का?'' असे प्रश्नही त्यांना विचारले गेले. पण त्यांनी हार मानली नाही. या मुलांच्या पालकांच्या मनांनाही सहानुभूतीची फुंकर हवी असते हे त्यांनी जाणले होते. त्यामुळे आपले म्हणणे त्यांना पटवून देऊन, आम्ही तुमच्या मदतीसाठी आलो आहोत याची त्यांना खात्री देऊन, हळूहळू त्यांनी विद्यार्थ्यांना शाळेकडे वळवले.

'दिलासा'ची मुख्याध्यापिका म्हणून संध्याताईंनी जबाबदारी घेतली होती. पण सुरुवातीला पगारही नव्हते. घरूनच मुलांची खेळणी आणून कामाला सुरुवात केली. शिक्षिका, लेखनिक, समुपदेशक, नर्सिंग यासारख्या साऱ्या भूमिका पार पाडल्या. ''या मुलांच्या फक्त बाई नाही तर प्रसंगी त्यांची 'आई'ही व्हावं लागतं'' संध्याताई सांगत होत्या. त्यांच्या चड्डीची नाडी बांधणे, लाळ पुसणे, फिट आली तर स्वतःच्या पदाराचा बोळा तोंडात घालणे यांसारखी कामे संध्याताई आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आईच्या हृदयाने केली.

एक शाळा चालवायची म्हणजे कितीतरी लोकांचा हातभार हवा. आर्थिकही आणि प्रत्यक्ष कामाच्या स्वरूपातही. शाळेचे बस्तान बसवण्यासाठी टाटा-किर्लोस्करांपासून सामान्य व्यक्तीपर्यंत साऱ्यांना आवाहन केले आणि मदतीचे अनेक हात पुढे आले. या मुलांची ने-आण करण्यासाठी शाळेची स्वतःची बस गरजेची होती. त्यासाठी पैसा उभा करणे आवश्यक होते. संध्याताईनी 'डिनर विथ हेमामालिनी' हा आगळावेगळा उपक्रम राबवला आणि त्यातून उभ्या राहिलेल्या रकमेतून स्कूल बस आली. आर्थिक सहकार्याबरोबर डॉ. आनंद पंडित, के.इ.एम.चे वैद्यकीय अधिकारी, मानसशास्त्रज्ञ डॉ. रत्नपारखी, डॉ. संजीव डोळे या साऱ्यांचे वैद्यकीय सहकार्यही मोलाचे ठरले.

आता 'दिलासा'ला स्वतःचे असे एक रूप येऊ लागले. आपल्या मनातल्या वेगळ्या कल्पना साकार करण्यासाठी संध्याताई झपाटून काम करत होत्या. त्यात पहिले उद्दिष्ट होते मुलांना आत्मनिर्भर बनवणे. स्वतःची कामे स्वतः करू शकतील इतपत सक्षम बनवणे. त्या दृष्टीने मुलांना प्रशिक्षित केले जाऊ लागले. त्यापुढची पायरी म्हणजे स्कूलबस किंवा इतर वाहनातून आणि घर जवळ असेल तर चालत. मुलांनी एकटे शाळेत येणे. या प्रयोगात पालकांना तयार करणे ही कसोटीच असायची. काही वेळ मूल हरवण्यासारखे प्रसंगही घडले. पण या साऱ्या अडचणींवर मात करून मुलांना आत्मनिर्भर बनवण्यात 'दिलासा केंद्र' मोठ्या

प्रमाणात यशस्वी ठरले. मतिमंद मुलांमधली एक मोठी उणीव म्हणजे हालचालीवर नियंत्रण नसणे, बेडौल हालचाली होणे. यावर 'डान्स थेरपी' हा उपाय शोधून काढला संध्याताईंनीच. त्यांना स्वतःला नृत्याची आवड आणि जाणही. नृत्यामुळे शरीरसौष्ठव प्राप्त होते, हालचालींत डौल येतो. त्यामुळे त्यांनी या विद्यार्थ्यांना विविध नृत्यप्रकार त्यांनी शिकवले. मुलांच्या सहज आकलनासाठी हातात व पायात विशिष्ट रंगाचा दोरा किंवा रुमाल बांधून मुलांना हालचाली शिकवल्या जातात. नृत्यामुळे मुलांच्या हालचालीत सुसूत्रता आली. बसण्याची, उभे राहण्याची ढब सुधारली. या थेरपीचा उपयोग आज अनेक मतिमंदांसाठीच्या शाळांमध्ये केला जातो हे संध्याताई आनंदाने आणि अभिमानाने सांगतात.

सामान्य शाळांमध्ये असणारी शिस्त, अभ्यास, खेळ, स्पर्धा या साऱ्या गोष्टी संध्याताईंनी 'दिलासा'तही राबवल्या. प्रत्येक विद्यार्थ्याचा बुध्द्यांक तपासून त्याच्यासाठी स्वतंत्र अभ्यासक्रम बनवला. त्यांच्या पहिल्या सहकारी साठेबाई उत्तम क्रीडापटू. त्यांनी मुलांना ॲथलेटिक्सपासून टेबलटेनिसपर्यंत सर्व क्रीडाप्रकार शिकवले. पर्वती चढणे, हॉर्स रायडिंग, ट्रेकिंग यांचेही अनुभव विद्यार्थ्यांना दिले. त्यांना हिशेबासाठी कॅल्क्युलेटर वापरायला शिकवला. कॉम्प्युटरसमोर मुले अधिक स्थिरतेने बसतात हे लक्षात आल्यावर शैक्षणिक साधनांत कॉम्प्युटरचाही समावेश झाला.

मतिमंद मुलांच्या पालकांसाठी कार्यशाळा घेणे ही वेगळी संकल्पनाही त्यांनी राबवली. प्रथमतः आपले मूल इतरांपेक्षा वेगळे आहे या गोष्टीचा स्वीकार करण्यासाठी त्यांना खंबीर बनवावे लागते. त्यानंतर त्यांच्याशी कसे वागले पाहिजे, त्यांना स्वतंत्र कसे बनवले पाहिजे याबद्दल या कार्यशाळांमध्ये मार्गदर्शन केले जाते. पालकही आपापसात अनुभवांची देवाणघेवाण करू शकतात.

'दिलासा'चे काम करताना मतिमंद मुलांच्या प्रशिक्षणाच्या विशेष ट्रेनिंगसाठी प्रथम त्या १९८४ साली इंग्लंडला जाऊन आल्या. या विषयासंदर्भात अनेक वेळा परदेशात त्यांचे अभ्यासदौरेही झाले. 'प्रौढ मतिमंदांचे पुनर्वसन'या विषयावरील आपल्या प्रबंधाचे वाचन करण्यासाठी त्या दुबईलाही जाऊन आल्या.



संध्याताई देवरूखकर

परदेशात राबवला जाणारा प्रकल्प 'बडी सिस्टम'– म्हणजे कॉलेजमधील मुलांनी आपल्याबरोबरीच्या मतिमंद मुलाला मित्र बनवणे, त्याला फिरायला, हॉटेलिंगला घेऊन जाणे, त्या वयातल्या स्वच्छंदी जीवनाचा अनुभव त्याला देणे. ही संकल्पना त्यांना खूप भावली. भारतात ही संकल्पना त्यांनी काही प्रमाणात राबवलीही. पण त्यात त्यांना अपेक्षेएवढे यश मिळाले नाही.

मतिमंद मुलांची शाळा ६ ते १८ वर्षांपर्यंत असते. त्यानंतर २ वर्षे वर्कशॉप. पण त्यापुढे काय? या मुलांना आर्थिक स्वावलंबन यावे, त्यांनाही आत्मसन्मान मिळावा म्हणून 'दिलासा' तर्फे १९८३ साली 'दिलासा कार्यशाळा'ही सुरू झाली. अठरा वर्षांच्या पुढील मुले, मुली या कार्यशाळेत सामावली जाऊ लागली. छोट्या गृहोद्योगांपासून मुलांकडून बगीचा बनवून घेण्यापर्यंत अनेक गोष्टी मुलांना इथे शिकवल्या जातात. 'आमची बाग' हा संध्याताईंनी राबवलेला एक वेगळा आणि सर्जनशील प्रकल्प. सर्जनशील, अशासाठी की प्रभात रोड–भांडारकर रोडला जोडणाऱ्या गल्लीतील ज्या जागेवर कचऱ्याचे ढीग साठत होते ती जागा या विद्यार्थ्यांनी स्वच्छ केली. माळीबुवांच्या मार्गदर्शनाखाली अमन, रोहन, केशव, अमित आणि विनोद या विद्यार्थ्यांकडून अप्रतिम बाग बनवून घेतली. कचऱ्याची जागा डोलणाऱ्या हिरव्यागार गवताने, बहुरंगी फुलांनी, भाज्यांच्या वाफ्यांनी आणि डेरेदार वृक्षराजीने घेतली. त्या बागेला 'आमची बाग' हे यथार्थ नाव संध्याताईंनीच दिले. ह्या बगीच्याच्या निर्मितीमुळे या मुलांना विलक्षण आनंद आणि समाधान



मिळाले. आम्हाला अजून असे बगीचे बनवू द्या अशी निरागस मागणीही मुले करत आहेत.

मतिमंद मुलांचा अधिक विकास व्हावा यासाठी १९९८ साली त्यांनी 'मतिमंद विकास मंडळाची स्थापना केली. या मंडळातर्फे संजीवन हॉस्पिटलने उपलब्ध करून दिलेल्या जागेत आठवड्यातून दोन वेळा या मुलांची बौद्धिक चाचणी घेतली जाते व त्याआधारे मुलांना व पालकांना मार्गदर्शन केले जाते. पालकांच्या मार्गदर्शनासाठी त्यांनी 'निगराणी' हे त्रैमासिकही सुरू केले.

दिलासा केंद्राच्या प्राचार्या म्हणून सेवानिवृत्त झाल्यावर आजही या विशेष मुलांसाठीचे त्यांचे कार्य जोरात चालू आहे. जवळजवळ २५-३० वर्षांच्या ह्या प्रवासातले, आनंदाचे, अभिमानाचे क्षण कोणते असे विचारल्यावर संध्याताईंनी मनापासून सांगितले, की ''माझे विद्यार्थी जेव्हा बक्षीस मिळवून येत, आनंदानं जल्लोष करत तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर उमलणारे आनंदाचे भाव हेच माझं खरं संचित. आपले विद्यार्थी आत्मनिर्भर होताना पाहणे हे मनाला खूप समाधान देऊन जातं.'' 'आपली बाग'चा प्रकल्प आणि मतिमंद मुलांसोबतचा हॉलंडचा दौरा हे दोन प्रसंग त्यांना खूप आनंद देणारे आहेत. हॉलंडला भरलेल्या मराठी लोकांच्या पहिल्या युरोपीय संमेलनाला त्या आणि त्यांच्या दोन सहकारी मैत्रिणी आठ मुलांना घेऊन गेल्या होत्या. तिथे ह्या मुलानी लेझिम, लोकनृत्य असे कार्यक्रम सादर करून लोकांची वाहवा मिळवली. या मुलाना सांभाळून नेणे, त्यांच्याकडून कार्यक्रम सादर करवून घेणे... सारेच आव्हानात्मक होते, पण संध्याताई आणि त्यांच्या सहकारी मैत्रिणींनी हे आव्हान यशस्वीपणे पेलले.

त्यांच्या ह्या तळमळीने केलेल्या कार्याला पावती मिळाली ती राष्ट्रीय पातळीवरच्या 'आदर्श शिक्षिका' पुरस्काराने. सन २०००च्या ऑक्टोबरमध्ये माजी राष्ट्रपती डॉ.अब्दुल कलाम यांच्या हस्ते हा पुरस्कार घेणे हा खरोखरच आनंदाचा, अभिमानाचा क्षण होता असे त्या नमूद करतात.

संध्याताईंनी चोखाळलेली ही वाट नक्कीच अवघड वळणाची. त्याची पूर्ण जाणीव असतानाही समाजाचे आपण काही देणे लागतो या तळमळीतून त्यांनी या वाटेवर पाऊल ठेवले. अनेक आव्हानांना तोंड दिले. शाळेतून विद्यार्थी हरवल्यावर स्वतःच्या भावनांना बांध घालून त्याच्या आई-वडिलांना सावरणे, मुले शोधण्यासाठी केलेली धावाधाव, ते सापडल्यावर होणारा आनंद आजही त्या आठवणी अंगावर शहारे उमटवतात. एका विद्यार्थ्याचा झालेला अपघाती मृत्यू आणि त्यानंतरचा त्याच्या आईचा

आक्रोश त्या आजही विसरू शकत नाहीत. दोन विद्यार्थ्यांना चोर समजून लोकांनी चोप दिला तेव्हा त्यांना सोडवण्यासाठी केलेली धावपळ, नंतर त्या बावरलेल्या कोकरांना जवळ घेऊन त्यांची समजूत घालणे, त्यांना सावरणे या गोष्टी खरेच खूप कठीण. पण आपल्या सहकारी शिक्षिकांच्या साहाय्यानं या प्रसंगांना त्यांनी कणखरपणे तोंड दिले.

मतिमंदांच्या समस्यांवर संध्याताईंनी 'स्वीकार मतिमंदांचा' हे पुस्तक पालक-शिक्षकांसाठी लिहिले. तर किशोरवयीन मुलांना समाजातल्या दुर्बल, अपंग घटकांप्रती सजग करण्यासाठी, त्यांची सामाजिक जाण जागृत करण्यासाठी 'दोस्ती अपंगांशी' हे पुस्तक लिहिले आहे. डाऊन सिंड्रोमची शिकार असलेल्या प्रथमेश दाते या मुलाने कॉम्प्युटर शिकता शिकता डॉ. गायकैवारी यांनी विकसित केलेले एक सॉफ्टवेअर वापरायला सुरुवात केली आणि त्यात बऱ्यापैकी गती प्राप्त केली. आता तो लायब्ररी अटेंडंट म्हणून काम करतो. या मुलांच्या यशस्वीतेची गोष्ट त्यांनी 'Take at little half chick' या फिल्मद्वारे लोकांसमोर आणली. असा सतत या विशेष मुलांच्या विकासाचा ध्यास घेऊन संध्याताई आजही कार्यरत आहेत, त्यांच्या विकासासाठी धडपडत आहेत.

जे आम्हाला लाभले ते देऊ आम्ही वंचिता
दीप उजळू तिमिर हरण्या होई तेजोमय पृथा

या ओळीप्रमाणे खरोखरच दीप उजळून त्यांची आयुष्य त्या प्रकाशमान करत आहेत. त्यांच्या या कार्याला मनःपूर्वक शुभेच्छा.

**- मृणालिनी कानिटकर-जोशी**
एफ-३४, वृंदावन पार्क,
महात्मा सोसायटी, कोथरुड,
पुणे -४११ ०३८
फोन नं.०२०-०२५३६१८१६
ई-मेलः mrunal_s_joshi@hotmail.com



# मुस्लिमांची साक्षरता आणि वास्तव

**रझिया पटेल**
शब्दांकन : ममता क्षेमकल्याणी

मुस्लिम समाजात शिक्षण कमी आहे हे सरकारनेही आता स्पष्टपणे मान्य केले आहे. एकूण राष्ट्रीय साक्षरतेमध्ये मुस्लिम समाजात साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी आहे. साक्षरतेचे निकष काय आहेत यावर मोठ्या प्रमाणात ही संख्यात्मक गणिते अवलंबून आहेत. लिहिता येणे म्हणजे साक्षरता असे म्हटले तर मुस्लिम समाजाचे साक्षरतेचे प्रमाण अधिक असल्याचे जाणवते. पण एकूण व्यावहारिक साक्षरता मात्र तितक्या प्रमाणात झालेली नाही, हे वास्तव आहे.

जातिव्यवस्था हे भारतीय समाजाचे वास्तव आहे. मुस्लिम समाजही त्याला अपवाद नाही. जातीच्या उतरंडीतील शेवटच्या स्तरावरील समाजघटक सगळ्याच बाबतीत मागास राहिले आहेत. मुस्लिम समाजातही हेच चित्र आपल्याला पाहायला मिळते.

**शिक्षण कसे पाहिजे?**

मुस्लिम समाज आणि शिक्षण याबद्दल विचार करताना आपल्याला वास्तवातल्या काही मुद्यांचा विचार करावा लागेल. या समाजातील साक्षरतेचे प्रमाण कमी का आहे हे मुळात समजून घ्यायला हवे. शिक्षण घेण्याची या समाजाची इच्छा आहे का? असा विचार केला तर आपल्याला सकारात्मक उत्तर मिळते. मात्र शिक्षणानंतर काय असा प्रश्न त्यांच्यापुढे आजही कायम आहे. आपल्याकडची शिक्षणपद्धती नोकरीशी जोडलेली आहे, त्यामुळे शिक्षण घेऊन नोकरी मिळेल का असा विचार केला जातो. आजचे शिक्षण रोजगाराची खात्री देत नाही, हे वास्तव त्यांना अधिक दाहक वाटते. एकूण समाजातील जेमतेम पाच टक्केच मुले मेरिटमध्ये येतात आणि त्यांना आपले भविष्य उज्ज्वल करता येते. मात्र उर्वरित सर्वसामान्य मुले काय किंवा त्यांचे पालक काय, त्यांच्या भविष्याबद्दल ठामपणाने काही सांगू शकत नाही. चाचपडत राहणे एवढेच त्यांच्या हातात असते. शिक्षणाच्या चौकटबद्ध व्यवस्थेमध्ये वैचारिक प्रगती मोठ्या प्रमाणात होते असे काही आपल्याला म्हणता येणार नाही. मात्र शिक्षणामुळे जगाकडे अधिक चौकस नजरेने आपण बघू शकतो. आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करू शकतो. व्यक्तिमत्त्वविकासाचे हे काम ज्याचे त्यालाच करावे लागते. शिक्षण पद्धती हे काम करू शकली असती तर आज समाज मोठ्या प्रमाणावर विकसित झाला असता. प्रत्यक्षात तसे झालेले काही दिसत नाही.

केवळ मुस्लिम समाजच नाही, तर शिक्षणापासून दूर राहिलेले जे जे सामाजिक घटक आहेत ते 'शिक्षण

नको' असे म्हणताना दिसत नाहीत. प्रश्न असा आहे, की शिक्षण असे पाहिजे की ज्यातून खऱ्या अर्थाने त्यांचा विकास होऊ शकेल. प्रत्यक्षात शिक्षणाचे स्वरूप नेतृत्व ठरवत असते. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या घटकांचा त्यात सहभाग नसतोच. प्रत्येकवेळी पांढरपेशांच्या गरजा काय आहेत ते पाहून शिक्षणाचे स्वरूप ठरवले जाते. तळागाळातल्या लोकांचा विचार त्यात होत नाही. आता तर शिक्षणाचे व्यापारीकरण झाल्यामुळे ज्यांच्याकडे पैसा त्यांना शिक्षण मिळणार अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. अल्पसंख्याक समाज जे आहेत त्यांना शिक्षणाचे महत्त्व लक्षात आले नाही असे नाही, तर शिक्षणाचे जे स्वरूप आहे ते त्यांना सामावून घेण्यात यशस्वी होऊ शकलेले नाही. शिक्षणाचे स्वरूप हा खरा अडथळा असल्यामुळे ते आजही या व्यवस्थेच्या बाहेर आहेत. देशातल्या अशा अल्पसंख्याक समाजांचा, विशेषत: मुस्लिम समाजाचा शिक्षणाला विरोध आहे, असे जे आपले गृहितक असते तेच मुळात चुकीचे आहे. आम्ही आमच्या मुलांना शिकवू इच्छित नाही, असे आजच्या समाजात तरी कोणीही म्हणणार नाही. शिक्षणानंतर काय असा प्रश्न समोर असल्यामुळे हा समाज शिक्षण व्यवस्थेत तितकासा सामील होऊ शकलेला नाही. व्यापारीकरणामुळे तर शिक्षण घेणेही आता महाग झाले आहे. शिवाय शिक्षण घेतल्यानंतर भविष्याबाबतची खात्री नाही अशा अवस्थेत अल्पसंख्याक समाज अडकलेला दिसतो. या समाजाकडून शिक्षणाला अंतर्गत विरोध कमी आहे मात्र बाह्य किंवा परिस्थितीचे अडथळे अनेक आहेत, असेच म्हणावे लागेल. भौतिक परिस्थीती, शैक्षणिक पद्धती अशा अनेक प्रकारचे अडथळे अल्पसंख्यांक समाजाला शिक्षणाच्या त्याच्या मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवत आहेत. हे वास्तव डोळ्यासमोर ठेवूनच शिक्षण पद्धतीचा विचार करण्याची गरज आहे. आज मी भारतीय शिक्षण संस्थेच्या (आयआयई) माध्यमातून अशाच प्रकारचे काम करते आहे.

**इतिहास काय सांगतो?**

मुस्लिमेतर समाजात, विशेषत: हिंदू समाजात ज्या सुधारणावादी चळवळी झाल्या त्या सगळ्या सुधारकांकडे पाहिले तर आपल्याला असे दिसते की, इंग्रजांच्या काळात त्यांनी आधुनिक शिक्षण घेतले आणि त्या आधुनिक शिक्षणातून त्यांना नवीन विचारांचा देखील परिचय झाला. या विचारातून त्यांना विषमतेची जाणीव झाली. जगभरात विषमता आहे आणि त्याविरोधात आवाज उठवण्यात आला आहे, ही जाणीव या विचारांमधून निर्माण झाली. आधुनिक शिक्षण घेत असताना या सुधारकांचा संपूर्ण जगाशी संपर्क आल्याने प्रचलित परंपरांचा नव्याने विचार करायला त्यांनी सुरुवात केली. मात्र ब्रिटिश काळामध्ये मुस्लिम समाजात शिक्षणाची परंपरा फारच क्षीण दिसते. याचे कारण म्हणजे मुस्लिम समाजाने ब्रिटिशांना विरोध करण्याच्या भूमिकेतून इंग्रजी शिक्षण नाकारले.

हिंदू आणि मुस्लिम अशा दोन्ही समाजांच्या शिक्षणाबाबतच्या काही मुद्यांचा विचार करताना असे लक्षात येते की हिंदू समाजामधल्या ठरावीक वर्गांना धर्मानेच शिक्षण नाकारले होते. शूद्रातिशूद्र आणि स्त्रियांना वेदाध्ययन करण्यास धर्माने बंदी घातली होती. याउलट, इस्लाम धर्माने कोणालाच शिक्षण नाकारलेले नाही. या धर्मातल्या कोणत्याही घटकाला शिक्षणबंदी नाही. कुराणाचा जो पहिलाच संदेश आहे त्यामध्ये 'इक्रा' असे म्हटलेले आहे. याचा अर्थ 'वाचन कर' असा होतो. परमेश्वराच्या नावाने ते वाच, की ज्याने लेखणीद्वारे तुला हे ज्ञान दिले आहे, असा त्याचा अर्थ आहे. त्यामुळे मुस्लिम समाजात शिक्षणाला विरोध असा नव्हता. पण भारतीय संदर्भात याचा विचार करताना आपल्याला असे दिसते की, ब्रिटिशपूर्व काळात अभिजन म्हणता येईल अशाच वर्गाकडे शिक्षण होते. हे शिक्षण अर्थातच फारसी भाषेतले होते, कारण राज्यकारभाराची भाषा फारसी होती. भारतामध्ये जातिनिहाय जो दुसरा वर्ग आहे तो कारागीरांचा आहे आणि या वर्गात शिक्षणाचा फारसा प्रसार झालेला दिसत नाही. शिक्षण हे आपले काम नाही आणि पोट भरण्यासाठी कलाकौशल्य असल्यामुळे शिक्षणावाचून आपले काही अडत नाही, असा विचार करणारा हा वर्ग होता. या कारागीरांमध्ये मुस्लिम समाजातला जो मोठा वर्ग होता तोसुद्धा शिक्षणाकडे वळला नाही. अभिजनवर्ग मात्र शिक्षण घेत होता. प्लासीची पहिली लढाई झाली तेव्हा ब्रिटिश आपली सत्ता काबीज करतील असे मुघल सत्तेला वाटू लागले आणि त्यानंतर ब्रिटिशांच्या विरोधातली एक प्रतिक्रिया निर्माण झाली. त्यानंतर १७५७ च्या

मुस्लिम निरक्षरतेची कारणे ही धार्मिक असण्यापेक्षा राजकीय स्वरूपाची अधिक आहेत. भौतिक परिस्थिती, शैक्षणिक पद्धती अशा अनेक प्रकारचे अडथळे अल्पसंख्याक समाजाला शिक्षणाच्या मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवत आहेत. हे वास्तव डोळ्यांसमोर ठेवूनच शिक्षणपद्धतीचा विचार करण्याची गरज आहे.

सुमारास मुस्लिम वर्ग आपल्या विरोधात उभा राहू शकतो, हे ब्रिटिशांच्या लक्षात येऊ लागले. कारण तो तत्कालीन सत्ताधारी वर्ग होता आणि त्यांना ब्रिटिशांपासूनच धोका होता. ब्रिटिशांच्या हातात हळूहळू सत्ता येऊ लागली आणि त्यांनी आपली धोरणे अवलंबण्यास सुरुवात केली. पारंपरिक शिक्षणाला त्यांनी इंग्रजी शिक्षणाचा पर्याय उभा केला. त्यावर उमटलेली प्रतिक्रिया म्हणजे 'इंग्रजी शिक्षण घेऊ नका' असे आवाहन संस्थानिक आणि मुल्ला-मौलवींनी त्या काळात केले. प्रशासकीय भाषा इंग्रजी झाल्यामुळे खूप मोठा वर्ग व्यावहारिक दृष्ट्या निरक्षर झाला. ज्या काळात हिंदू समाजातला ब्राह्मणवर्ग इंग्रजी शिक्षण घेत होता त्या काळात मुस्लिम समाजातला अभिजनवर्ग इंग्रजी शिक्षण घेत नव्हता. त्याउलट, हिंदू समाजात ब्राह्मणांनाच विद्येचा अधिकार असल्यामुळे ब्राह्मण आधी शिकले. सत्ताधाऱ्यांची भाषा त्यांनी आत्मसात केली. ब्रिटिशकाळात इंग्रजी शिक्षणातून सुधारणेचा विचार त्यापैकी काहींनी मांडायला सुरुवात केली. त्याशिवाय, ब्राह्मणेतरांमध्ये जे सुधारक निर्माण झाले त्यातील महात्मा फुलेंनी तर ही गोष्टी कधीच ओळखली होती, म्हणून शुद्रातिशुद्र आणि स्त्रिया यांना शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. मुस्लिम समाजाने मात्र इंग्रजी शिक्षणाला विरोध केल्यामुळे त्या समाजातला बराच मोठा वर्ग निरक्षर राहिला. प्रशासकीय भाषेचा अभाव त्यांच्यात असल्यामुळे बाहेरच्या जगाचे ज्ञान मिळवण्याचे आणि प्रत्यक्ष व्यवस्थेत सहभागी होण्याचे मार्ग त्यांना उपलब्ध होऊ शकले नाहीत. ब्रिटिशांच्या विरोधातला लढा म्हणून हा समाज आपल्या निर्णयाकडे पाहत होता, पण त्यामुळे हा समाज एकूण व्यवस्थेच्या बाहेरच राहिला. हिंदू समाजात त्याकाळात जसे सुधारक निर्माण झालेले दिसतात तसे ते मुस्लिम समाजात निर्माण झालेले दिसत नाहीत. पण मुस्लिम समाजानेही इंग्रजी शिक्षण घ्यावे असा आग्रह या काळात सर सय्यद अहमद यांनी धरला. हिंदू समाजातल्या सुधारकांप्रमाणे म्हणजे महात्मा फुले, राजाराम मोहन रॉय, आगरकर यांच्याप्रमाणे प्रमाणे सर सय्यद अहमद यांचे नाव सुधारक म्हणून अंशत:च घेता येते. कारण महात्मा फुले ज्याप्रमाणे समाजसुधारणेच्या इतर गोष्टी करत होते, स्त्रिया आणि शुद्रातिशुद्र हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता तसे सर सय्यद अहमद यांच्या कार्यात दिसत नाही. पण त्यांच्यासोबत काम करणारे त्यांचे सहकारी मोहम्मद हाली हे स्त्री-शिक्षणाबद्दल बोलत होते.

**अनेक गैरसमज**

महाराष्ट्रामध्ये मुस्लिम स्त्री-शिक्षणाची सुरुवात बद्रुद्दिन तय्यबजी यांनी केली, जे गांधीजींच्या चळवळीतही सहभागी झाले होते. मुस्लिम स्त्री-शिक्षणाची चळवळ महाराष्ट्रात सुरू होते हा काही योगायोग नाही. एक तर बद्रुद्दिन तय्यबजी हे गांधीवादी चळवळीतले आणि महाराष्ट्रातले आहेत, की जिथे महात्मा फुलेंनी स्त्री-शिक्षणाचा झेंडा त्याआधीच रोवला होता. मुस्लिम समाजातल्या मुलींना शाळेत आणून बद्रुद्दिन तय्यबजी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी मुस्लिम स्त्री-शिक्षणाचे कार्य सुरू केले. बहुसंख्य समाजात ज्या प्रमाणात सुधारक चळवळी झाल्या आहेत त्या अल्पसंख्याक मुस्लिम समाजात तुलनेने फारच कमी आहेत. बहुसंख्य समाजातील सुधारक ज्या प्रश्नांवर बोलत होते ते प्रश्न मुस्लिम समाजात अस्तित्वातच नाहीत. जसे की, एकीकडे राजाराम मोहन रॉय सती प्रथेच्या विरोधात बोलत होते, भूमिका मांडत होते. मात्र मुस्लिम समाजात सती प्रथाच अस्तित्वात नाही. तर दुसरीकडे महात्मा फुले शुद्रातिशुद्र आणि स्त्रिया यांना धर्माने बंदी घातलेला शिक्षणाचा अधिकार मिळावा म्हणून लढा देत होते. प्रत्यक्षात मुस्लिम धर्माने मात्र कोणालाच शिक्षण नाकारलेले नाही. त्यामुळे सुधारक चळवळींचे जे मुद्दे किंवा विषय होते ते त्या अर्थाने मुस्लिम समाजात अस्तित्वात नव्हते. मुस्लिम समाजात असलेला शिक्षणाचा अभाव महात्मा फुले यांना तेव्हासुद्धा

मोठ्या प्रमाणात जाणवला होता आणि म्हणूनच मुस्लिम समाजाच्या शिक्षणाचा विचार ब्रिटिश सरकारला नक्कीच करावा लागेल, अशी भूमिका त्यांनी हंटर कमिशनसमोर बोलताना व्यक्त केली होती.

अलिकडे बऱ्याचदा असे म्हटले जाते की, मुस्लिमांवर धर्माचा पगडा असल्यामुळे किंवा ते मूलतत्त्ववादी असल्यामुळे त्यांच्यात साक्षरतेचे प्रमाण खूप कमी आहे. पण प्रत्यक्षात मुस्लिम धर्माने सर्वांना शिक्षणाचा अधिकार मान्य केलेला आहे. त्याआधारे धर्माचा पगडा समाजावर मोठ्या प्रमाणात असता तर या समाजातले साक्षरतेचे प्रमाण निश्चित वाढले असते. किंबहुना, हा संपूर्ण समाजच साक्षर झाला असता. म्हणजेच, मुस्लिम निरक्षरतेची कारणे ही धार्मिकपेक्षा राजकीय स्वरूपाची अधिक आहेत. वसाहतवादाचे राजकारण हे तर त्याचे एक महत्त्वाचे कारण असल्याचे इतिहासच सांगतो आहे. मात्र याबद्दल आपल्याकडे नेहमीच गल्लत होत असते. मुस्लिम समाज निरक्षर आहे कारण तो कर्मठ आहे असा एक गैरसमज निर्माण झाला आहे. या प्रश्नाची मूळ कारणे शोधण्याची, समजून घेण्याची खरी गरज आहे. कारण मागासलेपणा हा राजकारणाचा परिणामस्वरूप असतो, मागासलेपणा हा कोणीही निवडून घेत नसतो. सामाजिक राजकारण किंवा सत्तेचे राजकारणच त्यामागे असते. या समाजामधल्या धार्मिक राज-कारणाचा विचार केला तर ते या समाजातल्या अभिजन वर्गाने केलेले राजकारण आहे. उदाहरणच द्यायचे तर अभिजन अशा मुस्लिम नेत्यांची मुले कॉन्व्हेन्ट शाळांमधून शिक्षण घेतात मात्र गरीब मुस्लिमांच्या मुलांनी उर्दू शाळांमध्येच शिक्षण घ्यावे म्हणून ते अस्मितेचा मुद्दा निर्माण करतात. हा प्रश्नसुद्धा धार्मिकतेचा नसून राजकारणाचाच असल्यामुळे त्याचे राजकीय उत्तर जोपर्यंत शोधले जात नाही तोपर्यंत ही समस्या सुटणार नाही. हे राजकीय उत्तर लोकशाही व्यवस्थेमध्ये लोकशाही पद्धतीनेच शोधावे लागते. ते होण्यासाठी तशा पद्धतीची चळवळ इथे उभी राहण्याची गरज आहे. अशी चळवळ उभी राहण्यात मुस्लिम समाजातील प्रस्थापित नेतृत्वाचा अडथळा आहेच, शिवाय सत्ताधाऱ्यांचा मुस्लिम समाजाबाबतचा दृष्टिकोन हाही एक अडथळा आहे.



रझिया पटेल

**जगातली परिस्थिती काय आहे?**

भारतातल्या मुस्लिम समाजाचा विकास, त्यांचे साक्षरतेचे प्रमाण याबद्दल बोलत असताना आपण संपूर्ण जगातल्या त्यांच्या परिस्थितीचा आढावा घेतला तर काही ठळक मुद्दे प्रकर्षाने पुढे येतात. धर्म इस्लाम आहे, असे देश जगाच्या नकाशावर कमी आहेत. इजिप्त, इराण यांसारख्या देशांचा विचार केला तर स्त्री शिक्षणाचे प्रमाण या देशांमध्ये थोडे जास्त असल्याचे दिसून येते. अफगाणिस्तानसारखा देश तर गरिबीने पोखरलेलाच आहे. गरिबी जिथे आहे तिथे शिक्षणाचा प्रश्न अधिक टोकदार झालेला आहे. एकूणच तिसऱ्या जगातल्या स्त्री शिक्षणाचा प्रश्न बिकट आहे तसा तो मुस्लिम देशांमध्येही आहे. पाश्चात्य शिक्षणाबरोबर येणारा पाश्चात्य संस्कृतीचा मुद्दा विचारात घेऊन अनेकदा हे पाश्चात्य शिक्षण मुलींना द्यावे की नाही असा विचारही मुस्लिम देशांत केला जातो. मात्र पुढारलेल्या मुस्लिम देशांमध्ये, आर्थिकदृष्ट्या सबळ आहेत अशा देशांत स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण चांगले म्हणावे असे आहे.

**प्रगत मुस्लिम राष्ट्रांची भूमिका**

शिक्षणाच्या बाजारीकरणामुळे, व्यापारीकरणा-मुळे आर्थिकदृष्ट्या मागास असलेले घटक शिक्षणा-पासून वंचित राहिले. मुक्त धोरणामुळे बड्या देशातल्या अनेक शिक्षण संस्था आज जगभर आपला विस्तार

करत आहेत. यामुळे भारतासारख्या देशातल्या सगळ्या नागरिकांनाच शिक्षण घेण्याचा आपला हक्क प्राप्त होईल, असे दिवास्वप्न पाहणे खूपच गैर आहे. मुस्लिमांसारखे अल्पसंख्याक समाज तर जागतिकी-करण आणि व्यापारीकरणाच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर बळी पडत आहेत. प्रगत मुस्लिम राष्ट्रांमधल्या शैक्षणिक संस्था जगभरातल्या निरक्षर मुस्लिम समाजासाठी फार काही ठोस भूमिका घेताना दिसत नाहीत. अमेरिका आणि मुस्लिम राष्ट्रांचे जे संबंध निर्माण झाले त्याचा मोठा परिणाम या सगळ्या गोष्टींवर होताना दिसतो आहे. तेलसाठ्यांच्या बाबतीत अमेरिकेने जे काही केले आणि नंतर इराकवर जो हल्ला केला ते पाहता मुस्लिम राष्ट्रांच्या धोरणावर या सगळ्याचा परिणाम झाला.

**सच्चर समिती आणि वास्तव**

खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकी-करण या सगळ्या गोष्टींची किंमत या समाजाला चुकवावी लागणार आहे, ती शिक्षणाच्या संधीपासून दूर जाणे या स्वरूपात. कारण स्पर्धेत टिकण्यासाठी जी पातळी गाठावी लागते, तिच्यापासून हा समाज मैलोगणती दूर आहे. भारतातील अन्य वंचित समूहांपेक्षा मुस्लिम समूहावर या गोष्टींचा कदाचित काकणभर जास्तच परिणाम होणार आहे; कारण हा समाज बहुसंख्याक समाजात पसरवल्या जाणाऱ्या मुस्लिमद्वेषाचाही बळी आहे. स्पर्धेत संधी मिळण्याची भाषा बरेचसे लोक बोलतात; पण त्यासाठीही समाजाचे सबलीकरण आवश्यक असते. मुस्लिम समाजातली निरक्षरता, दारिद्र्य, भेदभाव या सर्व गोष्टी सच्चर समितीनेही नमूद केल्याच आहेत, मात्र स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर ६० वर्षांनी आपल्याला ही जाग आली आहे. आता मात्र प्रामाणिकपणे प्रयत्न करण्याची गरज आहे.

मुस्लिम समाजाच्या शिक्षणाबाबत सच्चर समिती असे म्हणते की, 'शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्याची या समाजाची फार मोठ्या प्रमाणावर इच्छा आहे. आणि केवळ ३ टक्के मुले मदरशात जातात.' पण मुस्लिमांसाठीच्या शैक्षणिक धोरणात, मदरशांच्या आधुनिकीकरणाच्या घोषणा आपले सरकार करते याला काय म्हणावे? मुस्लिम समुदायाला आर्थिक, सामाजिक दृष्ट्या सक्षम करणाऱ्या शिक्षणाची गरज आहे आणि त्यासाठी त्यांना वेगळे ठेवून नव्हे तर मुख्य प्रवाहात आणून प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. मात्र मुख्य प्रवाहातील शिक्षणाचे धर्मनिरपेक्षीकरण करणे ही त्याची पूर्वअट आहे.


सच्चर समिती मुस्लिम समाजाच्या समग्र मागासलेपणाचा जो उल्लेख करते, त्यात शिक्षणाचा आणि रोजगाराचा मुद्दा महत्त्वाचा आहे; पण अजूनही प्रत्येक पक्षाला सनातनी मुस्लिम नेतृत्वाचाच मोह असल्यामुळे राजकीय पातळीवर पुरेशा गंभीरपणे हे प्रश्न घेतलेच जात नाहीत. आज संपूर्ण देशात मुस्लिम समुदाय अस्थिरतेची, असुरक्षिततेची जी भावना अनुभवतो आहे, त्यामुळे साहजिकच समाजाचे अग्रक्रम बदलून जातात.

**मुस्लिम महिलांची परिस्थिती**

गेल्या दहा-पंधरा वर्षांत मी मुस्लिम स्त्री व समाज यांच्या प्रश्नांवर चौफेर प्रकाश टाकणारे तीन-चार मोठे संशोधन अभ्यासप्रकल्प केले. ज्यातून कार्यकर्त्यांना आवश्यक असलेल्या वैचारिक बैठकीच्या गरजेची काही प्रमाणात पूर्तता तर झालीच; पण मला स्वत:ला देशभरच्या समाजाशी संवाद साधून प्रत्यक्ष 'फिल' घेता आला. यातील पहिला संशोधन प्रकल्प १९९३-९४ या काळात 'टाइम्स' फाऊंडेशनचा होता. 'शाहबानो प्रकरणावर सर्वसामान्य मुस्लिम महिलांची एकूण स्थिती, त्यांचे प्रश्न आणि त्यांच्या भूमिका समजून घेणे' या दृष्टीने मी कामाला सुरुवात केली.

लालकृष्ण आडवाणींच्या रथयात्रेने देशभरात प्रक्षोभ निर्माण केला आणि त्याची परिणती बाबरी मशीद उद्ध्वस्त करून दंगली घडवून आणण्यात झाली. त्या काळात देशभर दंगली तर झाल्याच; पण मुंबईतील दंगलीत हजाराच्या वर माणसे मारली गेली; मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाले. अशीच परिस्थिती थोड्याफार फरकाने देशभर होती. अशा वातावरणात मी देशभर फिरले आणि ती परिस्थिती डोळ्यांनी पाहिली. त्या वातावरणातही मुस्लिम महिला बोलल्या. त्यांची ती गरज होती आणि आधार शोधण्याची त्यांची धडपड व जिगर मला या काळात अनुभवायला मिळाली.

देशभरातल्या अनेक मुस्लिम महिलांसमोर मी प्रश्नांचे गाठोडे घेऊन जात होते आणि त्यांच्या उत्तरांनी वास्तवातली दाहकता अधिक टोकदार होत होती. मुस्लिम स्त्रियांचे हक्क, कौटुंबिक हिंसाचार, तलाक अशा एक ना अनेक प्रश्नांची उत्तरे मन सुन्न करणारी



जिव्हाळ्यास अंतरीच्या आनंदाने उधळावे
घराघरांतून समृद्धीचे लक्ष दीप उजळावे !
आमच्या ग्राहकांना, भागधारकांना व हितचिंतकांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
NKGSB
CO-OP. BANK LTD.
(Multi-State Scheduled Bank)
डोळे मिटून व्यवहार करावा इतकी विश्वासाची बँक
रजिस्टर्ड ऑफिस : लक्ष्मी सदन, 361, व्ही. पी. रोड, गिरगाव, मुंबई 400 004 दूरध्वनी : 022 67545008 / 007
sec@nkgsb-bank.com • www.nkgsb-bank.com

25x20 cms

होती. शिक्षणाच्या बाबतीत प्रश्न विचारल्यावर डोळ्यांत अंजन घालणारे उत्तर मला गोव्यातील एका १८-२० वर्षे वयाच्या मुस्लिम तरुणीने दिले. 'जिस समाजमें मर्द भी पढे-लिखे नही होते, उसमें औरतों को कौन पढाएगा?' सच्चर समितीने जे मत अवघ्या काही वर्षांपूर्वी आपल्या अहवालात नोंदवले, त्याच्याकडे त्या तरुणीने जवळपास बारा वर्षे आधीच निर्देश केला होता.

मुस्लिम महिलांची परिस्थिती, प्रश्न आणि भूमिका या संदर्भात अभ्यास करताना देशभरातील मुस्लिम महिला मुख्यत्वे चार मुद्दे मांडत आहेत असे माझ्या लक्षात आले. ते चार मुद्दे म्हणजे, १.शिक्षण, २.सुरक्षितता, ३.रोजगार, आणि ४.कायदे.

म्हणजे त्यांच्या कार्यक्रमपत्रिकेत समाजाच्या विकासाचे मुद्दे प्राधान्याने होते. त्यांचे स्थान खरे तर 'अल्पसंख्याकांतील अल्पसंख्याक' असे आहे. एकीकडे आपल्या समाजातून स्त्रीचे हिरावले जाणारे अधिकार, तर दुसरीकडे बहुसंख्याक समाजातील धर्मांध शक्तीचे समाजावर, तिच्यावर होणारे हल्ले असे असून देखील तिची दूरदृष्टी आणि समज स्वच्छ आणि स्पष्ट आहे असे दिसते. तिची हतबलता आणि एकाकीपणा मात्र जाणवतो.

**चळवळ आहे का?**

मुस्लिम समाजाचा शिक्षणाचा प्रश्न सोडवण्या-साठी लागणारी चळवळ आज आहे? का असा साधा प्रश्न मनात येतो. अशा प्रकारची प्रभावी चळवळ अस्तित्वात नसल्याचे उत्तर द्यावे लागते. याचे कारण म्हणजे इथे अस्तित्वात असलेले हिंदू-मुस्लिम राजकारण. या दोन समाजांचे संबंध कसे आहेत यावर विकास अवलंबून आहे. हे संबंध शांततापूर्ण नसतील तर बहुसंख्याकांचा आणि अल्पसंख्याकांचाही विकास होऊ शकत नाही. भारतीय समाजाचा विचार करता हिंदू-मुस्लिम संबंध हा फार कळीचा मुद्दा आहे. आपण समाज जितका अस्वस्थ ठेवू तितका सत्तेत जाण्याचा आपला मार्ग सोपा होईल, हे गृहितक फारसे यशस्वी होताना दिसलेले नाही. एका समाजाच्या विरोधात दुसऱ्या समाजाला उभे केले जाते तेव्हा शिक्षणाचा मुद्दा मागे पडतो. विकासाचे सगळेच मुद्दे मागे पडतात. अशा परिस्थितीत बहुसंख्याक आक्रमक होतात आणि अल्पसंख्याकांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होतो. धर्माचा अतिरेक दोन्ही समाजांकडून केला जातो आणि तिथे फक्त हिंसाच जन्माला येते.

भारतातील मुस्लिम समाजाची सद्यस्थिती आणि ती सुधारण्यासाठी होत असलेल्या उपाययोजना यांचा विचार करताना चळवळींचा मुद्दा प्रकर्षाने पुढे येतो. सध्याच्या काळात चळवळी विखुरलेल्या आहेत. याचे कारण आज चळवळी क्षीण झाल्या आहेत. अशा परिस्थितीत मागे वळून बघाताना आणि चळवळींसमोर उभ्या राहिलेल्या आव्हानांकडे बघताना असे जाणवते, की या प्रवासातल्या पहिल्या टप्प्यात चळवळींचे वातावरण कमी-जास्त स्वरूपात पण ठोसपणे अस्तित्वात होते. विद्रोहाला जागा प्राप्त होत होती. मात्र नव्वदच्या दशकात चळवळी स्तब्ध होत गेल्या. या काळात क्रांतीची भाषा बोलणाऱ्या चळवळी लोप पावत गेल्या आहेत आणि श्रीमंत देशांच्या तंत्राने चालणाऱ्या संस्था उभ्या राहिल्या आहेत. चळवळींचे एनजीओकरण झाले हे वास्तव आता स्वीकारले जात आहे.

मात्र या सर्व बाबतीत मुस्लिम समाजात; विशेषत: महिलांमध्ये बरीच जागृती दिसून येते आहे. मुख्यत: वर सांगितलेले चार मुद्दे म्हणजे त्यांनी एका दृष्टीने समाजाच्या विकासाची कार्यक्रमपत्रिकाच समोर ठेवली आहे. त्याला बळ देणे ही या देशातील प्रत्येक जागरूक व्यक्तीची आणि धोरणकर्त्यांची जबाबदारी आहे. असे झाले तर वर्षानुवर्षे भारतात हिंदू-मुस्लिम संबंध आणि मुस्लिम समाजाच्या संदर्भात उभ्या राहणाऱ्या बऱ्याच प्रश्नांची उत्तरे मिळू शकतील.

---

**- ममता क्षेमकल्याणी**
विदिशा मिडिया नेटवर्क, ३०४, ३ रा मजला,
'धनश्री' स्वरनगरी सोसायटी, सिंहगड रोड, पुणे-५१
भ्रमणध्वनी : ९८८१७३६०७८
mamata_kshem@yahoo.co.in

# हॉफनंगचे हास्यसंगीत


प्रकाश चव्हाण

''संगीतक्षेत्रातील माझ्या मित्रांच्या लेखी मी एक थोर व्यंगचित्रकार आहे, तर माझ्या चित्रकार मित्रांची अशी समजूत आहे की मी एक मोठा संगीततज्ज्ञ आहे.'' जेरार्ड हॉफनंग विनयापोटी वरील शब्दांत आपला परिचय करून देत असे, पण कलारसिकांच्या मनामध्ये त्याची प्रतिमा 'एक विक्षिप्त आनंदयात्री' अशीच होती.

जेरार्डचा जन्म जर्मनीमधील एका सुखवस्तू ज्यू कुटुंबात १९२५ साली झाला. वयाच्या सहाव्या वर्षापासून हे बालक व्यंगचित्रे काढू लागले. त्यावेळची बरीच चित्रे अद्याप सुखरूप आहेत. (सोबतचे चित्र वयाच्या सातव्या वर्षी काढलेले आहे.) चित्रकलेबरोबरच त्याला वाद्यसंगीतातही गती होती. कोणतेही वाद्य हाती आले की त्याच्यावर जेरार्डची बोटे सराईतपणे फिरू लागायची आणि कुटुंबीयांचे व शेजाऱ्यांचे लक्ष वेधून घ्यायची!

बालपणीचा हा सुखाचा काळ लवकरच संपणार होता कारण साऱ्या जर्मनीमध्ये ज्यूद्वेषाची कावीळ झपाट्याने पसरू लागली होती. जेरार्डला खास 'बहिष्कृत' मुलांसाठी राखीव अशा 'अनार्य' शाळेत प्रवेश देण्यात आला. जर्मनीमधील अस्वस्थ व असुरक्षित वातावरणात राहण्यापेक्षा इंग्लंडला जाणे अधिक सुखाचे असा विचार जेरार्डच्या मातापित्यांनी केला.

लंडनमध्ये आला तेव्हा जेरार्ड तेरा वर्षांचा होता. पुढे त्याचे वडील कुटुंबाला सोडून एकटेच पॅलेस्टाईनला निघून गेले व एका बँकेचे काम पाहू लागले. जेरार्डने लंडनमधील एका शाळेत प्रवेश घेतला. पण नव्या शाळेतल्या नव्या नियमाशी जुळवून घेणे त्याला अवघड होऊ लागले. अस्वस्थ जेरार्डला ही शाळा तुरुंगासारखी भासू लागली. तीन वर्षे अशी काढल्यानंतर त्याने आपल्या आईजवळ ''मी यापेक्षा कलाविद्यालयात जातो....'' असा धोशा लावला. अखेर मातृहृदय द्रवले आणि स्वारी आर्ट्स स्कूलमध्ये भरती झाली. इथला अनुभवही फारसा उत्साहवर्धक नव्हता. आपलेच खरे करण्याचा त्याचा हेका शिक्षकांना मानवत नव्हता. कलाविद्यालयातून गच्छन्ती होण्याचाही प्रसंग ओढवला. याच सुमारास दुसरे महायुद्ध सुरू झालेले होते. जेरार्डने इंग्लंडच्या लष्करात भरती व्हायचा प्रयत्न केला, पण जर्मनी या शत्रुराष्ट्रात झालेला त्याचा जन्म या संकल्पाच्या आड आला. अखेर, एका दूध डेअरीत बाटल्या धुण्याचे



काम त्याने पत्करले. पण हॉफनंगचा जन्म या कामासाठी झाला नव्हता. स्टॅनफोर्ड येथील कलाविद्यालयातही त्याने मुलांना चित्रकलेचे धडे दिले.

याआधीच, वयाच्या पंधराव्या वर्षी त्याचे एक हास्यचित्र 'लिलिपुट'या प्रसिद्ध विनोदी मासिकात प्रकाशित झाले होते. कलाविद्यालयात शिक्षक म्हणून स्थिर झाल्यावर, त्याच्या हास्यचित्रकारीला नवे धुमारे फुटले. इंग्लंडमधील अनेक प्रतिष्ठित नियतकालिकांत हॉफनंगची चित्रे प्रसिद्ध होऊ लागली.

''मला चित्र काढण्यासाठी काहीच करावे लागत नाही. समजा, मी खुर्चीचे चित्र काढायला घेतले की खुर्ची कागदावर हुबेहुब प्रकट होत!'' या शब्दात त्याने चित्रनिर्मितीची प्रक्रिया वर्णन केली आहे. त्याची सहजसुंदर शैली आणि खेळकर वृत्ती या दोन्ही गोष्टींचे प्रकटीकरण सांगीतिक हास्यचित्रांत प्रकर्षाने झाले. त्याच्या या कामगिरीमुळे राजकारण, समाजकारण आणि कुटुंब हे नित्याचे प्रांत ओलांडून हास्यचित्रकला संगीताच्या क्षेत्रात अवतीर्ण झाली. त्याने कुंचल्यातून साकार केलेल्या वादकांच्या व संगीतकारांच्या विचित्र लकबी, वादकचमूमधील गमतीजमती आणि खुद्द वेगवेगळ्या वाद्यांमधील खासियती पाहताना एक प्रसन्न अनुभव येतो. यातील काही नमुने येथे सादर केले आहेत.


हॉफनंगचे वाद्यवेड इतके पराकोटीचे होते, की त्याने काही प्राण्यांना व पक्ष्यांनाही आपल्या संगीत हास्यचित्रविद्यालयात दाखल करून घेतले. मांजर हा






त्याचा खास आवडीचा प्राणी! त्याने मांजराचे व्हायोलिन केले आहे. पाणगेंड्याच्या प्रचंड जबड्याला पियानोचे तंतोतंत रूप देणे फक्त हॉफनंगच करू जाणे. १९५३ मध्ये त्याच्या सांगीतिक हास्यचित्रांचे सहा छोटेखानी संग्रह प्रसिद्ध झाले.

"Ho Ho Hofnung या हास्यचित्रसंग्रहात हॉफनंगच्या संगीताखेरीज इतर हास्यचित्रांचा समावेश केलेला आहे. अर्थात, चित्रकाराचा तरल व नर्मविनोदी 'मूड' या हास्यचित्रांतदेखील जाणवतो.



बागेमध्ये फुलपाखरांचा पाठलाग करणाऱ्या एका रंगेल उमरावाचा 'रसिक' बो आपल्याला हास्यचित्रात भेटतो. तर प्रतिकूल परिस्थितीत न डगमगता आपल्या व्रताचे निष्ठेने आचरण करणारे तपोवृद्ध महाभाग आणखी एका हास्यचित्रामध्ये दर्शन देतात.

हॉफनंगच्या हास्यचित्रांचे विषय, आशय व स्वरूप त्याकाळी प्रसिद्ध होणाऱ्या हास्यचित्रांपेक्षा सर्वस्वी वेगळे होते. 'केवळ गंमत' हाच या प्रसन्न व शैलीदार हास्यचित्रांचा प्रधान हेतू होता. अशी हास्यचित्रे रसिक वाचकांच्या प्रेमाचा विषय न झाली तरच नवल होते.




हास्यचित्रकलेचे असे प्रयोग हा हॉफनंगच्या आनंदोत्सवाचा केवळ पहिला अंक होता. १९५० च्या आसपास त्याने 'पावावरची बुरशी' या नावाचे एक विनोदी भाषण बी.बी.सी.वरून इंग्लंडला ऐकवले. त्यानंतर प्रत्येक रविवारी दुपारी 'कृपया, एक मिनिट!' या रेडिओ शो द्वारे तो ब्रिटिश श्रोत्यांना भेटू लागला. रेडिओवरची वा ऑक्सफर्ड युनियनच्या व्यासपीठावरची त्याची भाषणे श्रोत्यांसाठी एक सुखद मेजवानी असायची. क्रूरता वा असभ्यता यांचा लवलेशही नसलेला शुद्ध विनोद त्याच्या वक्तृत्वातून प्रकट होत होता. भाग्यदेवता आता हॉफनंगवर प्रसन्न होऊ पाहत होती. याचा प्रत्यय १९५२ मध्ये ॲनिटा बेनेट नावाच्या युवतीशी प्रेमविवाह झाल्यानंतर जेरार्डला आला. त्यावेळी ऐन तारुण्यात असलेल्या हॉफनंगचा अवतार त्याच्या वयाशी तसा सर्वस्वी विसंगत होता. तो चक्क साठीतला वाटायचा! (त्याच्या किंचित 'घोगऱ्या'आवाजाचीही या अवताराला पुरेपूर साथ होती!) हॉफनंगच्या व्यक्तिमत्त्वातील या वैगुण्याचे फारसे वैषम्य न बाळगता ॲनिटाने त्याला त्याच्या साऱ्या



कलाप्रवासात समरसून साथ दिली.

हास्यचित्रकार व विनोदी वक्ता म्हणून सर्वपरिचित व सुप्रतिष्ठित झाल्यावर हॉफनंगच्या संगीतवेडाने पुन्हा एकदा उचल खाल्ली. त्याने ट्युब हे वाद्य खरेदी केले. या वाद्यावर त्याने इतके प्रभुत्व मिळवले, की एका बड्या वाद्यवृंदाच्या कार्यक्रमांना ट्युबवादक म्हणून त्याला पाचारण करण्यात येई. या कार्यक्रमात तो विनोदी प्रवेशही सादर करी. याच दरम्यान. निव्वळ शिट्टीवर हा सारा कार्यक्रम मित्रासमोर पेश करण्याचा पराक्रमही त्याच्या खात्यावर जमा झाला. कधी कधी हे विक्षिप्तराव मित्रांना फोन करून फक्त शिट्टीद्वारे संभाषणही करू लागत. वाद्यसंगीताच्या माध्यमातून, संगीतविश्वात घडणारे विचित्र, विनोदी प्रसंग सादर करणारा वाद्यवृंद निर्माण करायचा या कल्पनेने आता हॉफनंगला झपाटले. आपले सारे संघटनकौशल्य त्याने त्यासाठी पणास लावले. प्रख्यात संगीतदिग्दर्शकांना आमंत्रित करून काही खास संगीतरचना बांधण्यात आल्या. विविध वाद्यांवर हुकुमत असणारे नामवंत वादकही या वाद्यवृंदात दाखल झाले. विनोदी संगीतिका सादर करण्यासाठी फुटके ग्लास, व्हॅक्युम क्लीनर (तळचे चित्र) बागेत वापरण्यात येणारे होस पाईप, फरशा गुळगुळीत करणारे मशीन यांसारख्या गोष्टी वाद्ये म्हणून वापरण्याचे ठरले. जोडीला हॉफनंगचे ट्युबवादन व विनोदी चाळे होतेच. तब्बल सहा महिने पूर्ण तयारी केल्यानंतर हॉफनंगने हा गमतीदार संगीत जलसा लंडनमधील रॉयल फेस्टिवल हॉल येथे सादर केला तेव्हा एकच धमाल उडाली. या जलशामध्ये अशाच स्वरूपाचा 'आंतरग्रह संगीत गोंधळ' हॉफनंगने (१९५८ मध्ये) लंडनच्या स्टेजवर आणला. (चित्र पुढील पानावर) हास्यचित्रकार, विनोदी वक्ता आणि आगळ्यावेगळ्या विनोदी संगीतिकांचा निर्माता या तिन्ही भूमिका समर्थपणे साकार करणाऱ्या जेरार्डचे यश दिवसेंदिवस वर्धमान होत होते. त्याच्या सुखी संसारात एव्हाना दोन बछड्यांची भर पडली होती. मित्रपरिवाराच्या लेखी त्याचे घर आनंदाचा एक ठेवा






बनला होता. याचे पहिले कारण म्हणजे जेरार्ड हॉफनंगचे सहृदय, आनंदी, थोडेसे विक्षिप्त आणि सभ्य व्यक्तिमत्त्व, ज्याला सार्वजनिक व खाजगी असे दोन वेगवेगळे मुखवटे नव्हते. दुसरे कारण अर्थातच जेरार्डच्या साऱ्या उद्योगात नवऱ्यापेक्षा काकणभर अधिक उत्साहाने सहभागी होणारी त्याची सखी ॲनिटा. अनेक तत्कालीन राजकीय वा सामाजिक प्रश्नांबाबत हॉफनंगचा दृष्टिकोन उदारमतवादी होता. नियमितपणे तुरुंगात जाऊन कैद्यांची भेट घेऊन त्यांची आपुलकीने वास्तपुस्त करणे ही हॉफनंगची विशेष आवडीची गोष्ट होती.

१९५९ च्या सप्टेंबर महिन्यात आपल्या अनेक उपक्रमांच्या जोडीला Festival of Horror (महोत्सव भीतीचा!) नावाची विनोदी संगीतिका आयोजित करण्यात हॉफनंग मग्न होता. या कार्यक्रमाच्या प्रवेशिकेसाठी त्याने 'चषकामधील मानवी रक्त स्ट्रॉच्या साहाय्याने तब्येतीत पिणाऱ्या भयावह पिशाच्चाचे, व्यंगचित्र रेखाटले होते. हे चित्र पाहून कदाचित नियती गालातल्या गालात हसली असावी. कारण त्यानंतर काही दिवसांतच, म्हणजे २८ सप्टेंबर १९५९ रोजी हॉफनंगचे मेंदूतील रक्तस्रावाने आकस्मिक निधन झाले. त्यावेळी त्याचे वय फक्त चौतीस वर्षे होते.



आपले एक गमतीदार चित्र हॉफनंगने एका हास्यचित्रसंग्रहाच्या मुखपृष्ठासाठी रेखाटलेले आहे. (बाजूचे चित्र) विचार करणाऱ्या प्रत्येकाला 'मी कोण?' हा आध्यात्मिक प्रश्न सदैव सतावत असतो. आनंदयात्री हॉफनंगला या अवघड प्रश्नाचे सोपे उत्तर सापडले होते, याची साक्ष हे 'स्वयंचित्र' देते.

**– प्रकाश चव्हाण**
२३४२, बी वॉर्ड, देवणेगल्ली,
मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६०१२

# ‘आनंदभूमी’च्या शोधात

प्रभा पुरोहित

जवळ जवळ पाच शतकांपूर्वी त्रान थुआन टांग राजा राज्य करीत होता. तेव्हा तू थुक नावाचा एक तरुण अधिकारी तेन दू परगण्याचा मुख्य होता. तो खूप विद्वान होता आणि त्याच्याकडे अनेक दुर्मिळ, मौल्यवान ग्रंथांचा संग्रह होता. त्यात त्याला सर्व जगातील कुठलंही ज्ञान मिळत असे. फक्त ‘आनंदभूमी’ कुठे आहे ते त्याला समजू शकत नव्हतं. आणि ते जाणून घेण्याची त्याला अतीव इच्छा होती.

तू थुक लहान असताना त्याला कोणीतरी सांगितलं होतं की टांग झुआन झाँग ह्या चिनी बादशहाला आनंदभूमीचा शोध लागला होता. एका ऑगस्ट महिन्यातील पौर्णिमेच्या रात्री तिथे त्यांनी पीच फुलांच्या रंगांसारखा वर्ण असलेल्या युवती बघितल्या होत्या. त्यांनी इंद्रधनुष्याच्या रंगांचे कपडे घातले होते आणि त्यांच्या पोषाखाच्या बाह्या सैलसर अन् उडत्या होत्या. ती आनंदमय, सदैव-यौवनभूमी होती. तिथे हास्य, संगीत अन् नृत्य ह्यातच वेळ जात असे. त्या नृत्यांगनांकडूनच राजा ‘खूक नेह थुआंग’ हे नृत्य शिकला होता. आपल्या राज्यात परत आल्यावर त्यानं आपल्या प्रासादातील ललनांना हे नृत्य शिकवलं. रुपेरी चंद्रप्रकाशित रात्री राजा जेव्हा आपल्या सुवासिक मद्याचे घोट सावकाश घेत असे, तेव्हा ह्या नृत्यांगना हे राजानं शिकवलेलं नृत्य त्याच्यापुढे सादर करीत.

अगदी बालपणापासून तू थुक ह्या आनंदभूमीची स्वप्नं बघायचा आणि कधीतरी ही अद्‌भुत भूमी प्रत्यक्ष बघण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती.

एके दिवशी तू थुक एका जुन्या पॅगोडाजवळून जात होता. हा पॅगोडा तिथे फुलणाऱ्या मनोहर फुलांसाठी प्रसिद्ध होता. ते ‘बिन्ह ती’ ह्या वर्षीच्या फुलांच्या सणाचे दिवस होते. तेव्हा असं घडलं की एका सुंदर युवतीनं ती टवटवीत फुलं जवळून न्याहाळण्यासाठी त्या फुलांची फांदी खाली वाकवली अन् असं करताना ती फांदी तुटली. त्या पॅगोडातील पुजाऱ्यांनी ते बघितलं आणि त्या अपराधाबद्दल तिला पकडून दंड ठोठावला. तो दंड भरणं तिला शक्यच नव्हतं. तू थुकनं हे घडलेलं सगळं बघितलं. पण त्याच्याजवळही तो दंड भरण्याइतके पैसे नव्हते. मग त्यानं आपल्या अंगातला मखमली कोट देऊन त्या त्या तरुणीला सोडवलं. तू थुकच्या ह्या औदार्याची सर्वांनी तारीफ केली, ही वार्ता त्या परगण्यात पसरली.

काही वर्षांनी तू थुकला ह्या सर्व ऐहिक सन्मानांचा कंटाळा आला आणि त्यात रसही उरला नाही. त्यानं आपल्या नोकरीचा-अधिकाराचा राजीनामा दिला. त्याला

'निळे पर्वत अन् पाचूसारखे हिरवे झरे' बघायचे होते. शेवटी तो ताँग सॉन प्रदेशात, जिथे अनेक सुंदर निर्झर आणि गुंफा होत्या तिथे येऊन पोचला.

एके दिवशी त्यानं त्याचं ल्यूट हे वाद्य आणि कवितेचं पुस्तक घेतलं. मद्याचा तुंबा घेतला आणि जंगलातून भटकण्यासाठी निघाला. अशा जंगलात जिथे झाडांच्या फांद्यांनी मांडव गुंफलेले होते, सबंध जंगलभर. त्यानं अनेक निर्झर ओलांडले, प्रसिद्ध अशा गुलाबी पर्वताला भेट दिली. हिरव्या ढगांच्या गुहेपाशी गेला आणि शेवटी लाई नदीवर पोचला. ह्या भटकंतीत त्यानं निसर्गाच्या वन्य जादूवर कविता केल्या, सुंदर वर्णनपर.

एक दिवस पहाटेच तो जागा झाला आणि त्यानं आकाशात सुंदर फिकट रंगाचे ढग बघितले. ते समुद्रावर चमकत होते आणि कमळाच्या आकारासारखे आकार बदलत होते. ह्या दृश्यानं मोहित होऊन तो वल्हवत समुद्रावर जाऊ लागला. जवळ गेल्यावर त्याला समुद्रावर तरंगत असलेला जादूचा पर्वत दिसला. त्यानं किनाऱ्यावर पाय ठेवला. त्याच्या सभोवतालचं निसर्गदृश्य पाहून तो हेलावून गेला आणि त्यानं पंक्ती रचल्या–

*ह्या उंच उंच पर्णसंभारात हलताहेत सहस्र प्रतिबिंबं.*
*ह्या गुंफांतील पुष्पसंभार खुणावतोय पांथस्थाला.*
*पण आहे तरी कुठे तो निर्झराजवळ वनौषधी वेचणारा?*
*अकेला नावाडी वल्हवतोय निर्झरावर आपली नौका.*
*अन् त्याच्या गिटारीतून ऐकू येताहेत फक्त सूर दोनच.*
*नौका डोलते आळसात, मद्याचे घोट पुढे करतोय तुंबा.*
*विचारावं का त्या नावाड्याला वो लँग संबधात?*
*''कुठे आहे ती 'आनंदभूमी' अन् तिचे पीच वृक्ष?''*

तू थुक काळोख्या गुहेत शिरला आणि त्याला जाणवलं की, पर्वत गुहेच्या अगदी जवळ टेकला आहे. काही ठिकाणी ती गुहा इतकी अरुंद होती की त्याला रांगावं लागत होतं. पण नंतर ती उंच आणि रुंद झाली. जेव्हा तो अगदी तळाशी गेला तेव्हा सोनेरी प्रकाशानं त्याचं स्वागत केलं. त्यानं वर बघितलं. त्याला दिसलं की पर्वताचे खडक अगदी पांढरेशुभ्र आहेत. जणू निरभ्र आकाशातले धवल ढगच. ह्या खडकांचे कंगोरे पकडून तो वर वर चढू लागला.

शिखराच्या समीप पोचताच तिथल्या हवेला लिलीच्या फुलांचा आणि गुलाबांचा गंध येऊ लागला. स्फटिकासारख्या स्वच्छ पाण्याचा झरा त्याच्या पायाशी वाहत होता आणि त्या पाण्यात चमचमणारे सुवर्णमासे पोहत होते. त्या पाण्यात कमळाची पानं तरंगत होती. त्या पानांवरच्या दवबिंदूत इंद्रधनुष्यी रंग चमकत होते.

> व्हिएतनाममध्ये कधी कोणाला एखादी सुंदर स्त्री दिसली तर तो म्हणतो, ''बघा, बघा ते सौंदर्य, किती आश्चर्यकारक! बहुधा ती 'आनंदभूमी'मधून आली असावी. नक्कीच ती व्यक्ती तू थुकनी सांगितलेल्या गोष्टीचा दाखला देत असावी. कारण तू थुकला त्या पऱ्यांच्या देशात जाण्याचं सौभाग्य लाभलेलं होतं. तर त्यानं सांगितलेली ही कहाणी.

भासत होतं जणूकाही दिवेच पाजळताहेत. त्या निर्झरावर एक पूल होता, ज्याच्यावरून पलिकडच्या सुंदर बागेत जाता येत होतं. त्या बगिच्यात अदृश्य पऱ्या गात होत्या. त्यांचं गायन इतकं मुलायम अन् सुरेल होतं की कुठल्याही मानवी आवाजाशी त्यांची तुलनाच होऊ शकत नव्हती.

त्या वाटिकेत जाणाऱ्या मार्गावरच्या वृक्षांच्या फांद्या नक्षत्रांसारख्या चमचमणाऱ्या फुलांनी लगडलेल्या होत्या. त्यांना सोबत होती नवलपरी पक्ष्यांची. त्यांच्या सुरेल, आर्त सुस्वरांनी आसमंत भारला होता. तऱ्हतऱ्हेच्या रंगांच्या पाकळ्यांचा सडा त्या बागेतील हिरवळीवर पडला होता आणि त्यावर सुंदरसा मोरांचा थवा आपला पिसारा फुलवून उभा होता. हिमवर्षाव व्हावा तसा फुलपाकळ्यांचा सतत वर्षाव होत होता. त्या अनोख्या जगात तू थुक स्वत:चं भान हरपून गेला होता. पण एकाएकी ऐकू आलेल्या काही आवाजांनी त्याला भानावर आणलं.

अवर्णनीय रंगांनी चमचमणाऱ्या काही युवती त्याचं स्वागत करण्यासाठी सामोऱ्या आल्या. त्यांनी निळी वस्त्रं परिधान केली होती आणि त्यांच्या केशकलपात चांदण्या चमकत होत्या.

त्यांच्यापैकी एक युवती म्हणाली, ''आमच्या सुंदर वराचं स्वागत असो.'' नंतर त्या सर्वजणी 'वराचं आगमन' झालं आहे हे सांगण्यासाठी राजमहालात परत गेल्या. थोड्याच वेळात त्या परतल्या. त्याला वाकून अभिवादन करून राजवाड्यात चलण्यासाठी त्यांनी त्याला विनंती केली.

तू थूक त्या तरुणींच्या मागोमाग एका प्रशस्त भव्य दिवाणखान्यामध्ये गेला. त्या दिवाणखान्याच्या भिंती मखमली होत्या, बारीक नक्षी कोरलेले दरवाजे होते. एक कोमल सुरावट तिथे हवेत तरंगत होती. त्याच्या आगमनाची सूचना हळुवार शिंग फुंकून देण्यात आली.

एका अतिशय सुंदर नक्षीकाम केलेल्या सिंहासनावर

एक घरंदाज प्रौढा विराजमान झाली होती. तिचा पेहराव हिमधवल रेशमी होता. चंदनाच्या आकर्षक खुर्चीकडे निर्देश करून तिनं त्याला स्थानापन्न होण्यास सुचवलं. आणि ती म्हणाली, ''विद्वान विद्यार्थ्या अन् सुंदर दृश्यांवर प्रेम करणाऱ्या युवका, तू कुठल्या भूमीवर आहेस हे तुला माहीत आहे का?''

''मी खूप निळे पर्वत बघितले. खूप भयंकर जंगलं फिरलो; पण खरं सांगायचं तर इतकी सुंदर भूमी ह्यापूर्वी कधीही बघितली नव्हती. अहो उदात्त बाईसाहेब, मी कुठल्या भूमीत आहे, हे तुम्ही मला सांगाल का?''

राणीसाहेबांनी स्मित केलं आणि त्या म्हणाल्या, ''करड्या मातीच्या जगातून येणाऱ्या व्यक्तीला ही भूमी कशी ओळखू येणार? फू लाई पर्वताच्या छत्तीस गुंहांपैकी सहाव्या गुहेत तू आहेस... हा पर्वत अफाट पसरलेल्या महासागरावर तरंगतो आणि वाऱ्याच्या लहरीप्रमाणे दिसतो किंवा अदृश्य होतो. मी नॅम निटॅक शिखराची परीराणी आहे. आमच्या घराण्याचं नाव नगुय आहे. मला ठाऊक आहे की तू अतिशय निर्मळ मनाचा आहेस आणि तुझं हृदय अगदी उदात्त आहे. तुझं मी स्वागत करते.''

परीराणी पुढे म्हणाली, ''ही माझी मुलगी गिआँग हूँग. ती ज्यावेळी अडचणीत होती त्यावेळी तिला मदत करणारी एकमेव व्यक्ती म्हणजे तूच. तुझं हे उदात्त औदार्य आम्ही विसरूच शकत नाही. मला तुझ्याप्रति आभार व्यक्त करायचे आहेत. माझ्या मुलीचा हात मी तुझ्या हातात देऊ इच्छिते. ह्या पुढे, लग्नानंतर तिचं आयुष्य तुझ्या आयुष्याशीच निगडित असेल.''

लग्नसमारंभ त्याच दिवशी पार पडला. त्यासाठी इतर सर्व गुहांमधल्या पऱ्या उपस्थित होत्या, निमंत्रणानुसार.



खूप भव्य मेजवानीचं आयोजन करण्यात आलं आणि स्वयंवराचा सोहळा दिमाखात पार पडला.

त्यानंतर पुढचे सुखकारक दिवस हास्यविनोदात आणि अतीव आनंदात 'आनंदभूमी'त व्यतीत होत होते. त्या भूमीतील दिवस ना उष्ण होते ना थंड. कारण तिथं सदैव वसंतऋतूच होता. वृक्षांच्या फांद्या नेहमी गुलाब फुलांपेक्षाही सुंदर फुलांनी गच्च भरलेल्या असायच्या. तू थुकला ह्यापेक्षा अधिक कशाचीही अपेक्षा नव्हती.

तरीही जसजसे दिवस जाऊ लागले तसतशी त्याला त्याच्या जन्मभूमीची आठवण त्रस्त करू लागली. तो समुद्रकिनाऱ्यावर एकटाच जाऊन क्षितिजाकडे नजर लावून उभा राहायचा.

एक दिवस तो दक्षिण दिशेकडे बघत उभा होता तेव्हा त्याला एक नाव तिकडे जाताना दिसली. तिकडे निर्देश करीत तो गिअँग हाँगला म्हणाला, ''मला वाटतं की ही नाव मी जिकडून आलो त्याच दिशेला जाणार आहे. मी माझ्या भावना फार काळ लपवू शकत नाही. मी माझ्या घरचा विचार करीत असतो, त्या दिशेला बघत. मी जर थोड्या दिवसांसाठी तिकडे जाऊन आलो तर तू समजून घेशील?''

विरहाच्या कल्पनेनं गिअँग हाँग शोकाकुल झाली. पण तू थुक आग्रहपूर्वक तिला म्हणाला, ''थोड्याच दिवसांचा तर प्रश्न आहे. मी माझ्या नातेवाईकांना भेटून लगेच परतेन, शपथपूर्वक सांगतो.''

परीराणीचा सल्ला घेण्यात आला. ती म्हणाली, ''त्याला जर दुःखाच्या अन् परिश्रमाच्या, कष्टाच्या भूमीलाच परत जायचं असेल तर त्याला थांबवण्यात काय अर्थ? त्याच्या मनावर अजूनही जन्मभूमीच्या आठवणींचंच ओझं आहे. त्याच्या इच्छेप्रमाणे होऊ द्या.''

तू थुकला क्षणभर डोळे मिटण्यास सांगण्यात आलं आणि त्यानं जेव्हा डोळे उघडले तेव्हा तो पृथ्वीवर पोचलेला होता. त्यानं आपल्या गावाचा मार्ग विचारला तेव्हा तो त्याच्या गावातच आहे, असं त्याला सांगण्यात आलं.

त्याला त्याचं गाव ओळखता येईना, तिथला परिसर ओळखीचा वाटेना. त्याच्या जुन्या मित्रांऐवजी नवीनच चेहरे दिसत होते, जे त्यानं आधी कधीही बघितलेले नव्हते. तो चौकात पोचला आणि त्यानं जुन्या व्यक्तींची चौकशी केली आणि आपलं नावही सांगितलं. कोणालाही त्याचं नाव माहीत नव्हतं. त्यानं गाव सोडलं कारण त्याची खात्री पटली होती की ते त्याचं गाव नव्हतंच. तो चालू लागला तेव्हा त्याला एक वृद्ध भेटला. त्यांना तो म्हणाला, ''आजोबा महोदय, मला क्षमा करा. माझं नाव तू थुक आहे आणि मी माझ्या जन्मभूमीच्या शोधात आहे. तुम्ही मला मार्ग दाखवू शकता का?''

''तू थुक, तू थुक!'' त्या वृद्धानं पुनरुच्चार केला आणि तो काहीतरी आठवू लागला मनोमनी. तो पुढे म्हणाला, ''मी लहान होतो तेव्हा मला सांगायचे की तू थुक नावाचा आमचा कोणीतरी पूर्वज तेन दू परगण्याचा मुख्य अधिकारी होता. परंतु त्यानं शंभर वर्षांपूर्वीच आपल्या पदाचा राजीनामा दिला आणि तो कुठल्यातरी अनोळखी प्रदेशात निघून गेला अन् कधीच परतला नाही. अनेक लोकांनी सांगितलं की तो स्वर्गात गेला. बहुतेक तो दरीत कोसळला असावा हीच शक्यता जास्त. तो जवळजवळ आन वंशाच्या शेवटच्या राज्यकर्त्यांचा काळ होता अन् आता आपण चौथ्या ते राजाच्या अमलाखाली आहोत.''

नंतर तू थुकनं त्याच्या अद्भुत अनुवभाची कहाणी सांगितली. तो आनंदभूमीत गेला होता, तिथं राहिला होता त्याला बरोबर शंभर वर्षं झाली होती.

''पृथ्वीवरचं एक वर्ष म्हणजे आनंदभूमीवरचा एक दिवस होतो असं मी ऐकलं आहे. म्हणजे तूच आमचा आदरणीय पूर्वज आहेस, तू थुक.'' तो वृद्ध म्हणाला आणि पुढे तो बोलला, ''चल, मी तुला माझं जुनं घर दाखवतो. चल, कृपा करून चल.''

आणि तो वृद्ध तू थुकला एका वैराण जागी घेऊन गेला. तिथे एक पडकं झोपडं होतं. ह्याशिवाय काहीही नव्हतं.

तू थुकची अत्यंत निराशा झाली आणि तो खूप दुःखी झाला. शक्य तेवढ्या लवकर आनंदभूमीला परतण्याची त्याला घाई झाली. त्याच्या ओळखीचे सर्व लोक काळाच्या पडद्याआड गेले होते, अनेक वर्षांपूर्वीचं नवीन तरुण पिढीचं वर्तन त्याला पूर्णपणे विस्मयचकीत करत होतं!

तो पुन्हा त्या विरुद्ध दिशेला असलेल्या पर्वताकडे निघाला... पऱ्यांच्या प्रदेशाच्या शोधात. त्याला ती आनंदभूमी सापडली की तो कुठेतरी हरवला हे कोणालाच ठाऊक नव्हतं... आणि कळणारही नव्हतं.

(व्हिएतनामी लोककथेचा स्वैर अनुवाद)

---

**– प्रभा पुरोहित**
५, अभंग, सहित्य सहवास,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१

# कवितेचं व्यासपीठ

## आभासात लोटणारा

घनगर्द आभाळाखाली
डोंगरदऱ्यांतून, कडेकपाऱ्यातून
चिंबचिंब पाऊस
गवतपाती तरारलेली
झाडंपेडं झिंगलेली
स्वच्छसुंदर गारवा
किर्रकिर्र शांतता...
मधेच, भरारभरार वारा

समोर खडा
ड्युकचा कभिन्न पहाड
धुक्यात लपून
चेटूक करणारा...
आव्हान देणारा...!

डोंगरचढावर नजर ठेवून
पुन्हा पाऊल उचलावे तो,
आवेगानं माझ्याकडे धावत सुटलेला
झळझळीत, चंदेरी
नवा, कोरा, झरझरझरा
पावलांना भिजवून
आभासात लोटणारा....

– **उषा मेहता**
१६–१७, शिवाजी पार्क,
मुंबई – ४०० ०२८
फोन : २४४६१९९१



## ठेव

एकाकी अवचित आला
वितळून चंद्र दारात
कुलवंत चिंब झालेली
व्याकुळशी ओली रात

भयभीत ढगांच्या ओळी
घेतात शोध रानात
भिजलेल्या वृक्षाखाली
पेंगुळला कंपित वात

कोरून नभाला आली
थरथरती सागरगाज
भंगल्या डहाळीवरती
रात्रीला कुठली नीज

श्वासात कोंडले अवघे
स्वर धूसरसे अनिवार
भयशंकित प्राणामधले
करकरले उघडे दार

वैफल्य कुणी पांघरले
दूरस्थ वादळासाठी
मिणमिणत्या
ज्योतीमधले
संचित हे माझ्या गाठी

– **गोविंद केळकर**
आशीर्वाद रोड नं १,
बंगला नं ४, शास्त्रीनगर,
बेळगाव (कर्नाटक) : ५९० ००१
फोन : ०८३१–२४३६२६५

## || मरतोच बाप ||

माझ्या मनातले
मांडू कुठे बोल
आटलेली ओल
असताना.
किती मी मांडावे
उकरून शब्द
राहूनिया स्तब्ध
तुझ्या दारी.
कांडावं कांडावं
आयुष्य कांडावं
कुणाशी भांडावं
सांग तरी.
डोळ्यातलं पाणी
आज गेलं खोल
त्याला तरी मोल
उरलं का
उपाशी पोटाचा
करावा सांभाळ
डोईचं आभाळ
पाहूनिया
कुणब्याची व्यथा
मांडू तरी किती
त्याची शेणमाती
झाल्यावर
कोणतं केलं रे
कुणब्यानं पाप
मरतोच बाप
लटकून

**– गणेश एस्. भाकरे**
वॉर्ड नं.८, महाजन
ले–आउट,
छिंदवाडा रोड,सावनेर,
नागपूर ४४१ १०७
भ्रमणध्वनी :
९९२३८२९७१७



## | अभंग |

देठां...ओठांवर
गारठले सूर
कंठात काहूर
शब्दांचेच ।

मातीला लागले
हिरवे डोहाळे
शिणलेले डोळे
तुझ्यासाठी ।

चांदण्यांची रात
दिव्यात जागली
चोचीतली बोली
समजून घ्या हो

**– अर्जुन देशमुख**
अक्षरपान, कोरडगाव,
ता. पाथर्डी,
जिल्हा अहमदनगर

## किती काळ पाहू...

किती काळ पाहू
तुझी वाट मेघा
ओढून दमलो
भूमीवरी रेघा

झाडांचे खराटे
उभे बांधावर
भिरूड लागून
पुरते बेजार

दुबार पेरून
बसलो हताश
तुझी वावटळ
घुमते उदास

तुझ्या वाटेवर
जीव अंथरून
मीच मला आता
घेतले गाडून

**– शशिकांत शिंदे**
मुसमाडे बिल्डिंग, जिजाऊनगर,
कोल्हार (खु), ता. राहुरी,
अहमदनगर ४१३७१०

## वैश्विक सोरायसिस

नाही लिहून होत एक कविता
जी मी, शिलगावून देईन तुकड्यातुकड्यांनी
ठिकठिकाणी मच्छर उद्‌बत्तीसारखी!

अख्खा भोवताल भुकेतून विस्तारलेला
अन्‌ हा दिल जाळवा वैश्विक सोरायसिस!
संस्कृतींचा संकर घडवून पसरवलेला

हा नवंभोर नवलाईवर तरंगणारा कुतूहलांचा जत्था
अन्‌ हे उत्पाती काळाचे तुकडे झिलमिल
मिडियाने कॅमेऱ्यातून निसटवलेले

बदलू बदलूची ही लहर, धुक्याहून धुक्कट धुक्कट
अन्‌ ही चोट्टयांची चोट्टी दिशा अकरावी
चोट्टंगिरीने लखलख उजळलेली

आता ही तोहमत अशी की, कशाचीही
अगदी माणसांनाही मनात वागवण्याची पडते भारी
जेव्हा वाजतो लॅन्डलाईन फोन उत्तररात्री

**– अशोक कोतवाल**
संदर्भ ४८/१/५४, ब्लॉक क्र.६,
शिवा अपार्टमेंटजवळ, शिव कॉलनी,
जळगाव ४२५००२
भ्रमणध्वनी : ९८५०११७५३९

## जाता जाता

वळून क्षणभर उभी राहिली...जाता जाता
जरा दूर पण, जवळ भासली...जाता जाता!


गूज मनीचे सांगायला, शब्द कशाला?
नजर रोखुनी खुदकन्‌ हसली...जाता जाता!

गौरांगीच्या गालावरती छटा गुलाबी
मावळत्या किरणांत उजळली...जाता जाता!

निरोप घेता बावरली, पण, सावरलीही
तिची आंसवे मलाच दिसली...जाता जाता!

अर्ध्या मुर्ध्या किती कहाण्या या जगण्याच्या
हीच एक पण, मागे उरली...जाता जाता!

**– सदानंद डबीर**
१ बी/२०६, विमानदर्शन,
जीवा महाले मार्ग, अंधेरी (पूर्व),
मुंबई ४०० ०६९
फोन : २६८४८३९९



## मर्यादा

कुठल्या गुरुत्त्वाकर्षण बलामुळे
ओढल्या जातोय मी
तुझ्याकडे वारंवार...
तू मात्र ढिम्म
एकाच जागी रुतलेला
क्षितिजासारखा.

तरीही एकेका प्रहराचे
तुझे बदलणारे रंग
नजरेत न सामावणारे

डोळे मिटून तुला
कवटाळायला जावे तर
तू अलगद निसटून गेलेला...
तुला कवेत घेणे
मुश्किलच नव्हे
दुष्प्राप्यच...

मला माहीत आहे
क्षितिजाला नसतात सीमा
की क्षितिजच नसते अस्तित्वात...
तसेच तुझेही

तरीही
करतोच ना मी वेडेपणा
तुला कवेत घेवून बघण्याचा
कारण माझ्या भावनांना
कुठे असतात
मर्यादा...

**– सदानंद सिनगारे**
जिजामाता मार्ग, खामगाव,
जिल्हा बुलडाणा – ४४४३०३

## ।। तेच ते गाणे ।।

तेच ते गाणे । कितीदा गाऊ ।।
तेच ते उखाणे । कितीदा घेऊ ।।

तेच ते हुंदके। तीच ती माती ।।
तीच ती नाती । कितीदा कवटाळू ।।

तीच ती धार । तोच तो हिरवा काठ ।।
नवा गंध नवा घाट । कुठे कसा लेवू ।।

तेच ते विभ्रम । तेच ते गीत।।
रात्रीच्या दारात । कोणते नक्षत्र खुलवू ।।

वेदनेच्या पुरात । तोच तो प्रवास ।।
तेच ते श्वास । नवी लय कुठे शोधू ।।

आयुष्यभर आले । नशिबी तिमिर भोगणे ।
तेच ते रडगाणे । कितीदा जन्मा घालू ।।

शब्दांच्या जंगलात । भरले फुलांचे डोळे।
माझ्यातली मुळे । तुझ्यात कशी चेतवू ।।

**– राजा गायंगी**
दूधदर्या फेज–१,
रूम नं. बी–००१,
फुलपाडा रोड,
विरार (पूर्व)
ठाणे ४०३ ३०३



## भेटेल कधी का मज

धारदार करवत माझ्या
मानेवर मिरवत येते
वाहून रोज थकलेले
मी डोळे तिजला देतो...

भवताली माझ्या आहे
झाडांचे बहरून येणे
माझीच मुळे तुटलेली
बदसुरांतले हो गाणे...

घनव्याकुळ दुःख असे हे
मी प्रसाद मानी त्याला
तळहाती झेलून घेतो
कुसुमांच्या कुंकुम ज्वाला...

मी असा चालतो येथे
पाण्यावर ठेवून पाय
भेटेल कधी का मज!
ती दिगंतराची माय...
ती दिगंतराची माय!!

**– प्रा. प्रसन्नकुमार पाटील**
मु.पो.दुंडगे, ता. गडहिंग्लज,
जिल्हा कोल्हापूर
भ्रमणध्वनी : ९६३७६८७३६४



## ताल

आजही तू केव्हाची जागते आहेस,
आता जात्यावर ओव्या
म्हणत नसलीस तरी,
चहा, नाश्ता टिफिनच्या
तालावर,
शब्दापासून दूर
मुक्या कृतीतून,
तू जागत असतेस तशीच.
पहाटेच्या ओव्या
केव्हाच संपल्या,
आयुष्यातला ताल संपून
घड्याळावर चालणारे यंत्र
होताना,
किती यातना सोसल्यास?
मनातला गोडवा,
शब्दांतली ओळख
केव्हाच विसरला!
आता पूर्वीची तू
केव्हातरीच जाणवतेस,
सणसमारंभाच्या घाईगर्दीतही
तू, तुझ्या शोधात,
हरवलेल्या काळाला बिलगून,
हरवलेला आयुष्याचा ताल
एकवटण्याचा प्रयत्न करीत.

**– प्रा. प्रगती गुणाजी नाईक-अमृते**
प्राजक्त, न्यू सबनीसवाडा घर नं १४२,
क्यू वॉर्ड, डी बिरोडकर टेंब,
सावंतवाडी ४१६५१०

## साखर

ठेवतो जित्या वादाच्या मुंग्या
गोडवा विनम्रांच्या वागणुकीतला
घेतात पिऊन झाडे आसपासची
बोअरवेलच्या तळातले आभाळ
कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ

फिरकत नाही आंबटांकडे थवा राघवांचा
डुलतात वाऱ्याच्या झुळकीवर
डहाळ्या फळांनी लदबदलेल्या
लागते करावी सहन साखरआंब्यांना
दररोज तुफान गोटमार
पडतात तुटून पाडांवर पाखरे चवचाल.

ईश्वराच्या कृपादृष्टीची
माणूस पोळे मधांचे पेरतो
साखरेचे खाणार, त्याला देव देणार म्हणत
हव्या त्या सावजाला जाळ्यात हेरतो.

**– अजीम नवाज राही**
साहिल हाऊस, जाफ्राबाद मोहल्ला,
मु.पो साखरखेर्डा, ता. सिंदखेडराजा
जि. बुलडाणा – ४४३२०२
भ्रमणध्वनी : ९४२१३९६६६९

## सात रंगाचे सात घोडे

पांढऱ्याशुभ्र कॅनव्हासवर
मी काढतोय एक चित्र
सात रंगांच्या सात घोड्यांचं!

चित्रातले घोडे उन्मत्त
बेलगाम
अन् सुसाट धावणारे!
चित्र पूर्ण होताच
चित्रातले घोडे मला म्हणाले
चित्र बाकी छान झालंय,
फक्त ह्या चित्राला चौकट करू नकोस
चौकट केलीस तर
आमच्या धावण्याचा काय उपयोग?
आम्हाला धावू दे!
बाहेरचं जग पाहू दे!
तुझ्याजवळच्या सात रंगांपेक्षा
जगात इतरही खूप रंग आहेत
ते आम्हाला पाहू दे!
आम्हाला धावू दे!
तेव्हापासून चौकट नसलेल्या माझ्या चित्रांतून
घोडे सुसाट धावताहेत;
माझ्यासकट,
माझ्यातल्या रंगासकट!

**– प्रशांत असनारे**
अभिनंदन, मुखर्जी बंगल्याजवळ,
राऊतवाडी, अकोला



## ॥ हायकू ॥

तोडली झाडे
पक्षी उडाले दूर
उलला सूर

रातकिड्याचा
आवाज किर्र येतो
आहे कुठे तो

साद घालते
पाखरू पाखराना
जवळ या ना...

पक्ष्यावरती
हायकू लिहू कसे
गळती पिसे

एक दिशेने
उडतात पाखरे
कि नेई वारे

गंगाकिनारी
टपलेत बगळे
मिटून डोळे

**– तुकाराम खिल्लारे**
५७ पार्वतीनिवास, लोकमान्यनगर,
परभणी – ४३१ ४०१ / भ्रमणध्वनी : ९८८१९२७१०९

# अत्त दीपो भव

सुहासिनी देशपांडे

वैदिक धर्माचे निखळ शुद्ध आणि साधे-सोपे स्वरूप कालौघात बदलत गेले आणि ब्राह्मणवर्गाचे वर्चस्व असलेला, यज्ञयागादी खर्चिक नि गुंतागुंतीच्या कर्मकांडाचे अवडंबर असलेला, धर्माच्या नावावर निरपराध पशूंच्या बेसुमार हत्येचे प्राबल्य असलेला, सामाजिक विषमतेला मान्यता देणारा आणि धर्मज्ञानाला संस्कृतसारख्या क्लिष्ट भाषेत बंदिस्त करणारा नि त्यावर मूठभर पंडितांच्या मक्तेदारीची मोहर उठवणारा ब्राह्मणधर्म प्रचलित झाला. मध्ययुगात युरोपातील भ्रष्ट कॅथॉलिक चर्चविरुद्ध मार्टिन ल्यूथर, झ्विंगली वगैरेंनी ज्याप्रमाणे प्रोटेस्टंट रिफॉर्मेशन चळवळ सुरू केली तद्वतच भगवान महावीर आणि भगवान बुद्ध यांनी ब्राह्मणधर्माविरुद्ध इ.स.पूर्व सहाव्य शतकात धर्मसुधारणेची चळवळ सुरू केली, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

'सम्यक् सम्बोधी' प्राप्त झालेल्या सिद्धार्थ गौतमाने अर्थात भगवान बुद्धाने, धर्मचक्राला नवी गती देऊन एकप्रकारे क्रांतीला सुरुवात केली. वैदिक धर्माने अथवा प्रस्थापित ब्राह्मणधर्माने विश्वाचा निर्माता आणि नियन्ता या स्वरूपात परमेश्वराचे अस्तित्व मान्य केले होते. त्या परमेश्वराला प्रसन्न करून परमेश्वरप्राप्तीचे विविध मार्ग सांगितले होते. जगात आजवर उदयाला आलेल्या सर्वच धर्ममतांनी सर्वोच्च अशा परमेश्वरी शक्तीचे अस्तित्व मान्य केले आहे आणि या सर्वोच्च शक्तीला प्रसन्न करण्यासाठी पूजा-प्रार्थनादि कर्मकांड सांगितले आहे. मात्र अडीच हजार वर्षांपूर्वी उदयाला आलेल्या बौद्ध धर्माने ईश्वरकेंद्री धर्म न सांगता मानवकेंद्री धर्म सांगितला हीच मोठी आश्चर्याची गोष्ट आहे.

बुद्धाने मानवाला बाहेरील आलंबनापासून मुक्त केले आणि स्वतःच्या निर्वाणाचा मार्ग स्वत:तच शोधायला सांगितला. 'हे प्रभो, प्रकाश दाखव' असे असहाय्य कळवळण्यापेक्षा बुद्ध सांगतात- 'अत्त दीपो भव।' स्वतःचा दीप स्वतःच बना. स्वतःचा प्रकाश स्वतःच शोधा. कोणा बाहेरील शक्तीला शरण जाणे म्हणजे मानसिक गुलामगिरी आहे आणि आध्यात्मिक गुलामगिरी, आध्यात्मिक शरणागती ही सर्वात मोठी परस्वाधीनता आहे. जिथे जाऊ तिथे आपण आपल्या शृंखला बरोबर घेऊन जातो.

बुद्धाने म्हणूनच विश्वाचा निर्माता आणि नियंता

म्हणून ईश्वराचे अस्तित्व नाकारले. बुद्धाला नास्तिक नाही म्हणता येणार, कारण ईश्वराचं अस्तित्व नाकारण्यापेक्षा बुद्ध त्यावर काही बोलतच नाहीत. मौन पाळतात. त्यामुळे त्यांना अज्ञेयवादी म्हणता येईल. जसे कन्फ्युशसला कोणी ईश्वराविषयी विचारले तर तो उत्तरत असे– 'मला माहीत नाही. कारण मी ईश्वराला पाहिलेले नाही. स्वर्ग–नरकही मला माहीत नाहीत.' बुद्धांचे ईश्वरविषयक मौन असेच आहे. ईश्वरी अस्तित्वाची बुद्ध उपेक्षा करतात.

आश्चर्याची बाब हीच आहे की भगवान तथागतांनी ईश्वराची उपेक्षा केली, ईश्वरोपासनेला फाटा दिला, कोणतीही प्रार्थना त्यांनी सांगितली नाही वा सूक्ते रचली नाहीत; तरीही बौद्ध धर्म दूरवर पोचला. जवळजवळ संपूर्ण आशिया खंड बौद्ध धर्माच्या वर्चस्वाखाली आला. आज जरी भारतातून मूळ बौद्ध धर्म पूर्णतः नामशेष झालेला असला तरी तिबेट–ब्रह्मदेश–चीन–जपान–व्हिएतनाम–इंडोनेशिया–कोरिया–थायलंड–श्रीलंका अशा अनेक ठिकाणी बौद्ध धर्माचे अनुयायी मोठ्या प्रमाणावर आहेत. इतके की जगभरात मुस्लिम, ख्रिश्चन, हिंदूंच्या पाठोपाठ चौथ्या क्रमांकावर बौद्धांची संख्या आहे!... बौद्ध भिक्षूंनी अक्षरशः कोट्यवधी लोकांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली. थक्क करणारी बाब ही, की बौद्ध धर्मने ना तलवारीचा धाक दाखवला ना अन्नवस्त्रांच्या प्रलोभनाने लोकांची धर्मांतरे केली. अहिंसेवर नितान्त श्रद्धा असलेल्या बौद्ध धर्माला एवढे प्रचंड प्रमाणावर अनुयायी लाभले याचे कारण एकच– भगवान बुद्धांनी अखिल मानवतेला दुःखमुक्तीचा मार्ग दाखवला.

गयेला पिप्पल वृक्षाखाली (न्यग्रोध वृक्षाखाली) 'सम्यक सम्बोधी' प्राप्त झाल्यानंतर भगवानांनी सारनाथला आपल्या पंचवर्गीय भिक्षूंना प्रथम उपदेश केला. त्यावेळी त्यांनी प्रथमच आपल्या चार आर्यसत्यांचा उल्लेख केला. ही चार आर्यसत्ये म्हणजेच भगवान बुद्धांच्या उपदेशांचे आणि तत्त्वज्ञानाचे सार म्हणता येतील.

या चार आर्यसत्यांत मानवाच्या दुःखाची मीमांसा केलेली आहे. त्यातील पहिले सत्य आहे– सर्वं दुःख दुःखम्। दुःखाचे अस्तित्व हे पहिले सत्य –

इदं खो पन भिक्ख्वे दुःखं, अरियसच्चम्
जाति पि दुक्खा, जरा पि दुक्खा, व्याधि पि दुक्खा
मरणं पि दुक्खं, अप्पियेहि सम्पयोगो दुक्खो,
पियोहि विप्पयोगो दुक्खो, यम्पिच्छं नो लभति तं पि दुक्खम्,
संखिइचेन पच्चुपादान खन्धा दुक्खा।
(धम्मचक्कपवत्तनसुत्त)

भगवान म्हणतात – जग दुःखमय आहे. जन्माला येणे दुःख–जरा म्हणजे दुःख–व्याधी पण दुःख–प्रिय गोष्टींचा वियोगही दुःख, अप्रिय गोष्टींशी सबंध येणेही दुःखकारक आहे. ज्याची इच्छा करावी आणि ते मिळाले नाही तरी दुःख होते. एकूणच मानव जन्म–पञ्च उपादान स्कंध–म्हणजे मूर्तिमंत दुःख आहे.

'यद् अनिच्चं तद् दुक्खम्'– जे जे अनित्य (अनिच्च) आहे, अशाश्वत आहे, क्षणभंगुर आहे ते ते सर्व दुःखमय आहे.

दुसरे आर्य सत्य सांगते – दुःखाचे कारण आहे. यालाच 'समुदय सत्य' म्हटले आहे.

दुःखाची कारणपरंपरा सांगताना भगवान सांगतात–तृष्णा हे सर्व दुःखाचे मूळ कारण आहे. तृष्णा ही कधी न संपणारी आहे. कामतृष्णा–भवतृष्णा आणि विभवतृष्णा असे तृष्णेचे तीन प्रकार आहेत. विषयसुखाची लालसा ही कामतृष्णा. या भवसागरात पुनःपुन्हा जन्म घेण्याची भवतृष्णा आणि परलोकी जन्म घेण्याची विभवतृष्णा! दुःख कारणपरंपरा सांगताना बुद्धांनी बारा दुवे सांगितले आहेत. बारा दुःखांच्या या मालिकेलाच 'द्वादशनिदान' म्हटले आहे आणि दुःखकारणपरंपरेच्या या सिद्धांताला 'प्रतीत्यसमुत्पाद सिद्धांत' असे म्हटले आहे.

हे द्वादशनिदान म्हणजे–

अविद्या–संस्कार–विज्ञान–नामरूप–षडायतन–स्पर्श–वेदना–तृष्णा–उपादान–भव–जाती–जरामरणादि दुःखें!

भगवान बुद्धांचे शब्द वापरायचे तर...

अविद्या पच्चया सङ्खारा–अविद्येतून। अज्ञानातून। विमूढतेतून संस्कार निर्माण होतात.

भव पच्चया जाती–या भवाची तृष्णाच आपल्याला 'जाती' म्हणजे जन्माला येण्याची आसक्ती निर्माण करते. मृत्यूबरोबर ही क्रिया थांबत नाही; तर आपण पुनःपुन्हा या भवाकडे ओढले जातो आणि जन्माला येतो.

जाती पच्चया जर-मरण-सोक परिदेव दुक्खदोमनस्सुपासाया सम्भवन्ति! - जन्माबरोबरच जरा (= वृद्धावस्था) मरण, शोक, बेचैनी, चिंता येतातच.


थोडक्यात, या जगाच्या (भव) स्वरूपाविषयीचे अज्ञान मानवाच्या ठिकाणी ऐहिक वस्तूंविषयी तृष्णा व जीवनाविषयी आसक्ती निर्माण करते आणि म्हणून ते अज्ञान (अविद्या) आणि त्यातून उद्‌भवणारी तृष्णा हेच मानवी दुःखाचे मूळ कारण आहे.

अशाप्रकारे प्रतीत्यसमुत्पाद म्हणजे दुसरे आर्यसत्य. हे समुदयसत्य सांगितल्यावर बुद्ध तिसरे आर्यसत्य सांगतात ते म्हणजे तृष्णेचा निरोध करणे.

३. निरोधसत्य - दुःखाच्या मागची सारी कारणपरंपरा समजून घेतल्यावर अज्ञान हे दुःखाचे मूळ कारण नष्ट केल्यास तृष्णेचा निरोध होऊ शकतो.

४. मार्गसत्य - त्यासाठी भगवान बुद्धांनी अष्टांगिक मार्ग सांगितले आहे. हेच ते चौथे आर्यसत्य -मार्गसत्य!

बुद्धांचा हा अष्टांग मार्ग तीन आधारतत्त्वांवर आधारलेला आहे. ही तीन तत्त्वे म्हणजे शील, समाधी, ज्ञान अथवा प्रज्ञा. हे अष्टांग मार्ग आहेत- सम्यक् दृष्टी, सम्यक् संकल्प, सम्यक्‌वाक् (भाषण, वाणी), सम्यक् कर्मान्त (योग्य कर्म अर्थात् आचरण), सम्यक् आजीव (योग्य मार्गाने उपजिविका), सम्यक् व्यायाम (योग्य यत्न), सम्यक् स्मृती (योग्य विचार), सम्यक् समाधि (चित्ताची एकाग्रता). या आर्य



अष्टांगिक मार्गाला भगवान 'कल्याण वर्त्य' म्हणजे कल्याणाचा मार्ग अथवा कल्याणाचा वर्तनक्रम असे म्हणतात. हा अष्टांग मार्ग म्हणजेच बुद्धाचा मध्यम मार्ग आहे. ज्यामध्ये आत्यंतिक शारीरकष्ट, कठोर तपश्चर्या, उपासतापास वर्ज्य मानलेले आहेत. तसेच आत्यंतिक भोगविलास, ऐहिक सुखाचे जीवनही वर्ज्य मानलेले आहे. जे आहे ते 'सम्यक्' म्हणजे योग्य, समतोल, भगवान श्रीकृष्णाने भगवद्‌गीतेत जे म्हटलेले आहे :

युक्ताहा विहारस्य युक्त चेष्टस्य कर्मसु/युक्त स्वप्नावबोधस्य तस्मात् योगी भवार्जुन

त्याची आठवण आल्याशिवाय रहात नाही. अष्टांग मार्गापैकी सम्यक् दृष्टी, सम्यक् वाणी, आणि सम्यक् कर्मांत म्हणजे आचरण यांचा विस्तार आहे. काया, वाक् व मनाची शुचिता हे खरे तर साधन आहे. तसेच समाधी अथवा चित्ताची एकाग्रता हेही साधन आहे. त्यासाठी योग्य यत्न, योग्य विचारांची जोड हवी. या साधनांच्या साहाय्याने अंतिम साध्य प्राप्त करून घ्यायचे आहे. ते म्हणजे अंतिम सत्याचा साक्षात्कार. हा प्रज्ञा स्कंधाशी निगडित असलेला भाग झाला.

पण अंतिम सत्याचा साक्षात्कार म्हणजे नेमके काय? तो कसा करून घेता येतो? भगवान बुद्ध सांगतात– अत्त दीपो भव, आपणच आपला प्रकाश व्हा. दीप व्हा. हे कसे शक्य आहे? तर सतत जागे राहा. जागृत राहा. जाणीवपूर्वक स्वत:कडे पाहा. सतत समाधीत राहा. ज्यायोगे अविद्येतून निर्माण होणारे संस्कार किती बुडबुड्याप्रमाणे आहेत. अनित्य, अशाश्वत नि क्षणभंगुर आहेत ह्याचे ज्ञान होईल. मग संस्कार दृढ करायचे नाहीत तर संस्कारांचे विसर्जन करावयाचे हे लक्षात येईल. कारण संस्कारांचा निरोध केला तर पुढची शृंखला तुटण्यासाठी मदत होईल.

खीणं पुराणं नवं नात्थि सम्भवम–म्हणजे जुने संस्कार क्षीण जातील नि नवे निर्माण होणार नाहीत. ते क्षीण होता होता प्रज्ञा जागृत होईल आणि हीच अवस्था निर्वाणाकडे घेऊन जाईल. भगवान बुद्धांचा मार्ग हा पूर्ण बुद्धिवादी आहे. पूर्ण विज्ञाननिष्ठ आहे. साऱ्या जगाचे स्वरूप हे अनित्य (अनिच्च) आहे, अशाश्वत आहे, सतत बदलते आहे हे भगवानांनी ओळखलेले आहे. नदीचा प्रवाह वरवर पाहता नवा बनत असतो, जुना वाहत असतो. आपले शरीरही तसेच आहे. प्रत्येक क्षणी पेशींचे निर्माण आणि विलय चालूच असते. आज आपण जसे आहोत तसे उद्या नसतो. एका सतत बदलत्या प्रवाहाप्रमाणे आपले हे जीवन आहे. अज्ञानामुळे संस्कार निर्माण होतात. आसक्ती निर्माण होते आणि या आसक्तीमुळे, तृष्णेमुळे आपण या भवामध्ये पुन:पुन्हा जन्म घेत राहतो. जरा–मरण–व्याधी–शोक आदि दुःखे भोगत राहतो. या अनित्याचा साक्षात्कार होणे, संस्कारांचा निषेध करून जन्ममरणाच्या भवचक्रातून सुटणे हेच निर्वाण आहे. ह्या अंतिम सत्याचा साक्षात्कार होणे ही प्रज्ञा आहे. आणि या साक्षात्कारासाठी सतत आपल्या जाणिवेत राहणे, सतत सावधान राहून संस्कारांचा निरोध करणे यासाठी समाधी–म्हणजे चित्ताची एकाग्रता आवश्यक आहे आणि चित्त एकाग्र होण्यासाठी शील–नीती–शुद्धाचरण आवश्यक आहे. अनीतीमान माणूस कधी शांत नाही राहू शकत. हिंसा–असत्य–चोरी–चारित्र्यहीनता वा धनसंचय, धनलोभ माणसाच्या चित्तवृत्ती शांत नाही ठेवू शकत. मनाची निर्मळता हवी असेल, चित्ताची स्थिरता वा एकाग्रता हवी असेल तर पंचशीलांचे पालन आवश्यक आहे. म्हणून अष्टांगमार्गाचे तीन स्कंध– शील, समाधी व ज्ञान अथवा प्रज्ञा बुद्धांनी महत्त्वाचे मानले आहेत. या तीन स्कंधांना भगवान 'तीन मोठे यज्ञ', 'तीन संपदा' असे म्हणतात. आणि या तीन स्कन्धांमध्ये बुद्धांच्या शिकवणुकीचे सारे सार येते.

बुद्धांच्या अनुसार मानवी व्यक्तित्व म्हणजे पंचस्कन्धांचा एक संघात आहे. त्यापैकी रूपस्कन्ध म्हणजे भौतिक देह. बाकी चार स्कन्ध मानसिक स्वरूपाचे आहेत. त्यांना 'नाम' असे म्हणतात. हे चार नामस्कन्ध आहेत– वेदना म्हणजे वेदना अनुभव आणि भावानुभव; संज्ञा म्हणजे संवेदन, आकलन नामकरण:संस्कार म्हणजे कृतीप्रवृत्ती आणि विज्ञान म्हणजे जाणीव. यातील कोणताही घटक नित्य व स्थिर नाही. म्हणून बुद्ध मानवी व्यक्तित्वामध्ये आत्मा नावाचा शाश्वत स्थिर घटक असतो असे मानत नाहीत.

आत्मा–परमात्मा यांवर विश्वास नसला तरी भगवान बुद्ध कर्मसिद्धांत आणि पुनर्जन्म यांचा स्वीकार करतात. जुने भावसंस्कारच माणसाला पुन:पुन्हा जन्म

घेण्यास कारणीभूत ठरतात. मनुष्याच्या पूर्वकर्मानुसार, पूर्वसंस्कारांनुसार तो पुढील जन्मात दुःखाचा अनुभव करतो. या जन्ममरणाच्या भवचक्रातून सुटका प्राप्त करून घेणे म्हणजेच मोक्ष अथवा निर्वाण. त्यासाठीच शील म्हणजे सत्कर्म, समाधी आणि प्रज्ञा यांच्या साहाय्याने अंतिम सत्याचा साक्षात्कार करून घेणे... संस्काराच्या गाठी क्षीण करत विरघळवून टाकत नवे संस्कार निर्माण न होतील अशा सावधानतेने जाणित राहणे, सावधान राहणे हा प्रज्ञा मार्ग भगवान सांगतात.

हा मार्ग अर्थातच सोपा नाही. स्वतः गौतम बुद्ध सम्यक् सम्बुद्ध झाले. त्यासाठी त्यांना कोणता संघर्ष करावा लागला हे सांगताना 'मार' राक्षसाचे प्रतीक वापरले आहे. बौद्ध साहित्यात हा सैतान मार म्हणजे भवमुक्तीच्या मार्गावर बाधा घालणाऱ्या सर्व विकारांचे प्रतीक आहे. मार म्हणजे हिंदू पुराणकथांमधील असूर आहे, झरथ्रुष्ट धर्मातील अहुरमाज्दा आणि अहिरमान यांच्या संघर्षातील तो अहिरमान आहे. तो अपप्रवृत्ती, दुर्वासना, तामसवृत्तींचे प्रतीक आहे. तो सत्कर्मांच्या विरोधात उभा राहतो. या मारवर भगवान बोधीसत्त्वाने आपल्या दहा 'पारमिता'च्या मदतीने विजय मिळवला, असे 'मार-विजया'चे वर्णन बौद्धसाहित्यात येते. 'पारमिता' म्हणजे पूर्णता, सद्गुणांची पराकाष्ठा. दान-शील-नैष्कर्म्य (त्याग)-प्रज्ञा-वीर्य (उत्साह)-क्षान्ती(सहनशीलता), सत्याधिष्टान (दृढसंकल्प) मैत्री-उपेक्षा (अदुःख-असुखभाव) अशा दहा पारमितांच्या साहाय्याने बोधीसत्त्व विजयी झाले. त्याच रात्री त्यांना बोधीप्राप्ती झाली. त्यांना आपले सारे पूर्वजन्मही आठवले. सम्यक् सम्बुद्धत्व प्राप्त झाल्यावर भगवानांच्या तोंडून आनंदमय उद्गार निघाले -

अनेक जाति संसारं, सन्धाविरसं अनिब्बिसं।
गहकारकं गवेसन्तो, दुक्खा जाति पुनप्पुन।।
गहकारक दिट्ठोसि, पुन गेहं न काहसि।
सब्बा ते फासुका भग्गा, गहकूटं विसङ्खितं।
विसङ्खारगतं चित्तं, तण्हानं खयमज्झगा।।

या जगात किती वेळा जन्म घेतला त्याची काही गणती नाही. जन्म घेत होतो आणि न थांबता मृत्यूकडे जात होतो. या शरीररूपी घराच्या निर्मात्याला (गहकारकं) शोधात पुनःपुन्हा दुःखकारक जीवन मरणाच्या फेऱ्यात अडकत गेलो. आता घराच्या निर्मात्याचं दर्शन झालं (गहकारक दिट्ठोसि). आता तो पुन्हा नवीन घर नाही बनवू शकणार. सगळी शृंखलाच तोडली आहे. घराचे छप्पर मोडले आहे. घर बांधण्याची सारी साधनसामग्री मोडून फेकून दिली आहे. चित्त पूर्णपणे विसङ्खारगतं- म्हणजे पूर्वसंस्कारविरहित झालेलं आहे. तृष्णा समूळ नष्ट झाली आहे. मुक्त झालो आहे!

आपला निवार्णाचा अनुभव भगवान असा वर्णन करतात. स्वतः असे मुक्त झाल्यावरही बुद्धांना आपला मूळ ध्येयाचा विसर पडलेला नाही. बहुजनहिताय बहुजनसुखाय असा आपला धम्म दशदिशांना सर्वसामान्य मानवापर्यंत नेऊन भगवान बुद्ध गावोगाव, शहराशहरांतून फिरते राहिले. वयाच्या एकोणतिसाव्या वर्षी त्यांनी गृहत्याग केला, साधारण पस्तीशीत त्यांना बोधी प्राप्त झाली. त्यानंतर आयुष्याची उणीपुरी सेहेचाळीस वर्षे ते सामान्यजनांच्या उद्धारार्थ विहार करत राहिले. आपल्या अनुयायांचा शिस्तबद्ध संघ तयार करून त्यांना धम्मप्रसारार्थ गावोगाव जाण्याची आज्ञा केली. भगवान बुद्धांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व, त्यांची जनसामान्यांविषयी असलेली करुणा, प्रेम आणि त्यांनी बांधिलेला समर्पित वृत्तीच्या बौद्ध भिक्षूंचा संघ यामुळे राजांपासून रंकांपर्यंत, ब्राह्मण आणि वैश्यसुद्धा सारे नव्या धर्माचे अनुयायी बनले. अजातशत्रू, सम्राट अशोक, कुशाण राजा कनिष्क यांसारख्या राज्यकर्त्यांनी बौद्ध धर्माला उदार आश्रय दिला. बौद्ध धर्माच्या प्रसारार्थ जाणीवपूर्वक आणि सुव्यवस्थित प्रयत्न केले आणि बौद्धधर्म आशियाखंडात सर्वदूर पसरला.

बौद्धधर्मावर तो दुःखवादी, निराशावादी असल्याचा आरोप केला जातो. परंतु बौद्धमताने दुःखाचे अस्तित्व ओळखलेय याचा अर्थ तो दुःखवादी आहे असा होत नाही. सर्व दुःखं दुःखम असं चार आर्यसत्यातील पहिलं सत्य आहे. परंतु अन्ती दुःखनिरोध करणे, आणि शील-समाधी-प्रज्ञा या त्रिरत्नांद्वारे निर्वाण अर्थात् दुःखापासून मुक्तता मिळवणे ह्यावर बुद्ध भर देतात. त्यामुळे त्याला निराशावादी म्हणणे कितपत योग्य आहे?

बौद्ध धर्म नीतीप्रधान आहे. तो विज्ञाननिष्ठ आहे. दुःखपरंपरेची बारा दुव्यांची साखळी-द्वादशनिदान-ही अत्यन्त तर्कशुद्ध आहे. बौद्धधर्म क्रांतीकारक आहे. परमेश्वर तत्त्वाचा बाहेर शोध घेण्यापेक्षा आणि

त्याच्यापुढे व्याकूळ शरणागती स्वीकारण्यापेक्षा बुद्ध सांगतात–आपणच आपले दीप बना... आपल्या जाणिवेत रहा... संस्कारांच्या, प्रवृत्तींच्या जन्मजन्मांतरीच्या गाठी सोडवत त्या बंधनांतून मुक्त व्हा... निर्वाण प्राप्त करा! आस्तिकता आणि नास्तिकता यांच्यामध्ये बौद्धमत आहे. ईश्वराच्या अस्तित्वाविषयी वा नास्तित्वाविषयी ते काहीच बोलत नाहीत. नित्यवाद किंवा हे सारे क्षणभंगूर आहे हे सांगताना बुद्धांनी दिव्याच्या ज्योतीचं उदाहरण दिले आहे. दिव्याची ज्योत जळत असते. ती जाणवत असते एकात्म असल्याप्रमाणे परंतु, प्रत्येक क्षणी ती वेगळी असते. जगाचा सारा पसाराही असाच आहे. सर्व क्षणिकं क्षणिकम्! त्यामुळे बुद्ध आत्म्याचे अमरत्व मानत नाहीत. असे असले तरी हिंदूंचा कर्मविपाक आणि पुनर्जन्माचा सिद्धान्त त्यांना मान्य आहे.

पुनरपि जननं पुनरपि मरणम्
पुनरपि जननी जठरे शयनम्।। (शंकराचार्य)

ही जन्ममरणाची साखळी पूर्वकर्म आणि पूर्वकर्मांनी मिळवलेले संस्कार यामुळे अव्याहत चालूच रहाणार हे बुद्ध मानतात. आणि चक्रातून सुटणे हाच मोक्ष--हेच निर्वाण.

परंपरेनं आपण काही गोष्टींना घट्ट धरून बसतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे राजपुत्र सिद्धार्थ गौतमाचा गृहत्याग. एक दिवस रथातून फेरफटका मारत असताना राजपुत्राने एक वृद्ध, एक व्याधीग्रस्त, एक प्रेत आणि जीवन्मुक्त संन्यासी पाहिला नि आयुष्यात प्रथमच या चार दृष्यांमुळे दुःखाचा साक्षात्कार होऊन सुखाच्या शोधार्थ सिद्धार्थानं आपली सुंदर पत्नी–यशोधरा आणि नवजात–बालक–राहुल यांच्यासह साऱ्या राजवैभवाचा त्याग करून वनाचा मार्ग धरला.

परंतु, आपल्या गृहत्यागाचं कारण काय असावं हे भगवान स्वतः अत्तदण्डसुत्तमध्ये स्पष्ट करतात–

अत्तदण्डा भयं जातं, जनं पस्सथ मेधकम्!
संवेगं कित्तयिस्सामि यथा संविजितं मया!

शस्त्रधारण भयप्रद वाटतेय. ही जनता कशी भांडतेय पहा! मला संवेग–(वैराग्य) कसा उत्पन्न झाला सांगतो –

फन्दमानं मत्रं दिस्वा मच्छे अप्पोदके व्यथा!
अञ्ञमञ्ञेहि व्यरुद्ध दिस्वा मां भयमाविसि!

अपुऱ्या पाण्यात मासे कसे तडफडतात त्याप्रमाणे परस्परांशी विरोध करून तडफडणाऱ्या प्रजेकडे पाहून माझ्या अंत:करणात भय निर्माण झाले.

इच्छं भवनमत्तनो नाद्दसासि अनोसितं!
ओसाने त्वेव व्यारुद्धे दिस्वा ये अरती अहु!!

चारी बाजूंनी जग असार वाटू लागले. सर्व दिशा भयकंपित होऊन उठल्या असे वाटले. आणि त्यात आश्रयासाठी निर्भय असे ठिकाण सापडेना.

रोहिणी नदीच्या पाण्यावरून शाक्य आणि कोलीय लोकांमध्ये झगडा चालू होता. दोन्हीकडील लोक शस्त्रांनिशी एकमेकांवर तुटून पडत होते. बुद्ध दोन्ही सैन्यांमध्ये उभे राहिले आणि त्यांनी उभय पक्षांना या सुत्ताचा उपदेश केला. शस्त्रविजयापेक्षा शस्त्रनिवृत्तीचा, शस्त्रसंन्यासाचा मार्ग त्यांनी दाखवला.

आज आम्ही पाण्यावरून भांडतो, सीमाप्रश्नांवरून भांडतो, धर्मावरून भांडतो, जातींवरून भांडतो, पोटजातींवरून भांडतो, आरक्षणासाठी भांडतो, आरक्षणाविरुद्ध भांडतो, भाषांवरून भांडतो, परप्रांतीयांच्या विरोधात उभे राहतो, राजकीय पक्ष म्हणून भांडतो... आणि हे भांडण वादे वादे जायते तत्त्वबोधः असेही नसते की जायते कण्ठशोषः असेही नसते. हे असते डोळ्यांत खून चढलेले भांडण!...असते रक्त सांडण्यास उतावळे भांडण... म्हणून हवा आहे बुद्ध... हवा आहे एक प्रज्ञावान, अहिंसावादी... करुणामय बोधिसत्त्व! 'अत्त दीपो भव' सांगणारा... स्वतःतील प्रकाश शोधण्याचा मार्ग दाखवणारा...!

पण तो बुद्ध तर अडीच हजार वर्षांपूर्वीच हे सांगून गेलाय की  माझ्या आधीही अनेक बुद्ध होऊन गेले आहेत आणि नंतरही होणार आहेत. जो हा प्रकाश शोधेल आणि साक्षात्कारी होईल तो बुद्धच म्हणवेल! तेव्हा हा प्रकाश आपणच शोधुया... आपण सारेच बुद्ध होऊया. अत्त दीपो भव...अत्त दीपो भव...!!

**– सुहासिनी देशपांडे**
३, पुण्यश्री अपार्टमेन्ट्स,
रस्ता क्र.७, डहाणूकर कॉलनी,
कोथरूड, पुणे ४११०३८
संपर्क : ०२०–२५४३७६२१
भ्रमणध्वनी : ९८२३५७१६७८

# मानधन

## प्रा. मिलिंद जोशी

आपल्याकडे काही संकेत मोठे गमतीशीर आहेत. घराबाहेर कावळा ओरडायला लागला की घरी कुणीतरी पाहुणे येणार असे समजले जाते. डावा हात खाजयला लागला की पैसे मिळतात असा एक संकेत आहे. माझा एक मित्र सामाजिक कार्यकर्ता आहे. त्याचा खांदा फुरफरायला लागाला की आम्ही समजतो, आज कुणालातरी खांद्यावर घेऊन वैकुंठात जाण्याचा योग आहे. माझे ओठ फडफडायला लागले आणि भलत्यावेळी फोन वाजला की मी समजतो, व्याख्यानाचे निमंत्रण येणार!

दुपारी मस्त जेवण करून झोपलो होतो. त्या दिवशी सकाळपासून ओठ फडफडत होते. तेवढ्यात फोनची घंटा वाजली. मी उत्सुकतेने फोन उचलला.

''हॅलो, जोशी बोलतोय.''

''साहेब...'' तिकडून आवाज आला.

''बोला ना!'' मी म्हणालो.

''ते बोलणारे साहेब इथेच राहतात का?''

''कुठून बोलताय आपण?''

''बहिरटवाडीहून मी भांबुर्डे बोलतोय.''

''काय काम आहे?'' माझा प्रश्न.

'' तुम्ही त्या भाषण देणाऱ्या साहेबांना फोन द्या बघू. मला त्यांच्याशीच बोलायचे आहे.'' भांबुर्डे म्हणाला.

''तुम्हाला व्याख्यान हवं आहे का?''

''अहो तेच ते. मी बहिरटवाडीच्या वाचनालयातून बोलतोय. आमच्याकडे व्याख्यानमाला आहे. तुम्ही बोलायला येणार का?''

''कधी आहे कार्यक्रम?''

''अकरा सप्टेंबरला.''

''कोणता विषय हवा आहे तुम्हाला?''

''इतिहास आणि संत सोडून!'' भांबुर्डे पटकन म्हणाला.

''असं का? हे तर माझ्या आवडीचे विषय आहेत.''

''ते खरं आहे साहेब, पण सध्या दिवस वाईट आहेत. देण्या-घेण्याचं फुकट भांडण कोण करीत बसणार?''

''तुमचं म्हणणं बरोबर आहे, पण व्याख्यान देणाऱ्या माणसाला तुम्ही साधारण काय देता?''

''माईक आणि माणसं! दुसरं काय लागतंय हो बोलणाऱ्या माणसाला?'' भांबुर्डे चतुराईने म्हणाला.

''ते खरंय, पण मानधनाचं काय?'' मी, धिटाईने म्हणालो

''मानपान अगदी व्यवस्थित करू साहेब. शाल, हार, गुच्छ, जेवण, काही कमी पडू देणार नाही.''

भांबुर्डे सराईत संयोजकांसारखे बोलत होता.

''ते असतंच, पण मला किती पैसे देणार बोलण्याचे?''

माझ्या बोलण्यावर तो चपापला.

''काय रावसाहेब, बोलायला पैसे घेता!''

''अहो, फुकट कोण येतं का बोलायला?''

''तसे आम्ही देतो जाण्यायेण्याचे.''

''जाण्यायेण्याचे द्यावेच लागतात. बोलण्याचे किती देणार?''

''साहेब, आमचं वाचनालय गरीब आहे!''

''ग्रॅण्ट मिळत असेलच की?''

ग्रंथालयाच्या बाहेरच्या बाजूला ओटा होता. तिथून मंडप सुरू झाला होता. त्याने स्पीकर लावला. तो हातात माईक घेऊन ज्या खास ढंगात तमाशाची अथवा चित्रपटाची जाहिरात करतात त्याच ढंगात माझ्या व्याख्यानाची जाहिरात करीत होता. गाजणार... गाजणार... गाजणार... आज सायंकाळी ६.३०वा... पुन्याची मुलुखमैदानी तोफ... मास्तरांचे मास्तर... प्रा. जोशी यांचं बहुरंगी व्याख्यान...विषय चारित्र्यसंपन्नता... अर्थात एड्स व दारूपासून संरक्षण... सुरुवात चुकवू नका... शेवट घालवू नका.

''मिळते साहेब, पण मिळून मिळून किती मिळणार. अधिकाऱ्यांना वाटण्यातच बऱ्यापैकी पैसे जातात.''

''मग बोलणाऱ्या माणसांनाही थोडेबहुत द्यायचे.'' या माझ्या दटावण्यावर कसनुसं हसत तो म्हणाला.

''देऊ की राव फूल ना फुलाची पाकळी.''

''बरं, व्याख्यान कुठे असतं?''

''आपल्या वाचनालयासमोर मोठा मंडप टाकतो आपण.''

''किती मोठा असतो मंडप?'' मी प्रश्न केला.

''पाच-सातशे लोक बसू शकतील एवढी व्यवस्था असते साहेब. स्पीकरही झकास असतो'' भांबुर्डे ऐटीत सांगत होता.

''मंडपवाला, स्पीकरवाला साधारण किती पैसे घेतात?''

''सगळे मिळून पाच दिवसाचे पंधरावीस हजार रुपये घेतो''

''मंडपवाला आणि स्पीकर वाल्याला मिळून पंधरा-वीस हजार रुपये देता आणि ज्यांच्यामुळे हा कार्यक्रम होतो त्या वक्त्याला मात्र फूल ना फुलाची पाकळी! हा काय न्याय आहे का मला सांगा?''

मी कोल्हापुरी घुटण्याडाव टाकला तसा तो चपापला. हा गडी तयारीचा दिसतोय हे त्याने ओळखले. स्वतःला सावरत तो म्हणाला.

''मानधन बोला की राव, आमी कुठं नाही म्हणालो.''

''जाण्यायेण्याचे आणि मानधनाचे मिळून पाच हजार रुपये होतील.''

''काय राव, गरिबाची थट्टा करता! योग्य भाव सांगा.'' फर्निचरच्या दुकानात खरेदीच्या वेळी घासाघीस करावी तशी तो घासाघीस करीत होता.

''चला, चार हजार देऊन टाका.'' मी म्हणालो.

''साहेब, तुमचंही नको आणि माझंही नको, आपण तीन हजारवर तोडून टाकुया.'' भांबुर्डे म्हणाला.

त्याचा तोडून टाकुया हा शब्द ऐकून, मार्केट यार्डातल्या वायदेबाजारात आपण उभे आहोत असे क्षणभर वाटले. मोठ्या आवाजात तिथला माणूस ओरडत आहे तीन हजार एक...तीन हजार दोन...तीन हजार तीन...

''तीन हजार नक्की ना!'' मी खुंटा बळकट करून घेतला.

''साहेब, तीन हजार आम्हाला परवडतात. आता बघा की, पाचशे माणसांचा मंडप टाकला तरी तीनशेच लोक येतात. सध्या गावात आचारी स्वयंपाक करण्यासाठी पानासाठी दहा रुपये घेतात. व्याख्यान ऐकायला येणारी तीनशे माणसे पकडली तर माणशी दहा रुपये पडलेच की तुम्हाला! भाषण देणाऱ्या वक्त्यात आणि आचाऱ्यात फरक तो काय मला सांगा की. एकामुळे पोट भरतं. दुसऱ्यामुळे मन भरतं'' ग्रंथालयात फळ्यावर लिहिलेला सुविचार वाचावा तसे तो बोलत होता.

वक्ता आणि आचारी यांची त्याने केलेली तुलना ऐकून मला घाम फुटला. कळकट्ट धोतर नेसून, घामाच्या धारा पुसत, हातात उलथणे घेऊन काव्यशास्त्रविनोदाचा मी स्वयंपाक करतो आहे असे वाटायला लागले.

''साहेब, पक्कं समजतो मी.'' विनम्रतेचा खोटा आव आणत भांबुर्डे म्हणाला.

''हो. पत्र द्या पाठवून. त्यात आपण बोललेल्या सगळ्या गोष्टींचा उल्लेख करा.''

''विश्वास ठेवा राव. आम्ही खेड्यातली माणसं. प्राण जाए पर वचन न जाए!''

''ठीक आहे'' म्हणत मी फोन ठेवला आणि सुटकेचा निःश्वास सोडला.

'आम्ही युद्धात जिंकतो आणि तहात हरतो' हा सुविचार मी लहानपणापासून ऐकत आलो आहे. त्यात थोडासा बदल करून 'आम्ही सभेत जिंकतो आणि मानधनाच्या वाटाघाटीत हरतो' हा सुविचार आता रूढ व्हायला पाहिजे असे वाटले.

आठच दिवसात बहिरटवाडीच्या वाचकप्रिय वाचनालयाचे सविस्तर पत्र आणि निमंत्रणपत्रिका आली. पत्रिकेत माझ्या नावासमोर विषय लिहिला होत-

चारित्र्यसंवर्धन (अर्थात एड्स व दारूपासून संरक्षण)

मी विषय पाहून हबकून गेलो. संयोजकांनी कोणताही विषय दिला तरी 'आपल्याला जे बोलायचे' तेच बोलायचे हा मराठीतल्या वक्त्यांचा अनुभव माझ्या पाठीशी असल्यामुळे मला धीर आला. विषयाची व्याप्ती पाहता मी चिंतनाला प्रारंभ केला. 'संधी न मिळाल्यामुळे आमचे चारित्र्य शुद्ध' या मराठीतील एका प्रसिद्ध लेखकाच्या वाक्याने व्याख्यानाची सुरुवात करायची असे मी ठरवले.

अकरा सप्टेंबरला दुपारची गाडी पकडून मी बहिरटवाडीला पोचलो तेव्हा घड्याळात दुपारचे तीन वाजले होते. सूर्य आग ओकत होता. त्या दिवशी गावचा बाजार भरला होता.

''गावात वाचनालय कुठे आहे?'' मी एकाला विचारले.

तो आश्चर्यचकित होऊन म्हणाला'' म्हंजे काय?''

''आज संध्याकाळी माझा तिथे कार्यक्रम आहे.'' मी म्हणालो.

''आज बाजारचा दिवस आणि त्यात संध्याकाळी कार्यक्रम म्हंजे...सुलक्षणा लोककला-केंद्रातच असणार!'' माझ्याकडे संशयाने पाहते, मित्राला डोळा मारत तो म्हणाला. यांच्या नादी लागायला नको म्हणून मी काढता पाय घेतला.

थोडे पुढे आल्यानंतर एक जुनाट इमारत दिसली. बाहेर रंग उडालेली पाटी होती... 'वाचकप्रिय वाचलनालया'समोर मंडप घातला होता. मंडपात बाजार भरला होता. गाई-म्हशी, डुकरे मजेत फिरत होती. मी तिथेच झाडाखाली बसून राहिलो. सहा वाजता बाजार संपला. माणसं पांगली. शेळ्या, मेंढ्या 'जॉगिंग पार्कवर' माणसे यावीत तशा यायला लागल्या. त्यांना हकलत तो परिसर झाडण्यासाठी दोन बायका आल्या. धुळीचा लोट उठला होता. तितक्यात ग्रंथालय उघडण्यासाठी एक मुलगा आलेला मला दिसला. मी त्याच्याजवळ जाताच तो म्हणाला, 'तुम्ही पुण्याचे साहेब ना?'

मी हो म्हटलं. माझा जीव भांड्यात पडला. त्याने आत बसायला खुर्ची दिली. ग्रंथालयाच्या बाहेरच्या बाजूला ओटा होता. तिथून मंडप सुरू झाला होता. त्याने स्पीकर लावला. 'मेरे देश की धरती', 'ये देश है वीर जवानोंका' वगैरे गाणी झाली. दोन-तीन गाणी झाली की, तो हातात माईक घेऊन ज्या खास ढंगात तमाशाची अथवा चित्रपटाची जाहिरात करतात त्याच ढंगात माझ्या व्याख्यानाची जाहिरात करीत होता. गाजणार... गाजणार... गाजणार... आज सायंकाळी ६.३०वा... पुन्याची मुलुखमैदानी तोफ... मास्तरांचे मास्तर... प्रा. जोशी यांचं बहुरंगी व्याख्यान...विषय चारित्र्यसंपन्नता... अर्थात एड्स व दारूपासून संरक्षण... सुरुवात चुकवू नका... शेवट घालवू नका.

मला हसावे की रडावे तेच समजत नव्हते. मुलुखमैदानी तोफ हा शब्द ऐकून मला धडकीच भरली. माझी अवस्था भुईनळ्यासारखी झाली होती.

ऑफिसमध्ये चहापाणी झाले. सात कधी वाजले ते समजलेच नाही. बाहेर बघितले तर मंडपात अडीचशे-तीनशे माणसे जमा झाली होती. मला फोन करणारे भांबुर्डे आले. त्यांनी स्वागत केले. माझा परिचय करून दिला. ते म्हणाले ''आज जे वक्ते इथे आले आहेत ते इतके भाग्यवान आहेत की, अनेक मोठ्या साहित्यिकांनी, लेखकांनी आपले प्राण त्यांच्या मांडीवर सोडले आहेत.'' लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. माझ्याच परिचयातली ही नवीन गोष्ट ऐकून मी अवाक् झालो. नंतर उलगडा झाला. मराठीतील एक साहित्यिक माझ्या मांडीवर वारले असा उल्लेख भांबुर्डेने माझ्याच एका पुस्तकात वाचला होता. त्याचा संदर्भ घेऊन तो बोलत होता. मी मनातल्या मनात म्हणत होतो, हे मराठीतील इतर साहित्यिकांपर्यंत पोचू देऊ नका. नाहीतर उद्यापासून मला सुपाऱ्या यायला लागतील, 'त्यांना यांच्या मांडीवर झोपवा आणि वर पाठवा'. मी साहित्यक्षेत्रातला अहिंसक सुपारीबाज भाई आहे असे मला वाटायला लागले.

शाल, श्रीफळ देऊन माझा सत्कार करण्यात आला. मी तास भर भाषण केले. नको त्या ठिकाणी हशा आणि टाळ्या मिळत होत्या.


व्याख्यान संपताच मी भांबुर्डेना म्हणालो,

''मी आता लगेच निघतो.''

त्यावर भांबुर्डे म्हणाला, 'हे काय साहेब? तुम्ही आमचे पाव्हणे आणि न जेवताच परत जाणार हे काही पटत नाही. तुमची झक्कास जेवणाची व्यवस्था केलेली आहे. आता तुम्हाला या गावातून थेट पुण्याला गाडी नाही. इथून जवळच वांगेफाटा आहे. तिथून रात्री दहाला पुण्याला जाणारी गाडी आहे. दोन घास खा. गप्पागोष्टी करा मग निघा.''

घड्याळात रात्रीचे आठ वाजले होते. मलाही भूक लागली होती. मी जेवण करून निघायचे ठरविले. तेवढ्यात श्रोत्यातील एक वृद्ध गृहस्थ जवळ येत म्हणाले, ''साहेब, कृपा करून माझ्या घरी येता का?''

''नाही, आज वेळ नाही. परत कधीतरी नक्की


आल्या दिवाळीच्या संगे
लक्ष दीपकांच्या राशी
अंधारली सृष्टी सारी
न्हाऊन निघे प्रकाशी

घन तिमिराचे राज्य
सारे उजळून गेले
चराचर सृष्टीतले आज
तेजरूप ल्याले

करू नमन दिव्याला
प्रार्थना ही त्याच्यापाशी
पाय मातीत असू दे
हात भिडू दे आकाशी

सर्वांना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा

TJSB
TJSB
दि ठाणे जनता सहकारी बँक लि.
आपल्या विश्वासाची प्रथम पसंतीची
नातं... व्यवसायापलीकडचं
नोंदणीकृत कार्यालय: मधुकर भवन, रोड नं. १६, वागळे इस्टेट, ठाणे(प)-400604.फोन: 25838500. फॅक्स: 25838550.
E-mail: response@thanejanata.co.in
Website: www.thanejanata.co.in
टोल फ्री क्र.: १८०० २२३४६६
ठाणे ◆ मुंबई ◆ नवी मुंबई ◆ पुणे ◆ नाशिक...

येईन.'' मी म्हणालो

''असं करू नका साहेब. कृपा करा.'' तो काकुळतीला येऊन म्हणाला.

''त्यात कृपा काय करायची? आज वेळ नाही एवढंच.''

''साहेब, आता तुमच्याविषयी बोलताना भांबुर्डे म्हणाले मोठ्या लोकांनी तुमच्या मांडीवर प्राण सोडले आहेत. माझी चौऱ्याण्णव वर्षाची आई चार वर्षे अंथरूणाला खिळून आहे. आपण कृपा केली तर तिची सुटका होऊ शकते. एवढं पुण्याचं काम करूनच इथून जावा, फार उपकार होतील.''

मघाशी माझ्या मनात जो विचार आला होता तो कृतीत उतरण्याच्या दिशेने नियती पावले टाकत होती. त्या वृद्ध श्रोत्याचे बोलणे ऐकून मी हादरलोच. भांबुर्डेनी माझी सुटका केली.

भांबुर्डे आणि मी एका जुनाट जीपमध्ये बसलो. रस्ता इतका मस्त होता की, सगळी हाडं शेकून निघाली. एखाद्या गर्भवतीबाईचे सिझर टाळायचे असेल तर हा प्रवास घडला पाहिजे असे वाटत होते. आता भांबुर्डे कुठल्यातरी धाब्यावर आपल्याला जेवायला घेऊन जाणार अशी माझी अपेक्षा होती. आमची जीप एका लग्नमंडपाजवळ थांबली. 'वाघ आणि वाघमारे शुभविवाह' असा बाहेर फलक होता.

''साहेब उतरा.'' भांबुर्डे म्हणाले.

''इथे जवळपास धाबा किंवा खानावळ आहे का?'' माझा प्रश्न

''काय साहेब, पाहुण्याला पुण्यावरून बोलवायचं आणि बाहेर जेवायला घालायचं  हे काही मनाला पटत नाही. ग्रामपंचायतीच्या मेंबरच्या मुलीचं लग्न आहे. साहेबांनी आग्रहाचं निमंत्रण दिलेलं आहे. या मस्त जेवण करू.'' आढेवेढे न घेता भांबुर्डे म्हणाला. माझा नाईलाज होता. एखाद्या भामटच्या-सारखा मी त्या मंडपात भांबुर्डेबरोबर फिरत होतो. आम्ही दोघे थेट पंक्तीत जाऊन बसलो. वांग्याची भाजी, मसाले भात, मठ्ठा, पुऱ्या आणि बुंदीचा लाडू असा फक्कड बेत होता. मी मनमुराद ताव मारला. आग्रह करण्यासाठी नवरा-नवरी आले.

''हे आपले साहेब बरं का. जोशीसाहेब.'' भांबुर्डेने परिचय करून दिला.

मी कसनुसा हसलो.

''जोशीसाहेब म्हणजे वांगीगावचे तलाठी का?'' नवऱ्या मुलाने विचारले.

मी कोणत्याही अँगलने तलाठी वाटत नव्हतो तरी तो बिनधास्त बोलून गेला.

''नाही हो. हे आपल्या व्याख्यानमालेत भाषण द्यायला आलेले जोशीसाहेब आहेत.'' भांबुर्डेनी सारवासारव केली.

हात धुऊन आम्ही मंडपाबाहेर पडलो. समोर गाडी उभी होती. मला वाटले आता गाडीत बसायचे, वांगीगावाच्या जवळ असणाऱ्या फाट्यावरून पुण्याला बस पकडायची. मी ड्रायव्हर शेजारी बसलो.

'' निघूया का?'' मी भांबुर्डेला विचारले.

माझी नजर चुकवत भांबुर्डे म्हणाला, ''साहेब, वरात याच गाडीतून जाणार आहे. तुम्ही पुढे बसा. नवरानवरी मागे बसतील. अर्ध्या तासात बँडवाले त्यांना घरापर्यंत पोचवतील.''

मी कपाळाला हात लावला. हे सगळं सांगताना भांबुर्डेच्या चेहऱ्यावरची रेषसुद्धा हलली नव्हती.

मी हतबल होतो. ड्रायव्हरशेजारी बसून राहिलो. थोड्याच वेळात मळकट ड्रेस घातलेले बॅण्डवाले आले. दिवाबत्ती घेतलेली माणसे आली. मुंडावळ्या बांधलेले नवरानवरी माझ्या मागे येऊन बसले. वरात निघाली. बिलनची नागीण निघाली, कोंबडी पळाली, मुंगळा मुंगळापासून चलो रे डोली उठाओ जहाँपर्यंतची सर्व प्रकारची गाणी वाजत होती. ग्रामपंचायतीच्या त्या मेंबरने नाचवायला बायका आणल्या होत्या. त्या नाचत होत्या. गावातली माणसे त्यांच्यावरून पैसे ओवाळून टाकत होती. आजपर्यंत मराठी साहित्य संमेलनात ग्रंथदिंडीच्या वेळी आजीमाजी संमेलना-ध्यक्षांची मिरवणूक बग्गीतून निघते एवढेच मी पाहिले होते. ही मिरवणूक भन्नाट होती. आलिया भोगासी असावे सादर! या संतवचनाला शरण जाऊन, मी ती परिस्थिती स्वीकारत गाण्याच्या तालावर ठेका धरला. तेवढ्यात दोन-तीन तृतीयपंथी आले. त्यांनी टाळ्या वाजवून माझ्याकडे पैशांची मागणी केली.

''हे बोलणारे साहेब आहेत'' असं म्हणत ड्रायव्हरने माझी पाठराखण केली.

''हम किधर बोल रहे है ये गुंगी मॅडम है'' असे म्हणत त्यांनी टाळ्या वाजवत माझा पचका केला. जास्त तमाशा नको म्हणून मी खिशातून दहा रुपये काढून त्यांच्या हातात दिले तसे ते गेले. मी दीर्घश्वसन केले.

अर्ध्या तासात वरात संपली. जवळ येत भांबुर्डे म्हणाला, ''चला आता निघुयात.''

मी आणि भांबुर्डे ड्रायव्हरच्या मागच्या सीटवर येऊन बसलो. मला आता मानधनाच्या पाकिटाची ओढ लागली होती. भांबुर्डे कधी एकदा खिशात हात घालतो आणि

बाहेर पाकिट काढतो याकडे मी बारकाईने लक्ष ठेवून होतो.

त्याने खिशात हात घातला. मला वाटले आता हा पाकिट बाहेर काढणार. त्याने दात कोरण्याची काडी बाहेर काढली आणि तो दात टोकरू लागला! माझा भ्रमनिरास झाला. त्याने डावीकडे वळून पँटच्या खिशात हात घातला. पँटच्या खिशात पाकिट ठेवले असावे असा माझा कयास होता. त्याने खिशातून हात बाहेर काढला. त्याच्या हातात कंगवा होता. कंगव्याच्या दातावरून त्याने नख फिरवले आणि कंगव्याने स्वतःचे केस विंचरायला सुरुवात केली. आता माझे फालुदा आईस्क्रीम झाले होते. जीप चालू असताना एकदा भांबुर्डे माझ्याजवळ आला. मला वाटले, आता हा हळूच पाकिट काढून देणार. माझ्याजवळ येत माझ्या अंगावर रेलत त्याने ड्रायव्हर शेजारच्या खिडकीतून बाहेर पाहिले आणि म्हणाला, ''आयला, पानपट्टी बंद आहे वाटतं!'' भांबुर्डे अक्षरश: माझी सत्त्वपरीक्षा पाहत होता.

वांगीगावाच्या फाट्यावर आम्ही उतरलो. स्टॅण्डवर गाड्या लागलेल्या होत्या. भांबुर्डेने आतमध्ये जाऊन जागा पकडली. सामान नेऊन टाकले. मानधनाचे पाकिट मात्र तो काही केल्या काढत नव्हता. भांबुर्डे मागच्या जन्मी पुण्यातल्या एखाद्या सार्वजनिक संस्थेचा हाडाचा कार्यकर्ता असणार असे माझे मन मला बजावत होते.

लाल डब्याची ती एस.टी बाहेरून जितकी घाण होती तितकीच आतूनही घाण होती. कंडक्टर दारात उभे राहून 'पुणे, चला पुणे' म्हणून ओरडत होता. खिडकीजवळ येऊन बाहेरून भांबुर्डे माझ्याशी गप्पा मारत होता. माझ्या व्याख्यानाची आणि लग्नातल्या जेवणाची तोंड भरून तारीफ करत होता. खिशातून काही केल्या पाकिट मात्र बाहेर काढायला तयार नव्हता. कंडक्टरने बेल मारली तसा काकुळतीला येऊन मी म्हणालो,

''भांबुर्डे, तेवढा व्यावहारीक भाग पूर्ण करून टाका की!''

माझी शब्दरचना त्याला न समजल्यामुळे ओरडत तो म्हणाला,

''काय?''

''अहो, ते आपलं मानधनाचं पाकिट?'' मी म्हणालो.

''आयला, विसरलोच की.''

भांबुर्डेने खिशातून पाकिट बाहेर काढले. त्याची घडी घातली होती. ते त्याने सरळ केले. कंडक्टरने बेल मारली. गाडी हलली. भांबुर्डेने खिडकीतून ते पाकिट माझ्या हातात दिले आणि म्हणाला, ''ठरल्याप्रमाणे तीन हजार आहेत. आम्ही खेड्यातली माणसं. शब्द म्हणजे शब्द. व्यवहाराला चुकणार नाही.''

''ओके'' म्हणत मी त्याला टाटा केला. गडी दिलेल्या शब्दाला जागला होता आणि ठरल्याप्रमाणे पाकिट मिळाले म्हणून मी आनंदात होतो.

''तिकीट'' असं म्हणत कंडक्टर पुढे आला. मी तिकीट काढले. पाकिट उघडून पाहण्यासाठी मी उत्सुक होतो. मला ते पाकिट जड वाटत नव्हते. शंभराच्या तीस नोटा तर नक्कीच नसणार! कदाचित पाचशेच्या सहा नोटा असतील. मी मनाशी अंदाज बांधत होतो. मी बाहेरून पाकिट पाहिले. आत लालसर रंगाचे काहीतरी दिसत होते. मी मनाशी खूणगाठ बांधली. नक्कीच हजाराच्या तीन नोटा असणार. भांबुर्डे ज्या आत्मविश्वासाने बोलून गेला होता त्यावरून तो फसवणार नाही असे मी माझ्या मनाला बजावत होतो. तरीही नोटा मोजून पाहण्याचा मोह आवरत नव्हता.

मी पाकिट फोडले. आत लाल रंगाची एक पावती आणि पाचशेची नोट होती. मला हसावे की रडावे हेच समजत नव्हते. पावतीला टाचणी लावून एक पत्र होते. मी वाचायला सुरुवात केली.

माननीय प्रा. जोशी
सस्नेह नमस्कार

जोपर्यंत वक्त्याच्या बोलण्याला सामाजिकतेचा स्पर्श होत नाही तोपर्यंत ते शब्द म्हणजे बुडबुडेच. असले पोकळ बोलणे काय कामाचे? आपल्या बोलण्याला सामाजिक कार्याची जोड मिळावी म्हणून मानधनातले रुपये अडीच हजार म्हसोबा देवस्थानच्या जीर्णोद्धारासाठी देणगी म्हणून दिले आहेत. त्याची पावती सोबत जोडली आहे. प्रवासखर्चासाठी पाचशे रुपये दिले आहेत. त्याचा स्वीकार करावा. सुज्ञास अधिक सांगणे न लगे.

लोभ असावा.

आपला विश्वासू,
घा. त. भांबुर्डे

---

**– प्रा. मिलिंद जोशी**
बी १/११/१२ रविराज टेरेस,
सुखसागर नगर, कात्रज, पुणे ४०० ०४६
दूरध्वनी : ०२० २६९६३५०९
भ्रमणध्वनी : ९८५०२७०८२३
ई-मेल : joshi.milind23@gmail.com

# तुझे गीत गाण्यासाठी...

**सत्त्वशीला सामंत**

'लोकसत्ता'मध्ये १९९९ सालच्या सप्टेंबर महिन्यात माझा 'महानायक' या कादंबरीवरील एक स्फोटक लेख प्रसिद्ध झाला आणि त्या दिवशीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत माझ्या घरी दूरध्वनींची रीघ लागली. त्या ओघात दुपारी १२ वाजता अकल्पितपणे एक दूरध्वनी आला. ''मी मंगेश पाडगांवकर बोलतोय... तुमचा लेख वाचला. तुमचं भाषाज्ञान पाहून मी थक्क झालो...'' हे ऐकून माझ्यावरच थक्क होण्याची पाळी आली. 'पुंडलिकाभेटी परब्रह्म आले गा' या भावनेने 'भक्ताचिया पायीं थरारली वीट' अशी माझी स्थिती झाली. कविवर्यांची व माझी ती सलामीची भेट.

त्यानंतर केव्हातरी मुंबईला गेले असताना, निमंत्रणावरून त्यांच्या घरी गेले व समक्ष भेटीत त्यांना माझं 'व्याकरणशुद्ध लेखनप्रणाली' हे पुस्तक भेट दिलं. बहुसंख्य वेळा असा अनुभव येतो की, भेटीदाखल दिलेली पुस्तकं थोरामोठ्यांकडून वेळेअभावी कधी वाचली जात नाहीत. पण पाडगांवकरांचा मला आलेला अनुभव मात्र वेगळा होता. अधूनमधून माझं पुस्तक ते वाचतात आणि फोनवरून चर्चा करतात. एक दिवस, एका शब्दरूपाविषयी त्यांना काही शंका आली, म्हणून त्यांनी मला फोन केला व ते म्हणाले. ''अहो, आता आमचे वसंत बापट आणि श्री.पु. दोघेही गेले. आता शंका कोणाला विचारू?...'' मी मनात म्हटलं, आता फक्त मीच राहिले वाटतं! खरं सांगायचं तर, अनवधनानं का होईना, पण पाडगांवकरांनी मला त्या महनीय व्यक्तींच्या पंक्तीला बसवलं म्हणून मी आतून सुखावले. मग त्यांनी आपली शंका विचारली आणि शंकासमाधान करून घेतलं. मुळात ते वा. ल. कुलकर्णी यांचे सच्छिष्य आणि श्री. पु. भागवतांचे परममित्र. त्यामुळे भाषेच्या सौष्ठवाविषयी सतत जागरूक राहण्याची वृत्ती.

गेली साठ वर्षं कविवर्य पाडगांवकर मराठी जनमानसात मुरून गेले आहेत आणि त्यांनी मराठी तरुणाईचं भावविश्व सर्वांगांनी फुलवण्याची किमया केली आहे. १९४९ साली पुणे येथील मराठी साहित्य संमेलनात त्यांचा पहिला जाहीर काव्याविष्कार अवतरला तेव्हा संमेलनाध्यक्ष वि.द. घाटे यांनी त्यांची पाठ थोपटली आणि त्या 'पहिल्या हिरव्या

तृणपात्याचा' सत्कार केला. त्यानंतर १९५० सालापासून पाडगांवकरांचं 'धारानृत्य' सुरू झालं आणि आजतागायत ते चालूच आहे. अलिकडेच 'सामना'च्या दिवाळी २००८ अंकात दिलेल्या मुलाखतीनुसार, सुरुवातीला त्यांचं गायक होण्याचं स्वप्न होतं, पण व्यवहारनिष्ठ वडिलांनी त्यांना फारसं उत्तेजन दिलं नाही, म्हणून ते स्वप्न अधुरंच राहिलं. पण त्यांच्या कविताप्रेमी आईनं मात्र त्यांच्यातलं कवित्व जागवलं. 'तव चिंतनी, मन गुंगुनी, हिंडतो रानीवनी' हा त्यांच्या प्रतिभेच्या पहिला हुंकार आणि अंकुरदेखील. त्यांचं पूर्ण नांव मंगेश केशव पाडगांवकर असं आहे. त्यामुळे गतवर्षी त्यांना 'केशवसुत पुरस्कार' मिळाला तेव्हा त्या समारंभात त्यांनी आपण 'दुसरे केशवसुत' आहोत असं सांगून रसिकांना सुखद धक्का दिला. एवढं मात्र खरं की, हे साम्य 'नावापुरतंच' आहे.

पाडगांवकरांचा एकंदर जीवनप्रवास पाहिला की, फार पूर्वीपासूनच एक भटका 'जिप्सी' त्यांच्या मनात खोल दडून बसला होता हे लक्षात येतं. आयुष्याच्या पूर्वार्धात कोणतीच गोष्ट जगराहाटीप्रमाणे सरळ रेषेत घडलेली दिसत नाही. १९४८ साली महाविद्यालयीन शिक्षण अर्धवट सोडून ते काही मित्रांबरोबर दक्षिण भारत आणि श्रीलंका इथे प्रवासाला निघून गेले. यशोदा उजगरे यांच्याबरोबर प्रेमप्रकरण चालूच होतं. प्रवासाहून परतल्यानंतर १९५० साली विवाह केला. पण विवाहाच्या अनुषंगानं येणाऱ्या सांसारिक जबाबदाऱ्यांचं भान मात्र आलं नव्हतं, असं यशोदाबाईंच्या आत्मचरित्रावरून दिसतं. हा कलंदर कवी सदा आपल्या काव्यमस्तीत धुंद. 'कुणास्तव कुणीतरी सभय वाट पाहे घरीं नि भार वाहे खांद्यावरी' असा सगळा मामला होता. मध्येच १९५२ साली नरेश मंत्री या गांधीवादी मित्राच्या सुसंगतीमुळे वर्ध्याला काकावाडी येथे जाऊन हिंदी भाषेचा अभ्यास करण्याची लहर आली. सुदैवानं, यशोदाबाईंनी तिथं सहकुटुंब येण्याचा आग्रह धरला व त्यामुळे थोडा तरी गृहस्थाश्रम घडला. लग्नापूर्वी या प्रेमिकांना एकमेकांच्या जवळ येण्याची अनावर ओढ होती, पण लग्नानंतर मात्र 'इतुके आलो जवळ जवळ की जवळपणाचे झाले बंधन' अशी अवस्था झाली. यशोदाबाईंच्या शब्दांत सांगायचं तर, अनुक्रमे १९५०, ५३ व ५७ साली यशोदाबाईंना तीन अपत्य (अजित, अंजू व अभय) झाली आणि त्याचवेळी पाडगांवकरांना मात्र औरस व मानस अशी मिळून एकूण सहा अपत्यं झाली. त्या त्या वर्षी पाडगांवकरांचे 'धारानृत्य', 'जिप्सी' व 'छोरी' असे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले.

१९५४ सालच्या सुमारास पुन्हा मुंबईला परतल्यावर मात्र पाडगांवकरांना गृहस्थाश्रम चालवण्यातले खाचखळगे जाणवू लागले, आणि ते आपलं अर्धवट राहिलेलं शिक्षण पुरं करून उपजीविकेचा व्यवसाय शोधणाच्या खटपटीला लागले. बी.ए, एम.ए. च्या परीक्षेत त्यांनी उत्तम यश संपादन केलं. पण खरा चमत्कार म्हणजे ते विद्यार्थिदशेत असतानाच १९५४ साली त्यांचा 'निंबोणीच्या झाडामागे' हा लघुनिबंध संग्रह आणि 'जिप्सी' हा कवितासंग्रह विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात लागला. हा एक अभिनव विक्रमच म्हणावा लागेल. आपला पती संसाराप्रती 'उदासबोध' असल्यानं होणाऱ्या ओढाताणीमुळे यशोदाबाई वैतागत असल्या तरी पतीची ही कविताकामिनी मात्र त्यांची 'लाडकी सवत' होती. तरीपण काव्यविश्वातले पाडगांवकर आणि वास्तव व्यवहारातले पाडगांवकर ह्या अगदी वेगवेगळ्या व्यक्ती होत्या. कवितेतला हळुवार कवी प्रत्यक्षात आरडाओरड करून मुलांना धाकात ठेवत असे. 'झुले बाई झुला' किंवा 'दिवस तुझे फुलायचे, झोपाळ्यावाचून झुलायचे' अशी गाणी रचणाऱ्या कवीला प्रत्यक्षात झोपाळ्याचे भय वाटे व म्हणून त्यांनी कधी मुलांना झोपाळा बांधू दिला नाही!

१९५७ ते १९७० या काळात त्यांनी कधी प्राध्यापकी, कधी 'साधना'सारख्या साप्ताहिकात पत्रकारिता, तर कधी 'आकाशवाणी'वर 'बोलशब्द निर्माता' म्हणून आणि अखेरीस 'युसिस'मध्ये भाषांतरकार याप्रमाणे विविध क्षेत्रांत संचार केला. पण या सर्वांत त्यांच्या कवित्वशक्तीवर 'आकाशवाणी'चा खोल ठसा उमटला. त्या निमित्तानं त्यांना 'शर्मिष्ठा', 'बुद्ध', 'कवी', 'प्रभंजन' अशांसारख्या संगीतिकांची निर्मिती करण्याचा सुयोग आला. त्यापैकी 'बिल्हण' ही संगीतिका विशेष गाजली. पु.ल.देशपांडे यांनी त्यांच्या हातात बिल्हण कवीची एक काव्यकृती ठेवली आणि त्यांच्याकडून

ही संगीतिका लिहून घेतली. बिल्हण हा इसवी सनाच्या अकराव्या शतकातील सुप्रसिद्ध काश्मिरी कवी. 'विक्रमाकदेवचरित' हे महाकाव्य, 'कर्णसुंदरी' हे प्रणयप्रधान नाटक आणि ' चौरीसुरत पंचाशिका' हे प्रेमकाव्य (राजा बढे यांनी केलेला त्याचा अनुवाद 'लावण्य-ललित'अलिकडेच प्रसिद्ध आला.) त्याच्या नावांवर जमा आहेत. वेदवेदांगे, व्याकरण व अलंकारशास्त्र यांतील विद्यार्जन पूर्ण झाल्यानंतर हा कवी ठिकठिकाणी भ्रमंती करून देशाटन करू लागला व त्या प्रवासातच त्याची काव्यसंगीतातली मुशाफिरीही झाली. का कोण जाणे, पाडगांवकरांमध्ये 'जिप्सी'प्रमाणे असाच एक बिल्हण कवीदेखील दडून बसला असावा असं मला वाटतं. संगीतिकांच्या ओघांत पाडगांवकरांची कविता गेयतेकडे वाटचाल करू लागलेली दिसते. बिल्हणनं मराठी काव्यजगताला 'माझे जीवन गाणे' (माझे जीवनगाणे नव्हे) आणि 'शब्दांवाचुन कळले सारे शब्दांच्या पलिकडले' ही दोन उत्कृष्ट भावगीतं बहाल केली. 'गाणे हेच माझे जीवन' असं म्हणत पाडगांवकरांनी अनेक संगीतकारांना आणि गायकांना काव्यरस पुरवला आणि मराठी रसिकांचं भावजीवन समृद्ध केलं.

पाडगांवकर-विंदा-बापट या कवित्रयीनं महाराष्ट्रात आणि देशविदेशांतही जाहीर काव्यवाचनाचे कार्यक्रम केले व ते लोकप्रियही झाले. पण जे जे लोकप्रिय ते ते सवंग असतं असा एक समज समीक्षकांमध्ये रूढ आहे. कित्येकदा हे समीकरण बरोबर असलं तरी सदैव तसं असतंच असं नाही. या त्रिमूर्तींनं आपल्या काव्यवाचनाद्वारे बघ्ये निर्माण केले अशी काहींनी टीका केली. कविता ही एकांतात वाचायची वा आस्वादाची गोष्ट हे खरंच, पण तरीही चोखंदळ जाणकार आस्वादक वा रसिक हे साधारणपणे अल्पसंख्यच असतात. खरं तर, कवी उदंड जाहले तरी कवितांची पुस्तकं फारशी खपत नाहीत व म्हणून त्यांना फारसे प्रकाशकही मिळत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. म्हणून अधिकाधिक रसिकांना कवितेकडे खेचून आणायचं तर, जाहीर काव्यवाचनाच्या प्रयोगाचं स्वागत करायला हवं. या तिघांनी ती किमया केली हा इतिहास आहे आणि म्हणूनच लोकांतील कविसंमेलनांना उदंड प्रतिसाद मिळतो. त्याचप्रमाणे, चित्रपटांसाठी गीत लिहिणं हाही सवंग लोकप्रियतेचा एक प्रकार मानला जातो. तोही समज तितकासा बरोबर नाही. ग. दि. माडगूळकर, शांता शेळके, जगदीश खेबूडकर व अलिकडचे सुधीर मोघे हे सर्वजण उत्कृष्ट गीतकार आणि उत्तम कवीदेखील आहेत. पाडगांवकर मात्र चित्रपटांच्या वाटेनं गेलेले दिसत नाहीत, पण त्यांच्या बऱ्याचशा कविता भावगीतरूप झाल्या व गायल्या गेल्या. म्हणून त्यांना काही उणेपण आलं असं मुळीच दिसत नाही. उलट, 'झाली फुले कळ्यांची' इतक्या सहजतेनं त्यांच्या कविता भावगीतांच्या रूपात उमलल्या आणि खुलल्या. वस्तुतः समीक्षकांनी त्यांच्या भावगीतांची कविता म्हणून स्वतंत्रपणे समीक्षा करावयाला हवी. एवढंच नव्हे, तर डॉ.शुभांगी पातुरकर यांच्यासारख्या जाणत्या अभ्यासकांनी त्यांच्या कवितांची छंदशास्त्रीय समीक्षादेखील करावी.

पण पाडगांवकरांच्या कवितांबद्दल माझ्या मनात एक 'पण' आहे. १९६२ साली मराठीचे लेखननियम बदलले तेव्हा अवघं मराठी साहित्यजगत् ढवळून निघालं. कालांतरानं सक्तीनं का होईना, बहुसंख्य साहित्यिकांनी ते नियम अंगीकारले. मात्र, ना.घ. देशपांडे, इंदिरा संत, बा.भ. बोरकर, आरती प्रभू आणि पु.शि. रेगे यांनी आपल्या कवितांमधून जुन्या व्याकरणशुद्ध अनुस्वारांना फाटा दिला नाही. (पु. शि. रेग्यांनी तर आपल्या गद्यातही नवे नियम स्वीकारले नाहीत.) याउलट, जुन्या नियमांत मुरलेले असूनही शांता शेळके, कुसुमाग्रज आणि बापट-करंदीकर-पाडगांवकर हे प्रतिभावंत कवी गद्यात व पद्यातही नव्या प्रवाहात सामील झाले. मात्र क्वचित प्रसंगी पाडगांवकरांच्या मनाची चलबिचल झालेली दिसते. ते आपल्या कवितांतून 'का' (खातरजमावाचक) आणि 'कां' (कारणवाचक) असा फरक करतात. त्याव्यतिरिक्तदेखील जुने अस्पष्टोच्चार्य पण, व्याकरणशुद्ध अनुस्वार गाळल्यामुळे त्यांच्या (व इतरांच्याही) कवितांत अधूनमधून नकळत अर्थाचे घोटाळे झालेले आहेत. एकदा, मी पाडगावकरांना त्यांच्या कवितांतील अशा अनर्थकारी जागा कळवल्या. नंतर केव्हातरी त्यांनी मला फोनवरून कळवलं की, यापुढे अर्थाच्या दृष्टीनं आवश्यक असेल तिथं आपण अनुस्वार देत जाऊ. पण एक गोष्ट त्यांच्या लक्षात आलेली दिसत नाही की, एकदा

आपण काही ठिकाणी सार्थ व्याकरणिक अनुस्वारांचा स्वीकार केला की, मग–अर्थहानी होवो, न होवो–व्याकरणाची शिस्त सर्वत्र पाळावी लागते. तसेच, अनुस्वाराअभावी जिथं अर्थाबाबत संदेह निर्माण होतो तिथे त्या कवितेचे यथायोग्य भाषांतर करणेही अवघड बनते. म्हणून पाडगांवकरांच्या (व इतरांच्याही) बाबतीत 'चंद्राला दिवसा प्रकाश नसणे...' हे माझ्या मनाला बोचणारं शल्य आहे.

मायबोलीतील मौलिक सर्जनाप्रमाणे भाषांतराचंही त्यांना आकर्षण आहे. एवढंच नव्हे तर, एखाद्या परभाषेतील उत्कृष्ट साहित्यकृती स्वभाषेत आणताना व ती प्रतिकृती घडवतानाही ते नवसर्जनाचा आनंद लुटतात. हिंदी शिकण्यासाठी १९५२ साली वर्ध्याला काकावाडीत गेले असताना, त्यांना आचार्य काका कालेलकरांचा सहवास व मार्गदर्शन मिळालं आणि त्यांच्या प्रेरणेनं त्यांनी संत मीराबाईच्या हिंदी–राजस्थानी पदांचा समवृत्त अनुवाद केला. १९६५ साली 'मीरा' प्रकाशित झाल्यानंतर अशा अनुवादांत प्रदीर्घ खंड पडला. पण काकांना दिलेल्या वचनाचा त्यांना विसर पडला नाही आणि दीर्घ विरामानंतर त्यांचे 'कबीर' (१९९७) आणि 'सूरदास' (१९९९) हे अनुवाद प्रकाशित झाले. १९५३ सालच्या सुमारास त्यांनी अनुवादाचा जो संकल्प सोडला होता तो त्यांनी कधी सोडून दिला नाही आणि १९९९ साली संकल्पपूर्ती केली. 'मीरा'ला आचार्यांची प्रस्तावना आहे, तर 'कबीर' व 'सूरदास' ह्यामध्ये प्रारंभी खुद्द लेखकाचं 'मुक्तचिंतन' आहे. त्यामागे असलेलं त्यांचं कित्येक वर्षांपासूनचं 'मूक चिंतन'ही किती प्रगल्भ, गाढ आणि गूढ आहे त्याचा वाचकाला प्रत्यय येतो. वर्षानुवर्षं चालू असलेलं वाचन, संशोधन आणि व्यासंग यांची सुमधुर परिणती म्हणजे हे अनुवाद होत. आपल्या 'चिंतना'त त्यांनी मीरा, कबीर व सूरदास ह्यांचं जे तौलनिक विश्लेषण केलं आहे ते खरं तर मुळातूनच वाचण्यासारखं आहे. पण सारांशरूपानं सांगायचं झालं तर पाडगांवकरांच्या मते, मधुराभक्ती आळवणाऱ्या ह्या तीनही संतकवींचा काव्याविष्कार मात्र त्यांच्या या पिंडधर्मानुसार वेगवेगळा झालेला दिसतो. मीरेच्या काव्यात तो 'उत्कट भावानुभव' बनून येतो व त्यातून 'भाववृत्तींचा उत्सव' प्रकट होतो; तर कबीर 'भाववृत्तीचा आविष्कार' न करता, तो आपल्या आशयाचं ठोस विधान करतो.... चिंतनगर्भ–विचारगर्भ काव्यप्रकृतीमुळेच....कबिराच्या काव्यातील उपरोध या निरीक्षणातूनच जन्माला येतो. उपरोधाच्या मागे विचारानुभव हा असतोच. सूरदासाची कविता लोकप्रिय झाली यामागे अनुभूतीतले नाट्य हेरण्याची त्याची कल्पकता आणि संगीत....त्याबरोबरच, जगण्याचा उत्सव करण्याची त्याची स्वीकारशील वृत्ती आहे.

सूरदासाची भक्तिकविता ही मीरेप्रमाणे स्वतःला झोकून देणारी आत्मसमर्पणपर कविता नाही अथवा कबीराप्रमाणे एखाद्या साधकाचीही ती कविता नाही, तर ती कृष्णलीलांप्रमाणे काव्यरचनेच्या लीलांमध्ये रमणारी एका 'कलाकवीची कविता' आहे. पाडगांवकरांनी कबीर आणि तुकाराम ह्या साक्षात्कारी साधकांचीही तुलना करून, त्या दोघांची साक्षात्कारपूर्व अवस्थेतील उत्कट आंतरिक अनुभवाशी जोडलेली रोखठोक भाषा आणि तदुत्तर अवस्थेतील परतत्त्वस्पर्श झालेली मृदुमवाळ भाषा या दोहोंचा नेमका व विचक्षण वेध घेतला आहे.

'पतियां मैं कैसे लिखूं लिखिहि न जाई'चा 'पत्र लिहू मी सांग कसे गऽ मुळी न लिहिले जाई' अशांसारखे शब्दानुवाद हे मूळ संतकवीशी हृदयसंवाद साधल्यामुळे भावानुवादही झाले आहेत. (मात्र 'मीरा'चा अनुवाद त्यांनी जुन्या मराठी संतकाव्याच्या धर्तीवर, जुन्या लेखनपद्धतीनं सानुस्वार केला असल्यानं त्यात एक विलक्षण गोडी आलेली आहे, तर 'कबीर' व 'सूरदास' हे अनुवाद नव्या लेखनपद्धतीत केले असल्यानं काही ठिकाणी अर्थहानी होऊन त्यांतील गोडवाही काहीसा उणावलेला दिसतो; याउलट, विंदा करंदीकरांनी 'अमृतानुभवा'चे अर्वाचीनीकरण करतानाही लेखनपद्धती मात्र पुराणीच ठेवली आहे.)

एकेकाळी 'युसिस'मध्ये सेवाचाकरी केल्यामुळे पाडगांवकरांना इंग्रजी साहित्याच्या अनुवादाचाही प्रदीर्घ अनुभव होता. त्याचा परिपाक म्हणजे गेल्या काही वर्षांत त्यांनी शेक्सपीअरच्या तीन अभिजात नाट्यकृतींचं केलेले समवृत्त पद्यानुवाद. आता तर ते 'बायबल' पंथालाही लागलेले दिसतात. नुकतंच त्यांचं 'बायबल; नवा करार' हे भाषांतर प्रसिद्ध झालं

आहे. (मात्र हे अनुवाद-साहित्य अजून माझ्या पाहण्यात आलेलं नाही) कधीकाळी 'साधना' साप्ताहिकात संपादक म्हणून काम केलेल्या पाडगांवकरांनी केलेलं हे आतंरभारतीचं कार्य पाहून सानेगुरुजींच्या आत्म्याला नक्कीच समाधान वाटलं असेल.

पाडगांवकर आबालवृद्ध रसिकांना प्रिय ओत. त्यांनी 'चांदोमामा'सारखी बालगीतं लिहून बालकांना रिझवलं, 'श्रावणांत घन निळा बरसला' यांसारख्या प्रीतिगीतांनी तरुणांच्या हृदयांतला प्रेमांकुर फुलवला आणि ताटातूट झालेल्या प्रेमिकांसाठी 'भातुकलीच्या खेळामधल्या' आर्त विराण्याही रचल्या; आणीबाणीनंतरच्या काळात देशातील विदारक राजकीय स्थिती पाहून अस्वस्थ झालेल्या मनानं त्यांनी 'सलाम'सारख्या व्यंगात्मक कवितांतून आपला असंतोष प्रकट केला, प्रौढांसाठी मिश्किल 'वात्रटिका', 'बोलगाणी' आणि 'माणसांच्या कविता' लिहून त्यांची मनं जिंकली आणि वृद्धांसाठी 'म्हातारपणावरचं तरुण गाणं' लिहून त्यांचं गतकालीन तारुण्य जागवलं. पा(प)डगांवकरांच्या पावसाळी कवितांतली लज्जत आणि 'लिज्जत'ही न्यारीच. थोडक्यात, भोग व त्याग, मीलन व विरह आणि अनुराग नि विराग ह्या मानवी जीवननाण्याच्या जुळ्या बाजू आहेत याचं भान सतत त्यांच्या अंतर्मनात असतं. त्यामुळेच की काय, ते कवितेतून परस्परविरोधी अनुभवांना सामोरे जात असतात.

१९८० साली 'साहित्य अकादमी'नं पाडगांवकरांच्या कवित्वाला पहिला 'सलाम' केला तेव्हापासून २००८ साली महाराष्ट्र सरकारकडून 'महाराष्ट्रभूषण' गौरव प्राप्त होईपर्यंत त्यांना अनेक मानसन्मान लाभले. पण २००३ साली कवी कुसुमाग्रजांच्या स्मृत्यर्थ त्यांना 'जनस्थान' पुरस्कार जाहीर झाला तेव्हा त्यांच्या कविप्रतिभेचं खरं सार्थक झालं. कारण तो पुरस्कार म्हणजे त्यांच्याच जातकुळीतील दिवंगत कविश्रेष्ठानं त्यांच्या मस्तकावर धरलेला आशीर्वादाचा वरदहस्त होता. २७ फेब्रवारी २००३ रोजी नाशिक येथे कविकुलगुरू कालिदासाच्या नावानं विभूषित झालेल्या भव्य प्रेक्षागृहात झालेला तो अविस्मरणीय सोहळा योगायोगानं 'याचि डोळां' पाहण्याचं भाग्य मला लाभलं व माझ्या डोळ्याचं पारणं फिटलं. प्रेक्षागृह इतकं तुडुंब भरून ओसंडून वाहत होतं की, खुर्च्यांच्या मधल्या रांगांमध्ये खाली बसून आणि पुढे तर मंचावरील मोकळ्या जागेत ठाण मांडून नाशिकच्या जनताजनार्दनानं त्यांचं भरभरून कौतुक केलं आणि कविराजांनीही तीन-चार तास सर्व रसिकांना आपल्या काव्यवर्षावात चिंब केलं. अखेरीस म्हणाले-

इतकं दिलंत,
इतकं दिलंत तुम्ही मला।
खरं सांगतो,
माणूस केलंत तुम्ही मला।

त्याप्रसंगी मला पाडगांवकरांचं 'जनमनातील स्थान' समजलं आणि तेव्हाच मला 'जनस्थान'चा खरा अर्थ काय तेही उमगलं.

पितृवत बा.भ. बोरकर, वडीलबंधूंसमान कुसुमाग्रज व श्री. पु. भागवत आणि जीवाभावाचे मित्रद्वय- विंदा नि वसंत बापट ह्या सर्वांचा अकृत्रिम जिव्हाळा पाडगांवकरांच्या वाट्याला आला. सुप्रसिद्ध निवेदिका प्रतिभा इनामदार यांनी एका जाहीर समारंभात सांगितलेला एक किस्सा- पाडगांवकर जेव्हा तेव्हा श्री.पुं.च्या घरी जात तेव्हा खुर्चीत विसावताना ते म्हणत- ''आई ग नि बाई ग!'' एकदा श्री.पुं.नी त्यांना त्यांच्या या उद्गारांचा अर्थ विचारला. पाडगांवकर उत्तरले- ''माझ्यातले सद्गुण जोपासणारी ती माझी आई आणि मला माझ्या दुर्गुणांसकट सांभळणारी ती यशोदाबाई!'' (यशोदाबाईंना याहून मोठं प्रशस्तिपत्र ते काय असणार?) सहस्रचंद्रदर्शन संवत्सरीचा उंबरठा पार केल्यावर आता यापुढे पाडगांवकरांची वाटचाल 'ज्ञानपीठा'च्या किंवा 'सरस्वती सन्माना'च्या दिशेनं व्हावी ही शुभेच्छा! त्यांचा भाग्ययोग्य असा की, अजूनही अनेक नामवंत संगीतकार व गायक त्यांच्या दारी तिष्ठत उभे आहेत आणि त्या सर्वांच्या मनात एकच भावना आहे.

*तुझें गीत गाण्यासाठीं*
*सूर लावू दे रे!*

---

**- सत्त्वशीला सामंत**
१६, यशोदा कुंज सोसायटी,
तेजसनगर कोथरुड,
पुणे - ४११०३८
दूरध्वनी : ०२०-२५३८३७५५

# पाकिस्तानची गाणी

## योगेंद्र जावडेकर

'तुम्ही आणि मॅडम रोटरी इंटरनॅशनल पीस मिशनच्या कार्यक्रमासाठी पाकिस्तानला जाताय.' चोणकरांनी बातमी दिली... आमचं एक स्वप्न पूर्ण होणार होतं.

चोणकर म्हणजे बदलापूरच्या रोटरी क्लबचे तेव्हाचे अध्यक्ष. भारतीय आणि पाकिस्तानी माणसांच्या एकमेकांबद्दलच्या प्रेम-द्वेष भावनांवर काही हिंदी-उर्दू गज़लांचा कार्यक्रम पीस मिशनच्या निमित्तानं पाकिस्तानात करावा, असा बेत होता. आम्हा उभयतांना गज़ल गायच्या होत्या. पेटी नेहमीप्रमाणे मी वाजवली असती. पण तबला कोण वाजवणार, असा प्रश्न होता. पाकिस्तान सफरीत कोणीतरी जवळच आपल्याबरोबर असावं असंही वाटत होतं. मग उत्तम तबलजी असलेल्या आमच्या डोंबिवलीच्या सर्जन मित्राला-अभय उपासनीला फोन केला,

'अभय, सविता आणि मी गाणार आहोत. तबला वाजवशील का?'... मी अगदी साधा प्रश्न केला.

'म्हणजे काय! नक्की!' अभयचं आनंदानं उत्तर आलं, 'कधी, कुठे?'

'येत्या जानेवारीत. लाहोर आणि कराचीला!'

'काय?' अभय उडालाच, 'वेड लागलंय का तुला?'

एकदा पाकिस्तानचा शिक्का पासपोर्टवर बसला तर युरोप-अमेरिकेतल्या कुठल्याही देशाचा व्हिसा आयुष्यभर मिळणार नाही!'...

'बघ, आपण रोटरीसारख्या संस्थेच्या कार्यक्रमासाठी जाणार आहोत. त्यामुळे असा प्रश्न येईलसं मला वाटत नाही. त्यातही तुझ्या सगळ्या शंकांचं निरसन झालं तरच जायचं. ठरलं मग?'

ऑक्टोबरच्या शेवटच्या शनिवारी संध्याकाळी घाटकोपरला रोटरीची पूर्वनियोजनाची सभा होती. डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. उल्हास कोल्हटकरांनी कराचीच्या रोटरी क्लबशी त्यांच्या झालेल्या चर्चेचा तपशील सांगितला. जानेवारी २००८ च्या ७, ८ आणि ९ या तारखा निश्चित झाल्या. साठपेक्षा जास्त रोटॅरियन्स पाकिस्तानला येणार होते. बरेचसे उद्योजक होते. शिक्षक-शिक्षिका, चार्टर्ड अकाऊंटंट्स्, डॉक्टर्स, वकील... अजून कोणी कोणी. या सगळ्यांचं पाकिस्तानला जाणं हे स्वप्न होतं.

पाश्चात्य लोक इथे आले, दीडशे वर्षं राज्य करून तुंबडी भरून निघून गेले. पण इथे त्यांनी भावनिक गुंतवणूक केली नाही. मुस्लिम आले, पण त्यांनी या उपखंडाला आपलं घर मानलं. वाटा मागितला, पण पळून गेले नाहीत. आणि आज तरी आशियाई देशांबद्दलचं पाश्चात्त्यांचं धोरण काय आहे? इराकला, फायदा संपल्यावर, एकटं पाडून बेचिराख केलं त्यांनी! भारत-पाकिस्तानलाही हे लोक मतलब संपल्यावर नष्ट करायलाही मागे पुढे पाहणार नाहीत. ...आपणच एकमेकांचे सोबती व्हायला हवं. इतिहासाचा अन्वयार्थ माझ्या दृष्टीनं असाच होता. तो सांगणारी एक ग़ज़ल लिहिली.

आपल्यासारखं स्वप्न पाहणारे खूपजण भेटल्याचा तो अनुभव विलक्षण होता.

पुढच्याच आठवड्यात बेनझीर भुत्तोंची हत्या झाली. आणि सगळीच समीकरणं बदलली. आमचं मिशन पुढे ढकलल्याचं जाहीर झालं आणि अखेरीस मे महिन्यात 'मिशन' श्रीलंकेला गेलं. आम्ही दोघे लंकेला गेलो नाही. पाकिस्तानला तर नाहीच. पण ग़ज़ला लिहिण्यापासून पाकिस्तानातल्या काही लोकांशी संवाद होण्यापर्यंतचा आणि माझ्यासारखीच आणि अगदी विरुद्धही मतं असलेली माणसं भेटण्यापर्यंतचा प्रवास फार समृद्ध करणारा होता. त्याची ही गोष्ट. ढोबळ मनानं लेखाची दोन भागांत विभागणी करतो आहे. पहिला प्रवास ग़ज़ला-गाणी लिहिण्यार्यंतचा आणि दुसरा नंतरचा.

नव्वदच्या दशकात कधीतरी भारत-पाकिस्तानच्या मध्ये असलेली पोलादी तटबंदी ढासळायला सुरुवात झाली. पंतप्रधान वाजपेयींच्या 'बस'च्या आगे-मागे बरेच पत्रकार, लेखक, टी.व्ही.वाले सरहद्दीपलीकडे जाऊन आले आणि सांगायला लागले, 'अरे ही माणसं आपल्यासारखीच आहेत,' डॉ. अभय बंगसारख्यांनाही पाकिस्तान भेटीत दिसलेलं तिथल्या माणसाचं 'आपलेपण' भरभरून लिहावंसं वाटलं. द्वारकानाथ संझगिरींनी टी.व्ही.वरच्या एका वादविवादाच्या कार्यक्रमात 'तुम्ही तिथे जाऊन या आणि मगच काय ते बोला! किंबहुना माझं तसं प्रत्येकाला आवाहन आहे!'... असं काहीसं एक जहाल राजकीय पुढाऱ्याला ऐकवलं. मुशर्रफ आग्रा-परिषदेच्या निमित्तानं भारतात आले तेव्हा सगळ्या मीडियानं, त्यांच्या युद्धखोर धोरणाला विरोध केला, पण अगदी 'आपला माणूस' म्हणून त्यांचं स्वागत केलं.

जगाच्या इतिहासात भिंती ढासळण्याचा तो काळ होता. बर्लिनची भिंत तर पडलीच होती. भारत-पाकिस्तानच्या सरहद्दीचा अर्थ बदलत होता. माझ्या लहानपणी महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाला अगदी हिंसक स्वरूप आलं होतं. तेव्हाही कोल्हापूर-निपाणी बस चालूच असायची, तसं काहीसं होईल असं वाटत होतं. लोकमताच्या रेट्यापुढे कडवटपणा कमी होत जाईल, असं वाटत होतं. ही एक चळवळ व्हावी, असं वाटत होतं. या चळवळीचा एक भाग मला व्हायचं होतं. भिंती तोडायच्या होत्या, पूल बांधायचे होते.

माझं मन कामाला लागलं. उर्दू शायरी आणि भारतीय संगीत हा भारतीय आणि पाकिस्तानी माणसाचा 'वीक पॉइंट' आहेच. आपल्याला जे जे सांगायचंय ते ग़ज़लांच्या माध्यमातून सांगता येईल, तसा संवाद साधता येईल, हे नक्की होतं. प्रश्न होता माझ्या क्षमतांचा. भावगीतांच्या कार्यक्रमांतूनही क्वचित गात असलो, तरी मी गायक नव्हे, हिंदी उर्दू ही माझी भाषा नव्हे, हे ठाऊक होतं. पण गप्प बसवत नव्हतं.

काही ग़ज़ला लिहून काढल्या. तितक्यात शायर संदीप गुप्तेंचं ग़ज़ल लेखनावरचं एक भाषण ऐकण्याचा योग माझ्या भावानं-अश्विननं जुळवून आणला. त्यांनी फारच सोप्या पद्धतीने ग़ज़लांची काही वृत्त समजावून सांगितली. उत्साह वाढला. पण हेही लक्षात आलं की मी आत्तापर्यंत जे लिहिलं आहे, त्याला ग़ज़ल म्हणता येणार नाही!

...पुन्हा पहिल्यापासून कामाला लागलो. उर्दूची माझी शब्दसंपदा किती मर्यादित! एक एक शब्द सापडायला दिवसचे दिवस जायचे. तरीही लिहिलं

रूख़ से पर्दा हटा तो क्या निकला?
हमसफर एक गुमशुदा निकला!
जब तेरी आँख मे जरा झाँका
मेरे ख्वाबों का आईना निकला!

दिल ने दिल की जुबाँ को पहचाना
हाल दोनों का एक सा निकला!
दिल की ग़हराइयों से जो उभरा
तोड सरहद को हौसला निकला!
... मैं न शायर हूँ, हूँ न मैं फ़नकार
सिर्फ कहता हूँ दिल से क्या निकला!

तिथल्या लोकांशीही मला हितचिंतक म्हणूल संवाद साधायचा होता, म्हणून लिहिलं,

दुश्मन थे हम तो पहले यहाँ, तेरे मुल्क में!
आएँ हैं दोस्त बन के यहाँ तेरे मुल्क में!

.... ही गज़ल तिकडच्या लोकांना आपल्याकडे येण्याचं आमंत्रण देऊन संपवली. पुढे रोटरीच्या मिशनला निघताना 'दुश्मन' हा शब्द काढून टाकला. आणि 'थें गैर हम तो पहले यहाँ'असं गाणं म्हटलं. न जाणो हा 'दुश्मन' शब्द व्हिसा मिळवताना आड आला, तर?

... पहिल्या दोन्ही गज़ल मला स्वतःला लिखाणाबद्दल आत्मविश्वास देणाऱ्या होत्या. पण त्यांत मुद्दे नव्हते.

... एक गोष्ट मला नेहमी जाणवायची. जेव्हा जेव्हा बेदींच्या, कुंबळेच्या, हरभजनच्या बोलिंग ॲक्शनबद्दल ऑस्ट्रेलियन लोकांनी आगपाखड केली. तेव्हा पाकिस्तानी क्रिकेटर्सची भारतीयांना सहानुभूती होती. ॲलन लँब विरूद्धच्या खटल्यात इम्रान खानची विश्वासार्हता पणाला लागली होती, तेव्हा भारतीयांना मनातून इम्रान खान जिंकायला हवा होता. ऑस्ट्रेलियनांनी सुरक्षेच्या कारणासाठी कोलंबोत खेळायला नकार दिला, तेव्हा भारतीय आणि पाकिस्तानी खेळाडू एकत्र असलेली टीम अझरुद्दीनच्या नेतृत्वाखाली खेळली आणि १९९६च्या विश्वचषकाची सुरुवात झाली. हा तर इतिहास आहे.

नाहीतरी पाश्चात्य लोक इथे आले, दीडशे वर्षे राज्य करून तुंबडी भरून निघून गेले. पण इथे त्यांनी भावनिक गुंतवणूक केली नाही. मुस्लिम आले, पण त्यांनी या उपखंडाला आपलं घर मानलं. वाटा मागितला, पण पळून गेले नाहीत. आणि आज तरी आशियाई देशांबद्दलचं पाश्चात्त्यांचं धोरण काय आहे? इराकला, फायदा संपल्यावर, एकटं पाडून बेचिराख केलं त्यांनी! भारत-पाकिस्तानलाही हे लोक मतलब संपल्यावर नष्ट करायलाही मागे पुढे पाहणार नाहीत.

...आपणच एकमेकांचे सोबती व्हायला हवं. ...इतिहासाचा अन्वयार्थ माझ्या दृष्टीनं असाच होता. तो सांगणारी एक गज़ल लिहिली. त्यातले मुख्य शेर असे होते -

खिज्जी, गुलाम या मुघल आए यहाँ बसे,
छोडा न मुल्क़ ना हि वो लूटकर चले गए!
वो ग़ैर थें जो मुल्क़ को बाँटे चले गए!
अपनों पे फिर ये वार क्यों हम से किए गए!

...भारत पाकिस्तानचे लोक एक झाले तर जगाला आपली एक सुपरपॉवर म्हणून दखल घ्यावी लागेलच, पण दोन्ही देशांतल्या लोकांचं भलं होईल. दोन्ही देशांतल्या सामान्य माणसांना एकमेकांच्या रक्ताच्या नद्या वाहायला लावण्यात खरंच रस आहे का? किंबहुना जगातल्या कुठल्याही सामान्य माणसाला इतर कुठल्याही सामान्य माणसाबद्दल वैर असायचं कारण काय? मुशर्रफ भारतात आले होते तेव्हा पाच दशकांहून अधिक काळ चाललेलं हे वैर दोन राष्ट्रप्रमुखांच्या एकाच भेटीत संपेल याची सुतराम शक्यता नव्हती. तरीही तसा आव आणून टी.व्ही.चे सगळे चॅनेल्स स्वप्नं विकत होते आणि देशांतले लोक ह्या स्वप्नांमागे वाहवत गेले होते. केवळ दोन्ही देशांत शांतता प्रस्थापित व्हावी एवढीच भावना असती तर ही प्रक्रिया फक्त सीमेलगतच्या भागापुरतीच मर्यादित राहिली असती. पण तसं झालं नाही. या दोन्ही देशांतल्या नागरिकांच्या मनात एकमेकांविषयी एक तीव्र आपुलकीची भावना आहे, हाच त्याचा खरा अर्थ होता. प्रत्येक सामान्य माणसानं, माणूस म्हणून माणुसकीसाठी जगायचं ठरवलं; राजकारण्यांच्या, अतिरेक्यांच्या अतिरंजित भूलथापांना बळी न पडता माणूस म्हणून एकमेकांच्या कलांचा, संस्कृतींचा आदर करायचा ठरवला तर?... शेवटी, असे राजकारणी, दहशतवादी वगैरे सामान्य माणसांच्या तुलनेत संख्येनं अगदीच मूठभर नाहीत का? सगळी माणसं जर माणूस म्हणून एक झाली तर कारस्थानी लोकांची कारस्थानं आपोआपच पराभूत होणार नाहीत का? ... पुढच्या गज़लेचा शेवट मी हा प्रश्न विचारून केला -

जो राह मिल के चलेंगे अमन की हम सब लोग
तो कैसे जीत सकेंगे फरैब से कुछ लोग?

... याच कालावधीत कारगिलचं युद्धही होऊन गेलं होतं. टी.व्ही.च्या पत्रकारांनी इतक्या जवळून

दाखवलेलं हे पहिलंच युद्ध. या आणि आधीच्याही युद्धांत दोन्ही देशांमधली तरुण मुलं लढताना मारली गेली. भारत जिंकला. पण जे मारले गेले त्यांच्या घरी काय झालं असेल? स्वातंत्र्यापासून लढल्या गेलेल्या तीन-चार युद्धांचा सामान्य माणसाला किती फायदा झाला?

...बांगलादेशच्या सामान्य माणसाला स्वातंत्र्य मिळालं हा फायदा होता. पण त्याची केवढी किंमत मोजावी लागली! प्रत्यक्ष युद्धाचा ज्वर एक प्रकारे सामान्य माणसालाही चढतोच. पण आता युद्ध थांबलं आहे तर आपण, सामान्य माणसांनी याचा विचार करायला नको का?

...बंदूकें अब चुप सी हो गय हैं तो
इस दिल की धड़कन सुन ले
कुछ तू भी सुना, मैं भी सुनाऊँ मेरी
आ, मिलकर बातें कर ले
... असं म्हणून
जब मानेंगे इन्साँ को हम इन्साँ
हल होगा हर मुश्किल का!

... हे हितगुज करीत पुढचं गीत मी संपवलं.

हेही खरंच की कित्येक गोष्टी तर्कशास्त्राच्या आणि स्पष्टीकरणांच्या पलीकडच्या असतात. दोन्हीकडच्या, पन्नास पाऊणशे वर्षांचा इतिहास आणि युद्ध पाहिलेल्या माणसांसाठी सगळं विसरून नव्यानं सुरुवात करणं अशक्य असू शकतं. पण तरी दोन्ही देशांतल्या माणसांना एकमेकांचं भलं व्हावं असं प्रामाणिकपणानं वाटायला नको का? आणि हे एकमेकांच्या स्वाभिमानाला जपून करता येणार नाही का?

... हैं कुछ बातें ऐसी
जिनको ना तुम भुला सकोगे
ना हम भुला सकेंगे!
... इन बातों को पीछें छोडे कल का सूरज आए,
नया उजाला लाए!
तेरा मेरा एक ही आँगन
एक ही धरती, एक ही जीवन
बीते कल के काले साये इन पे ना मँडराएँ!
तुझ को प्यारा है तेरा घर
मुझ को प्यारा हे मेरा घर
पर दोनों की नींव एक है, आँच न उस को आए!
दिल, दरवाजे खुले रखेंगे
ख्वाबोंको आज़ाद करेंगे
तेरे घर के हिना की खुशबू मेरा घर महकाए!

भारतीय आणि पाकिस्तानी माणसाच्या भावविश्वातल्या मला सुचणाऱ्या प्रत्येक पैलूवर कविता लिहून झाली. आतापर्यंतचा हा सगळा माझा 'आपुलाची वाद आपणाशी' होता. आता जगाशी संवाद साधायचा होता. त्याची सुरुवात घरापासूनच करावी, म्हटलं. बायकोच्या हातात माझ्या कवितांचं बाड दिलं. तिला माझ्या लेखनाच्या (आणि गायनाच्याही) क्षमतांबद्दल एक पदसिद्ध अविश्वास होताच. त्यामुळे माझ्या डोक्यात हा विषय सुरू झाल्यापासून घरातली परिस्थिती तणावपूर्णच होती. पुढचे दोन दिवस तिने एक पानही उघडून बघितलं नव्हतं. अखेर माझी अस्वस्थता पहावेनाशी झाल्यावर ती वाचती झाली. 'तुझ्या शेवटच्या तीन कविता तशा चांगल्या आहेत. पण पुढे काय?'... या 'पुढे काय'मध्ये बरेच मूलभूत प्रश्न होते. अस्मितांचे प्रश्न मुळात आर्थिक विषमतेतून निर्माण होत असतात, असं तिचं मत आहे. अजमल कसाब गरीब नसता तर काही रुपयांसाठी (किंवा रुपयांशिवाय) दुसऱ्यांच्या आणि स्वतःच्याही जिवावर उदार झाला असता का, हा प्रश्न आहेच. तरीही माझी 'पाकिस्तानची गाणी' आधी बाथरूममध्ये आणि नंतर अपवादात्मक प्रसंगी का होईना, बाथरूमच्या बाहेरही म्हणण्याचा धीर आला. पुढे एका प्रसंगानं माझं म्हणणं तिला कुठेतरी पटलं असावं, याचा मला पुरावाच मिळाला.

... ५ नोव्हेंबर २००५...आम्ही कुटुंबीय आणि आमच्या एका डॉक्टर मित्रांचं कुटुंब सुट्टीत फिरायला पंजाबमध्ये गेलो होतो. ५ नोव्हेंबरला ईद होती. आम्ही बाघा बॉर्डरवरचा सूर्यास्ताच्या वेळचा संचलनाचा कार्यक्रम पाहायला गेलो होतो. कार्यक्रम संपल्यानंतर सगळ्या प्रेक्षकांना सरहद्दीवरच्या कुंपणाच्या अगदी जवळून जाऊन मग पुन्हा बाहेर यायचं असतं. मध्ये फक्त काही फुटांचं अंतर. पलीकडे आमच्याकडे तोंड करून उभे असलेले पाकिस्तानी सैनिक. मी पटकन हात उंचावून 'ईद मुबारक़' म्हटलं...आणि तिनंही माझ्याइतकंच खणखणीत आवाजात 'मुबारक़' म्हटलेलं मी ऐकलं...आम्हा उभयतांचा 'मुबारक़' ऐकून अचंबित झालेला त्या पाकिस्तानी सैनिकाचा

चेहरा आणि प्रत्युत्तरादाखल अर्धवट उचलला गेलेला हात मी आयुष्यात विसरणार नाही... आपल्या जवानानं मात्र दंडुका आपटून 'बडे आये हैं मुबारक बात देने वाले, चलो चलो' म्हणत आम्हाला तिथून बाहेर काढलं...असो.

माझ्या वडिलांना माझ्या या उद्योगाची कुणकुण लागली होती. त्यांनी माझी गाणी वाचली नव्हती. पण माझा मुद्दा त्यांना ठाऊक होता. पण मुस्लिमेतर माणसांच्या धार्मिक श्रद्धांबद्दल कोणीही मुस्लिम माणूस सहिष्णू असू शकतो, हे त्यांना मान्य होणंच शक्य नव्हतं. 'त्यांना सगळं जग मुस्लिम करायचं आहे, ती त्यांची कालबद्ध योजना आहे,' हे ते मला नेहमी सांगत असत. मी मला ठाऊक असलेली, त्यांच्या मुद्याला छेद देणारी, उदाहरणं सांगायला लागलो की ते एकच सांगत, 'कोणताही मुस्लिम हा त्याच्या धर्माचा सैनिक असतो आणि धर्मगुरूंनी फतवा काढला की त्याला ज़िहाद पुकारून जिवावर उदार व्हावंच लागतं.' ही त्यांची ठाम समजूत आहे. (त्यांना यापलिकडे मला काही सांगता येतच नाही) पण त्यांच्याशी झालेल्या या वादातून मला माझा प्रयत्न



अधिक महत्त्वाचा वाटायला लागतो. माणसानं माणसाशी माणसासारखं वागावं हा विचार सर्व धर्माच्या, सर्व राष्ट्रांच्या सर्वसामान्य माणसाला आपलासा वाटायला नको का? अगदी परवेझ मुशर्रफदेखील '९/११ नंतरच्या जगात लोकांनी आपलंसं करावं असं वाटत असेल तर जगभराच्या मुस्लिमांनी सहिष्णु व्हायला हवं,'असं काहीसं आपल्या आत्मचरित्रात म्हणतात.

... हळूहळू पाकिस्तानचा रस्ता शोधायला मी लागलो होतोच. मी कवी नाही किंवा गायकही नाही, हा माझा पवित्रा होता. तरीही मला माझ्या कविता तांत्रिकदृष्ट्या बिनचूक असणं महत्त्वाचं वाटत होतं. संदीप गुप्तेंनी काही दुरूस्त्या सुचवल्या. एकाच विषयावर अशा गज़ला करणं त्यांना कुतूहलजनक वाटलं होतं. संगीता जोशींनी कौतुक केलं. पण या दोघांशीही कवितांमधल्या मुद्द्यांबद्दल गप्पा झाल्या नाहीत.

द्वारकानाथ संझगिरींचा कार्यक्रम बदलापूरला होता. तेव्हा मुद्दाम जाऊन त्यांना भेटलो. पाकिस्तानला जाण्याच्या माझ्या इच्छेबद्दल सांगितलं आणि गाण्यांचं घरीच केलेलं एक रेकॉर्डिंग त्यांना ऐकायला दिलं. केवळ गज़ला सादर करायला पाकिस्तानला जायला व्हिसा मिळणं अशक्य आहे. असं त्यांचं मत होतं. एखाद्या क्रिकेट मॅचच्या निमित्तानं तिकडे जायचं आणि मग तिथल्या रोटरी क्लबमध्ये वगैरे कार्यक्रम करायचा, असं करावं लागेल, हे त्यांनी सुचवलं. (एकट्या-दुकट्या माणसाला पाकिस्तानचा व्हिसा मिळणं शक्य नाही, असं रोटरीच्या पदाधिकाऱ्यांचंही मत होतंच.) आमच्या भेटीनंतर सुमारे आठवड्याभरानंतर त्यांचा फोन आला. ते म्हणाले, 'या आशयाचं एखाद्या सामान्य माणसाला लिहावंसं वाटणं याला सामाजिक महत्त्व आहे.' त्यांनी मला त्यांचं 'फाळणीच्या देशात' हे पुस्तक मिळवून वाचायला सांगितलं. ते मी वाचलं आणि त्यांना फोन केला. माणसामाणसांमध्ये विनाकारण पडलेल्या दऱ्यांनी अस्वस्थ होणारा आपल्यासारखाच माणूस भेटल्याचा आनंद त्यांना झालेला मला जाणवत होता.

डॉ. अभय बंग यांनी लिहिलेल्या एका दिवाळी अंकातला लेख मला असाच फार 'आपलासा' वाटला होता. मी त्यांचा फोन नंबर मिळवून त्यांना फोन केला. ते तिकडच्या डॉक्टर्सना वगैरे भेटले होते. तिथल्या वैद्यकीय परिषदेमध्ये निमंत्रित वक्ते म्हणून बोलले होते. तिकडच्या काही डॉक्टर्सशी माझा त्यांच्यामार्फत संपर्क होऊ शकेल अशी एक शक्यत होती. त्यांनी माझं म्हणणं शांतपणानं ऐकून घेतलं. त्यांना कल्पना आवडली असावी. ते म्ह णाले, 'पण आपली ओळख नाही,' ... मग मी त्यांना आमचा सामाईक मित्र डॉ. आनंद नाडकर्णी याचा संदर्भ दिला. माझ्या कवितांचं बाड पोस्टानं गडचिरोलीला पाठवून दिलं. त्यांच्या सांगण्यावरून माझा ई-मेल अॅड्रेसही मी त्यांना पाठवला.

दोन-चार दिवसांनी मी ई-मेल उघडला. तेव्हा मला आश्चर्याचा धक्का बसला. आनंद नाडकर्णींकडून माझ्या विश्वासार्हतेची खात्री करून घेतल्यावर डॉ. अभय बंग यांनी पाकिस्तानातल्या दोन डॉक्टर्सना माझी भलावण करणारा एक ई-मेल लिहिला होता आणि त्याची एक प्रत मला पाठवली होती. ते दोन डॉक्टर्स होते डॉ. साजिद मक्बूल (तेव्हाचे पाकिस्तान अॅकॅडमी ऑफ पेडिअॅट्रिक्सचे प्रेसिडेंट) आणि डॉ. झुल्फिकारभुत्ता (कराचीच्या आग़ाख़ान युनिव्हर्सिटीतल्या पेडिअॅट्रिक्स विभागाचे हेड ऑफ द डिपार्टमेंट) त्या पत्राचा सारांश असा होता -

'डॉ. योगेन्द्र जावडेकर हे बालरोगतज्ज्ञ असून माझ्या चांगल्या परिचयाचे आहेत. ते मानवतावादी आहेत आणि जागतिक शांततेसाठी कार्य करतात. भारत-पाकिस्तान संबंधांवर त्यांनी लिहिलेल्या गज़ला उत्कृष्ट दर्जाच्या आहेत. त्यांना आपण काही परिषदेच्या निमित्तानं पाकिस्तानात निमंत्रित करणं ही एक चांगली कल्पना ठरेल.'

... हे माझ्या अपेक्षेपलीकडचं होतं. दुसऱ्याच दिवशी पाकिस्तानातल्या त्या दोन्ही डॉक्टर्सची मला मो आली. डॉ. साजिद मक्बूल यांनी फक्त 'अशा प्रकारची देवाणघेवाण वाढायला हवी,' इतकंच लिहिलं होतं. पण डॉ. झुल्फिकार भुत्तांचं पत्र सविस्तर आणि आश्वासक होतं. त्याचा सारांश असा -

'तुम्हाला पाकिस्तानात निमंत्रित करायला आवडेल. मी ऑगस्टमध्ये एक परिषद आयोजित करतो आहे. त्यावेळी काही संगीतप्रेमींना एकत्र करून आपला कार्यक्रम करता येईल. मी माझ्या स्टाफला व्हिसासाठी लागणारी कागदपत्रं तुमच्याकडे पाठवायला सांगतो. तुमचा पत्ता कृपया कळवा. डॉ. अभय आणि डॉ. राणी बंग येणार आहेत का? ते

आले तर फारच बरं होईल.'

मी खरोखरच भारावून गेलो होतो. मी त्यांना माझा पत्ता तर पाठवलाच, पण उत्तरादाखल एक छोटीशी गज़ल लिहून पाठवली. ती अशी–

मेरे दिल की दास्ताँ तुझ को बताऊँगा कभी
हालेदिल तेरा भी क्या है जान पाऊँगा कभी!
मुल्क़–मज़हब की सलाखों से परे दिल की जुबाँ
हमजुबाँ, दिल की जुबाँ तुझ को सुनाऊँगा कभी!
क्या पता, क्यों आजतक़ तुझ से जतायी दुश्मनी?
दोस्त कहकर यार अब तुझको पुकारुँगा कभीं!
जो मुनासिब है करुँगा, मुश्किलें आएँ तो क्या
सरहदों के फासले भी मैं मिटाऊँगा कभी!

शिवाय माझ्या इतर सगळ्या गज़लांचं, गीतांचं एक रोमन लिपीमधलं स्क्रिप्टसुद्धा मी 'अॅटॅच' करून पाठवलं.

खरे धक्के यापुढेच बसायचे होते. नंतर पुन्हा मी माझं ई–मेल आकाऊंट उघडायला गेलो तर ते उघडेचना! काही दिवसांनंतर 'तुमचा मजकूर सुरक्षेच्या कारणासाठी गोपनीय न ठेवला तर चालेल का?' अशा प्रकारच्या प्रश्नाला 'ओ.के.' केल्यावर ते उघडलं खरं. पण डॉ. झुल्फिकार भुत्तांच्या अकाऊंटला माझं 'ई–मेल' जाईना. ते परत यायला लागलं... पुढे ज्या ऑगस्टमध्ये डॉ.भुत्तांची कॉन्फरन्स व्हायची होती, त्याच्या आदल्या जुलैमध्ये मुंबईच्या लोकल्समध्ये बॉम्बस्फोट झाले. त्यानंतर मी त्यांच्याशी संपर्क साधायचा प्रयत्नही सोडून दिला.

... आता पाकिस्तानातली परिस्थिती अशी आहे की तिथे कोणी भारतीय माणसाला व्हिसा देणार नाही. शिवाय कोणी दिला तरी तिकडे जाणं हे संकटाला आमंत्रण देण्यासारखंच वाटेल!

... लोकांना वाटतं की भारत–पाकिस्तान यांच्यात राजकीय मैत्री व्हावी असं माझं स्वप्नं आहे. पण तसं नाही. राजकारणी, अतिरेकी, धर्मपंडित, गुप्तचरखाती, लष्करं, पत्रकार अशा सगळ्यांच्या हितसंबंधांच्या मागे सामान्य माणसानं फरफटत जाता कामा नये; असं मला वाटतं. दोन्हीकडच्या सामान्य माणसांना एकमेकांच्या संस्कृती, भाषा, कला यांबद्दल ओढ आहे, ती वाढावी. सामान्य माणसांनी, मग भारतीय असोत व पाकिस्तानी, एकमेकांशी विश्वासाचं नातं जोपासावं. ही एक लोकचळवळ बनावी आणि त्या रेट्यानं सगळ्या हितसंबंधी माणसांना झुकायला लावावं, प्रतिभा रानडेंच्या एका लेखामध्ये कराचीतल्या एका शाळकरी मुलाचा.... साद महम्मद रफ़ीक़चा शेर त्यांनी लिहिला होता. तो म्हणतो –

दिल है जख्मों से भरा इस इंतशार–ए–क़ौम से
मैं कहाँ जाऊँगा यारब दिल के मरहम के लिए!

माझ्या हृदयाला देशाच्या परिस्थितीमुळे असंख्य जखमा झाल्या आहेत. देवा या जखमांवर इलाज करायला आता मी कुठे जाऊ?

.... व्यथित झालेल्या या मुलाच्या प्रातिनिधिक हाकेला ओ द्यायला नको का? मी एकट्यानं नव्हे, तर आपण सगळ्यांनी मिळून द्यायला पाहिजे.

... आणि हे होईल, हा विश्वास मला दोन प्रसंगांमधून आला. श्रीनगर–मुझफ्फराबाद मार्गावर 'कारवाँ–ए–अमन' या नावानं बस सुरू झाली आणि अतिरेक्यांच्या धमक्यांना न जुमानता लोक बसमधून नियंत्रणरेषेपलीकडे गेले. आणि या बसला निरोप द्यायला आणि तिचं स्वागत करायला हजारोंच्या संख्येने दोन्ही बाजूंची सामान्य माणसं रस्त्याच्या दुतर्फा अतिरेक्यांच्या हल्ल्यांची पर्वा न करता उभी राहिली.

२६ नोव्हेंबरला ताजवरच्या हल्यानंतर उजळलेल्या लक्ष मेणबत्त्यांनीही माझ्या मनात हाच विश्वास जागवला.

पण इतकं पुरेसं नाही. एकीकडे देशविदेशातली माझं म्हणणं मनापासून पटणारी, माझ्यासारखी भावना असणारी माणसं माझ्या संपर्कात आली तर दुसरीकडे अगदी माझ्या घरात, माझ्या वडिलांना माझं म्हणणं मला सांगता आलं नाही. माणसामाणसांतल्या दऱ्या बुजवण्याचं काम इथेही तितकंच गरजेचं आहे... आमच्या रोटरी क्लबमध्ये आम्ही दोघांनी या गज़ला गायल्या तेव्हा तिथे असलेल्या लोकांच्या हृदयापर्यंत आम्ही पोचलो होतो. माणसांच्या मनामधल्या माणसाबद्दलच्या नैसर्गिक आपलेपणाला आवाहन करण्याचं काम ही गाणी नक्की करतील.

---

**– डॉ. योगेन्द्र जावडेकर**
स्टेशन रोड,
बदलापूर (पूर्व) – ४२१५०३




# नेतृत्व आणि विकास

## हेमंत देसाई

जगद्विख्यात राज्यशास्त्रज्ञ सिडनी हूकच्या मते, इतिहासात जर-तरच्या भाषेला अर्थ नसतो. तरीसुद्धा अशी भाषा केली जाते. ती इतिहासापासून सत्ताधारी व विरोधी नेते काही बोध घेतील, या अपेक्षेने. फ्रेंच राज्यक्रांतीपूर्वी तेथे अधिराज्य गाजवणारे राजे नवे काही शिकत नव्हते व जुने काही विसरत नव्हते. आजचे राजकारणी तरी यापेक्षा निराळे आहेत काय? सुवर्णमहोत्सवी वर्षांत पदार्पण केलेल्या महाराष्ट्रातील नेतृत्व तरी सर्व राज्यांमध्ये सर्वोत्तम आहे, असे म्हणण्यासारखी परिस्थिती आहे का? 'स्टेट नंबर वन' असा दिमाख आपण मिरवतो; पण इतर राज्ये पुढे जाऊ लागली आहेत. त्यामुळे इथले नेतृत्वही अव्वल दर्जाचे आहे, असे म्हणता येणे कठीण आहे.

जवळपास निवृत्त झालेले बाळासाहेब ठाकरे आणि निवृत्तीच्या दिशेने वाटचाल करणारे शरद पवार. बाळासाहेबांना मुख्यमंत्रीही व्हायचे नव्हते. त्यांना रिमोट कंट्रोलने राज्य चालवायचे होते व तसे ते त्यांनी चालवले. बाळासाहेबांनी भावनाउद्रेकी राजकारण केले आणि झोपलेल्या मराठी माणसाला जागे केले, पण सत्तेचा व्यवहार, प्रशासन यात त्यांना स्वारस्य नाही वा गम्यही नाही. पवारांना प्रशासनात, व्यवहारात, विकासात आणि तपशिलात रस आहे. परंतु त्यांच्या नेतृत्वशैलीत प्रेरकता, उत्स्फूर्तता, ओजस्वीपणा आणि भावनात्मकता कमी आहे.

राज्यातल्या २००९ च्या विधानसभा निवडणुकांच्या प्रथम चरणात बाळासाहेबांनी घरातल्या घरात मुलाखती देऊन शिवसेनाप्रेमिकांना झुलवण्याची धडपड केली. त्यांनी आपल्या हातातील मराठीच्या चिपळ्यांची प्रशंसा केली आणि इतरांच्या, म्हणजे मनसेच्या चिपळ्यांची रेवडी उडवली. उद्धव ठाकरे शिवसेनेचे अप्रतिम काम करत आहे, इतरांसारखा तो उडाणटप्पू नाही असे उद्गारही त्यांनी काढले. आपला तो बाब्या, दुसऱ्याचं ते कार्ट अशी ही तऱ्हा आहे. एवढे असूनही मराठी माणसाच्या हितासाठी उद्धव व राज ठाकरे एकत्र असल्याचा दावा खासदार मनोहर जोशी करतात! तर मनसेच्या ट्रेनमधून परप्रांतीयांना परत पाठवण्याचा इशारा राज यांनी दिला. उद्धव व राजइतकेच रामदास आठवले व प्रकाश आंबेडकर यांच्यातील भांडणही जोरदार.

काँग्रेस-राष्ट्रवादीच्या छायेतून बाहेर आलेल्या

रामदास आठवलेंनी रिपब्लिकन डावी लोकशाही आघाडी स्थापली. परंतु परदेशी व अभिमत विद्यापीठात आरक्षण, दलित अत्याचार प्रतिबंधक कायद्याची नीट राबवणूक, खैरलांजीतील दलित कार्यकर्त्यांवरील गुन्हे मागे घेणे, बौद्धांच्या जनगणनेचा प्रश्न सोडवणे व भूमिहीनांना स्वाभिमान योजनेंतर्गत जमीन देणे हे मुद्दे रिडालोसच्या जाहीरनाम्यात नव्हतेच! उलट २००९ पर्यंतच्या झोपडपट्ट्यांना संरक्षण देण्याचे कलम मात्र आवर्जून समाविष्ट करण्यात आले.

कोणत्याही पक्ष वा नेत्यापुढे उद्याच्या महाराष्ट्राचे चित्र नाही. पक्षांचा सैद्धांतिक पाया ठिसूळ होऊ लागला आहे आणि कॉम्पिटिटिव्ह पॉलिटिक्सच्या आहारी पक्षीय नेतृत्व जाऊ लागले आहे.

या संदर्भात यशवंतराव चव्हाणांचे एक उदाहरण कथन करण्यासारखे आहे. स्वातंत्र्यचळवळीत तुरुंगात जाऊन आल्यानंतर, म्हणजे १९३३ साली, यशवंतराव फक्त काँग्रेसमन राहिले नव्हते. तर त्यांच्या काँग्रेस- निष्ठेला समाजवादी निष्ठेचीही जोड मिळाली होती. तेव्हाची काँग्रेसनिष्ठा म्हणजे राष्ट्रीय जनआंदोलनात झोकून (१०, जनपथवर जाऊन भजन म्हणणे नव्हे) देणे. स्वातंत्र्यसैनिक म्हणून यशवंतराव काँग्रेसचे व्यासपीठ मूलभूत मानत व समाजवादही स्वीकारत. जेलमधून बाहेर आल्यावर काही महिन्यांनी यशवंत-रावांना असे समजले, की १९३२ सालीच देशातल्या काही प्रमुख नेत्यांनी काँग्रेस समाजवादी पक्ष स्थापण्याचा संकल्प सोडला होता. त्यास जयप्रकाश, नरेंद्र देव यांचे मार्गदर्शन होते. मित्र राघूअण्णा यांनी यशवंतरावांना सांगितले की, या पक्षाशी आपण समरस झालो पाहिजे. तेव्हा 'असले काही विचार माझ्याही मनात आहेत', असे यशवंतराव उत्तरले. त्यावर राघूअण्णांनी विचारले, 'अडचण कोठे आहे?' तेव्हा ते उत्तरले, ''माझी अडचण एवढीच आहे की आपण ज्या कार्यकर्त्यांबरोबर काम करत आहोत, त्यांना ते पटवल्याशिवाय असे पाऊल उचलल्याने आपण एकाकी तर नाही पडणार?''

आपल्या राजकीय जीवनात कोणताही पर्याय स्वीकारायची वेळ आली, तेव्हा या कसोटीवरच पुढील पर्याय स्वीकारायचा की नाही, ते यशवंत रावांनी ठरवले.

यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे भाग्यविधाते होते. कसेल त्याची जमीन हा पुरोगामी कायदा त्यांनी केला. राज्याची पंचवार्षिक योजना तयार केली. कृषिऔद्योगिक विकासाचे धोरण निश्चित केले. सहकारी साखर कारखानदारीवर भर दिला. ठाणे खाडीवरचा पूल बांधला. एमआयडीसीमार्फत औद्योगिकीकरण केले. पक्षसंघटना बांधण्यासाठी काँग्रेसची प्रशिक्षणशिबिरे घेतली. साहित्य-संस्कृती मंडळ, विश्वकोष मंडळ अशा संघटना उभारल्या, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा, विदर्भात भावनात्मक ऐक्य कायम राहील हे त्यांनी पाहिले. ग्रामीण भागाला, गोरगरीब शेतकऱ्यांना बरोबर घेऊन विधायक-विकासवादी नेतृत्वाचा आदर्श त्यांनी निर्माण केला.

राघूअण्णांच्या प्रेमाखातर यशवंतरावांनी काँग्रेस समाजवादी पक्षाचे सदस्यत्व घेतले, पण ही गोष्ट मानवेंद्रनाथ रॉय यांच्या प्रभावाखाली काम करणाऱ्या आपल्या ह. रा. महाजनी प्रभृती सुहृदांना व मुख्यतः जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना रुचली नाही हे ध्यानी घेऊन यशवंतरावांनी लगेच या पक्षाचा त्याग केला. समाजवादाचा पाठपुरावा करण्याचीच त्यांची भूमिका होती; पण त्याकरता काँग्रेसअंतर्गत एखादा पक्ष काढावा हे त्यांना व त्यांच्या कार्यकर्त्यांना पटले नाही. यशवंतराव कार्यकर्ते व सुहृदांचे मत नेहमी विचारात घेत असत.

महाराष्ट्रात अगदी प्रारंभी सत्तेवर असताना व नसतानाही त्यांनी कार्यकर्त्यांच्या बांधणीच्या कामाचा ध्यास ठेवला. महाराष्ट्रासंबंधी लोक विचारत, तेव्हा यशवंतराव त्यांना सांगायचे की, महाराष्ट्र काँग्रेसची शक्ती ही तेथील असंख्य कार्यकर्त्यांची शक्ती आहे. हे कार्यकर्ते चळवळीत वाढले आहेत. शेकडो गावांतून ते विखुरले आहेत. काँग्रेसबरोबर ते सातत्याने उभे राहिले आहेत. महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाने सरकारतर्फे व पक्षामार्फत विविध क्षेत्रांत पुढाकार घेऊन नागरी व ग्रामीण जीवनात नवी आशा निर्माण केली आहे. समाजातल्या विविध जाती-जमातींचे, वर्गांचे, धर्मांचे

लोक त्यात आहेत, शेतकरी आहेत. कामगार आहेत, मध्यमवर्गीय आहेत, खेड्यांतील लोक आहेत आणि शहरांतीलही आहेत. सदासर्वकाळ जागरूक न राहिल्याने कामात काही त्रुटी राहिल्या असतीलही, पण या सर्वांतून निर्माण झालेली शक्ती ही महाराष्ट्र काँग्रेसमध्ये संमीलित झाली आहे. ही शक्ती आणखी वाढवावी लागणार आहे, असा यशवंतरावांचा दृष्टिकोन होता. लोकांची गाऱ्हाणी वाढत आहेत. गरीब, हरिजन, शेतकरी, कामगार, मजूर अस्वस्थ आहेत. या सर्वांना दिलासा देण्याचे आणि त्यांची गाऱ्हाणी ही आपली गाऱ्हाणी समजून उभे राहायचे काम करावे लागणार आहे, असे यशवंतराव म्हणत असत.

लोकांच्या दैनंदिन गाऱ्हाण्यांनुसार कामगारांत, शेतकऱ्यांत आदिवासींत प्रत्यक्ष जाऊन कार्यकर्त्यांना काम करावे लागेल. त्यासाठी कामाची शिस्त संभाळून कार्यक्रमांची मांडणी केली पाहिजे. अशिक्षितां-प्रमाणेच सुशिक्षितांच्या रोजगाराचाही प्रश्न तितकाच तीव्र असल्याने त्यासाठी वेगवेगळे काम सातत्याने करावे लागेल. जसा काळ जाईल, तसे हे प्रश्न अधिक सूक्ष्म बनतील. त्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांनी आपल्या वागण्यात आणि बोलण्यात टोकदारपणा आणण्याची गरज आहे. कार्यकर्त्याने पक्षासाठी दिलेल्या निष्ठा या विचाराधिष्ठित असतील, तर त्या विचलित होऊ द्यायच्या नसतात, अशी यशवंतरावांची भूमिका होती.

यशवंतराव हे महाराष्ट्रातील सर्वात मोठे आणि आदर्श असे नेते होते. काँग्रेस पक्षाला बहुजन समाजाचा पक्ष म्हणून संबोधतात. इथे बहुजन हा शब्द 'मागास'या अर्थाने वापरला जातो. बहुसंख्य समाज म्हणजे 'अमुक एका जातीचा समाज' असा अर्थ नव्हे. महाराष्ट्रा-सारख्या प्रांतात मात्र बहुजनसमाज या शब्दाला विशिष्ट, मर्यादित अर्थ प्राप्त करून दिला आहे, काही विचारवंतांना या शब्दातून असा सीमित अर्थ काढण्याची खोड जडली आहे, अशी सार्थ टीका यशवंतरावांनी केली होती.

इथे एक नेता म्हणून यशवंतराव कसा विचार करत होते ते पाहण्यासारखे आहे. त्यांच्या मते, एखाद्या पक्षाला बहुजन समाजाचा पक्ष म्हणत राहायचे असेल, तर त्या पक्षाला राष्ट्रीय आंदोलनाचे स्वरूप द्यावे लागेल. काँग्रेसने बहुजनांचे दारिद्र्याचे, सामाजिक व सांस्कृतिक प्रश्न हाताळले आहेत. दलित समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे कार्यक्रम या पक्षाने राबवले. खुद्द यशवंतरावांनी महाराष्ट्रातील राजकारण जातीयवादापासून अलिप्त राहावे यासाठी मनापासून कष्ट घेतले. ते स्वतः कधी जातीयवादी भावनेला बळी पडले नाहीत. समाजात एकजिनसीपणा आणण्याचे ध्येयच त्यांनी उराशी बाळगले. म्हणूनच त्यांच्या काळात महाराष्ट्रातील सार्वजनिक जीवन ब्राह्मण-ब्राह्मणेतरवादापासून जवळपास मुक्त झाले. राजकारण करण्यासाठी जातीयवाद राबवावा, असे त्यांना कधी वाटले नाही. संघ-जनसंघावर टीका करताना त्यांच्या डोळ्यांसमोर विशिष्ट वर्ग होता, असे बिलकुल नाही.

यशवंतरावांनी गरीब स्थितीत असताना शिक्षण घेतले. कॉलेजात असताना जातिविशिष्ट होस्टेलमध्ये राहायचे त्यांनी नाकारले. शेवटी, जिथे कुठे खोली मिळाली, तेथील जोडीदार त्यांचा ब्राह्मण मित्रच होता. गरीब घरातील शेतकऱ्यांशी, हरिजनवर्गातील मंडळींशी; तसेच मुसलमान, लिंगायत, ब्राह्मणांशी त्यांचे संबंध जिव्हाळ्याचे होते. महाराष्ट्रात कोणी जातीयवाद फैलावण्याचा प्रयत्न केला तर जीव पणाला लावून मी जातीयवादाविरूद्ध उभा राहीन, असा निर्धार यशवंतरावांनी व्यक्त केला होता. आज राज्यात खेडेकर-मेटेंसारख्या जातवादी नेत्यांचे नगदी पीक आले आहे. गावोगावी मराठा वा अन्य 'वादी' राजकारण केले जात आहे.

यशवंतराव एकदा स्पष्टपणे म्हणाले होते की, राष्ट्रीय स्वयंसेवकसंघ ही ब्राह्मणांची संघटना असल्याची टीका केली जाते. याउलट जनसंघ-राष्ट्रीय स्वयंसेवकसंघाचे महाराष्ट्रातले व बाहेरचेही स्वरूप मी पाहिले आहे. त्यामुळे या संघटनेत एकाच जातीचे लोक आहेत असे मी म्हणू शकत नाही, असे म्हणण्याचे औदार्यही यशवंतरावांकडे होते. टीका करायची ती विचारसरणीवर, सामाजिक-सांस्कृतिक अलिप्तपणाच्या संघ-शैलीवर, जातीवर नव्हे, हा दृष्टिकोन त्यांच्याकडे होता.

आणीबाणीनंतरचा काळ देशातील व महाराष्ट्रातील काँग्रेसच्या दृष्टीने खडतर होता. पक्षावर जबरदस्त टीका सुरू होती. अशावेळी या टीकेचे परिमार्जन करून लोकांना वस्तुस्थिती पटवण्यासाठी पाच-दहा माणसांच्या संख्येपासून हजारोंच्या संख्येपर्यंत पोचून कार्यकर्त्यांनी नवे युवामंडळ बनण्याचे

काम करावे; खेड्यापासून शहरापर्यंत हे काम करावे; महाराष्ट्र म्हणजे काँग्रेस कार्यकर्त्यांचे मोहोळ आहे, असे महात्मा गांधी म्हणत असत. गांधींजींनी महाराष्ट्राला जो काँग्रेसचा मंत्र दिला, त्याच्या परीक्षेची ही वेळ आहे, या मुद्यावर यशवंतरावांनी भर दिला होता. महाराष्ट्रातील पक्षातील व बाहेरच्या तरुणांना चालना देण्याचे काम त्यांनी केले. ३७ वर्षांपूर्वी राजकारण म्हाताऱ्यांच्या वर्चस्वाखाली होते. (काही प्रमाणात आजही आहे.) अशा काळात यशवंतरावांनी ही भूमिका घेतली हे विशेष.

मोरारजी देसाई मुंबईच्या द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री असताना यशवंतराव चव्हाण प्रथम नागरी पुरवठा खात्याचे मंत्री झाले. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ झाली, तेव्हा नेहरूंच्या धोरणामुळे यशवंतरावांनाही तीव्र टीकेला तोंड द्यावे लागले. ते प्रथम द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाले व नंतर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले.

यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे भाग्यविधाते होते. कसेल त्याची जमीन हा पुरोगामी कायदा त्यांनी केला. राज्याची पंचवार्षिक योजना तयार केली. कृषिऔद्योगिक विकासाचे धोरण निश्चित केले. सहकारी साखर कारखानदारीवर भर दिला. ठाणे खाडीवरचा पूल बांधला. एमआयडीसीमार्फत औद्योगिकीकरण केले. पक्षसंघटना बांधण्यासाठी काँग्रेसची प्रशिक्षणशिबिरे घेतली. साहित्य-संस्कृती मंडळ, विश्वकोष मंडळ अशा संघटना उभारल्या, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा, विदर्भात भावनात्मक ऐक्य कायम राहील हे त्यांनी पाहिले. ग्रामीण भागाला, गोरगरीब शेतकऱ्यांना बरोबर घेऊन विधायक-विकासवादी नेतृत्वाचा आदर्श त्यांनी निर्माण केला. त्यांच्या कारकिर्दीत राज्यात राजकीय संघर्ष कमी निर्माण झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात आचार्य अत्र्यांनी 'मराठा'मधून यशवंतरावांना सदैव धारेवर धरले होते. परंतु यशवंतराव जेव्हा संरक्षणमंत्री म्हणून हिमालयाच्या मदतीस धावून गेले, तेव्हा त्यांनीही 'माझे परमप्रिय मित्र' म्हणून त्यांचा गौरव केला. विरोधी पक्षनेते कृष्णराव धुळुप यांनीही विधानसभेत चव्हाणांच्या अभिनंदनाचा ठराव मांडताना, त्यांनी राज्याचे हित निष्ठेने सांभाळले व जनतेचे प्रेम पूर्णत्वाने जिंकले असे गौरवोद्‌गार काढले.

यशवंतरावांनादेखील मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र हवा होता. त्यांचा कल चर्चा करून प्रश्न सोडवता आला व नेहरूंकडे आपली बाजू मांडून यश मिळाले तर बरे, असा होता. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन पेटले. इतके की राज्याची स्थिती प्रक्षोभक बनली. या परिस्थितीत इंदिरा गांधींनी यशवंतरावांसह राज्याचा दौरा केला. काँग्रेसचे सरकार या स्थितीत टिकू शकणार नाही या मतापर्यंत इंदिराजी आल्या. यशवंतरावांनी सारी परिस्थिती त्यांना समजावून सांगितली. मग इंदिराजींनी पुढाकार घेऊन पंडित नेहरूंना मुंबई राज्याच्या विभाजनासाठी राजी केले. यशवंतराव या कठीण काळात मुंबईचे राज्य समर्थपणे सांभाळत होते. म्हणूनच या नेत्यास 'मॅन ऑफ क्रायसिस' असे संबोधले जात होते.

काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतरच्या काळात यशवंतराव व वसंतदादा पाटील यांचे बिनसले होते. पण यशवंतरावांनी २६ मे १९८१ला स्वर्णसिंग काँग्रेसचा त्याग केल्यानंतर पुढच्या वर्षी वसंतदादांनी अंकलखोपला यशवंतरावांचा जाहीर वाढदिवस साजरा केला. त्यावेळी वसंतदादा म्हणाले, 'आम्ही दोघे एकत्र येणार याची चर्चा दिल्लीत आहे. सर्वत्र उत्सुकता आहे. आम्ही दोघे एकत्र येणार म्हणजे काय करणार? हे काय मराठ्यांचे एकत्रीकरण आहे काय? पूर्वी आम्ही भांडून महाराष्ट्राचे नुकसान केले. या पुढे भांडणार नाही. जातीपुरते बघून चालणार नाही, देशाचे समाजाचे बघितले पाहिजे', असे सांगितले.

या समारंभात यशवंतराव म्हणाले, 'दादा आणि मी स्वातंत्र्य लढ्यातील शिपाई होतो. आता आम्ही विकासकार्यातील शिपाई आहोत. सर्व धर्म, जाति-जमाती यांना एकत्र घेऊन जाणारा पक्ष हा काँग्रेसच आहे.'

आज उद्धव व राज, नारायण राणे व उद्धव परस्परांबद्दल ज्या भाषेत बोलतात ते बघितले की यशवंतराव, वसंतदादा अशांची आठवण येते.

यशवंतरावांनंतर मारोतराव कन्नमवार वर्षभर मुख्यमंत्री होते. या पदावर असतानाच त्यांचे निधन झाले. गोरगरीब विद्यार्थी, मुलींसाठी त्यांनी होस्टेल्स उभारली. अत्यंत सच्चा व दयावान असा मुख्यमंत्री. वाढदिवसाची थैली संरक्षण निधीत जमा करणारा

सरळ माणूस. आचार्य अत्रेंनी त्यांना 'कंडमवार'म्हटले असले, तरी या टीकेला तसा अर्थ नव्हता, पण मुख्यमंत्री म्हणून त्यांचा प्रभाव असा नव्हता.

राज्याच्या वर्तमान नेतृत्वाची चर्चा करताना जरा मागे वळून बघितले पाहिजे म्हणून मोजक्या मुख्यमंत्रांचा विचार करतो. यातले प्रमुख म्हणजे वसंतराव नाईक. १९५७ नंतर द्विभाषिक महाराष्ट्रात कृषिमंत्री म्हणून त्यांनी काम केले होते. यशवंतराव व कन्नमवारांच्या मंत्रिमंडळात त्यांनी महसूल खातेही सांभाळले. बंजारा या मागास समाजातील, खेड्यातील माणूस राज्याचा मुख्यमंत्री होतो यास सामाजिक अर्थ होता. वसंतराव सलग १२ वर्षे मुख्यमंत्री राहिले. राज्यात तेव्हा राजकीय स्थैर्य होते. कमाल जमीन धारणा कायद्याची राबवणूक, रोहयो या क्रांतिकारक योजनेची अंमलबजावणी, राज्यात दुग्धक्रांती, धवल क्रांती आणणे, भात, ज्वारी, कापसाची एकाधिकार खरेदी, राज्याला अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण करणे ही वसंतरावांचीच कामगिरी. महाराष्ट्र राज्य लॉटरी त्यांनीच सुरू केली. परंतु बॅकबे रिक्लेमेशन व्यवहारामुळे वसंतरावांची कारकीर्द वादग्रस्त बनली. मुंबईत काळा पैसा वाढला व राजनीतीत धनिकांचा पगडा निर्माण झाला तो याच काळात.

वसंतरावांचे इंदिरा गांधींशी उत्तम संबंध असल्याने ते दीर्घकाळ सत्तेत राहू शकले. ते सुसंस्कृत व नेमस्त स्वभावाचे होते. परंतु त्यांच्या नेतृत्वात करिश्मा होता, असे म्हणता येणार नाही.

शंकरराव चव्हाणही द्विभाषिक मुंबई राज्याचे महसूल उपमंत्री होते. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर ते पाटबंधारे व वीजमंत्री झाले. त्यांनी सांभाळले नाही असे जवळपास एकही खाते नाही. शंकरराव प्रथम २१ फेब्रुवारी १९७५ साली मुख्यमंत्री बनले. आणीबाणीपर्वात त्यांचीच सत्ता होती. ज्या कठोर शिस्तीसाठी आणीबाणी लादली गेली, त्या शिस्तीचे शंकरराव भोक्ते होते. कधी कधी सकाळी मंत्रालयाच्या प्रवेशद्वारापाशी उभे राहून ते उशीरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांची कानउघडणी करत असत. मंत्रालयात व प्रशासनात त्यांनी शिस्त आणली. कायदा व नियमानुसारच त्यांचे प्रशासन चाले.

आदिवासींच्या जमिनीचे पट्टे सावकारी पाशातून मुक्त करणे, गोरगरीबांसाठी घरबांधणी, मुंबईतील भिकारी हटाव मोहीम, कुटुंब नियोजन कार्यक्रमावर भर ही कामे त्यांच्या नावावर आहेत. शंकररावांना हेडमास्तर म्हणत. परंतु पक्षाचे नेते व मुख्यमंत्री म्हणून ते मुळीच लोकप्रिय नव्हते. आठमाही पाणी-वाटपाचा मुद्दा लावून धरून त्यांनी शुगर लॉबीलाही डिवचले होते.

वसंतदादा पाटील हे तरुण वयात सत्यशोधक चळवळीत पडले होते. १९३० पासून त्यांनी काँग्रेसचे काम तालुका पातळीपासून करण्यास सुरुवात केली. राजारामबापू पाटलांच्या प्रांतिक असेंब्लीच्या निवडणुकीसाठी दादांनी सायकलवरून प्रचार केला होता. वसंतदादा हे खऱ्या अर्थाने नेते होते. ते इथल्या भूमीत पूर्णत: रुजलेले होते. त्यांची तुलना लालूप्रसाद यादव यांच्याशी करता येईल. लालू दादांपेक्षा लोकप्रिय. पण दादा ग्रामीण भागात वाढले, तर लालू शहरात. दादा अशिक्षित तर लालू सुशिक्षित. दोघांकडे उपजत शहाणपण. पण दादांना शेतीचे, सहकाराचे प्रश्न अधिक समजत. त्यांच्याकडे विधायक वृत्ती होती, तर लालूंकडे राजकीय मार्केटिंगचा, जनतेला एंटरटेन करण्याचा गुण.

स्वातंत्र्यचळवळीत सहभागी झालेल्या अनेकांपाशी रचनात्मक, विधायक काम करण्याचे कौशल्य नव्हते. दादांनी स्वातंत्र्यासाठी गोळीदेखील खाल्ली, पण स्वतंत्र भारतात त्यांनी सहकारी साखर कारखाना उभारला. औद्योगिक वसाहत स्थापली, सहकारी उपसासिंचन योजनांना मूर्त स्वरूप दिले. साखर राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना त्यांनी पूरक उद्योगाची जोड दिली. कारखानदारीची भरभराट झाली ती त्यांच्याच कामामुळे व उत्तेजनामुळे.

वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची मुदत सहा अथवा दहा वर्षे असावी असा कायदा करण्यात येणार होता. त्यामुळे सहकारी साखर कारखानदारी कोलमडून पडेल, असे दादांचे मत होते. त्यामुळे त्यांनी त्यास कडाडून विरोध केला.

आजकाल राजकारणात प्रवेश केल्यावर लगेच बहुतेकांना मंत्री बनायचे असते. पण दादा आमदार झाल्यानंतर अनेक वर्षांनी मंत्री बनले. पण त्यांनी मनापासून प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस उपाध्यक्ष व अध्यक्ष म्हणून काम केले.



आमच्या सर्व सभासदांना व हितचिंतकांना
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
दिवाळीचा दुहेरी आनंद लुटूया !
वाहन कर्ज
व्याजाचा दर
१०.५%
३६ महिन्यांकरीता
(३१ ऑक्टोबर २००९ पर्यंत)
११%
६० महिन्यांकरीता
(३१ ऑक्टोबर २००९ पर्यंत)
व्यवसाय कर्ज
व्याजाचा दर
१२ ते १५%
आमच्या विविध सेवा
• कोअर बँकिंग (एनी ब्रँच बँकिंग) ए.टी.एम. • आर.टी.जी.एस. फ्रँकिंग सुविधा
• फॉरिन एक्स्चेंज रेमिटंस
ठाणे भारत सहकारी बँक लि. शेड्यूल्ड बँक
केंद्रीय कार्यालय : सहयोग मंदिर, सहयोग मंदिर पथ, घंटाळी, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५३३४९२१ / २५४०८०७६, फॅक्स नं. : २५३३३६४५
शाखा : मुख्य, ठाणे पूर्व, पोखरण, चंदनवाडी, चेंदणीकोळीवाडा, श्रीनगर, कल्याण, शिवाईनगर, मुलुंड, घाटकोपर, ऋतू पार्क, घाटकोपर शाखा विस्तारीत कक्ष, चेंदणीकोळीवाडा शाखा विस्तारीत कक्ष (ऐरोली), घोडबंदर रोड

ते संघटनाकुशल लोकनेते होते. टेलिव्हिजनवरून मुलाखती देऊन निर्माण केले गेलेले नेते नव्हते. १९७२ मध्ये झालेल्या निवडणुकीनंतर लवकरच दुसरा कोणीतरी मुख्यमंत्री होईल हे ठरले असूनही वसंतराव नाईक पद सोडेनात, तेव्हा त्यांच्यात व दादांमध्ये चकमक झडली होती. नंतर शंकरराव मुख्यमंत्री झाल्यावर दादा त्यांच्या मंत्रिमंडळात गेले. परंतु पुढे त्यांनी दादांची मंत्रिपदावरून हकालपट्टी केली. 'असे करणे तुम्हाला भारी पडेल' असा इशारा वसंतदादांनी त्यांना दिला होता. आणीबाणीनंतर इंदिरा गांधींच्या मागे जनता पक्षाचे क्षुक्लकाष्ठ लागले व त्यामुळे शंकरराव एकटे पडले. नंतर वसंतदादाच त्यांच्या नाकावर टिच्चून मुख्यमंत्री झाले.

इंदिरा गांधींच्या समर्थनामुळेच वसंतदादा मुख्यमंत्री बनले, पण त्यांना तिरपुडेंना उपमुख्यमंत्री करावे लागले. तिरपुडेंच्या चालीमुळे दादांची कोंडी झाली. नंतर शरद पवारांनी दादांच्या पाठीत राजकीय खंजीर खुपसला. पुढे १९८० च्या निवडणुकांत इंदिरा काँग्रेसचे पुनरागमन झाले. तेव्हा वसंतदादांचा विरोध बाजूला ठेवत इंदिरा गांधींनी अ.र. अंतुले यांना मुख्यमंत्री केले.

इंदिरा गांधी यांनी पद्धतशीरपणे प्रदेश काँग्रेसमध्ये गटबाजी वाढवली. प्रादेशिक नेतृत्वाचे खच्चीकरण केले. त्यामुळे दादांनीही मुंबई स्वतंत्र करण्याचा डाव असल्याचा बागुलबुवा दाखवून मुंबई महापालिकेतील सत्ता शिवसेनेच्या स्वाधीन केली. आंध्रमध्ये राजीव गांधींनी विमानतळावर मुख्यमंत्री टी. अंजप्पा यांचा अपमान केल्यानंतर तेथे तेलुगु देसमचे आव्हान निर्माण झाले. इंदिरा गांधी व राजीव गांधींनी दादांचा अपमानच केला होता. यशवंतरावांना पक्षाबाहेर केले, तेव्हा संघटनात्मक बळ मुळातच त्यांच्याकडे नसल्याने ते अलग पडले. उलट, दादांच्या मागे पक्षाची व सहकाराची ताकद होती. संघटनेतून खालच्या पातळीवरून मुख्यमंत्रीपदापर्यंत प्रगती करणाऱ्या दादांनी सत्तेच्या आधाराने संस्था वाढवल्या. परंतु त्यानी सतत पश्चिम महाराष्ट्राची, सहकारी लॉबीची, ऊसकरी शेतकऱ्यांची चिंता वाहिली. विना अनुदान इंजिनीयरिंग कॉलेजांना मान्यता देण्याचे धोरण आखून महाराष्ट्रात नवे शिक्षणसम्राट तयार केले. पाणीसम्राट, साखरसम्राट व शिक्षणसम्राटांनी राज्यातील जनतेचे शोषण केले. शिवाय, दादांसारख्यांच्या काळात विदर्भ-मराठवाड्याचा अनुशेष वाढत गेला.

> चारदा मुख्यमंत्री व केंद्रात अनेकदा मंत्री बनूनही पवार पश्चिम महाराष्ट्राचेच नेते राहिले. पवार व त्यांच्या साजिंद्यांनी सहकारी साखर कारखाने, बँका व सूतगिरण्यांसाठी करोडो रुपये ओतले. समाजातील इतर वर्ग व घटकांचा या मंडळींनी कधीही विचार केला नाही. गिरणी कामगार, लघुउद्योजक, असंघटित कामगार, शेतमजूर यांच्या प्रश्नांनाही हात घालावा, असे त्यांना क्वचितच वाटले.

१९८३ मध्ये वसंतदादा सरकारने डी.वाय. पाटील यांना एका दिवसात छत्तीस संस्था काढण्याचे आदेश दिले होते! पुढे ते राज्यपाल झाले व ते पदही सोडल्यावर शेतकऱ्यांची स्वतंत्र संघटना उभारण्याचा त्यांचा विचार होता! चौधरी चरणसिंग यांनी ज्याप्रमाणे मध्यम-श्रीमंत शेतकऱ्यांचे (कुलक्स) राजकारण केले, तसेच दादांनीही केले. फक्त चौधरीजींचे राजकारण नकारात्मक होते, तर दादांचे सकारात्मक.

अंतुलेंनी कुलाबा जिल्ह्यात शेकापचे प्राबल्य असूनही तेथे काँग्रेस वाढवली. युवक काँग्रेसचे ते अध्यक्ष झाले व नंतर प्रदेश व मग अ.भा.काँग्रेसचे सरचिटणीस. परंतु १९८० मध्ये अंतुले राज्याचे पहिले मुस्लिम मुख्यमंत्री झाले ते विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहाचे नेते नसताना. अंतुले धडक कृती दलवाले होते. ते तडकाफडकी निर्णय घेण्याबद्दल प्रसिद्ध होते. त्यांनी राज्यातील आठ लाख शेतकऱ्यांची कर्जे माफ केली, संजय गांधी निराधार योजना राबवली, कुलाब्याचे 'रायगड' केले. तालुक्या-तालुक्यात हुतात्मा स्मारके उभारली. या महानगरातील परप्रांतियांचा ओघ थांबवण्याची योजनाही त्यांनी आखली होती. अंतुले मुख्यमंत्री म्हणून लोकप्रिय असले, तरी ते सवंग लोकप्रियतेच्या आहारी जाणारे होते. त्यातूनच सिमेंट प्रकरणात त्यांचे मुख्यमंत्रीपद गेले. त्यानंतर त्यांची अधोगतीच होत गेली. विकासाला पूरक धोरणे न राबवता, झटपट प्रसिद्धी मिळवून देणाऱ्या (उदाहरणार्थ, भवानी तलवार आणेन) कामांवर अंतुलेंचा भर होता.

शरद पवार चारदा मुख्यमंत्री झाले. पंतप्रधानकीसाठी त्यांनी दोनदा असफल प्रयत्न केले. ते यशवंतरावांचे मानसपुत्र असले, तरी त्यांच्याबद्दल ते मोठे समाधानी होते काय, हे सांगता येणार नाही. यशवंतरावांमुळे पवार गोवर्धन पारिख, ह.रा. महाजनी, शंतनुराव किर्लोस्कर, तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी, गोविंद तळवळकर, पु.ल. देशपांडे या सांस्कृतिक-सामाजिक-कॉर्पोरेट वर्तुळात वावरू लागले. महाराष्ट्रात सर्वांत तरुण वयात मुख्यमंत्री बनण्याचा मान त्यांना मिळाला. पक्षाचा छोट्यातला छोटा कार्यकर्ता त्यांना माहीत असतो. तंत्रज्ञान, उद्योगधंदे, शेती, बायोटेक्नॉलॉजी, आयटी अशा विषयांत त्यांना मनापासून रस आहे.

पवारांनी फलोद्यान विकास योजना राबवली. वाईन उद्योगाला प्रोत्साहन दिले. शेतकऱ्यांनी जोडधंदे हाती घ्यावेत म्हणजे दुष्काळातही तग धरून राहता येते, हा मुद्दा शेतकऱ्यांच्या मनावर बिंबवला. लातूरच्या भूकंप पुनर्वसनात पवारांचे व्यवस्थापन कौशल्य दिसले. त्यांनी परदेशस्थ भारतीयांकडून गुंतवणूक खेचून आणली. मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर केले. बॉम्बस्फोटानंतर त्यांनी मुंबई त्वरेने स्थिरस्थावर केली. अन्नप्रक्रिया उद्योगधंद्याचा विकास करत, महिलांकरता स्वतंत्र धोरण आखले. कबड्डी, कुस्तीला उत्तेजन दिले.

महाराष्ट्राच्या समस्यांचे व्यापक आकलन शरद पवार यांना जितके आहे, तितके ते कोणालाही नाही. पवारांकडे दुसरा गुण आहे तो म्हणजे जोखीम घेण्याचा. हा गुण यशवंतरावांकडे बिलकुल नव्हता. काँग्रेस सोडून स्वत:चा पक्ष स्थापण्याचा, बेस तयार करण्याचा प्रयत्न पवारांनी केला.

एकेकाळी शरद पवार काँग्रेस (एस) मध्ये होते. त्या पक्षाचे ते विधिमंडळातील नेते होते. विरोधी पक्षात राहूनही त्यांनी जिद्दीने किल्ला लढवला. सत्तेविना राहण्याची काँग्रेसवाल्यांना सवय नसते. पवार तसे राहिले. त्याकाळी इंदिरा गांधी, राजीव गांधी व त्यांच्या भालदार-चोपदारांशी दोन हात करणे सोपे नव्हते. नंतर राजीव गांधींच्या साक्षीनेच पवार काँग्रेसमध्ये परतले. त्यानंतर पुढे त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली आणि तरुण व कसदार नेते तयार केले.

व्यक्तिश: पवार जातवादी नसले, तरी राष्ट्रवादी काँग्रेस हा मराठाबहुल पक्षच आहे. काँग्रेस (एस)चा पाठीराखा वर्ग तोच होता. विश्वसनीयतेचा अभाव, मध्यमवर्गीयांमध्ये पूर्वीइतके अपील नाही आणि गुन्हेगारीला त्यांनी दिलेला आश्रय यामुळे शरद पवारांची प्रतिमा बदलली. एकेकाळी लेखक-कलावंतात रमणारा हा माणूस पप्पू कलानी आणि हितेंद्र ठाकूरला थारा देऊ लागला. पर्यावरणवाद्यांना 'मलबार हिलवरच्या पंचतारांकित' व्यक्ती संबोधणे, स्थानिक विरोध डावलून 'देवू' सारखे प्रकल्प रेटणे, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे श्रेय काँग्रेसवाल्यांना मिळू नये, यासाठी धडपडणे, शिवसेना-भाजपाशी सोयीस्करपणे चुंबाचुंबी करणे, सत्तेत नसताना डब्ल्यूटीओला विरोध व सत्तेत आल्यावर पाठिंबा देणे या खेळ्यांमुळे पवारांची विश्वासार्हता व प्रतिमा धुळीला मिळालेली आहे.

चारदा मुख्यमंत्री व केंद्रात अनेकदा मंत्री बनूनही पवार पश्चिम महाराष्ट्राचेच नेते राहिले. पवार व त्यांच्या साजिंद्यांनी सहकारी साखर कारखाने, बँका व सूतगिरण्यांसाठी करोडो रुपये ओतले. समाजातील इतर वर्ग व घटकांचा या मंडळींनी कधीही विचार केला नाही. गिरणी कामगार, लघुउद्योजक, असंघटित कामगार, शेतमजूर यांच्या प्रश्नांनाही हात घालावा, असे त्यांना क्वचितच वाटले.

सुधाकर नाईकांनी जलसंधारणासाठी स्वतंत्र खाते निर्माण केले. मनोहर जोशींनी महाराष्ट्रातील शिवसेना-भाजपाच्या पहिल्या सरकारचे नेतृत्व केले. पुणे-मुंबई द्रुतगती मार्ग, कृष्णा खोरे विकास मंडळ, उड्डाणपूल, मातोश्री वृद्धाश्रम अशी कामे हाती घेतानाच, त्यांनी राज्याची तिजोरीही रिकामी केली. शिवसेनाप्रमुखांच्या रिमोट कंट्रोलवर चालणारा हा मुख्यमंत्री म्हणजे लोकशाहीची एकप्रकारे चेष्टाच होती.

विलासराव देशमुखांनी दोनदा मुख्यमंत्रीपद भूषवले. मराठी शाळांमध्ये पहिलीपासून इंग्रजी सुरू करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. ग्रामस्वच्छता अभियान सुरू केले. गृहनिर्माण धोरण आणले. मात्र दीर्घकाळ मुख्यमंत्रीपद भूषवूनही विलासरावांनी जमीनदाराच्या चैनी पोराप्रमाणे राज्य केले. ते लातूरमधले असले, तरी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाशी त्यांचे नाते उरलेले नाही. ते मुंबईच्या फिल्मी व पेज

थ्री सर्कीटचाच अविभाज्य भाग होऊन राहिले आहेत. मुंबईमधून गिरणी कामगार, मराठी माणूस उखडला जात असताना विलासरावांना त्याची पर्वा नव्हती. सुशीलकुमार शिंदे हा राज्याचा पहिला दलित मुख्यमंत्री. सामाजिक न्यायप्रधान अर्थसंकल्प मांडण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले. मागासवर्गीय मुलींसाठी त्यांनी कन्यादान योजना आणली. सरकारमधील राखीव जागा भरण्याचे काम सुरू केले. परंतु लोकसभा निवडणूक लढवताना त्यांनी राखीव नव्हे, तर खुला मतदारसंघ निवडला. काँग्रेसी परंपरेतील नेते असल्याने दिल्लीश्वरांच्या छत्रछायेतच ते वाढले. तीन-चार दशके सत्तेत राहूनही शिंदे लोकनेता होऊ शकलेले नाहीत.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून, म्हणजे १९३०-३२ पासून महाराष्ट्रातील राजकारण काँग्रेसच्या प्रभुत्वा-खालीच आहे. ३१-३२% मराठी/कुणबी वर्गांच्या समर्थनावर ही सत्ता राबवण्यात आली. राज्याचे सांस्कृतिक नेतृत्व ब्राह्मणांकडे, तर राजकीय नेतृत्व मराठ्यांकडे होते. स्वतंत्र भारतात काँग्रेसने ब्राह्मण-ब्राह्मणेतर असा संघर्ष टाळला. पंचायत राज व सहकारी संस्थांच्या संस्थापक आधाराने काँग्रेसने आपले जाळे विणले. बहुजनांचे, बेरजेचे राजकारण करताना काँग्रेसने आर्थिक सत्ता राबवली व खेड्यापाड्यांत सामनांतील हिंदुराव पाटीलसारखे नेते निर्माण केले. जनता आपल्या आश्रयाखाली राहावी हा हेतू होता.

गुजरात व महाराष्ट्रात सहकारी व्यवस्था जशी जोमदार आहे, तशी ती कोठेही नाही. मात्र आज भाजपाने उत्तर महाराष्ट्रात, राष्ट्रवादीने प. महाराष्ट्रात व शिवसेनेने मराठवाडा-कोकणात व प. महाराष्ट्रात काँग्रेसच्या जनाधारात घुसखोरी केली आहे. आपल्या हिताची जपणूक काँग्रेसतर्फे केली जात नसल्याचे पाहून गेल्या तीस वर्षांत काही मराठा-कुणबींनी काँग्रेसपासून दूर जाण्यास आरंभ केला. याची कसर १९९० नंतर दलित, आदिवासी, मुस्लिम, ओबीसींनी भरून काढली.

गेल्या पाच-सात वर्षांपासून काँग्रेसला शहर-वासीयांचा, उच्च-मध्यमवर्गीयांचा पाठिंबा मिळतो. म्हणजे एकीकडे आम व दुसरीकडे खास आदमीही काँग्रेसला मते देतो आहे.

१९७८ मध्ये शरद पवार मराठा नेत्यांना आसपास बाळगूनच स्वत: 'प्रतिशिवाजी' बनले होते. मात्र राष्ट्रवादीने गोरगरीब मराठ्यांची, झोपडवासीयांची, दलित, मुस्लिम, आदिवासींची निराशाच केली.

शिवसेनेने प्रथम हुल्लडबाजीचे, हिंसक प्रक्षोभी राजकारण केले. सेना आता शहरी पक्ष राहिलेला नाही. तो ग्रामीण भागातही पसरतो आहे. मराठा-कुणबी, ओबीसीप्रमाणेच आदिवासीही त्याकडे वळू लागले आहोत. शिवशक्ती व भीमशक्ती ऐक्याचे आवाहन करून उद्धव ठाकरेंनी सेनेची दलित व प्रामुख्याने बौद्धविरोधी प्रतिमा बदलण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र मुंबई-ठाण्याचा शिवसेनेचा किल्लाच २००९ च्या लोकसभा निवडणुकीत उद्‌ध्वस्त झाला. यावेळी शिवसेनेमध्ये जनरेशन चेंजही होऊ घातला आहे. प्रमोद महाजनांच्या निधनामुळे भाजप बराच काळ संभ्रमावस्थेत होता, शिवसेना-भाजप मित्र पक्ष असले, तरी सेनेमुळे भाजपच्या वाढीस मर्यादा आल्या आहेत.

महाराष्ट्राची स्थापना झाली, तेव्हा राज्याची लोकसंख्या होती चार कोटी, आज ती दहा कोटी आहे. दरडोई उत्पन्न तेव्हा ५३० रुपये होते, तर आज ते आहे ३७ हजार रुपये. दर हजारी जन्म व मृत्युदर कमी झाला आहे. शाळा, कॉलेज, दवाखाने वाढले आहेत. मुंबईहून पुण्याला व पुण्याहून कोल्हापूरला जाताना चांगल्या सडका दिसतात. जावे तेथे मॉल्स, मल्टिप्लेक्स, गोदरेजचे नेचर बास्केट, रिलायन्स फ्रेश, बिर्लांचे मोअर फॉर यू दिसते. परमिट हाऊसेस, बार, फार्म हाऊसेस दिसतात. दोन गावांच्या मध्ये मोकळ्या जमिनी कमी दिसतात. हरेक ठिकाणी इमारती, वसाहती, दुकाने किंवा Under Construction च्या पाट्या. ठिकठिकाणी सेझ म्हणजे सुधारणा झाली आहे. पण काळाप्रमाणे काही ना काही सुधारणा होतच असतात. पण विकासाला वळण लावण्याची जबाबदारी नेतृत्वाची असते. महाराष्ट्रात त्याचाच अभाव आहे.

राज्याच्या अर्थव्यवस्थेतील प्राथमिक क्षेत्राचा हिस्सा पन्नास वर्षांत ३१% वरून १४% वर आला आहे. उलट, सेवाक्षेत्र ६०% वर जाऊन पोचले आहे. प्राथमिक क्षेत्र म्हणजे उत्पादनक्षेत्र हा पायाच आक्रसला तर निरोगी विकास होणार कसा?

हजारो कोटी रुपयांची भांडवलगुंतवणूक

होऊनही फक्त १७% जमीनच भिजली आहे. आणखी पैसे ओतले तरी २५% पेक्षा जास्त जमीन ओलिताखाली येऊ शकणार नाही. त्यामुळे बव्हंशी क्षेत्र कोरडवाहू शेतीखाली आहे व असणार हे वास्तव आहे. या जमिनीतील पिकाची उत्पादकता वाढवण्यासाठी धरणे-कालव्यांचा उपयोग नाही, तर जलसंधारणाची गरज आहे. आपापल्या भागात सेझ, वीज वा माइनिंग प्रकल्प यावा म्हणून लढणारे नेते पाणलोटक्षेत्र विकासाचा विषयच अजेंड्यावर घेत नाहीत, हे दुर्दैव आहे. पडीक जमिनी लागवडीखाली आणाव्यात म्हणून मोहन धारिया तीस वर्षे हेका धरत आहेत. पण ते देखील घडलेले नाही.

कापूस, अन्नधान्य, तेलबिया, कडधान्याच्या प्रतिहेक्टरी उत्पादकतेत महाराष्ट्र मागे आहे. दलित, आदिवासी, ओबीसी, अल्पसंख्याकांसाठी सरकारच्या योजना पुष्कळ आहेत, पण त्यांची अंमलबजावणी नीट होत नाही. उपेक्षितांच्या उद्धारासाठी जी महामंडळे स्थापन केली आहेत, त्यात भ्रष्टाचार मोठा आहे.

सार्वजनिक घरबांधणीकडे काँग्रेस किंवा युती सरकारनेही दुर्लक्ष केले. म्हाडामध्ये खोऱ्याने पैसे खाल्ले जातात. संक्रमण छावण्या, एसआरए स्कीम्स, टॉवर्समध्ये करोडोंचे गैरव्यवहार सुरू आहेत. स्वस्त घरबांधणीचा राज्यव्यापी कार्यक्रम हाती घेऊन काँग्रेस-राष्ट्रवादी, सेना-भाजपाला आपला जनाधार वाढवता आला असता, पण हे त्यांनी केले नाही. दारिद्र्य निर्मुलनाच्या योजना व कार्यक्रम राबवले गेले; पण बीपीएल कुटुंबाची संख्या कमी झाली नाही.

जागतिकीकरण व उदारीकरणाच्या लाटेत पारंपरिक कारखानदारी संपली. लाखो लघुउद्योग बंद पडले. उद्योगधंद्यांनी आधुनिकीकरण केले नाही. त्यामुळे मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबादेतील गिरण्या, इंजिनीयरिंग, केमिकल कारखाने बंद पडले.

महाराष्ट्रात १९७०-८०च्या दशकात तरुण मध्यमवर्गीय घरातून तंत्रज्ञ-उद्योजकांची एक पिढीच्या पिढी तयार झाली, उदारीकरणाच्या रेट्यात ती खतम होत असताना शरद पवार किंवा मनोहर जोशी असोत, ते त्यांच्या मदतीस धावून गेले नाहीत.

विदेशी गुंतवणुकीत राज्याचा नंबर अव्वल आहे. परंतु धातू, आयटी, खते, इलेक्ट्रॉनिक्स, ऑटो उद्योगांना कुशल व प्रशिक्षित रोजगार लागतो. अशा प्रशिक्षणसंस्थांचे जाळे सरकारी व खाजगी पातळीवर निर्माण करण्याचा दूरगामी विचार झाला नाही. आधुनिक उद्योगांत गुंतवणुकीच्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत नाही. त्यामुळे कृषी व कृषिआधारित उद्योगधंद्यांचा प्रचंड गतीने विकास व्हायला हवा कारण तेथे रोजगार जास्त निर्माण होतो. पण त्या प्रकारची धोरणात्मक व्यूहरचना दिसत नाही.

७३व्या घटनादुरुस्तीनुसार शिक्षण, आरोग्य, शेती, सिंचन इत्यादी विषयांत जिल्ह्यासाठी अनुकूल योजना तयार करून त्या राबवण्याचे काम जिल्हा नियोजन समितीकडे सोपवणे जरुरीचे असते. वास्तवात मात्र सरकार आपल्या विविध योजना जिल्ह्याकडे सोपवतच नाही. कारण त्यामुळे अधिकार कमी होतात!

महाराष्ट्रात पन्नास वर्षांनंतर ७८% साक्षरता निर्माण झाली आहे. पण सातवीतल्या मुलांना धड गुणाकार-भागाकार येत नाही व चार वाक्ये लिहिता येत नाहीत. 'प्रथम'ने आपल्या शैक्षणिक गुणवत्तेचे धिंडवडे काढले आहेत. बालमृत्यूबाबत डॉ.अभय बंग यांनी झगझगीत 'सर्च' लाईट टाकूनही सरकारने कार्यपद्धतीत सुधारणा घडवून आणलेली नाही. खेड्यात रेशनवर पुरेसे धान्य मिळत नाही व शहरांत बोगस रेशनकर्डे वितरित केली जातात.

राज्यात काम करणाऱ्या एकूण पाच कोटी कामगारांतील चार कोटी कामगार असंघटित क्षेत्रात आहेत. नाका कामगार, मोलकरणी, काच-पत्रा भंगार, गोळा करणारे वगैरेंच्या जीवनात कसलीच सुरक्षितता नाही.

आपल्या राजकीय नेत्यांनी या समस्या हिरिरीने अंगावरच घेतल्या नाहीत. उद्धव ठाकरेंनी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवरून, गोपीनाथ मुंडेंनी राजकारणाच्या गुन्हेगारीवरून आणि राज ठाकरेंनी परप्रांतीयांच्या मुद्यावरून वेगवेगळ्या वेळी सरकारला अडचणीत आणले. मात्र आत्महत्या थांबविण्या-करता नेमकी कोणती नीती अवलंबावी? शेती किफायतशीर कशामुळे होईल? याची उत्तरे शोधायला उद्धवजींना सवड नाही. गुन्हेगारीकरण रोखण्यासाठी पोलीस यंत्रणेची पुनर्रचना कशी करावी, राजकीय हस्तक्षेप कसा थांबवावा हे मुंडे सांगत नाहीत. 'भय्यां'चे

लोंढे येऊ नयेत यासाठी कायदेशीर चौकटीत काय करता येईल, याचे उत्तर राजकडे नाही. इथला शेतकरी जीन्स-टीशर्टवर ट्रॅक्टर चालवेल हे स्वप्न राज कसे साकारणार आहेत, हे कोणालाच ठाऊक नाही.

गोपीनाथ मुंडे आणि प्रमोद महाजन हे वसंतराव भागवत या समर्पित-सत्शील नेत्याचे पट्टशिष्य परंतु पक्षाच्या राजकारणासाठी वा अन्य कारणाकरिता त्यांनी पैसा आणला. भाजपकडे प्रचंड निधी एन्रॉन की रिलायन्समुळे आला; ते कळायला मार्ग नाही. या नेत्यांची जीवनशैलीही बदलली. फाइव्हस्टार हॉटेल्समध्ये रुम्स रिझर्व्ह केल्या जाऊ लागल्या.

येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उदाहरण देण्यासारखे आहे. १९३० साली त्यांना गोलमेज परिषदेत भाग घेण्याचे आमंत्रण मिळाले. २ ऑक्टोबर १९३० रोजी त्यांना मानपत्र व ४४४० रुपयांची थैली अर्पण करण्याचा समारंभ झाला. त्यावेळी केलेल्या भाषणात बाबासाहेब म्हणाले, ''आपण दिलेली थैली व मानपत्र मी स्वीकारतो; परंतु थैलीतल्या रकमेचा आपल्याला खाजगी कामाकरता मुळीच उपयोग करायचा नसून, ज्या गरीब समाजाकडून या थैलीची रक्कम जमा झाली आहे, त्याच गरीब जनतेच्या कार्यात याचा उपयोग होणे इष्ट आहे. सदर रकमेचा काही भाग डॉ. सोळंकी यांचेजवळ ठेवून जाणार आहे. बहिष्कृत काँग्रेसकरता त्यांनी त्या रकमेचा उपयोग करावा. आपले बंद पडलेले 'बहिष्कृत भारत' हे पत्र पुन्हा सुरू करावे. थैलीच्या रक्कमेतील काही भाग मी चालवलेल्या बोर्डिंगांना मदत म्हणून देण्यात येईल. ज्यावेळी मला आपल्या मदतीची जरुरी होती, त्यावेळीसुद्धा जेथे मी आपल्या मदतीची अपेक्षा केली नाही, त्या मला माझ्या खासगी कार्यासाठी तुमच्या मदतीची जरूरी नाही.''

आज महाराष्ट्राचे राजकीयच नव्हे, तर सांस्कृतिक नेतृत्वही कुचकामी आहे. पु.ल.देशपांडेंचा शिवसेनाप्रमुखांनी अपमान केला, तेव्हा ज्येष्ठ साहित्यिक गप्प बसले. नगरच्या साहित्य संमेलनात 'अधिकृत पुरावा समोर आल्याशिवाय निषेध व्यक्त करणे योग्य नाही' अशी भूमिका साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. सुधीर रसाळ यांनी घेतली. प्रा. पुष्पा भावे यांनी मात्र संमेलनातील परिसंवादात भाषण करताना, ठाकरेंचे नाव घेण्यास घाबरणाऱ्या लेखकांना रास्तपणे, 'भ्याड' असे म्हटले. पण त्याबद्दल महामंडळातर्फे त्यांच्याकडे खुलासा मागू असे डॉ. रसाळ यांनी जाहीर केले!

आविष्कारस्वातंत्र्याबद्दल स्पष्ट भूमिका घेणाऱ्यांमध्ये दुर्गा भागवत, य.दि.फडके, सुभाष भेंडे प्रभृतींचा उल्लेख करावा लागेल. मात्र समाजाचे बौद्धिक नेतृत्व करत त्याला सदैव जागे ठेवण्याचे काम करणाऱ्यांची उणीव भासते आहे. साहित्य व नाट्यसंमेलनासाठी सरकार अनुदान देते. दरवर्षी स्थानिक पुढारी ही संमेलने भरवतात व त्यात अध्यक्ष मिरवून घेतात. सटरफटर लेखकांना प्रसिद्धी लाभते. ही वार्षिक सहल किंवा टुरटूर असते. त्यामधून साहित्यिक, नाट्यविषयक प्रश्न धसाला लागत नाही. अपवादानेच कसदार परिसंवाद घडतात, चित्रपटांच्या मराठी 'ऑस्कर'मध्येही, निर्माते, दिग्दर्शक मुख्यमंत्री व सांस्कृतिक मंत्र्यांची हुजरेगिरी करून आपापल्या पोळीवर तूप ओढून घेतात. मराठी चित्रपटाचे तंत्र विकसित कसे करावे, उमेदीच्या दिग्दर्शकांना अधिक वाव कसा मिळेल यावर कोणताही विचार होत नाही.

राज्यात सांस्कृतिक क्षेत्रात जे सुरू आहे ते फक्त इव्हेंटकेंद्रित राजकारण. खिशाला चाट लावून, माना मोडून गावोगावी, लहान शहरांत, खेड्यांत जे हस्तकला, लोककला व इतर कलांमध्ये काम करत आहेत, त्यांची उपेक्षा सुरू आहे. म्युझियम्स व वृद्ध कलावंतांकडे कोणी बघत नाही. अधूनमधून एखाद्याला जीवनगौरव पुरस्कार देऊन, मंत्री त्या कलाकाराबद्दल अतीव आदर असल्याचे नाटक करतो व लगेच त्याला विसरून जातो! आता महाराष्ट्राचे सांस्कृतिक धोरण येऊ घातले आहे. पण त्याचे काय होते ते नव्या सरकारवर अवलंबून आहे.

पुढच्या पन्नास वर्षांत राज्याचे वैज्ञानिक, तंत्रज्ञानाबद्दलचे, शेती-उद्योगविषयक धोरण कसे असावे याबद्दलची भविष्यवेधी नजर कोणाकडे नाही. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी निदान विकासाचा आराखडा तयार करण्याकरता तज्ज्ञांची मदत घेण्याची सक्रियता तरी दाखवली. पण आपले राजकारण दिवसेंदिवस व्यक्तिकेंद्रित होत चालले आहे. प्रसारमाध्यमेही पक्षांपेक्षा व्यक्तींना, जाहीरनाम्यांपेक्षा घोषणांना, मुद्यांपेक्षा चमकदार बाईट्सना महत्त्व देत आहेत. राजकारणाचे टीव्हीकरण,

माध्यमीकरण होत आहे.

टीव्ही, मोबाइल्स, इंटरनेट युगात राजकारण रस्त्यावरून मीडिया कॉर्नरवर येणार हे खरे असले, तरी शेवटी हे लोककारण आहे. पण लोकाभिमुखता कमी व माध्यमाभिमुखता अधिक वाढत आहे.

'जुने जाऊ द्या मरणालागुनी' असे म्हणून राज्याला आशयपूर्ण प्रगतीकडे घेऊन जाणारे नेतृत्व हवे आहे. अब्दुल कलाम, नारायण मूर्ती, रतन टाटा, नंदन नीलकेणी, विजय भटकर, रघुनाथ माशेलकर, अनिल काकोडकर, स्वामिनाथन यांनी त्यांच्या विज्ञान-तंत्रज्ञान-उद्योग-कृषी क्षेत्रात लोकांना विचारांची नवी दिशा दिली. सामाजिक क्षेत्रात मेधा पाटकर, अण्णा हजारे, आमटे कुटुंबीय, डॉ. बंग दांपत्य यांनी मूलगामी कार्य केले आहे. आपले सामाजिक नेतृत्व जेवढे सकस आहे, तेवढे सांस्कृतिक व राजकीय नेतृत्व नाही.

आता आम्ही द्वेषाचे, वजाबाकीचे 'अँगर'चे राजकारण करतो. प्रश्नांची व्यामिश्रता बाजूला ठेवून सरळसोपी मांडणी करून इन्स्टंट रिझल्टवादी, नाटकबाजीचे राजकारण करतो. चुरस वाढल्याने विजेचे दर, मराठी पाट्या, परप्रांतीय या प्रश्नांबाबतीत यशस्वी स्पर्धा दिसून येते. गरिबांचे, झोपडवासीयांचे आम्हीच तारणहार कसे, हे दाखवण्याची दोन्ही काँग्रेसमध्ये शर्यत लागली आहे.

हे चित्र उद्या तरी पालटणार आहे का?
फिरून वर्षचक्र हे
पुढे पुढे जातसे
विशी, तिशी अन् चाळिशी...

कवी अनिल यांच्या या कवितेची याद येते. निर्नायकी महाराष्ट्राच्या भविष्याच्या पोटात काय दडले आहे असा विचार मनात येतो व अस्वस्थता दाटून येते...

---

**– हेमंत देसाई**
सी/३ गुलमोहर, दा.ग.महाजनी पथ,
महापालिका वसाहत,
शिवडी पश्चिम, मुंबई ४०० ०१५
दूरध्वनी : २४१३५८६४
ई-मेलः hemvdesai@rediff.com

ग्रंथाली



## डायरी

**प्रवीण बर्दापूरकर**

मूल्य १८० रुपये
१२० सवलतीत रुपये
घरपोच १३० रुपये

प्रवीण बर्दापूरकरांनी गेल्या तीस वर्षांत अनेक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय उलथापालथी पाहिल्या आहेत. हा काळच प्रचंड उलथापालथींचा आहे. त्यातील अनेक नायक-खलनायक वा प्रतिनायक-उपनायक प्रवीणना भेटले आहेत.
प्रवीण यांनी त्यांच्या त्या प्रवासाची मानसिक नोंद केली आहे आणि अर्वाचीन इतिहासात त्यांचे कोंदण कोणते ते ठरवून ती 'जागा' त्यांना दिली आहे. विशेष म्हणजे, प्रवीणच्या डायरीत आत्मप्रौढी नाही वा आत्मकरुणा नाही, आत्मवंचना नाही आणि कुठचा गंडही नाही. यामुळे त्या लेखनाला एक सहजता, एक तात्कालिक-ऐतिहासिकता आणि एक प्रवाहीपणा प्राप्त झाला आहे. ही 'डायरी' प्रत्येक 'होतकरू' पत्रकाराने वाचावीच, पण तिचा परिसर पत्रकारितेच्या पलीकडे, म्हणजे आपल्या व्यापक सामाजिक-राजकीयतेकडे आहे आणि म्हणूनच सर्वच प्रकारच्या वाचकांच्या मनोकक्षा रुंदावणारा आहे.
**– कुमार केतकर**

## महाराष्ट्राचा लेखाजोखा

**संकलन : दिलीप चावरे**



मूल्य १६० रुपये
सवलतीत १०० रुपये
घरपोच १२० रुपये

प्रत्येक पत्रकाराचे वेगळे वैशिष्ट्य, दृष्टिकोन वेगळा, लिहिण्याची पद्धत वेगळी. आवडी-निवडी वेगळ्या. त्यामुळे गेल्या पन्नास वर्षांच्या महाराष्ट्रावर अनेक बाजूंनी प्रकाश पडल्यासारखा वाटतो. उगवत्या पत्रकारांनी जरूर वाचावे असे हे पुस्तक. **– अरुण साधू**

# जनसंवाद काय, का व कसे?

## राज्यश्री क्षीरसागर

• **जनसंवाद** ही एक चळवळ आहे; धर्मनिरपेक्ष आणि पक्षनिरपेक्ष राहून समाजातील शक्तिसामर्थ्य संघटित करणारी, सुसंस्कृत व सक्षम समाजाचे स्वप्न बाळगणारी, संवेदनशील व सत्प्रवृत्त समाजमनाला हाक देणारी आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे घटनेतील लोकशाहीमूल्ये केंद्रस्थानी मानणारी.

• भारताच्या सामाजिक स्थितीवर महाराष्ट्रातील काही सजग नागरिकांनी पुणे येथे २ व ३ मे २००९ रोजी केलेल्या सर्वंकष चर्चेतून **जनसंवादची** सुरुवात झाली.

• सुसंस्कृत व सक्षम समाज हे **जनसंवादचे** स्वप्न आणि स्वत:च्या तसेच इतरांच्या विकासासाठी प्रयत्नशील असणारा, कर्तव्यतत्पर, सामाजिक बांधिलकी मानणारा, नागरी प्रश्न सोडविण्यासाठी लोकशाही मूल्ये जमेस धरून पुढाकार घेणारा – किमान त्याच्या आड न येणारा, म्हणजेच सुसंस्कृत, असा समाज देशात निर्माण व्हावा हेच **जनसंवादचे** उद्दिष्ट.

• म्हणूनच **'आपण नाही तर कोण, आणि आत्ता नाही तर केव्हा'** हे **जनसंवादचे** घोषवाक्य ठरले.

**चळवळीची गरज**

• गरजेच्या सुधारणा अनेक आहेत; निवडणूकपद्धती, वाहतूक, नागरी स्वच्छता, स्वच्छ अर्थकारण– यादी वाढतच जाईल. या सुधारणांसाठी हजारो–लाखो सामाजिक व धर्मादाय संस्था मोलाचे काम करीत आहेत. तरीही **जनसंवाद** चळवळीची गरज वाटली. कारण..

– एकीकडे मतपेट्यांद्वारे सत्तापरिवर्तन करणारा व भारतात लोकशाही जिवंत आहे हे दर्शवणारा समाज येथे असला तरी लोकशाही राबवण्यासाठी तो सामर्थ्यशील बनलेला दिसत नाही; लोकांच्या मनामनांतून येथे लोकशाही साकारलेली नाही.

– राजेशाहीचा, संस्थानिकांचा आणि इंग्रजी सत्तेचा काळ मागे पडून देश स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० रोजी प्रजासत्ताक संविधान आम्ही स्वीकारले, पण समाजात लोकशाही मूल्यांची रुजवात होण्यापूर्वीच ती घटना घडली आणि स्वातंत्र्यलढ्यात संघर्ष करताना ती मूल्ये रुजवण्यासाठी वावच नव्हता!

– युरोपमधील प्रबोधनाच्या (एनलाइटनमेंट) चळवळीची, समाजसुधाराची प्रक्रिया भारतात साधलीच गेली नाही. मात्र, तेथे उदयास आलेली राज्यपद्धत चांगली आणि गरजेची म्हणून आम्ही जवळ केली.

– स्वातंत्र्योत्तर साठ वर्षांच्या प्रदीर्घ काळात आंदोलने बरीच झाली, मात्र खऱ्या अर्थाने समाजात लोकशाही रुजवणारी चळवळ देशभरात राबवली गेली नाही. अस्पृश्यता निवारण, कामगारहित, स्त्री–स्वातंत्र्य अशा काही चळवळी झाल्या आणि त्यांचा अनुकूल परिणाम जाणवतोसुद्धा!

– सार्वत्रिक अनुभव असाही आहे, की समस्या सोडवण्यासाठी आपण निवडून दिलेले (खरे तर, निवडून आलेले– आपण हाच शब्दप्रयोग नेहमी वापरतो, ते सुद्धा

लोकशाही मूल्यांच्या उणिवेचे लक्षण मानले पाहिजे) राजकारणी नेते 'राजकारणा'तच रंगले, सत्शील सामाजिक कार्यकर्ते स्वत: निर्माण केलेल्या विश्वात दंगले आणि तुमच्या-आमच्यासारखे सज्जन नागरिक संघटित शक्तीविना एकाकी पडले.

• **जनसंवादची गरज** भासली ती राजकारणापासून ते समाजकारणापर्यंत विविध ठिकाणी गुंतलेल्या अशा सर्व सत्शक्तींनी समान व किमान कार्यक्रमाकरिता एकत्र येण्यासाठी, सामान्य नागरिकांना उत्स्फूर्तपणे एका छत्राखाली एकत्रित करण्यासाठी!

• **जनसंवादचा** कार्यक्रम तसा मर्यादितच. लोकशाहीची, नागरिकत्वाची आणि सामाजिक बांधिलकीची मूल्ये समाजमनात निर्माण करण्याचा, ती जोपासण्याचा! खरे तर, मुळातच, ती एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे.

**प्रयत्नांची दिशा**

• भारत हे लोकशाही राष्ट्र आहे, कायदेमंडळ, न्यायपालिका, प्रशासन या मजबूत पायांवर आमची लोकशाही उभी आहे. चौथे महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे प्रसारमाध्यमे. तीही भारतात प्रभाव राखून आहेत. तरीसुद्धा भारतात अनेक समस्या अनेक वर्षांपासून 'जैसे थे' आहेत. असे का?

• निवडणुकांतून सत्तांतर करणारा समाज भारतात निर्माण झाला. परंतु, सत्ता राबवून घेण्यात आम्ही कमी पडतो. 'राजकारण्यांच्या आश्वासनांना, प्रलोभनांना बळी पडणारा व चिथावणीतून सहजरीत्या दुभंगणारा समाज' हेच वर्णन आम्हाला आजही लागू पडते. म्हणजेच, या प्रजासत्ताक देशातील लोकांच्या मनांत लोकशाही पूर्णत: साकार झालेली नाही.

• भारतासमोर उभ्या ठाकलेल्या अनेक समस्यांचे मूळ या विरोधाभासात, या सामाजिक उणिवेतच सामावलेले आहे.

• म्हणूनच **जनसंवादचे** प्रयत्न आहेत ते स्व-विकासाचे मार्ग चोखाळून सर्व स्तरांत लोकशाही मूल्ये रुजतील अशी निर्भेळ लोकशाहीवादी चळवळ देशभरात उभी करण्याचे आणि सत्ता राबवून घेण्यासाठी आवश्यक असलेला सामर्थ्यवान समाज घडवण्याचे.

**कार्यपद्धत**

• जनसंवादची साधने कोणती? प्रामुख्याने दोनच. विविध प्रयत्नांतून व प्रसारमाध्यमांद्वारे नागरिकांपर्यंत पोचणे आणि भावी पिढ्यांसाठी देशभरात परिणामकारक व समान आणि समाजाभिमुख अभ्यासक्रम शासनामार्फत औपचारिकरीत्या शिक्षणक्रमात समाविष्ट करणे.

• समाजपरिवर्तनाच्या या ध्येयाकडे वाटचाल कशी करायची? या उत्तरासाठी **जनसंवाद** ही संस्था वा संघटना नव्हे तर ती एक चळवळ - एक व्यासपीठ - आहे, ही बाब लक्षात घ्यायला हवी.

• या चळवळीचे स्वरूप देशव्यापी असणार हे निर्विवाद; म्हणूनच, स्थानिक स्वायत्तता (फेडरॅलिझम), किमान औपचारिकता (फॉरमॅलिटीज), आणि ठोस कार्यक्रम (अॅक्शन-प्लॅन) ह्या बाबी गरजेच्या.

• आवडीच्या, सोयीनुसार व स्वयंस्फूर्त कामात राहूनच वा तशी कामे निवडून **जनसंवादचे** सदस्य काम करतील; ते स्वातंत्र्य सदस्यांना देणे गरजेचे आहे.

• **जनसंवादचे** सदस्य बनलेल्या व्यक्ती स्वत:चे असे लोकशाही मूल्ये मानणारे गट स्थापन करू शकतात वा इतर गटांना, संस्था-संघटनांना एकत्र आणण्याचे काम करू शकतात. शहर, राज्य पातळीवर समान उद्दिष्टे असणारे गट एकत्र यावेत व कामात व्यापकता यावी, हेही गरजेचे.

• संपर्क साधण्यासाठी **जनसंवादचे** लेटरहेड अर्थातच लाभू शकेल.

• नियोजन, खर्चाची बेगमी, कामाचे स्वरूप, आवाका व वाटप ज्याचे त्याने ठरवून **जनसंवादच्या** मूळ उद्दिष्टांशी सुसंगत असे कोणतेही काम सदस्य हाती घेऊ शकतात. अर्थात, आवश्यकतेनुसार इतर सदस्यांची मदत घेता येईलच.

• **जनसंवादच्या** सदस्यांनी एक मात्र नक्कीच करायचे. लाभलेल्या स्वायत्ततेचा आदर राखून, निर्णयपद्धतीत लोकशाही प्रणालीचे पालन करून कार्यातील पारदर्शकता जपायची. तसेच, जात, धर्म, पंथ, जमात, लिंग अशा विभाजनवादी प्रवृत्तींना वळसा घालून पुढे जायचे.

**आवाहन सदस्यत्वाचे**

• चळवळीची शक्ती संख्याबलातच असते; आपले सदस्यत्व म्हणूनच खूप महत्त्वाचे! सदस्य होण्यासाठी कोणतेही शुल्क नाही.

• अधिक माहिती, सूचना, स्वयंस्फूर्त आर्थिक मदत यांसाठी अवश्य संपर्क साधावा.

**संपर्क : सु. गो. तपस्वी,** ए - ३/१९, मीनल गार्डन्स, पटवर्धन बाग, एरंडवणे, पुणे - ४११ ००४.
दूरध्वनी : ०२० -२५४१०१४५/२५४६३५१८.

---

**- राज्यश्री क्षीरसागर**
भ्रमणध्वनी : ९७६६ १५३ २५३

ग्रंथाली दिवाळी विशेषांकाच्या स्थानिक फेरीतून
'जनसंवाद'च्या राज्यव्यापी स्पर्धेत सामील व्हा आणि **भरघोस पारितोषिके मिळवा!!!**

**प्रथम** **द्वितीय** **तृतीय**

**रु. ३०,०००** **रु. १५,०००** **रु. ५०००**

**अशा भरघोस पारितोषिकांसाठी निबंधस्पर्धेत भाग घेऊन**

**'सामाजिक मूल्ये'**ह्या विषयावर जनसंवादने राज्यभरात साधलेली वैचारिक घुसळण यशस्वी करण्यासाठी

**'रुची'च्या वाचकांना सुवर्णसंधी!!!**

निवडक दिवाळी विशेषांकांतून राज्यव्यापी महास्पर्धेसाठी पात्रता ठरवण्यासाठी ग्रंथाली प्रकाशनाने पुढाकार घेतला आहे.

**आपला प्रतिसाद २ डिसेंबर २००९, ह्या तारखेपर्यंत पोचला पाहिजे.**

लाभलेल्या प्रतिसादाचे मूल्यांकन करून तीन स्पर्धकांचे निबंध **'जनसंवाद'च्या** महास्पर्धेसाठी 'कदंब' प्रकाशन निवडेल.

**तीनही स्पर्धकांना उत्तेजनाप्रीत्यर्थ रुपये ५०१/- 'कदंब'तर्फे देण्यात येतील.**

उपक्रमात व्यवस्थापकीय सहभाग असल्यामुळे ग्रंथाली प्रकाशन उपक्रमात प्रत्यक्ष भाग घेऊ शकत नाही.
म्हणून **'रुची'च्या वाचकांनी प्रतिसाद 'कदंब प्रकाशना'कडे पाठवावा.**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** 'कदंब', २०३/बी, नरसिंह स्मृती, गावठाण, विरार (प.) – ४०१३०३


## स्पर्धकांसाठी निवेदन

### १) नियम

१.१) वैयक्तिक व सामाजिक मूल्यांवर प्रकाश टाकणारी, मानवी स्वभावाचे पैलू खुलवणारी, स्व-विकासाच्या ऊर्मीची जाण व त्यासाठीच्या प्रयत्नांची साक्ष देणारी आणि त्या प्रयत्नांना समाज कशा तऱ्हेने मदत करू शकतो ते दर्शवणारी, सामाजिक बांधिलकीच्या व इतर लोकशाही मूल्यांची दखल घेणारी एक कथा राज्यातील विविध ठिकाणच्या दिवाळी विशेषांकांत प्रकाशित झाली आहे. **स्पर्धेचे स्वरूप त्या कथेतूनच व्यक्त होईल.** कथेतील एक पात्र गरजेचे टिपण बनवते, अशा अर्थाचा उल्लेख कथेतच आहे. स्पर्धकांनी स्वत:ला कथेतील ते पात्र मानून, ते पात्र ज्या उद्देशाने टिपण बनवणार असते, तो उद्देश जमेस धरून तसे टिपण बनवायाचे आहे; ते टिपण म्हणजेच स्पर्धानिबंध. कथेतील पात्राच्या उद्देशाचे आकलन व समर्थन हा प्रस्तुतच्या स्पर्धानिबंधाचा मुख्य विषय ठरणार आहे. **स्पर्धेची कथा – 'सामाजिक मूल्ये-...' निवेदनानंतर सुरू होते.**

१.२) व्यक्तिगत व सामाजिक मूल्यांचे विवेचन, मूल्यांत कालमानाने होणारे बदल, ग्राह्य व गरजेचे कौटुंबिक आणि सामाजिक वर्तन, इत्यादी गोष्टींचे विवेचन, हा स्पर्धानिबंधातील महत्त्वाचा भाग असेल. एक उद्देश असाही आहे की स्पर्धकाने त्याच्या स्पर्धानिबंधात विचारांच्या मांडणीतून अप्रत्यक्षरीत्या समाजातील सदस्यांच्या वर्तणुकीवर परिणाम साधण्याच्या दृष्टिकोनातून विषयाची उकल करायची आहे. त्या दृष्टिकोनातून स्पर्धानिबंधाच्या वाचकाला विषयाचे समर्पक आकलन होण्यासाठी कथेतील घटना, वर्तणूक, इत्यादींच्या व स्वत:च्या अनुभवातील उदाहरणांतून त्या गोष्टींचे स्पष्टीकरण स्पर्धकाकडून सादर केलेल्या टिपणात (स्पर्धानिबंधात) साधले गेले पाहिजे. स्पर्धानिबंधाची शब्दसंख्या कमाल बाराशे ते पंधराशेपर्यंत मर्यादित असावी.

१.३) ही स्पर्धा सर्वांना खुली आहे; पात्रतेसाठी कोणतीही अट नाही. सहभागी होण्यासाठी वाचकांनी स्थानिक पातळीवर निवडलेल्या कोणत्याही, पण फक्त एकाच, प्रकाशनाकडे आपला प्रतिसाद पाठवावा. एकापेक्षा जास्त प्रकाशनांकडे प्रतिसाद पाठवल्याचे नजरेस आल्यास तो वाचक, स्पर्धक स्पर्धेतून त्या वेळेपासून बाद ठरवला जाईल.

१.४) **प्रतिसादात्मक निबंध २ डिसेंबर २००९ ह्या अंतिम तारखेपर्यंत निवडलेल्या प्रकाशनाकडे पोचले पाहिजेत.** त्यानंतर लाभलेल्या प्रतिसादाची दखल घेण्याची जबाबदारी निवडलेले स्थानिक प्रकाशन व जनसंवाद घेणार नाही.

१.५) ह्या स्पर्धेत वैयक्तिक वा संयुक्तपणे - गट स्थापन करून - सहभागी होता येईल. गटांची उदाहरणे म्हणजे, एखादे मित्रमंडळ, ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य, पती-पत्नी, कुटुंब, बहीण-भाऊ, वगैरे. संयुक्तपणे - गट स्थापन करून - सहभाग साधला तर त्या त्या गटाला एक गटप्रमुख नेमावा लागेल; सर्व व्यवहार त्या गटप्रमुखाबरोबर व त्याच्या नावाने केले जातील. विजयी ठरल्यास उत्तेजनार्थ व अंतिम पारितोषिकाचा धनादेश गटप्रमुखाच्या नावाने काढला जाईल; गटामधील सदस्यांमध्ये रकमेची विभागणी करण्याबाबत संयोजक कोणतीही जबाबदारी घेणार नाहीत.

१.६) वाचकांनी पाठवायच्या प्रतिसादात दोन भाग असतील. पहिला असेल तो स्पर्धकाची वैयक्तिक माहिती (नाव, वय, व्यवसाय, पत्ता, इ-मेल आयडी व दूरध्वनी क्रमांक) आणि जनसंवाद चळवळीचे सदस्य व्हायचे असल्यास तसा उल्लेख; दुसरा भाग म्हणजे स्पर्धानिबंध.

१.७) संयुक्तपणे - गट स्थापून - सहभागी होणाऱ्या गटांमध्ये दोन ते पाच सदस्य असू शकतील; म्हणजे पाच ही कमाल गटसंख्या असावी अशी अट आहे. गटसदस्यांनी चर्चा साधून एकच स्पर्धानिबंध सादर करायचा आहे, परंतु स्पर्धकांची वैयक्तिक माहिती मात्र प्रत्येक गटसदस्याची द्यायची आहे व सामाईक स्पर्धानिबंधाबरोबर ती माहिती अशा संयुक्त प्रतिसादात समाविष्ट करायची आहे.

१.८) **संपूर्ण प्रतिसादाच्या दोन प्रती प्रत्येक स्पर्धकाने (वैयक्तिक वा संयुक्त) निवडलेल्या प्रकाशनाकडे पाठवायच्या आहेत;** एक प्रत स्थानिक स्पर्धेसाठी, जी ते ते प्रकाशन स्वत:कडे ठेवेल व दुसरी राज्य पातळीवरील महास्पर्धेसाठी; जी प्रत ते ते प्रकाशन 'जनसंवाद'च्या स्पर्धासमितीकडे पाठवेल.

१.९) लिखाण कागदाच्या एका बाजूला (पाठपोट नको) व्यवस्थित मार्जिन सोडून केलेले असावे, कोणतीही खाडाखोड नसावी आणि ते लिखाण प्रती काढण्यालायक असावे, पुसट नसावे. लिखाण काळ्या रंगात टंकलिखित केलेले असावे; ते शक्य नसल्यास काळ्या रंगाचे बॉलपॉईंट पेन वापरावे. कोणत्याही कारणामुळे लिखाण सुलभरीत्या व पूर्णपणे व्यवस्थितरीत्या वाचता आले नाही तर परीक्षकांकडून होणाऱ्या मूल्यांकनावर अनिष्ट परिणाम होऊ शकतो हे स्पर्धकांनी ध्यानात घ्यावे; अशा परिणामांना स्थानिक संयोजक प्रकाशन वा स्पर्धासमिती जबाबदार राहणार नाही.

१.१०) स्थानिक पातळीवर अव्वल ठरलेल्या तीन स्पर्धकांबाबत त्या त्या प्रकाशनाने स्पर्धासमितीला तसे कळवल्यावर पूर्वीच प्राप्त झालेला त्या तीन स्पर्धकांच्या स्पर्धानिबंधाची प्रत स्पर्धासमिती महास्पर्धेसाठी नेमलेल्या परीक्षक मंडळाच्या प्रत्येक सदस्याकडे, गरजेच्या प्रती काढून, पाठवेल. म्हणजेच, दोन्ही स्तरांवरील स्पर्धेसाठी एकच स्पर्धानिबंध तयार करायचा आहे, जे सुरुवातीच्या स्पर्धकांच्या प्रतिसादातूनच परस्पर साधले जाईल. महास्पर्धेच्या परीक्षक मंडळाकडे पाठवायच्या प्रतींवर स्पर्धकाचे व प्रकाशनांचे नाव नसेल.

१.११) स्थानिक स्पर्धासंबधातील वाचकांबरोबरचा संपर्क व पत्रव्यवहार, स्पर्धानिबंधाचे स्थानिक फेरीसाठी मूल्यांकन, स्थानिक तीन अव्वल स्पर्धकांबरोबरचा संपर्क, उत्तेजनार्थ द्यायच्या धनादेशांचे वितरण व संबंधित मुद्दे आणि त्यांचे निराकरण, वगैरे गोष्टींची स्थानिक स्पर्धांबाबतची अंमलबजावणी आणि संबंधित निकष व निर्णयप्रक्रियेसंबंधात सर्व हक्क त्या त्या प्रकाशनाचे राहतील आणि त्या त्या प्रकाशनाचे निकष व निष्कर्ष अंतिम मानले जातील; 'जनसंवाद' ह्या बाबतीत कोणताही पुढाकार घेणार नाही वा ढवळाढवळ करणार नाही. हे सर्व व्यवहार काटेकोर व पारदर्शकपणे करण्याची जबाबदारी त्या त्या प्रकाशनाची राहील.

१.१२) जनसंवादने उपक्रमाचे नियोजन करण्यासाठी 'रुची' व 'मिळून साऱ्याजणी' ह्या मासिकांच्या प्रकाशनांचे साहाय्य घेतले आहे व संपूर्ण उपक्रमावर व्यवस्थापकीय नियंत्रण राखण्यासाठी स्पर्धासमिती नियुक्त केली आहे. त्या स्पर्धासमितीचे सदस्य आहेत: विद्या बाळ, धनंजय गांगल, सुदेश हिंगलासपूरकर, राज्यश्री क्षीरसागर व सु. गो. तपस्वी. ही समिती सर्व व्यवस्थापन व निर्णयप्रक्रिया लोकशाही मार्गाने साधेल आणि 'जनसंवाद'च्या सल्लागार समितीला जबाबदार राहील. वाद्य मुद्यांवर स्पर्धासमिती 'जनसंवाद'च्या सल्लागार समितीच्या सल्ल्यानुसार उपक्रमासंबंधातील गरेजेचे निर्णय घेईल. स्पर्धासमितीने साधलेले सर्व बदल, लावलेले निकष वा घेतलेले निर्णय सर्व संबंधितांवर बंधनकारक असतील.

१.१३) स्पर्धकांनी कोणत्याही प्रकाशनाकडे पाठवलेल्या निबंधांचे सर्व अधिकार (कॉपीराईट्स) जनसंवादकडे राहतील.

**विशेषांकातील 'जनसंवाद म्हणजे काय, का व कसे?' हा लेख वाचला नसल्यास जरूर वाचावा आणि सदस्य व्हावे.**

**२.० परीक्षक मंडळे**

स्पर्धा निबंधांच्या मूल्यांकनासंदर्भात व पारितोषिकांच्या निर्णयप्रक्रियेत स्थानिक पातळीवर ते ते प्रकाशन आणि राज्य पातळीवर स्पर्धा समिती जबाबदार राहतील.

२.१) स्थानिक पातळीवर प्रत्येक प्रकाशन त्याच्याकडे आलेल्या स्पर्धानिबंधांचे मूल्यांकन करून राज्यव्यापी महास्पर्धेसाठी पात्र ठरणारे तीन स्पर्धक निवडेल. स्थानिक पातळीवर उद्भवू शकणाऱ्या कोणत्याही अडचणी वा वादविवादात त्या त्या प्रकाशनाचे निकष व निर्णय अंतिम स्वरूपाचे मानले जातील व संबंधितांवर बंधनकारक राहतील.

२.२) राज्यपातळीवरील महास्पर्धेत विजेते ठरवण्यासाठी स्पर्धासमितीने राज्यभरातील नामवंतांचे एक परीक्षक मंडळ निवडले आहे. अशा राज्यव्यापी स्पर्धेसाठी परीक्षक मंडळावरील सदस्यांची निवड करताना जसे विभागीय प्रातिनिधिकत्वाकडे लक्ष दिले पाहिजे, तद्वत, वैचारिक समतोल सुद्धा साधला गेला पाहिजे. शिवाय, ज्ञान व अनुभवक्षेत्र ह्या गोष्टींचा पण विचार झाला पाहिजे. अर्थात, ही सुद्धा काळजी घेतली पाहिजे की परीक्षक मंडळावरील कोणत्याही सदस्याचे संदर्भातील प्रकाशन संस्थांशी थेट संबंध नाहीत. ह्या व अशा गोष्टींचा विचार करून त्या त्या व्यक्तीशी संपर्क साधून परीक्षक मंडळ नियुक्त केले आहे.

**३.० राज्यव्यापी महास्पर्धेच्या परीक्षक मंडळाच्या सदस्यांची यादी**

३.१) डॉ. शरद देशपांडे, तत्त्वज्ञान विभागाचे माजी प्रमुख, पुणे विद्यापीठ, पुणे.

३.२) श्री. मा. गो. वैद्य, माजी संपादक, तरुण भारत, नागपूर.

३.३) श्री. शांताराम पोटदुखे, माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री, चंद्रपूर.

३.४) फादर फ्रांसिस दिब्रेटो, सेंट पॅट्रिक चर्च, वसई.

३.५) ॲड. देवदत्त परुळेकर, वकील व सामाजिक कार्यकर्ते, वेंगुर्ला.

३.६) प्रा. फरीदा लाम्बे, 'निर्मला निकेतन' व 'प्रथम' ह्या संस्थांशी निगडीत, मुंबई.

३.७) डॉ. प्रकाश आमटे, मेगाससे पारितोषिक सन्मानित सामाजिक कार्यकर्ते, हेमलकसा, गडचिरोली.

३.८) प्रा. नागोराव कुंभार, महात्मा बसवेश्वर कॉलेजचे प्राचार्य, लातूर.

३.९) प्रा. पीतांबर सरोदे, हिंदी लेखक, नंदुरबार.

३.१०) प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी, मराठी लेखक, नांदेड.

३.११) प्रा. द. ता. भोसले, मराठीचे माजी प्राध्यापक, पंढरपूर.

३.१२) श्रीमती रझिया पटेल, अध्यक्ष, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन व मुस्लिम स्त्री संघटनेच्या अध्यक्षा, पुणे.

३.१३) श्रीमती सुरेखा दळवी, आदिवासी व वनवासी समाजांच्या हक्क संवर्धन चळवळीतील कार्यकर्त्या, श्रमिक क्रांती संघटना, पेण.

३.१४) डॉ. सुधा कोठारी, ग्रामीण बचतगट कार्यक्रमांतून स्त्री उद्धाराच्या चळवळींत कार्यरत, व्यवस्थापकीय विश्वस्त, चैतन्य संस्था, राजगुरुनगर.

३.१५) श्री. नरेंद्र लांजेवार, वाचनालय अधिकारी व सामाजिक कार्यकर्ते, बुलडाणा.

३.१६) श्री. मदन हजेरी, नगर वाचनालय सचिव आणि सामाजिक कार्यकर्ते, राजापूर.

३.१७) श्रीमती शांता नारकर, निवृत्त शालेय शिक्षिका व सामाजिक कार्यकर्त्या, मातृमंदिर, देवरुख.

३.१८) डॉ. राणी बंग, ग्रामीण आरोग्य - साहाय्य व संशोधन, सर्च संस्था, शोधग्राम, गडचिरोली.

३.१९) डॉ. गिरीश कुळकर्णी, वेश्यांच्या मुलांना, विशेषत: एड्सग्रस्त, साहाय्य, आधार, आश्रय व संगोपन; अशा मुलांमुलींसाठी चालवलेल्या संस्थेचे संस्थापक व सामाजिक कार्यकर्ते, अहमदनगर.

३.२०) डॉ. गोविंद जोशी, प्राचार्य, शेतकी महाविद्यालय, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

३.२१) डॉ. श्याम जोशी, प्राचार्य, डी.बी.जे कॉलेज, चिपळूण.

३.२२) ले.कर्नल कुमार फुले, शालेय विद्यार्थ्यांना शिक्षक-पालक बैठकींच्या माध्यमातून नागरिकत्वाच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याच्या उपक्रमात रस घेणारे निवृत्त लष्कर अधिकारी, पुणे, आणि

३.२३) 'जनसंवाद'च्या स्पर्धासमितीतर्फे, चळवळीचे अध्यक्ष व कथेचे लेखक श्री. सु. गो. तपस्वी.

# एक चित्तवेधक कथा

## सामाजिक मूल्ये – शाश्वत, बदलती आणि आपद्धर्माची

(मूळ कथानक सत्यघटनेवर आधारित – पात्रांची नावे, विस्तार व समस्याबांधणीसाठी प्रसंगनिर्मिती, कल्पनारंजन लेखनस्वातंत्र्यातून.)

सु. गो. तपस्वी

आजची पिढी, मूल्यांचा ऱ्हास वगैरे विषयांवर ज्येष्ठ नागरिकांच्या मासिक बैठकीत जोरात चर्चा चालली होती. 'आमच्या वेळी असं नव्हतं', 'असं वागण्याचा विचारसुद्धा कोणाच्या मनात आला नसता, त्याकाळी', अशा तऱ्हेचे विचार व्यक्त होत होते. समाजात अनुभवास येत असलेली वर्तणूक, पेहराव, विशेषत: तरुण मुलींचा, ह्या व अशा उदाहरणांतून मूल्यांचा ऱ्हास होतो आहे, ह्या मतप्रदर्शनात मंडळी रंगली होती. ऐकत असताना, पंढरीनाथांना काही तरी खटकत होतं. त्यांच्या मते, ती सारी चर्चा संदर्भरहित ठरत होती; होणारं मतप्रदर्शन काळाला, परिस्थितीला जमेस धरून होत नव्हतं. खटकत होतं, पण पंढरीनाथांना सोदाहरण आणि तात्त्विक मुद्यांतून ते खोडूनही काढता येत नव्हतं. चर्चेत विशेष सहभाग न साधताच पंढरीनाथ घरी परतले.

युनिव्हर्सिटीत तत्त्वज्ञान हा विषय शिकवणारे एक प्राध्यापक पंढरीनाथांच्या परिचयात होते. शंकर काळभोर त्यांचं नाव. दोन-चार दिवसांनी वेळ घेऊन चर्चा करायला पंढरीनाथ काळभोरांकडे पोचले.

"फार मोठा विषय आहे, बरं झालं तुम्ही निवांत वेळ निवडून आलात." अशी सुरुवात करून, तास-दीड तासानंतर समारोप करताना काळभोरांनी सांगितलं, "मूल्य म्हणजे समाजात व्यवस्था राखण्याच्या दृष्टिकोनातून मानवी वर्तणूक नियंत्रित करण्यासाठी घेतलेला आधार; त्यात सापेक्षता असणारच. व्यक्तीनुसार, दृष्टिकोन, स्थल-काल, अशी वा इतर अनेक प्रकारची सापेक्षता संभवते."

ग्लासातून सरबताचा एक घोट घेऊन काळभोर पुढे म्हणाले, "थोडक्यात, शाश्वतधर्म, युगधर्म आणि आपद्धर्म अशा तीन प्रकारांत मूल्ये विभागता येतील." ह्या तात्त्विक वर्गीकरणाचा उदाहरणासकट खुलासा करताना काळभोरांनी पेहरावाचंच उदाहरण घेतलं. "उघडं-नागडं न फिरणं, कपडे घालणं, हे सामाजिकदृष्ट्या गरजेचं. म्हणून, जर ते सामाजिक मूल्य आहे असं मानलं तर पेहरावाबाबतचा 'अंग झाकण्यासाठी कपडे घालणं' हा भाग शाश्वत मानता येईल. पण, कपडे कोणते व कसे वापरावेत ही बाब सापेक्ष आहे. स्थल-कालाप्रमाणे त्यात बदल होऊ शकतात, व होणारच. तो भाग झाला युगधर्माचा. समजा, स्विमींगपूलमध्ये एखादी बाई साडी नेसून पोहायला उतरली. बऱ्याच क्लबमध्ये आज तशा वागणुकीला मनाई करण्यात येईल. पोहण्यासाठी, तसा पेहराव अयोग्य आहे का नाही?" पंढरीनाथांनी होकारार्थी मान हलवली. "परंतु, त्याच स्विमिंग-ड्रेसमध्ये

हातात पर्स घेऊन खरेदीला बाहेर पडणं योग्य ठरेल का? आपण वेडी म्हणू त्या बाईला!'' सापेक्षता स्पष्ट करत काळभोरांनी शाश्वत व युगधर्माचं निरूपण केलं.

आपद्धर्म स्पष्ट करताना काळभोर म्हणाले, ''तेच उदाहरण पुढे रेटतो. एखादी बाई आंघोळीला बसली असताना त्या इमारतीला आग लागल्याचं कोणीतरी तिला ओरडून सांगितलं; आणि अशा वेळी अर्धवट कपड्यात ती बाई पळत रस्त्यावर आली; वेडी म्हणाल का तिला? एखाद्या आपत्तीच्या वेळी मानवी वर्तणुकीला मूल्याचं लेबल चिकटवणं सुद्धा गैरच मानलं पाहिजे.''

पंढरीनाथांना तात्त्विक बाबींचा उलगडा होत होता, परंतु त्यांचा गोंधळही उडत होता. मुख्य गोंधळ होता तो दुतोंडी वर्तणुकीचा. म्हणून पंढरीनाथांनी विचारलं, ''एखादी व्यक्ती निरनिराळ्या संदर्भात वेगवेगळी वागते; मग त्या व्यक्तीची समाजातील वर्तणूक मूल्याधिष्ठित मानायची का?'' त्या प्रश्नाचा खुलासा प्राध्यपकांनी असा केला. ''उत्तम, गरजेची अशीही काही मूल्यं असतात. 'नेहमी खरं बोलावं' हे त्याचं एक उदाहरण. परंतु, प्रत्यक्षात, व्यवहारात प्रत्येक वेळी त्या मूल्याचं पालन करणं कठीण, जवळजवळ अशक्य असतं हे आपण सर्वजण अनुभवतो. ज्या गोष्टी सर्वसाधारण माणसाला नेहमी पाळणं शक्य नसतात अशा वर्तणुकीबाबतची मूल्यं तात्त्विक स्वरूपाची, पुस्तकीमूल्यं ठरतात. जे सदैव आचरणात येऊ शकत नाही, ते खऱ्या अर्थानं सामाजिक मूल्य मानणंच चुकीचं, असं बऱ्याच जणांना, मलासुद्धा वाटतं.''

उठता-उठता काळभोर पुढे म्हणाले, ''माझ्या वाचनात एक कथा आली होती; व्यक्तिगत, कौटुंबिक व सामाजिक वर्तणुकींवर प्रकाश टाकणारी. त्या कथेतील मुख्य भागाची प्रत विषय शिकवताना मी 'केस-स्टडी' म्हणून वापरतो. कथेचा नायक फार विचित्र जीवन जगला. वेळोवेळी त्यानं घेतलेले निर्णय खरंच धाडसाचे होते. सारासार विचार करण्याचा नायकाचा स्वभाव ज्या त्या परिस्थितीत योग्य निर्णय घेण्यासाठी काय बरं आणि काय वाईट ह्या गोष्टींची छान उकल करतो.'' असं सांगत, 'केस-स्टडी'ची एक प्रत काळभोरांनी पंढरीनाथांना दिली. ''वाचा तुम्ही. मूल्यांचा मूळ उद्देश मात्र विसरू नका. तो म्हणजे, कुटुंबात, समाजात सुसूत्रता राखणे. ज्या वर्तणुकीत संबंधितांना पोचू शकणाऱ्या विविध प्रकारच्या हानीचा विचार झालेला असतो, ती वर्तणूक कौटुंबिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या मूल्याधिष्ठीत मानता येईल. स्वत:चं सुख, सोय बघताना इतरांना होणारा त्रास विचारात घेऊन समतोल राखण्याकरिताच अशी मूल्यं निर्माण केली जातात, तेच सभ्य वर्तणुकीचं लक्ष्य मानता येईल, पायाभूत तत्त्व मानता येईल.''

-----

घरी पोचल्या-पोचल्या पंढरीनाथांनी 'केस-स्टडी' वाचायला सुरुवात केली.

-----

''मी आज जे सांगणार आहे ते सर्व वर्गांना उद्देशून आहे. दुसऱ्या वर्षाची मुलं तुम्ही, आणखी एका वर्षानंतर डिप्लोमा घेऊन तुमच्यातील बहुतेक जण व्यावसायिक कारकिर्दीला सुरुवात करतील!'' संपूर्ण वर्गावरून नजर टाकत गावंडेसर टेबलामागून पुढे आले व टेबलावर बसले. अर्ध मिनिट कोणीच काही बोललं नाही. सरांच्या चेहऱ्याकडे बघण्याची कोणाचीच हिंमत नव्हती. टेबलाखाली लटकणाऱ्या सरांच्या पायांवर वर्गाचे डोळे खिळले होते. उजवा, डावा; उजवा, डावा- लटकणारे ते पाय पुढे मागे होत होते. हालचाल होताना टेबलाची होणारी कुरकुर घड्याळाच्या टिकटिकीसारखी साऱ्यांच्या कानात घुमत होती.

ती शांतता मुलांना जीवघेणी वाटली!

''नीट लक्ष देऊन ऐका.'' सरांचा आवाज आज भारदस्त वाटत होता; त्याची धार जाणवत होती. प्रिंसिपॉल गावंडे त्या वर्गाला आठवड्यातून फक्त एकच तास शिकवायचे, परंतु वर्गात कधी कोणाला सरांचा धाक असा जाणवलाच नव्हता. प्रश्न, उत्तर, शंका- तिचं निरसन, काही अनुभवकथन आणि तास संपता संपता क्रमिक पुस्तकातील निवडलेल्या मानवी वर्तणुकीच्या पाठाचा साऱ्यांना उलगडा झालेला असायचा; विषयावरील सरांची मल्लीनाथी, साधलेलं विवेचन बहुतेकांना पटायचं आणि मतभेद असणाऱ्यांनासुद्धा आपलं मत व्यक्त केल्याचं समाधान मिळायचं!

प्रिंसिपॉल गावंडे स्वत: आठवड्यातून एकदा शिकवणार ही गोष्ट जेव्हा दुसऱ्या वर्षाच्या सुरुवातीला मुलांना कळायची, तेव्हा मुलांवर काहीसं दडपण आलेलं असायचं; आणि विषय तरी कोणता - ह्युमन रिलेशन्स- परस्पर मानवी संबंध. मात्र, दोन-तीन आठवड्यांतच दडपण दूर व्हायचं; नव्हे, वर्गातील आवाज व मोकळेपणी होणारी चर्चा बाहेरच्यानं कोणी ऐकली असती तर त्याला वाटलं असतं, वर्गावर ताबा कसा ठेवायचा ते शिकण्याची ह्या मास्तराला गरज आहे. व्हायचं काय, की इतर संस्थांतून ह्या विषयासाठी पासापुरता अभ्यास करणाऱ्या इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत सरांचे विद्यार्थी मनापासून रस घ्यायचे; ह्या विषयातले मार्क बघितले तर

दर वर्षी पहिल्या दहांत ह्या वर्गातील पाच-सहा विद्यार्थी असायचे.

"पोरसवदा मुलं-मुली म्हणून तुमच्या अनेक हरकतींकडे मी कानाडोळा केला. एक-दोन उदाहरणं देतो. गेल्या वर्षी बापटसरांच्या कोटाजवळ पेन धरून शाईचा डाग लावणारा कोण, ते मला आधीच माहिती होतं. योगायोगानं, खिडकीतून ती घटना ज्यानं पाहिली त्याच्याकडून त्या मुलाचं नाव मला कळालं होतं. तरीही, मी तुम्हालाच तो प्रश्न विचारला, कारण मला तुमच्याकडून ती कबुली हवी होती. कोणीही तोंड उघडलं नव्हतं. 'तुमच्यापैकी कोणीही पुढं आलं नाही, तर सगळ्या वर्गाला शिक्षा करीन.' ह्या माझ्या धमकावणीनंतर सुद्धा तुमच्यापैकी कोणी चुगली केली नव्हती. खरं तर, वर्गातील तुमच्या एकीचं, टीम-स्पिरीटचं होणारं ते प्रदर्शन मला त्यावेळी योग्यच वाटलं होतं.

"तुमच्यापैकी बहुतेकांना माहीतही नसेल की ज्यानं ते पेन धरलं होतं त्या विद्यार्थ्यानं नंतर येऊन खाजगीत तो गुन्हा माझ्याकडे कबूल केला होता आणि वर्ग चूप बसला म्हणून मी तुम्हा कोणालाही शिक्षा करू नये, अशी विनंती सुद्धा त्यानं केली होती. एकूणच, त्या विद्यार्थ्याचा स्वभाव आणि त्याच्या वागणुकीबद्दल मला अभिमान वाटतो." सरांच्या ह्या खुलाशानंतर सर्वांच्या नजरा सबनीसकडे वळल्या, त्याची मान मात्र खाली होती.

"दुसरं एक उदाहरण देतो. पहिल्या टर्मनंतर मुत्तमवार सर तुमच्याबरोबर पालक-शिक्षक म्हणून शैक्षणिक दौऱ्यावर आले होते. जळगावच्या एका हॉस्टेलवर तुमची राहण्याची व्यवस्था होती. तुमच्यातील पाच-सहा जण त्या रात्री चोरून खोलीत बिअर प्यायले; नंतर त्यांना सरांनी शिक्षाही केली. पण, प्रकरण तिथं थांबलं नव्हतं. तक्रार वरपर्यंत गेली आणि ट्रस्टींच्या मीटिंगमध्ये त्यावर चर्चाही झाली. 'पोरांकडून पौगंडवयात असे उद्योग होतात, त्यांच्याकडून परत अशी चूक होणार नाही.' माझ्या ह्या आश्वासनामुळे काही जण बडतर्फ होता होता वाचले. आज ज्याबद्दल मी बोलतो आहे ती तुमची वर्तणूक मात्र अक्षम्य आहे."

तांब्यातून पाणी पिण्यासाठी गावंडेसर थोडे थांबले.

----

"जेवणात लक्ष नाही तुमचं, सर." ह्या पत्नीच्या तिरकस वाक्यामुळे राम गावंडे भानावर आले. "हं, वाढ थोडी भाजी" असं आशाला म्हणत पानातील उरलेली पोळी त्या भाजीबरोबर खाऊन गावंडे हात धुण्यासाठी बेडरूमकडे वळले.

---

"काय झालं होतं काल एव्हढं डिस्टर्ब व्हायला?" असं विचारत आशानं चहाचा कप रामच्या हातात दिला व त्यानं दूर सारलेलं वर्तमानपत्र वाचायला घेतलं. ठळक बातम्यांवर नजर टाकून आशा स्थानिक पुरवणीकडे वळली; वाचता वाचता चक्क ओरडलीच. "राम, ही बातमी वाचलीस का?" बाथरूमकडे जाणारा राम दचकून थबकला. परत येऊन आशाच्या हातातील पेपर घेऊन तिनं बोट ठेवलेली बातमी वाचू लागला-

'मुंबई, दि. ४ नोव्हेंबर: गेली दोन वर्षे स्वित्झर्लंडमधील बर्न ह्या गावातील एक स्विस जोडपे त्यांनी दत्तक घेतलेल्या भारतीय वंशाच्या मुलाच्या नातेवाईकांच्या शोधात आहे. मुंबईच्या पोलिस उपआयुक्तांच्या कार्यालयातून मिळालेली माहिती दांपत्याने वार्ताहारांना उपलब्ध करून दिली. एक जुने छायाचित्रही दाखवले.जीर्णावस्थेतील तो फोटो पिवळा पडला आहे व चेहरेही नीट ओळखू येत नाहीत. फोटोत दोन मुले एका ट्रकशेजारी उभी असलेली दिसतात. ते घरातून पळून आलेले सख्खे भाऊ होते. पोलिसांना अनेक वर्षांपूर्वी ती मुले मुंबईत - वडाळा स्टेशनजवळ - ट्रकखाली झोपलेली असताना सापडली होती. त्या दोघांची कायदेशीर रवानगी दोन वेगवेगळ्या अनाथाश्रमांत झाली होती आणि त्यांचा संबंध नंतर तुटला. धाकट्या भावाचे नाव लक्ष्मण होते. कोर्टाने त्याला अनाथाश्रमात भरती होण्यासाठी, रावले हे आडनाव दिले. पुढे, ह्या स्विस दांपत्याने लक्ष्मणला दत्तक घेतले आणि लक्ष्मण रावलेचा ख्रिस बेकर झाला. बऱ्याच वर्षांनी हा ख्रिस व त्याचे आईवडील ख्रिसच्या भावाच्या, 'दादाच्या' शोधात आहेत. मोठ्या भावाला आपण 'दादा' म्हणत होतो ह्या व्यतिरिक्त ख्रिसला आपल्या कुटुंबाबद्दल इतर काहीही माहिती नाही.'

रामने बातमी वाचली, आशाकडे पाहून होकारार्थी मान हलवली आणि वर्तमानपत्र टेबलावर ठेवून तो बाथरूमकडे वळला.

-----

कमोडवर बसलेल्या प्राचार्य राम गावंडेच्या नजरेसमोर रेल्वेगाडीतील तीसेक वर्षांपूर्वीच्या रात्रीची आठवण तरळली; राम-लक्ष्मणामधील तो संवाद आठवला.

"लक्षा, तुझं आडनाव काय?"

"माहीत नाय."

"लक्षा, तुझ्या गावाचं नाव काय?"

"ठावं नाय."

"लक्षा, तुझ्या बापाचं नाव काय?"

"आऽऽन्ना."

राम तेव्हा हसला होता. प्रश्न होता, तो त्याने स्वत: चूप राहण्याचा; लक्षाला तर ह्या गोष्टी माहीतदेखील नव्हत्या. कोणी त्यांची माहिती विचारली तर हीच उत्तरं आता त्यालाही द्यायची होती; घरी परतायचं नव्हतं, ते मात्र पक्क ठरलं होतं. म्हणून तर घरातून पळून ते दोघं भाऊगर्दीत, रेटारेटीत, रेल्वेपॅसेंजरच्या त्या डब्यात एका मोठ्या गाठोड्याच्या आडोशाला बसले होते.

नंतर दोघांनाही झोप लागली होती.

-----

"अरे, पण का नाही भेटायचं लक्ष्मण भावजींना?" दोन दिवस उडवाउडवीची उत्तरं देणाऱ्या रामला ब्रेकफास्ट घेताना आशानं विचारलं. "बरीच कारणं आहेत. तू कशाला उगाच त्रास करून घेतेस?"

रामच्या दुर्लक्ष करण्यानं आशा अधिकच चिडली. "अरे, असं काय करतोस? माझ्यापासून तू आजवर काहीही लपवून ठेवलेलं नाहीस; असं तू नेहमी म्हणतोस तरी. कुठलाही महत्त्वाचा निर्णय घेताना आपण चर्चा करतो. मग, ह्याच विषयावर निर्णय घेण्यापूर्वी माझ्याशी चर्चा का टाळतोस?"

"ड्रेसिंगटेबलच्या ड्रॉवरमध्ये बंद लिफाफ्यात पत्र आहे, ते वाच." असं सांगून राम घराबाहेर पडला.

रामची गाडी निघाल्याचा आवाज ऐकला व आशाने पत्र वाचायला सुरुवात केली.

*नोव्हेंबर ७*

*प्रिय आशा,*

*मला माहीत आहे, तू माझं मन जाणून घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहीस. त्यावर तुझं मत पण तू सांगणार, त्यावर चर्चा करणारच! म्हणून हे पत्र. आजवरची संपूर्ण कथा सविस्तर सांगतो; जोडीला, माझ्या निर्णयामागची कारणं.*

*आपली ओळख होण्यापूर्वीचा माझा इतिहास, किमान सर्व ठळक व महत्त्वाच्या गोष्टी, लग्न ठरण्यापूर्वी मी तुला सांगितल्याच होत्या. कदाचित, काही गोष्टी तुला आज स्पष्टपणे आठवणार नाहीत. मात्र, निर्णयामागचे माझे विचार स्पष्ट होण्याकरिता ती पार्श्वभूमी गरजेची आहे. माझ्या निर्णयप्रक्रियेत सामील होऊन तू योग्य दृष्टिकोनातून विचार करशील, अशी मला माझ्या आशाकडून आशा आहे.*

*आमचे वडील दारुडे होते. मनमाडजवळच्या एका खेड्यात आमची थोडी शेती होती. पण, बेताचं उत्पन्न आणि दारूवरचा खर्च ह्यामुळे आईच्या नशिबी दोन वेळचं जेवण सोडाच, रोज रात्री मारच आल्याचं मला स्मरतं. रोजची रडारड व दारिद्र्य पाचवीला पुजलेलं!*

*एक दिवस मी चिडून आईला म्हणालो, "घरातून पळून जाईन मी एखाद्या दिवशी." ती काऊन म्हणाली होती, "जा बाबा जा; जाताना लक्ष्याला न्यायला इसरू नगस रं बाबा!" तिनं हे सारं वैतागून म्हटलं असणार. पण, त्या दिवसापासून पळून जाण्याचा विचार माझी पाठ सोडेना. तिथं राहून तरी काय भलं होणार होतं? रात्री, उरलेली एखाद-दुसरी भाकरी आमच्याबरोबर वाटून खावी लागत होती बिचारीला, कधी कधी तर नुसतं पाणी पिऊनच मार खायला सामोरं जावं लागायचं तिला!*

*मी असेन दहा-बारा वर्षांचा, अन् छोट्या लक्षाला घेऊन कुठे जाणार होतो मी पळून? रोज ह्या विचार सतावायचा. एक दिवस संध्याकाळी फिरत असताना स्टेशनवर पसेंजर थांबलेली दिसली. लक्षाला हाक मारली अन् मी स्टेशनकडे निघालो. दोन-अडीच वर्षांचं पोर ते, "दादा, दादा" करत झोपडीबाहेर आलेलं मी पाहिलं. क्षणभर थबकलो. परत स्टेशनकडे जाणार, तोच माघारी फिरलो, त्याला कडेवर घेतलं अन् पळत-पळत गाडी गाठली.*

*गर्दीत दाटीवाटीत आम्हाला झोप लागली. रात्र तर उलटली कशीबशी. नुकतंच उजाडत होतं. बहुतेक सर्व गाडी नंतर आलेल्या स्टेशनवर उतरली, आम्हीही उतरलो; गर्दीबरोबरच स्टेशनाबाहेर आलो. मिरची-मसाल्यासाठी आईनं दिलेली रुपयाची नोट खिशात होती. स्टेशनाबाहेर रहदारीला सुरुवात झाली होती. एवढी माणसं मी प्रथमच पाहत होतो. लक्षा तर भेदरलाच होता, केव्हा भोकाड पसरतो त्याचीच मला भीती होती. येणारा-जाणारा प्रत्येक जण जणू पळत होता, आपापल्या उद्योगात मग्न होता. कोपऱ्यावर आडोशाला आम्ही थांबलो. शेजारच्या चहाच्या टपरीकडे लक्षा आशाळभूतपणे पाहत होता. एक ग्लास चहा व पाव घेऊन मी रुपया दिला. ऐंशी पैसे परत आले. नाश्ता झाला.*

*दिवसभर इकडे-तिकडे फिरलो. दुपारला परत चहापाव झाला. एका म्हातारीला टॅक्सीतून सामान काढायचं होतं. तिनं हाक मारली. मी मदत केली. पावली मिळाली. त्या पैशाचा लागलीच वडा-पाव घेऊन आम्ही सदुपयोग केला. इकडे -तिकडे, कडेकडेनं, रहदारी बघत आम्ही नंतर फिरत राहिलो; कोणाचंही आमच्याकडे लक्ष*

गेलं नव्हतं. दिवेलागण होत होती. मोठमोठ्या दुकानांच्या पाट्यांवर प्रकाश पडत होता. मी चक्रावलो होतो. ती मुंबई होती हे मला काही दुकानांच्या पाट्यांवरून कळलं. काही वेळेला लक्षा माझ्यामागे फरफटत येत होता. एरवी, रमतगमत, त्याच्या गतीने आम्ही फिरत होतो. एके ठिकाणी रस्त्याच्या कडेला बरेच ट्रक उभे होते. तेवढ्यात,एकानं ट्रकमधून सीट ओढून बाहेर काढली, ट्रकखाली ढकलली व हाताची उशी करून तो आडवा झाला. शेजारी कुठंतरी भजी तळली जात होती. तो वास नाकात शिरून सतावत होता, भुकेची आठवण करून देत होता. भजी व पाव खाऊन, पाणी पिऊन आम्हीसुद्धा एक ट्रक शोधला, रात्रीसाठी आडोसा जवळ केला. थकलेल्या जिवांना झोप कधी लागली, कळलंच नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी कोणीतरी काठीनं मला ढोसत होता. निळ्या डगल्यातील तो इसम माझ्यावर खेकसला, "बाहेर ये." मी लक्षाला उठवलं. आम्ही दोघं ट्रकखालून बाहेर आलो. लक्षा रडायला लागला. लक्षात आलं की तो निळा डगलेवाला पोलिस होता. आत्तापर्यंत बघेही जमा झाले होते. लक्षाच्या रडण्यामुळे कुणीतरी पोलिसांना फोन केला असणार. काही वेळानं एक पोलिस जीप आली. त्यात बसून आम्ही ठाण्यावर पोचलो.

पुढे काय काय झालं हे मी तुला सांगितलंच आहे. थोडक्यात म्हणजे, आठ-दहा दिवसांत आमची व्यवस्था वेगवेगळ्या अनाथाश्रमांत झाली. मला परगावी पाठवण्यात आलं; लक्षा मुंबईतच कुठेतरी गेला. नंतर मात्र आमचा संबंध कायमचा सुटला, तो आजतागायत.

ज्या अनाथाश्रमात मी पोचलो त्यांनी माझी शाळेची व्यवस्था केली, मला पहिलीत घेतलं. वर्गातील मुलं माझ्यापेक्षा खूप लहान होती. प्रगती बघून काही महिन्यात मला दुसरीत बसायला सांगितलं गेलं. अभ्यास आणि अनाथाश्रमातील जमतील ती कामं करत करत दोन वर्षांत मला चौथीच्या स्कॉलरशिपच्या परीक्षेला बसण्याची संधी मिळाली. त्या परीक्षेतील यशामुळे मी मुख्याध्यापकांच्या विशेष नजरेत आलो. अनाथाश्रमातील वागणूकही चांगली होती. काम असायचं, पण मुख्य आधार होता तो म्हणजे आश्रय, स्वच्छ धड कपडे व पोटभर चारी-ठाव जेवण; माझ्या घराच्या पार्श्वभूमीवर अनाथाश्रम मला एक स्वर्ग वाटला.

काही वर्षांनी झालेली एसएससीची परीक्षा मला कठीण गेली तरी शास्त्र व गणित ह्या विषयांत मला चांगले मार्क मिळाले. मुख्याध्यापक व अनाथाश्रमाच्या संचालकांनी साहाय्य केलं व इंजिनीअरिंगच्या डिप्लोमाला मला ॲडमिशन मिळाली. त्यांनी हॉस्टेलमध्ये माझ्या निवासाची सोय केली. लागणारा पैसा त्यांनी कसा उभा केला ह्याची तेव्हा मला कल्पना नव्हती, पण नंतर त्यांच्याकडूनच ती माहिती मला कळाली. डिप्लोमाला माझा पहिला नंबर आला व अनायासे दोन वर्षांत डिग्रीसुद्धा घेण्याची संधी उपलब्ध झाली. एरवी, ते शक्य झालं नसतं, पण त्या दोघांनी आणखी दोन वर्षं कळ सोसायचं ठरवलं. फायदा सगळ्यांचाच झाला; कसं ते सांगतो.

डिग्री घेतल्यामुळे मला बऱ्या पगाराची नोकरी मिळाली. पहिल्या पगारातून काही भेटवस्तू खरेदी करून मी गुरुवर्यांकडे गेलो. मुख्याध्यापक माझ्याबरोबर निघाले व आम्ही, तोवर निवृत्त झालेल्या, अनाथाश्रमाच्या संचालकांच्या घरी पोचलो. त्या दोघांनीही माझ्या भावनेची कदर केली. माझ्या भेटवस्तूंचा स्वीकार केला. थोड्याफार गप्पा झाल्यावर नि:संकोचपणे त्यांनी पैशाच्या हिशोबाचा विषय काढला व माझ्या एसएससीनंतरच्या शिक्षणासाठी वीसेक हजार रुपये आजवर खर्च झाल्याचं सांगितलं. ते पैसे त्यांनी मित्रपरिवारांच्या नियमित वर्गणीतून, परत-बोलीच्या करारावर, भिशीसारखे, गोळा केले होते, हे सुद्धा त्यांनी माझ्या नजरेस आणून दिलं.

प्रथम मला सारंच खटकलं. पण सारासार विचार केल्यावर त्यांच्या मदतीचं मूल्य लक्षात आलं. बऱ्या पगाराची नोकरी सुरू झाली होतीच, त्यामुळे पैसे बाजूला ठेवणं सोपं गेलं. मी बँकेत एक रिकरिंग डिपॉझिटचं खातं उघडलं व तीन वर्षांनंतर एकदा पंचवीस हजारांचा चेक घेऊन मी त्या दोघांना भेटायला गेलो. मध्यंतरी मला कॉलेजात लेक्चररची नोकरी लागली होती. नेहमीसारखी विचारपूस व गप्पा झाल्या. नंतर आठ दिवसांनी त्यांचा मला परत फोन आला. त्यानुसार, मी गेलो. दोघांनी, दरम्यान, मी पैसे परत केल्याचं इतरांना सांगितलं होतं. त्या आठवड्यात झालेल्या त्यांच्या चर्चेनुसार मला असं सांगण्यात आलं, की त्या कोणालाही ते पैसे नको होते. उलट, त्यात काही भर घालून ती रक्कम ते मला परत देऊ करत होते; माझ्याच कॉलेजातील एखाद-दुसऱ्या होतकरू विद्यार्थ्यांचं शिक्षण मी करावं म्हणून!

थेंबाथेंबानं तळं कसं साचतं ह्याचं दुसरं समर्पक उदाहरण मला देता येणार नाही. मी आजवर मदत केलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यानं माझ्यासारखीच नोकरी लागल्यावर परतफेड केली; खरं तर, मूळ मुद्दलात भर घालून. वाढत वाढत बऱ्यापैकी रक्कम जमा झाली होती. तीन वर्षांपूर्वी कॅम्पस रिक्रुटमेंटसाठी आलेल्या अधिकाऱ्यांकडून एका कारखानदाराला ह्या अनौपचारिक प्रथेची माहिती कळली.

तोपर्यंत जमा झालेल्या रकमेच्या चौपट रक्कम त्याने एकहाती देणगी म्हणून देऊ केली. आज त्या कारखानदाराच्या आईच्या नावानं ती रक्कम औपचारिक-रीत्या होतकरू विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी वापरली जाते; निव्वळ व्याजातून काही मुलांच्या शिक्षणाची पूर्ण व्यवस्था होते.

अनाथाश्रमात दाखल करण्यासाठी कोर्टानं मला फुले हे आडनाव बहाल केलं होतं, हे तुला माहीतच आहे. फुलेचा मी गावंडे झालो, ते तर तुझ्या समोरच, मदतीनंच. मूळ आडनाव काय होतं ते आज मला नीट स्मरत नाही, कदाचित ते आठवण्याचा मी जाणूनबुजून प्रयत्न करत नसेन. न्यायालयाने दिलेलं आडनाव जरी फुले होतं तरी मी शेड्युल्ड कास्ट आहे किंवा नाही, हे काही कोणत्याही न्यायालयाला सिद्ध करता आलं नाही. त्यामुळे, तोपर्यंतच्या आयुष्यात आरक्षणाचा फायदा मला कधीच मिळाला नव्हता. परंतु, फुले ह्या आडनावाच्या संदर्भात, प्रथम ओळख झाल्यावर, अभिजन समाजातील लोकांच्या चेहऱ्यावरचा बदलणारा भाव माझ्या परिचयाचा झाला होता. नोकरीला लागल्यावर काही दिवसांनी तुझी ओळख झाली. त्या भेटीत अपेक्षित असा तो 'चेहऱ्यावरचा फरक' मला जाणवला नाही. ओळख वाढली व मैत्रीचं रूपांतर प्रेमात झालं. आपण लग्न करायचं ठरवलं, तेव्हा "अजून दोन वर्षं तरी मी लग्न करू शकत नाही, कारण मला शिक्षणासाठी झालेलं कर्ज फेडायचं आहे", असं मी तुला सांगितलं होतं. तुझ्या घरच्यांना पण त्यावेळेस आपलं प्रकरण माहीत नव्हतं. त्यांना कळल्यावर होऊ शकणाऱ्या घटनांचा अंदाज मला होता. प्रत्यक्ष आईवडिलांनी जरी, समजा, परिस्थिती मान्य केली, तरीही तुझे इतर नातेवाईक माझं आडनाव, जात ह्यांबद्दल त्यांना खोचकपणे विचारतीलच, ह्या गोष्टीची मला खात्री होती.

म्हणूनच, आडनाव बदलण्याचा निर्णय मी घेतला व गावंडे हे नाव निवडलं. एक तर ते तुझ्या जातीतलं होत व दुसरं म्हणजे, फुले ह्या आडनावावरून आजवर फुकटची होणारी लोकांतील चर्चा त्यामुळे टाळली जाणार होती. पुढे, कायदेशीररीत्या मी नाव बदललं, आपलं लग्न झालं, बदलीतून मी गाव बदललं व आज आपण नव्या समाजात स्थिर होऊन सुखानं जगतो आहोत. नोकरीबरोबर अध्ययन करून मी पीएच.डी. झालो व आता प्राचार्य पदावर पोचलो आहे. हे सारं विचारपूर्वक, कष्टानं आपण साधलं आहे. आपल्या मुलीला तर ह्यातलं बरंच माहित सुद्धा नाही; आणि पुढे-मागे कळलं तरी फार फरक पडणार नाही. कारण, तिच्यात गरजेचा आत्मविश्वास निर्माण झाला आहे; निवडलेल्या समाजात आजवर ती सुखात रमली आहे. शर्वरी चांगल्या शाळेत शिकते आहे; तिला कोणतीच झळ पोचलेली नाही, तुझीही नोकरी चालू आहे.

ह्या सर्व गोष्टी तुला माहीतच आहेत. परंतु, सविस्तर पद्धतीनं केलेल्या मांडणीवरून आजच्या आपल्या परिस्थितीचा अंदाज यावा व त्या पार्श्वभूमीवर लक्षाबाबतच्या माझ्या निर्णयप्रक्रियेचं तुला आकलन व्हावं, त्याचसाठी ही सारी उठाठेव.

निर्णयप्रक्रियेत मी विचार केलेली कारणमीमांसा आता सादर करतो.

निर्णय घेण्यापूर्वी संपूर्ण समस्येचा सर्व बाजूंनी साधक-बाधक विचार झाला पाहिजे; भावना महत्त्वाच्या असल्या तरी प्रश्न निव्वळ भावनांचा नसतो. मला वाटलं नसेल का, की लक्षाला कडकडून मिठी मारावी; त्या 'भरतभेटी' साठी मी कायमच आसुसलेला असतो.

लक्षाच्या भूमिकेतून विचार करणंसुद्धा गरजेचं आहे. इतक्या वर्षानंतर त्याला नातेवाईकांचा शोध घ्यावासा का वाटला? मला सारं आठवतंय, थोडंफार गावसुद्धा. लक्षाचं तसं नाही. स्वित्झर्लंडला गेला तेव्हा तो जेमतेम तीन-चार वर्षांचा असेल; गावाची, नातलगांची त्याची नाळ पूर्णपणे तुटली होती. वंशाबद्दल जेव्हा प्रश्न उद्भवत नाही तेव्हा पूर्वजांना महत्त्व नसतं. पण, 'मूळ' जेव्हा अज्ञात असतं तेव्हा मात्र 'कुळा' चा शोध सुरू होतो. लक्षाची ही भेटण्याची इच्छा अशीच कुतूहलापोटी निर्माण झाली असणार. खरं तर, फार थोड्यांना निर्माण झालेलं असं कुतूहल आयुष्यभर भेडसावतं. बहुतेक जण मात्र थोड्याफार प्रयत्नांनंतर इतिहासाबद्दलचं कुतूहल विसरून जातात, वर्तमानात रमतात, भविष्य त्यांना साद घालतं; आणि मी तर म्हणेन ते योग्यच आहे. लक्षाच्या बाबतीत तसं होण्याची शक्यताच जास्त!

लक्षाच्या आत्ताच्या शोध घेण्यामागे दुसरंही एक कारण असू शकतं; घरातून पळून जाण्याबाबतची त्याची प्रतिक्रिया. त्या गोष्टीला मी जबाबदार होतो. म्हणजे, प्रतिक्रियेतून जो काही राग-लोभ त्याला वाटला असेल, तो माझ्याबाबतचा असणार. त्याला काय वाटत असेल? मी त्याला घरापासून तोडला का त्याच्या आयुष्याचं भलं केलं, त्याच्यावर उपकार केले. ही पूर्णतया मानसिक बाब आहे, ज्याच्या त्याच्या परिस्थितीनुसार होणाऱ्या तात्त्विक वैचारिक बैठकीवर ते अवलंबून आहे. ह्यांतील पहिलं कारण असेल, तर भेट टाळणंच दूरगामी विचारातून योग्य वाटतं.

आजच्या त्याच्या सुस्थितीमुळे, परतफेडीच्या

*भावनेतून त्याला उपकारकर्त्याला मदत करायची तीव्र इच्छा निर्माण झाली आहे, असं समजूया. आपल्याला काही गरज आहे का अशा मदतीची?*

*तू काय व शर्वरी काय, आजवर तुम्हाला कधी लक्षाची उणीव जाणवली नाही; शर्वरीला तर लक्षा नावाचा अपाला कोणी काका ह्या जगाच्या पाठीवर आहे, ह्या गोष्टीची कल्पनासुद्धा नाही. लक्षा भेटून वा न भेटून तुम्हा दोघींच्या आयुष्यात काय फरक पडणार आहे? उलट, तो भेटला तर शर्वरीच्या नाना प्रश्नांना उत्तरं शोधावी लागतील.*

*कदाचित, अशा भेटण्यामुळे त्यातून निर्माण होणाऱ्या संबंधांमुळे दोन्हीकडून अपेक्षा निर्माण होतील व त्यांचा भंग झाला तर कडवटपणा येऊ शकेल; तुझ्या-माझ्या संबंधातसुद्धा!*

*भविष्यात शर्वरीकरिता परदेशी आधार मिळेल, लक्षाकडे परदेशी जायला मिळेल, मित्रपरिवारात टेंभा मिरवता येईल, ही कारणं क्षुल्लक वाटली तरी तसा विचार देखील मनात येऊ शकतो. मात्र, ह्या उथळ गोष्टींची भुरळ पडण्याइतके आपण छचोर नाही.*

*एकदा का आम्ही भेटलो की ती बातमी माध्यमांकरिता 'ब्रेकींग न्यूज' ठरेल, वणव्यासारखी पसरेल, त्या वणव्यात आपण ओढले जाऊ. सुरुवातीला काही वेळ तो ज्वालांचा लोळ प्रसिद्धीचा झगमगाट वाटेल, नंतर मात्र आगीची धग आपल्याला सहन होणार नाही, आपलं विश्वच जळून भस्मसात होईल. मला असं वाटण्याचं कारण म्हणजे अशा गोष्टी मी अनुभवल्या आहेत, इतिहास परत अनुभवण्याची गरज मला वाटत नाही.*

*मी सारं विसरलो आहे. थोडीफार 'नशिबावर मात केल्याची' भावनासुद्धा आहे, अहंकार म्हण हवं तर, पुरुषार्थ साधल्याचं समाधान आहे. भावनेच्या आहारी जाऊन भेटण्याच्या ऊर्मीला आवर घालणं सोपं नाही. पण विचारांती, आहे त्या परिस्थितीत मी सुखी आहे, मुख्य म्हणजे समाधानी आहे.*

*कुतूहलापोटी काही दिवस लक्षा शोध घेईल व तोही त्याच्या त्याच्या आयुष्यात, त्याच्या विश्वात रमून जाईल!*

*नाव बदललं- दोनदा, गाव बदललं- ते सुद्धा दोनदा. हे प्रकरण चिघळलं तर आता परत स्वत:पासून दूर पळण्याची हिंमत माझ्यात नाही, मीही आता चाळिशीचा झालो आहे. वस्तुस्थितीबाबत अशी नाउमेदीची भाषा नको असेल तर तीच बाब व्यक्त करण्याकरिता मी म्हणेन, 'बसलेल्या फांदीवर कुऱ्हाडीचा घाव घालण्याइतका मी नतद्रष्ट नाही.' बघणाऱ्याच्या दृष्टिकोनानुसार प्रत्येकानं कोणतंही लेबल चिकटवावं, पण माझा निर्णय जवळजवळ पक्का झाला आहे. तुला गरज वाटल्यास तुझ्याबरोबर चर्चा करायला मी तयार आहे. तू बऱ्याचदा दुर्लक्षित राहिलेला एखादा नवीन मुद्दा काढतेस; तुझ्याबरोबरच्या चर्चेचा फायदा होतो हे मी जाणतो, मानतो. आता तूच स्वतंत्र विचार कर आणि तसा काही मुद्दा सापडला नाही तर, बाईसाहेब, कृपया माझ्या निर्णयावर शिक्कामोर्तब करावं, ही विनंती.*

*तुझाच राम*

-----

दोनेक तासांनी फेरफटका मारून गावंडेसर घरी पोचले व स्वत:जवळच्या किल्लीने लॅच उघडून हॉलमध्ये शिरले तेव्हा तलत महमूदच्या गाण्याची सीडी सुरू होती. दुपारच्या जेवणाची तयारी झालेली दिसत होती. टेबलावरच्या काचेच्या छोट्या बादलीत, बर्फात, बियरची बाटली पण विसावली होती. जवळच्या कोचावर कादंबरी वाचत आशा पहुडली होती. रामचं पत्र व मूळ लिफाफा चुरगळून कोचाच्या पायाशी पडलेला होता!

रामला बघून हसतहसत आशा उठली आणि रजिस्टर्ड पोस्टानं आलेला एक सीलबंद लिफाफा रामच्या हातात देत, भुवया उंचावून, मान तिरकी करत आशा म्हणाली, ''दादांचा फोन आला होता, बहुतेक तीच बातमी ह्या पाकिटात बंदिस्त असणार.''

रामनं लिफाफा उघडला आणि त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद आशानं टिपला; दोन वर्षांकरिता राम गावंड्यांची आस्ट्रेलियातील एका विद्यापीठात संशोधन करण्यासाठी झालेल्या निवडीची बातमी त्या लिफाफ्यात बंदिस्त होती.

-----

टेबलावर बसून जेवताना रामच्या ग्लासमधील बियरचा एक 'सिप' घेत आशानं म्हटलं, ''त्या दिवशी कॉलेजातून परतल्यावर एका माणसाचं जेवणात लक्ष का नव्हतं, त्या गोष्टीचा उलगडा मात्र मला अजून झालेला नाही.''

''खरंच की, गेल्या दोन दिवसांत लक्षाच्या बातमीमुळे त्या विषयावर आपलं बोलणंच झालं नाही आणि कोणत्याही बाबतीत सविस्तर माहिती मिळून चर्चा झाल्याखेरीज बाईसाहेबांना बियर गोड लागणार नाही, हे मी विसरलोच.'' असं सांगत, वर्ग-प्रतिनिधीच्या निवडणुकीदरम्यान कॉलेजच्या मुलांनी घातलेल्या गोंधळाचा रामनं उल्लेख केला.

''हे तर नेहमीचंच आहे की.'' आशाच्या ह्या प्रतिक्रियेवर त्याला आलेल्या संतापाच्या कारणाचा रामनं खुलासा केला. ''हो, पण ह्या वर्षी पोरांनी प्रचारात

जातीच्या राजकारणाचा वापर केला आहे!''

''म्हणजे?'', आशानं विचारलं. ''त्याचं काय झालं,'' रामनं सविस्तर हकिगत सांगायला सुरुवात केली ''ह्या वर्षी तिघं जण निवडणुकीला उभे आहेत. त्यातील एक मुलगी आहे; पण, खरी लढाई आहे ती इतर दोन स्पर्धकांतच. त्यांतील कामसू व योग्य उमेदवार म्हणजे प्रदीप बर्वे; अभ्यासात साधारणच आहे पण इतर ॲक्टिव्हिटीजमध्ये नेहमी पुढे असतो. गेल्या वर्षी ज्युनियर असूनही त्यानं एकांकिका स्पर्धेचं छान नियोजन केलं होतं. दुसरा आहे तो सुनील जाधव.'' असं सांगून रामनं मुद्याच्या विषयाला हात घातला. ''प्रदीप ब्राह्मण आहे, त्या संदर्भात प्रचार सुरू झाला. आडून-आडून कुजबुज होत होती तेव्हा मी थोडंफार दुर्लक्ष केलं. पण, ज्या दिवशी मी चिडलो होतो, त्या सकाळी कॅम्पसमध्ये काही पोस्टर्स चिकटवली गेली होती व त्या पोस्टर्समध्ये जातीवरून भाष्य केलं गेलं होतं. आपापसात मुलांची थोडी बोलाचाली, बाचाबाची झाली. कॉलेजबाहेरची काही मुलं दुपारी आली आणि झालेल्या मारामारीत एकाला बऱ्यापैकी लागलं, पोलिस आले आणि कंप्लेंट पण नोंदवली गेली.''

''पुढे काय झालं?'' आशाच्या ह्या प्रश्नावर रामनं त्याच्या डिस्टर्ब होण्याचं समर्थन केलं. तो म्हणाला, ''प्रकरण मिटलं, पोलिस कंप्लेंटही मागे घेतली गेली. संध्याकाळी वर्गात मुलांशी मी संवाद साधला. संवाद कसला, चांगलाच चिडलो होतो मी सुरुवातीला. हळूहळू समजावलं, पटवून दिलं त्यांना; त्यांचं काय चुकलं होतं, व का, ते स्पष्ट केलं. सर्वांनाच ते पटलं का नाही ह्याची मात्र मला खात्री नाही. प्राचार्य म्हणून माझी जबाबदारी फक्त व्यवस्थापकीय आहे, असं मी मानत नाही. ह्या मुलांना पुढील आयुष्यासाठी शिदोरीसुद्धा शिक्षणसंस्थांनी दिली पाहिजे. इथे आम्ही कमी पडतो की काय, हे माझ्या त्या दिवशीच्या उद्विग्नतेचं खरं कारण होतं.''

-----

काळभोरांनी दिलेली 'केस-स्टडी' वाचून पंढरीनाथ उठले. मित्रमंडळींबरोबर चर्चा करण्यासाठी त्यांच्याजवळ आता बरीच सामग्री उपलब्ध झाली होती; विषयाची उकलही समाधानकारक झाल्याचं त्यांना जाणवलं. सामाजिक बांधिलकीची उणीव, नागरिकत्वाबाबत नित्य अनुभवास येणारी समाजातील उदासीनता, ह्यांकडे दुर्लक्ष करून रस्त्यावर कचरा फेकणारे, ट्रॅफिक नियम न पाळणारे आपले मित्र भलत्याच मूल्यांवर निरुपयोगी चर्चा करत होते, हे मित्रांना पटवून देण्याकरिता पंढरीनाथ आता 'सज्ञान' झाले होते.


पंढरीनाथांना एक कल्पना सुचली. समाजातील परस्परावलंबन, त्यानुसारची नागरिकत्वाची व सामाजिक मूल्ये, विभाजनवादी वृत्तीला खतपाणी घालणारे राजकारणी, वगैरे गोष्टींचा सार्थ अर्थ उमगलेल्या समाजात प्रत्येकाचं, आणि म्हणूनच परस्परांचं, रोजचं जीवन कसं सुखकर होतं ह्या विषयावर एक औपचारिक भाषण संघात द्यावं, असं पंढरीनाथांना वाटलं. विसर पडू नये म्हणून लागलीच पंढरीनाथ लिहायला बसले. त्यांनी गरजेच्या ठिकाणी विवेचन साधण्यासाठी, मुद्दा पटवण्यासाठी 'केस-स्टडी'तील उदाहरणं घेऊन एक टिपण तयार केलं. पुढच्या महिन्याच्या ज्येष्ठ नागरिक संघाच्या बैठकीची पंढरीनाथ आतुरतेनं वाट पाहू लागले.

**– सु. गो. तपस्वी**
ए-३/१९, मीनल गार्डन्स, पटवर्धनबाग,
एरंडवणे, पुणे. ४११ ००४.
०२०-२५४६ ३५१८, २५४१ ०१४५.

*दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!*

**कुंजल इन्टरप्राईजेस**

बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स
रेती, विट, पाणी टँकर व जे.सी.बी. भाड्याने मिळेल.



**श्री. भुपेश रा. राऊत**
९९६०६९७८५६/७
६८७५९१

**मुजबादेवी स्टोन क्रशर**
सर्व प्रकारची १ नं.,२,३,४ खडी व डबरचे उत्पादक
स्टँप पेपर उपलब्ध

सफाळे पश्चिम रेल्वे फाटकाच्याशेजारी,
टेंभिखोडावे रोड, एस.टी. डेपोसमोर,
ता. पालघर, जि. ठाणे ४०११०२

# माझ्या सासुबाईंच्या मैत्रिणी

वसुमती धुरू

माझ्या सासुबाई, सुमतीबाई बाळाराम धुरू (माहेरच्या हिराबाई जीवानजी धुरू) यांचा जन्म १९०० सालचा. त्या गृहिणी होत्या. त्याही एकत्र कुटुंबातल्या. दादरच्या प्रसिद्ध धुरू घराणातल्या. त्यांचे एकटीने कधीच कुठे जाणेयेणे नसे. तरी त्यांना इतक्या मौत्रिणी कशा, हे एक नवलच! पण होत्या एवढे खरे. पुतळबाई तळपदे, रतनबाई गोरेगांवकर, यमुनाबाई कोरे, सुंदराताई पाटील, माणकबाई राणे, आनंदीबाई सातघर, जनाबाई कोठारे, लक्ष्मीबाई कोरगावकर... किती म्हणून नावे सांगायची? यातल्या थोड्या त्यांच्या लहानपणीच्या शाळेतल्या मैत्रिणी, योगायोगाने पुढील आयुष्यात पुन्हा भेटलेल्या. पण बहुतेक जणी मात्र पतीच्या मित्राची पत्नी ती आपली मैत्रीण, या नात्याच्या. या सर्वजणींनी माझ्यावर फार प्रेम केले. लाड केले. कदाचित आपल्या मैत्रिणीची सून ती आपली सून असे असेल. कदाचित् एवढी शिकलेली (म्हणजे मुंबई विद्यापीठाची बी.एस्सी.!) असून नोकरी धंदा न करता (हेही कौतुकाचे कारण?) सासूच्या हाताखाली सालसपणे राहते हे कारण असेल. कादाचित प्रेम देणे हा त्यांचा स्वभावधर्म असेल, कदाचित या सर्वांचा मिश्र परिणाम असेल. मला वाटते, सासूच्या मैत्रिणींकडून इतके लाड करून घेण्याचे भाग्य फारच थोड्या स्त्रियांना लाभत असेल. त्यापैकी मी एक आहे, याचा मला अभिमान वाटतो.

**रतनबाई आप्पाजी गोरेगांवकर.** आयुष्यभर त्यांनी आम्हा सर्वांचे भरपूर कौतुक केले. माझा एकदा दूरदर्शनवर काही कार्यक्रम होता, तेव्हा रतनबाई ९२ वर्षांच्या होत्या जराजर्जर होत्या. पण खुर्ची घेऊन बसल्या आणि संपूर्ण कार्यक्रम लक्ष देऊन पाहिला, ऐकला! नातवंडा-पतवंडांनी विचारलं, ''आजी, एवढं काय बघतेस? तुला काय कळतंय त्यात?'' त्यावर त्या म्हणाल्या, ''अरे, तुम्हाला काय कळणार आमचं नातं? ती माझी आहे. सून म्हणा, मुलगी म्हणा, तिचा कार्यक्रम नाही मी पाहणार तर पाहणार तरी काय?'' आणि हे त्यांनीच मला कौतुकाने सांगितले.

दुसरी विशेष मैत्रीण म्हणजे **यमुनाबाई कोरे**. यांना आमच्या घरी 'कॉमिक मावशी' म्हणत. त्यांची भावजय आणि त्या एकमेकीला 'झाशीची राणी' म्हणत. त्यांच्या मते त्या दुर्गा खोटेंसारख्या किंवा काकणभर अधिक सरस होत्या. मला वाटते, ही सर्व विशेषणे त्यांना शोभत होती.

सदृढ शरीरप्रकृती, सावळा वर्ण पण अतिशय रेखीव चेहरा, गालात गोड खळ्या, विनोदी पण हजरजबाबी बोलणे, स्वयंपाकात कुशल, रोजचा घरचा आणि लग्नघरचा पाचशे माणसांचा मटण-मासे, केशरीभात असा साग्रसंगीत स्वयंपाकही लीलया पार पाडीत. बायकांच्या झिम्मा-फुगडीपासून क्रिकेटसारख्या मर्दानी खेळात पण त्या आघाडीवर असत. क्रिकेट त्यांच्या रक्तात असावे. त्यांचा भाचा पद्माकर चुरी आणि मुलगा जनार्दन कोरे हे

आपापल्या काळातले नावाजलेले क्रिकेटर होते.

''काय सांगू वसू तुला? आमच्या काळात बायकांना उत्तेजन नव्हतं अजिबात. नाहीतर मी दुर्गा खोटेला कधीच हरवलं असतं आणि सुनील गावस्करला तर उभंच राहू दिलं नसतं! खरं बोलते मी!''

१९१० साली त्यांच्या माहेरच्यांनी त्यांना दादर सोडून चर्नीरोडच्या चंदारामजी गर्ल्स हायस्कूलमध्ये घातले होते हे विशेष. माझ्या सासुबाईंच्या त्या वर्गमैत्रीण.

''काय सांगू वसू तुला? तुझी सासू म्हणजे नुसतं लाजाळूचं झाड. ११ व्या वर्षी लग्न झालेलं. सासरी जाच नव्हता पण धाक भरपूर. पायांत ब्राह्मणी जोडा, नऊवारी इरकली लुगडं, बंद गळ्याचा आणि लांब बाह्यांचा ब्लाऊज, त्यावर लोकरी शाल गुंडाळलेली, ऊन-पाऊस असो-नसो डोक्यावर छत्री हवीच! (वाटेतल्या टारगटांच्या नजरांपासून संरक्षण करण्यासाठी?) आता त्या पोरीनं तो लुगड्याचा बोंगा सावरायचा की खांद्यावरची शाल, की हातातली छत्री, की पुस्तकं? तिला घरून (आगरबाजार) दादर स्टेशनवर सोडायला घरची गाडी येत येई, पुस्तकं धरायला आणि सोबत म्हणून एक विश्वासू नोकर असे बरोबर. तिचा रस्ता माझ्या घरावरूनच जाई. मग मी थोडीच सोडणार! वाटेत मी त्या गाडीत बसायची, माझी पण पुस्तकं त्या नोकराकडे देऊन ऐट मिरवायची. ट्रेनमध्ये सुद्धा तिच्याबरोबर सेकंड क्लासमध्ये बसायची खुशाल! कुठल्या तिकीट चेकरची हिम्मत होईल माझं तिकीट तपासायची? (त्या काळी आगगाडीला पहिला, दुसरा, मध्यम आणि तिसरा असे चार वर्ग असत. बहुतेक लोक तिसऱ्या वर्गानेच प्रवास करत. सेकंड क्लास (दुसरा वर्ग) श्रीमंतांचा समजला जाई.) शाळेत पोचल्यावर काय, आधीच तुझी सासू रूपानं सुंदर, त्यात एवढ्या लहान वयात लग्न झालेली आणि लाजरीबुजरी. सारी शाळा तिच्या भोवती जमायची कौतुक करायला!''

या असल्या गप्पा, त्यासुद्धा हातवारे करून, आवाजात चढउतार करत रंगवून सांगितलेल्या. त्या ऐकायला आम्ही आतुरतेने त्यांच्याभोवती जमलो नाही तर नवल.

यमुनामावशी त्यांच्या घरात आणि त्यांच्या एकूण समाजात अग्रेसर होत्या. मला वाटते, की त्यांना जर आजच्यासारख्या संधी उपलब्ध झाल्या असत्या, तर त्या खूप काही करू शकल्या असत्या.

**जनाबाई कोठारे**

कोठारेमंडळी ही खानदानी मुंबईकर. अगदी अस्सल आणि अव्वल. त्यांचे घर मुंबईच्या प्रसिद्ध महालक्ष्मी मंदिराच्या लगतच होते. लगत म्हणजे खरोखरीच लगत. महालक्ष्मी मंदिर एका टेकडीवजा खडकावर बांधलेले आहे. त्याच खडकात पण जरा खाली कोठाऱ्यांचे घर, बांधलेले नाही म्हणता येणार, पण कोरून काढलेले होते. बाहेरून खडक पण आत सुंदर सुसज्ज बंगला. भरपूर खोल्या. प्रत्येक खोलीच्या खिडकीतून बाहेरच्या समुद्राची दिसणारी निरनिराळी रूपे. कधी शांत, गंभीर, अथांग. कधी मिश्कीलपणे तुषार उडवणारा, कधी रौद्र रूप धारण करणारा. त्या अभेद्य घराच्या सुरक्षित कोंदणात बसून ती रूपे न्याहाळायला खूप मजा वाटायची.

पुढे, एकदा मी मिल्वॉलीला (U.S.A.) दीराकडे गेले होते. त्याने मला तेथील एक प्रसिद्ध टुरिस्ट ॲट्रॅक्शन पाहायला नेलं. The House on Rock. कुणा हौशी माणसाने भल्या मोठ्या खडकात कोरून काढलेले ते नाविन्यपूर्ण घर सर्वांना थक्क करून सोडते. मलाही ते फार आवडले. ते पाहताना मला महालक्ष्मीच्या कोठाऱ्यांच्या घराची आठवण झाली.

त्या सर्वदृष्टींनी निराळ्या घरात कोण राहत होते? माधवराव कोठारे व पत्नी सौ. जनाबाई कोठारे. त्यांची दोन मुले. डॉक्टर झालेली, माझ्या वयाची मुलगी विनत आणि तिच्या पाठचा भाऊ रमेश. आणि श्री. कोठारेंच्या चार वयस्कर बहिणी. मोठी विधवा. बाकी सर्व अविवाहित. आणि मोठ्या बहिणीची कन्या यमा (यमुना!). ती रूपाने सुंदर होती. किंग जॉर्ज गर्ल्स स्कूलमध्ये शिक्षिका होती. तिचे लग्न का झाले नाही, की तिने केले नाही, माहीत नाही. पण नऊ जणांच्या आणि सात स्त्रियांच्या त्या मोठ्या कुटुंबात सौभाग्यवती स्त्री एकट्या जनाबाई. सदा हसतमुख, कर्तबगार, अनभिषिक्त सम्राज्ञी!

माधवराव कोठारे हे माझ्या सासऱ्यांचे मित्र. साहजिक त्यांच्या पत्नी जनाबाई या माझ्या सासुबाईंची मैत्रीण झाल्या. शिवाय, त्या दोघी लहानपणी काही दिवस चंदारामजी गर्ल्स स्कूलमध्ये एकत्र शिकत होत्या. त्यामुळे मैत्री अधिक घट्ट झाली.

त्यांच्याकडे भाद्रपदात गणपती येत असे. तोही उत्सव इतरांपेक्षा निराळाच. भल्या थोरल्या दिवाणखान्यात मध्यभागी (इतरांप्रमाणे भिंतीशी किंवा कोन साधून कोपऱ्यात नाही.) एका मोठ्या टेबलवजा चौरंगावर गणेश-मूर्तीची स्थापना करीत. सभोवती इतरांप्रमाणे आराशीचा पसारा नसे. फक्त दोन मोठ्या समया आणि समोर पूजेचे सामान, नैवेद्य इतकेच. त्यामुळे गणपती अगदी उठून दिसे. प्रसादही थोडा निराळाच. पेढे, घरी केलेले. अगदी दूध आटवून, खवा बनवण्यापासून सगळे त्या घरी करीत. दोन

भले मोठे पेढे बटर पेपरमध्ये गुंडाळून पाहुण्यांना देत. (तेव्हा झिप लॉक बॅग नव्हत्या) गणपतीसाठी घरातील सर्व स्त्रियांना (विनतसोडून, कारण ती पाचवारी साडी नेसत असे) खास ऑर्डर देऊन काढवून घेतलेल्या जरीकाठी नऊवारी साड्या असत. जनाबाईंपासून सर्वांना एकसारख्या. दरवर्षी गणपतीला नवीन साडी. सर्वजणी त्या दिवशी हौसेने घडी मोडत. इतकी हौस आणि एकात्मता दुसरीकडे पाहिली नाही.

विनतचं लग्न जमलं. ती डॉक्टर आणि भावी वर वकील. माझ्या सासुबाई मैत्रिणीला म्हणाल्या, ''अगं, तुझा जावई पाहिला नाही आम्ही अजून. दाखव तरी एकदा.''

जनाबाई हसून म्हणाल्या, ''असे कसे दिसतील जावईजी! बघणं कराचं, मग मिळेल जावई बघायला.''

''बघणं म्हणजे?'' इति माझ्या सासुबाई.

''म्हणजे होणाऱ्या जावयाला मानाने आमंत्रण देऊन आपल्या घरी बोलवायचं. थाटामाटाचं जेवण कराचं. जावयाला नवे कपडे करायचे आणि हौसेनं हा समारंभ बघायला आपल्या नात्यागोत्यातली चार मंडळी बोलवायची. याला म्हणतात, 'जावई बघणं.' '' जनाबाईंनी कौतुकाने सांगितले.

''ऐकावं ते नवलंच बाई!'' सुमतीबाई (माझ्या सासुबाई) म्हणाल्या, ''सूनमुख बघताना नव्या नवरीच्या हातात काही सोनंनाणं घालावं लागतं, हे माहीत आहे. सगळीकडेच तशी रीत आहे. पण पुरुषाचं असं कौतुक नव्हतं बाई ठाऊक!''

''अगं, आमच्याकडे अशीच पद्धत आहे. हे तर काय, पण लग्न जमल्यापासून पार पडेपर्यंत आणि पुढे वर्षसण होईपर्यंत हे कौतुक चालूच असतं. दर सणाला जावयाला पोशाख, काहीतरी भेटवस्तू पाठवायची. बरोबर बर्फीचा थाळा, फळांची डाली (करंडी) आणि सरंग्याची कोडी, एवढं पाठवावंच लागतं व्याह्यांकडे.''

''सरंग्याची कोडी म्हणजे?'' सरंग्याची केवळ जोडीच (२ सरंगे) माहीत असलेल्या सासुबाईंनी विचारलं.

''कोडी म्हणजे २० नग!''

''वीस नग! वीस पापलेट? करतात काय एवढ्या सरंग्यांचं?'' सुमतीबाईंनी आश्चर्याने विचारले. कारण संरगा ऊर्फ पापलेट हा महागाचा मासा आहे आणि कोणताही मासा ही ताजीताजीच खायची चीज आहे. साठवून ठेवायची नव्हे.

''अगंऽऽऽ एवढं सगळं एकट्यानं कसं खातील? त्यातली बर्फी, फळं, पापलेटं आपापल्या जवळच्या लोकांना भेटी पाठवाच्या आणि व्याह्यांकडून आलं म्हणून मोठेपणा सांगाचा.''

''कुठला तुमचा मोठेपणा आणि कुठली तुमची रीत! अनाठायी खर्च सगळा!'' माझ्या सूर्यवंशी क्षत्रीय सासुबाई उत्स्फूर्त उद्‌गारल्या. मैत्रिणीच्या तोंडावर असे बोलायला मैत्री खरोखरीच जिवाभावाची असली पहिजे.

मला पहिल्या वेळी दिवस गेले तेव्हा सातव्या महिन्यात जनाबाईंकडून भेट आली. मला काळ्या रंगाची (दृष्ट लागू नये म्हणून काळा रंग?) भरजरी लाल किनारीची, अंगात जरीची गच्च बारीक चौकडी असलेली साडी आणि 'ह्यांना' स्टेनलेस स्टीलचा ट्रे, सरबताचे दोन ग्लास, ट्रेमध्ये खाज्यांच्या गुलाबाचा हार! खाजी म्हणजे खास पद्धतीचे पाकातले चिरोटे. गुलाबाच्या फुलांप्रमाणे हुबेहूब दिसणारे, फिक्या गुलाबी रंगाचे, नाजूक फुलाफुलांचे तेपण खऱ्या हारांप्रमाणे खाली मोठे, वर वर हळुहळु छोटे होत गेलेले आणि मध्यभागी रुळणारे एक भले मोठे खाजे, त्याच्या दोन बाजूला पानांच्या आकाराची दोन लांबट पोपटी रंगाची खाजी. हे सारे स्वतः हातांनी बनवलेले. एकूणच भेट पाठवणारीच्या हौसेची, प्रेमाची आणि कलात्मकतेची साक्ष पटवणारी!

त्यांची एक खासियत म्हणजे काजूवड्या. त्या काजूची बर्फी किंवा काजूकतली म्हणत नसत. चांगले दळदार काजू आणायचे. ते भिजतील इतक्या दुधात रात्रभर भिजत घालायचे. सकाळी पाट्यावर (तेव्हा मिक्सर-ग्राईंडर नव्हते) स्वतः जातीने बारीक वाटायच्या. मग त्याबरोबरीने थोडी साखर, वेलची घालून आळवून वड्या पाडायच्या. लागोलग दुपारी तीन-साडेतीन वाजता महालक्ष्मीहून निघून आमच्याकडे ताज्या-ताज्या 'काजीच्या वड्या' घेऊन यायच्या. समोर दिसेल त्याच्या हातात डबा द्यायच्या. ''घे, तुम्हाला आवडतात नं, म्हणून आणल्या आहेत.''

घरातला एकुलता एक तरुण म्हणजे रमेश. त्या सर्व वयोवृद्ध आत्यांना त्याचे केवढे कौतुक. सर्वांच्या आनंदाचं आणि आशा-आकांक्षांचे तोच निधान. सकाळी ब्रेकफास्टला बसला तरी सर्वजणी लुडबुडायच्या, ''रमेश, तुला हे हवं का? रमेश, तुला ते आणून देऊ का?'' नुसता बोवाळ.

रमेशचे लग्न झाले. सुरेख सून मिळाली. त्यांच्या रीतीप्रमाणे जावयाचे सर्व कोडकौतुक झालेच असणार. ''नथ केलीय सुनेला, तिला आवड आहे, मला आवड आहे. तिचं नाक रेखीव आहे. मग का नको?'' त्या कौतुकाने सांगत होत्या.

रमेशला मुलगी झाली. नाव बकुल ठेवले. हाक

मारत 'बकुळी'. पहिली बेटी, धनाची पेटी. खूप लाड झाले बकुळीचे. काही वर्षांनी बकुळीच्या पाठीवर भाऊ आला. त्या हौशी कुटुंबातला पहिला नातू. इस्टेटीला वारस. त्याचे कोडकौतुक काय विचारता! थोड्या दिवसांनी बाळंतीण रीतीप्रमाणे विश्रांतीला आणि अधिक कौतुक करून घ्यायला माहेरी गेली. दिवाळीच्या पाडव्याच्या शुभमुहूर्तावर ती बाळाला घेऊन घरी परतणार होती.

पाडव्याच्या दिवशी लवकरच आरत्या वगैरे आटपल्या. माधवराव क्रॉफर्ड मार्केटला गेले. नव्या नवेल्या नातवासाठी केवढेतरी नवे कपडे, तऱ्हतऱ्हेची खेळणी आणण्यासाठी. झालेच तर व्याह्यांकडे भेट देण्यासाठी मिठाईच्या टोकऱ्या, फळांच्या डाल्या. खरेदीच्या उत्साहात वेळेचे भान राहिले नाही. मध्येच घड्याळात बघतात तर बारा वाजून गेलेले. बाप रे! हे सर्व सामान घेऊन ते घरी पोचतील तेव्हाच ना रमेश त्या भेटी घेऊन सासूरवाडीला जाईल. बायको-मुलांना घरी आणायला. लगबगीने टॅक्सी करत ते घरी पोचले.



टॅक्सीतून उतरतात तो त्यांच्या दाराशी बरीच गर्दी दिसली. ''कमाल आहे! बाळाला बघायला एव्हांशीच मंडळी जमली आहेत तर. बरे झाले म्हणा. नाहीतर एवढं सामान आपण एकटच्याने कसे वर नेले असते? कोणालातरी हाक मारली.

पण हे काय? मंडळी आपल्याकडे अशी चमत्कारिक का पाहतायत ?'' कोणीतरी त्यांचा हात धरला आणि घराकडे घेऊन चालले. हे काय चाललंय? घरी मयत वगैरे झालं की काय? माझी एखादी वयोवृद्ध बहीण? देवा रे!

घरी जातात तो वैऱ्यावरही येऊ नये असा प्रसंग. तरण्याबांड रमेशचा मृतदेह समोर होता. ''काय झालं? काय झालं'' ते वेड्यासारखे पुनःपुन्हा विचारू लागले. काही नाही. बाळाला आणायला जाण्यासाठी रमेश तयार झाला आणि म्हणाला, ''मला जरा कससंच होतंय. बाथरूममध्ये गेला. तर

भडभडून उलटी झाली आणि तिथेच कोसळला. डॉक्टर म्हणाले, ''ही इज नो मोअर विथ् अस्!''

जनाबाईंनी कसे हे दुःख गिळले, कसे स्वतःला समजावले, सांभाळले, त्यांचे त्यांनाच माहीत. माधवराव आणि त्या सर्व आत्यांनादेखील जनाबाईंनीच सावरले, एवढे खरे. काळ कुणासाठी थांबत नाही. काही दिवसांनी सून पण दोन्ही मुलांना घेऊन घरी आली. जनाबाईंनी तिन्ही नातवंडांना अतिशय ममतेने वाढवले. स्वतःही बाहेर जात, त्यांनाही घेऊन जात. म्हणत, ''मुलांवर नको दुःखाची छाया. त्यांना आनंदात वाढू देत.''

माझ्या सासुबाईंना भेटायला आमच्या घरीपण वरचेवर येत. दुपारी तीन-साडेतीन वाजता येत. त्यावेळी बसला गर्दी नसे म्हणून. येताना बहुधा छोटी बकुळी बरोबर असायची. इतके दुःख गिळून त्या दुपारदुपार येतात याचा मला संकोच वाटे. त्या म्हणत, ''मग काय करू? मैत्रिणीला पाहावंसं वाटलं, तुमची सर्वांची खबरबात घ्यावीशी वाटली की येते. तुझ्या सासूची आहे का हिम्मत मला भेटायला येण्याची? उभा जन्म घरात बसून गेला तिचा.'' जनाबाईंचे म्हणणे खरे होते, पण म्हणजे माझ्या सासुबाई दुःखात, जाचात वगैरे नव्हत्या काही. त्या रूपाने देखण्या होत्या. सौभाग्यवती, पुत्रवती (चार पुत्र व एक कन्या) होत्या. माहेरहून जमीनजुमला, धनदौलत घेऊन सधनतर घरी आल्या होत्या. पण त्यांच्या खानदानी शालीनपणाच्या कल्पनेप्रमाणे त्या एकटीने कधीच कुठे घराबाहेर पडल्या नव्हत्या, एवढेच. कधी नव्हे ते आता पतीनिधनानंतर कुठे जाणार?

यावरून एक गमतीशीर (की खेदजनक? ऐकणाऱ्याच्या दृष्टिकोनावर अवलंबून) आठवण आली. माझी नणंद अंबाल्याहून (पंजाब) थोडे दिवस माहेरी आली होती. तिला भेटायला तिची मैत्रीण आमच्याकडे आली होती. मैत्रीण कोल्हापूरची खानदानी मराठा. नलूताईंनी बराच आग्रह केल्यानंतरच माझ्या सासुबाई त्या पाहुणीला भेटायला आपल्या रूममधून बाहेर हॉलमध्ये आल्या. नलूताई मोठेपणाने म्हणाल्या, ''काकांना (त्या वडिलांना काका म्हणत.) जाऊन वर्षं होत आलं पण आई काही त्यांच्या रूममधून बाहेर येत नाहीत.'' मैत्रीण आढ्यतेने उत्तरली, ''हो ना. आमच्या मासाहेब तर पप्पासाहेब गेल्यावर पाच वर्षं घराबाहेर पडल्या नाहीत!'' मुलींना मोठा अभिमान!

या पार्श्वभूमीवर जनाबाई किती वेगळ्या उठून दिसत होत्या. पती गेले. पुत्र तर आधीच गेला होता. त्या एकटीने धैर्याने किल्ला लढवत होत्या. धैर्याने आणि हसतमुखाने. त्या चारही आत्या एकेक करून गेल्या. नंतर ते आगळे वेगळे घरही त्यांना सोडावे लागले. सरकारने ताब्यात घेतले की बिल्डरने विकत घेतले कुणास ठाऊक? पण ते सोडून त्या जवळच एका अपार्टमेंटमध्ये फ्लॅट घेऊन राहायला लागल्या. त्या व्हिनस अपार्टमेंटमधूनही त्या वरचेवर आमच्याकडे येत. संध्याकाळी आम्ही त्यांना सोडायला जात असू. मला म्हणत, ''कशाला गं त्याला ऑफिसमधून आल्या आल्या त्रास देतेस? जाईन की मी बसनं.''

त्यांच्या-माझ्या पण खूप आपुलकीच्या गोष्टी चालत. एक दिवस त्या माझ्या सासुबाईंना म्हणाल्या, ''सुमती, तुझ्या सुनेचा स्वभाव मला अगदी पटला बघ. मनात काही आडपडदा नाही तिच्या. किती मोकळेपणानं बोलते, वागते.'' ऐकून मलाच नवल वाटलं. इतकी मी मनमोकळी आहे? माझ्या मैत्रिणींशी तरी बोलते का इतके मनातले? बरे, त्यांचा स्वभावही खोचक, भोचक तर नाहीच; पण सूचकसुद्धा प्रश्न विचारण्याचा नव्हता. मग, वयाचे अंतर विसरून एवढी कशी मी बोलते त्यांच्याशी? मला वाटते की काही माणसे अशी असतात की त्यांचा नुसता सहवास आपल्याला बोलतं करतो.

अशाच एक दिवस त्या आल्या. बोलता बोलता म्हणाल्या, ''अगं, माझ्या सुनेचं लग्न ठरलं. चांगला मिळाला गं तिला. दोन्ही मुलांची जबाबदारी घ्यायला तयार आहे तो. बरं झालं नं. मुलांना बाप मिळाला. माझी चिंता मिटली.'' एखाद्या आईने मुलीच्या पुनर्विवाहाविषयी बोलावे तशा त्या बोलत होत्या.

सून आणि नातवंडे त्यांच्या नव्या घरी गेली. आता व्हिनस अपार्टमेंटमध्ये राहणार कोण? एकट्या जनाबाई? जन्मभर सगळ्यांना सांभाळणाऱ्या, एकट्या राहणार?

त्या मुलीबरोबर लोणावळ्याला की खंडाळ्याला गेल्या.

जनाबाई, तुमचे ते आगळेवेगळे वैशिष्ट्यपूर्ण घर गेले. चोवीस तास साथ देणारी समुद्राची गाज गेली. घरभर माणसे होती, ती गेली. ते निसर्गनियमाला धरूनच झाले म्हणा, पण एकुलता एक लाडका लेक अकाली गेला. त्याची मुले आनंदात आहेत. तुम्हाला मात्र दुरावली. मुंबई बेटाच्या आद्य रहिवाशांपैकी मानकरी तुम्ही! शेवटी मुंबईसुद्धा सोडावी लागली. शेवटी, मग उरले काय तुमच्याकडे?

उरले तुमचे आंतरिक समाधान. सर्व कर्तव्ये पार पाडल्याचे आणि त्या आंतरिक प्रकाशात उजळून निघालात तुम्ही जनाबाई!

**लक्ष्मीबाई कोरगांवकर**

कोरगांवकर घराणे गोव्याचे. ते लोक बरीच वर्षे मुंबईत स्थिर झालेले असावेत. कोरगांवकरकाका बडे इन्कमटॅक्स ऑफिसर होते. नोकरी बदलीची होती. ते माझ्या सासऱ्यांचे मित्र असल्यामुळे त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई या आपोआपच माझ्या सासुबाईंच्या मैत्रीण झाल्या. लक्ष्मीबाईंचे घरगुती नाव आक्का. आक्कांच्या सासऱ्यांचे नाव बाबल व दिरांचे (वय वर्षे ५० च्या पुढे ) नाव बेनी! ही मंडळी प्रार्थना समाजिस्ट होती! बाबल कोरगांवकर हे प्रार्थना समाजाच्या कार्यात सक्रिय भाग घेणारे होते. 'प्रार्थना समाचार' नावाच्या त्या समाजाच्या मुखपत्रात ते नेमाने लिहीत. कादाचित संपादक असावेत. कोरगांवकर-काका पण त्यांत लिहीत. सुप्रसिद्ध प्रार्थना समाजिस्ट जस्टीस चंदावरकर यांच्या वर्तुळातले ते होते. स्वाभाविकच ते संपूर्ण कुटुंब खूप पुढारलेले, मोकळ्या मनाचे असे होते.

आक्का काकांच्या पुढे होत्या. त्या पाचवारी साडी नेसत. खूप सुंदर नसल्या तरी आकर्षक चेहरा, प्रमाणबद्ध बांधा, सदा हसतमुख, पुष्कळ बोलणे, पण त्यात आत्मप्रौढीचा लवलेश नसायचा. त्यांना तीन मुलगे होते. मोठा विजय, मधला दिलीप आणि धाकटा प्रताप. मुलगी नव्हती.

कॅप्टन विजय कोरगांवकरची आई हीच त्यांची जगाला असलेली ओळख. विजय एअरइंडियात पायलट-कॅप्टन-होता. त्या काळी म्हणजे १९५०च्या आधी भारतात वैमानिक ही जरा नवलाईची व मोठ्या बहुमानाची चीज होती.

माझे तेव्हा नवीनच लग्न झाले होते. रुग्णाइत सासऱ्यांना सकाळी ब्रेकफास्ट नेऊन देण्याचे काम माझ्याकडे होते. एक दिवस ऐन दिवाळीच्या दिवसांत, मी नेहमीप्रमाणे ब्रेकफास्ट ट्रे घेऊन त्यांच्या रूममध्ये गेले. तो सासऱ्यांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहत होते. बाजूला सासुबाई सून्न बसल्या होत्या. समोर पेपर पडला होता. त्यांनी पेपरकडे बोट दाखवले. मी उचलला. पहिल्या पानावर ठळक बातमी, संपूर्ण आठ कॉलमभर होती. ''एअर इंडियाच्या 'मलबार प्रिन्सेस' विमानाला स्विस आल्प्स अपघात. कोणीही बचावले असण्याची शक्यता नाही. कॅप्टन विजय कोरगांवकर पायलट होते. (३ नोव्हेंबर १९५०)

मी दिग्मूढ होऊन उभीच राहिले. मित्राच्या तरुण कर्तबगार मुलाचा अपघाती मृत्यू! आणि तो स्वतःच विमान चालवत असताना ! (कमांडर ब्रिटिश होता.) यापुरते दुर्दैव कोणते? माझ्या सासू-सासऱ्यांच्या दुःखाला अधिक धार चढण्याचे कारण, त्यांचापण पहिला पुत्र (माझे दीर) पायलट होता. एअर-इंडियातच होता. जे.आर.डी. टाटांच्या प्रथमपासूनच्या विश्वासू सहकाऱ्यांपैकी होता. सिनियर कोरगांवकर आणि धुरू हे जसे मित्र होते, तसेच त्या दोघांचे प्रथम पुत्रही कॅप्टन विजय व कॅप्टन भालचंद्र हे मित्र होते. आणि विजयचा असा अपघाती मृत्यू झाला होता. खरं म्हणजे, त्या दिवशी, त्या विमानावर विजयची ड्युटी नव्हतीच. दुसऱ्याच कुणाची होती. पण त्या मित्राला काही कारणाने सुट्टी हवी होती, म्हणून विजय स्वखुषीने त्याच्याबदली गेला होता.

काही महिन्यांनी आम्ही कोरगांवकरांकडे समाचाराला गेलो. माझे सासू-सासरे, रवीन्द्र (माझे पती) व मी. एकमेकांना पाहिल्यावर त्या दोन्ही ज्येष्ठ पुरुषांच्या डोळ्यांत पाणी आले. त्यांनी ते निग्रहाने पुसून टाकले व काहीच दुःखदायक घडले नाही अशारीतीने बोला-वागायला सुरुवात केली.

कोरगांवकरकाका त्यावेळी नुकतेच नोकरीतून निवृत्त झाले होते. निवृत्तीवेतनांतून त्यांनी चेंबूरला मोठा ऐसपैस बंगला बांधला होता. त्याकाळी चेंबूर हवेचे ठिकाण मानले जाई. R.C.F. चा खत कारखाना झाला नव्हता. तीन मुलगे; त्यांची यथावकाश लग्ने होतील, सुना-नातवंडे येतील, भरपूर जागा हवी. विजय नोकरीच्या निमित्ताने लंडनला राहत होता. त्याचे लग्न झाले नव्हते, पण जमले होते. त्याला आवडतील अशा सर्व अद्यावत् सोयी नवीन घरात करून घेतल्या होत्या. आक्कांना हौस वाटेल तेव्हा त्यांना खास गोव्याच्या पद्धतीचा स्वयंपाक करता यावा म्हणून भल्या मोठ्या किचनच्या एका कोपऱ्यात तीही सोय केली होती. पाटा-वरवंटा, रगडा, सर्व काही.

सर्व काही हौसेने केले. पण आता विजय राहिला नव्हता. त्यांनी बंगल्याला 'विजय-स्मृती' नाव दिले. सर्व घर आम्हाला हौसेने दाखवले. आम्हालाच बघताना अवघडल्यासारखे वाटत होते.

नंतर आम्ही, म्हणजे आम्ही दोघे व दोघे धाकटे दीर त्यांच्याकडे पुष्कळदा जात असू. सासऱ्यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते व सासुबाई येत नसत. गेलो, की दोघेही आमचे इतके लाड, इतके कौतुक करत की मला तर अगदी लाजल्यासारखे होई. घरात किती खाऊ असला-आणि तो असेच- तरी तेवढ्यावर आक्कांचे समाधान नसे. काहीतरी ताजा पदार्थ करून खाऊ घालीत. अगदी आग्रहा-आग्रहाने. एकदा असाच त्यांनी काही गोड पदार्थ केला होता आणि आग्रहाने वाढत होत्या. मी उगाच संकोचाने, ''पुरे. मला गोडाची फारशी आवड नाही'' म्हणून म्हटले, तर लगेच ''हो, का? नाही कुणाकुणाला गोड आवडत; पण

माझ्याकडे तिखट काहीच नाही. थांब. तुला कोलंबीचे लोणचे आणि ब्रेड देते.'' असं म्हणून आक्कांनी बशीभर कोलंबीचे लोणचे आणि पावाच्या जाडजाड चार स्लाइज आणून दिल्या. त्या काळात पाव रेशनवर होता! कोलंबीचे लोणचे हा पदार्थ मी कधी खाल्ला तर काय, पण ऐकले सुद्धा नव्हता. ते रंगतदार झणझणीत लोणचे आजही आठवणीने जिभेला पाणी आणते. मला आवडले म्हटल्यावर आक्कांनी लगेच एका बाटलीत भरून लोणचं घरी न्यायला दिले आणि कसे बनवले याची कृती अगदी अथपासून इतिपर्यंत समजावून सांगितली. या मुलीला मुळात स्वयंपाकाची आवड आहे का, किंवा या विषयांत तिचा आवाका केवढा हा विचारसुद्धा त्यांच्या मनाला शिवला नसावा. आपल्या जवळ आहे ते हातचे न राखता दुसऱ्याला द्यावे एवढेच त्यांना ठाऊक. मी टेबलावर बसून संकोचत का होईना, आवडीने खात होते. माझ्या उजव्या बाजूला आक्का कोलंबीच्या लोणच्याची रेसिपी आणि खुबी समजावून सांगत उभ्या होत्या. डावीकडून पुरुषाचा आवाज येऊ लागला. बघते तर कोरगांवकरकाका हातात प्रार्थना-समाचार-पत्रिका घेऊन उभे. त्यातील त्यांना फार आवडलेला लेख मला समजावून सांगत होते. आपल्या एकूण समजाला अधिक बरे दिवस येण्यासाठी आपणा सुशिक्षित मंडळीचे कर्तव्य काय, सुशिक्षित तरुण स्त्रीला संसार सांभाळूनसुद्धा समाजासाठी काय करता येईल वगैरे. माझी अवस्था फारच अवघड झाली. मी ते रुचकर लोणचे खाऊ , की आक्कांचं ऐकू की काकांचं? दोघांचे विषय सर्वस्वी भिन्न असले तरी तळमळ तीच होती. एक मऊ मातीचा गोळा आपल्यापुढे बसला आहे. त्याला घडवून योग्य तो आकार देण्याची, अर्थात हे हेतुपुरस्पर नव्हतं. त्यांचे प्रेमळ अंतःकरण त्यांना ती प्रेरणा देत होते. माझी स्थिती अगदी अक्षरशः 'मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश' अशी झाली.


आणि हा अनुभव नेहमीच येत राहिला. कोरगांवकरांकडे जाणे मला दिवसेंदिवस फारच आवडू लागले असल्यास नवल नाही. कधीही गेले की आक्का माझ्या जिभेला व काका माझ्या विचारशक्तीला भरपूर खाद्य पुरवित राहिले. आक्कांनी कितीतरी पदार्थांची कृती लिहिलेली स्वतःची वही पण मला दिली आणि 'उतरून घे' म्हणून सांगितले. मटणाचे पुलाव, बिर्यानी कच्ची व पक्की, चायनीज फ्राइड राईस, तिखट भाताचेच किती प्रकार! तसेच मटणाचे. पारसी पद्धतीचे मटण, ज्यू पद्धतीचे, मोगलाई, साधे मुसलमानी वगैरे वगैरे. मला वाटते, माझा पाककृतींची पुस्तके लिहिण्याचा श्रीगणेशा तेथेच झाला असावा. एरवी ही मुलगी स्वयंपाकात (पाककला म्हणा, पाकशास्त्र म्हणा) एवढा रस घेईल हे माझ्या आई आणि आज्जीलासुद्धा खरे वाटले नसते.

आक्कांचा सर्वात धाकटा प्रताप मोठा झाला आणि एव्हिएशन इंजिनीअरिंगचे उच्च शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला गेला. आता त्या एवढ्या मोठ्या बंगल्यात आक्का, काका आणि दिलीप तिघेच राहिले. पण त्यांच्या बोलण्यात कधी निराशेची किंवा कुरकुरीची छटा डोकावली नाही.

॥ग्रंथाली॥

खंड १

महाभारतातील काही प्रसंग
विवेचन आणि रसग्रहण



अरुण जातेगांवकर । वासंती जातेगांवकर

मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये
घरपोच १४० रुपये

त्याची तिथून पत्रे येत तीसुद्धा ते कौतुकाने आम्हाला वाचायला देत.

ते दुसऱ्या महायुद्धानंतरचे दिवस होते. इंग्लंडमध्ये रेशनिंग होते. खाण्यापिण्याची चंगळ नव्हती, उलट हालच होते. आक्का येथून त्याला खाऊची पार्सले पाठवीत. एकदा गेले तेव्हा त्यांनी त्याला आवडतात म्हणून कांद्याची भजी केली होती. थालीपीठवजा चपटी आणि कडक तळलेली, पुष्कळ दिवस टिकावीत म्हणून. आणि दहीगी म्हणून प्रकार बनवला होता. जिलबीचे पण नेहमीप्रमाणे काढईत चाक न टाकता भज्यासारखी बोंडे तळून पाकात घातली होती! (नेहमीचे लाडू-चिवडा होतेच.) मला आश्चर्य वाटले म्हणून- या वस्तू इंग्लंडला जाईपर्यंत टिकतील? मी विचारले. ''हो. टिकतात. तो आवडीने खातो.'' आक्का उत्साहाने म्हणाल्या.

आणि एक दिवस प्रतापचे पत्र आले. त्याने आपल्या लॅण्डलेडीच्या मुलीशी-बेटीशी-लग्न केले होते. दोघांचा लग्नाचा फोटो पाठवला होता. काका मोठ्यांदा हसून म्हणाले, ''बेटीनं आपल्या बेट्याला गटवलं!''

प्रतापचे शिक्षण पूर्ण झाले. तो बेटीसह मुंबईत आला. काका-आक्कांनी भरपूर कौतुक केले. आक्कांनी तिला दागिने दिले. आपल्या भारी भारी साड्या दिल्या. काही नवीन घेतल्या. बेटी तर आनंदाने भारावूनच गेली. म्हणाली, ''माझ्या नातेवाइकांनी, मैत्रिणींनी या भेटी पाहल्या तर त्यांना वाटेल, मी कोणा संस्थानिकाशी लग्न केलं आहे. आक्का, अगं तू सगळं नको मला देऊन टाकूस. दिलीपच्या पण बायकोला ठेव ना काही.''

कोरगांवकरकाकांनी आपली बरीचशी कमाई त्या आलिशान बंगल्यात घातली होती. विजय भरपूर कमावत होता म्हणून त्यांना भविष्यकाळाची चिंता नव्हती. पण विजय तर गेला. दिलीपचा स्वतःचा व्यवसाय होता, त्यात त्याचा जम बसला होता. प्रतापची मुलंबाळे, वाढता संसार होता. वयोमानाप्रमाणे आणि आतल्याआत दडवलेल्या दुःखामुळे काकांची प्रकृती ठीक राहत नव्हती. डॉक्टरी खर्च वाढत होता. आता विजय-स्मृती बंगला परवडत नव्हता. विजय तर गेला. स्मृती राहणारच होत्या. त्यासाठी बंगलाच कशाला हवा?

बंगला विकून चेंबूरलाच चांगल्यापैकी पण आटोपशीर फ्लॅट घेतला. आम्ही तेथे गेलो. गेल्यानंतर आक्कांनी डोळ्यांना पदर लावला नाही. ''मोठी हौस केली गेली होती; पण देवाला नाही पाहावलं,'' असलं काही बोलल्या नाहीत. म्हणाल्या, ''बरं झालं की नाही देखभाल करायला पण सोपा आणि मुख्य म्हणजे प्रतापच्या मुलाला शेजारची मुलं खेळायला मिळतात!''

प्रतापला इथे नोकरी मिळाली, पण त्याच्या योग्य नव्हती. तो बायको-मुलांसह इंग्लंडला परत गेला. तिथून तो कॅनडात जाऊन स्थायिक झाला. कोरगांवकरकाका पण देवाघरी गेले. आता आक्का आणि दिलीप दोघंच राहिले. दिलीपने अजून लग्न केले नव्हते. मुली सांगून येत होत्या, पण दोघांच्या पसंतीस उतरेल अशी एकही नव्हती.

शेवटी दिलीपला मनासारखी बायको मिळाली. सुरेख सून आपल्या मैत्रिणीला दाखवायसाठी आक्का आमच्या घरी आल्या. बरोबर लग्नाचा आहेर, खाऊ वगैरे. नेहमीप्रमाणेच खूप आनंदात होत्या.

एरवीसुद्धा कधीही आमच्या घरी आल्या तर आक्का भला मोठा पायलीचा डबा (पायलीचा डबा म्हणजे ३ किलो धान्य मावेल एवढा) स्वतः केलेल्या खाऊने भरून आणत. त्यांच्या चविष्ट झुणक्यात शेवग्याच्या शेंगांचे तुकडे, भरपूर काजूगर, ओल्या खोबऱ्याचे काप असत. माझी चंगळ. पुष्पा आणि मी दोन दिवस तो झुणकाच जेवणाऐवजी पोटभर खात असू! त्यांच्या दिलीपला मात्र रोज जेवणावर बटाट्याची भाजीच लागे. शेवटी, वजन वाढते म्हणून त्यानेच ती बंद केली. हेही कौतुकाने त्या सांगत.

दिलीपचा सुका माशांचा एक्स्पोर्ट बिझनेस होता. गोव्यातून तो चालवणे जास्त बरे पडेल (ही मंडळी मूळची गोव्याचीच) म्हणून त्याने गोव्याला जाण्याचा निर्णय घेतला. तो पण आक्कांनी नेहमीसारखाच उत्साहाने सांगितला. गोव्याला गेल्यानंतर पत्रव्यवहार चालू होता. कधी मुंबईत आल्या तर आवर्जून भेटत. पुढे पुढे पत्रव्यवहार बंद झाला. भेट तर नाहीच.

एक दिवस ऐकले की दिलीपचा डायव्होर्स झाला. नंतर एक दिवस ऐकले की आक्का गेल्या!

आक्का तुमची आठवण येते.

---

**- वसुमती धुरू**
३७२, वीर सावरकर मार्ग,
दादर (प.), मुंबई ४०० ०२८
संपर्क - २४२२२१२४/२४३८६९०५




# अधिकार आणि दृष्टिकोन

## मुलाखत : प्रकाश परांजपे

दिनेश अफझुलपूरकर आय.ए.एस. परीक्षेत देशात दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. जबाबदारीच्या विविध पदांवर काम केल्यानंतर ते महाराष्ट्राचे मुख्य सचिव या पदावरून निवृत्त झाले. आज ते सामाजिक कार्यात व्यस्त असतात. 'शुश्रूषा' रुग्णालयाचे ते विश्वस्त आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या 'नागरी वारसा जतन समिती'चे अध्यक्ष आहेत. वास्तु-शास्त्राच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण इमारती आणि परिसर यांचे मूळ स्वरूप कायम राखण्यासाठी पालिका आयुक्तांना सल्ला देण्याचे काम या समितीमार्फत करण्यात येते. शिवसेना-भाजपा युतीच्या पहिल्या-वहिल्या सरकारमध्ये काम करणे हे एक मोठे आव्हान होते. अफझुलपूरकरांनी ते स्वीकारले. 'मुंबईतील चाळीस लाख झोपडवासीयांना मोफत घरे देणे' हे युती सरकारचे प्रमुख आश्वासन होते. मुंबई पोर्ट ट्रस्टचे अध्यक्ष असताना अफझुलपूरकरांनी ते प्रत्यक्षात उतरवण्यासाठी एक सविस्तर अहवाल तयार केला होता. विविध कारणांनी हे आश्वासन कागदावरच राहिले. निवृत्तीनंतर अफझुलपूरकरांची नेमणूक महाराष्ट्र शासनाचे 'रोजगार निर्मिती सल्लागार' या पदावर करण्यात आली. राजकीय नेतृत्व आणि शासकीय यंत्रणा यांच्यातील दृष्टिकोनाच्या समन्वयाअभावी त्यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण शिफारसी प्रत्यक्षात येऊ शकल्या नाहीत. सध्याच्या शासन-व्यवस्थेत सर्वसामान्यांच्या आकांक्षा कितपत फलद्रूप होऊ शकतील, या प्रश्नाला त्यांच्याकडे उत्तर सापडत नाही. नोकरशाही पूर्वीसारखी राहिलेली नाही अशी खंत मात्र ते जरूर बोलून दाखवतात. अफझुल-पूरकरांची १९६२ ते १९९७ या दरम्यानची कारकीर्द अनेक नाट्यमय घडामोडींनी परिपूर्ण आहे. त्यांच्याशी केलेली ही बातचीत.

*आपल्या कार्यकालातील एखादी हृद्य आठवण सांगाल का?*

माझ्या दृष्टीने अविस्मरणीय काळ म्हणजे मी साताऱ्याच्या जिल्हाधिकारीपदावरून दुष्काळ निवारणासाठी केलेले काम. यशवंतराव चव्हाण तेव्हा भारताचे गृहमंत्री होते. दुष्काळाचा तडाखा अभूतपूर्व होता. मागेल त्याला काम उपलब्ध करून देण्यासाठी मी प्रयत्नांची पराकाष्ठा करत होतो. एके दिवशी यशवंतरावांची साताराभेट ठरली. दुष्काळी वातावरणामुळे शासकीय यंत्रणेच्या कारभाराबद्दल त्यांना उत्सुकता होती. त्यांच्या उपस्थितीत लोकप्रतिनिधींची एक बैठक आयोजित करण्यात आली. मी काहीसा अस्वस्थ होतो. एक प्रकारे ही

माझी परीक्षाच ठरणार होती. एवढ्या मोठ्या कामात काही कमी-जास्त राहणे स्वाभाविक होते. अर्थात, माझ्या प्रयत्नांमध्ये कुठेच कसूर नव्हती. तरीही थोडीफार धडधड होती. बैठक सुरू झाली आणि वडूजचे केशवराव पाटील उठून म्हणाले, ''जिल्हाधिकाऱ्यांनी एवढे काम केलेले आहे की तक्रारीला जागाच नाही.'' माझा जीव भांड्यात पडला. यशवंतरावांनी माझ्या कामगिरीची आठवण ठेवली हे मला समजले लंडन येथील एका प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी शासनाने माझी निवड केल्यानंतर. लंडनला रवाना होण्यापूर्वी मी मुंबईत त्यांची आवर्जून भेट मागितली आणि त्यांनीही लगेच मला भेटीला बोलावले. क्षेमकुशल विचारल्यानंतर यशवंतरावांनी 'I am thankful for what you have done' असे उद्गार काढले आणि माझे मन भरून आले. एवढ्या ज्येष्ठ व्यक्तीने माझ्यासारख्या तरुण अधिकाऱ्याचे आभार मानल्याने माझ्या नजरेत ते आणखी मोठे झाले. त्या काळात शासनकर्ते आणि अधिकारी यांच्यात परस्परविश्वासाचे नाते असे. राजकीय ढवळाढवळ जवळपास नसेच. अधिकाऱ्यांना आपले परखड मतप्रदर्शन करण्याचे स्वातंत्र्य असे. अधिकारीही शासनाचे निर्णय अमलात आणण्यासाठी सर्वशक्तिनिशी प्रयत्न करत. म्हणूनच महाराष्ट्राचा प्रशासकीय लौकिक पसरला होता.

*आपण अनेक मुख्यमंत्र्यांबरोबर काम केले आहे. एखादा वैशिष्ट्यपूर्ण प्रसंग?*

मुख्यमंत्री म्हणून शंकरराव चव्हाण यांच्या दुसऱ्या कार्यकाळात (१९८६-८८) सीमाभागात वातावरण फारच तापले होते. कर्नाटक शासनाविरुद्ध वर्तमानपत्रे सातत्याने लिखाण करत होती. मराठी भाषकांवर अन्याय होत असल्याची त्यांची तक्रार होती. शंकरराव आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांची मुंबईतील 'सह्याद्री' बंगल्यावर बैठक ठरली. माहिती विभागाची जबाबदारी माझ्यावर होती. या बैठकीला मी हजर राहावे अशी सूचना मला मिळाली. ठरल्याप्रमाणे बैठक झाली. नंतर दोघा मुख्यमंत्र्यांची खासगी चर्चा सुरू झाली. दरम्यानच्या काळात बैठकीतील कामकाजाच्या आधारे मी दोघांच्या संयुक्त निवेदनाचा एक मसुदा तयार केला. वार्ताहर मोठ्या संख्येने जमल्यामुळे काहीतरी सांगावे



दिनेश अफझुलपूरकर

तर लागणार होतेच. परंतु प्रत्यक्ष बोलताना एखादा शब्द इकडेतिकडे झाला असता तरी बिकट परिस्थिती निर्माण झाली असती. मुख्यमंत्र्यांची खासगी बैठक संपली. 'वार्ताहरांना काय सांगायचे,' असा प्रश्न शंकररावांनी मला केला. मी मसुदा त्यांच्यासमोर ठेवला. पुन्हा दोघा मुख्यमंत्र्यांची चर्चा झाली. अखेर, मसुद्यातील एक शब्दही न बदलता ते संयुक्त निवेदन वार्ताहरांना देण्यात आले. तेव्हापासून शंकररावांनी सीमाप्रश्नाबाबत प्रत्येक चर्चेच्या वेळी मला हजर राहायला सांगितले. मी या प्रश्नाचा कसून अभ्यास केला. त्याच्या सर्व बाजू समजावून घेतल्या. एकदा, केंद्रीय गृहमंत्री बुटासिंग यांच्याकडे याबाबत बैठक आयोजित करण्यात आली. 'अफझुलपूरकर, तुम्हीच बोलायचे आहे,' असे मला शंकररावांनी सांगितले. साहजिकच मला थोडी चिंता वाटली. ती बरोबर टिपून शंकरराव म्हणाले, 'काळजी करू नका. मी आहेच.' त्यानंतर बुटासिंग यांच्यासमोर मी महाराष्ट्राची बाजू मांडली. माझ्या कामगिरीबद्दल शंकररावांनी समाधान व्यक्त केले. खरे तर, मी माझे कर्तव्य पार पाडले होते, पण शंकररावांनी मला शाबासकी देऊन मला कायमचे ऋणी करून ठेवले. आमच्या काळातील विशेष म्हणजे अधिकाऱ्यांना आपले म्हणणे स्पष्टपणे मांडण्याची मोकळीक असे.

*आपल्या अधिकारांचा वापर लोकहितासाठी करण्याची*

*एखादी संधी मिळालीच असेल...*

या संदर्भात मी मुंबईतील 'नाना पालकर स्मृती भवन' या वास्तूचा जरूर उल्लेख करतो. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सर्जन डॉ. अजित फडके यांच्या वडिलां-बरोबर माझ्या वडिलांची मैत्री होती. त्यामुळे आम्ही नेहमीच संपर्कात असायचो. डॉ. फडके वेळात वेळ काढून समाजकार्य करत असतात. मी मुंबई महानगर-पालिकेत अतिरिक्त आयुक्त असतानाची ही घटना आहे. आमचे वरिष्ठ द.म. सुकथनकर त्या काळात पालिकेचे प्रशासक होते. निर्वाचित सभागृह तेव्हा अस्तित्वात नव्हते. त्यामुळे स्थायी समितीचे अधिकार माझ्याकडे होते. तेव्हाही मुंबईत देशभरातून रुग्ण येत असत. परंतु त्यांच्या नातलगांना परवडेल अशी निवासव्यवस्था नव्हती. डॉ. फडके यांना या संदर्भात काहीतरी करण्याची इच्छा होती. अशा नाते-वाईकांची अल्प दरात निवासव्यवस्था करण्याची कल्पना त्यांनी माझ्यासमोर मांडली. अर्थातच यासाठी जागेची गरज होती. परळ भागात महापालिकेची काही जमीन उपलब्ध करून देता येईल असे माझ्या लक्षात आले. अपेक्षेनुसार ही जमीन देण्याच्या मार्गात अडचणी उभ्या करण्यात आल्या. परंतु माझे अधिकार वापरून मी त्या दूर केल्या. या वास्तूने हजारो गरीब लोकांना दिलासा दिला आहे. या कामात माझेही योगदान असल्याचे समाधान मला नक्कीच आहे.

अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. मला लगेच आठवणारी घटना म्हणजे पुण्यातून पंढरपूरकडे रवाना होणारी ज्ञानदेव-तुकाराम पालख्यांची दिंडी. मी पुण्याचा जिल्हाधिकारी असताना हा प्रश्न कायमचा सोडवणे मला शक्य झाले. उच्चवर्णीय आणि मागास अशा प्रकारचा वाद निर्माण होऊन त्या वर्षी काहीसा तणाव निर्माण झाला होता. परिस्थिती चिघळू नये म्हणून मी चर्चेसाठी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, कामगार संघटनांचे नेते आदी मान्यवरांना सहभागी करून घेतले होतो. तथापि वातावरण तापत गेले. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने जिल्हा दंडाधिकारी या नात्याने माझे अधिकार वापरून मी दिंडीची रचना केली. ती सर्वांना मान्य झाली. माझ्या माहितीनुसार आजतागायत तीच प्रथा पाळली जात आहे. जनभावनेचा विचार करताना शासनाची जबाबदारी आणि सामाजिक सलोखा यांचे भान कसे ठेवावे लागते याचा हा वस्तुपाठ ठरावा.

*आपण मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त होता. केरळ राज्याहूनही मोठा अर्थसंकल्प असलेल्या या महापालिकेचा कारभार बघताना कुठल्या अडचणींना तोंड द्यावे लागले? प्रशासकीय की राजकीय, की दोन्ही. पूर्वी एक आयुक्त आणि बाकीचे उपायुक्त हे उत्तमपणे कारभार बघत. आता तीन ते चार अतिरिक्त आयुक्त, डझनभर उपायुक्त अशी अधिकाऱ्यांची फौज असताना पालिकेची कार्यक्षमता वाढली आहे किंवा पूर्वीइतकीही राहिली आहे असे वाटत नाही. याबाबत आपण काय म्हणाल?*

कामे पूर्वीही काही रखडायची, आजही रखडतात. आज जसा विलंब होतो, तसा पूर्वीही होत होता. प्रशासकीय यंत्रणा मोठी झाली की अवजड होते तसे काहीसे झाले आहे, असे वाटते. अधिकारांचे वाटप करण्याची गरज आहे. अधिकार दिल्यानंतर त्या कामाबाबत संबंधित अधिकारी किंवा कर्मचाऱ्याला जबाबदार धरा आणि चांगल्या कामाचे कौतुकही करा. अशी व्यवस्था प्रशासनात आणली तर त्याला गती मिळायला अडचण येऊ नये. पालिका बरखास्त झाली त्या काळात मी महापालिकेत होतो. राज्याचे भावी मुख्य सचिव द.म. सुकथनकर हे तेव्हा मुख्य प्रशासक होते. त्यावेळी माजी नगरसेवक कामे घेऊन यायचे आणि योग्य असतील ती केली जात. माझ्याकडे अतिरिक्त आयुक्त म्हणून ऐंशी टक्के कामे होती. सेन्टॉर हॉटेलजवळ एका नाल्यावर अतिक्रमण करून जे बांधकाम उभे राहिले होते ते पाडले. त्यामुळे तेथे थोडा पाऊस पडला तरी पाणी साठायचे, हा प्रकार बंद झाला.

*प्रशासक आणि राजकीय नेते हे दोघे नेहमीच अमुक योजना आणू, तमुक योजना राबवू असे दावे करत असतात. प्रत्यक्षात फारसे काही होत नाही. यात अपयश कुणाचे? प्रशासकांचे की राज्यकर्त्यांचे?*

उत्तर अवघड आहे. दोघांचेही उद्दिष्ट एकच आहे. दुर्दैवाने, यंत्रणा वेगाने काम करत नाही. एखादे काम जिद्दीने पुरे करायचेच अशी ध्येयाने प्रेरित माणसे कमी आहेत. सध्या लोकांच्या कामांकडे लक्ष दिले जात आहे. शंभर टक्के यश हवे असेल तर जास्त प्रयत्न आणि मजबूत यंत्रणेची गरज आहे.

*तुमच्या वेळची नोकरशाही आणि हल्लीची यातील*

*फरक सांगाल? चांगल्या कंपन्यांमध्ये उत्तम संधी मिळत असल्याने तरुण आयएएस, आयपीएस, आयएफएसकडे कमी वळतात. यासाठी काय करावे असे आपण सुचवाल?*

आमच्या वेळी फारशी संधी उपलब्ध नसे, पण आता पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीमुळे शासकीय अधिकाऱ्यांना उत्तम वेतन व इतर फायदे मिळू लागले आहेत. यामुळे आता तरुणांचा ओढा या सेवेकडे वाढायला हरकत नाही.

*राज्य सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. आपण जिल्हाधिकाऱ्यांपासून राज्याच्या मुख्य सचिवपदापर्यंत काम केले आहे. आज मुख्य सचिव असता तर कुठली नावीन्यपूर्ण योजना राबवली असती? आपल्या मुख्य सचिवा-पर्यंतच्या सेवेत आपल्या कुटुंबाला प्रशासना-तील ताणतणावाचा फटका बसला का?*

माझ्या कुटुंबाला सेवेतील ताणतणावाचा फटका बसला नाही, पण मी कुटुंबासाठी फार वेळ देऊ शकलो नाही हे नक्की. स्वच्छ पाणी, उत्तम रस्ते, गृहनिर्माण आणि सुरळीत वाहतूकव्यवस्था यावर मी भर दिला असता. या चारही सुविधांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन सुसह्य झाले असते. मी पुणे जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी असताना पवना धरणाचे काम हाती घेण्यात आले होते. प्रकल्पग्रस्तां-साठी शाळा, रस्ते, दवाखाने, घरे, अगदी सगळी जय्यत तयारी होती. पण त्या गावातील लोक काही हलण्यास तयार नव्हते. मी तेथे गेलो तेव्हा समजले, की लोकांची साधी मागणी होती. त्या मागणीने मी भारावून गेलो. त्या गावात तब्बल चाळीस वर्षे डॉ. आचरेकर यांनी लोकांची सेवा केली होती. पुनर्वसनाच्या ठिकाणी जे प्राथमिक आरोग्य केंद्र होणार होते त्याचा दर्शनी भाग डॉ. आचरेकर यांच्या दवाखान्याच्या दर्शनी भागासारखा गावकऱ्यांना हवा होता, म्हणजे नवीन जागी डॉ. आचरेकर यांची स्मृती त्यांना जिवंत ठेवायची होती. मी विशेष प्रयत्न करून, प्राथमिक आरोग्यकेंद्राचे तसे खास आराखडे बनवून घेतले. गावकऱ्यांना आनंद झाला. एक प्रश्न असा सहजपणे सुटला.

*आता शेवटचा प्रश्न. मुंबईतील चाळीस लाख झोपडवासीयांना मोफत घरे देण्याची योजना आपल्या अहवालावर आधारलेली होती. ती यशस्वी का झाली नाही? ही योजना काय होती?*

तेव्हाच्या मुंबईचा विचार करता संपूर्ण महानगरातील झोपडपट्टीचे पुनर्वसन तीस चौरस किलोमीटर क्षेत्रात करणे शक्य होते. त्याबाबतची आकडेवारी माझ्या अहवालात आहे. टप्प्याटप्प्याने झोपडवासीयांचे पुनर्वसन केले असते तर ही योजना नक्की यशस्वी झाली असती. त्यासाठी झोपडपट्ट्यांची वर्गवारी करणे आणि पुनर्वसनाचा प्राधान्यक्रम ठरवणे आवश्यक होते. संपूर्ण मुंबईसाठी एकाच वेळी योजना अमलात आणणे अपेक्षित नव्हते आणि शक्यही नव्हते. रस्ते, पायाभूत सुविधा, पाइपलाइन अशा कामांना अडथळे करणाऱ्या झोपड्या प्रथम काढायची माझी शिफारस होती. त्याचप्रमाणे व्यापारीदृष्ट्या महत्त्वाच्या परिसरातील झोपड्यांचे पुनर्वसन आधी करण्याची कल्पना मी मांडली होती. परंतु राजकीय आणि प्रशासकीय दृष्टिकोनाचा समन्वय होऊ न शकल्याने योजनेची प्रगती झाली नाही. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ही या योजनेतील महत्त्वाची यंत्रणा. गृहबांधणीचे प्रस्ताव मंजूर करण्याचा अधिकार प्राधिकरणास देण्याबाबत मी आग्रही होतो. परंतु मुंबई महानगरपालिका याच्याविरुद्ध होती. त्याबाबतही माझा निरुपाय झाला. अशी अनेक कारणे सांगता येतील. मोक्याच्या जागा विकसित केल्यानंतर होणारा फायदा गरिबांना मोफत घरे देण्यासाठी वापरणे, हा योजनेचा गाभा दुर्लक्षिला गेला. एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे की, मुंबईत रोजीरोटी मिळते म्हणून लोक देशभरातून मुंबईला येतात. राहण्यासाठी त्यांचा काही पैसा खर्च होतच असतो. त्याचा आधार घेऊन त्यांना घरे दिली तर एक मानवी समस्या कायमची सुटेल अशी माझी धारणा होती. तथापि संपूर्ण मुंबईसाठी योजना एकाचवेळी लागू करण्याचा राजकीय निर्णय योजनेच्या यशाआड आला असे मला आजही वाटते.

---

**– प्रकाश परांजपे**
ए/१०४, तपस्या सोसायटी,
परांजपे 'बी' स्कीम,
विले पार्ले (पूर्व), मुंबई – ४०० ०५७
दूरध्वनी : २६१२०४४०

# यातू, गूढ, साक्षात्कार, धर्म आणि विज्ञान

श्रीनिवास हेमाडे

मानवाचे पृथ्वीवरील अस्तित्व नक्की कोणत्या काळापासून आहे, मानव प्राणी 'माणूस' म्हणून कधी विकसित झाला, त्याने 'समाज' कधी निर्माण केला, जनावरापासून तो 'माणसात' कधी आला, या आणि अशा प्रश्नांची उत्तरे देणे कठीण आहे. विश्वाची निर्मिती आणि रचना हाच एक प्रचंड गोंधळ आहे. आश्चर्य म्हणजे या गोंधळातूनच एका विलक्षण सुव्यवस्थेची रचना निर्माण झाली आहे. एक तर, मूलतः पृथ्वीवर सजीवांच्या अस्तित्वाची निर्मिती हेच एक गूढ आहे. त्यात माणसाची उत्क्रांती कोणत्या टप्प्यांवर झाली याविषयी केवळ अंदाजच व्यक्त करता येतात. बरे, तो उत्क्रांत झाला की परग्रहाचा पाहुणा आहे. हाही एक संशयच आहे.

समजा, माणूस येथेच निर्माण झाला, तर त्या आदिमानवाने पृथ्वीवर जन्म घेतला तेव्हा ही पृथ्वी कशी होती? ती त्याला कशी वाटली? तत्कालीन निसर्गाचे स्वरूप कसे होते? अगणितअनंत तारकांनी भरलेले आकाश त्याला कसे वाटले? सतत कोसळणारा पाऊस, उंचच्या उंच पर्वत, भयानक वादळवारे, उल्कापात, महापूर, ज्वालामुखीचे उद्रेक आणि सूर्यचंद्राचे उगवणे-मावळणे, भरती-ओहोटी, रोज दिसणारा चंद्र एके रात्री गायबच होतो म्हणजे काय? हे सारे विचित्र पाहून आदिमानवाला काय वाटले? तो आनंदाने रोमांचित झाला की घाबरून गेला? त्याच्या मनात भीती, कुतुहल, संताप, चिंता, करुणा, प्रेम अशा कोणत्या भावना निर्माण झाल्या? तो संभ्रमित झाला की चिंतातूर झाला? कोणती वैचारिक आणि मानसिक आंदोलने त्यांच्या मनात निर्माण झाली?

मुळात, आदिमानवाला मन होते काय? आत्मा होता काय? त्याची जाणीव-आत्मजाणीव कधी विकसित झाली, ती नव्हती तेव्हा ईश्वराच्या जाणिवेचे स्थान काय होते? ईश्वराची कल्पना कशी सुचली? की ती विकसित करण्यातच त्याचे अस्तित्व सिद्ध झाले? आपणास काहीही माहीत नाही, मी कोण आहे? इतर प्राण्यांमध्ये आणि माझ्यात काय फरक आहे? काय साम्य आहे? माझे वैशिष्ट्य काय? असे विचार त्याला सुचले असतील काय? किंवा कोणत्या काळात सुचले?

आपले अस्तित्व टिकवण्यासाठी आदिमान-

वाला कसा-कोणता-कुणाशी किती काळ संघर्ष करावा लागला? यात खुद्द निसर्ग, प्राणी आणि स्वजन यांच्याशी कसे संघर्ष झाले? इतिहास केवळ माणसांमधील संघर्षाचाच आहे, की निसर्ग, सहभागीदार प्राणीजगताचाही तो असतो? यापैकी कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देणे जवळपास अशक्य आहे.

पण एक गोष्ट सत्य आहे की अत्यंत अवघड, भरड, अक्राळविक्राळ भीतिदायक निसर्गाशी झगडून माणसाने आपले अस्तित्व पृथ्वीवर टिकवले आहे. कधी निसर्गाशी झगडा करून, कधी त्याच्यावर विजय प्राप्त करून, कधी त्याला सपशेल शरण जाऊन, तर कधी त्याच्याशी मैत्री करून माणसाने आपले अद्वितीय स्थान निर्माण केले आहे.

## अ) बुद्धी : एक महाशक्ती

सर्व सजीव प्राण्यांमध्ये माणूस जन्म श्रेष्ठ व टिकून राहिलेला एकमेव प्राणी आहे. याचे रहस्य काय? तर ते त्याच्या बुद्धीत आहे. ती फक्त माणसाकडे आहे. बुद्धीच्या साहाय्याने सर्व संकटावर मात करून माणसाने अस्तित्व टिकवले. खरे पाहता, मानवी मेंदू हे जगातील सर्वात मोठे आणि श्रेष्ठ आश्चर्य आहे.

## ब) आत्मभान

बौद्धिक क्षमता वापरून माणसाने एक महत्त्वाची गोष्ट विकसित केली. ती म्हणजे आत्मभान, स्वतःविषयीची जाणीव. सर्वात असहाय्य, परावलंबी आणि असुरक्षित जीव असूनही माणूसच या संघर्षात टिकला, त्याचे कारण 'आपण टिकून राहावे' हा विचार केवळ मानवी बुद्धीलाच सुचला.

'मी आहे.' ही जाणीव केवळ माणसालाच असते. प्राण्यांना जाणीव नसते. प्राण्यांना जिवंतपणा असतो. ते स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव इतरांना करून देऊ शकतात, तथापि त्यांना स्वतःला स्वतःची जाणीव असेलच असे म्हणता येत नाही. समजा ती असली तरी त्या जाणिवेतून ते आत्मभान व त्यातून माणसाने जशी संस्कृती निर्माण केली तशी, संस्कृती निर्माण करू शकत नाहीत.

आत्मभानातून 'मी कसा टिकून राहीन' अशी नवी जाणीव माणूस विकसित करतो. आपल्या मुलाबाळांमध्ये आपले स्वतःचे रूप पाहतो. त्यांचे संगोपन करतो. 'मी मरणारा आहे. मृत्यूने सारे काही संपते. पण मला ते संपवायचे नाही. मला माझे अस्तित्व टिकवले पाहिजे. माझे अस्तित्व म्हणजे माझी संतती. ती टिकली तर मी टिकेन. अस्तित्वात राहीन.' असे स्वरूप या आत्मभानाचे सांगता येईल. मग तिचीच परंपरा बनते. तेच त्याचे जगणे बनते. तिच्यामुळे माणूस टिकला. थोडक्यात, बुद्धी आणि आत्मभान या दोन शक्तींच्या आधारे जीवनसंघर्ष करून माणसाने आपले अस्तित्व टिकवले, हे निश्चित करून चार्ल्स डार्विनने उत्क्रांतिवादाची दोन तत्त्वे सांगितली. ती अशी-

अ. जगण्यासाठी संघर्ष (Struggle for Existence)

ब. जो श्रेष्ठ तोच टिकतो (Survival of the fittest)

डार्विनच्या मते कोणता प्राणी शारीरिकदृष्ट्या किती ताकदवान, अवाढव्य आहे यापेक्षा त्याच्याकडे टिकून राहण्याची क्षमता किती आहे यावर त्याचे अस्तित्वात राहणे अवलंबून आहे. ज्याच्याकडे टिकून राहण्याचा चिवटपणा आहे तोच टिकतो. डोळ्यांना न दिसणाऱ्या अतिसूक्ष्म जीवाणूंपासून डायनासोर-सारख्या अवाढव्य प्राण्यांपर्यंत सर्वच जगण्याची धडपड करतात. पण पृथ्वीवरचा टिकून राहिलेला सर्वात जुना रहिवासी म्हणजे केवळ माणूस! त्याने तीन अब्ज पंच्याऐंशी लाख वर्षांपासून आपले अस्तित्व टिकवले आहे!

## क) करुणा

बुद्धी व आत्मजाणिवेतून केवळ माणसातच विकसित झालेली तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे करुणाभावाचा आविष्कार होय. मानवजात टिकून राहण्यात हा करुणाभाव वरील दोनापेक्षा अतिशय महत्त्वाची व कळीची भूमिका बजावतो. माणसाने ईश्वराची संकल्पना निर्माण केली. पण काही मानवसमूह निरीश्वरवादीही आहेत. ईश्वरवादी, निरीश्वरवादी आणि अज्ञेयवादी अशा सर्वांना कवेत घेणारी व्यापक भावना म्हणजे करुणा. त्यामुळेच तर मानवतावादी बौद्ध, जैन धर्माची निर्मिती होऊ शकली. एवढेच नव्हे, तर विसाव्या शतकाच्या मध्यात आणि या शतकाच्या चालू दशकात ज्या शाकाहारवाद, हरित चळवळ,

पर्यावरणवाद, स्त्रीवाद इत्यादीची तात्त्विक मांडणी करण्यात येत आहे त्यामागे ईश्वर, धर्म इत्यादीपेक्षा करुणा हाच उचित निकष महत्त्वाचा मानला जातो. मानवजात टिकण्यामागे हा मूलभूत घटक आहेच.

मानवाने या धडपडीतूनच आपल्या स्वतंत्र संस्कृतीची निर्मिती केली. ही त्याची महान जीवनयात्रा कधी सुरू झाली व कधी संपणार हे सांगणे कठीण आहे. या यात्रेत किती स्त्रीपुरुष जन्माला आले, झगडले आणि अनंतात विलीन झाले, पण ही संघर्षयात्रा अजूनही चालू आहे. ती अनिश्चित भविष्याकडे जाते. ही यात्रा करत असतानाच माणसाने राहणीमान, जगण्याची पद्धत, एकमेकांशी वागण्याचे नियम तयार केले. पाककला, वस्त्रकला, संगीत, नाट्य, साहित्य, तंत्रज्ञान, विज्ञान धर्म आणि परमोच्च बिंदू समजल्या जाणाऱ्या तत्त्वज्ञानाची निर्मिती केली. या साऱ्या घटकांनी संस्कृतीची उभारणी होते.

## संस्कृतीचे पाच घटक

मानवी संस्कृतीचे काही ठळक घटक सांगता येतील. विशेषतः धर्म आणि धर्मसंस्थेच्या उभारणीबाबत हे घटक मूलभूत मानले पाहिजेत. ते म्हणजे– जादू किंवा यातुविद्या, विज्ञान, नीती (कला) आणि अध्यात्म (तत्त्वचिंतन).

या लेखाच्या शीर्षकात मी यातु, गूढ, साक्षात्कार, धर्म आणि विज्ञान या पाच गोष्टींचा उल्लेख केला आहे. त्यापैकी धर्म आणि विज्ञान या दोन गोष्टी वगळून पहिल्या तीनांचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न मी करणार आहे. कारण बहुधा आपणास धर्म आणि विज्ञान यांची अचूक माहिती नसली तरी बऱ्यापैकी माहिती असते. तिच्यात काही अपुरेपणा असला तरी थोड्याफार प्रयत्नाने दुरुस्ती करता येते. पण पहिल्या तीन गोष्टी तांत्रिक (technical) आहेत.

प्रस्तुत संदर्भात काही मुख्य कळीच्या संज्ञांचे अर्थ आणि त्यांची जास्तीत जास्त निर्दोष भाषांतरे आपण निश्चित करण्याचा प्रयत्न करू. उदाहरणार्थ,

जादू = Magic, गुह्य = Occult, गुह्यविद्या = Occultism, गूढविद्या/गूढवाद = Mysticism

साक्षात्कार = Revelation, Realization, Intuition, Direct illumination, साक्षात्कारवाद = intuitionism, धार्मिक गूढवाद = religious mysticism, गुढानुभववाद = mystical intuitionism या संज्ञा बऱ्याचवेळा पर्यायी म्हणून वापरल्या जातात. पण काटेकोरपणे त्यांची हीच भाषांतरे योग्य राहतील. आपण या लेखात ती त्याच अर्थाने वापरू. पण त्यांच्यातील सीमारेषा स्पष्ट करणे अवघड आहे. कारण त्या संकल्पना केवळ संस्कृत किंवा मराठीतील नाहीत तर संस्कृतबरोबरच प्राचीन ग्रीक, लॅटिन, हिब्रू, इंग्रजी भाषेतील आहेत. या लेखात आपण प्रचलित अर्थानुसारच त्यांचे थोडक्यात स्वरूप पाहू. त्यामुळे संकल्पनांमधील फरक तसेच या परस्परांमध्ये असलेला संबंधही लक्षात येईल.

अ) यातु (Magic)ः जादू म्हणजे काय?

'जादू' ही संज्ञा वैदिक संस्कृत वाङ्मयातील असून तिचे मूळ 'यातू' या संज्ञेत सापडते. इंग्रजीतील Magic या शब्दाचा उगम मध्युगीन फ्रेंच भाषेतील magique मध्ये असून त्याचे मूळ ग्रीक भाषेतील हे magikos आहे. त्यापासूनच लॅटिनमधील magicus हा शब्द बनला. magikos म्हणजे काही धार्मिक विधी. ते करणाऱ्या ग्रीकांमधील धर्मगुरूंना उद्देशून Magians म्हटले जात असे. हेकॅटे (Hecate) ही ग्रीकांची जादूदेवता होती. तिची पूजा करण्याचे विधी म्हणून ज्या कृती केल्या जात तीच जादू. पूजा करण्याच्या नावाखाली हे धर्मगुरू अपवित्र कर्मकांडे करून लोकांना फसवत असल्याने प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ हेरॅकिलटसने (इ.स.पू.५८५–५३५) या धर्मगुरूंना दिलेली Magians ही शिवी होती. ग्रीकांनी जसे तत्त्वज्ञान जगाला दिले तशी जादूही दिली. ग्रीकांपासूनच इजिप्तमार्गे साऱ्या मध्यआशिया, युरोप आणि पश्चिमी राष्ट्रांत जादूचा प्रभाव पसरला.

जादुगिरी आणि यातुविद्या यांत फरक आहे. जादू म्हणजे मुख्यतः भ्रममूलक हातचलाखी, फसवणूक यावर आधारलेली मनोरंजनाची कृती. उदाहरणार्थ, इंद्रजाल. वेदवाङ्मयातील ऋग्वेद, अर्थवेद, जातकग्रंथ, पुराणे, कथा इत्यादीमध्ये मायावी, मायाविनी, जादूगार राक्षसांचे चमत्काराचे उल्लेख आढळतात. घटोत्कचाचा मायाबाजार, सीतेला मोहात पाडाणारा कांचनमृग इत्यादी. अर्थशास्त्रज्ञ कौटिल्य जादूला 'जंभकविद्या' म्हणतो.

यातुचे स्वरूप जादूसारखे नाही. यातु म्हणजे

निसर्गावर किंवा काही काल्पनिक योनींवर गूढ रीतीने प्रभुत्व मिळवून, त्यांच्याद्वारे विशिष्ट घटना घडवून आणण्याची क्लृप्ती. मराठीतील 'जादू' हा शब्द 'यातू' या शब्दाचा अपभ्रंश आहे. यातुविद्या ही अभिचारविद्या समजली जाते. ऐहिक गरजांच्या पूर्तीसाठी निसर्गशक्तींना वश करण्यासाठी विधी करणे म्हणजे यातू होय. अल्केमी, जडप्राणवाद, टोटेम, टाबू, वूदू व वूदूचे विविध प्रकार, हुना, ओबीहा, पालो, रेकी, सैतानवाद, विक्का हे जादूचे प्रादेशिक प्रकार आहेत. भारतातील भानामती, केगामती, काळी जादू, जारणमारण हेही जादूचेच प्रकार मानले जातात.

फ्रेझर, टेलर, द्युरखाईम, हार्टलॅण्ड इत्यादी लेखकांनी जादू-यातुविद्येवरील केलेले लेखन थक्क करणारे आहे. 'एनसायक्लोपिडिया ऑफ रिलिजन ॲण्ड एथिक्स'मध्ये जादूवर बरेच लेखन आढळते. जगातील बहुतेक सर्व प्राचीन धर्मांच्या रचनेत यातुविद्येने फार महत्त्वाची भूमिका बजावलेली आढळते.

यातूचे दोन प्रकार केले जातात. १. अनुकरण यातू २. संपर्कयातू.

एका कृतीमार्फत दुसरी कृती घडवणे हे अनुकरण यातूमध्ये अपेक्षित असते. यातुविधीमार्फत जो परिणाम घडवून आणायचा आहे तो केवळ अनुकरणानेच घडवता येतो, अशी भावना अशी यातू करणाऱ्याला वाटत असते. संपर्कयातूचे स्वरूप वेगळे आहे. ज्या दोन वस्तूंचा परस्परांशी संपर्क झालेला असतो तो संपर्क, त्या वस्तू एकमेकांपासून भिन्न झाल्या तरी तुटत नाही, हे संपर्कयातूत गृहीत धरलेले असते. असा यातुविधी करणारा एखाद्या वस्तूवर जो प्रयोग करतो त्याचा परिणाम ती वस्तू ज्या व्यक्तीशी संबंधित आहे त्या व्यक्तीवरही होतो. मग ती वस्तू त्या व्यक्तीच्या शरीराचा भाग असेल किंवा नसेल. (एखाद्याचा केस, हातरुमाल, चप्पल इत्यादी) अन्योन्य संपर्क हेच संपर्कयातूचे गृहीततत्त्व आहे.

रोगनिवारण, विषहरण, स्त्रीवशीकरण, पुत्रलाभ, शेती, युद्धविजय, शत्रुनाश, शाप-उशाःप इत्यादी हजारो कारणांसाठी यातुविद्या आली. त्याचे जारण-मारण, उच्चाटन, चेटूक, आक्रमण, स्वसंरक्षण असेही हेतू असतात. मुलाची दृष्ट काढण्यापासून मूठ मारण्यापर्यंत सौम्य, रौद्र, बीभत्स असे अनेक प्रकार यातुविद्येत आहेत. मांत्रिक, भगत, देवर्षी, चेटकिणी ही मंडळी, अंगारेधुपारे, मंत्रमणी, गंडेदोरे, ताईत, भारलेल्या वस्तू, अंगठ्या, माळा याद्वारे धंदा करतात. यातुविद्येचा मुख्य हेतू कोणतीतरी भौतिक इच्छा तृप्त करणे हाच असतो. धर्म आणि नीती यांना त्यात कसलेही स्थान नसते. पण हे सारे धर्माच्या नावाने घडते, हे दुर्दैवाचे असते.

ऋग्वेदकालात यातुआचार होते. यातुधान हा शब्द राक्षस या अर्थाने येतो. सायणाचार्यांनी 'यातवो राक्षसाः' असे म्हटलले आहे. रामायण, महाभारतात अनेक राक्षस, जादुगारांचे उल्लेख येतात तो त्या कालातील यातुविद्येचा पुरावा आहे. अथर्ववेदास तर यातुविद्येचा लोकवेद असेच म्हटले आहे. शेती, वृक्षसंवर्धन, पशुसंवर्धन, अर्थार्जन, वैद्यक इत्यादी सर्व क्षेत्रांत मानव जादूचा साधन व शस्त्र म्हणूनच वापर करत होता असे दिसते.

ओल्डेनबर्ग या अभ्यासकाच्या मते सर्व वैदिक कर्मकांडात जादूचाच प्रभाव दिसतो. ब्लूमफिल्डच्या मते वैदिक विधीत जादू व चेटूक यांना महत्त्व होते. प्रा. दि.के.बेडेकरांच्या, मते आदिमानवाचा प्रजोत्पादनविधी हा यातुविद्येचा उगम असावा आणि यातुविद्या हा वैदिक यज्ञसंस्थेचा उगम असावा. डॉ. करंबेळकरांच्या मते, अथर्ववेदकालात धर्मगुरू आणि मांत्रिक यांना समाजात एकच स्थान होते. अर्थात, यातुविद्या ही वैदिक धर्माची निकृष्ट बाजू आहे.

ब) गूढ/गुह्य (Occult/Mystic):

जादूशी संबंधित दुसरी संकल्पना म्हणजे रहस्य (Mystic) किंवा गूढता. इंग्रजीत तिला occult म्हटले आहे. हा occult शब्द लॅटिनमधील occults पासून बनतो. त्याचा अर्थ लपवलेला, गुप्त असा आहे. 'सर्वसामान्याच्या आवाक्यात न येणारे रहस्यमय गुप्तज्ञान, असा त्याचा गुढवादी अर्थ आहे. वैद्यकीय क्षेत्रात न कळणाऱ्या गोष्टीला occult म्हणतात. जसे occult bleed. त्याला 'गुप्त राखावे असे ज्ञान, असे मानले गेले. पुढे साहजिकच विशिष्ट लोकांसाठीचेच ज्ञान असा अर्थ झाला. पुढे जाऊन अनेक जादूविषयक संघटनांना, पंथांना तसेच शिकवणुकींना आणि आध्यात्मिक तत्त्वाज्ञाने व त्यांचे साहित्य यांना उद्देशून ही संज्ञा वापरली गेली. या मूलभूत गूढवादी तत्त्वज्ञानावर आधारित अनेक पंथ अस्तित्वात आले.

गूढ ज्ञानाची रचना करणारा तो गूढवाद (Occultism) समजला जातो. ज्यास गूढवाद म्हणतात त्याचा मुख्य विषय (तत्त्वज्ञानाप्रमाणे) 'सत्य' हाच असतो. पण तत्त्वज्ञानाची सत्यशोधनपद्धती बुद्धिवादी असते. गूढवादात सत्याच्या शोधात बुद्धीचा वापर केला जाईल, असे नसते. उलट, बुद्धिवाद बाजूलाच फेकला जातो. उदाहरणार्थ, किमयाविद्या (alchemy), अतिद्रिंय ज्ञान, भविष्यवाणी (काचेचा गोल, पत्ते, आकडे इत्यादी) यात बुद्धीचा मागमूसही लागत नाही.



बरे, ज्याचा समाजात भयानक गवगवा होतो ते अध्यात्मही गूढवादाच्या कचाट्यातून सुटत नाही. उलट, अध्यात्मवादात अनेक गोष्टी बोकाळल्या आहेत. बापू, नाथ, ताई, माई, आक्का, दादा, इत्यादी लोकांनी भयानक व भयावह रणधुमाळी माजवली आहे! या गोष्टींना ते धार्मिक श्रद्धांचा आधार देऊन त्याचा थेट धर्मच बनवतात आणि शोषणाची परंपराच तयार करतात.

गूढविद्येत जादूटोणा, किमया, मंत्रतंत्र, चमत्कार यांचाच समावेश असतो. जादूगार, मांत्रिक, किमयागार हे या विद्येचे साधक समजले जातात. अतिंदिय ज्ञानसंपन्न साधकांनाच सृष्टीची गूढ रहस्ये समजू शकतात, तेच त्या ज्ञानाचे अधिकारी असतात अशी श्रद्धा या क्षेत्रात असते. असे 'अंतर्ज्ञान' हेच खरे व श्रेष्ठ ज्ञान, अशी भूमिका गूढवादी घेतात. दूरदर्शन, दूरश्रवण, पूर्वजन्म-कथन, पुनर्जन्मभविष्य, मृत व्यक्तीशी तिच्या आत्म्याशी संवाद, भूत-पिशाच्च योनीचा संपर्क, मंत्राचे सामर्थ्य, यज्ञयागामार्फत सृष्टीतील घटनांवर प्रभुत्व, मृत्यूचे स्वरूप व मरणोत्तर जीवनावस्था इत्यादी अनेक गूढ समस्यांचा अभ्यास यात केला जातो. पण प्रत्यक्षात भर गूढ कर्मकांडावर असतो. त्यामुळे जनसामान्यांवर ताबा मिळवता येतो. ही गूढविद्या हा धर्मातील रहस्यांचा यातु-विद्यात्मक अभ्यास असतो.

### तात्त्विक गूढवाद

पुढे काय झाले पाहा या गूढवादालाच तत्त्वज्ञानात्मक स्वरूप मिळाले. हे अर्थातच बेमालूपणे घडले. तत्त्वज्ञाना-

त्मक स्वरूप मिळाल्यानंतर गूढवाद 'तात्त्विक गूढवाद' अथवा रहस्यवाद (Mysticism) म्हणून मान्यता पावला. हा तात्त्विक गूढवाद इतका बोकाळला की खरे अध्यात्मवादी तत्त्वज्ञान आणि हा तथाकथित तात्त्विक गूढवाद यांतील सीमारेषा फारच धूसर झाली. दोघांना एकच समजले जाऊ लागले आणि या तथाकथित 'तात्त्विक गूढवादी' पंथापासून, प्राचीन कालापासून, जगात सर्वत्र, सर्वकालात, सर्व संस्कृतीमध्ये सतत गूढवादी तत्त्वज्ञान प्रसृत झाले. या गूढवादी तत्त्वज्ञानाचा उपयोग की (दुरुपयोग?) वेगवेगळ्या प्रकारे होत गेला उदाहरणार्थ–

१. अनेक प्रसिद्ध विज्ञानकथा लेखक त्यांच्या कथेत, त्यांच्या कथाकथित विज्ञानभाषेत गूढ सिद्धान्त मांडत राहिले. (खरे तर, ही मिथ्याविज्ञानभाषा pseudoscientific language असते. ती दिसते आणि वाटते वैज्ञानिक भाषा, पण विज्ञानाचा आणि वैज्ञानिक पद्धतीचा तिथे काहीच पत्ता नसतो. केवळ भास असतो. त्याला विज्ञानभास म्हणता येईल.)

२. युरोप-पाश्चात्य राष्ट्रांमध्ये अनेक महाविद्यालये व विद्यापीठे गूढ/ गुह्यविचारसरणीचे अभ्यासक्रम राबवू लागले.

३. चित्रपट आणि टीव्हीवर गूढकथांच्या मालिकांचा रतीबच आढळू लागला. आजही आढळतो.

४. स्त्रीचळवळीतील एक प्रवाह प्राचीनकालीन पूजेचा व आदराचा विषय असणाऱ्या चेटकिणीच्या संप्रदायाची रचना करू लागला.

५. बायबलमधील सैतानाचा अवतार झाल्याच्या कथा तयार होऊन चित्रपट निर्माण होतात. उदाहरणार्थ ओमेन, घोस्ट, एक्झॉरर्सिस्ट इत्यादी किंवा भारतात तर भयपट, भूतकथा, भूतकथात्मक चित्रपट यांचा रतीब असतो. जसे रामसे बंधू इत्यादी.

६. एकोणिसाव्या शतकात या गूढवादी तत्त्वज्ञानाचा ख्रिश्चन जगतात इतका प्रभाव पडला की विसाव्या शतकातील अनेक वैज्ञानिक शोधांना चर्चने सैतानाचा चमत्कार समजून मान्यताच दिली नव्हती! त्यात नीत्शेसारख्या तत्त्ववेत्याने 'ईश्वर मेला आहे' असे ईश्वरी मृत्यूचे तत्त्वज्ञान मांडल्याने लोक घाबरूनच गेले. मध्ययुगात प्रसिद्ध वैज्ञानिक शिरोमणी न्यूटन, लायब्नीज हा गणिती-तत्त्ववेत्ता आणि शॉपेनहॉवर यांनी विशेषतः तत्त्वज्ञान, विज्ञान व गणितात गूढवाद घुसडला. परिणामी, ही क्षेत्रे विनाकारण धूसर, गूढ बनली. 'न्यूटन बुद्धियुगाचा, जादूयुगाचा पहिला नव्हे तर शेवटचा जादूगर होता' अशी संभावना जॉन किन्से हा विचारवंत करतो. येथे बुद्धीने दाखवलेल्या करामतीच्या युगाचा अर्थ अपेक्षित आहे. जणू बुद्धी हीच एक जादूगार आहे! 'दा विन्ची कोड' या कादंबरीत व सिनेमात न्यूटनच्या गूढवादाचे उल्लेख आढळतात. ते भलतेच प्रभावी ठरले. हा सिनेमा भलताच गाजून टीआरपीची चंगळ करून गेला.

७. पुढे, आधुनिक व प्रबोधनकालात विज्ञान विरुद्ध धर्म या युद्धात विज्ञान जिंकत गेले आणि धर्माची पिछेहाट झाल्याने आणखी पंचाईत झाली. ईश्वर अथवा ईश्वरपुत्रांचे अस्तित्व धोक्यात आले. परिणामी, माणसावर जबाबदारी आली, त्याचे महत्त्व व श्रेष्ठत्व वाढले. या काळातील विज्ञान, तंत्रज्ञान आणि तत्त्वज्ञानाच्या झालेल्या विकासामागे वरील कारणेही महत्त्वाची ठरली. विज्ञानामुळे सामाजिक संपत्तीत वाढ होऊन सर्वसामान्यांकडे संपत्ती आली. याचा अर्थ चर्चच्या मक्तेदारीला धक्का बसला. हे अर्थातच चांगले झाले. विश्वनिर्मात्याचे अस्तित्व नाकारल्याने मानवी संस्कृती लोकशाहीकडे आणि जीवनाच्या इहवादी अर्थाचा (a secular search for meaning) शोध घेऊ लागली. त्याचा दुसरा चमत्कारिक परिणाम म्हणून भारत, चीन इत्यादी पूर्वेकडील देशांमधील चमत्कारवाद वाढीला लागला. लोक त्याच्या भजनी लागले! या साऱ्या घडामोडीवर आधारित प्रचंड साहित्य निर्माण झाले. (त्याचाच अल्पसा परिणाम मराठीतील अनेक धार्मिक, गूढकथाविषयक अंकांमध्ये दिसतो. या विषयावरील दिवाळी अंकांना तर पूरच येतो आणि गंमत म्हणजे त्यांना वाचकांकडून प्रचंड मागणीही असते!!)

८. विसाव्या शतकातील भयावह घटना समजले जाणारे दुसरे महायुद्ध संपल्यानंतर आणखी एका गूढवादी पंथाचा उदय झाला. तो म्हणजे नाझी गूढवाद. १९४५ नंतर हिटलरच्या पाडावानंतर त्याची कारकीर्द, त्याची आत्महत्या इत्यादीभोवती एक गूढतेचे वलय निर्माण झाले आणि नाझी गूढवाद विकसित झाला. विविध प्रकारचे साहित्य, चित्रपट,

माहितीपट, चित्रे, संगीत, गुप्त संघटना, क्लब्ज, विविध प्रकारचे खेळ (की ज्यात छळछावण्यातील छळाचेही खेळ असत.) यांना एकत्र उधाण युरोपात आणि एकूणच जगभरात आले. ती जणू काही लोकसंस्कृती बनली. हिटलरला आणि नाझींना कोणतीतरी गूढशक्ती मार्गदर्शन करते, अशुद्ध वंश नष्ट करण्यास भाग पाडत; किंबहुना, सैतानच हे आदेश देतो, अशा कथा प्रसृत झाल्या.

९. इंटरनेटवरही याचा परिणाम आढळतो. अनेक वेबसाईट, ब्लॉग्ज, वेबपेजेस, कम्युनिटीज, ग्रुप्सनी एकच धूमाकूळ घातला आहे. या साऱ्यांचे भयचकीत करणारे पण जबरदस्त आकर्षणमूल्य आहे.

१०. या दशकातील एक साहित्यिक आणि चित्रपटीय धूमाकूळ म्हणजे हॅरी पॉटरचे सिनेमे! रोलिंग आणि तिचा हा मानसपुत्र यांच्याबद्दल काय लिहावे, किती लिहावे, (कशासाठी लिहावे?) तेच कळत नाही! पण जनमानसाची नस, विशेषतः लहानग्यांची नाडी तिने बरोबर पकडली आहे हे खरे.

क) साक्षात्कार

(Realization/ Direct Illumination):

विश्वाच्या बुडाशी विश्वाचे निर्मितीकरण असणारे असे काहीतरी अंतिम सत्य असून त्याचे ज्ञान इंद्रिये आणि बुद्धीमार्फत मिळू शकत नाही; पण तिचा आणि माणसाचा काहीएक आंतरिक संबंध आहे आणि त्या अंतिम सत्तेचा गाभा माणसाला प्रत्यक्ष आणि प्रभावी अनुभूतीने होऊ शकतो, नव्हे होतो, असा विश्वास बाळगणारा विचार म्हणजे साक्षात्कार आणि त्याची विद्या ती साक्षात्कारशास्त्र! यास इंग्रजीमध्ये intuitionsm/ myscticim म्हणतात. त्याचे भाषांतर म्हणून बऱ्याचवेळा गूढवाद असा शब्द वापरला जातो.

बहुतेक धर्मांत साक्षात्कारवादाचा उदय झाला. भारतात (उपनिषदे, योग, अद्वैत वेदान्त आणि भक्तिसंप्रदाय), चीनमध्ये (लाओत्सेचा ताओवाद), ग्रीसमध्ये (ऑर्फिझम, प्लेटोवाद, नवप्लेटोवाद, अन्य साक्षात्कारवादी पंथ), बौद्धधर्मात (हीनयान ते झेन), ख्रिश्चन धर्मात (किमान ५० गूढवादी), यहुदी धर्मात (फायलो, कबाला, हॅसिडिम म्हणजे श्रद्धावान), जैन व शिखधर्मात तर साक्षात्कारवाद टोकाचा महत्त्वाचा मानला जातो.

साक्षात्कारवादाचा उगम मुख्यतः प्राचीन भारतात आणि ग्रीसमध्ये झाल्याचे मान्य झाले असून त्यांच्यामधूनच जगातील बहुतेक गूढवादी विचारप्रवाह, पंथ, संप्रदायांची निर्मिती होत राहिली. 'समाधी म्हणजे अनुभूतीची सत्यता'हे या सर्वांमध्ये समान सूत्र आहे. त्या अनुभूतीचे विवरण आणि अर्थ लावण्यावरून मात्र मतभेद आहेत. उदाहरणार्थ, बौद्धधर्म अनुभूतीला पूर्ण शून्य समजतो, जैन व सांख्यदर्शन सर्वज्ञ पण निरीश्वरवादी आत्मा मानतात, प्लॉटीनसवाद सत्तेच्या सर्व आविष्कारांच्या अतीत मानतो, ताओवादी त्यास सर्वांचा कारणीक नियम म्हणतात, तर अंतिम सत्यात पूर्ण एकत्व व साधेपणा असून तो त्रिस्तरिय ईश्वर आहे ही ख्रिश्चनधर्माची धारणा आहे, तो अनन्य व अमूर्त ईश्वर आहे ही इस्लामची विशेषतः सुफीपंथाची धारणा आहे, तर ब्रह्मन-आत्मन म्हणून ज्याचा निर्देश करता येतो असे अमूर्त पण परिपूर्ण पूर्णत्व आहे ही उपनिषदांची-अद्वैत वेदान्ताची धारणा आहे आणि तो कमीजास्त मानवीकरण झालेला ईश्वर आहे ही सर्वच भक्तिसंप्रदायांची आवडती गोष्ट आहे. मनाची एकाग्रता आणि चिंतनातून येणारी समाधी हे साक्षात्कारवादाचे सार समजले जाते.

साक्षात्कारवादाचा धर्मसंस्थेवरही प्रभाव पडतोच. कारण धर्मसुद्धा गूढच मानला जातो. गूढवाद, गूढानुभव हे तर धर्माचे मुख्य आधारस्तंभ असतात. त्यावरच धर्माचा सारा व्यापार तेजीत चालतो. साक्षात्कार व गूढविद्या यांचा तोंडवळा सारखाच असतो. त्यामुळे साक्षात्कारालाच गूढविद्या किंवा उलटे समजले जाते. मग चांगलाच घोटाळा होतो. अतिंद्रिय सामर्थ्याचा उदय, सिद्धी, चमत्काराचे सामर्थ्य या साक्षात्कारातील घटना समजल्या जातात, पण साधकाचे त्यामुळे आध्यात्मिक पतन होते, असे मानले जाते. त्या मोक्षातील अडथळा असून त्यांचा उपयोग करू नये असा दंडक असतो.

निरामय, शाश्वत आनंदाऐवजी ऐहिक भोगलालसा वाढल्याने माणसाला मोक्षाऐवजी बंधनात अडकावे लागते. असा माणूस मग साक्षात्कारी साधकाला पाहतो तेव्हा त्याला तो अध्यात्मदर्शनाचा भास होतो. वस्तुतः तो मोह असतो. कुणी असे करत

असेल तर ते 'दर्शन' न समजा 'प्रदर्शन' समजले पाहिजे. खरे तर, साधक, योगी, संत यांची थोरवी त्यांच्या चमत्कारांवरून न ठरवता त्यांचे चारित्र्य, करणी आणि अध्यात्मिक अनुभव यावरून ठरवली पाहिजे.

याचे मुख्य कारण असे की मज्जाविकृतीमध्ये घडणारे मानसिक अवस्थांचे काही आविष्कार व मादक द्रव्यांच्या सेवनाने उद्भवलेली मानसिक तरल उन्मनी अवस्था आणि गूढानुभूती यांच्यात कमालीचे साधर्म्य आहे. त्यामुळे तथाकथित साक्षात्कारवादी वर्तणुकीतील सत्य कोणते आणि असत्य कोणते, हे फारच काळजीपूर्वक ठरवावे लागते. महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध प्रगाढ तत्त्वज्ञ आणि 'आजचा सुधारक' या वैचारिक नियतकालिकाचे संपादक प्रा. दि. य. देशपांडे (२४ जुलै १९१७ ते ३१ डिसेंबर २००५) यांनी म्हणूनच आध्यात्मिक अनुभवांवर गमतशीर टीका केली आहे. आध्यात्मिक ज्ञानाची तुलना ते दारुड्याला दिसणाऱ्या गुलाबी उंदरांशी करतात. दारुड्याला दिसणारे गुलाबी उंदीर जसे कोठेही नसतात, फक्त त्याच्या मनातच असतात तशाच अध्यात्मात अनुभवाला येणाऱ्या गोष्टीही केवळ काल्पनिक असतात आणि त्यांना वास्तवात कधीही अस्तित्व नसते!

## यातु, धर्म आणि विज्ञान

जगातील सर्व प्राचीन मानवसमाजाचे संप्रदाय, समजुती, चालीरीती आणि आचारांचे शास्त्रीय अवलोकन केले असता लक्षात येईल की त्या सर्वांचा प्रमुख आधार यातू हाच आहे. माणसाच्या धार्मिक जीवनाचा प्रारंभ जादूपासून सुरू होतो असे सांस्कृतिक मानववंशशास्त्रज्ञांचे अनुमान असून त्याचे अनेक पुरावे दिले गेले आहेत. या जादूचेच प्रगत रूप म्हणजे 'धर्म' ही संकल्पना असून सर्वात मोठा जादूगार म्हणजे ईश्वर अशी कल्पना केली गेली आहे. त्या ईश्वराने ज्यांच्यावर अनुग्रह केलेला असतो ते जादूगार, यति, साधु, तपस्वी, योगी, साधक, संत ही मंडळी.

विज्ञान ही घटना आपण समजतो तशी अलिकडील नाही आणि केवळ पाश्चात्य नाही. ती मानवी संस्कृतीत तशी जुनीच आहे. त्या त्या संस्कृतीत काहीना काही विज्ञान असतेच. उदाहरणार्थ, भारतात विज्ञान नव्हते असे नाही, तर ते आयुर्वेदाच्या स्वरूपात चांगले विकसित रूपात होते. नाट्यशास्त्र हे नाटकविषयक विज्ञानच होते.

जे.जी. फ्रेझरच्या मते यातुविद्या ही धर्माचा आरंभ असते. एस. हार्टलॅंड यांच्या मते यातुविद्या ही धर्माची प्राथमिक अवस्था असून, मानवी संस्कृतीच्या आदिम कालात यातुविद्या, धर्म आणि विज्ञान यांची मिसळण झालेली दिसते. नंतर ती संथगतीने वेगळी होत गेली आहेत. वैदिक धर्मही अपवाद नव्हताच. विशेषतः श्रौत आणि गुह्य या उभय शाखा यातुप्रधानच आहेत. यातू वगळल्यास त्यात फारच थोडा धर्म उरेल, असे डॉ. काशीकर यांचे मत आहे.

फ्रेझरच्या मते, जादू ही अनिवार्यपणे असत्य, वांझ असते. जादू ही विज्ञानाची फसवी बहीण आहे. याचे कारण विज्ञानात कार्यकारण शोधला जातो, जादूत ते शोधले जात नाही. पण निसर्गावर स्वामित्व मिळवणे हा दोघांचाही हेतू समान असतो. जादूचा विश्वास आश्चर्य, चमत्कारावर असतो. तर विज्ञान निसर्गनियम शोधते. विज्ञान वैज्ञानिक पध्दती विकसित करते.

प्राचीन काळी धर्म हे जादूचे तात्त्विक अंग होते तर जादू ही धर्माचे व्यावहारिक, उपयोजनात्मक अंग होते. अंधश्रद्धा जशी कमी होत गेली तसे धर्म व विज्ञान स्वतंत्र होत गेले. विकसित धर्मात यातुविद्या नेहमीच अनैतिक, दुष्ट, अधर्मकारक समजली जाते. धर्माचा व विज्ञानाचा उगम यातुविद्येतून झाला की नाही हा वादग्रस्त प्रश्न आहे. पण या गोष्टी परस्परसंलग्न असल्या तरी त्यांच्या प्रेरणा भिन्न असल्याने त्यांचे स्वरूप बदलते.

यातू आणि विज्ञान या वेगळ्या पण निकटच्या गोष्टी आहेत. यातूत एक प्रकारचा कार्यकारणभाव गृहीत धरलेला असतो तसा तो विज्ञानातही असतो. पण यातूतील कार्यकारणभाव हा निव्वळ भ्रम असतो तर विज्ञानातील कार्यकारणभाव तर्कशुद्ध सिद्ध करता येण्याजोगा असतो. यातून वैज्ञानिक पद्धती अस्तित्वात येते. विज्ञान सर्वांना समानरीतीने लागू असते. यातू मात्र व्यक्ती व स्थलकालविशिष्ट असते. विज्ञान व्यापक स्थल-काल-व्यक्तीनिरपेक्ष असते. यातू मिथ्या (psuedo) असते तर विज्ञान सत्य (true/ real) असते.

पण यातू हा विज्ञानाचा अतिशय कच्चा, भरड, अप्रगत स्वरूपाचा पूर्वप्राथमिक टप्पा आहे. तो ओलांडल्याशिवाय विज्ञानाकडे जाता येत नाही असे मत प्रसिद्ध अभ्यासक डॉ. चिं. ग. काशीकर यांनी व्यक्त केले आहे. ते पुढे म्हणतात, की जगातील सर्व मानवसमाज आपला व्यवहार सिद्ध करण्याच्या उद्देशाने यातूच्या अवस्थेतून गेले आहेत, किंवा पूर्णतः अथवा अंशत: त्याच अवस्थेत अद्यापि आहेत!

धर्मकल्पना यातू आणि विज्ञान या दोहोंहून भिन्न असते. विश्वातील सर्व घटना विशिष्ट नियमांनी बांधलेल्या आहेत, असा दोघांचा दावा असतो, तर विश्वाच्या मुळाशी एक अतर्क्य शक्ती आहे, हे धर्मकल्पनेचे मूलतत्त्व आहे. निसर्गातील सर्व घटना आणि मानवी जीवन यांचे नियंत्रण करणारी एक अतिमानवी शक्ती आहे, या शक्तीला शरण जाऊन प्रार्थना, उपासना, आचारविधी करून तिची कृपा संपादन करावी, हे धर्माचे लक्षण असते.

धर्म आणि यातू यांमध्ये देवदेवता-ईश्वर असतो, पण यातू देवदेवतांना ताब्यात ठेवू पाहतात तर धर्म ईश्वरशरण असतो. धर्म व यातू यांचे हेतू, उद्दिष्टे, कार्यपद्धती यात जमीनअस्मानाचा फरक असतो. किंबहुना विरोधच असतो. पण विज्ञानाप्रमाणे धर्मांच्याही प्राथमिक अवस्थेत यातूअवस्था अनिवार्य ठरलेली होती. त्यांचे मिश्रण झालेले होतेच. अशी संमिश्रता असलेले समाजही सांस्कृतिकदृष्ट्या उच्चपदाला पोचलेले होते. वैदिक समाज हा त्यापैकी एक होता.

साक्षात्कारावर तर हवे तितके लिहिता येईल. साक्षात्काराचे अंतरंग, साधना, विविध दृष्टिकोन, साक्षात्काराची शक्यता व आवश्यकता, साक्षात्काराची पूर्वतयारी, नैतिक अधिष्ठान, योगविद्या, सद्गुरू व साक्षात्कार, धर्मातील साक्षात्काराचे महत्त्व इत्यादी, पण इथेच थांबतो. त्याचप्रमाणे धर्म आणि विज्ञान हे विषयही स्वतंत्र लेखांचे असल्याने तूर्तास अर्धविरम.

---

**– श्रीनिवास हेमाडे**
सम्यक, ११, नवरंग बाग,
हॉटेल सम्राटसमोर, पुणे-नासिक रोड,
संगमनेर - ४२२ ६०५, जिल्हा अहमदनगर
दूरध्वनी ०२४५-२२२१३१

ग्रंथाली

**आगामी प्रकाशन**



# एक दिवस जीवनातला

**नीला सत्यनारायण**

एकेक दिवस जीवनातला, एकेक दिवस वनातला. निसर्गाच्या कुशीतला. वृक्षवेली-वनचरांच्या सोबतीतला. म्हटली तर ही अनुभवांची डायरी, पण खरं म्हणजे जीवन जाणीवसंपन्न करणारी ही एकेक पायरी...

# जेवणाचा ट्रक

## सुभाष सुंठणकर

ऊस प्रचंड झाला आणि बलरामनगरात हाहाकार उडाला. नदीचे पाणी घराघरात घुसले. काही लोकांनी डोंगरालगतच्या शाळेत आश्रय घेतला. सगळीकडे पाण्याचे आणि चिखलाचे साम्राज्य माजले.

शाळेत आश्रय घेतलेल्या लोकांचे, बायकामुलांचे अन्नपाण्याविना हाल होऊ लागले. पाचशेहून अधिक लोक तेथे राहिले होते.

सरपंचाने तातडीने जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्याला फोन करून ही घटना कळवली. हेलिकॉप्टरने अथवा जीपमधून तातडीने जेवणाची पॅकेट पुरवली जातात हे सरपंचाला माहीत होते. त्याने जेवणाची पॅकेट ताबडतोब पाठवावीत अशी जिल्हाधिकाऱ्याला विनंती केली. 'आपण हे काम अन्नपुरवठा खात्याकडे सोपवले आहे. त्या खात्यातर्फे जेवणाचा ट्रक लगेच बलरामनगरात पाठवण्याची आपण व्यवस्था करत आहोत.' असे जिल्हाधिकाऱ्याने सरपंचाना सांगितले.

जेवणाचा ट्रक येणार म्हणताच सरपंचाने सुस्कारा सोडला.

तरीसुद्धा, विलंब नको म्हणून सरपंच गावडे यांनी एक उपाय योजला. जिल्ह्याच्या ठिकाणी बलरामनगरचाच त्यांचा एक मित्र साखरदांडे राहत होता. त्याला अन्नपुरवठा खात्यात जाऊन 'जेवणाचा ट्रक लवकर पाठवण्यासाठी' प्रयत्न करण्यास सांगितले.

साखरदांडे अन्नपुरवठा खात्याच्या कचेरीत गेला. तेथे नदाफ नावाच्या अधिकाऱ्याला बलरामनगरची समस्या त्याने सांगितली. तेव्हा नदाफ म्हणाले,

''तसा एकदम ट्रक पाठवता येत नाही.''

''म्हणजे?''

''सरपंचांचा अर्ज आला पाहिजे. तो सँक्शन झाला पाहिजे...''

''पण जिल्हाधिकाऱ्यांनी तुम्हाला कळवलंय ना?''

''कळवलंय. पण ते तितकं सोपं नाही.''

''ते कसं काय?''

''ट्रक रिकामे पाहिजेत. ड्रायव्हर मिळाला पाहिजे. आणि तुम्हाला नुसतं गहू, तांदूळ, डाळ देऊन चालत नाही. चपात्या-भाकऱ्या केल्या पाहिजेत. भात, भाजी केली पाहिजे. प्लॅस्टिक पिशव्यांत भरलं पाहिजे. प्लॅस्टिक तर वापरू नका म्हणून सरकारचा नियम आहे. तुमचं काम होत नाही.''

''मग ती बलरामनगरमधली लोकं मरू देत?'' साखरदांडेने ओरडून विचारले.

साखरदांडेने एकमद आक्रमक पवित्रा घेतल्याने तेथे खळबळ उडाली. सगळे क्लार्क आश्चर्याने पाहू लागले. बाजूच्या खुर्चीवरचा कुलकर्णी नावाचा एक क्लार्क लगबगीने साखरदांडेपाशी आला. त्याने साखरदांडेला 'रागाऊ नका हो, सांगतो या' असे म्हणून बाहेर नेले.

'नदाफची बायको माहेराहून नुकतीच परत आल्यानं ते वैतागलेत' हे सत्य कुलकर्णीने साखरदांडेला सांगितले व तो पुढे म्हणाला, ''त्याला एक उपाय आहे. पाकिटात घालून तीनशे रुपये हळूच त्यांच्या हातात ठेवा. तुमचं काम लगेच होतंय. लगेच जेवणाचा ट्रक बलरामनगरात जातोय बघा.''

साखरदांडे चकितच झाला. नदफला तीनशे रूपये दिले तर त्यांच्या बायकोचा राग शांत होतो काय? आपल्या

बायकोचा राग शांत होण्यासाठी आपल्याला कोणीच तीनशे रुपये देत नाही. आणि ट्रकचा न मिळणारा ड्रायव्हर नदाफला तीनशे रुपये दिले की पटकन मिळतो की काय? प्लॅस्टिक पिशव्या वापरू नका हा सरकारी नियम तीनशे रूपये दिले की बदलतो?

शिवाय, आपण आपल्याकडचे पैसे भरल्यावर नंतर सरपंच गावडेकडून ते पैसे कसे वसूल करायचे हाही प्रश्न होताच. मग साखरदांडेने ठरवून टाकले. आता पैसे घालायचे. गावडेनी पैसे दिले तर प्रश्नच मिटला. नाही दिले तरी एक उपाय आहे. त्याच्या मुलीचे लग्न ठरले आहे. त्या लग्नात आपण आहेरच द्यायचा नाही. बोंबलू देत पाहिजे तर.

साखरदांडेकडे पाकिट नव्हते, तो पाकिट आणण्यासाठी बाहेर निघाला. पण जवळपास दुकाने नव्हती, ही समस्या कुळकर्णीच्या लक्षात आली. तो म्हणाला.

''तुम्हाला पाकिट पाहिजे ना? त्या बाकावर पेंगत बसलेल्या प्यूनकडे असतात बघा.''

मग साखरदांडेने त्या पेंगणाऱ्या प्यूनला उठवले. त्या प्यूनने एक रुपयाचे पाकिट साखरदांडेला दोन रुपयांना खपवले. त्या पाकिटात साखरदांडेने तीनशे रुपये घातले व नदाफकडे दिले. नदाफ लगेच म्हणाले, ''बलरामनगरला जेवणाचा ट्रक लगेच पाठवून देतो. पाचशे लोकांचे जेवण पाठवतो!''

नदाफने लगेच समोरचा नेहमीचा हॉटेलवाला रामू याला पटकन बोलावून घेतले. लुंगी नेसलेला व कपाळाला गंध लावलेला रामू प्रकट झाला. बलरामनगरात चारशे लोकांना जेवण पटकन करून पाठवून द्यायची त्याला ऑर्डर देण्यात आली.

''जिलबी, मसालेभात, परोठा, पनीर फ्राय, भजी, दालफ्राय चालेल नै शायेब. जय बालाजी.'' रामूने विचारले.

''अरे, हे काय लग्नाचं जेवण आहे?''

''मग?''

''अरे पूरग्रस्तांसाठी जेवण पाठवायचं आहे.''

''जय बालाजी. पूरग्रस्तांनी जिलबी, मसालेभात खाऊ नये असं कुठे लिहिलंय शायेब.''

''लिहिलंय, सरकारनं लिहिलंय''

''आँऽऽऽ!'' रामू चकितच झाला.

''हे बघ, पूरग्रस्तांसाठी चपाती, आमटी, भाजी व दहिभात एवढे अन्न प्रत्येकी वेगळ्या पाकिटात पॅक करून पाठवावं असं सरकारनं या पुस्तिकेत लिहिलंय.'' पुस्तिका पुढ्यात दाखवत नदाफ बोलले.

पुस्तिका कसली? पुस्तकच होते ते. दोनशे पानी पुस्तक इंग्रजीत होते. पूर अथवा महापूर आला असता काय करावे याच्या सूचना देणारे ते पुस्तक होते. पूर आला असता सरकारी अधिकाऱ्याने तेथे कसे धावून जावे, पूरग्रस्ताना कसे वाचवावे, त्यांच्या निवासाची तात्पुरती सोय कशी करावी, माणसे-जनावरे कशी वाचवावीत, जरूर पडल्यास पोलिस अथवा मिलिटरीची मदत कशी घ्यावी, वाहनांची मदत कशी घ्यावी, ओढ्यांवर तात्पुरते लहान पूल कसे उभे करावेत, महत्त्वाचे फोन नंबर... इत्यादी खूप सविस्तर माहिती देणारे ते पुस्तक होते.

रामू हॉटेलवाला तयार झाला.

प्रत्यक्षात चपाती, आमटी, भाजी व दहिभाताचे जेवण चारशे लोकांना देण्याची ऑर्डर घेतली तरी आपण शार्टकट मारायचा असे त्याने ठरवले. आमटी करायचीच नाही. फक्त चपाती, भाजी आणि दहिभात द्यायचा. चारशेची ऑर्डर असली तरी साडेतीनशे लोकांचे जेवणच पाठवायचे. पाकिटे भरली की मोजली जातात म्हणून पाकिटे न भरता जेवण सरळ मोठ्या पातेल्यांतूनच पाठवायचे. बिल चारशे जेवणांचे करायचे. कालचा बराचसा भात उरला आहे. तो शिळा भात आजच्या गरम भातात मिसळून संपवून टाकायचा.

जेवण तयार करून त्याने मोठी पातेली अन्नपुरवठा खात्याच्या ट्रकमध्ये ठेवली.

ड्रायव्हर पिंटो ट्रक घेऊन निघाला.

रोज दुपारी अर्धी बाटली ढोसणाऱ्या पिंटोने आज अजिबात ढोसली नव्हती. त्यामुळे त्याने बलरामनगरात ट्रक नेण्याऐवजी बलभीमनगरात नेला. आपल्याला बलभीमनगरात जायेच आहे अशी त्याची समजूत होती.

ट्रक बलभीमनगरात शाळेच्या आवारात उभा राहिला तेव्हा शाळा चालू होती. कधी नव्हे तो शाळेच्या आवारात ट्रक आलाय म्हणताना सातवीची मुले भराभर बाहेर आली. ट्रकभोवती गोळा झाली. काही जणांनी चढून ट्रकचा हॉर्न वाजवला. काही जण मागे ट्रकमध्ये चढली.


पातेली उघडून पाहिल्यावर त्यांना चपाती, भाजी, दहिभात दिसला. भराभर काही मुले हेडमास्तांकडे पळाली व त्यांनी ही बातमी हेडमास्तरांना सांगितली. खोटी हजेरी भरण्याचे काम थांबवून, भराभर ते कुतुहलाने बाहेर आले.

ट्रकमधली पातेली पाहताच त्यांची खात्री पटली.

शिक्षणखात्याने एक नवीन योजना सुरू केली होती. साक्षरता वाढावी व जास्तीत जास्त मुले शाळेत यावीत म्हणून आठवड्यातून दोन वेळा सर्व मुलामुलींना खिचडी अथवा उप्पिट देण्याची योजना सरकारने नुकतीच काढली होती. ती अजून सुरू व्हायची होती.

तोच हा ट्रक आलाय आणि त्यात खिचडी, उप्पिटाऐवजी संपूर्ण जेवण आहे हे पाहून हेडमास्तर गोंधळले.

योजनेची सुरुवात उप्पिट न देता संपूर्ण जेवण देऊन सरकारने केली असावी हे हेडमास्तरांनी ओळखले. पुढच्या आठवड्यापासून उप्पिट देतील हे त्यांच्या लक्षात आले.



जेवण आले व ते आपल्यासाठी आहे हे समजताच मुले आनंदाने नाचू लागली. ''जेवायला बसायचं?''

''डबे आणू सर?''

''वर्गात वाढणार की व्हरांड्यात सर?'' असे प्रश्न विचारून मुलांनी शिक्षकांना भंडावून सोडले. मग शिक्षकही मुलांना दमदाटी करू लागले.

''काय काय जेवण आणलंय?'' हेडमास्तरांनी पिंटोला विचारले.

''चपाती, भाजी, दहिभात.''

''आणि ताटं?''

''ताटं पाठवली नाहीत. ताटं आपापली आणायची.''

''किती जणांचं जेवण पाठवलंय?''

''चारशे.''

''चारशे! पण शाळेत मुलं तर फक्त नव्वद आहेत आणि गावात तर एकच शाळा आहे.''

''बाकीचं काही मला ठाऊक नाय, चारशे माणसांचं जेवण हाय.''

''हे फक्त बलभीमनगरासाठीच ना? की पाच-सहा खेड्यांना मिळून हा ट्रक पाठवलाय?''

''फक्त बलभीमनगरासाठी. पण हे जेवण फक्त शाळेच्या मुलांसाठी नाय, हे सर्वांसाठी हाय. गावातल्या सर्वांसाठी हाय.''

आता हेडमास्तर पुन्हा पेचात पडले. नवीन काही योजना आली काय? गावाची लोकसंख्या वाढावी म्हणून आठवड्यातून एकदा गावाला जेवण अशी काहीतरी योजना असावी असे त्यांना वाटले. जेवणही बहुधा पौष्टिक असणार.

पण 'गावाला जेवण' म्हणजे ते आपले काम नव्हे, ते सरपंचाचे काम, म्हणून हेडमास्तरांनी शाळेतली दोन मुले सरपंच कुंभार यांच्या घरी पाठवली व 'ताबडतोब या' असा निरोप दिला.

सरपंच कुंभार लगेच शाळेकडे हजर झाले. हेडमास्तरांनी त्यांना घडलेली हकिकत सांगितली. लगेच कुंभार मोठ्या आनंदाने म्हणाले,

''ट्रकमधून जेवण पाठवलंय ना? मग ते आमदाराचंच काम. काल आमदाराच्या मुलाचं लग्न झालं. जिल्ह्याच्या ठिकाणी तर त्यांनी गावजेवण घातलंय. आपल्या बलभीमनगरातून त्याला जास्त मत पडलेत ना, मग तो इथे जेवण पाठवणारच. आमची आठवण ठेवली त्यांनी. विसरून कसं चालेल? शिवाय, आता लवकरच लोकसभा निवडणुका होणार. तो खासदारकीसाठी उभा राहणार असेल. त्याचीही पूर्वतयारी म्हणून हे जेवण. जिल्ह्याच्या ठिकाणाहून आलंय म्हणजे आमदाराचंच काम ते.''

''बरं जेवण आलंय. लोकांना वाढलं पाहिजे, पुढचं काय करणार बघा.''

''पुढचं सोपं आहे. लोकांना ताटं आणि पेले घेऊन या म्हणायचं. इथं शाळेच्या आवारातच बसवायचं. शाळेच्या मुलांनाही ताटं, पेले आणायला पाठवा. इथं पंगती मांडुया, रांगेत बसवुया. जेवण संपपर्यंत वाढत

राहायचं. इथली तीनशे माणसंच होणार फार तर. त्यांनी चारशे माणसांचं जेवण पाठवलंय. बाजूच्या बलभीमवाडीतली माणसं जेवायला बोलवुया. चला, चला. पटकन कामाला लागूया, दहा-बारा माणसं वाढण्यासाठी लावुया, चला, चला.''

पुढची कृती भराभर घडली. गावात बातमी समजताच लोक भराभर ताटं, वाट्या, पेले घेऊन जमले. काही जण आधीच जेवले होते, तेही आले! लोकांना रांगेत बसवण्यात आले. स्वयंसेवकाने त्यांना भरभर वाढले.

सरपंच कुंभारानी ड्रायव्हर पिंटोला विचारले,

''काय रे, फक्त चपातीभाजी, दहिभात एवढंच दिलंय?''

''होय. दिलंय तेवढं मी आणलं. बाकीचं मला ठावुक नाय''

''रसमलाई नाही? व्हेज पुलाव नाही? सांडगे-पापड नाहीत?''

''ते काय मला ठावुक नाय, एवढंच दिलंय बगा.''

''बाकीचं जाऊ देत. निदान आमदारसाहेबांनी स्वीट तरी पाठवायला पाहिजे होतं.''

हे वाक्य एका शिक्षकाने ऐकले व तो पटकन म्हणाला,

''आपण स्वीट अरेंज करुया काय, बघा.''

''आता?'' सरपंचाने शंका काढली.

''त्यात काय कठीण आहे? सोगनलाल मिठाईवाल्याला सांगायचं. सगळ्यांना काजुबर्फी दे म्हणून. तो लगेच आणून देतोय, त्याला किती वेळ लागतोय? काजुबर्फी आणायची. भराभर वाटून टाकायची.''

शिक्षकाने हे जरी सुचवले असले तरी प्रत्यक्षात कठीण आहे हे सरपंचानी ओळखले. लोकांनी जेवणास सुरुवात केलीच होती. आता सोगनलालला गाठायचे. गावात तो एकटाच मिठाईवाला. त्याच्याकडे एवढ्या लोकांना पुरेल एवढी काजुबर्फी असेलच असे नाही. म्हैसुरपाक, जिलबीसुद्धा एवढी नसणार. काही जणांना काजुबर्फी, काही जणांना जिलबी, इतराना म्हैसुरपाक असे वाढले तरी अर्धवट होणार. काजुबर्फी खाणारे 'आम्हाला जिलबी मिळाली नाही' म्हणून तक्रार करणार. शिवाय, हे सर्व मिठाईच्या दुकानातून आणायला ताट, पराती, मोठी पातेली जमवावी लागणार. ती जमवून आणेपर्यंत लोक जेवून उठणार.

''सोगनलाल काही उधार देणार नाही. त्याचे पैसे कोण भरणार?'' सरपंच.

''पैसे ग्रामपंचायतीनं भरायचे.'' हेडमास्तर.

''ग्रामपंचायतीकडे पैसे नाहीत. हा प्लॅन शिक्षकानं सुचवलाय. तेव्हा शाळेनं पैसे भरायचे.'' सरपंच जोरात म्हणाले.

''शाळेकडेही पैसे नाहीत.'' हेडमास्तर ठसक्यात म्हणाले.

''मग सोगनलाल उधार देतोय का विचारा.''

''तुम्ही विचारा.''

''तुम्ही विचारा, आम्ही का म्हणून?''

मग या वादात स्वीट रद्द झाले. तोपर्यंत लोकही जेवून हळूहळू उठत होते.

जेवणे झाल्यावर ड्रायव्हर पिंटो सरपंचाकडे आला. म्हणाला,

''माझं काय असेल ते देऊन मोकळं करा.''

'' तुझं? तुझं आणि काय?''

'' हे बघा सावकार, तुम्हाला जेवण मिळालं. अगदी फुकटात मिळालं. इकडं तुमच्या गावात डायरेक्ट मिळालं. श्रम मात्र मला पडले. त्यात आणि हे पावसाचे दिवस. रस्ते बाद झालेत. रस्त्यात चिखल. चिखलाच्या रस्त्यातून जेवण आणून तुमाला वेळेत पोचतं केलं.''

''बरं ठीक आहे, तुझे किती द्यायचे सांग.''

''एका ताटाला दोन रुपये. म्हणजे साडेचारशे गुणिले दोन. म्हणजे नऊशे रुपये होतात सावकार.''

''नऊशे कसे होतात? थांब जरा.''

म्हणून सरपंच कुंभारांनी खिशातली जुनी पावती काढली. पेन घेऊन त्या पावतीवर मागे गुणाकार केला. साडेचारशे गुणिले दोन.

''अकराशे होतात!'' सरपंच म्हणाले.

''अकराशे? बरं अकराशे तर अकराशे, देऊन टाका. मोकळं करा.'' ड्रायव्हर पटकन म्हणाला.

मग सरपंचाना संशय आला. ड्रायव्हर पटकन तयार कसा झाला? त्यांनी पुन्हा एकदा गुणाकार केला. तो आठ हजार एकशे निघाला. मग ते गुणाकार करत न बसता बेरजेच्या मार्गाला लागले. साडेचारशे अधिक साडेचारशे बरोबर नऊशे.''

''हां, नऊशे बरोबर होतात.''

''मी तेच सांगत होतो सावकार.''

''पण मी तुला नऊशे देणार नाही.''

''असं कसं होईल...'' पिंटो चकित होऊन म्हणाला.

''मी ताटाला एक रुपयाप्रमाणे धरणार. थांब जरा.''

असे म्हणून सरपंचाने पावतीच्या मागे साडेचारशे गुणीले एक असा गुणाकार केला. तो साडेचारशे आला.

''हं तर साडेचारशे होतात. मी तुला तेवढे देणार नाही.''

''असं कसं होईल सावकार...''

'' तू स्वीट आणलेलं नाहीस. मसालेभात आणला नाहीस. कांदाभजी आणली नाहीस...''

''पण वरून जे पाठवलंय ते मी आणलंय.''

''मी साडेचारशे देत नाही. फक्त तीनशे देणार.''

मग ड्रायव्हर पिंटोने विचार केला. तीनशे तर तीनशे. घेऊन टाकायचे. अन्नपुरवठा खात्याकडून आपल्याला जादा महापूर भत्ता मिळणार आहेच. हे तीनशे आयते मिळाले. शिवाय, परत जाताना 'श्री ट्रान्सपोर्ट'मधली लोखंडी स्पेअर पार्टस्ची पोती घेऊन जायची. तेवढेच ट्रान्सपोर्टचे पैसेही मिळतात. शिवाय एक दोन पॅसेंजर पुढच्या केबीनमध्ये बसवले तर त्यांचेही बस तिकिटाएवढे पैसे मिळतात.

मग सरपंचानी त्याला तीनशे रुपये काढून दिले. व 'आमदारांच्या ट्रकचा ड्रायव्हर. साडेचारशे रुपये.' असे डायरीत नोंद केले. पुढे ते ग्रामपंचायतीच्या खर्चात दाखवायचे त्यांनी ठरवले.

ट्रक निघून गेला.

इकडे बलरामनगरात सरपंच गावडे जेवणाच्या ट्रकची वाट पाहत होते. शाळेतल्या लोकांना, बायकामुलांना भूक लागली होती. जिकडेतिकडे पाणीच पाणी व चिखल झाल्यामुळे लोक शाळेच्या खोल्यांमध्येच बसून राहिले होते. पाऊस आता उघडला होता. पाणी ओसरण्याची शक्यता होती.

जेवणाचा ट्रक अजून कसा आला नाही म्हणून गावडे चिंतेत होते. खूपच उशीर झाला होता.

सरपंच गावडेंनी वाट पाहून जिल्हाधिकाऱ्याला फोन लावला तेव्हा जिल्हाधिकारी कुठेतरी मंत्र्याबरोबर पाहणीदौऱ्यावर गेल्याचे समजले. मग गावडेंनी उपजिल्हाधिकाऱ्याला फोन लावला तेंव्हा त्याला काहीच माहीत नसल्याचे समजले. 'चौकशी करून सांगतो. पंधरा मिनिटांनी फोन लावा.' असे त्याने सांगितले.

पंधरा मिनिटांनी उपजिल्हाधिकाऱ्याला फोन लावला तेव्हा तो म्हणाला. ''तुमारा बलरामनगरका लंच भेजनेका काम फुड अँड सप्लाय ऑफिसने लिया है, तुम्ही असं करा. दहा मिनिटांनंतर फूड अँड सप्लाय ऑफिसला फोन लावा.' असे म्हणून त्या ऑफिसचा फोन नंबर दिला.

दहा मिनिटांनंतर गावडेंनी फूड अँड सप्लाय ऑफिसला फोन लावला तेव्हा एका क्लार्कने 'बलरामनगर आमच्या विभागात येत नाही. ते दक्षिण विभागात येते' असे उत्तर दिले. मग 'वरच्या अधिकाऱ्याकडे फोन द्या' म्हणून गावडेनी सांगताच त्या क्लार्कने वरच्या अधिकाऱ्याकडे फोन दिला. हे दक्षिण विभाग प्रकरण काय आहे हे गावडेंना समजेना. अन्नपुरवठा खात्याचे जर पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर वगैरे काही भाग पाडले असतील तर ते केव्हा पाडले आणि आम्हाला का कळवले नाहीत?

आज नदाफऐवजी तिकडे जामदाडे नावाचा अधिकारी ड्युटीवर होता. तो म्हणाला,

''ट्रक पाठवलाय की हो तुम्हाला. किती वेळा तुम्हाला जेवणाचा ट्रक पाठवायचा?''

''हे बघा, इथे ट्रक पोचला नाही...''

''पोचला नाही त्याला आम्ही काय करणार?''

''पण ट्रक पोचत कसा नाही?'' गावडेंनी चिडून विचारले.

''तुम्ही मॅड आहात काय हो? कसा पोचत नाही म्हणजे आम्ही काय सांगणार? एखाद्या वेळेस ट्रकला ॲक्सिडेंट झाला असेल. वाटेत दरोडेखोरांनी ट्रक लुटला असेल, चाक पंक्चर झालं असेल, ट्रक कदाचित चिखलात रुतला असेल, ड्रायव्हरला हार्ट ॲटक आला असेल, ड्रायव्हकडे लायसेन्स नाही म्हणून पोलिसांनी वाटेत आडवला असेल. कदाचित रस्ता रोकोमध्ये अडकला असेल...''

आता मात्र गावडे चिडले. म्हणाले,

''तुम्ही उलट उत्तर देताहात. सरपंचाशी बोलण्याची ही पद्धत नव्हे लक्षात ठेवा. 'ट्रक न पोचण्याची शंभर कारणे' हे पुस्तक तुम्ही हाता घेऊन बसला आहात का? ही पद्धत नव्हे. इथे महापुरातल्या लोकांना भूक लागलेय आणि तुम्ही बेफिकिरी दाखवत आहात. तुमचा क्लार्क वेगळंच सांगतोय. बलरामनगर दक्षिण विभागात येतंय म्हणे. हा मध्येच दक्षिण विभाग कुठला आला?...'

''हे पाहा जिल्ह्याचे दक्षिण आणि उत्तर असे विभाग होणार आहेत. अजून झाले नाहीत. आणि विभाग झाल्यावरही बलरामनगर उत्तर विभागातच येणार.''

''ते जाऊ देत, इथं लोक भुकेनं हैराण झालेत. तुम्ही विचारता ट्रक किती वेळा पाठवायचा म्हणून. वर आणि ट्रक न पोचल्याची काल्पनिक कारणं सांगता. ट्रक इथं एकदासुद्धा आला नाही. इथं लोक भुकेनं मरायला टेकलेत...''

''तुम्ही जिवंत आहात ना? मग झालं.''

''मी खणखणीत जिवंत आहे घ्या, आठ-दहा सरकारी अधिकाऱ्यांना खांदा दिल्याशिवाय मी मरत नाही लक्षात ठेवा, मी धडधाकट आहे.''

‘‘मग आमचा ट्रक तुम्ही जिवंत असतानाच पोचतोय घ्या, काळजी नको. मात्र एक, तुमच्या गावाला ट्रक जेवण देऊन आला असेल तर पुन्हा पाठवणार नाही हेही लक्षात ठेवा.’’ असे म्हणून जामदाडेंनी फोन खाली ठेवला.

सरपंच गावडे वैतागले. त्यानी थोडा वेळ ट्रकची वाट पाहिली व त्या गावातल्या इतर लोकांकडून खाद्यपदार्थ जमवले. भाकरी, शेवचिवडा, भात, फळं, लाडू, चुरमुरे, बिस्किटे वगैरे काय मिळेल ते जमवून पूरग्रस्तांची सोय केली.

दुसऱ्या दिवशी गावडेंनी सरळ जिल्हाधिकाऱ्यालाच फोन लावला. त्यांनी उत्तर दिले,

‘‘तुमचं काम होतंय. पंधरावीस वीस दिवसात काम होतंय, सँक्शन झालेलं आहे. वरती सहीसाठी गेलंय.’’

मग सरपंच गावडेंनी ‘आपलं सँक्शन वगैरेचं काम नसून’ पूरग्रस्तांसाठी जेवणाचा ट्रक पाठवण्याचं काम आहे हे सांगितले. शिवाय, काल ट्रक न पाठवल्याची तक्रारही केली. जेवण न आल्यामुळे खाद्यपदार्थ वाटून आपण तात्पुरती सोय केल्याचेही सांगितले. तेव्हा जिल्हाधिकारी म्हणाले,

‘‘तसे कुठलेही पदार्थ द्यायचे नसतात हो. शिळे पदार्थ असतात. रोगराई पसरते. पटकी, कॉलरा, गॅस्ट्रोची साथ पसरते. मग आम्हाला उपदव्याप, डॉक्टर पाठवा, औषधं पाठवा. बरं असं करतो. मी चौकशी करतो आणि जेवणाच्या ट्रकबाबत दहा मिनिटांनी मीच तुम्हाला फोन करतो.’’

असे म्हणून जिल्हाधिकाऱ्याने फोन ठेवला.

पंधरा-वीस मिनिटानंतर जिल्हाधिकाऱ्यांचा फोन आला, गावडेंनी मोठ्या उत्सुकतेने फोन घेतला. जिल्हाधिकारी सांगू लागले,

‘‘हे पाहा, मी एकदम कडक माणूस आहे. काल तुम्हाला जेवणाचा ट्रक आम्ही पाठवला आहे. ‘ट्रक पाठवला नाही.’ ही तुमची तक्रार खोटी आहे. आज मी तुम्हाला मुळीच ट्रक पाठवणार नाही. काल तुम्हाला ट्रक पाठवलाय. ट्रक नंबरसुद्धा आमच्याकडे नोंद आहे. त्या ट्रकला पिंटो नावाचा ड्रायव्हर होता. पाचशे लोकांचं जेवण पाठवलंय. तुमची माणसं भरपूर जेवलीत. वर आणि तुम्ही ड्रायव्हरला विचारलंत म्हणे, स्वीट, मसालेभात आणि कांदाभजी कुठं आहेत म्हणून. हे काय लग्नाचं जेवण आहे? की मुंजीचं! की कुणाच्या वास्तुशांतीचं? की बारशाचं? आम्हाला खेड्यापाड्यात अन्न, वस्त्र आणि जीवनावश्यक वस्तू पूरग्रस्तांना पाठवेपर्यंत पुरे पुरे झालंय. माणसं कमी पडतात. ट्रक कमी पडतात. पावसानं रस्ते बंद झालेत आणि तुम्हाला स्वीट, मसालेभात पाहिजे? ट्रक पाठवूनही वर आणि ‘पाठवला नाही’ म्हणत तुम्ही खोटारडेपणा करता? सरकारनं तुमची ग्रामपंचायत बरखास्त का करू नये? सरपंचपद रद्द का करू नये? अनेक खेडी पुरात सापडली असता, तुम्ही सरकारला फसवल्याचा खटला तुमच्यावर का भरू नये? पाचशे लोकांचे जेवण परस्पर इतरांना विकून बलरामनगरच्या पूरग्रस्ताना फसवल्याबद्दल तुमच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप कां करू नये? मी कडक आहे. लक्षात ठेवा. या सर्वांचा तुम्हाला जाब द्यावा लागेल. शुक्रवारी दुपारी दोन वाजता माझ्यासमोर येऊन हजर व्हा. सर्व गोष्टींचा खुलासा करा.’’

असे म्हणून जिल्हाधिकाऱ्याने फोन ठेवला.

आता मात्र सरपंच गावडे पुरते वैतागले. पूरग्रस्तांचे हाल चाललेत ते चाललेत. सरकारी मदत नाहीच. वर आणि आपल्यावरच खोटारडेपणाचे व भ्रष्टाचाराचे आरोप! हा कसला उलटा न्याय?

काय करावे ते त्यांना सुचेना. शुक्रवारी कसला खुलासा करायचा? काय सांगायचे? त्यांना घाम फुटला.

आणि पंधरा मिनिटांतच अन्नपुरवठा खात्याच्या कचेरीतून सरपंच गावडेंना फोन आला. तो फोन कुलकर्णींचा होता. ते सांगत होते.

‘‘आता जिल्हाधिकाऱ्यांचा फोन आला होता ना? तुम्ही काही घाबरून जाऊ नका. त्याचं काय झालंय, जिल्हाधिकाऱ्याचं एका तरुणीबरोबरचं लफडं त्यांच्या बायकोनं पकडलं. त्यामुळे ते चिडले. त्यामुळे जिल्हाधिकारी वैतागलेत. खरं म्हणजे ते कडक वगैरे अजिबात नाहीत. पंचायत वगैरे बरखास्त करत नाहीत. सरपंचपदही रद्द करत नाहीत. तुम्ही अजिबात घाबरू नका. पण शुक्रवारी मात्र दोन वाजता जरूर या. जिल्हाधिकाऱ्यांना भेटण्यापूर्वी मला भेटा आणि असं करा, एका पाकिटात एक हजार रुपये घालून या. पाकिट डायरेक्ट जिल्हाधिकाऱ्यांकडे देऊ नका, त्यांचा मूड कसा असेल सांगता येत नाही. पाकिट आणून माझ्याकडे द्या. पुढचं सगळं मी बघतो.’’

असे म्हणून कुलकर्णीने फोन ठेवला. कपाळावर हात मारून सरपंच गावडे मटकन खालीच बसले.

---

**– सुभाष सुंठणकर**
२२१/१, दी आदर्श को. ऑप.
क्रे. सोसा. इमारत, शनी मंदिराजवळ,
कपिलेश्वर रोड, बेळगांव-५६०००२
दूरध्वनी : ०८३१-२४२५६८४

# चेतन भगत व त्यांच्या कादंबऱ्या

**कार्तिक सीतारामन**
अनुवाद : अभय पाटील

काहीतरी नेमकं सांगायचा प्रयत्न आहे खरा, पण थोडा कमी पडणारा. छान वाटतं–पण अगदी झोकून वाचावं असं मात्र कधी वाटत नाही. काही अंतर्वेधी विचार आहेत खरे, पण त्यात पुरेशी खोली जाणवत नाही. सध्या चलती असलेल्या बेस्ट सेलर चेतन भगतच्या प्रत्येक नव्या पुस्तकाच्या वाचनाबरोबर माझ हे 'वाटणं' जास्तच दृढ होत गेलं. चेतन भगतचं अगदी वर्गीकरणच करायचं म्हटलं तर त्याचं लेखन हे चित्रपटाच्या पटकथेचा पहिला खर्डा आणि उदयोन्मुख कादंबरीकरचा स्तुत्य प्रयत्न या दोहों दरम्यान कुठेतरी मोडतं असं मला वाटतं!
भगताच्या पहिल्याच पुस्तकावर (फाईव पॉइंट समवन) वाचकांच्या अक्षरशः उड्या पडल्या. भारतातल्या सर्वोत्कृष्ट इंजिनीयरिंग संस्थेचा– आय.आय. टी.चा विद्यार्थी. तिथल्या त्याच्या अभ्यासाव्यतिरिक्तच्या शिक्षणावर बेतलेली ही कादंबरी. होस्टेलच्या एका खोलीत राहणाऱ्या तीन मित्रांभोवती कथानक फिरतं. तिथली हृदयशून्य व्यवस्था त्यांना भविष्यातले उच्च कोटीचे अभियंते बनवण्याच्या नादात अगदी पिळून काढत असते.
त्याची दुसरी 'वन नाईट @ कॉल सेंटर'. कठोर आणि कष्टप्रद वातावरणात संपूर्ण बुडालेल्या, बाकीच्या संवेदनाच हरवून बसलेल्या– एका कॉल सेंटरमधल्या चमूची ही गोष्ट आहे. एका रात्री यातल्या सहा पात्रांना 'कॉल' येतो तो प्रत्यक्ष परमेश्वराचा! ते एकाएकी त्यांच्या अतिमानवी गुंगीतून खाडकन् जागे होतात. आपल्या आयुष्याची सूत्रं हाती घेतात ते अगदी आपलं आयुष्य मुळापासूनं बदलण्यासाठी– सुरळीत करण्यासाठी. आणि ते सर्व घडतं केवळ एका रात्रीत. अर्थात, इश्वरेच्छा बलियसी– दुसरं काय बरं म्हणणार! भगतांच्या सर्वात अलिकडच्या कादंबरीचं शीर्षक थोडंसं उपरोधिक आहे– 'माझ्या आयुषातल्या तीन चुका'. इथे लेखक नेहमीपेक्षा थोड्या खालच्या सामाजिक, आर्थिक स्तरावर उतरतो. पहिल्या

कादंबरीतल्या एका पात्राचा अपवाद वगळता त्यांची सगळी पात्र ही बुद्धिमत्ता, शिक्षण आणि आर्थिक सुबत्ता याबाबतीत भारतातल्या अल्पसंख्य अभिजन मंडळीमध्ये मोडतात असं म्हणायला हरकत नाही. इथे लेखक काही पायऱ्या खाली उतरतो. गोष्ट आहे– पुन्हा एकदा– तीन मित्रांची. अहमदाबादमधल्या नम्र मध्यमवर्गातलं इथे चित्रण आहे.

या तिन्ही कादंबऱ्यांत प्रकर्षान जाणवणारी गोष्ट म्हणजे लेखक अगदी जाणीवपूर्वक 'तारुण्य' हाच कथानकाचा केंद्रबिंदू ठेवतो. यातला तरुण कथानायक सुरुवातीला उच्छृंखल, भरकटलेला, भिरभिरणारा, दिशाहीन असा असतो– आणि मग अशी काही गोष्ट घडते की तो अगदी जणूकाही वीर पुरुषच, हीरोच, बनून जातो. लेखकाची शैली प्रथमपुरुषी गोष्ट सांगण्याची आहे– तो स्वतःच एक पात्र बनतो. त्यामुळे होतं काय, की बाकीच्या पात्रांची वाचकांशी पुरेशी ओळख न होण्याचा धोका संभवतो. मग कधी कथानायकाच्या ऐवजी दुसरंच पात्र भाव खाऊन जातं. अर्थात, आपण असं प्रत्यक्ष घडतानाही पाहतो हेही तितकंच खरं, नाही का? ''वन नाईट..''मध्ये भगत याही पुढे जातात. रेल्वेतल्या रात्रीच्या प्रवासाची गोष्ट सुरू होते, लेखक (पात्र नव्हे) सांगतोय अशी. मग त्यातल्याच एका पात्राला लेखक निवेदक करतो– आणि आता गोष्ट त्या पात्राच्या तोंडून आपण ऐकू लागतो. आणि अचानक एक चमत्कृतीपूर्ण धक्का देत लेखक आपल्याला मूळ निवेदकाकडे नेतो ज्याच्या गोष्टीतल्या एका पात्राला त्यांनी आधी निवेदक केलेलं असतं. गोंधळ उडाला ना? साहजिक आहे!

दुसरी गमतीची गोष्ट ही की या सर्व कादंबरीतले कथानायकांचे मित्र हे साधारण एकाच साच्यातले आहेत. एक मित्र असतो घुमा, शांत तर दुसरा आक्रमक– नमुनेदार आधुनिक शहरी पुरुष म्हणू हवं तर. कथानायक त्यांच्यातला दुवा असतो– त्याच्या मते त्यांना सांधणारा. त्याची त्यामधे फरफटही होताना दिसते.

हे मात्र मान्य करायलाच हवं की भगतांची पात्र, त्यांचा भवताल, त्यांचे परस्पर संबंध हे सर्व वास्तववादी असतं आणि लेखक ते मांडतोही तसंच. तरुणांपुढचे प्रश्न, त्यांचं भावविश्व, त्यांचं ते आळस झटकून देणं, स्वतःच्या स्वप्नांपलीकडे पाहायला शिकणं हे अगदी अस्सल उतरतं यातही वाद नाही. पण तरीसुद्धा वाचताना आपण तल्लीन का होत नाही प्रश्न माझ्यापुरता तरी उरतोच! कदाचित, आधी म्हटल्याप्रमाणे, कादंबरीकडून ज्या खोलीची अपेक्षा असते– ती जाणवत नाही हे एक कारण असावं. त्यांनी पात्रांच्या, केवळ कथानायक नाही तर सर्वच, व्यक्तिमत्त्वाचे स्तर उलगडून दाखवावेत असं वाटतं. भगत व्यक्तिरेखांची ओळख सशक्तपणे करून देतात पण पुढे मांडणीला, आकृतिबंधाला अवाजवी महत्त्व देतात आणि त्या नादात व्यक्तिरेखा फुलवण्याकडे त्यांचं दुर्लक्ष होतं. कधी कधी कथावस्तू तुकड्यातुकड्यात, ओढूनताणून बेतलेली वाटते, मूळ रूपाशी असंगत आणि काही वेळा तर अगदी विचित्र वाटते. (उदा. 'वन नाईट' आणि काही प्रमाणात 'थ्री मिस्टेक्ससुद्धा') लेखकालाही त्याच्या या मर्यादेची जाणीव आहे हे 'वन नाईटचा' शेवट वाचताना जाणवत! लेखक इथे, जरा अनपेक्षितपणे, वाचकाच्या भूमिकेत शिरतो आणि मूळ निवेदकाच्या अतिमानवी, दैवी भूमिकेच्या विश्वासार्हतेबद्दलच प्रश्न उपस्थित करतो. मूळ निवेदक– जो स्वतःच दैवी अंश असतो– उत्तरतो– श्रद्धा! अप्रत्यक्षपणे लेखकही वाचकाला माझ्यावर विश्वास ठेव असाच सल्ला देतो आहे, जणू असं वाटतं. हे मला तरी काही सुसंगत वाटत नाही.

सहज आणि सोपं– भगतांच्या लिखाणाच्या या गुणधर्माविषयी मात्र वादाला जागा नसावी. प्रवासात वाचायला उत्तम. एका रात्रीसाठी वाचायला काही हवं असेल तर भगतसाहेबांच्या कादंबऱ्या तुम्हाला निराश करणार नाहीत. एका रात्रीत (ONE NIGHT!) एक कादंबरी अगदी हमखास वाचून संपवू शकाल. मग दिवसभर तुमचं काम करायला तुम्ही मोकळे. रात्री वाचलेल्या गोष्टींचा विचारही करावासा तुम्हाला वाटणार नाही. अर्थात, वाचलेलं सकाळपर्यंत तुमच्या लक्षात राहिलं असेल तर म्हणा!

**– अभय पाटील**
abhay.patil@gmail.com

WISH YOU
HAPPY DIWALI
AND
A
PROSPEROUS
NEW YEAR



FROM A WELL WISHER

RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001




'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता जयमल्हार प्रिंटिंग प्रेस, २१७, आशीष इंडस्ट्रियल इस्टेट, दादर (प) येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.